इतिहास - ४९ सन १८७१

लेखक - विनायक जनार्दन कीर्तने

पु. नांव - मध्य हिंदुस्थानाचा इतिहास.

(श्री प्रिंटर्स ॲण्ड स्टेशनर्स, टाणे)



A MEMOIR

OF

# CENTRAL INDIA

INCLUDING

## MALWA AND ADJOINING PROVINCES

WITH THE HISTORY AND COPIOUS ILLUSTRATIONS

OF THE

PAST AND PRESENT CONDITION OF THAT COUNTRY

BY

MAJOR GENERAL SIR JOHN MALCOLM, G. C. B., K. L. S

TRANSLATED INTO MARÁTHÍ

BY

VINÁYAK JANÁRDAN KÍRTANE,

AUTHOR OF THE ELDER MÁDHAVRÁO PESHWA AND JAYAPÁL

SUPERINTENDENT, STATE EDUCATION, INDORE.

## Vol. I.

*Registered under Act XXV. of* 1867.


Bombay:

PRINTED AT THE "INDU-PRAKÁSH" PRESS.

1871.

*Price Rs.* 3½.

BUDHAWAR PETH POONA.

# मध्य हिंदुस्थानाचा इतिहास.

हा ग्रंथ

मेजर जनरल सर जॉन मालकम, जी. सी. बी., के. एल. एस.

यांणीं मूळ केला.

त्याचा मराठी तरजमा

## विनायक जनार्दन कीर्तने,

सुपरिन्टेंडंट, स्टेट एड्युकेशन इलाका सरकार होळकर,

यांणीं केला तो

मुंबईंत

"इंदुप्रकाश" छापखान्यांत बापू मोरेश्वर याणीं छापिला.

भाग १.

सन १८७१.

किंमत ३। रु०.

(आक्ट नं. २५ सन १८६७ या प्रमाणें रजिस्टर केला आहे.)

DEDICATED

TO

H. H. MAHÁRÁJA TUKOJÍRÁO HOLKAR
BÁHÁDOOR, G. C. S. I.,

BY

HIS MOST OBEDIENT AND FAITHFUL SERVANT

THE TRANSLATOR.

श्रीमंत महाराज तुकोजीराव होळकर

बाहादुर, जी. सी. एस. आय.,

यांस हा ग्रंथ

अति नम्र सेवक

विनायक जनार्दन कीर्तने

याणें

अत्यंत आदरानें नजर केला असे.

# प्रकरण १.

सांप्रतकाळीं ज्या देशास **मध्यहिंदुस्थान** ह्मणतात त्याचा नकाशा या ग्रंथास जोडला आहे. त्यांत एकवीसपासून पंचवीस उत्तर अक्षांश व त्र्याहात्तरपासून ऐंशी पूर्व रेखांश यांमधील प्रांताचा समावेश होतो. ह्मणजे उत्तरेस **मेवाडांतील चितोड** नगरापासून दक्षिणेस **तापी** नदीपर्यंत, आणि पूर्वेस **बुंदेलखंडापासून** पश्चिमेस **गुजराथेपर्यंत.** पूर्वी जितके प्रांत सुभा माळव्यांत मोडत होते तितके सारे यांत दाखल होतात.[१] इतक्या विस्तीर्ण प्रदेशास माळवा हें साधारण नांव दिलें गेलें होतें. हें नांव खास माळवाप्रांताच्या पुरातन हद्दीवरून दिलें गेलें होतें असें दिसत नाहीं. दिल्लीच्या बादशाहांच्या सोईवरून व व्यवहाररीतीवरून दिलें गेलें होतें असें दिसतें. त्यांच्या विस्तीर्णराज्याचे सुभे अथवा सरकारें पाडलीं असत. प्रत्येक सुभ्यावर एक सुभेदार अथवा वजीर असे; आणि सुभेदाराच्या अथवा वजीराच्या ताब्यांतील प्रांतांपैकीं जो मुख्य प्रांत असे त्यावरून त्याच्या सर्व सुभ्याचें

१ अइन अकबरीचा ग्रंथकार अब्बुलफजल, ज्याच्या आधारानें बहुतेक युरोपांतील भूगोलवेत्ते चालतात, त्याच्या लेखाप्रमाणें ह्मटलें तर माळव्याचा सुभा बेवीस आणि पंचवीस उत्तर अक्षांश व पंचाहत्तर आणि अठ्याहत्तर पूर्व रेखांश यांमध्यें आहे. याची उत्तरसीमा नरवर आणि एक डोंगराची रांग यांणीं बांधली जाते. दक्षिण सीमा बागलाण; पश्चिम सीमा अजमीर व गुजराथ. या सुभ्याचा विस्तार नंदुरबारेपासून चंदेरी पावेतों दोनशें तीस कोस, आणि गढ्यापासून बांसवाड्यापर्यंत दोनशें पंचेचाळीस कोस आहे.

[library stamp]

बहुधा नांव पडे. अशीं दिलेलीं नांवें भूप्रदेशाच्या धोरणानें नसत व दरबारी व्यवहाराच्या धोरणानें असत असें ह्मणण्यास विशेष मजबूत आधार हा होय कीं, मुसलमानी अमलांत सुभ्यांच्या हद्दी वेळोवेळीं बदलत असत. तथापि एकंदरीनें पाहतां मोगल बादशाहांचे परवाने व त्यांच्या राहाटी हीं दोन्हीं, आपल्या हिंदु प्रजेच्या अनादि स्थापित वहिवाटीस बदलूं सकलीं नाहींत; व त्यांच्या पूर्वजांनीं आपल्या देशांस दिलेल्या नांवाचा व ठरविलेल्या हद्दींचा त्यांस विसर पाडूं सकलीं नाहींत. यामुळें सुभ्यांचीं नांवें कांहीं ठरलीं तरी हिंदुस्थानाचे प्राचीन विभाग लोक चालवीतच आले. उदाहरणार्थ, मुसलमान लोक माळवा या नांवाखालीं खास माळव्याखेरीज, त्या सुभ्याच्या ताब्यांतील परंतु वस्तुतः निराळे असे कित्येक प्रांत, दाखल करीत. वायव्येकडील हारावती प्रांत, दक्षणेकडील नेमाडप्रांत आणि पश्चिम व वायव्य दिशेकडील राठ, वागड, कांथळ हे डोंगराळ प्रदेश व कांहीं मेवाडचा भाग इतके सर्व ते लोक माळव्यांतच मोडीत; परंतु हिंदवीलेखांप्रमाणें पाहिलें तर दक्षिणेस विंध्याद्रीपासून उत्तरेस चितोड आणि मुकुंद्रा डोंगराची रांग येथपर्यंत, आणि पूर्वेस भोपाळापासून पश्चिमेस दोहदपर्यंत जेवढा एक सारखा वरघाटी सपाट प्रदेश आहे तेवढ्याचा मात्र माळव्यामध्यें समावेश होतो. या लेखास सृष्टिजन्य सीमांचाही चळकट पुरावा जोर आणितो. या सीमांमधील देशाचें एकसारखें स्वरूप आहे. आणि यांच्या बाहेर कोणीकडेही गेलें असतां देशाच्या स्वरूपांत व उंचींत अंतर दिसल्या शिवाय राहत नाहीं. खास माळव्याचें थोडक्यांत असें वर्णन करतां येईल कीं, हा वरघाटी बहुधा खुला व उत्तम तऱ्हेनें आबाद केलेला प्रदेश आहे. यांत मध्यें कोठें कोठें लहान लहान गोपुच्छाकार टेंकड्या, कोठें कोठें पठारी टेंकड्या व कोठें कोठें लहान डोंगरांच्या रांगी आहेत. पुष्कळ नद्या व लहान लहान ओहोळ यांच्या योगानें पाण्याची सुबत्ता आहे. जमीन उमदी पिकाऊ आहे आणि हवा सौम्य आहे. या साऱ्यागोष्टी मनुष्यांस आरोग्य देण्या-

स व त्यांच्या निर्वाहाच्या व सुखचैनीच्या वस्तूंचा यथेच्छ पुरवठा करण्यास कारणीभूत आहेत.

---

१ मुख्य नद्या चम्मल, व चमला, मोठी व धाकटी काळी सिंध, मही, क्षिप्रा, पार्वती, नेवी, आणि आहूर या होत. पूर्व पश्चिम वाहिनी नर्मदा आणि तीस मिळणाऱ्या कांहीं लहान नद्या, यथार्थ पाहतां जरी या प्रांताच्या हद्दींत नाहींत, तरी त्या वर सांगितल्या नद्यांत लेखल्या पाहिजेत. माळव्यांतील बाकीच्या सर्व नद्या उत्तर वाहिनी आहेत.

माही नदी जरी गुजराथेंत भव्य व रुंद आहे तरी माळव्यांत हिला कोठेंही फारसी रुंदी किंवा खोली नाहीं. इचा उगम अमझऱ्याचे पश्चिमेस पांच मैलांवर (२॥ कोस) एका लहानशा मैदानांत आहे. तेथून भोपावर पर्यंत जाऊन पुढेंही वागड प्रांताच्या उत्तर सीमे पावेतों उत्तर दिशा धरित्ये. वागडाच्या सर हद्दीवर जो डोंगर आहे तो मुंगाण्या गांवाजवळ एकाएकीं हिला पश्चिमेकडे वळण देतो. पुढें थोडक्यांत मेवाडच्या उंच पर्वतामुळें हीही दिशा बदलत्ये. नंतर तेथून दक्षिण दिशेकडे वळत्ये आणि पुढें फारसा फेरफार न होतां त्याच दिशेनें जाऊन खंबायत शहराजवळ खंबायताच्या अखातांत समुद्रास मिळत्ये. ग्या नदींत मुखापासून बारा अथवा पंधरा मैलांहून वर, जहाजें जाऊं शकत नाहींत कारण हिच्यांत पुष्कळ उथळ जागा आहेत.

चम्मल नदीचा उगम विंध्याद्रींत महूच्या छावणीजवळ नैर्ऋत्येस नऊ मैलांवर आहे. परंतु या ठिकाणीं उन्हाळ्यांत पाणी नसतें. त्या काळांत या नदीस इतर मिळणाऱ्या ओहोळांतून पाण्याचा पुरवठा होतो. हिचा ओघ बहुतेक ठिकाणीं शांत आहे, तळ खडकाळ आहे, आणि माळव्यांत हिच्यांत पुष्कळ उथळ ठिकाणें आहेत. परंतु मुकुंदरा रांगीच्या दऱ्यांतून निघून एकदां हारावती प्रांतांत शिरली ह्मणजे, तेथून पुढें ही भव्य व खोल नदी आहे असें दिसतें.

नर्मदेच्या पात्राची बारीक पाहणी केल्यानें असें दिसून आलें आहे

माळव्याच्या सपाटीची उंची कांहीं ठिकाणीं मात्र समुद्राच्या सपाटी पासून दोन हजार फुटांहून अधिक आहे. तथापि या प्रांतांतील नद्या ज्या ज्या प्रदेशांतून सागरास मिळावयास जातात त्या त्या प्रदेशाच्या समस्वरूपावरून, व खुद्द नद्यांच्या तटाकांत कोठेंही फेर दिसत नसल्यावरून असें अनुमान करण्यास फारशी हरकत नाहीं कीं, हिंदुस्थानांतील उत्तर सीमेचा पर्वत आणि नर्मदा नदी यां मधील बहुतेक भागाहून माळव्याची भूमि अधिक उंच आहे. कदाचित् अमरकंटकाची भूमि जेथं नर्मदेचा उगम आहे तेथं माळव्याहून उंच असेल, परंतु अमरकंटकाची उंची देखील माळव्यास लागून असलेला जो मध्यवर्ती पर्वत, उत्तर हिंदुस्थान व दक्षिण हिंदुस्थान असे या देशाचे दोन भाग पाडतो, त्याच्या उंचीपेक्षां कमी आहे असें दिसून येईल.

वायव्ये खेरीज इतर दिशांकडून माळव्याकडे भूमि चढत चढत आली आहे. दक्षिण दिशेस ह्या प्रांताची उंची नेमाडाहून ह्मणजे नर्मदेच्या खोंड्याहून सतराशें फूट अधिक आहे. आणि या दिशेस विंध्याद्रीचा कडा तुटला असल्यामुळें ही उंची थोडक्या अंतरांत नजरेस येते. उत्तरेच्या बाजूस विंध्याद्रीस फारच थोडा उतार आहे. पूर्वेकडे व पश्चिमेकडे माळव्याचा चढाव जरी वर लिहिल्यापेक्षां कमी

---

कीं, समुद्रापासून तुलुक वाड्याच्या पलीकडे अकरा मैलपर्यंत लहान गलबतें फिरूं सकतात. हें अंतर शंभर मैलांहून अधिक आहे. येथून पुढें ९० मैलांपर्यंत जंगली व डोंगराळ प्रदेश लागतो. यांत कोठें कोठें नर्मदेचें पात्र इतकें निरुंद होतें व तिच्या ओघांत इतके खडक व इतकीं उथळ स्थळें आड येतात कीं, येथें गलबतें चढणें केवळ अशक्य आहे. पुढें हरिणफाळाच्या वरही ती निरुंद व वेगवती आहे. परंतु पुनः चिखलद्या जवळ गलबतांतून फिरण्यास योग्य होत्ये आणि येथून पुढें कांहीं ठिकाणा खेरीज (याठिकाणीं जमीनीवरून लहान रस्ते होऊं सकण्यासारखे आहेत) हुसंगाबादेच्या पूर्वेपर्यंत तसीच राहते.

आहे तरी; आसपासच्या डोंगराळ प्रदेशाहून त्या प्रदेशाची विशेष उंची स्पष्ट नजरेंत भरण्या जोगी आहे. हे डोंगराळ प्रदेश विंध्याद्रीच्या शाखांनीं झाले आहेत; व पूर्वेस भोपाळास लागून आहेत आणि पश्चिमेस माळवा, व गुजराथ आणि मेवाड यांच्या मध्यें आहेत. वायव्य दिशेस मेवाडच्या अंगास चितोडच्या रांगेजवळ सरासरी दोनशें फुटांचा चढाव आहे; परंतु येथपर्यंत या दिशेस माळव्याची भूमि याहून अधिक उतरत आली आहे आणि त्यापलीकडे पश्चिमेस पुनः उतरूं लागते. यामुळें मेवाडच्या अतिउंच प्रदेशाखेरीज दुसरा कोणताही भाग माळव्याच्या दक्षिण भागाच्या सपाटी इतका उंच धरवत नाहीं.

माळव्याची हवा एकंदरीनें सौम्य आहे इतकेंच नाहीं; तर तेथें वर्ष अखेरीच्या कांहीं महिन्यां खेरीज, ऊष्णमापक यंत्रांतील पाऱ्याच्या चढ उताराचा छट्टाही इतर ठिकाणा पेक्षां कमी असतो. त्या काळीं मात्र वारंवार हवेंत एकाएकीं फार बदल होत असतात. हिंदुस्थानांतील इतर भागा प्रमाणें येथेंही, पावसाळा संपतांच आरंभीं दोन महिने जरी तापाची सात असत्ये (त्या दिवसांत डोंगरी व जंगली प्रदेशांत जाऊं नये.) तरी एकंदरीनें पाहातां माळव्याची हवा निरोगी ह्मटली पाहिजे.[२] आणि हिंदुस्थानाच्या विशेष सखल व उष्ण प्रदेशांत फार काळ राहून निःशक्त झालेल्या लोकांस तर सुखदायक व पुष्टिकारकच होय. येथें

---

१ जसें दोहद पश्चिमेस, माळव्याच्या बरोबर सरहद्दीवर आहे तसें-च भोपाळ प्रांतांची राजधानी भोपाळ हें पूर्वेस आहे. भोपाळची एक वेस माळव्यांत लेखिली जाते व त्याच्याच समोरची दुसरी वेस गोंडवनां-त लेखिली जाते.

२ माळव्यांतील लोकांत फार चालू रोग ताप होय. वर्ष अखेरीस हिंवताप सुरू होतो. चंबल नदीच्या पश्चिमेस पोटांतील पाणथरीचा रोग साधारण आहे. असाही शोध लागला आहे कीं, जरीमरीची सात आलीकडे सर्व हिंदुस्थानभर पसरली आहे ती, या प्रांतांत हमेशा असते.

वर्षाचे ऋतु पश्चिम हिंदुस्थाना प्रमाणेंच आहेत; आणि त्यांची, पावसाळा, हिंवाळा व उन्हाळा असी मुख्यत्वें करून निवड करितां येईल. जून, जुलई, आगस्ट आणि सेपटेंवर या महिन्यांत पाऊस बहुधा सौम्य व नेमानें पडतो. साधारण ऋतूंत पन्नास इंच धरला असतां हरकत नाहीं. या ऋतूंत उष्णमापक यंत्रांतील पाऱ्याच्या चढ उताराचा छट्टा फारच थोडा असतो. तो बहुधा रात्रीं व प्रातःकाळीं बहात्तर अंशांखालीं पडत नाहीं व दोनप्रहरीं शहात्तर अथवा सत्त्याहात्तर अंशांवर जात नाहीं. पावसाळा संपला ह्मणजे लागलीच जरी पाहटेस थंड हवा होते तरी, डिसेंवर महिन्यापर्यंत फारशी थंडी पडत नाहीं. जानेवारीत महिनाभर आणि फेब्रुवारी महिन्याच्या कांहीं भागापर्यंत थंडी सुरू असत्ये. १८२० या सालीं फेब्रुवारी महिन्यांत प्रातःकाळीं सहा वाजतां उष्णमापक यंत्रांत पारा २८ अंशांवर असे. उन्हाळ्यांत उत्तरेकडून व पश्चिमेकडून उन्हाच्या झळी, हिंदुस्थानाच्या बहुतेक भागांत अतिशय कडक सुटतात त्या, येथं तादृश सौम्य असतात व फार काळही राहत नाहींत. तत्रापि दिवसा पारा ९८ अंशांपर्यंत चढलेला असतो. माळव्यांत रात्रकाळ मात्र हमेष गार व श्रमहारक असतो.

माळवा प्रांत सपाट असून बेसाल्टे[१] ( Basalt ) च्या थरावर आहे ह्यामुळें त्यांत खनिज धातूच्या फारशा जाती सांपडतील असें दिसत

---

१ या ग्रंथास जोडलेल्या परिशिष्टांत नंबर २ व ३ हे लेख कप्तान डेंजरफील्ड ह्याच्या रिपोर्टांतून घेतले आहेत. त्यांत आपण फिरलेल्या देशांत त्याणें घेतलेले वायुचक्रासंबंधी, भूगोलासंबंधीं व ज्योतिषासंबंधीं वेध दिले आहेत. या शास्त्रज्ञ कामगारानें मध्यहिंदुस्थानाच्या भूगर्भ रचनेवरही कांहीं थोडें लिहिलें आहे. व तें स्पष्ट ध्यानांत येण्या करितां नंबर २ च्या लेखास नकाशा जोडला आहे. नंबर ३ मध्यें कप्तान डेंजरफील्ड याणें वायुचक्रासंबंधीं घेतलेले वेध दिले आहेत.

नाहीं. तरी चांगल्या तऱ्हेच्या लोखंडाची कच्ची धातू विपुल आहे. मेवाड व मारवाड ह्यांच्या सरहद्दीवरील जे डोंगर व पर्वत माळवा, गुजराथ व अजमीर ह्यांच्या मध्यें वायव्येकडे जातात त्यांत, पूर्वकाळीं तांब्याच्या व शिस्याच्या खाणी बऱ्याच चालू होत्या व त्यांपासून फायदाही बराच होत होता असें ह्मणतात. परंतु अलीकडच्या धामधुमीच्या काळांत हें काम बंद पडलें आणि ह्याची अद्याप पुनः सुरुवात झाली नाहीं.

माळव्याची जमीन जरी बहुतेक ठिकाणीं फारशी ओंड नाहीं तरी सुपिकतेविषयीं प्रसिद्ध आहे. ही बहुत करून भुसभुसित उमद्या काळ्या चिकण मातीची किंवा घट्ट लोहमिश्र चिकण मातीची बनली आहे. खेरीज येथें पाटानें पाणी बांधून नेण्याची सोय चांगली आहे आणि हीं सारीं साधनें ध्यानांत घेतलीं असतां असें दिसून येईल कीं, माळव्याइतके सृष्टिजन्य लाभांनीं युक्त असे, अथवा नाना तऱ्हेच्या धान्यांचीं उत्पन्नें देणारे असे, हिंदुस्थानांत इतर थोडेच प्रदेश अढळतील.[१]

---

१ माळव्यामध्यें उद्भिद उत्पन्नांत खसखस मुख्य आहे. याजपासून अफीम काढतात आणि या प्रांतांतून देशांतरात व्यापारासाठीं जाणाऱ्या पदार्थांत हा पदार्थ मुख्य होय. या अमली पदार्थाचें सालीना दाहाहजार मण किंबहुना अधिक ह्मणजे सरासरी तीन लक्ष पन्नासहजार (अऱ्हाईपौंईस) पौंड उत्पन्न होतें. या पैकीं देशांतरीं जाण्याकरितां साहाहजार मण खालीं राहते असें गणितां येईल. धान्यांत गहूं, हरभरा, वाटाणा, ज्वारि, बाजरी, मूग, उडीद, मका, आणि तूर हीं मुख्य धान्यें होत. गहूं व हरभरा सर्वांत विशेष देशांतरीं जातो. तांदूळही माळव्याच्या माळव्यांत उपयोगा करितां थोडा बहुत पेरितात व ऊंस, तमाखु, कपास, अळशी, तिळी, लसूण, हळद, व सुंठ हींही येथल्या येथें खपास पुरून उरण्याजोगीं उत्पन्न करितात. निळीचीही थोडीबहुत पेरणी होते. आलीचाही, झाडांच्या मुळ्यां करितां पुष्कळ पेरा

येथें पूर्वी फळेंही पुष्कळ व सर्वोत्कृष्ट होत होतीं. अब्बुलफजल माळ्व्यांतील द्राक्षवेलांच्या उफाडीची तारीफ लिहितो. येथें एका जातीचा आंबा आहे तो प्रथमत: मराठे लोकांनीं गोंव्या कडून आणून लाविला असें ह्मणतात. हा आंबा आकृतींत व रुचींत मूळ गोंव्या कडील बिजवटा-पेक्षां कोणत्याही अंशानें कमी नाहीं. परंतु गेल्या तीस वर्षांत या प्रांतीं बागबगीच्या कडे कोणी फारसें लक्ष्य दिलें नाहीं ह्मणून आतां बहुतेक फळांची विपुलताही नाहीं व तीं रुचीविषयींही ह्मणण्या सारखीं प्रसिद्ध नाहींत.

माळ्व्यांत व आसपासच्या प्रांतांत पुष्कळ अरण्यें आहेत; त्यां पैकीं कांहीं अरण्यांत इमारती लाकडांची व विशेषें करून सागवानाची समृद्धि आहे. लांकडें व्यापारांत मौल्यवान् पदार्थ आहेत या करितां त्या-जविषयीं पुढें लिहूं.

हिंदुस्थानाच्या इतर भागांत जीं जंगली व पाळीव जनावरें असतात तींच या प्रांतीं आहेत. डोंगरी व अरण्यमय प्रदेशांत राहाणाऱ्या जंगली जनावरांमध्यें वाघ, चित्ता, अस्वल, लांडगा, तरस, रानडुक्कर, काळवीट, निळगाय अथवा शुभ्रपायांचा काळविट, सांबर व तशाच हरिणाच्या आणखी जाती या गणाव्या. सांबराचें चर्म चांगलें कमावलें ह्मणजे, तें एतद्देशीय संस्थानी लोकांच्या लष्करांत पोषाक बनविण्याचें उत्तम द्रव्य होतें. तें आसपासच्या मुलकांतही व्यापाराकरितां जातें. पाळीव जनावरांत शृंगी जनावरांची विशेष प्रतिष्ठा आहे. हीं जनावरेंही देशांतरीं जातात. माळ्व्यांत शेळ्या व मेंढ्या फारशा नाहींत व त्यांची प्रतिष्ठाही नाहीं. हीं जनावरें शेजारच्या अजमीर व मेवाड प्रांतांत पुष्कळ व उंच जातीचीं आहेत.

माळ्व्यांत घोड्यांची पैदास आहे, परंतु या जनावराच्या खाणी

---

करितात. या मुळ्या पासून सुंदर तांबडा रंग पैदा होतो, आणि या मुळें या पदार्थाचा व्यापारांत बराच खप आहे.

करितां हा प्रांत कधींही फारसा प्रसिद्धीस आला नाहीं. याचें कारण कांहीं अंशीं हें होय कीं, घोड्यांच्या उत्पत्ती करितां जो काठेवाडचा प्रसिद्ध प्रांत तो या मुलखास जवळ आहे. तसेंच मुसलमान लोक उत्तर हिंदुस्थानी घोड्यांस व मराठे लोक आपल्या दक्षिणेतून आणिलेल्या सुंदर खाणीस चाहतात.

माळव्यांत उंटाची पैदास फारसी नाहीं व येथील हवा पाणीही त्या पैदासीस मानण्याजोगें नाहीं. बहुतकरून हीं जनावरें मारवाडच्या सुकट रेताड व उष्ण मैदानांतून आणितात. तेथें यांची पुष्कळ उत्पत्ति आहे; आणि वाढ व सामर्थ्य हींही उफाड्याचीं आहेत.

माळव्यांतील बहुतेक नद्यांत स्थूलाकृति व रुचिकर असे मत्स्य पुष्कळ आहेत. परंतु यांच्या जाति, तशाच. शिकारी जनावरांच्या जाति, तशाच खाण्यास व शिकारीस उपयोगी अशा पक्ष्यांच्या जाति हिंदुस्थानांतील इतर भागांतील जातींहून भिन्न नाहींत. यासाठीं त्यांचें पृथक् पृथक् वर्णन करण्याचीं आवश्यकता नाहीं.

माळव्यांतील कितीएक शहरें व मोटालीं गांवें प्राचीन व अर्वाचीन इतिहासांत फार प्रसिद्ध आहेत. त्यांपैकीं, कांहीं गांवठाणांचा

---

१ मुख्य शहरें व मोटालीं गांवें खालीं लिहिलीं आहेत:—

उज्जेनी १ इंदूर १ धार १ रतलाम १ नवलाई अथवा बडनगर १ खाचरोद १ उन्हेल १ मंदोसर १ जावद १ रामपुरा १ भानपुरा १ मन्दासा १ आगर १ सुरेंज १ मेलसा १ सुजालपूर १ अष्टे १ साजापूर १ देवास १ ढिग १ गंगराड १ ताळ १ मंडावळ १ महतपूर १ सारंगपूर १ भोपाळ १ दोहद १ मांडव.

या सर्वांपैकीं उज्जनी हें शहर फार प्राचीन आहे. हें हिंदुस्थानी लोकांच्या पुराणांत सांगितलेल्या तीर्थांत उत्तम गणलें आहे. ग्रीक इतिहास करणारांनींही याचा उल्लेख केला आहे. नवी उज्जनी प्राचीन वस्तीच्या दक्षिणेस दोन मैलांवर आहे. प्राचीन शहर पृथ्वीच्या छायेखालीं दबलें गेलें असें ह्मणतात, परंतु मला असें दिसतें कीं,

अथवा नांवांचा हल्लीं माग लावणेंही कठीण आहे. तरी पुष्कळ ठि-काणें, प्राचीनविषयशोधकांनीं लक्ष पुरविण्याजोगीं आहेत; कारण कीं,

---

क्षिप्रानदीच्या पुरानें वाहून गेलें असावें. नवी वस्ती प्राचीन वस्ती इतकीच उंचावर आहे. तीही अशाच अपघाताच्या धोक्यांत वारंवार आली आहे.

उज्जनीखालीं धार लेखिली पाहिजे जिला हिंदुलोक अजून धारानगरी असें ह्मणतात. हें शहर प्राचीनकाळींचें धारानगर असावें. परंतु माळव्याच्या सप्रमाण इतिहासांत याची योग्यता मुख्यत्वेंकरून या गोष्टीमुळें आहे कीं, या प्रांतांतील राजांची गादी उज्जनीहुन निघाल्यानंतर, व अखेर मांडव येथें स्थापित होण्यांपूर्वीं, या शहरीं आली होती.

मांडव हें शहर फार कालापासून बिलकुल उजाड आहे, परंतु येथें प्राचीन इमारतींचीं वगैरे भव्य व चित्तव्यापक अवशेषें राहिलीं आहेत. याविषयीं आणखी पुढें मजकूर येईल.

इंदुराची शहरांत गणना अर्वाचीन काळीं होय. या होळकरांच्या राजधानीच्या ज्या भागास जुनें इंदूर ह्मणतात तें एक लहानसें खेडें होतें. एकदां हें गांवठाण पाहून अहिल्याबाई प्रसन्न झाली, आणि तिनें मल्हारराव होळकरांच्या मरणानंतर तेथेंच छावणीचा तळ घातला. बाईनें या परगण्याच्या मुख्य अधिकाऱ्यास कंपेलगांव सोडून येथें ठाणें देण्यास हुकूम दिल्हा. आणि या गांवाखालीं जी लहान परंतु स्वच्छ नदी वाहते तिच्या पश्चिम किनाऱ्यावर नवें शहर वाढवून त्यास इंदूर हेंच नांव दिलें. जरी अहिल्याबाई जातीनें जन्मपर्यंत महेश्वर शहरींच राहात होती, तरी इंदुरावर तिची भक्ति असल्यामुळें हें शहर बरेंच भरभरलें.

भेलसा आणि मंदोसर यांची उत्पत्ति प्राचीन हिंदुइतिहासांच्या कादंबरींत घोटाळली आहे. भेलसा हिंदुदैवत रामचंद्र यानें, व मंदोसर रामचंद्राचा बाप दशरथ यानें बांधिलें असें ह्मणतात. या शहरास दशरथानें आपलें नांव दिलें व तें अर्वाचीन काळींही चालत

तेथील पडझडींत पुरातन इमारतींचीं, खोदिवकामांचीं व लेखांचीं शेषें अढळतात.

---

होतें. पुढें पश्चिमेकडील राजपूत लोक या नांवाचा अपभ्रंश करून दसोर ह्मणूं लागले आणि आतां बहुधा यास मंदोसर असें ह्मणतात.

सुजालपूर व साजापूर हींही नांवें शहर वसविणारांपासून प्राप्त झालीं आहेत. सुजालपूर सुज्यारवान ह्मणून माळव्याचा एक अत्यंत प्रख्यात सुभेदार होता त्याणें, व साज्यापूर शाहजहान बादशाहानें वसविलें.

सुरंज, शीरगंज या शब्दाचा अपभ्रंश आहे. या गांवठाणांत शीरशाह बादशाहाचा 'गंज' ह्मणजे छावणीचा तळ होता. हा तळ गांवाच्या उत्पत्तीस व नांवास कारण झाला.

रतलाम हा गांव कोणी ह्मणतात कीं, शाहजहानाच्या कारकीर्दींत रतनसिंग नांवाच्या राठोड राजपुतानें फार वाढविला. कोणी ह्मणतात त्याणें मुळापासून वसविला. ज्या परगण्याचें रतलाम मुख्य शहर आहे तो परगणा, रतनसिंगास लष्करी नोकरीकरितां इनाम दिल्हा होता.

नवलाई, राजा नवल याणें बांधिली. प्रातःकाळीं भोजनापूर्वीं अशुभ नांवें घेऊं नये अशा मूर्खलोकांच्या विचित्र व वेड्या समजुतीमुळें याला अलीकडे बडनगर असें ह्मणतात. ज्यावेळीं या शहराचें नांव घेणें जरूर असेल त्या वेळाच्या मानानें नवलाई अथवा बडनगर असें ह्मणतात.

सारंगपूर प्राचीन शहर आहे. व सरकार, ह्मणजे एक मोठा प्रांत, याचें मुख्य स्थान आहे. बाज बहादर माळव्याचा शेवटचा मुसलमान अधिकारी, ज्यानें आपल्यास राजा ही पदवी घेतली होती, त्याणें हें शहर फार उजागऱ्यास आणिलें.

भोपाळ हें नांव स्थापनकर्त्या एका राजपुतापासून आहे. हा राजपूत प्रसिद्ध राजा भोज याचा प्रधान होता. ज्यासमयीं भोजानें ताळ परगण्यांत सरोवर केलें आणि त्याजवळ भोजपूर ह्मणून शहर

नर्मदेच्या खोंड्याचा जो लहान भाग पूर्वेस हंडं, पश्चिमेस कोत्री, उत्तरेस विंध्याद्रीची रांग व दक्षिणेस सातपुड्याची रांग, या हद्दीमध्यें आहे तो नेमाडचा प्रांत होय. या प्रांताची लांबी सरासरी एकशें तीस मैल आहे, व बहुतेक ठिकाणीं रुंदी तीस पासून चाळीस मैल आहे. मध्यभागीं रुंदी सत्तर मैल ह्मटल्यास चिंता नाहीं. नर्मदेच्या उत्तरकांठींच्या पर्वताची रांग किनारा सोडून अटरा मैलांहून दूर क्वचित् ठिकाणीं आहे. नेमाडच्या पश्चिम टोकास हरणफाळ या ठिकाणीं नर्मदेच्या उत्तरे कडील ( विंध्याद्री ) व दक्षिणे कडील ( सातपुडा ) रांगी केवळ नर्मदेच्या ओघानेंच मात्र तुटल्या गेल्या आहेत. नेमाडचा बहुतेक भाग सुपीक व उंच सखल मैदान आहे. एक्या काळीं हा प्रदेश चहूं कडून खुला, भरभराटीस आलेला व उत्तम प्रकारें जोतलेला होता. परंतु आलीकडे पुष्कळ ठिकाणें जंगली झुडपांच्या अरण्यांनीं व्याप्त आहेत. पश्चिमभागीं नर्मदेच्या दोहों तटाकीं, बढवाणी, चिखलदें, धरमपुरी, सुलतानाबाद वगैरे गांव धरून खरगोणापर्यंत भूमिभाग बहुधा सपाट आणि जोतलेला आहे. पूर्व भागींचा प्रदेश मांधाता या पवित्र बेटाच्या पश्चिमे पासून काटकूटापर्यंत, नर्मदेच्या उत्तर कांठीं दाट अरण्यानें व्याप्त अशा लहानलहान टेंकड्यांचा एक झांपच बनला आहे; व नदीच्या कांठास केवळ लागून असलेल्या स्थलांव्यतिरिक्त समग्र उजाड आहे. या स्थळीं कित्येक लुटारू राजपूत सरदारांनीं, पाठलाग करणारांचा इलाज नचाले अशीं लपण्याचीं ठिकाणें शोधून काढलीं होतीं; व तेथून ते इंग्रेजी अंमल बसे तों पर्यंत आसपासचे मुलूक अशीरगडापासून तहत इं-

---

वसविलें, त्याच समयीं त्याच्या प्रधानानें भोपाळ वसविलें. भोजपुरांत आतां उजाड खिडाऱ्या आहेत.

प्राचीन कालच्या गोष्टींचा शोध लावणाऱ्यांनीं लक्ष देण्याजोगीं जुनी अवशेषें राहिलेलीं स्थळें आहेत, त्यांत नेमाडांतील प्राचीन गांव ऊन आणि राठप्रांतांतील बागगांवांतील भुयारें व चमल नदी जवळ धमणार येथील भुयारें हीं स्थळें आहेत.

दूरच्या वेशी पावेतों लुटून फस्त करीत असत. दक्षिण कांठीं नदीच्या पात्रापासून तीन अथवा च्यार मैल पर्यंत प्रदेशाचें स्वरूप उत्तर कांठा प्रमाणेंच आहे. परंतु तेथून पलीकडे वदलून पुनः नेमाडच्या अवांतर भागाप्रमाणें होतें. इतकेंच कीं, वस्ती उठून गेल्या मुळें अथवा तिचा संहार झाल्या मुळें फारशी वहिती नाहीं. व त्याच्या मोबादल्यांत वहुतेक भागीं लहानलहान झुडपांचीं अरण्यें उगवलीं आहेत.

नेमाडची जमीन माळव्याच्या जमीनीहून भिन्न आहे असें नाहीं. येथील गायरान विशेष उमदें समजलें जातें. या प्रांतांत आरपार जाणाऱ्या नर्मदे खेरीज, तीस मिळणाऱ्या अनेक ओघांच्या योगानें पाण्याची सुवत्ता झाली आहे.

नर्मदेच्या उत्तरकांठींचा वहुतेक प्रदेश धारसरकार व होळकरसरकार यांचा आहे. मात्र वंकानेरचा लहानसा परगणा शिंद्याचा आहे, आणि कांहीं डोंगरळ भाग राजपूत व भील सरदारांचा आहे.

नेमाडांत मुख्य व प्रसिद्ध शहर एक महेश्वर मात्र आहे असें ह्मटलें पाहिजे. खालीं वस्ती, वर उंचावर किल्ला अशा तऱ्हेनें नर्मदेच्या उत्तर तटाकीं मनोहर वसलेलें हें प्राचीन शहर व याच्या आसमंतात भागींच्या भूमी, फार कालापासून पृथक् संस्थाना सारख्याच लेखिल्या गेल्या आहेत. याचें कारण वहुधा हें असावें कीं, ज्या काळीं महेश्वर होळकरांच्या गादीचें स्थान होतें त्याकाळीं, हा प्रदेश गादीवरील खास मालकाच्या प्रत्यक्ष देखरेखीखालीं असे. पूर्वीं अहिल्यावाईच्या राहण्याचें स्थान अशामुळें जे लाभ या शहरास होत असत ते लाभ आतां त्या प्रतापी व पूज्य वाईच्या निर्याणाचें स्थान अशामुळें होत आहेत. तऱ्हेतऱ्हेच्या लोकोपयोगी इमारतींची उभारणी हल्लीं सुरू आहे. आणि वस्तीपासून नदीच्या तटाकापर्यंत अतिविस्तीर्ण व अत्यंत सुबक दगडी पायऱ्यांचा घाट, व तसींच त्यावरील देवालयें हीं कामें वाईच्या स्मरणार्थ बांधीत आहेत, व वहुधा पुरींही होत आलीं आहेत.

वढवाणीच्या लहानशा महाला खेरीज, दक्षिण नेमाडांतील बहुतेक भाग प्राचीन बीजागड सरकारा खालील आहे. सातपुड्याच्या रांगेंतील एका डोंगरी किल्ल्याच्या हद्दींत, बीजागड शहराची मोडतोड झालेलीं खिंडारें पडलीं आहेत. तेथें मात्र ह्या सरकारचें नांव आतां राहिलें आहे. मुसलमानांच्या कारकीर्दींत इतर सरकाराप्रमाणें सरकार बीजागडाच्या हद्दींतही वेळोवेळीं बदल होत असे. एक ग्रंथकार असें लिहितो कीं, शाहाजहान बादशाहाच्या कारकीर्दीच्या आठव्या वर्षी सरकार बीजागड, हंडेप्रांताचा कांहीं भाग, व नर्मदा आणि तापीमधील कांहीं मुलुक इतका प्रदेश खानदेशाच्या सुभ्यांत सामील करण्याचा हुकूम झाला होता. अब्बुलफजल तर बीजागडास खानदेशाचें मुख्य ठाणें ह्मणतो व येथें फार काळपर्यंत खानदेशचे वजीर रहात असत असेंही लिहितो. दिल्लीच्या बादशाहांच्या रूढीविषयीं पूर्वी सांगितलें आहे त्यास, हे मुलुकाच्या हद्दींत केलेले हवेतसे फेरफार दृढता आणितात.

हिंदुलोकांच्या दंतकथेंत, नेमाडाची दक्षिण सरहद्द सातपुड्याचीरांग असें वर्णिलें आहे, व या वर्णनास अलीकडील व पलीकडील प्रांताच्या निरनिराळ्या नांवांवरून व देशभाषेंतील फेरफारांवरून पुष्टीकरण होतें. हा बळकट पुरावा आहे. हिंदूंच्या ह्मणण्या प्रमाणें अशीरगड हा डोंगरी किल्ला दोहों प्रांतांच्या सरहद्दीवर आहे.[२] कित्येक तर निमा अशीरगड नेमाडांत व निमा खानदेशांत लेखितात.

नेमाडच्या पश्चिमटोंकास, विंध्याद्रीपासून उत्तरदिशेनें माळवा व

---

१ आलीकडे सन ईसवी पासून होळकर सरकारानें नेमाडप्रांताचा सुभा करून त्यास **सुभासरकार बीजागड** असें नांव दिलें आहे.

२ लोक प्रसिद्ध दंत कथान्वयें या बळकट किल्याचें नांव अहीर जातीच्या एका श्रीमान् व प्रसिद्ध अस्सा नांवाच्या जमीदारापासून आहे. त्यानें हा गड बांधिला. अस्सा अहीर, या शब्दांचा अशीर असा अपभ्रंश झाला आहे.

गुजराथ यांमध्यें एक डोंगराळ प्रदेश पसरला आहे. याची बहुतेक ठिकाणीं रुंदी पन्नासपासून सत्तर मैल आहे; व याची अखेर मेवाडच्या दक्षिण व पश्चिम सरहद्दीमध्यें होते. या प्रदेशाचा दक्षिणभाग, जो थांदले परगणा व नर्मदा नदी यांमध्यें आहे, त्यास हिंदुलोक राठ असें ह्मणतात. झाबवें, अल्ली, बाग्रं, जोबट वगैरे लहान लहान संस्थानें व त्यांच्या पेटच्यांतील सरदारांचीं इनामें या प्रांतांत आहेत. यांतील बहुतेक प्रजा भील जातीची आहे. याचा बराच भाग जरी खडकी टेंकड्या व दाट अरण्यें यांनीं व्याप्त आहे तरी येथील डोंगरांच्या अनुक्रमानें लागलेल्या रांगींत पुष्कळ खोरीं, सुपीक व पाण्यानें अबाद आहेत. हे डोंगर बहुतकरून एकसारखे उत्तरदिशेकडे एकमेकांशीं समांतर जातात. उंचींत, राठ प्रांताची पायरी गुजराथ व माळवा यांमधली आहे. हा प्रांत गुजराथेहून उंच आहे व माळव्याकडे चढता आला आहे. हवापाण्यांत अथवा धान्योत्पत्तींत माळव्याची बरोबरी याच्यानें होत नाहीं.

लहान लहान संस्थानांच्या मुख्य गांवांखेरीज राठ प्रांतांत मोठालीं ठिकाणें फारशीं नाहींत. संस्थानी मुख्य गांवांत झाबवें सांगण्या लायक आहे. हा गांव एक्या सखल टेंकड्यांच्या रांगेच्या पायथ्याशीं, लहानशा सुपीक खिंडींत, अद्भुत मनोहर स्थळीं, वसलेला आहे.

राठ प्रांताच्या डोंगरांत, कच्ची लोखंडी धातु पुष्कळ सापडते; तेथील अरण्यांतून सागवान, वांबू व अशींच दुसरीं इमारतीचीं लांकडें, केवळ घरें बांधण्याच्या उपयोगाचींच नव्हत, तर आणखी दुसऱ्या उपयोगी व शोभिवंत कामास लावण्याजोगींही, मिळतात. या प्रांतांतून, माळवा व गुजराथ या प्रांतांस जोडणारे कित्येक हमराह रस्ते आहेत.

बागडाचा प्रदेश रांठ या डोंगरी प्रांताचाच एक भाग आहे. पेटलावदेपासून दोहदपर्यंत, एक माळव्याचा निरुंद तुकडा मात्र आंत शिरून, रांठ व बागड यांस निरनिराळें करितो. बागडाच्या उत्तरसी-

मेवर कांतळ आणि मेवाड प्रांत आहेत; आणि पूर्व व पश्चिमसीमेवर माळवा व गुजराथ प्रांत आहेत. रांठ प्रांतापेक्षां वागड प्रांतांत नदी-नाले, दरीं खोरीं, शेती पोती कमी आहे इतकेंच; याहून विशेष दुसऱ्या तऱ्हेचें अंतर नाहीं. मात्र वागडाच्या उत्तर टोंकास हें कलम लागु नाहीं. कारण तेथें जमीन चांगली व सुपीक आहे. वागडाच्या वस्तींत मुख्य भरणा किरसानी करणाऱ्या भील व मीणे लोकांचा आहे. हे लोक राजपूत सरदारांच्या व ठाकुरांच्या ताब्यांतील आहेत. या प्रांताचा मुख्य भाग वांसवाडा व डोंगरपूर येथील छोटेखानी राजांचा आहे. त्यांच्या गादीच्या या दोन जागा, व संगवाडा गांव इतकीं ठिकाणें मात्र या प्रदेशांत नांवें घेण्याजोगीं आहेत. पुष्कळ मोडतोड होऊन उजाड पडलेलीं गावें, खेडीं, देवालयें, वहिंदुलोकांचीं चित्तवेधक पुरातन कामांचीं शेषें वागडच्या उत्तर प्रदेशांत जिकडे तिकडे पसरलीं आहेत. यावरून पूर्वी कधींकाळीं येथें पुष्कळ आबादी व भरभर होती असें दिसतें. येथून डोंगरपुरावरून व लुनवाड्यावरून गुजराथेंत जाण्याचे चांगले व हमराह रस्ते आहेत. विस्तीर्ण व दाट अरण्याच्या योगानें पावसाळा संपतांच आरंभींच्या दोन महिन्यांत येथें दुष्ट ज्वराची सुरुवात असत्ये. व एकंदर सालांत अमुक एककाळीं येथील हवापाणी सुखदायक व निरोगी असतें असें कोणीं-च ह्मणवत नाहीं.

वागड व मेवाड यां मध्यें कांतल हा एक प्रांत आहे असें ह्मणण्यापेक्षां लहानसा परगणा आहे असें ह्मटलें असतां चालेल. हा परगणा पश्चिमेकडे मंदुसरापासून वांसवाडा व उदेपूरच्या राज्यापर्यंत पसरला आहे. याची लांबी सरासरी चोवीस मैल व रुंदी वीस पासून पंचवीस मैल आहे. यांत प्रतापगड येथील राजाच्या मुलकाचा मुख्यभाग आला आहे. प्रतापगड, गादीचें ठिकाण, तटबंदीगांव आहे, परंतु राजा बहुधा पश्चिमेस बारा मैलांवर देवळे गांवीं राहात असतो. बहुतेक प्रदेश सपाट, खुला व उत्तम जोतलेला आहे. उंचींत वाग-

हाहून हा प्रदेश विशेष आहे. सरासरी शेजारच्या माळव्यांतील भागाच्या बरोबरीनें उंच येईल. या प्रांतांतून गुजराथ, काठेवाड व कच्छ या देशीं रस्ते जातात. कांतळची जमीन उमदी आहे व येथें माळव्या सारखींच अफू व इतर धान्यें वगैरे उत्पन्न होतात. माही नदीस मिळणाऱ्या नाल्यांच्या योगानें पाण्याची सुवत्ता आहे. ही माही नदी या प्रदेशाच्या दक्षिण हद्दी जवळून वाहत्ये.

हारावती प्रांत माळव्याच्या ईशान्यदिशेस आहे आणि याच्या व त्याच्या मध्यें मुकुंदराचे डोंगर व चितोडची पुढे आलेली रांग हीं आहेत. या देशाचें एकंदर स्वरूप, व हवा खेरीज करून ईश्वरीदत्त लाभही माळव्या सारखेच आहेत. याच्या सभोंवतील डोंगरी गराड्यांच्या विशेष उंचीमुळें हवामात्र अधिक उष्ण व कमी गुणकारी आहे. माळव्याचा जो भाग या प्रांताच्या शेजारीं आहे त्याच्या व याच्या उंचींत फारसा फरक नाहीं. माळव्यांतीलच नद्या या प्रांतांतून वाहतात व जसजशा पुढें जातात तसतसे त्यांचे प्रवाहही बरेच मोठे होतात. यांतील मुख्य शहरें कोटा, पाटण, बुंदी हीं होत. हा प्रांत ज्या दोघां राजपूत राजांमध्यें विभागला गेला आहे त्यांच्या गादीचीं स्थानें कोटा व बुंदी हीं आहेत. कोट्याचा राजा राणा जालिमसिंग याणें वसविलेलें पाटण शहर, ज्याला बहुधा झालरा पाटण ह्मणतात, तें एक्या वीस वर्षांत, खेडे गांवाच्या गणतींतून निघून माळव्या मधील अत्यंत सुंदर व श्रीमान् शहरांत सामील झालें आहे.

माळव्यांतील सपाट मैदानाच्या पूर्व सीमेवर डोंगराचा गराडा आहे; व ज्याप्रमाणें राठ व बागड हे प्रदेश माळवा व गुजराथ यांमध्यें आले आहेत त्या प्रमाणें हा गराडा, माळवा व बुंदेल खंड यां मध्यें आला आहे. या गराड्यांत चंदेरी, कचवाडा आणि अहीरवाडा हे

---

१ कित्येक हुशार हिंदुलोकांशीं माझें बोलणें झालें त्यांत ते कांतळ माळव्याचाच भाग ह्मणाले, परंतु कांतळ या नांवाचा अर्थ सीमा असा आहे.

लहान लहान प्रांत सांपडले आहेत. ही पूर्व सीमा अब्बुल फजलानें सांगितलेल्या सीमेशीं जुडत नाहीं. हा ग्रंथकार सुभामाळव्याची रुंदी गढ्यापासून वांसवाड्या पर्यंत दोनशें पंचेचाळीस कोस[1] धरितो. या अंतरावरून असें अनुमान करणें भाग येतें कीं, या प्रदेशांतील गढ्यां पैकीं अब्बुल फजलानें धरलेला गढा, गढामंडळ्या अथवा गढाजवलपूर असावा. आतां या गढ्यांचा प्रदेश नेमाडासारखा नर्मदेच्या कांठीं विंध्याद्रीच्या पायथ्याशीं आहे; व माळव्यामध्यें व ह्या प्रदेशामध्यें कित्येक प्रांत असे आले आहेत कीं, ते माळव्याशीं निसबत राखीत नाहींत. तेथील लोकांची भाषाही निराळी आहे. तथापि ते दिल्लीच्या बादशाहाच्या काळीं दरबारच्या वहिवाटी प्रमाणें माळव्याच्या सुभ्यांत सामील केले नसतील असें ह्मणवत नाहीं. खरोखर असें समजण्यास हा एक आधारच आहे कीं, वर सांगितलेला डोंगराळ प्रदेश माळव्याची प्राचीन सीमा गणिला गेला होता. हा डोंगराळ प्रदेश उत्तरेस नरवरास लागून असून, नरवर द्वारावती आणि चितोडची रांग एकमेकाशीं जोडतो व आग्नेयीस विंध्याद्रीस जाऊन टेंकतो. हा विंध्याद्री तर माळवा प्रांताच्या सृष्टिजन्य सीमांत अत्यंत ठळक सीमा आहे.

---

१ बहुत करून एका अंशांत बेचाळीस कोस बसतात. परंतु हिंदुस्थानांत बहुधा प्रत्येक प्रांतांत कोसांची लांबी बदलते. कोठेंही दीढमैलाखालीं नाहीं, व महिसूरच्या राज्यांत टिपुसुलतानानें आपल्या हुकुमानें सुरू केलेल्या कोसांखेरीज, दोन मैलांहून अधिक नाहीं.

# प्रकरण २.

## माळव्याचा इतिहास.

माळव्याचा इतिहास, दंतकथेंत व अंधःकारांत बुडाला आहे. उज्जनी, जें सर्वांत मोठें असल्या मुळें अझूनही माळव्यांतील मुख्य शहर आहे असें ह्मटलें असतां चालेल, त्याच्या पुरातन वस्तीविषयीं हिंदुस्थानांतील सांप्रत कायम असलेल्या इतर शहरांपेक्षां विशेष दाखला सापडतो. या शहराचें वर्णन हिंदुलोकांच्या धर्मपुस्तकांत अढळतें इतकेंच नाहीं तर, पेरिप्लस ऑफ्दी इरिथ्रियनसी नांवाच्या ग्रीक ग्रंथांत व टॉलेमीच्या ग्रंथांतही अढळतें. हिंदुस्थानांतील बखरींत, ख्रिस्ती शकाच्या पूर्वीं आठशें पन्नास वर्षें, माळव्याचें स्वतंत्र प्रांतासारखें वर्णन आहे. त्याकाळीं धनजी राजा, ज्याची देवापासून उत्पत्ति होती असें ह्मणतात, त्यानें बौध्धधर्मानुयायी लोकांनीं बुडविलेल्या ब्राह्मणधर्माची पुनः स्थापना केली. त्या बौध्धधर्माचीं पुष्काळ शेषें हिंदुस्थानच्या या भागांत अढळतात. बाग गांवाजवळच्या पर्व-

---

१ ख्रिस्ती शकापूर्वीं आठशतकांहून अधिक दिवस मुख्य बुध्धास होऊन झाले नाहींत. ज्योतिष गणिताच्या कालमानांतील साम्यतेवरून असें बरोबर शोधून ठेविलें आहे कीं, हा बुद्ध ख्रिस्ती शकापूर्वीं साडेपांच शतकें झाला असावा. ( एशियाटिक रीसर्चिस् पाहा ). एकाहून अधिक बुध्ध होते व त्यांच्या परस्पर कालमानांत लोकांस भ्रम पडे, असें मानण्यास बळकट आधार आहेत. प्रथम बुध्ध ख्रिस्ती शका पूर्वीं एक हजार वर्षें, द्वितीय बुध्ध ख्रिस्ती शका पूर्वीं साडेपांचशें वर्षें, व तृतीय बुध्ध ख्रिस्ती शका नंतर अडीचशें वर्षें, या काळीं झाले असावे.

तांतील लेण्यांत देवालयें, मूर्ती व सांकेतिक आकृती खोदलेल्या आहेत, त्यांच्या धर्तींत बौध्धधर्माचीं विशेष लक्षणें नजरेस येतात.[१]

हिंदुलेखांच्या आधारान्वयें, धनजीचें घराणें पृथुराज या पांचव्या पुरुषापर्यंत तीनशें सत्यायशी वर्षें गादीवर होतें. पोटीं संतान नसतां पृथुराजास देवाज्ञा झाली ह्मणून आदितपंवार हा राजपूत सरदार पुढें गादीवर बसला; व याणें पंवार कुलाची स्थापना केली. ह्या घराण्याचा माळव्यावर अधिकार एक हजार अठ्ठावन वर्षे अधिक चालला.

धनजीच्या घराण्यांत माळवा होता त्याकाळीं, ख्रिस्ती शकापूर्वी सातशें तीस वर्षांपर्यंतची त्या घराण्याची विशेष हकीकत कोठें अढळत नाहीं. त्यावर्षी धनजीच्या गादीवरील वंशजानें दिल्लीच्या राज्याचा तावा तोडून टाकला असें ह्मणतात. हा तरी अपुरा सुगाव खरा, परंतु पुनः या काळापासून पुढें सुमारें ख्रिस्ती शकाच्या आरंभापर्यंत, विद्या व कला यांस उत्तेजनदाता असा सर्व हिंदु ग्रंथकारांनीं वर्णिलेला जो विक्रमादित्य, तो राज्यारूढ होई तावत् माळव्यासंबंधी इतके अपुरे सुगावे देखील मिळत नाहींत. हिंदु ग्रंथकारांच्या लिहिण्याप्रमाणें, विक्रमादित्याकरितां त्याच्या बापानें कांहीं एक वतनवाडी करून ठेविली नव्हती. तो बऱ्याच काळपर्यंत, राजधानी उज्जनी येथें, आपला दासीबंधू माळव्याचा अधिकारी जो भर्तृहरी, त्याजपाशीं होता.[२] बंधूबंधूंत वैमनस्य आल्यामुळें विक्रमादित्यानें उ-

१ या कथेवरून कोणी कल्पना करितात कीं हा सूर्यवंशी असावा, परंतु बहुतेक वर्णनांत धनजी भील असावा असें लिहिलें आहे. फार प्राचीन काळीं या देशीं, या पदभ्रष्ट जातीची सत्ता चालत होती यांत कांहीं संशय नाहीं.

२ विक्रम संवत् नांवाचा जो शक चालू आहे तो या विक्रमादित्यापासून आहे. ख्रिस्ती शकाप्रमाणेंच याचें सूर्यगतीवरून वर्ष भरतें. हा ख्रिस्ती शकापूर्वीं ५६ वर्षे सुरू आहे. ( पहा एशियाटिक रीसार्चेझ् पुस्तक १ पान १४४. )

ज्जनी सोडिली व मोठी आपत्ति सोसून गुजराथेंत व हिंदुस्थानाच्या अ-वंतर भागांतही बराच काळ प्रवास केला. माळव्यांत परत आल्या-वर पाहतो तों, आपल्या भावानें, स्त्रीच्या व्यभिचारामुळें वैतागून, संसार-त्याग करून, वैराग्य धारण केलें आहे; तेव्हां तो माळव्याचा अधिकार आपण चालवूं लागला व त्यादिवसापासून त्याची कारकीर्द सुरू झाली. या कारकीर्दींत त्याचा अम्मल हिंदुस्थानांतील बहुतेक भागा-वर बसला. गयाळीराजे एकामागून एक अनुक्रमानें गादीवर बसले होते, व त्यांच्या गयाळीपणानें दूरदूरच्या ताब्यांतील देशाधिकाऱ्यांनीं पुंडावे करून आपआपले प्रांत स्वतंत्र केले होते, व अशामुळें या माळव्याच्या राजांचें वैभव नाहींसें झालें होतें, तें विक्रमादित्यानें पुनः परत आणिलें. विक्रमादित्याचें याप्रमाणें वर्णन जें सांपडतें त्यास आधार-भूत अझून भक्कम पुरावा सांपडला नाहीं, तरी त्याच्या प्रतापी नांवावरून व हिंदुस्थानभर पसरलेल्या लौकिकावरून असा तर्क केला पाहिजे कीं, त्याची सत्ता फार विस्तार पावली होती. विक्रमादित्यानंतर अकरावा पुरुष, जो हिंदूदंतकथेंतील विख्यात राजा भोज[१] त्याच्या काळापर्यं-

---

१ विक्रमादित्याच्या कथेप्रमाणेंच भोजाच्या कथेंतही कादंबरी-ची मिसळ आहे. भोजाच्या जन्माकरितां त्याच्या आईनें आप-ल्या जिवाचा बळी दिला होता. तिचें उतारी होण्याभावीं भोजानें असी शपथ वाहिली होती ह्मणतात कीं, मी नवनद्यांचे व नव्याण्णव ना-ल्यांचे प्रवाह धक्के बांधून अडवीन. ही शपथ पुरी करण्याकरितां, शोधा-अंतीं त्यास आपल्याच राज्यांत विलक्षण सोईचा एक प्रांत सांपडला. येथें दोन टेंकड्यांच्या मध्यें एक मोठा धक्का बांधून नऊ नद्यांचें व अठ्याण्णव नाल्यांचे ओघ अडवून त्याणें एक मोठें सरोवर केलें. हा बांध पुढें को-णी तोडून टाकून नदीनाल्यांचे प्रवाह खुले केले. सरोवराच्या पाण्यानें जो प्रदेश आच्छादित होता तो सांप्रतचा ताळ (सरोवर) परगणा होय. भोपाळच्या राज्यांत हा परगाणा अत्यंत सुपीक व वस्तीनें आबाद आहे. पडझड होऊन उरलेल्या धक्याच्या शेषां-

व, मध्यें झालेल्या राजांविषयीं लिहिण्याजोगें कांहीं दिसत नाहीं. या राजानें उज्जनीहून गादी काढून धारेस आणिली; व माळवा फस्त करणाऱ्या मुसलमानांनीं, ही गादी मांडवास नेई तोंपर्यंत याच ठिकाणीं होती.

भोजराजाच्या पुढील पुरुष जो जयचंद तो मेल्यानंतर, पवांर कुळांतील राज्य करण्यास कोणी योग्य नसल्यामुळें, जीतपाळ नांवाच्या राजपुत सरदारास गादीवर बसविलें. यापासून तउर[1] कुळाची स्थापना झाली. त्यांच्या मागून चव्हाण राजे झाले.[2] चव्हाण कुळांतील मूळपुरुष जगदेव नावाचा होता. ह्या कुळांत १६७ वर्षे गादी चालली. यांतील चवथा पुरुष जो राजा वासुदेव त्याणें चक्रवर्ती राजाचीं चिन्हें धारण केलीं, कला कौशल्यें मोठ्या उदयास

जवळ वसलेलें भोजपूर एकाकाळीं मोठें शहर होतें, परंतु आतां मोठ्या खेड्या एवढें मात्र राहिलें आहे. प्राचीन नांवमात्र अझून चालत आहे. व तेथें बाकी राहिलेलीं देवळांचीं व इतर इमारतींची शेषें गांवाचा जुनाटपणा दाखवितात. उरलेल्या नव्याण्णवाव्या नाल्यास भोजराजाच्या प्रधानानें बंधारा बांधिला होता, व या योगानें झालेल्या तळावाजवळ एक गांव वसवून त्यास त्याणें आपलें भोपाळ नाव दिलें होतें. याच तळावाच्या काठीं हल्लींचें भोपाळ शहर आहे.

१. ज्या बखरीच्या आधारानें मी लिहितों त्यांत या सरदारास जमीदार झटलें आहे. प्रांतांतील जमाबंदी कडील कामगारांवर जो अधिकारी असतो त्यास मुसलमान ग्रंथकार बहुतेक ठिकाणीं हा शब्द लावितात. हिंदूंच्या रूढीप्रमाणें या कामगारांचा अधिकार वंशपरंपरा चालतो व हे एकंदर जमीदार लोकांपैकींच असतात ह्मणून बाकीच्या जमीदारांपासून ओळखतां येण्याकारितां त्यास "आपल्या प्रांताचे जमीदार" असें ह्मणतात.

२. माळव्यांतील क्षत्रियांत चव्हाण राजपूत हे या दिवसास सुद्धां अत्यंत उंचांत व बलिष्ठांत मोडतात.

आणिलीं; आणि सर्व गोष्टींत आपल्या देशाची कीर्ति व भरभर वाढविली.

या कुळांतील शेवटला पुरुष जो राजा मालदेव ( माळव्याच्या हिंदु राजांतील शेवटला ह्मटल्यास हरकत नाहीं ) त्याच्या कारकीर्दींत, वैश्य जातीच्या एका अनंददेव नांवाच्या सरदारानें माळव्यांतील कांहीं भागाचा अपहार केला.[१] मालदेवाच्या मरण समयीं माळवाच काय, परंतु दिल्ली येथील चक्रवर्ती राज्यापैकींही बराच भाग मुसलमानांच्या सत्ते खालीं गेला.

माळव्यांतील प्राचीन राजांचा हा थोडासा वृत्तांत पुरा करितांना हें सांगणें आहे कीं, दिल्ली चक्रवर्तीच्या ताब्यांत माळवा मुलूख होता असें एकंदर लिहिलेल्या लेखांवरून व दंतकथेवरून सिद्ध होतें. इतकेंच कीं, ताब्यांतील इतर ठिकाणांप्रमाणेंच या ठिकाणचे अधिकारीही वेळोवेळीं राजसत्ता धारण करीत व कित्येक पुस्तांपर्यंत तशीच चालवीत.

मुसलमानांनीं मुलुक प्रथम फते केला त्या दिवसापासून बऱ्याच काळापर्यंत माळव्याचें वृत्त शोधित बसणें यांत व्यर्थ त्रास आहे व हासिलही नाहीं. एका मागें एक दंगे धोपे उद्भवले व त्यांत प्राचीन हिंदुस्थानांतील एक पृथक् भाग[२] अशी जी माळव्याची योग्यता ती बहुतकरून नाहींशी झाली. या शिवाय त्यावृत्तांतांत दुसरें कांहीं दृष्टोत्पतीस येत नाहीं. या पुढें निरनिराळ्या अपहार कर्त्यांच्या यशा प्रमाणें माळव्याच्या सीमा वेळोवेळीं बदलत. हें मात्र उघड आहे कीं, हा देश केव्हांही मुसलमानांच्या पुऱ्या कबजांत गेला नव्हता. प्रत्येक परगण्यांत हिंदूराजे व सरदार आपल्यावर

---

१. ( शास्त्रानें ) यत्ता ठरविलेल्या कर्माचें उल्लंघन करणाऱ्या पुष्कळ पुरुषांच्या उदाहरणांपैकीं हें एक उदाहरण आहे.

२. हिंदु कारकीर्दीच्या अव्वलीस हिंदुस्थानांत पन्नास राज्यें होतीं व त्यांत माळवा हें एक होतें असें फिरिस्ता लिहितो.

चाल करून आलेल्या लोकांच्या पुरोगतीस आड येत होते. कोठें कोठें तर विजय पावून[1] त्यांनीं आपलीं कुळें या प्रांताच्या बऱ्याच भागावर राज्यपदीं स्थापिलीं आहेत, व तीन च्यार पिढ्यांपर्यंत अधिकार केला आहे असें नजरेस येतें. शाहाउद्दीन बादशाहाच्या कारकीर्दींत बाहादुरशाहा यानें विशेष पक्का अंमल बसवीला तोंपर्यंत अशाच राज्यक्रांती या प्रांतीं सुरू होत्या. या बाहादुरशहास बादशाहानें ठार मारून दिल्यावर खांगोरीकडे माळव्याचें काम सांगितलें. पुढें महंमद तगलख बादशाहा पळून गेला आहे, व तैमुरलंगाच्या [illegible] मुळें हिंदुस्थानभर घंप्पाघोळ झाला आहे, अशी संधी साधून दिलावर खानानें स्वतंत्र राजा असी किताब घेऊन राजचिन्हेंही धारण केलीं. त्याणें धार शहरीं आपली गादी स्थापिली. या शहराच्या आसपास जीं पुरातन शेषें उरलीं आहेत त्यांवरून या क्रांतीचें वृत्त ध्यानीं येतें. या नव्या राज्या करितां हिंदूंच्या अत्युत्तम देवालयांचे मालमसाले काढून राजवाडे व मसजीदी बांधण्यासाठीं लावले गेले[2] परंतु मुसलमानांची गादी धारेस फार काळ राहिली नाहीं. दिलावरखानाचा मुलगा अलिफखान जो हुशंगशाह या नावानें प्रसिद्धीस आला त्याणें गादी मांडव येथें नेली.[3]

मांडवशहर धारेच्या आग्नेयीस पंधरा मैलांवर आहे. हिंदूंच्या वृत्तांता वरून असें दिसतें कीं, जयसिंगदेव या नावाच्या राजानें या

---

१ शेखशाहा गझनवीनें माळवा प्रांतावर प्रथम स्वारी केली. त्याजपासून पुढें दुसरा पुरुष जो कमरुद्दीन त्यास मालदेवाच्या कुळांतील चित्तपाळ याणें ठार मारिलें.

२ आतां धारेस गेलों होतों तेव्हां एका मोडून पडलेल्या मसजिदींतून मी एक सुंदर घोंटीव लांब रुंद हिंदूंचा शिला लेख काढला. हापवित्रलेख मसजिदींत मकावऱ्याच्या उंबऱ्यास लाविला होता.

३ फिरिस्ता.

जागीं तुरळकतुरळक ठिकाणीं तटबंदी केलेली होती.[१] तरी मांडवास, गादीचें स्थान असें नाव या पुर्वीं दिलेलें कोठें अढळत नाहीं. तेव्हां जरी हुसंगशाहाच्या पूर्वीं येथें लोकांची वस्ती होती तरी या राज्यकर्त्यापासूनच मांडवाच्या महत्वाचा आरंभ होय. हुशंगशाहाच्या मरणानंतर त्याचे वंशजही येथूनच अधिकार चालवीत असत.

मांडव स्थान फार मनोरंजक होतें. हुशंगशाहानें आपल्या राजधानी करितां पसंत केलेल्या स्थळांचा परिघ ३७ सदतीस मैल आहे. विंध्याद्रीच्या मस्तकावर आठ कोसपर्यंत याचा विस्तार आहे. उंचींत माळव्यावराबर असून याच्या आणि माळव्याच्या पा...मध्यें एक खोंडा आला आहे. हा खोंडा एकदम उतरता लागतो. व चेचड असून कमजास्ती खोलीचा आहे. परंतु याची दोनशें फुटांहून कोठेंही कमी खोली नाहीं व रुंदी बहुतकरून तीनशें पासून ...यारशें यार्ड पर्यंत आहे. शहराच्या सभोंवतीनें जाऊन हा खोंडा

---

१ हिंदुदंतकथेत असें आहे कीं, या राजाजवळ परीस होता व त्यामुळें तटबंदीचें काम करण्यांत त्यास फार साह्य झालें. ह्याच्या कारकीर्दींत हा दगड एका गवतकापणारास रानांत सांपडला. त्याच्या गुणांची परीक्षा एका लोहारानें केली व जयसिंगदेवाजवळ तो दिला. मांडव किल्ला बांधण्याचा खर्च भागण्यास पुरेल इतकें सोनें या परिसापासून जयसिंगानें उत्पन्न करून घेऊन तो आपल्या कुलगुरूस दान दिला. दगड दान दिला असें पाहून कुलगुरूनें असंतुष्ट होऊन त्याचे गुण समजून घेण्यापूर्वींच नर्मदा नदींत फेकून दिला. आपण काय केलें हें ध्यानांत आल्यानंतर नदींतून वर काढण्याकरितां गुरूनें आंत उडी टाकिली परंतु व्यर्थ. नदीचा कांहीं केल्या तळ लागेना. भोळे हिंदू लोक असें मानितात कीं, ज्या ठिकाणीं परीस पडला त्या ठिकाणीं नर्मदेस अथांग पाणी आलें व अझूनही तेथें पाण्याचा थांग नाहीं.

रुंद व चेचड अशा अनेक दऱ्यांच्या रूपानें सकल प्रदेशांकडे पूर्व पश्चिम दिशेंत उतरूं लागतो. खोंडय्राच्या किनाऱ्यावर, व विंध्याद्रीच्या ज्या रांगेनें मांडवाचें दक्षिण तोंड झालें आहे, त्या रांगेच्या मस्तकावर, वरीच उंच किल्ल्याची भिंत बांधलेली होती. जातीचीच जागा बळकट; तीस भिंतीच्या योगानें अधिक बळकटी येऊन अशी झाली कीं, सुसूत्र हल्ला केल्याविना कोणाचा इलाज चालावयाचा नाहीं. हा लाभ, कीं ज्यामुळें लोकांच्या मालमत्तेस निर्भयता प्राप्त झाली, तसाच हवेचा निरोगीपणा, पाण्याची विपुलता, व या राजधानीच्या चतुःसीमेंत सांपडलेल्या जमीनीची मातवरी हीं सर्व कारणें एकत्र होऊन मांडव शहरास नूतन असतांच मोठी भरभर प्राप्त झाली.

हुशंग शाहास आपल्या कारकीर्दीच्या आरंभीं जरी विपत्ति प्राप्त झाली होती[१] तरी पुढें त्याणें महत्कीर्ति संपादिली. नर्मदेच्या दक्षिणे कडील राजांशीं तो लढला. आणि गोंडवाडो[२] येथील हिंदु राजावर चाल करण्यास सोपें जावें या हेतूनें त्याणें नर्मदेच्या डाव्या किनाऱ्यास ( ह्मणजे दक्षिण तीरास ) एक गांव वसवून व किल्ला बांधून त्यास आपलें नांव दिलें.[३] यामुळें **बहामनी** वंशाच्या मुसलमानीं राजांशीं युद्ध उद्भवलें. त्या युद्धांत कांहीं दिवस परस्प-

---

१ गादीवर नुकताच बसतो आहे इतक्यांत हुशंग शाहास गुजराथेच्या राजानें कैद केलें होतें.

२ सन १८१८ इसवीच्या पूर्वी नागपूरवाल्यांचा जो विस्तीर्ण प्रदेश नर्मदेच्या आग्नेयीस होता तितका सारा कांहीं थोड्या काळापूर्वी या गोंड लोकांच्या ताब्यांत होता.

३ हुशंगाबाद ज्याला साधारणतः हुसिंगाबाद ह्मणतात. हुसिंगाबाद ह्मणणें बरोबर नाहीं.

रांचा जय अपजय होऊन, अखेरीस हुशंगशाहास यश प्राप्त झालें[१]. त्याणें गोंडवाड्याचा राजा जो नरसिंग त्याचा पराजय करून त्याचें मुख्य व मातबर केरल शहर घेतलें. हें शहर व आसमंतात् भागींचा प्रदेश, यापुढें हुशंगशाहाच्या ताब्यांत राहिला. या विजयानंतर

सन १४३३. थोडक्यांत हुशंगशाह मरण पावला. त्याणें तीस वर्षें राज्य केलें. त्याच्या अस्थी हुशंगाबादेहून नूतन स्थापित राजधानी जें मांडव शहर तेथें नेल्या; व त्या पुरून त्यावर एक भव्य कबर उभारिली. ही इमारत अझून उत्तम स्थितींत जशीचीतशी आहे.[२]

हुशंगगोरी नंतर त्याचा मुलगा गिजनीखान गादीवर बसला[३]. हा राजा निर्बल व व्यसनी होता. महंमद खीलजी या नांवाच्या त्याच्या प्रधानानें त्यास पदच्युत केलें. अधिकार प्राप्त झाल्यानंतर आपल्या सुवर्तणुकीनें महंमद खिलजीनें राज्यापहाराच्या पापाचें क्षालन केलें.

सन १४३५. मांडवाच्या कीर्तीसी व वैभवास हा राजा कारण होय. हुशंगशाहच्या अस्थींवर बांधलेली भव्य कबर, तशींच विद्यालयें, राजवाडे, वगैरे उभारलेल्या दुसऱ्या इमारती यांवरून आपल्या कल्याणकर्त्याच्या स्मरणीं पूज्यबुद्धि, व आपल्या प्रजेच्या ठिकाणीं कळकळ

---

१ दक्षिणेंत स्थापन झालेल्या मुसलमानीं राजकुळांतील हें एक कुळ होय. याजविषयींच्या विशेष माहितीकरितां स्कॉट्ट साहेबांनीं "दक्षिण" या नावाचा केलेला ग्रंथ पहा. हें फिरिस्ताच्या तिसऱ्या भागाचें भाषांतर आहे.

२ सर्व मांडवांत या सुंदर व भव्य इमारतीसारखी दुसरी इमारत नाहीं. एथून तेथून संगमरवराचा दगड लाविलेला आहे. मांडवास धारवाले पंवार यांचा अंमल आहे.

३ **अईन अकबरींत** यास हुस्सेन खां ह्मटलें आहे व महंमद खिलजीनें यास कैद करून आपण गादी घेतली असें लिहिलें आहे.

महंमदशाह बाळगीत असे असें दिसतें. हिंदुस्थानांतील मुसलमान राज्य-कर्त्यांमध्यें जी महत्कीर्ति त्यास प्राप्त झाली आहे तिला या कृत्यांनीं तो पात्र झाला. यानें तीस वर्षें राज्य केलें. व फिरिस्ताच्या लिहिण्याव-रून दिसतें कीं, त्याचा हा सारा काळ सतत परिश्रमांत गेला. त्याचें सर्व आयुष्य लढायांत गेलें;' परंतु एकदां गुजराथचा राजा अहंमद-शाह यानें माळव्यावर स्वारी केली होती, त्या प्रसंगाखेरीज महंमद खिलजीचीं युद्धकर्में आपल्या राज्याच्या हद्दीबाहेर असत. ज्या-मानानें हा शूर राजा बाहेर परिश्रम करी व सामर्थ्य दाखवी त्या मानानें त्याची प्रजा भरभराटीचा व शांतीचा अनुभव पावे. जरी बहुधा सारा काळ रणांगणांत गेला तरी, रसज्ञ व धीताल असल्यामुळें त्यानें आपल्या राज्यांतील हरएक ठिकाणास शोभा व मातबरी आणिली. त्याच्या अलिजाह स्वभावाच्या ज्या स्मारकांचें वर वर्णन केलें त्यांखेरीज, नालशा गांवीं त्यानें बांधिलेल्या पुष्कळ राजवाड्यांचीं शेषें उरलीं आहेत. जे डोंगर व मोठमोठे दरे मांडव शहराच्या गांवठाणाची हद्द बनले आहेत, व त्याच्या संरक्षणास कारण झाले आहेत, त्यांस लागून असलेल्या एका खुल्या सुपीक मैदानाच्या किना-ऱ्यावर, मांडव शहरच्या उत्तरेस साहा मैलांवर, रम्यस्थानीं, हें गांव वसलेलें आहे.

या राजाचें गुणानुवर्णन फिरिस्ता आनंदानें करितो. तो ह्मणतो

---

१. उन्हाळ्या दिवसांत राहण्याकरितां प्राचीन वाड्यांपैकीं एक वाडा मी तयार करविला होता. खोल्यांतून झाड झुडपें व कांटेरी पुष्कळ माजली होती ती काढून टाकून जागा साफ केली; तेव्हां राजांनीं राहण्याच्या या भव्य गृहांतील एका तळखोलींत एक वाघीण व तिचीं दोन पिलें गुहा करून राहिलीं होतीं त्यांस मजूरांनीं हुसकून लाविलें

कीं, हा सभ्यचालीचा, शूर, न्यायी व विद्वान् होता. हिंदु व मुसलमान दोघेही याच्या कारकीर्दींत सुखी होते व हे दोघेही लोक ऐक्याच्या व मैत्रीच्या धाग्यांत गोंवले जावे अशी याची मुत्सद्दीगिरी होती. प्राचीन काळीचे इतिहास व विशेषेंकरून प्रख्यात महत्पुरुषांचीं चरित्रें ऐकण्याची यास गोडी होती. परंतु या सर्वांहून आपल्या लोकांच्या उपयुक्त ज्ञानाविषयीं हा अत्यंत अभिमान बाळगी व त्या कामांत अत्यंत प्रवीण असे असें हा ग्रंथकार अखेरीस सांगतो.

सर्व साक्षी मिळतात तेव्हां हें निःसंशय आहे कीं, महंमद खिलजीच्या कारकीर्दींत माळवा येथील राज्याच्या भरभराची शिकस्त झालीं. तथापि हमेश कामगिरींत सर्व आयुष्य गेल्यामुळें या राजास कित्येक वळकट प्रतियोगही आले होते. एक्या प्रसंगीं पदरच्या उमरावांच्या फिसादीमुळें त्याची गादी गेली होती, परंतु गुजराथेंतील सुलतान मुजफ्फराच्या सहायानें ती परत प्राप्त झाली. दुसऱ्या एका प्रसंगीं तो चितोडच्या कुंभ राण्याच्या कैदेंत सांपडला होता, परंतु त्या राण्यानें उदार स्वभाव दाखवून त्यास सोडून दिलें व पुनः गादीवर बसावलें. चंदेरी, इसलामाबाद, हुशंगाबाद, व केरल, हीं शहरें त्याच्या मुलुखांत गणलीं गेलीं होतीं असें अढळतें. त्याच्या राज्याच्या सीमाः— दक्षिणेस सातपुडा, पश्चिमेस गुजराथेची सरहद्द व पूर्वेस बुंदेलखंड ह्या होत्या. उत्तर दिशेकडे त्याचा अधिकार मेवाड व हारावती प्रांतापर्यंत चालत होता, व शिवाय असें वर्णन आहे कीं, तो चितोड, कमळनेर वगैरे ठिकाणीच्या राजपूत राज्यांत, निरनिराळ्या प्रसंगीं वसूल गोळा करण्याभावीं लष्करें नेऊन, तेथील राजांकडून खंडणी घेत असे. परंतु त्या काळांतील लेखांवरून, व त्यांत विशेषेंकरून हिंदू लोकांच्या, असेंही दिसून येतें कीं, कित्येक राजपूत राजे शेजारच्या मुसलमानांशीं मोठ्या कसोसीनें झगडत व वारंवार महत्वाचीं यशें संपादित.

महंमद खिलजीनें लोकोपयोगी इमारती बांधण्यांत पुष्कळ खर्च केला व मोठें लष्कर ठेविलें, यावरून त्याच्या आमदनीचा थोडाबहुत अंदाज होऊं सकतो. फिरिस्ता लिहितो कीं, गुजराथेवर स्वारी केली त्यावेळेस त्याचें एकलक्ष लष्कर होतें. ही अतिशयोक्ति असावी हें संभवतें; परंतु हें घेऊन चाललें तथापि, खास राज्यांतील वसुलांतून जो खर्च पुरा पडूं सकता त्याहून वास्तविक खर्च इतका पुष्कळ होता कीं, परमुलुकांवर प्रतिवर्षी स्वाऱ्या करून तो आपली तिजोरी भरीत असे असें अनुमान करणें भाग येतें. व असेंही अनुमान करणें भाग येतें कीं, अवंतर पुष्कळ शूर राजांप्रमाणेंच त्याची खास प्रजा जरी त्याला न्यायी, समर्थ व संरक्षक लेखी तरी आसपासच्या मुलखांतील लोक त्यास लुटारू, धाडेकरी व प्रजापीडक समजत.

महंमद खिलजीच्या मागें त्याचा मुलगा गयासुद्दीन गादीवर बसला. सन १४६८. जरी बापाबरोबर कष्ट करण्याची व प्रताप मिळविण्याची तालीम त्यास मिळाली होती, तरी राज्याचा व अधिकाराचा त्यास लवकरच वीट आला असें वर्णन आहे. राज्यभार दुसऱ्याच्या मस्तकीं देऊन तो विषयसुखांत निमग्न झाला. मांडवास त्याच्या वाड्यांत पांचशें सुंदर स्त्रिया होत्या असें ह्मणतात. कित्येक ग्रंथकार तर अतिशयोक्तीनें या संख्येची तिप्पट सांगतात. या राजानें तेहेतीस वर्षें राज्य केलें. त्याच्या बापाच्या शाहण्या व समर्थ कारकीर्दीचा हा बलकट पुरावा आहे कीं, पुढील अळसी व जालसादी पुरुषाच्या अमला खालीं देखील, चहूंबाजूंनीं दंगेखोर शेजाऱ्यांनीं वेष्टिलेल्या माळव्या सारख्या राज्यांतून, मुलूक कमी पडला नाहीं. कित्येक ग्रंथकार लिहितात कीं, गयासुद्दीनाचा अंत त्याचा मुलगा नुरुद्दीन याच्या हातानें झाला. या गोष्टीचा फिरिस्ता अंदेशा घेतो व ती संभवत नाहीं असें ह्मणतो. परंतु नुरुद्दिनाच्या कारकीर्दीचें जें वृत्त फिरिस्तानेंच लिहिलें आहे तें हा नुरुद्दीनाचा आरोप दूर होण्यासारखें नाहीं. नुरुद्दी-

न जरी चालाक व शूर होता तरी विषयाचा गुलाम झाला होता असें दिसतें. त्याच्या व्यभिचाराचे बीभत्स देखावे पाहून हिंदु लोक व मुसलमान लोक दोघेही विटले. अखेर दारू पिण्यांत कमाल झाल्यामुळें त्यास ताप आला व तापांत त्याणें गारपाण्यानें स्नान केलें तें स्नान त्याच्या मरणास कारण झालें. गादीवर बसून अकरा वर्षे झाल्यानंतर तो मरण पावला.

जरी नुरुद्दीन इतका दुर्व्यसनी होता तरी, जेव्हां राज्य त्याचा मुलगा जो महमूद त्याच्या हातीं गेलें तेव्हां, त्यांतील संपात्ति अथवा वैभव कमी झालें नव्हतें हें एका गोष्टीवरून सिद्ध होत आहे. प्रतिष्ठित ग्रंथकार लिहितात कीं, या तरुण राजास राज्याभिषेक होतेवेळीं मखमाली पोषाकांनी सज्ज केलेले सातशें हत्ती मांडव शहराच्या रस्त्यांत बाहेर निघाले होते.

महमुदाच्या कारकीर्दीच्या स्वस्थतेंत व्यत्यय आणण्यास ( प्रथम ) सन १५१२. त्याच्या भावांचे फिसादी खटाटोप कारणीभूत झाले. त्यांपैकीं एकानें चंदेरी वळकाविली.[१] हे घरांतले दंगे मोडण्या करितां महमुदानें, आपल्या राज्यांतील राजपूत शिपायांच्या मदतीचा आश्रय केला. मुसलमानी ग्रंथकार ह्मणतात कीं, त्यानें आपल्या खुद्द जातीचें व राज्याचें संरक्षण, या जातींपैकीं आपला प्रधान जो मदतराय ह्मणून होता, त्याजकडे सोंपविलें. परंतु ही चुकी लवकरच त्याच्या ध्यानांत आली व ती सुधारण्याकरितां सैन्यांतील पुष्कळ

---

१ बाबर आपल्या शाहनाम्यांत लिहितो कीं, दिल्लीच्या सुलतान शिकंदर व सुलतान इब्राहीम बादशाहांनीं या राजपुत्रास चेतविलें व मदत दिली. सुलतान इब्राहिमानें महमूदशाहच्या मरणानंतर त्याच्या मुलाकडून चंदेरी हिसकून घेऊन आपल्या एका कामदाराच्या हवाली केली. या कामगारापासून चंदेरी चितोडच्या राजानें वळकाविली.

लोकांस फांटा देऊन तो प्रयत्न करूं लागला. यापासून प्रथम बंड आणि नंतर मुसलमान व राजपूत यांमध्यें कलह उत्पन्न झाले. या कलहांच्या भयंकर परिणामापासून त्यानें गुजराथेंत पळून जाऊन आपला बचाव केला. गुजराथच्या राजानें त्यास खुशीनें आश्रय दिला. व या परागंदा होऊन आलेल्या राजास पुनः गादी प्राप्त करून देण्याकरितां त्यानें लष्कर पाठविलें. ह्या लष्करानें कित्येक महिनें वेढा देऊन अखेर मांडव शहर हल्ला करून घेतलें. या स्मरणार्ह प्रसंगीं एकुणीस हजार राजपूत पडले व त्यांत कित्येकांनीं अपजय सोसून राहण्यापेक्षां जिवाची आहुती देणें पसंत केलें. नंतर, महमुदानें मूर्खपणानें भरंवसा ठेवून राज्यांतील सर्व बळकट ठिकाणें हिंदूंच्या ताब्यांत दिलीं होतीं, तीं हिंदूंशीं युद्ध करून परत घेण्याकरितां, तीन हजार स्वार कुमकेस देऊन गुजराथचा राजा आपल्या देशीं परत गेला.

वरील वर्णन याथातथ्य नाहीं असें अनुमान करण्यास चांगला आधार आहे. चितोडचा राजा राणासंक, या काळीं राजपूत लोकांत अग्रगण्य होता, त्याच्या शौर्यापासून व सामर्थ्यापासून जीं मुसलमानांस संकटें प्राप्त झालीं, त्यांचा संबंध गृहकलहाकडे व बेमानीकडे मुसलमानी ग्रंथकार लावितात असें दिसतें. या प्रसिद्ध हिंदू राजानें शाहामहंमदावर संपादिलेल्या विजयांचा उल्लेख बाबरानें आपल्या काळचा जो इतिहास लिहिला आहे, त्यांत आहे; बाबरानें असेंही लिहिलें आहे कीं, राणासंकानें महमुदापासून कांहीं प्रांत हिसकावून घेतले होते. या प्रांतांचीं नांवें, राठगड, सारंगपूर, भेलसा व चंदेरी अशीं होतीं. पुढें एका ठिकाणीं हा ग्रंथकर्त्ता राजा आपल्या स्वतःच्या विजयांविषयीं बोलतानां लिहितो कीं, मी चंदेरी या राजपूत राजापासून घेतली. "सन ९३४ हिजरी या सालीं भगवंताच्या कृपेनें मी हल्ला करून चंदेरी शहर कांहीं तासांच्या आंत घेतलें. त्याच्या संरक्षणास राणासंकाच्या अत्यंत मोठ्या व प्रसिद्ध कामगारां-

पैकीं, मदतराय नावाचा एक कामदार होता. सर्व काफरी लोकांत मी मारिलें आणि फारकाळपर्यंत वैरी असलेल्या या शहरास मी स्वधर्मांतील एक शहर केलें." वास्तवीक गोष्ट अशी दिसते कीं, खिळजी वंशाच्या पडत्या काळीं राजपूत लोक, माळव्या वरील गेलेलें आपलें स्वामित्व पुनः हस्तगत करण्या करितां झटून प्रयत्न करीत होते; व त्यांचा हेतु सिद्धीस न जाण्यास एवढेंच आड आलें कीं, या संधीस दिल्लीच्या गादीवर बसलेल्या नवीन राजकुळाचा उदयसमय आला.

आपल्या अधिकाराची पुनः स्थापना करण्यांत महमूदशाहाचें बरेंच पुढें पाऊल पडलें होतें इतक्यांत त्यानें दुर्दैवेंकरून, गुजराथच्या बहादुरशाहाचा भाऊ परागंदा होऊन आला होता, त्यास आश्रा दिला; व या वेडेपणानें त्याणें त्या राजाचा हल्ला आपणावर आणून घेतला. या हल्ल्यांत महमूदशाह मरण पावला व त्याचें कूल विलयास गेलें. बहादूरशाहनें मांडव हस्तगत केलें व दुर्दैवी महमूदशाहास व त्याच्या मुलांलेकरांस पवारगडच्या किल्ल्यावर कैदेंत टाकिलें. त्यांची सुटका करण्या भावीं कोणी यत्न केल्यावरून महमूदशाहा दोहदगावीं ठार मारिला गेला. या गांवींच त्यास मूठमाती दिली.

वर लिहिलेल्या प्रसंगापासून, पुढें दिल्लीच्या बादशाहानीं माळवा जिंकिला तोंपर्यंत, हा प्रांत निरनिराळ्या राज्यक्रांतींचेंच स्थळ झाला होता. ह्या मध्यंतरीय काळांत ३७ वर्षें गेलीं. हुमायुनानें बहादुरशाहास हकून लाविलें. परंतु खुद्द हुमायून इराणाकडे पळाला. तेव्हां खिलजी सरकाराच्या अमलामधील मल्लूखां नावाच्या अधिकाऱ्यानें, दिल्लीच्या बादशाहाचे कामगारास या प्रांताचा बराच भाग सोडून देणें, भाग केलें. मग मल्लुखांस मांडव येथें सुलतान कादर माळवी या नांवानें गादीवर लोकांनीं बसविलें. माळवी हें नांव धारण करण्यांत त्याचा असा हेतु असावा कीं, तेणेंकरून या प्रांतांतील रहवाश्यांनीं अभिमान

धरून स्वतंत्रतेचा आपल्या देशाचा हक्क गाजवावा, व अशा प्रकारें आपलें साहाय्य व्हावें. त्याजवर शीरशाह बादशाहानें स्वारी केली व
सन १५४२. यामुळें त्यास गुजराथेकडे आश्रयाकरितां पळून जाणें भाग आलें. शीरशाहानें सुजालखां या नावाच्या एका पदवीच्या अम्मलदार गृहस्थाकडे माळव्याचें काम सांगितलें. या उमरावाच्या अलिजाह कारखान्याच्या निशाणी दाखल त्याणें वसविलेलें सुजालपूर शहर आतां राहिलें आहे. त्याच्या मरणानंतर त्याचा मुलगा मल्लीवइजद अधिकार चालवूं लागला. त्याणें बाजबहादर असी खिताब घेऊन
सन १५५५. थोडाकाळ पर्यंत स्वतंत्र सत्ता चालविली. तो जरी शूर शिपाई होता तरी अळसांत व ख्याली खुशालींत निमग्न असे. रूपमती या नावाच्या एका लावण्यवती हिंदूस्त्रीवर[1] त्याचें प्रेम जडलें होतें, त्याचा इतका अतिशय झाला कीं, त्यामुळें कित्येक अनिवार मूर्खपणाचीं कृत्यें त्याणें केलीं. लोकप्रिय काहाण्यांतून व गाण्यांतून अझून
सन १५६०. हीं कृत्यें प्रसिद्ध आहेत. परंतु दिल्लीहून एक लष्कर आल्यामुळें बाजबहादर या सुखाच्या स्वप्नांतून जागृत झाला व अशीरगडावरील अधिकाऱ्याकडे पळून गेला. नंतर या अधिकाऱ्याच्या व तसेंच वऱ्हाडच्या मुसलमानी राजांच्या सहायानें त्याणें बादशाही सैन्यावर कांहीं यश मिळविलें. त्या सैन्याच्या सरदारावर आतां पळून जाण्याची पाळी आली. परंतु हा मिळविलेला जय थोडा काळ
सन १५६१. कामीं आला. दिल्लीहून पुनः सैन्य आलें व त्याणें पुनः बाजबहादरास हाकून लाविलें. पुढेंतर अकबरानें जातीनें यामुलकीं स्वारी करून हा तटा पुर्णपणीं मिटविला. माळव्याचें नांव

---

१ ही प्रसिद्ध स्त्री सहारणपूर येथील कळावंतीण होती. व हिच्या शहाणपणाची व कुशलतेची सौंदर्याहूनही विशेष ख्याति होती. या आशिक राजानें आपल्या माशूका करितां बांधलेल्या भव्य वाड्याचीं शेषें मांडव येथें उरलीं आहेत.

सन १५६७. आतां स्वतंत्र राज्यांतून निघालें व खालसा प्रांतांत दाखल झालें. पुढें मराठ्यांनीं हा देश जिंकिला तोंपर्यंत माळवा याच स्थितींत राहिला. इतकेंच कीं, बादशाही खालसा प्रांतांत जे फेरफार व ज्या राज्यक्रांती होत असत त्या येथेंही होत.

माळव्यांतील मुसलमानी राजांच्या हातीं एकाकाळीं बरीच सत्ता आली होती. त्यांचीं नाणीं पुष्कळ सांपडतात त्यांवरून असें दिसतें कीं, इतर मुसलमानी राजांच्या वहिवाटी प्रमाणेंच त्यांणींही, मोठाली अर्हतेचीं व डामडौलाचीं नांवें धारण केलीं होतीं. इतका काळमध्यें लोटला आहे तेव्हां, आज त्यांच्या राजव्यवस्थेचें साधारण स्वरूप देखील बरोबर निवडूं ह्मटलें तर मुष्किल आहे. परंतु मांडव येथील भव्य शेषांवरून[१], व तसेंच आतां उजाड असलेल्या स्थळीं पुरातन

---

१ या भव्य शहराच्या तटबंदीचा ३७ मैल विस्तार होता ह्मणून वर सांगितलेंच आहे. या परिघाच्या आंतील जागेच्या मोजदातीचा हिशेब, ह्या शहराच्या जमीदाराचे कांहीं कागद मी आणले होते त्यांपैकीं एका अत्यंत जुन्या कागदांत, खालीं लिहिल्या प्रमाणें दाखविला आहे. सदरहू कागदांत इमारती, हमामखाने, तलाव, नद्या, पर्वत वहित जमिनी वगैरेकडे लागलेल्या जागेची बरोबर लांबी रुंदी दिली आहे, त्या वरून हें शहर किती वैभवास पोंचलें होतें याचा बराच खरा अंदाज करितां येतो.

मांडव किल्ल्यांतील जमीनीचा तपशील चौरस बिघ्यांनीं खालीं लिहिला आहे.

| नांव. | बिघे. |
|---|---|
| १. निमाझर. | २,५५५ |
| २. हमामखाने. | ४०० |
| ३. लहानलहान टेंकड्या व डोंगर. | २,३५० |
| ४. बागा. | ३६३ |

शहरांच्या व खेड्यापाड्यांच्या निशाणी उरल्या आहेत त्यांवरून असें सिद्ध होतें कीं, हा प्रांत या राजांच्या अमलाखालीं फार मोठ्या भरभरास चढला होता. तथापि एक गोष्ट खचित आहे कीं, त्यांणीं आसपासच्या रजपूत व छोटेखानी सरदारांस तर दूरच, परंतु आपल्या राज्याच्या हद्दींतील रजपूत व छोटेखानी सरदारांस सुद्धां कधीं

---

| | | |
|---|---|---|
| ५. | मसजिदी. | ७०५ |
| ६. | लहानमोठे तलाव. | ३१० |
| ७. | राजवाडे. | ५०० |
| ८. | सराई. | ३०५ |
| ९. | लालबाग. | २०० |
| १०. | बारा बाजार रस्ते. | १४७ |
| ११. | तगर तलाव. | ९१० |
| १२. | लहान तळीं. | २६३ |
| १३. | वस्ती. | २,२५८ |
| १४. | जोतलेली जमीन | ८४५ |
| १५. | जमीदारांचें इनाम | १२५ |
| | | ११४१६ |

खेरीज जामन्या हुनेरी व नंदल्या हे पुरेही तटबंदीच्या आंत होतें. यांनीं व्यापिलेली जागा २२५८ बिघे होती; ही संख्या वरच्या संख्येंत मिळविली ह्मणजे मांडवाच्या सीमेंत एकंदर बिघे १३६७४ जमीन भरते. खेरीज तटाच्या भिंतींनीं व्यापिलेली जागा दोन हजार आठशें अडतीस बिघे; आणखी यांत सोनगडचे ५०० पांचशें बिघे मिळविले तर येकंदर तटबंदीच्या आंत १७०१२ बिघे जमीन होते. हल्लीं साठ चौरस यार्डांचा माळवी बिघा आहे. या मानानें पाहिलें ह्मणजे मांडव येथील तटबंदीच्या घेऱ्यांत सांपडलेली जमीन बरासरी १२४६५४ इंग्लिश एकर भरते.

पुरे कबज्यांत आणिलें नव्हतें. या कुळांत अत्यंत शूर व शाहाणे जे राजे झाले त्यांनीं ह्या शूर हिंदुलोकांशीं दिल्लीच्या बादशाहांप्रमाणें वर्त्तणूक ठेविली होती. ताबेदारीचें नांव, कांहीं थोडी खंडणी, व प्रसंगीं एखादेवेळीं लष्करी नौकरी, एवढ्यावरच ते तृप्त असत. आपल्यावरील मुसलमानी अधिकाऱ्यांच्या निर्बलतेनें अथवा जुलुमानें जेव्हां जेव्हां रजपूत सरदार दंडेलीस येत, तेव्हां तेव्हां त्यांची तयारी जी दिसे त्यावरून वरील गोष्ट सिध्ध होते.

माळव्याच्या वस्तींत रजपुतांचा बराच मोठा भरणा आहे. यांचा पूर्णपणें वृत्तांत पुढें दिला जाईल. येथें इतकेंच सांगणें पुरे कीं, या प्रांतांतील पुष्कळ जातींचे रजपूत सूर्यवंशी रामचंद्रापासून आपला वंश आहे असा अभिमान वाळगितात. आणि याच कारणामुळें त्यांस सूर्यवंशी ह्मणतात. आणखी कितीएक जाती आपण पुरुवंशी आहों असें ह्मणतात व आपली उत्पत्ति चंद्रापासून आहे असें लेखितात; परंतु कितीयेक ग्रंथकार ह्मणतात कीं, मुळीं क्षत्रियजातींतील आपण आहों असें ह्मणविण्यास सुद्धां त्यांस अधिकार नाहीं. त्यांच्या सांगण्यांत क्षत्रियजातीचा या युगांत क्षय झाला आहे. कांहीं असो. हें खरें आहे कीं, रजपूत लोकांनीं फार दिवस सत्ता चालविली असल्यानें त्यांस अत्यंत मान्यता मिळाली आहे. हिंदूंच्या लाक्षणिक व स्तुतिकारक ह्मणींत रजपूत लोकांस हिंदुधर्माचें खड्ग असें नांव आहे. अशा लोकांस जिंकिणें सोपें नव्हतें. कारण मुसलमानी स्वाऱ्यांच्या पूर्वीं व नंतर, दोन्ही काळांत, जरी आपसांतल्या कज्जांनीं त्यांचीं हजारों लहान लहान संस्थानें झालीं होतीं, आणि जरी हजारों या लहान संस्थानांतील प्रत्येकाविषयींही भाउबंदांचा झगडा असे तरी रजपूत मनुष्य जितका तितका शिपाई असे; व तो शिपाई नांवास कलंक लावून घेण्यापेक्षां मरण बरें असें मानी; व जरी कोणत्याही राजाची चाकरी करण्यास तयार असे, तरी गुलामगिरी करण्यास धिक् जिणें समजे.

त्यांच्या अत्यंत पवित्र पुस्तकांतून आपलीं कर्तव्यकर्में ते वाचीत. एके ठिकाणीं मनुष्य अवतार धारण केलेल्या कृष्णानें अर्जुनाशीं असा संवाद केला आहे "क्षत्रिय जातीच्या योद्ध्यास लढण्याहून विशेष महत्वाचें दुसरें कर्तव्य कर्म नाहीं. हे वीरा ज्या तुजवर भगवान् प्रसन्न आहे तो तूं आजच्या युद्धांत प्रवेश कर. जर मरण पावलास तर स्वर्गप्राप्ति पावशील, जर यशस्वी झालास तर पृथ्वीचा उपभोग घेशील."

रजपूत लोकांचा दम मारून टाकण्याकडे, जरी हिंदुस्थान जिंकणाऱ्या मुसलमानांच्या मुत्सद्दीगिरीचा कटाक्ष असता, तरी त्यांनीं स्थापिलेल्या राज्यरीतींत हा हेतु सिद्धीस जाण्यासारखा गुण नव्हता; परंतु मुसलमानांचा तसा कटाक्षही नवे. ज्यांच्या हातानें यश संपादावें त्यांचा हेवा करावा असा हमेशा जुलमी राजांचा स्वभाव असतो. यामुळेंच आपल्या दगेखोर लष्करावर व राज्यलोभी उमरावांवर दाब बसण्याकरितां, दिल्लीचे पूर्वीपूर्वींचे बादशाह या जातीच्या हिंदु लोकांस आर्जवून आपल्या नोकरींत लावीत; व त्यांच्या राजांवर ताबेदारीचें जूंव फार हलकें ठेवीत. बादशाहींतील अव्वल प्रतीच्या उमरावांप्रमाणें त्यांस वागवीत आणि पदव्या, मान, मरातब, संपत्ति वगैरे त्यांस व त्यांच्या नातलगांस देत इतकेंच नाहीं तर, त्यांच्या सेवकांतूनही पुष्कळांस देत. अशा वागवणुकीनें उत्पन्न झालेल्या ऐक्यांत केव्हां केव्हां अंतर येई; आणि यामुळें प्रथमप्रथमच्या मुसलमानी बादशाहांमध्यें व राजपुतांमध्यें कांहीं तुमुल संग्राम झाले होते असेंही दिसतें. तथापि मुसलमानी उमरावांपेक्षां ह्या राजपूतांमध्यें कमी दगे उभे राहात. शिवाय तैमूरच्या कुळाची मनोभावानें ताबेदारी उचलण्यांत राजपूतांपैकीं कित्येक अत्यंत अभिमानी राजे आपल्या धर्मास व पूर्वापार चालीस इतके विसरले होते, तसेंच ऐषआरामांत राहिल्यानें इतके निस्तेज झाले होते, व बादशाहांनीं ठेविलेल्या अधिकारानें व थाटमाटानें इतके दिपून गेले होते कीं, बादशाहांच्या जनानखान्यांत आपल्या मुली देण्यास ते राजी होत. इत-

केंच नाहीं, तर त्यापासून आपल्या मुलींची अब्रू वाढत्ये असें समजत.[1] परंतु शूर व इमानी शिपाई अशी जी यांची ख्याति होती तीच, मुसलमानी राजांची कृपा प्राप्त करून घेण्यास मुख्य कारणीभूत होय. यामुळें हिंदुराजांना व सरदारांना बादशाहींत निरनिराळ्या ठिकाणीं काम व अधिकार प्राप्त होत, व चाकरी बजाविण्याबद्दल बहुधा जमीनी इनाम मिळत. माळव्यांतील मुख्य मुख्य रजपूत घराण्यांपैकीं कांहींची या देशीं स्थापना होण्याचें हें मूळ आहे. त्यांतून पुष्कळांस जयपूर, जोदपूर, उदेपूर[2] वगैरे वजनदार राजांपासूनही मदत मिळाली होती बहुधा त्या साऱ्या घराण्यांचा या राजांपैकीं कोणाशीं तरी संबंध आहे.

माळव्यावर मराठ्यांनीं प्रथम स्वारी केली तेव्हां, त्या प्रांतांतील अतर्गत राज्यव्यवस्था कशा प्रकारची होती हें दाखविण्यास, तेथील हिंदू सरदारांच्या कांहीं पूर्वजांचें वृत्त दिलें असतां उपयोग होईल. असें करण्यास राघवगड, झाबवें आणि रतलाम या लहान लहान संस्थानांपेक्षां चांगलीं उदाहरणें सापडणार नाहींत. राघवगडचे राजे कयचा जातीचे रजपूत आहेत व ते असा अभिमान बाळगितात कीं, आपण दिल्लीच्या पृथुराजा-

---

१. तथापि हिंदू ग्रंथकार या गोष्टीस लांछन समजतात. माजी जयशिंग कयची याच्या जवळील एका बखरींत असें अभिमानाचें लिहिणें आहे कीं, जयशिंगाच्या एका पूर्वजानें अत्यंत संकटकाळ सोशिला परंतु या अब्रुनाशक प्रघातास तो अनुसरला नाहीं. उदेपूरचे राणे, जे सर्व राजपूत कुळांमध्यें उंच आहेत, तेही असा अभिमान बाळगितात कीं, आपल्या घराण्याचा कोणत्याही मोगल बादशाहाशीं शरीरसंबंध झाला नाहीं.

२. माळव्याच्या पूर्व इतिहासामध्यें उदेपूरच्या राण्यास चितोडचे राजे ह्मटलें आहे. सन १५६७ त अकबर बादशाहानें चितोडचा प्रसिद्ध किल्ला घेतला, व त्यामुळें चितोडाहून या राजांची गादी उठली, तों पर्यंत ते चितोडचे राजे या नावानें प्रसिद्ध असत

चे वंशज आहों. ते प्रथमतः गंग्राड येथें राहिले.[१] गरीबदास या नांवांच्या पुरुषापर्यंत त्यांचा अधिकार अथवा महत्व फारसें नव्हतें. हा पुरुष अकबर बादशाहाच्या नोकरींत प्रसिद्धीस आला. अकबरानें त्याजकडे मुलतान प्रांताचें काम सांगितलें, व नेक वर्त्तणुकीसाठीं त्यास सिरोंज गांव व आसपास आणखी जमीनी वंशपरंपरा जहागीर करून दिल्या. या सरदाराच्या लालजी नावाच्या मुलानें राघवगड शहर वसविलें. व हा गांव या घराण्याच्या गादीचें स्थान झाला. मराठ्यांनीं माळव्यावर प्रथम स्वारी केली तेव्हां, त्याचा नातु बलिभद्रसिंग या नावाचा विख्यात व वजनदार पुरुष, राघवगडीं राजा होता.

झाबव्याच्या गादीवरील सांप्रतचा पुरुष सिंदा आहे. परंतु हे राजे जोतपूरच्या राठोड राजांपासून आपण प्रत्यक्ष वंशज आहों असा दावा करितात. या घराण्यांतील कांहीं पुरुषांचा, बादशाही चाकरींत, रिघाव होण्यास, उंचकुळीं जन्म व जातीचे गुण हीं दोन्हीं कारणें साधनीभूत झालीं. भानजी दिल्लीस च्यारशें स्वारांचा मुख्य होता, व

१ हिंदूंच्या वर्णनांत पृथुराजाची फार ख्याति आहे. हिंदुस्थानावर स्वाऱ्या करणाऱ्या मुसलमानांशीं त्याणें केलेले प्रसंग, त्याच्या जातींतील भाट लोकांच्या भक्तिपुरस्सर वर्णनांस वारंवार विषय झाले आहेत. त्याची ख्याति दंतकथेंतच आहे असें नाहीं. त्याजवर कित्येक कवनेंही रचलेलीं आहेत. त्यांपैकीं एका कवनांत कवितेचा गुण चांगला असून इतिहासांतील पुष्कळ खऱ्या गोष्टीही आहेत. तें करणारा भाट, पृथुराजाच्या सर्व युद्धांत त्याजपाशीं हजर असे. मी पाहिलें आहे तितक्यांत माझ्या नजरेस असें आलें आहे कीं, सांप्रतकाळींचे राजपूत राजे आपल्या पूर्वजांच्या शूर कृत्यांतील निर्विवाद गोष्टींकरितां, वारंवार या कवनाचा दाखला देतात.

सन १८५७ सालच्या गर्दींत राघवगड खालसा झालें.

२ या किल्ल्यांतून शिकंदर बादशाहच्या फौजेशीं यांणीं बारा वर्षें टक्कर घेतली.

त्याचा मुलगा किसनदास अलाउद्दीन शाहजाद्यापाशीं हुजुरांत असे. गादीवर बसल्यानंतर तो अल्लाउद्दीनाच्या फार मेहेरबानींत राहिला. कोणा एका सुभेदारानें फिसाद माजवून डाका शहर हस्तगत करून घेतलें होतें, तें त्याणें त्याजपासून परत जिंकून घेऊन आपल्या धन्याची नोकरी बजाविली. या साठीं त्यास उत्तरहिंदुस्थानांत पांच गांव व माळव्यांत दहा परगणे असें इनाम मिळालें. माळवे प्रांतीं येऊन कांहीं वर्षे झालीं नाहींत तोंच त्याच्या नशीबाचा आणखी उदय होण्यास कांहीं गोष्टी घडून आल्या. सुका नाईक भील, झावव्याचा अधिकारी होता त्याणें, व धोलीटा येथील चंद्रभान नावाच्या राजपूत सरदारानें, गुजराथेंतील सुभेदाराच्या कुटुंबापैकीं कांहीं माणसांस व त्यांच्या नोकराचाकरांस लुटून घेऊन ठार मारिलें होतें. या खुनाचा सूड उगविण्याकरितां किसनदासास दिल्लीहून परवाना आला. आपल्या दुर्गम प्रांतांपासून वळकटी पावून, लष्कराच्या सुसूत्र हल्ल्यास न जुमानणाऱ्या या सर्वत्र प्रसिद्ध लुटारू सरदारांवर केवळ सैन्यबलानें जें कार्य कधींही घडून आलें नसतें, तें किसनदासानें युक्ति व धैर्य या दोहोंची योजना करून घडविलें. घोडे विकणाऱ्या गुजराथी व्यापाऱ्याचा वेश घेऊन तो झावव्यास गेला; व तेथील राजास थोड्या किमतींत कांहीं नांव घेण्याजोगे नामी घोडे विकून, व कृतज्ञता बुद्धि दाखवून, मेजवानी करितों ह्मणून विनंति केली. मेजवानीचें आमंत्रण घेतलें गेलें. मग नेह्मी सारखी रेलचेल उडाली त्यांत निमग्न असतां सूका नाईक आणि त्याचे सर्व मुख्य मुख्य अनुयायी मारले गेले, व त्यांचा किल्ला किसनदासाच्या हातीं आला. या चाकरीसाठीं बादशहानें झाववा मुलुख प्रथम किसनदासास इनाम दिला व नंतर मोठ्या मोठ्या पदव्या देऊन राजचिन्हें पाठविलीं. यामुळें माळव्यांतील हिंदू सरदारांत त्यांस उंच पायरी प्राप्त झाली. इतर लहान संस्थानांप्रमाणेंच येथील कामगारांतही फेरफार चालू राहून मराठ्यांच्या स्वारीपर्यंत हें कुळ कायम होतें. तथापि धाकट्या भावाच्या वंशास निर्वाहाकरितां

मुलूख तोडून देण्याचा जो या जातीमध्यें प्रघात आहे त्या अन्वयें, या कुळांत वांटण्या होऊन कित्येक निरनिराळीं लहान लहान संस्थानें त्या काळापूर्वींच झालीं होतीं. त्यां पैकीं, अमझऱ्याचें संस्थान एक होयं.[1]

जोदपूरच्या कुळांतील मोहनदास नांवाच्या सरदाराचा रतनसिंग ह्मणून मुलगा होता. त्यानें आपल्या अवरशक्तीनें व शौर्यानें शहाजहान बादशाहाची इतकी प्रसन्न मर्जी करून घेतली कीं, त्या बादशाहानें रतलाम[2], सलाणा, व त्याजवळचे दुसरे प्रांत त्यास इनाम दिले. अवरंगजेबानें जेव्हां आपल्या बापाविरुद्ध बंड केलें तेव्हां, स्वामिकार्यासाठीं हा सरदार अवरंगजेबाचे लष्कराशीं लढण्यास गेला, व तेथें लढाईंत पडला[3]. रतनसिंगाच्या इमानदारीकरितां शहाजहानानें, ज्या जमिनी पूर्वीं जायदाद (सरंजामी) इनाम करून दिल्या होत्या, त्या आतां कुटुंबाच्या निर्वाहाकरितां मोफत इनाम करून दिल्या.

मराठ्यांच्या स्वारी पर्यंत या कुळाकडे आपल्या संस्थानाचा अधिकार होता. तरी राजपूत लोकांच्या चालीप्रमाणें किती एक परगणे धाकट्या भावाच्या निर्वाहास तोडून दिले होते. सीतामहूचा राजा, सलाण्याचा राजा, कच्च बरुडचा राजा आणि मुलठानचा राजा हे सारे रतनसिंगाचे वंशज आहेत. कुळांतील मुख्य पुरुष या सुंदर प्रांतीं रतलाम शहरीं अधिकार चालवी. व बाकी सारीं धाकटीं घराणीं त्याचा मान राखीत व सांगितलेलें ऐकत.

माळव्यामध्यें कितीएक राजपूत सरदारांचा कसा अधिकार व कसें

---

१. हें संस्थान सन १८५७ सालच्या गर्दींत इंग्रज सरकारानें खालसा केलें.

२ असें सांगतात कीं, रतनसिंगानें या प्रांताचें मुख्य शहर (रतलाम) वसविलें. बहुधा असें वाटतें कीं, आपल्या राहण्याचें ठिकाण त्याणें करून हें खेडें होतें तें शहर केलें.

३ या लढाईचें विशेष वृत्त बरनर साहेबानें दिलें आहे.

वजन होतें, व तें कसें स्थापन झालें हें दाखविण्यास हीं उदाहरणें पुरत. यां सारखींच दुसरींही पुष्कळ उदाहरणें आहेत. ये बलशाली जातीनें तैमूरच्या कुळाची तावेदारी फार काळ उठविली असतां, अखेर कां सोडिली या गोष्टीचा माग लागणें सोपें आहे. हिंदू प्रजेस स्वधर्मानें चालण्यास अगवर बादशाहाचा प्रतिबंध नसून खुली मोकळीक होती. तोच नमूना घेऊन त्याच्या लागलीच मागें जे गादीवर बसले ते चालले; परंतु खड्गाच्या योगानें स्थापित झालेला असा जो (मुसलमानी) धर्म, कीं ज्या धर्मांतील एक मुख्य मत, परधर्मी लोकांस व विशेषकरून मूर्तिपूजकांस आपल्या धर्मांत आणावें, अथवा त्यांची कतल करावी, अथवा त्यांजपासून जबर खंड घ्यावा, अशाविषयीं आज्ञाकरितें, त्या धर्माचा बाणा; आणि स्वधर्मी व परधर्मी यांजमध्यें भेद न करणाऱ्या सूत्रांवर ज्या राजनीतीचा पाया, त्या राजनीतीचा बाणा, या दोहोंमध्यें मेळ कोठून? जेव्हां हिंदुलोकांशीं लढाया अथवा तंटे उभे राहात तेव्हां ही द्वेषबुद्धि प्रकट होई. परंतु जोंकाळपर्यंत गादीचा मालक धर्माभिमान बाळगीत नसे, तों काळपर्यंत या द्वेष बुद्धीची कार्यशक्ति फार नियमित होती. जहांगीर बादशाहाचा विशेष कल कोणत्याच धर्माकडे नव्हता. त्याचा मुलगा जो शाहाजहान त्याचीही पूर्व वयांत बापासारिखींच मतें असत. पुढें पक्क दशेंत, जरी मुसलमानी धर्मावर कदाचित् त्याचा विश्वास नसला तरी, बाह्यात्कारी त्या धर्मांतील आचार लक्ष देऊन तो पाळूं लागला होता. परंतु तेव्हांही आपल्या प्रजेस पूर्वींप्रमाणेंच धर्मसंबंधी त्याणें मोकळीक ठेविली होती. यांत एकदां मात्र न जाणून अंतर पडलें. या बादशाहाचा वडील मुलगा, जो प्रसिद्ध दुर्दैवी दारा त्याणें मुसलमानी व ब्राह्मण धर्मांच्या मतांचें ऐक्य करण्याभावीं एक ग्रंथ लिहिला होता. या प्रमाणेंच औरंगजेबाखेरीज दाराचे दुसरे बंधूही धर्मवेडापासून दूर होते. शाहजाद्या अवरंगजेबानें सत्ता कशी मिळविली व कशी चालविली हें जें चरित्र आहे, त्याजहून दुसरें कोणतेंही चरित्र विशेष उपदेशपर नाहीं. त्याचीं सुकृत्यें व दुष्कृत्यें तराजू-

त तोलण्याचा, अथवा जो महत् लौकिक त्याणें संपादिला आहे तो यथार्थ आहे किंवा नाहीं याचा उलगडा करण्याचा, अथवा औरंगझेव सर्व आयुष्यभर केवळ सोंग्या होता, व तोही असा सोंग्या कीं, भगवंतानें त्यास उभें केलेल्या उत्तम नाट्य प्रवेशीं, सर्व कृत्रिमसाधनें अनकूळ असतां, जें स्वभावसिद्ध सामर्थ्य खरें पात्र मात्र दाखवूं सकतें तें सामर्थ्य त्यास दाखवितां आलें नाहीं, असें ठरविण्याचा दावा आह्मीं बाळगीत नाहीं. परंतु आपले महत्वाकांक्षी हेतु सिध्धीस नेण्यास जे उपाय त्याणें योजिले त्यांवरून पाहतां असें खुशाल ह्मणतां येईल कीं, मुसलमानी धर्मविषयीं औत्सुक्य दाखविण्याचे जे आरंभी आरंभी त्याणें उद्गार काढिले होते ते सर्व आपल्या अनुयायी वर्गाची संख्या वाढविण्यासाठीं असत. या मुख्य गोष्टींत, बादशाही तख्ताचे वारिसदार ह्मणविणारे जे आपले बंधू त्यांच्या वर्तणुकीशीं आपली वर्तणूक ठळठळीत विरुध्ध आहे असें दाखविण्याचा त्याचा हेतु होता. त्यांच्याशीं झगडण्यांत औरंगजेब केवळ दुनियादारीच्या लाभास अनुसरे हें या गोष्टीवरून सिध्ध होत आहे. शूर व उदार दाराच्या रक्तांत हात बुडवितांना, त्यानें माइक, अक्षमी, व अनिवार्य धर्मौत्सुक्य धारण केलें होतें तें, त्या पापें करून सिंहासन हस्तगत केल्यानंतर तत्काळ टाकून दिलें; आणि आपल्या सर्व मूर्तिपूजक प्रजेस धर्मसंबंधी पूर्ण मोकळीक दिली. कारकीर्दीच्या आरंभीं या लोकांवर, त्याची मुसलमानांहून कदाचित विशेष भक्ति नसल्यास, निदान तितकी तरी होती असें दिसतें. निःसंशय हेंही दरबारीपणच होतें; परंतु या वेळीं तैमूरच्या कुळाच्या नाशार्थ आलेलें विघ्न टाळण्यास, केवळ युक्तीचे प्रयोग करूं पहाणारी सूक्ष्मबुद्धि राजनीति, समर्थ नव्हती. राज्याच्या एकंदर हिताकरितां अवश्य असणारीं नियम सूत्रें एकीकडे ठेऊन, एकादा क्षणिक लाभ प्राप्त करून घेणें हें धिक् जिणें आहे, मग तो लाभ कितीही मोहक असो, असें मानणाऱ्या उदार मनाच्या, व खऱ्या सद्गुणाच्या आधारानें, त्याणें खबरदारी व शाहणपण धारण केलें असतें तर मात्र याकुलाची सत्ता राहिली असती.

औरंगजेबाची वर्त्तणूक याहून किती विपरीत होती.? मराठ्यांच्या लुटारू स्वाऱ्यांमुळें संताप पावल्या कारणानें असो, अथवा या लुटारू लोकांस अवंतर हिंदु लोकांनीं जरी आंतून मदत दिली नसली तरी, ते त्यांचें बरें इच्छितात असा संशय उत्पन्न झाल्या कारणानें असो, अथवा खऱ्या, किंवा मुसलमानांची प्रीति जडून घेण्याकरितां धारण केलेल्या धर्मसंबंधी छळिक बुद्धीनें असो, औरंगजेबानें आपल्या सर्व हिंदु प्रजेस मुसलमानी धर्मांत आणण्यासाठीं अत्यंत अन्यायाचे उपाय योजिले. त्याच्या उपदेशास अथवा धमकावणींस थोड्याच लोकांनीं मानिलें, परंतु बाकी साऱ्यांच्या हट्टाचें शासन करण्याकरितां त्यांजवर त्याणें जबर कर बसविले व त्यांजपासून दंड घेतले. दंडाची जमा पुष्कळ होईल असें त्यास वाटलें होतें. औरंगजेबाच्या राज्यांत सरकारी महसूल फार घसरला होता ह्मणून त्याणें तिजोरी भरण्याच्या हलकट हेतूनें हा उपाय योजिला असें ह्मणतात. हेतु तडीस तर गेलाच नाहीं, ( कारण पूर्णपणें तडीस जाणें अशक्य होतें ) परंतु त्यांजपासून त्याच्या प्रजेंतील बहुतेकांचीं मनें विटलीं व त्याजवरील भक्ति उडाली. या मुकद्दम्याच्या संबंधांतील इतिहासोपयोगी जे लेख राहिले आहेत त्यांत, जोतपूरच्या यशवंतसिंग राजानें बादशाहास धिटाईचें व पाणीदार लिहिलेलें पत्र मुख्य होय. अकबर, जहांगीर, व औरंगजेबाचा बाप शाहाजहान, यांची कशी उलट वर्तणूक होती या गोष्टीचें स्मरण देऊन, व लोकांच्या सद्सद्विचार बुद्धीपासून वसूल उत्पन्न करण्याच्या प्रयत्नाची, व धर्मावर कर बसवून गोसांवी व बैरागी यांचीं मनें दुखविण्याच्या प्रयत्नाची निंदा करून यशवंत सिंग आणखी ह्मणतो. ज्या "पुस्तकांस ईश्वरी पुस्तकें आपण मानितां त्यांमध्यें जर आपला विश्वास असेल तर त्यांत आपणास असें सांपडेल कीं, जो ईश्वर ह्मणून आहे तो सर्वांचा ईश्वर आहे. नुस्त्या मुसलमानांचाच नाहीं. त्याच्या समोर मुसलमान व मूर्तिपूजक दोघेही समान आहेत. शरीराच्या रंगांत भेद त्याच्याच हुकुमानें आहे. सर्वांस जीवन तोच देतो. तुमच्या मसजीदींत त्याच्याच नांवानें भक्ति

करण्यास मुल्ला आवाज देतो. देवळांत घांट वाजते तरी आमच्या भक्तीचा विषय तोच आहे. ह्मणून इतर लोकांच्या धर्माची अथवा चालीची निंदा करणें हें भगवंताच्या इच्छेस न जुमानण्यासारिखें आहे."

अशातऱ्हेचीं मतें हिंदुलोकांत आतां पसरूं लागलीं; व सर्वांच्या साधारण धर्मावर आलेल्या विघ्नांच्या विचारांत ते आपसांतले तंटे विसरले. ही केलेली चूक परंतून औरंगजेब सुधरूं शकला नाहीं. त्याच्या वर्तणुकीनें प्रदीप्त झालेल्या क्रोधवुद्धीशीं, पुढें जे निर्बल वादशाह गादीवर वसले, त्यांच्या अधिकारीं उद्भवलेल्या तुच्छ वुद्धीचा, योग झाला. चालू अधिकार सदोदित कांहीं अंशीं तरी लोकांस अप्रिय असतोच. जसा सृष्टींतील पदार्थांत आघातापासून प्रत्याघात उत्पन्न होतो असा नियम आहे, तसाच लोकांच्या वर्तनांत व वर्तनविधींतही नियम आहे. येथें तर तशाविषयीं विशेष हेतु होते. आपणास जिंकणाऱ्यांच्या उदार दयेनें व मोकळिकीनें, तसेंच वादशाहीच्या संपत्तींत व वैभवांत हिस्सेदार झाल्यानें, दिल्लीच्या ताब्यांतील हिंदुराजे प्राप्तस्थितींत संतुष्ट असत; व तैमूरच्या वंशजांची सत्ता ध्यानांत आणून पुंडावे माजवीत नसत. ज्यावेळीं या सत्तेचा क्षय होऊं लागला व चहूं दिशेनें शत्रू उभे राहूं लागले, त्याच वेळीं धर्मप्रकरणांत मूर्ख हटवादामुळें लोकांची गांजणूक होऊं लागली. मग जुलमानें तापून व वादशाहांच्या निर्बलतेनें धैर्य पावून, जयपूर, मारवाड, मेवाड आणि माळवा येथील राजपूत राजांनीं व सरदारांनीं वादशाहीचा संरक्षकपणा सोडिला इतकेंच नाहीं, तर कोणी आंतून व कोणी उघड मराठ्यांच्या स्वाऱ्यांस मदत दिली. हें आश्चर्य करण्यासारखें नाहीं. या विषयावर लिहिणारे सर्व फारशी व हिंदुग्रंथकार सांगतात कीं, माळव्यावरील मराठ्यांच्या प्रथम स्वारीस कोणीच आड आलें नाहीं. या वेळेच्या त्यांच्या जयास धर्मवुद्धी मुख्यत्वें कार्यकर्ती झाली असें दाखविण्यास पुष्कळ आधार सांपडतात.

माळवा मराठ्यांच्या ताब्यांत जाण्यास (सारें उत्तर हिंदुस्थान ह्मटलें तरी चालेल) जयपूरचा प्रसिद्ध राजा जयसिंग वराच कारणीभूत झाला. कदाचित् न जाणोनही तो झाला असेल. या राजामध्यें व बाजीरावामध्यें जो पत्रव्यवहार झाला होता, तो जर आतां सांपडेल तर या काळाचा इतिहास स्पष्ट होईल. हा पत्रव्यवहार कसा सुरू झाला हें पाहिलें असतां त्या काळाचा व त्या त्या पक्षांचा विशेष गुण लक्षांत येतो. मराठ्यांच्या प्रधानानें जयसिंगाकडे पुराणांतील एक श्लोक पाठविला. या श्लोकाचा शब्दशः अर्थ असाः—तूं त्या मेघासारिखा आहेस कीं, जो समुद्राच्या उदकाचें प्राशन करितो व पृथिवीस सुपीकता देण्यासाठीं गर्जना करून तें उदक पुनः टाकितो. इंद्राच्या भयानें पर्वत, संरक्षणासाठीं तुजकडे पळतात. तूं कल्पवृक्ष आहेस. ज्या सागरांतून कल्पवृक्षाची उत्पत्ति तो सागर तूं आहेस. तुझी खोली कोण जाणूं शकेल? महा सागराच्या खोलीचें वर्णन करण्यास मी असमर्थ आहें; परंतु आपल्या सर्व कार्यांमध्यें अगस्ति मुनीची आठवण ठेव.

हिंदूंच्या पुराणांत अगस्ति मुनीनें समुद्राचें प्राशन केलें ह्मणून वर्णन आहे. तेव्हां हें पत्र जरी स्तुतिपर होतें तरी लक्षणेंकरून त्याणें स्पष्ट अर्थ सुचविला कीं, जर ब्राह्मणांच्या अधिकारास आड येशील तर काय होईल याची खबरदारी ठेव.

जयसिंगानें पाठविलेलें उत्तर त्याच पुराणा मधून होतें.

जर ब्रह्मवृंद माझी अगळीक करील तर मी त्यास क्षमा करीन. ही भाक मी पवित्र मानितों. अगस्तीनें समुद्राचें प्राशन केलें ह्मणून काय होय? जर महासागराची हद्द ज्या तटबंदीनें झाली आहे ती तटबंदीच पडावी अशी ईश्वरी इच्छा असेल तर जगताचा नाश होईल आणि मग अगस्ति मुनि कोठे राहील?

हिंदूलोक मानितात कीं, समुद्रास तट बंदीनें व्यापिलें आहे, आणि ब्रह्मवृंदानें स्थापित स्थितीचें संरक्षण करावें, नाश करूंनये; तेव्हां समुद्र

पृथ्वीवर मोकळा सोडिला असतां काय परिणाम होतील हें ब्रह्मवृंदा पैकीं-च एकास लिहून पाठविणें हें त्या वेळीं फार प्रशस्त समजलें गेलें. बाजीरावानें दाखविलेला मित्रभाव कबूल करून त्यास उत्तेजन देत असतां, त्याणें दिलेल्या धमकीस उलट धमकी द्यावी कीं, फार काल स्थापित अधिकाराच्या नाशास प्रवर्त्तलें असतां काय परिणाम होतील याची खबरदारी ठेव असा ह्या अभिमानी राजपूताचा हेतु होता.

बादशाहांनीं माळव्याचें संरक्षण करणें बहुधा सर्वांशीं राजपूत लोकांवर सोडिलें होतें, तेथें मराठ्यांची प्रथम स्थापना कशी झाली हें दाखविण्याकरितां वर लिहिलेल्या गोष्टी महत्वाच्या आहेत इतकेंच नाहीं, तर शूर व धर्मभोळ्या राजपूतांच्या धर्मावर हल्ला केल्यानें कसा परिणाम झाला हेंही त्या दाखवितात. त्यामुळें त्यांणीं लुटारू लोकांस आपलें घर दाखविलें आणि त्यादिवसापासून जरी पुष्कळ संकटें त्यांज-वर पडलीं तरी, ही नवीन राज्यक्रांति होण्यास झालेल्या मुख्यकारणाचें स्मरण अझून ते विसरले नाहींत. ज्या बादशाहांनीं आपल्यावर कृपा केली व आपणास अब्रूस वाढविलें त्यांच्या ठिकाणीं तर ते उपकारबु-ध्दि ठेवितात; परंतु आपला धर्म पालटण्याविषयीं ज्यांणीं प्रयत्न केले त्यांचा रागही मनांत बाळगितात. परधर्माच्या इमारती बांधण्याकरि-तां आपलीं देवळें कशा जुलमानें व अन्यायानें पाडिलीं गेलीं, आपल्या धर्मावर कर कसे बसविले गेले, व हे कर सर्व धर्मकर्मांवर, अखेर-च्या प्रेतसंस्कारावरही, बसविले गेल्यामुळें आपल्या लोकांची कशी नुसती गांजणूकच नव्हे तर बेअब्रूही झाली, हें वर्णन त्यांचे भाट व चारण[1] अझून गात असतात. या लोकप्रिय दंतकथांत अशाप्रकारें झालेल्या जुलमांचें वर्णन करून नंतर, प्राचीन देवतांच्या पवित्रस्थानीं या प्रजापीडकांनीं उभारिलेल्या मसजिदी, ज्या आपल्या वीरांनीं पाडिल्या

---

१ चारण व भाट या जाती माळव्यांतील हिंदुवस्तींत बऱ्याच महत्वाच्या आहेत. त्यांचें वर्णन पुढें दिलें जाईल.

व अनादि चालत आलेल्या पूजाअर्चा पुनः सुरू केल्या, त्या वीरांच्या सुकीर्तीचें वर्णन विशेष आवीर्भावानें करितात. माळव्यांतील हिंदु लोकांत ह्या विषयाची इतकी पुष्कळ चर्चा आहे कीं, सांगितलें असतां एकाद्यास खोटें वाटेल. या विषयाच्या संबंधानें राजपूत लोकांच्या मनांत जो राग अझून बळकट उरला आहे त्यावरून पाहतां, मराठे लोकांस बोलावून आणून आपण आपला नाश करून घेण्यास येथील रहिवासी लोक प्रवर्तले ही गोष्ट संभवत्ये. वर सांगितलेल्या धर्मछलाहून दुसरें कांहीं कमी कारण असतें तर, मराठ्यांच्या स्वाऱ्यांस या लोकांनीं उत्तेजन दिलें नसतें व मदत केली नसती.

# प्रकरण ३.

## माळव्यावर मराठ्यांची स्वारी.

माळव्यांत मराठ्यांचा आरंभीं उत्कर्ष कसा झाला या विषयीं लिहिलेलीं अथवा छापिलेलीं जीं वृत्तें आहेत तीं सारीं मोघम मोघम वर्णिलीं आहेत. स्वाऱ्यांच्या सालांखेरीज त्यांमध्यें दुसरें कांहीं दिलेलें नाहीं ह्मटल्यास चालेल. हीं सालें तरी बरोबर सांगितलीं आहेत अथवा सारीं दिलीं आहेत असेंही नाहीं.

पूर्व काळासंबंधीं, व मोगलबादशाहीचा अत्यंत भरभराट होता त्या काळासंबंधीं, मुसलमानी ग्रंथकार जसें बारकाईनें लिहितात, तसें औरंगजेबाची कारकीर्द सुरू झाल्यापासून पुढें लिहीत नाहींत. पुढचा विषय त्यांचें चित्त वेधणारा नव्हता. व मराठ्यांच्या ठिकाणीं द्वेषबुद्धि असल्यामुळें त्यांणीं त्या लोकांच्या यशाचें मोघम व खोटें वर्णन केलें आहे. यामुळें राहिलेला अवकाश हिंदु ग्रंथकारांनीं व्यापावा तो त्यांणींही व्यापिला नाहीं. हे लोक, व विशेषेंकरून मराठे लोक, आपल्या विजयांचा कागदोपत्रीं दाखला ठेवीत नाहींत. इतर गोष्टीं प्रमाणें या गोष्टींतही ते पूर्वापार चालीचे गुलाम बनले आहेत. साधारण लिहिणारांच्या लेखणीची धांव ह्मटली ह्मणजे घरगुती कामांसंबंधीं अथवा नुकत्या घडून आलेल्या सरकारी गोष्टीं संबंधीं लहान लहान चिठ्यापत्रें लिहिणें येथ पर्यंत. हींपत्रें अर्थातच नाहींशीं होतात अथवा तत्काल विसरलीं जातात. विशेष विद्वान् जे ह्मणवितात ते पुराणें व त्यांतील कादंबऱ्या वाचून कृतार्थ होतात. जर त्यांणीं कांहीं लिहिलेंच तर ह्या अद्वा तद्वा उद्गारांचा (कादंबऱ्यांचा) नमूना घेऊन एकाद्या राजाच्या अथवा सरदाराच्या स्तुतिपर लिहिणें लिहितात. दिसण्यांत तर असें दिसतें कीं, आपल्या लोकांनीं संपादिलेल्या कीर्तीवर इतिहास ग्रंथ लिहि-

णें, अथवा आपल्या राजांचीं नांवें लिहून ठेवून, त्या नांवांबरोबरच त्यांच्या कारकीर्दीत जीं जीं मुख्य वर्तमानें झालीं असतील त्या त्या वर्तमानांचें साफ व खरें वृत्त लिहून ठेविणें, हें त्यांच्या स्वप्नींही आलें नाहीं.

मुख्य पुढारी जो शिवाजी त्याच्या काळापासून, पाणिपतची लढाई झाली त्या काळापर्यंत, मराठ्यांच्या इतिहासांत झालेलें वृत्त जरी तिखट मीठ न लावितां अत्यंत साध्या भाषेनें लिहिलें, तरी त्यांत अभिमानबुद्धीस तृप्ति देणारीं स्थळें पुष्कळ आहेत. त्या लढाईंत अफगाण लोकांनीं त्यांचा पराजय केला, त्यानंतरही होळकरांच्या कुळांतील प्रथम पुरुष मल्हारराव, व महादजीशिंदे व नानाफडनवीस यांचीं कृत्यें त्यांच्या देशबांधवांनीं लिहून ठेविण्या सारिखीं आहेत. परंतु त्यांणीं त्यांच्या कृत्यांचें स्मरण राखणें दंतकथांवर सोंपविलें आहे. चमत्कार इतकाच कीं, मराठे लोक बहुतकरून सारे थोडेंबहुत लिहिणें पुसणें शिकलेले असतात इतकेंच नाहीं, तर ते आपल्या ताब्यांतील सांप्रतच्या अथवा पूर्वीच्या मोठ्या प्रांताच्या व्यवस्थे संबंधी हरएक गोष्टींत अत्यंत बारकाई ठेवीत व ठेवितात. पुण्याच्या दप्तरांत ज्या रोजकीर्दी[१] सांपडतात त्या फक्त राज्यांतील वसूलबाकीच्या प्रकरणांत आहेत. त्या गेल्या शतकाबद्दल पुऱ्या आहेत. व त्यांमध्यें जमेचा, खर्चाचा, कामावर असलेल्या कामदारांचा, व हिशेबी कामांतील मिती वगैरेचा बरोबर दाखला सांपडतो.

---

१. रोजकीर्द हा फारसी साधित शब्द आहे. याचा अर्थ रोजचीं कृत्यें- दक्षिणेंतील कमिशनर साहेबांचा असिस्टंट माक्लूड साहेब याणें पुणें दप्तर फार मेहनत घेऊन शोधिलें. तो ह्मणतो कीं, या रोजकीर्दी इसवी सन १७२० तागाईत सांपडतात. प्रथम दहा वर्षांच्या अमळ अपुऱ्या आहेत. तेथें आपणास दोन अशीं पंच्यांगें ही सांपडलीं ह्मणोन तो ह्मणतो कीं, त्यांत दोनशें वर्षांपर्यंत मराठ्यांच्या कारकीर्दीतील मुख्य वर्तमानें लिहिलीं आहेत, परंतु ह्या दाखल्यांचे कागदांमधून फारसें निष्पन्न होईल असें नाहीं.

मध्यहिंदुस्थानावरील प्रथम स्वारींत मराठ्यांचें युद्ध या प्रांतींच्या सरकारांशीं होतें; लोकांच्या वस्तीशीं नव्हतें. या अवस्थेंत मराठे लोक वसूलाचा बराच हिस्सा गोळा करीत; परंतु रानटी लोकांसारिखें ज्यांपासून वसूल मिळे त्यांचा नाश करीत नसत असें दिसतें. जर तसें करिते तर या प्रांतीं वसूल कमी पडलेला पुनः पुनः पहिल्या अंकावर येई असें वसूली कागदांवरून दिसतें तसें कधीं घडून आलें नसतें. या वेळच्या सर्व हकीकतीवरून असा बळकट पुरावा दिसून येतो कीं, बादषाहीमधील हिंदु राजांच्या संमतीनें व मदतीनें मराठे

---

१ माळव्यावरील मराठ्यांच्या प्रथम स्वारी संबंधीं वर्तमानाच्या शोधांत असतां असें समजलें कीं, इतर सर्व लोकांजवळचे कागद नाहींसे झाले खरे, परंतु मांडव एथील पूर्वींच्या जमीदाराच्या वंशजाजवळ त्याच्या परगण्याचे कांहीं कागद राहिले आहेत. त्यांपैकीं एक फार जुना कागद सन १६९० सालाचा धर्मपुरीचा वसूलखर्डा दिसून आला. हा परगणा नर्मदेच्या उत्तरेस, व मांडवयास लागूनच दक्षिणेस आहे. येथें पूर्वीं वसूल ८१,०७२ रुपये होता तो मराठ्यांच्या स्वारीमुळें ३२५८९॥– इतका उतरला असें या कागदावरून दिसतें. सन १६९१ त इकडे मराठे आले नाहींत व यामुळें पुनः त्या सालीं वसूल ७२१३९॥– वाढला. त्याच्या पुढच्या सालीं आणखी वाढून वसूलाची बेरीज ८९६८४ रुपये झाली; परंतु १६९४ मध्यें पुनः दक्षणेंतील लुटारू लोक आल्यामुळें वसूल तीस हजार दोन रुपयांवर येऊन पोंचला. "दक्षिणेंतील लुटारू" हा शब्द या कागदांत मराठ्यांस लाविला आहे. याच्या पुढच्या सालीं मराठ्यांनीं या प्रांतास धका लाविला नाहीं ह्मणून पूर्ववत् वसूल झाला. या कागदासारिख्या दाखल्यांत मराठ्यांच्या प्रथम लुटारू स्वाऱ्यां विषयीं फार खऱ्या हकीकती सांपडतात. कारण यांत फक्त स्वारीचा शकच सांपडतो असें नाहीं तर, त्या स्वाऱ्यांची तऱ्हा कशी होती हेंही त्यांवरून दिसून येतें.

लोक स्वाऱ्या करीत असत. औरंगजेब बादशाहाशीं हे राजे लोक कोणत्या वास्तविक कारणासाठीं नाराज होते हें वर सांगितलेंच आहे. या मदतीच्या संबंधानें, सवाईजयसिंग दुंडरचा ह्मणजे जयपूरचा[1] राजा, याच्या विषयीं तर त्या वेळच्या कित्येक लेखांत उल्लेख आहे[2].

---

१ हा विस्तीर्ण प्रदेश हारावती व मेवाड प्रांताच्या उत्तरेस आहे व यास दुंडर असें ह्मणतात. यांत अंबर नांवाची पूर्वीची राजधानी होती व त्यापासून सर्व प्रदेशाही अंबर नाम पावला होता. आतां या प्रदेशास जयपूर नांव चालू आहे. व हेंही सवाई जयसिंगानें वसविलेल्या सुंदर शहरापासून प्राप्त झालें आहे. जयपूर येथें सवाई जयसिंगाच्या वंशजांची गादी आहे.

२ मांडवाच्या जमीदारांपाशीं, वसूलबाकीच्या कागदांत, त्या जमीदाराच्या कोणी एका पूर्वजानें लिहिलेली बखर सांपडली. त्यांत लिहिलें आहे कीं, सन हिजरी ११०८ ह्मणजे सन इसवी १६९६ या सालीं मराठे लोक नालशाचा घाट वर चढून आले व मांडव घेऊन पुढें धारेस मुसलमानांच्या लष्कराशीं लढले. तीन महिने वेढा देऊन अखेर सुरंग खणून धारचा किल्ला त्यांणीं हस्तगत केला. त्यावेळेस माळव्याचें काम शहादुल्ला व अबदुल्लाखान या दोघांकडे होतें, यांस "शाहजादे" ह्मटलें आहे. फारसीभाषेंत लिहिलेल्या एका बखरींत माळव्याच्या एकंदर सुभेदारांची याद शकाच्या अनुरोधानें दिली आहे. त्यांत असें आढळतें कीं, सुभेदार नवाब अमीरखानानंतर त्याचे मुलगे दुल्लाखान व सादुल्लाखान माळव्याचे कामीं झाले होते. मराठ्यांशीं लढण्यास यांस बादशाहाकडून कुमक मिळाली नाहीं व कित्येक महिने लढून अखेरीस हे भोपाळ येथें पळून गेले हिंदूंच्या लेखांवरून पाहिलें असतां असें दिसतें कीं, धारचा किल्ला शरण आला आणि नंतर किल्ल्याच्या संरक्षणास जे लोक होते त्यांस मराठ्यांनीं आपआपल्या मालमत्तेसुद्धां इच्छेस वाटेल तेथें

ज्या लेखांच्या आधारानें हें वृत्तलिहिणें चाललें आहे त्यांवरून असें दिसतें कीं, माळव्याच्या या भागीं मराठ्यांच्या स्वाऱ्या सात वर्षें सुरू होत्या. जेव्हां सवाई जयसिंग लढण्यास पुढें आला तेव्हां मात्र स्वाऱ्या करणें त्यांणीं सोडून दिलें. जोदपूरचा राजा यशवंत सिंग याच्याशीं औरंगजेबाचें अत्यंत हाडवैर असे. त्याच्यावर काबू राहण्याकरितां ज्या राजपूत कुळांस औरंगजेबानें हातीं धरिलें होतें त्या कुळांतील सवाई जयसिंग हा प्रसिद्ध हिंदू वीर व मुत्सद्दी होता. परंतु या बादशाहाची कृपा होणें ह्मणजे दुर्दिन यावयाचें चिन्ह असे. शिवाजीच्या उत्कर्षास सवाई जयसिंगाचा [1] आजा आड आला होता, व त्यास या कामीं यशही प्राप्त झालें होतें. परंतु अशा रीतीनें औरंगजेबाचे राज्यलोभसंबंधीं हेतु सिद्धीस जाण्यास कारणीभूत झाला असतां, पुढें त्याचा उत्कर्ष त्या बादशाहास न साहून व त्याजपासून धास्ती बाळगून त्यानें त्याचा नाश केला.

---

जाऊं दिलें. इरादतखान आपल्या तवारिखेंत सादुल्लाखान सन १७०७ त माळव्याचा सुभेदार होता व त्या सालीं आपण मांडवगडचा किल्लेदार होतों असें ह्मणतो. यावरून दिसतें कीं, या काळच्या मराठ्यांच्या स्वाऱ्या केवळ लूट घेऊन जाण्या पुरत्या होत्या. (मुलुख काबीज करून ताब्यांत ठेविण्यांचा त्यांचा हेतु नव्हता) स्कॉट साहेबानें लिहिलेल्या दक्षिणेच्या इतिहासांत या स्वाऱ्यांचा मुळींच उल्लेख नाहीं; आणखी त्यांत उलट असें लिहिलेलें सांपडतें कीं, इसवी सन १७०२ या सालीं भाऊराव कृष्ण, सागर प्रांतींच्या धामोणी परगण्यांत चालून गेला तोच नर्मदा उल्लंघून वर येण्याचा मराठ्यांचा प्रथम प्रसंग होय. परंतु मागच्या टिपेंत धर्मपुरीचा परगणा लुटल्याविषयीं जो दाखला सांपडतो ह्मणून मी लिहिलें आहे त्यांत बिलकुल संशय नाहीं.

१ या जयसिंगास इतर जयसिंग नांवाच्या पुरुषां पासून ओळखितां यावें ह्मणून मिरजाराजा असेंही म्हटलें आहे. बादशाहानें याजवर विषप्रयोग केला असें ह्मणतात.

सवाई जयसिंगाच्या आजाचें मराठ्यांशीं आंतून सूत होतें, व गुप्त पत्रव्यवहारही होता असा मुसलमानी ग्रंथकारांचा आरोप आहे. त्या प्रमाणेंच सवाई जयसिंगही, जरी बादशाहाचा ताबेदार व बंदा ह्मणवी तरी आंतून मराठ्यांशीं व्यवहार ठेवी असें ह्मणण्यास पुष्कळ कारणें आहेत. विश्वासासपात्र अशा एका हिंदू लेखांत[१] लिहिलें आहे कीं, धार येथील शाहाजाद्यांनीं जयसिंगाच्या राजभक्तीविषयीं बादशाहाच्या मनांत संशय उत्पन्न केला. त्यांचें सांगणें खोटें आहे असें दाखविण्यास, चढाव करून आलेल्या मरांठ्यांस आपण माळव्यांतून हाकून लावितों ह्मणून जयसिंगानें आपण होऊन कबूल केलें. बादशाहानें त्याचा अर्ज कबूल केला आणि नंतर तो मराठ्यांवर चालून गेला. आपल्या अशा वर्तणुकीचें कारण त्याणें आंतून मराठ्यांच्या सरदारांस कळविलें; आणि तुह्मी उगेच लढाईचें मिष करा आणि नंतर विशेष अनुकूल प्रसंग येईल तेव्हां मी तुमच्या पुनरागमनाचा मार्ग सुलभ करीन असेंही सांगून पाठविलें ह्मणून ह्मणतात. मरांठ्यांनीं त्याच्या इच्छेप्रमाणेंच केलें. व लढावयास उगीच उभें राहवयाचें ह्मणून राहून ते दक्षिणेकडे निघून गेले. जयसिंगही सहा महिने माळव्यांत राहून पुढें हिंदुस्थानाकडे चालता झाला.

हीं वर्तमानें सन १६९८ त झालीं ह्मणून लिहिलें आहे[२]. पुढें कांहीं थोड्या वर्षांनीं हे स्वारी करणारे पुनः या मुलकीं परत आले, व उदाजी पंवारानें मांडव येथें ठाणें देऊन आपला झेंडा रोंविला; परंतु त्याला

---

१ मांडवच्या जमीदारानें दिलेल्या बखरींत असें लिहिलें आहे.

२ ही गोष्ट मेजर स्काट साहेबानें लिहिली नाहीं, परंतु त्याचा ग्रंथ मुसलमानी ग्रंथकारांच्या आधारावर आहे. व मुसलमानी ग्रंथकारांच्या तऱ्हेचें वर्णन पूर्वीं केलेंच आहे. मेजर स्काट याच्यां ग्रंथांत पुढें आढळतें कीं, "मराठ्यांची नर्मदेपासून दक्षिणेकडे मुंग्यां सारखी रांग लागली आहे."

सन १७०२. लौकरच परत जाणें भाग आलें. मग पुढें बाळाजी विश्वनाथ पेशवा होई तों पर्यंत, मराठ्यांनीं या प्रांतास त्रास दिला नाहीं.

बाळाजीच्या कारकीर्दींत मराठ्यांचा पुनरुत्कर्ष झाला व त्याच्यानंतर जेव्हां त्याचा मुलगा बाजीराव बल्लाळ पेशवा झाला तेव्हां, त्याणे प्रथमतःच रामचंद्र गणेश[1] यास मोठें लष्कर देऊन हा प्रांत लुटून फस्त करण्यास, व नर्मदेच्या उत्तरेकडील राजेरजवाडे, व बादशाही कारखानदार यांजपासून खंड घेण्यास रवाना केलें.

वरील हकीकतीवरून दिसून येईल कीं, जरी औरंगजेबाच्या मरणापूर्वीं माळव्यांत मराठ्यांनीं कांहीं स्वाऱ्या केल्या होत्या, तथापि महंमदशाहाच्या कारकीर्दीपर्यंत या प्रांतीं त्यांच्या अधिकाराची स्थापना झाली नव्हती. व उलट असेंही दिसून येईल कीं, जरी सन १७३२ पर्यंत त्यांणीं येथें कायम बंदोबस्त केले नव्हते व आपल्या निरनिराळ्या सरदारांस निरनिराळे प्रांत तोडून दिले नव्हते[2] तरी ते वारंवार या प्रांतीं येऊन लुटून जात. पुण्यांतील दप्तरावरून असें

---

१ या स्वारीचा सेनापति रामचंद्र गणेश हा फार इभ्रती पुरुष होता, पुढें राणोजी शिंद्या बरोबरही हा आला होता. याच नावाचा आणखी एक मराठ्यांचा सरदार, कोकणस्थ ब्राह्मण जातींतील, विंचूरकरांच्या हुद्यावर असे; व हा सन १७७३ त महादजी सिंदा व तुकोजी होळकर यांज बरोबर हिंदुस्थानांत खास पेशव्याच्या लष्कराचा सेनापति होऊन आला होता. वर सांगितलेला रामचंद्र गणेश व हा रामचंद्र गणेश एक नाहींत.

२ या काळीं मराठ्यांनीं या प्रांतास फार त्रास दिला नाहीं याचें कारण बहुधा राजा जयसिंगाचें सामर्थ्य व वजनदारी हें असावें. चंबल नदीवर साग्रोद व विजावर या हरदो गांवांमधील शेंवतकारीच्या फैसल्या प्रकरणीं एका कागदावरून असें दिसून येतें कीं, सन १७१०।११ या सालीं जयसिंग माळव्याचा नाझीम ह्मणजे सुभेदार होता. या पुढेंही कांहीं वर्षे हें काम याजकडे असावें.

दिसून येतें कीं, सन १७२५ सालाच्या अखेरीस या प्रांतीं वसूल गोळा करण्यास मराठ्यांचे कामगार नेमिले गेले होते, व माळव्यांतील कांहीं परगणेंही सरकार मर्जीतील लोकांस ज्याहागीर दिले गेले होते. या पूर्वी तीन वर्षें गुजराथ कावीज करण्यास उदाजी पंवारास एक सैन्य देऊन पाठविलें होतें. या सरदाराचा शाहूराजाशीं व पेशव्याशीं जो पत्रव्यवहार झाला आहे, त्यावरून दिसून येतें कीं, मराठ्यांचे चौथ व सर देशमुखी हे नेहेमीचे कर माळव्यावर वसविण्यास, त्यांणीं उदाजीस हुकूम केला होता[१]; व प्रत्येक परगण्यांतील अधिकाऱ्यास परवानेही लिहिले होते कीं, चौथ व सरदेशमुखी हा वसूल गोळा करण्यास आह्मी उदाजीस अधिकार दिला आहे. पुढें माळवा बिलकूल काबिज करण्याच्या हेतूनें बाजीराव बल्लाळ या मुलकीं आला, त्या पूर्वी दोन वर्षें उदाजीनें याप्रांतीं बहुतेक ठिकाणीं चौथ व सरदेशमुखी वसविली होती

माळव्यावर स्वारी करणारे मराठे कोणत्या नियमसूत्रांच्या आधारानें चालत, व या प्रांतीं त्यांनीं स्थापन केलेल्या अधिकाराचें कसें रूप होतें, हें दाखविण्यासाठीं वरपासून सांगत आलेली गोष्ट येथें तूर्त इतकीच ठेविली पाहिजे. शिवाजी व त्याच्या पुढील अधिकारी यांचे

---

१. चौथ ह्मणजे वसुलाचा चौथा हिस्सा असें त्या शब्दावरून दिसून येतें. सरदेशमुखीचा हक्क वसूलावर शेंकडा १० रुपये असे; व तो परगण्याच्या देशमुखाचा ह्मणजे मुख्य अधिकाऱ्याचा असे. हा हक्क प्रत्येक परगण्यांत निरनिराळ्या कुटुंबाकडे असतां, ज्या ज्या मुलकीं मराठ्यांची स्वारी गेली त्या त्या मुलकीं मराठ्यांनीं आपला ह्मणून कोणत्या कारणासाठीं वसविला, हें बरोबर दिसून येत नाहीं. प्रथमतः कोणीतरी त्यांच्या कोणा एका सरदारास हा हक्क दिला असेल; व पुढें इतर सरदार, वहिवाटीचें सोंग करून तो गोळा करूं लागले असतील-वहिवाट दाखविण्यास त्यांस हेंच कारण पुरें वाटलें असावें असें मराठ्यांच्या संवई वरून दिसून येतें.

इतरांशीं जे झगडे झाले त्यांत, अवंदर देशांतील लोकांपेक्षां संग्राम करण्याची त्यांची रीति निराळी असे; व तसेंच लष्करास पगार देणें, सेनाध्यक्षांस इनामें वांटणें, स्वाऱ्या केलेल्याप्रांतीं लूट करणें, ते प्रांत विभागणें, व तेथें आपला अधिकार स्थापन करणें ह्या सर्व रीति इतरांपासून भिन्न असत. शिवाजीच्या बुद्धिवैभवानें मराठे लोक, मुसलमानी राज्याचे प्रथम तर शास्ते व तदनंतर नाशकर्त्ते, अशा उंच कोटीस चढले होते. यामुळें आरंभीं आरंभीं त्यांच्या काजास धर्मबुध्धीचें साहित्य असे. त्यांचें युध्ध एका तऱ्हेचें धर्म युध्धच होतें, व त्यांच्या लष्करांत ब्राह्मण सेनापति असत यामुळें, वर लिहिलेल्या लोक समजुतीस बळकटी आली होती. मराठ्यांचें एवढावेळ फार मोहगम वर्णन केलें आहे. या लोकांमध्यें, व विशेषें करून यांच्यांतील ज्या जातीनीं राजसत्तेचा अनुभव घेतला आहे, ह्मणजे ब्राह्मण व क्षत्रिय जाती, व शूद्र जातींतील शिपाईपेशा करणारे लोक, यांच्यामध्यें, जसे विपरीत गणांचे पुरुष दिसून येतात तसे आणखी कोणांमध्यें दिसून येत नाहींत. मराठी ब्राह्मणांचें खाणेंपिणें, त्यांच्या संवई व त्यांस जी शिक्षा प्राप्त होते ती, हीं सारीं अशा तऱ्हेचीं आहेत कीं, त्यांपासून ते मार्मिक, चंचल व बुद्धिमान्, परंतु बहुधा द्रव्यलोभी होतात. कधीं-कधीं त्यांचा स्वभाव घातकही दृष्टीस पडतो. त्यांच्या अधिकाराची मांडणीच असी आहे कीं, जे ब्राह्मण सरकारी कामकाजांत शिरतात त्यांचें आयुष्य, लोकांस कसें फसवावें व लोक आपणास फसवीत असल्यास त्यांस कसें पकडावें, या कामांत जातेंच जातें. अशा व्यवसायानें लबाडी शहाणपणांत मोडत्ये, व मनाचा कल हलकट व आपलपोट्या होतो. अधिकाऱ्यांचे ठायीं लोकांची भक्ति व पूज्यबुद्धि असणें हेंच मोठ्या व अमर्याद अधिकाराचे मजबूत पाये आहेत. परंतु मनाच्या अशा कलामुळें त्या भक्तीत व बुद्धींत फरक येतो.

अगदीं हलक्या कारकुनीच्या हुद्यापासून चढतचढत ब्राह्मण लोक, राज्याचे कारभारी व कधींकधीं मुख्य अधिकारीही झाले आहेत,

अशीं उदाहरणें मराठ्यांच्या इतिहासांत पुष्कळ आढळतात. परंतु अशा उत्कर्षापासून त्यांच्या स्वभावांत फेर पडत नाहीं, व बहुधा त्यांच्यांतील हलकट तऱ्हा जशाच्या तशाच राहतात.

जरी हमेश, मराठे ब्राह्मण सेनापति झालेले आहेत तरी, त्यांणीं जातखत शौर्याविषयीं कीर्ति संपादन केली नाहीं. (कांहीं यास बाध आणणारीं उदाहरणेंही प्रसिद्ध आहेत.[1]) त्यांचा स्वभाव उध्धट अथवा दुष्ट नसतो खरा, परंतु निर्द्रवी व जुलमीं असतो; अशा आरोपास वारंवार ते पात्र झाले आहेत.

साधे, अक्षर शून्य मराठे, शूद्र अथवा क्षत्रिय, शिपाईधंद्यांत शिरतात. पूर्वीं शेतें नांगरितांना अथवा गुरें चारितांना जो त्यांचा पोषाक असतो व ज्या संवयी त्यांस जडलेल्या असतात, तोच पोषाक व त्याच संवयी, हा नवा पेशा धारण केला तरी कायम असतात. निरनिराळ्या राज्यक्रांतींमुळें या जातींतील लोक प्रसंगानुसार अत्यंत मान्यतेस व अधिकारास पोंचले, व प्रसंगानुसार पुनः आपला पूर्वधंदा त्यांस करावा लागला; तरी उभय अवस्थेंत त्यांच्या स्वभावांतील साधेपणा कायम राहिला. हिंदूंच्या कारखान्यांच्या तऱ्हा, तसेंच शिवाजीचा व त्यांच्या सरदारांचा नमूना, तसेंच संवयीचा जोर हीं कारणें, असा साधेपणा कायम राखण्यास कारणीभूत झालीं असावीं. या सर्व कारणांमुळें गर्विष्ट व बाह्यस्तोमी मुसलमानांपेक्षां मराठे उघडच बरे दिसून येत; व ज्या देशीं ते स्वारी करीत त्या देशांतील लोकांशीं त्यांचा व्यवहार राही. डामडौल, ऐषआराम, व अहंपणा यांपासून महायशस्वी पुरुषांनाही देश जिंकण्यांत अडथळे येतात. कदाचित् अडथळे न आले तरी त्यांस त्यांचें ओझें होत असतें; तसें कधींही मराठ्यांस होत नसे. मराठे वीर, शौर्यापेक्षां युक्ति विशेष दाखवीत

---

१ सन १७९२त टिपूसुलतानावर लॉर्ड कॉर्नवालिस साहेब चाल करून गेले तेव्हां त्यांच्या साह्यास परशरामभाऊ होता. या पुरुषाचें जातखत धैर्य विचित्र असे.

व धाडस करून शत्रूवर चालून जाण्यांत जो पुरुषार्थ, तोच त्वरित पलायन करण्यांतही पुरुषार्थ मानीत, हें त्यांच्या जातींतील स्तुतिपाठकांसही कबूल करावें लागेल. परंतु हें कबूल केलें, व मराठे वीर पुष्कळ प्रसंगीं हलकेपणा व अभिलाषबुद्धि दाखवीत हेंही घेतलें, तथापि त्यांच्या तर्फेनें बोलणारे दावा सांगतात, व तो दावा यथार्थ आहे कीं, त्यांजमध्यें पुष्कळ उत्तम गुण होते. श्रम झाले असतां, व ताहानभूक लागली असतां दम न सोडण्यांत, व साधा शिपाईबाणा बाळगिण्यांत थोडेच लोक मराठ्यांची बरोबरी करूं सकते. अनुकूल व प्रतिकूल उभय काळांत हा साधा शिपाईबाणा फरक न पावतां एकसारखा राहिला. आणखीं मराठ्यांविषयीं असेंही कबूल केलें पाहिजे कीं, उत्कर्षाच्या आरंभीं, व पुढें फार विस्तीर्ण प्रदेश ताब्यांत आल्यामुळें फौज फार वाढून व तींत सर्व ठिकाणच्या लोकांची भेसळ होऊन तिचें महाराष्ट्री रूप राहिलें नाहीं; त्या काळापूर्वीं, ते आपल्या कोस्याकीस्वाऱ्या[1] अशा तऱ्हेनें करीत कीं, त्यांपासून रयतेस फारसें नुकसान होत नसे. अशा भयंकर व नाशकारक युद्धाच्या तऱ्हेत रयतेचें नुकसान न होऊं देणें मुष्किल खरेंच. ज्या गॉथ लोकांनीं व व्हँडल लोकांनीं युरोप खंड पूर्वकाळीं लुटून फस्त केलें होतें त्यांपासून, तसेंच ज्या तार्तर लोकांनीं एशियांतील राज्यें वारंवार जिंकून लयास नेलीं आहेत त्यांपासूनही, मराठ्यांची उत्पत्ति व त्यांच्या संवयी भिन्न प्रकारच्या होत्या. गांजणुकीमुळें मराठे प्रथमतः लढण्यास सिद्ध झाले, आणि आपणास गांजणारे निर्बली आहेत असें अनुभवास आल्यामुळें, उचलिलेला शिपाई पेशा पुढें त्यांणीं सुरू ठेविला. त्यांच्या सामर्थ्याच्या पूर्वस्थितीची बांधणी व स्वरूप हीं अशीं असत कीं, लुटलेल्या प्रांतीं त्यांची लागलीच वस्ती होणें अशक्य होतें. तथापि नाशाचें सामर्थ्य अंगीं आलें, तेंव्हां अर्थात् वसुलाचा कांहीं तरीं अंश माग-

१. मराठ्यांच्या बखरींत या स्वाऱ्यांस कोस्याकी स्वाऱ्याच ह्मटलें आहे. [illegible] शब्द आणखी पुष्कळ शब्दां प्रमाणेंच मोगल लोकांपा- [illegible] असावा. याचा मराठी भाषेंत लुटारू असा अर्थ आहे.

ण्यास हक्क उत्पन्न झाला. सर्व हिंदुस्थानभर वसविलेले मराठ्यांचे सरदेशमुखी वगैरे हक्क अशा तऱ्हेनें उत्पन्न झाले. ज्या प्रांतीं हे हक्क कबूल होत त्या प्रांतांस लुटीपासून मोकळीक मिळे. ज्या सामर्थ्यवान् सरदारांनीं हे जबर कर प्रथमतः मोगलराज्यांतील वसुलावर बसविले, त्यांणीं आलीवेळ ढकलून नेण्या पुरती ही तजवीज आहे असें मानिलें होतें. याहून विशेष अर्थ त्यांचा असावा असें ह्मणवत नाहीं. या युक्तीनें, मोठमोठीं लष्करें राखून व आपले कामगार सर्व ठिकाणीं पसरून व आपली वजनदारी वाढवून पुढें आणखी स्वाऱ्या करण्यास त्यांस उपयोग झाला. त्या काळच्या मानानें पाहतां, व मराठ्यांच्या स्वभावाकडे व विचित्र स्थितीकडे पाहतां, या युक्तीची जडण उत्तम होती असें दिसतें. एक्या स्थळास स्वस्थता प्राप्त होई व त्यामुळें दुसऱ्या स्थळीं चालून जाण्यास त्यांस फुरसत सांपडे. शिवाय या योगानें दुसऱ्या संस्थानांत व कुटुंबात फिसाद माजविण्याची संधि सांपडे, व या संधाचा पुरा उपयोग कसा करावा हें ते चांगलें जाणत. तैमूरच्या कुलापासून तों अत्यंत हलक्या राजपूत सरदारापर्यंत, जितके ह्मणून यांच्या गराड्यांत आले तितक्या साऱ्यांच्या घरांत, दर एका पक्षाकडे, कोण्या तरी मराठ्या सरदाराची अथवा कामगाराची, आंतून अथवा बाहेरून, कशी तरी मदत असावयाचीच. या लोकांचा स्वभाव व त्यांचीं कृत्यें हीं सर्व गोष्टींत विचित्र होतीं. वास्तविक पाहतां, इतर देशांतील लोकांशीं जुडतीं लक्षणें यांच्या मध्यें क्वचितच असत. इतर ठिकाणीं देश जिंकित्या पुरुषांनीं जीं साधनें अहंतेनें टाकून दिलीं असतात, त्या साधनांचा प्रयोग या विचित्र लोकांनीं साऱ्यांच्या आधीं करावा. जीवाची तमा न धरणाऱ्या, व सरकारास विटलेल्या लोकांस आपल्या लष्करांत शिरण्यास हे मोकळीक देत इतकेंच नाहीं तर, चोरट्या व लुटारू लोकांचिही मदत घेत; व कांहीं काळ पर्यंत केवळ त्यांच्याच हिता करितां त्यांस हवें तसें वर्तूं देत. सामर्थ्य असूनही, जबरदस्तीपेक्षां, युक्तीच्या द्वारें प्रवेश करून एखाद्या प्रांताच्या व्यवस्थेंत हात घालणें,

व तेथील लोकांत आपल्या बाजूचा पक्ष उभा करणें, हें विशेष मानीत. हे हेतु सिद्धीस नेण्यांत सहनशक्ति व लीनता या गुणांची त्यांस फार मदत पोंचे. निरनिराळ्या प्रांतीं क्षत्रियवंशांतील हिंदुराजे स्थापना पावले होते, त्यांच्या बरोबर प्रांतींच्या अधिकारांत व वसुलांत कांहीं हिस्सा प्राप्त झाला असतां, मराठे प्रथमतः तृप्ति पावत; व तो प्रांत हळुहळू सारा आपल्या कबजांत आणणें हें काळगतीवर व युक्तिप्रयुक्तीवर टाकीत. मध्यहिंदुस्थानांत दिवसेंदिवस मराठ्यांची विशेष स्थापना होत चालली यामध्यें, वर सांगितलेल्या मसलतीचा जसा उत्तम परिणाम दिसून येतो तसा आणखीं कोठें सांपडणार नाहीं. या मुलकांतील हिंदुलोकांचीं मनें, जशाजशा चालचलणुकीनें व भावभक्तीनें उत्तम प्रकारें वश होतील असें दिसलें, तशीतशी चालचलणूक व भावभक्ति त्यांणीं प्रथम धारण केली. राजपूत राजेरजवाडे व सरदार जातीनें अभिमानी असत, व मोंगलदरबारांत वागल्यामुळें मानमुलाजांची त्यांना आवड प्राप्त झाली असे, ह्मणून या दोहीं प्रकरणांत त्यांना हरएक प्रसंगीं मोठेपणा देऊन मराठ्यांनीं वश केलें. शूद्रादि हलक्या जातीच्या लोकांस तर, व विशेषें करून जमीदारांस व शेतीपोती करणारांस, मराठ्यांनीं कितीही पुंडावे केले तरी असें भासे कीं, मराठे आपल्याच वर्गांतील आहेत; व जरी अधिकारास व राज्यप्राप्तीस ते चढले आहेत, तरी ज्या खेड्यांत आपला जन्म, त्या खेड्यापाड्यांतील मंडळीच्या रीतिभातींच्या ठिकाणीं त्यांची पूर्ववतच अत्यंत भक्ति आहे. या विजयी लोकांच्या मुख्य सरदारांत कोणाचें नांव पाटील तर कोणाचें पटवारी असे. कारण स्वदेशीं लहानसहान खेड्यांचे ते वंशपरंपरा पाटील पटवारीच असत. मोटमोठ्या दीडदीड हात लांबीच्या पदव्यापेक्षां, या पाटीलपटवारी नांवांवर त्यांची विशेष भक्ति, हें पाहूनही या देशींच्या शूद्रादि जातीस समाधान वाटल्या शिवाय राहिलें नसेल.

तथापि मराठ्यांच्या लष्कराची व दरबाराची मांडणी, स्वराज्याची

स्थापना करण्यापेक्षां परराज्याचा लय करण्यास विशेष योग्य होती. त्यांचा पहिला सरदार जो शिवाजी, तो यशस्वी व लोक पुढारी पुरुष होता खरा; परंतु याहून विशेष कांहीं नांव त्यास देववत नाहीं. त्याच्या कारकीर्दीच्या शेवटीं, समर्थ प्रतियोगीही त्यास प्राप्त झाले होते. आतां यांत संशय नाहीं कीं, बाह्य स्थितीच्या व मनोवृद्धीच्या साम्यतेनें, त्याच्या जातींतील पुष्कळ लोकांची त्याजवर भक्ति बसली होती; आणि यामुळें, मराठ्यांत ऐक्यभाव होण्यास व त्यांस स्वतंत्र लाकांचें रूप येण्यास, शिवाजीच्या मरणापूर्वीं पुष्कळ कार्य झालें होतें. तसेंच त्यांच्या शत्रूंच्या दुष्ट व हाडवैरी स्वभावामुळें हा ऐक्यभाव बळकटीही पावला होता. शिवाय शिवाजीचा मुलगा जो संभाजी त्याचा मुसलमानांनीं अपमान केला होता व त्यास दुःख दिलें होतें यामुळें, व या सारिख्याच त्यांच्या दुसऱ्या पुष्कळ कृत्यांमुळें सर्वच मराठ्यांचा एकसारखा संताप झाला होता, व सूड उगविण्याची बुद्धि उपजली होती; व ही बुद्धि, ज्या विशेष बळकट धाग्यांनीं ऐक्य बांधिलें जातें त्या धाग्यांचें त्या काळीं, कार्य करिती झाली. तथापि सारासार पाहतां मराठ्यांच्या इमारतीस पाया चांगला नव्हता. प्रथमपासून त्यांच्या साऱ्या सरदारांची योग्यता एकसारिखीच असे; व जीं लष्करें ते घेऊन जात तीं यशस्वी होणें हें मुख्यत्वें पगार वेळच्या वेळीं बरोबर मिळणें यावर असे; ह्मणून ज्या प्रांतांत त्यांस पाठवावयाचें त्या प्रांतीं खंड बसविणें व वसूल गोळा करणें हे अधिकार अर्थांतच सर्वांस देणें भाग येत असे. या खंडापैकीं व वसूलापैकीं कांहीं अंश मुख्य सरकारांत येई;[१]

---

१. धारकर पंवार यांचे येथील सर्व जुने कागद मला वाचावयास सांपडले आहेत. सन १७२४ त बाजीराव पेशव्यानें माळवा व गुजराथ येथें चौथ वसूल करण्याविषयीं उदाजी पंवारास सनद दिली त्यावरून असें दिसतें कीं, जितका चौथ वसूल गोळा होई तितक्याचा निम्मा हिस्सा लष्कर खर्चाकरितां उदाजीस दिला होता. व निम्मा हिस्सा

परंतु बहुतेक हिस्सा सरदारांच्या फौजेस व खर्चास लागला जाई. यामुळें जो सरदार एकादा मुलूक जिंकून विजय पावत असे, तो सरदार त्या मुलकाचा मुख्य अधिकारीच बने; अशामुळें परिणाम सर्वत्र ठिकाणीं सारखेच घडून आले. व्यक्तिमात्रांस आपण राज्य कमवावें असा लोभ उत्पन्न होऊन, त्यापुढें मुख्य सरकारच्या लाभा विषयीं दृष्टि एक्या बाजूस राहिली. राज्यापहाराचा मूळ कित्ता पेशव्यांनीं घालून दिला तोच पुढें ज्यास जसी संधि सांपडली तसा त्यानें वळविला. हिंदूंच्या पूर्वापार चालत आलेल्या कारखान्यांत, बहुधा खेडे गांवांतील बंदोबस्ता-च्या नमूना फार जुना आहे असें दिसतें. याच नमून्यांवर एकंदर राज्यव्यवस्था मराठ्यांनीं सुरू केली, यामुळें ही व्यक्तिमात्रांच्या राज्या-पहारवृद्धीस मदत झाली. हरएक काम मुख्य प्रधान पेशव्यांपासून तों कनिष्ठ चाकरांपर्यंत, वंशपरंपरेनें सोंपीत, अशा प्रघातानें कामांवर लोकांचे हक्क उत्पन्न झाले; लायक माणसांस चढावयास सोय कमी झाली; मुख्य राज्याधिकारी निर्बल पडले व त्याच्यांतही लौकर तंटे उद्भवले. असें असतांही या विलक्षण राज्यव्यवस्थेंत, निरनिराळ्या सर-दारांच्या निरनिराळ्या व परस्पर विरुद्ध स्वार्थांपासून, सर्वत्र कार्य कर-

---

सरकार तिजोरींत जमा होई. या मोहोगम सनदेचें खालीं भाषांतर दिलें आहे.

अखंडित लक्ष्मी अलंकृत महाराजे श्री उदाजी पवार यांस प्रति बाजीराव बल्लाळ प्रधान ११२२ फसली* पावेतों सुखरूप असो विशेष. गुजरा-थ व माळवा या प्रांतांचा निम्मा मोकासा, (चौथ हक्काचा तीन चतुर्थांश), हुजूरचा आहे, त्यापैकीं निम्मा हिस्सा तुह्मांस सरंजामी करून दिला आहे. तुह्मी आमचे सेनापति आहां व तुह्मावर आमचा भरव-सा आहे. हें जें दिलें आहे याचा अनुभव घेणें. बहुत काय लिहिणें तारीख ५ रबिलावल.

(पुढें पहा.)

* या शकांत व मुसलमानांनीं दिलेल्या शकांत सात वर्षांचें अंतर आहे.

ण्याविषयीं उत्साह उत्पन्न झाला; व त्यामुळें मराठ्यांचें राज्य विलयास न जातां कांहीं काळपर्यंत अधिकच भरभरलें. या राज्यरीतींत मुख्य ब्राह्मण होते. एका मुसलमानी ग्रंथकारानें उग्र शब्दांनीं लिहिलें आहे तें खोटें नाहीं कीं, " ब्राह्मणांनीं आपलीं यज्ञोपवीतें धनुष्यांच्या प्रत्यंचांच्या ठिकाणीं योजिलीं " परंतु मुख्य अधिकाराविषयींच्या आपल्या हक्कास जरी कित्येक पेशव्यांनीं लष्करी कामांत कीर्ति मिळवून बळकटी आणिली होती, व जरी बाळपणापासून प्राप्त झालेल्या शिक्षेनें, व एकंदर सर्वांनीं त्यांची बुद्धिमता सर्वांत विशेष असे, तरी ते आपल्या प्रतापी सरदारांच्या राज्यलोभास आवरूं सकले नाहींत. ब्राह्मण राज्यकर्त्यांनीं आपणास अधिकारास चढविलें हे उपकार, विजयाच्या धुंदींत ते सरदार लौकरच विसरले. त्यांचें स्वातंत्र्य वाढविण्यास पेशव्यांच्या राज्यमसलतीचाच एक भाग फार कारणीभूत झाला. स्वदेशीं शांतता मोडून दंगे उभे करितील, व सारा वसूल खाऊन टाकितील अशा भीतीनें ते या सरदारांस हमेषा परदेशीं स्वाऱ्यांवर पाठवीत असत. मग तेथें त्यांच्यावर क्वचितच तावा राही; मुदलींच राहत नसे असें ह्मटल्यास हरकत नाहीं. खेरीज विजय पावलेल्या सेनापतीस व त्यांच्या लष्करांस दूर राखण्याचा हेतु सिद्धीस जाण्याकरितां, हे वरिष्ठ पेशवे, त्या सरदारांनीं तावेदारीचें नांव राखिलें असतां, तृप्ति पावत.

---

स्वारीचा जय झाला असतां उदाजीनें कसें व कोणत्या आधारानें वागावें हें दाखविण्याकरितां, स्वारी रवाना होण्यापूर्वीं, ही सनद दिली गेली असें उघड दिसतें. कारण इसवी सन १७२९ त पूर्वेस बुंदेलखंडापासून पश्चिमेस आमदावादेपर्यंत, व उत्तरेस मारवाडापर्यंत, सर्व गांवोगांवच्या व प्रांतोप्रांतांच्या अधिकाऱ्यांस बाजीरावानें लिहिलेले हुकूम धारवाल्यांच्या कागदांत सांपडतात कीं, तुह्मीं उदाजी पंवार यांस सरदेशमुखी व चौथ देत जावें. हे परवाने उदाजीची स्वारी फत्ते झाल्यानंतर लिहिले गेले यांत संशय नाहीं. माझा असा तर्क धांवतो कीं, वर दिलेली खरी सनद, एकंदरीनें कशा सनदा देत असत याचा नमूना आहे.

कारकीर्दीच्या सुरूंतच मराठ्यांचा अधिकार सर्व हिंदुस्थानभर कसा पसरला, आणि पुष्कळ मराठी सरदार आपणास राजे न ह्मणवितां राजांचे सर्व अधिकार कसे चालवूं लागले, अशाविषयींच्या मुख्यमुख्य कारणांचें हें वर थोडक्यांत वर्णन केलें आहे. तुटक तुटक व एकमेकांपासून फुटलेले असे जरी ते दिसत, तरी त्यांजमध्यें सर्वांस सारखे प्रयोजक कांहीं हेतु असत, त्यामुळें त्यांचा प्रसंगानुसार एकोपा होई.[१] पुढें मात्र राज्यस्थिति बदलली असतां पूर्व रहणी बदलली नाहीं, ह्मणजे त्यांचा पूर्ण विजय होऊन शत्रूचा नाश झाला असतां, प्रथमतः ज्या रहणीनें निरनिराळ्या मराटीसरदारांच्या हातीं निरनिराळा व स्वतंत्र अधिकार आला होता, ती रहणी कायमच राहिली, यामुळें वर लिहिलेले साधारण प्रयोजक हेतु बहुतांशीं ते विसरले, व एकमेकांस लुटूं लागले व एकमेकांच्या नाशास उद्युक्त झाले. परंतु असें झाल्यानंतरसुध्धा एका जुटांतले आपण निरनिराळे भाग आहों हा संबंध निदान नांवानें तरी ते हमेषा लक्षांत बाळगीत. खरोखरीच हरप्रसंगीं त्या नात्याचें ते इतकें स्मरण ठेवीत कीं, जशी धर्मावर श्रद्धा असावयाची तशी या नात्यावर मराठ्यांची श्रद्धा होती असें दिसतें. असें असण्याचें हें एक कारण असावें कीं, अपल्या जन्मभूमीवर त्यांची पूर्ण भक्ति होती. माळव्यांत अथवा उत्तर हिंदुस्थानांत अथवा हर कोठें गेले तरी, आपल्या मूळच्या घरच्या माणसांशीं व जातभाईशीं ते हमेशा घरोबा ठेवील; तसेंच मूळचे संबंध लग्नादि नव्या शरीरसंबंधांनीं हमेषा दुणावत व जो-

१. मराट्यांच्या निरनिराळ्या सरदारांचा, आपसांत तंटे असतां, सहज एकोपा होई, या विषयीं लिहितांना एक मुसलमानी ग्रंथकार ह्मणतो कीं, जसें बळकट पदार्थांचे स्वभाव सारखे राहतात, व एकाच पदार्थाचे निरनिराळे कण केले असतांही त्या कणांमध्यें जमून जाण्याची शक्ति हमेषा असत्ये, तसें मराठ्यांचें आहे; अथवा जसें, सापाचे तुकडेतुकडे केले असतां, निरनिराळ्या तुकड्यांत निरनिराळा जीव राहतो, व जोडिले असतां पुनः एक होतात तसें मराठ्यांचें आहे.

पावत. हिंदूलोक अशा नात्यागोत्यांच्या फार अहारीं असतात. या लोकांसारिखा, नातेवाइकांवर वळकट भक्ति ठेविण्याचा सद्गुण, आवांतर कोणत्याही लोकांत नाहीं. एक पक्ष जरी मोठ्या अधिकारास चढला, व दुसरा पक्ष जरी तादृश गरीबींत राहिला, तरी हा संबंध नाहींसा होत नाहीं अथवा त्यांत अंतर पडत नाहीं.

पेशव्यांस मराठी राज्याचे मुख्य समजून सारे मानीत असत, मग त्या मानण्यांत जीव असो अथवा नसो. ब्राह्मणवर्णामुळें ही मान्यता त्यांस मिळाली होती असें नाहीं. उलटें असें ह्मटलें पाहिजे कीं, जरी प्रथमतः लोकांची भक्ति बसण्यास त्यांचा उंच वर्ण कारणीभूत झाला, तरी पुढें तोच वर्ण त्या भक्तींत अंतर पाडण्यासही कारणीभूत झाला. ब्राह्मणांनीं आपला मूळचा ईश्वरविषयक अध्ययन, अध्यापनादि प्रकार जर राखिला, तर मात्र बहुधा सारे हिंदुलोक त्यांस पूज्यता देतात व त्यांची दचक बाळगितात. मराठी राज्यांतील ब्राह्मणांनीं तर ऐहिक राजसत्तेस हात घातला. तेव्हां अर्थातच त्यांस ती पूज्यताही मिळाली नाहीं व त्यांची ती दचकही राहिली नाहीं. तथापि सर्व जातीचे लोक, पेशव्यांस आपल्या राज्याचे मुख्य दिवाण समजून, त्यांची जी ताबेदारी उठवीत ह्मणा, अथवा त्यांजवर जी भक्ति ठेवीत ह्मणा, त्या भक्तींत जरी वर लिहिल्या कारणानें अंतर पडलें, तरी ती कधींही समूळ नाहींशी झाली नाहीं. संकटसमयीं एकोपा होण्यास सदां ही भक्ति कारण होई. लोकांनीं हा अंतःकरणापासून धरिलेला भाव जसा गेल्या थोड्या वर्षांत दिसून आला तसा पूर्वीं कधींही आला नसेल. या भक्तिभावास जो पुरुष विषय होता, (बाजीराव रघुनाथ), त्यांत जर विशेष सद्गुण असता, अथवा विशेष शहाणपण असतें, तर या भक्तिभावानेंच मुख्यत्वें बांधिला गेलेला जो मराठ्यांचा जूट तो मोडला नसता.

औरंगजेब बादशाह मरण पावला त्यापूर्वीं मराठ्यांनीं माळव्यावर ज्या स्वाऱ्या केल्या त्यांचें मागें वर्णन केलें. तसेंच सन १७२१ त, जी त्यांणीं स्वारी केली तिचेंही वर्णन केलें. त्यासालीं माळव्यांत

प्रसिध्ध निजाम उलमुल्काचा [1] एक वहिवाटदार अधिकार चालवीत होता. या उमरावास महंमदशाह बादशाहानें सुभेदारीच्या कामावर मुकरर केलें होतें. परंतु हें काम लौकरच त्याजकडून काढून राजा गिरधर बाहादर [2] यांजकडे सांगितलें गेलें. थोडक्या वर्षांनंतर चिमणाजी पंडित [3] व उदाजी पंवार या मराठी सरदारांच्या लष्करांनीं राजा गिरधरावर चाल करून त्यास पराजित केलें. यानंतर हे सरदार
सन १७२४. सारंगपुरावर जाऊन पडले. येथें एक मुसलमान सुभेदार होता, त्यानें पंधरा हजार रुपये देऊन त्यांस परत वाटेस लाविलें; याहून विशेष देण्यास बहुधा या शहरास ताकत नसावी. मराठ्यांच्या वहिवाटीप्रमाणें, पुढें दरसाल या रकमेची मागणी या शहरावर सुरू झाली. ही वहिवाट, मराठे देश कबज्यांत कसा आणितात त्याचें रूप दाखविणारी आहे. [4]

याकाळीं मराठ्यांनीं गुजराथ व माळवा हे प्रांत निर्वेध लुटून फस्त केले. त्यांच्या कबजांत माळवा पूर्णपणें जाण्यास निजामुल्मुल्काची नियत विशेषेंकरून कारणीभूत झाली. तो अशी इच्छा बाळगून होता कीं, दक्षिण व उत्तरहिंदुस्थान यांमध्यें मराठ्यांचें आड कुंपण करावें.

१. रफीउलदीरजत याच्या थोडक्या कारकीर्दींत, इसवी सन १७१७ त, माळव्याची सुभेदारी असूफजाह निजामउलमुल्क याकडे झाली.

२. गिरधर बहादर नागर ब्राह्मण होता. हा मुळचा गुजराथेंतील राहणारा.

३. चिमणाजी पंडित बाजीराव पेशव्याचा बंधु. पुणे दफ्तरांतील सन१७२९ सालच्या रोजकीर्दीवरून असें दिसून येतें कीं, या सालीं चिमणाजीपंत माळव्यांत होता. तो या सालाच्या बराच पूर्वीं माळव्यांत गेलेला असावा.

४. फारशी ग्रंथकारांनीं या रकमेस **गनीमशाई** ह्मटलें आहे. ह्मणजे लुटीचा पैसा. गनीमशाई या दोन शब्दांच्या अक्षरांमधून हिजरी ११४१ या शकाचा बोध होतो. ह्मणजे इसवी सन १७२८.

हे लोक जी वाताहात करीत त्या वाताहातीचा ओघ बंद करण्याचें सामर्थ्य त्या सरदाराच्या अंगीं नव्हतें खरें, तरी तो ओघ प्रत्यक्ष आपल्या अधिकारामधील प्रांतांपासून आपल्या शत्रूच्या प्रांतांत कांहीं काळ वळविण्याचें सामर्थ्य त्याच्या अंगीं होतें. महंमदशाह बादशाहास व त्याच्या दरबारास निजाम उल्मुल्क आपले शत्रूच समजे. बादशाही राज्यव्यवस्थेचा असा घाट; तेव्हां बाजीराव पेशव्यास अर्थातच राज्यलोभ

सन १७३१. उत्पन्न झाला, व त्याणें एक मोठें लष्कर घेऊन पुण्याहून कूच केलें, व नेमाड आणि माळवा हे प्रांत आपल्या ताब्यांत आणिले. माळव्यांत राजा गिरधरांचा[1] नातलग दयाबहादर सुभेदार झाला होता, तो युद्धास उभा राहिला, परंतु रणांगणांत पडला; व त्याचा पराभव झाला यामुळें सर्व प्रांत मराठ्यांच्या सहजच हस्तगत झाला.[2]

यानंतर महंमदखान बंगश सुभेदार झाला. त्याणें मराठ्यांचा उत्कर्ष न होऊं देण्यास प्रयत्न केले, परंतु ते सारे व्यर्थ झाले. नंतर त्यास कामावरून मौकूफ करून जयपूरचा राजा सवाई जयसिंग याजकडे बादशाहानें काम सांगितलें. परंतु मराठ्यांस आड येणें व्यर्थ आहे अशा समजुतीनें असो, अथवा मुसलमानी ग्रंथकार त्याजवर आरोप ठेवितात त्याप्रमाणें, मराठ्यांशीं त्याचें आंतून सूत व सख्य असो; कसेंही असो, हें खरें कीं, सवाई जयसिंगानें बाजीरावाकडेच माळव्याच्या सुभ्याचें काम सांगण्यास बादशाहाचें मन वळविलें. परंतु ही गोष्ट घडून आली नाहीं. पेशव्यांच्या लष्करानें आग्रा व अलाहाबाद हे प्रांत उजाड

---

१. राजा गिरधरानें आपल्या कारकीर्दींत उज्जनी शहरास तटबंदी केली. बहुधा मराठे येतील अशा अंदाजानेंच केली असेल. जरी या तटबंदीवर लेख असा आहे कीं, ही राजा गिरधरानें बांधिली, तरी उज्जनीचे लोक ही दयाबहादरानें बांधिली ह्मणोन दंतकथेच्या आधारानें ह्मणतात.

२. या लढाईंत दयाबहादर व त्याचें दोन हजार लष्कर, रणांगणीं पडलें. ही लढाई धार व अमझरा यांच्यामध्यें तरळा खेड्यावर झाली.

पाडिले, व माळव्यांतून मराठ्यांस घालवून देण्याविषयीं बादशाही लष्कराचा हरएक प्रयत्न फसला, तेथपर्यंत त्यांजकडे सुभ्याचें काम सांगितलें गेलें नाहीं.

या वर्तमानांपासून पुढें मराठ्यांच्या कारकीर्दीची नवी अवस्था उत्पन्न झाली. बऱ्याच कालापासून, बलिष्ठ लुटारू या नात्यानें उत्पन्न झालेले त्यांचे हक्क कबूल झाले होते. व बादशाही राज्याच्या बऱ्याच भागीं वसुलांचा हिस्सा त्यांस मिळूं लागला होता. बहुधा अशा हेतूनें मिळूं लागला असेल कीं राहिलेल्या भागास तरी त्यांणीं धका लावूं नये. आतां तर मराठ्यांच्या मुख्य अधिकाऱ्यास उत्तर हिंदुस्थानांतील एका मुख्य प्रांताचें काम दिलें गेलें. हें खरें आहे कीं, त्या अधिकाऱ्यानें हा प्रांत काम मिळण्यापूर्वींच जिंकिला होता; परंतु त्याणें समजून उमजून चौथ व सरदेशमुखीखेरीज दुसरा वसूल गोळा केला नव्हता; आणि असें दिसतें कीं, बादशाहाच्या नांवानें या प्रांतीं अधिकार चालविण्यास आपला वास्तविक हक्क असावा, अशाविषयीं त्यास फार उत्कंठा होती. मराठ्यांच्या विचित्र स्वभावाचें वर वर्णन केलें आहे त्याचा मासला, मध्यहिंदुस्थानाचे जेव्हां ते मालक झाले तेव्हां त्यांच्यांत उत्तम दिसून आला. आपण जें संपादन केलें त्यांतील तत्वापासून व खऱ्या फायद्यापासून बाजीराव व त्याचे मुख्य सरदार तृप्ति पावले. व डामडौलाचीं नांवें व लवाजमे घेऊन लोकांचा आपल्याविषयीं ग्रह कमी होईल, अथवा त्यांच्या पूर्वसमजुती जाऊन भीति उत्पन्न होईल, ह्मणून तसें न करितां जसजसा त्यांचा अधिकार वाढत चालला, तसतसीं त्यांच्या लीनतेचीं सोंगेंही वाढत चाललीं. बादशाहाशीं व त्यांच्या मुख्य अधिकाऱ्यांशीं, विशेषेंकरून राजपूत राजांशीं, पत्रव्यवहार व हरएक व्यवहार ठेवितांना वळेंच धाकुटपणा त्यांणीं ओढून आणावा. हरएक बाह्योपचाराच्या व शिष्टाचाराच्या प्रसंगीं, ज्यांचे देश आपण बुडविले व ताब्यांत आणिले, त्यांच्याहून हलकेपणा दिल्हा असतां मराठे सरदार घेत इतकेंच नाहीं; तर देश जिंकिण्यापासून तो ताब्यांत ठेविण्याचा हक्क आला असें कोण

त्याही प्रसंगीं मानीत नसत. जे निरनिराळ्या देशीं निरनिराळे राजे असत त्यांचा देश बुडाडून घेतल्यानंतर त्या देशाबद्दल हमेश सनदा मागत व करून घेत. ही वर्तणूक हिंदुस्थानांतील रहिवाशांचीं मनें न दुखविण्यास उत्तम होती. कारण हे लोक बहुधा चालत आलेल्या संवईत फरक न करणारे, व हरतऱ्हेचा नवीनप्रकाराचा त्रास करणारे आहेत. मराठ्यांच्या पूर्वीं जे विजयकर्ते झाले त्यांस, जीं पुष्कळ विघ्नें आलीं होतीं तीं, अशा वर्तणुकीनें मराठ्यांनीं टाळिलीं. परराज्यांशीं त्यांचे संबंध असे विचित्र असत. परंतु यांहीपेक्षां विचित्र, त्यांचे आपसांतील परस्परांचें संबंध होते. पुढें दिसून येईल कीं, माळव्याच्या सुभेदारीची सनद बाळाजीस करून देण्यापूर्वीं, त्याच्या लष्करी सरदारांपासून महंमदशाह बादशाहानें लेख लिहून घेतला कीं, आमचे धनी एकनिष्ठेनें वागतील अशाविषयीं आह्मीं जामीन आहों. या गोष्टीवरून, व अशाच तऱ्हेच्या दुसऱ्या गोष्टींवरून असें सिद्ध होतें कीं, पेशव्यांचा अधिकार हा, फक्त मराठी राज्यांतील मुख्य कामगाराचा अधिकार असा लेखिला जात असे. व पेशवेही, सर्व मराठ्यांच्या हितासंबंधीं गोष्टींविषयीं आपल्या जुटांतील सरदारांशीं बहुधा बरोबरीच्या नात्यानें सल्लामसलत करीत. बहुधा वर लिहिलेली विचित्र तऱ्हा[1], मराठ्यांच्या या मुख्य नियमसूत्रास अनुसरून होती कीं, आपला हेतु सिद्धीस जाण्यास जो कोणताही उपाय दिसेल तो सोडावयाचा ह्मणून नाहीं.

राज्याच्या पडत्याकाळीं प्रजेचें संरक्षण करण्यास राजांच्या अंगीं सामर्थ्य राहत नाहीं, व त्यांच्या गरजा तर वाढतात, यामुळें ते प्रजेस गांजूं लागतात; व अशानें मूळचीं दुःखें दुणावतात. हा प्रकार आतां

१. परंतु वर लिहिलेला प्रकार मराठ्यांतच आहे असें नाहीं. सर्व हिंदू राज्यांत आहे. राजांस अमर्याद सत्ता हिंदूंच्या थोड्याच राज्यांत प्राप्त झाली होती. त्यांचीं सर्व राज्यें, एक मुख्य सरदार व बाकीचे हाताखालील सरदार मिळून जूट होऊन झालेलीं असत.

माळव्यांत झाला होता. या वेळींच्या तेथील अधिकाराशीं, मराठ्यांची या प्रांतांतील प्रथमप्रथमची कारकीर्द ताडून पाहिली असतां, ती चांगली व सौम्य होती अशाविषयीं, मध्यहिंदुस्थानांत त्यांची स्थापना झाल्याचीं जितकीं वर्णनें आहेत तितक्यांत एक सारिखें लिहिलेलें मिळतें.[१] कांहीं

१. माळव्यांत मराठ्यांची प्रथम स्थापना कशी झाली याविषयीं इंदूरच्या जमीदारानें एक स्पष्ट वृत्त मजजवळ लिहून दिलें आहे. व हें वृत्त फार काळाचें नाहीं, तसेंच वृत्त सांगणारा जमीदार योग्य, वृद्ध मनुष्य आहे, तसेंच ज्यानें मराठ्यांस भेटून या प्रांतीं आणिलें तो राव नंदलाल या जमीदाराचा आजा होता, इतकें सारें ध्यानांत घेतलें ह्मणजे त्याणें सांगितलेली गोष्ट बरोबर आहे किंवा नाहीं अशाविषयीं संशय राहत नाहीं. या विषयावर घातलेल्या माझ्या प्रश्नाचा जाब त्याणें शब्दशः खालीं लिहिल्या प्रमाणें दिला :—

"मोगली राज्याचे तुकडे तुकडे होऊन दिल्लीच्या बादशाहाची "सत्ता त्वरित विलयास जाऊं लागली त्या काळीं, महमदशाहचा अधिकार "असतां, माळव्याच्या सुभ्याचें काम दयाबहादर या नावाच्या ब्राह्मणा- "कडे होतें. दिल्लीच्या ताब्यांत राहिलेल्या मुलकी अधिकाराचा "फारच भलता उपयोग होई, व सरकार आपल्या योग्य कर्तव्य कर्माचा "बिलकुल आळस करी अशामुळें अनाथ रयतेवर अत्यंत पीडेचें ओझें "पडे. ज्या लहानशा सरदारास जुलूम करावा असें वाटे तो जुलूम "करी व रयतेस गांजीं, यामुळें रयतेचे नाकींनव आले होते. दया- "बहादर व त्याचे कामदार यांचा फार जुलूम झाला, व त्यांणीं आपल्या "पासून खेंचखेंचून वसूल काढला हें, अखेर माळव्यांतील ताबेदार "ठाकूर लोकांस न सहन होऊन, त्यांणीं दिल्लीच्या दरबारीं गाऱ्हाणें "गाइलें व आमची दाद लागावी ह्मणोन अर्ज केला ; परंतु त्या वेळचा "बादशाह, महमदशाह, याच्या हातीं राजसत्तेची अनीनी फार ढिली "पडली होती, व तो ऐष आरामाच्या जनानी ख्यालखुशालींत अत्यंत "निमग्न असे यामुळें त्यांची दाद लागली नाहीं. येथें आपली निरा-

काळपर्यंत माळव्यांतील रहिवाशांशीं मराठ्यांची वर्तणूक मनमिळावू होती. पुढें लौकरच ते इतकी बळकट पावले कीं, आपल्या निर्बळ

---

" शा झाली असें पाहून, या राजपूत सरदारांनीं जयपूरच्या सवाई-
" जयसिंग राजाकडे डोळे लाविले. व त्यांणीं त्याची प्रार्थना केली.
" बादशाहाची सत्ता मानणारे जे कोणी अद्यापि हिंदू राजे राहिले होते,
" त्यांत जयसिंग अत्यंत बलशाली व शहाणा पुरुष होता; परंतु कांहीं
" अपमान झाल्यामुळें जयसिंगाच्या स्वामिभक्तींत अंतर पडूं लागलें
" होतें, व बाजीराव पेशव्याशीं त्याचा पत्रव्यवहार सुरू झाला होता.
" या पत्रव्यवहाराचा हेतु, मुसलमानी राज्याचा नाश करण्याचा होता
" असें लोक अनुमान करीत. माळव्यांतील राजपूत सरदार त्याज-
" कडे फिर्याद गेले व त्याणें त्यांस असा जाब दिला कीं, तुह्मी
" मराठ्यांस बोलावा व मोगलांस आपल्या कबजांत आणा. या वेळेस
" राव नंदलाल चौधरी, इंदूर परगण्याचा जमीदार ह्मणजे मुख्य
" अधिकारी होता. हा संपत्तिमान् व वजनदार पुरुष असे. व
" याच्या जवळ दोन हजार स्वार व पायदळ असे. या लोकांचा खर्च,
" परगण्यांतील जो वसूल त्यास येई, त्यांतून भागे. खेरीज नर्मदेच्या
" ठिकठिकाणच्या उतारांवर जे पाहरे असत त्यांचा हा मुखत्यार असे;
" या कारणामुळें मराठ्यांशीं सलूक करण्यास, व त्यांची स्वारी या
" मुलकीं येईल असें करण्यास सर्वांनीं याजला सांगितलें. या
" वेळेस बाजीरावाच्या लष्कराचा तळ बऱ्हाणपुरच्या मैदानांत पडला
" होता, व मल्हारराव होळकर १२००० लोकांनिशीं बीनिवर होता.
" राव नंदलालानें मल्हाररावाकडे वकील पाठविला व बोलणें
" लावलें कीं, तुह्मीं माळव्यांत यावें. तुमच्या लष्कराकरितां सातपु-
" ड्याचे घाट मोकळे सोडितों व आह्मी सारे जमीनदार लोक तुमच्या
" स्वारीस मदत करितों. अशामुळें मराठे कूच करून धरमपुरी व-
" महेश्वर या दोहोंमध्यें, अगबरपूरखेड्याजवळ नर्मदा उतरले. मध्यंतरीं

अधिकाराखालीं माळवा पुनः येईल ही आशा, महंमदशाह बादशाहास राहिली नाहीं. येथपासून हा प्रांत मराठ्यांचें घर झाला; व यांतून उत्तर हिंदुस्थानांत त्यांच्या स्वाऱ्या जाऊं लागल्या. या स्थित्यंतरापासून

---

" त्यांच्या येण्याची बातमी दयाबहादरास लागल्यामुळें, त्याणें लष्कर
" घेऊन अमझऱ्याकडे कूच केला; व तांडेगांवाकडे जाण्याचा सात-
" पुड्याचा घाट बंद केला. मराठ्यांचा हेतु या घाटानें वर चढून
" येण्याचा होता असें त्यास वाटलें; परंतु जमीदार लोकांची व एकंदर
" वस्तीची मराठ्यांस मदत असल्यामुळें, त्यांणीं त्यांस बंदोबस्त नव्हता
" अशा एका दुसऱ्याच घाटानें वर आणिलें. या घाटास आतां भैरवघाट
" ह्मणतात, व हा मांडवाच्या पूर्वेस कांहीं मैलांवर आहे. अशा तऱ्हेनें
" लढाईचा सामना न होतां, मराठ्यांचें सारें लष्कर माळव्याच्या मैदानावर
" येऊन पोंचलें. पुढें अमझरा व धार यांमध्यें तरळे खेड्याजवळ दया
" बहादराशीं त्यांचा प्रसंग झाला. या प्रसंगीं दयाबहादर रणांगणीं
" पडला, व त्याच्या लष्करानें पाय काढिला. या काळापासून माळ-
" व्यांत मराठे प्रमुख झाले. प्राचीन ठाकूरांचीं व जमीदार लोकांचीं
" वतनें, जशीं बादशाहींत चालत होतीं तशीं, त्यांणीं कायम ठेविलीं; व
" बादशाही अधिकारी, आलीकडे जसा पिळून पैसा काढीत, तसें
" आपल्या कडून होणार नाहीं ह्मणून अभय वचन दिलें. मोगलांचे
" अमीन व दुसरे कामदार, तसींच त्यांचीं ठाणीं, त्यांणीं उठवून दिलीं;
" व त्याल्या जागीं मराठे कामदार, व मराठ्यांचीं ठाणीं बसविलीं. या-
" पुढें कित्येक ठाकूर मदोन्मत्त झाले, व त्यांणीं खंड देणें व आपल्या
" कबुलायती पार पाडणें सोडून दिलें. यामुळें मराठ्यांनीं त्यांचे
" अधिकार काढिले व जमीनी घेतल्या; परंतु एकंदरीनें पाहतां हा
" प्रांत त्यांणीं प्रथम आपल्या ताब्यांत आणिला तेव्हां, त्यांतील हिंदू-
" सरदार व रहिवासी यांचीं मनें ओढून घेण्यासरिखी मुद्दाम आपली
" वर्तणूक ठेविली होती "

जीं त्वरित फळें प्राप्त झालीं त्यांतील हें एक होय कीं, उत्तर हिंदुस्थानाच्या वसुलांतून कांहीं हिस्सा, व खुद्द दिल्लीच्या आसपास कांहीं जमीनी, त्यांस प्राप्त झाल्या. मग बुंदेलखंडावर स्वारी करून, व उत्तर हिंदुस्थान लुटून, आणि सर्व बादशाही मुलूक तुह्मांस चौथ देईल असा करार बादशाहाकडून करून घेऊन, प्रथम आल्यादिवसापासून सहा वर्षांनीं, बाजीराव माळव्यांतून परत गेला. या सालीं, बादशाही दरबारांतील मुख्य उमरावांत तुमची गणना आहे अशा भावीं, सनदापत्रें मिळावीं ह्मणून त्यानें अर्ज केला व तो मान्यही झाला. या सनदेंत लिहिलें आहे कीं, कांहीं मुलूक इनाम देऊन, बरोबरीच्या लोकांहून बाजीरावाची योग्यता आह्मीं वाढविली आहे; व त्यास सुंदर खिलत रवाना केली आहे. व या बरोबरच आपल्या कर्तव्यकर्माची त्यास आठवण दिली जात आहे, व स्वामिभक्तीच्या रुंद मार्गांत दृढ निश्चयानें चालावें ह्मणून आज्ञा केली जात आहे. हा मानपान देण्यापूर्वीं एकच वर्ष, माळव्यांतून बाजीरावास हांकून लाविण्याकरितां, बादशाहानें त्या प्रांताच्या सुभेदारीचें काम पुनः निजामुल्मुल्कास सांगून प्रयत्न मांडिले होते. बाजीरावास दक्षिणेंत परत जाण्यास जीं कारणें झालीं

सन १७३८. त्या कारणांत हें एक कारण असावें; कां कीं या वेळेस नादरशाहाशीं लढण्यास निजामुल्मुल्कास बोलाविलें होतें, तिकडे तो जाईल, व मागें बराच मुलूक जिंकिण्यास संधि सांपडेल अशी निःसंशय बाजीरावानें उमेद बाळगिली होती; परंतु कारकीर्दीच्या अखेरीस एक ध्यानांत ठेविण्याजोगा अपजय त्यास प्राप्त झाला, यामुळें पुणें शहर नाजरजंगानें घेऊन जाळिलें. यानंतर कांहीं थोड्या महिन्यांतच हा प्रसिद्ध मराठी सरदार मरण पावला. बाजीरावानंतर त्याचा मुलगा, बाळाजी, पेशवा झाला; व काम पाहूं लागण्यापूर्वीं, बंदींत असलेल्या शाहू राजापासून, वस्त्रें घेण्याचा उगाच शिष्टाचार बाळा-

सन १७४०. जीनें केला.

नादरशाहाच्या स्वारीमुळें सर्व उत्तरहिंदुस्थान खळबळून गेलें

होतें. हा प्रसंग साधून राज्यवृद्धि करण्याची बाळाजीनें त्वरा केली. त्याच्या कारकीर्दीसंबंधीं, जो जुना भरवसा ठेवण्याजोगा एक दाखला सांपडतो, तो निजामुल्मुल्काशीं झालेल्या एका चमत्कारिक ठरावाचा कागद आहे. तो सवालजवाबांच्या पद्धतीनें आहे. हिंदुस्थानी राजदरबारी कागद, अशा तऱ्हेचे हमेश असतात.

प्रथमकलमांत हा अर्ज आहे कीं, बादशाहांनीं बाळाजीस माळव्याच्या सुभ्याचें काम सांगावें, आणि त्या सर्व प्रांताची जहागीर द्यावी. यास निजामाचा जाब आहे कीं, सुभेदार तर आह्मी खुद्द आहों; परंतु जर हुकुमाची तामिली करीत जाऊं असें पेशवे कबूल करतील तर, नायबीच्या सनदा त्यांस दिल्या जातील. व

दुसऱ्या कलमांत अर्ज आहे कीं, बादशाहांनीं पेशव्यांच्या मदतखर्चास ५० लाख रुपये देण्याचें कबूल केलें होतें, ते रुपये द्यावे. यास जबाब आहे कीं, ही रकम बादशाहांकडून घेऊन तुह्मास देण्याविषयीं हरप्रयत्न केला जाईल.

या कागदाच्या नांवावरून असें दिसतें कीं, नादरशाह हिंदुस्थानांतून परत गेल्यानंतर, जेव्हां निजामुल्मुल्क दक्षणेंत आपल्या मुलानें पुंडावा माजविला होता, त्याच्या शासनाकरितां जातांना माळव्यांत आला, तेव्हां हा कागद लिहिला गेला.

बाळाजी, पेशव्यांच्या गादीवर बसल्यापासून सवाईजयसिंगाच्या मरणापर्यंत, तीन वर्षें मध्यें लोटलीं. या तीन वर्षांत सवाईजयसिंगाचा व मराठ्यांचा सदा मित्रभाव असे. त्यावेळेचीं कांहीं पत्रें व तहनामे उरले आहेत त्यांवरून, त्यांच्या आपसांतील संबंधाचें रूप स्पष्टपणें ध्यानांत येतें. बहुधा आपण हिंदु व मराठेही हिंदू, अशा बुद्धीनें

१ पहिल्या भागांत सांगितलेंच आहे कीं, ज्यास आपण मध्यहिंदुस्थान ह्मणतों त्या साऱ्या मुलकाचा समावेश मोगलांच्या वेळीं सरकार-माळव्यांत होत होता.

जयसिंगानें हा संबंध प्रथमतः जोडिला असावा; परंतु मग ज्यावेळीं मराठ्यांनीं उघडपणे पुढारीपणा घेतला त्यावेळीं या संबंधाचें रूप बदललें. जयसिंगाचा हेतु असा होता कीं, आपण बादशाहा व मराठे यांमध्यें हरएक व्यवहाराचें द्वार असावें; व या वेळेस त्याणें मराठ्यांशीं कांहीं कबुलायती केल्या आहेत, त्यांवरून असेंही दिसून येतें कीं, इकडे तर आपल्या स्वामीच्या ठिकाणीं कर्तव्यकर्मबुद्धि, व इकडे तर मराठ्यांशीं मित्रभाव, या दोहोंची जोड राखावी अशी त्याची इच्छा होती. तसेंच मराठ्यांनीं आपले मदतगार व्हावें असेंही तो इच्छीत असे. एक चार कलमांचा तहनामा[१] आहे, तो मुख्यत्वें करून जोतपूरचा राजा अभयसिंग, ज्याच्याशीं यावेळीं जयसिंगाचें वांकडें असे, त्यास उद्देशून केला आहे असें दिसतें.

हा तहनामा अमलांत आला असता तर, जीं दरबारी कारस्थानें, व घंपाघोळ, व गुन्हे घडून आले असते त्यांपासून, हा प्रतापी व गुणी राजा, प्रसंगावर मरण आल्यामुळें वांचला गेला. आपल्या सभोंवार आतां जे तुफान माजत चाललें होतें, तें अहारीं ठेविण्यास जयसिंगाजवळ साधनें नसल्यामुळें, वरील गोष्टीपासून त्याच्या नांवाची विशेष कीर्ति न होतां, त्यास काळिमाच आली असती.

वर सांगितलेल्या तहनाम्याच्या तारिखेवरून असें दिसून येतें कीं, तो तहनामा जयसिंगाच्या मरणापूर्वीं फार थोडे दिवस झाला असावा[२]. त्यांतील पहिल्या कलमांत, परराज्यावर स्वारी केली असतां व आपल्या-

---

१ परचक्र चढ करून आलें असतां अथवा परचक्रावर चढ करून जाणें असतां, जयसिंगानें व मराठ्यांनीं एकमेकांची मदत ठेवावी असें या तहनाम्यांत आहे. तहनाम्याचें साल, संवत १७९८ लिहिलें आहे. व त्याच्या खालीं सुर सन ११४१ घातला आहे. मराठे लोक या आरबी शकाचा उपयोग करितात. हें साल हिजरी शकाचें ११५५ वें व इसवी सनाचें १७४१ वें आहे.

२ जयसिंग सन १७४२ त मरण पावला.

वर स्वारी आली असतां परस्पर मदत द्यावी, अशाविषयीं कबुलायत आहे. दुसरें कलम विचित्र आहे. बादशाहाशीं बेमान होण्याचा बाजीरावास बहुधा प्रसंग येईल, असी कल्पना मनांत घेऊन हें कलम लिहिलें आहे. हा प्रसंग मी येऊं देणार नाहीं, व आल्यास मी पेशव्याच्या पाठीशीं असेन, असी जयसिंग कबुलायत करितो. कलम तीन व चार मोहोगम आहेत. पांचवे कलमांत जयसिंग वचन देतो कीं, चंमलनदीच्या उत्तरेकडील ज्या राजपूत सरदारांविषयीं बाळाजीनें शिफारस केली आहे, त्यांच्या हितावर मीं दृष्टि ठेवीन; व जर ते बादशाहाच्या ताबेदारींत फरक करणार नाहींत, व खंड देतील, तर त्यांच्या जमीनी त्यांजकडे चालवीन. या शेवटच्या आटीवरून सिद्ध होतें कीं, बादशाहाच्या ठिकाणीं कर्तव्यकर्मबुद्धि जयसिंग अद्याप बाळगीत होता. खरोखर असा भास होतो कीं, महंमदशाह बादशाह व पेशवे यांच्या परस्पर व्यवहारांमध्यें, हा राजा केवळ मधल्या कारभाऱ्याप्रमाणें वागे. शेवटचें कलम सर्वांत महत्वाचें आहे. त्यांत जयसिंग कबुलायत करितो कीं, सुभ्या माळव्याच्या वजीरीची सनद, व त्याबद्दल रिवाजाप्रमाणें खिलत, शाहूकडे पाठविण्याविषयीं, व चंमलनदीच्या उत्तरेकडील राज्यांवर बादशाहांनीं बसविलेला खंड घेण्यास परवानगी देण्याविषयीं, सहा महिन्यांच्या आंत मी बादशाहाचा हुकूम आणितों. हा तहनामा ज्येष्ठ शुद्ध १४ संवत १७९८ (ह्मणजे इसवी सन १७४१) या दिवशीं ठरला. दुसऱ्याच वर्षीं राजा जयसिंगास मरण आलें. जयसिंगाहून विशेष कीर्ति, व तीही अंगच्या चातुर्यानें, ज्यांनीं मिळविली आहे असे राजे थोडकेच. आपलें नांव मागें राखण्या करितां त्याणें जयपूर शहर वसाविलें. या शहराच्या भव्य सुशोभेंत, वसविणाऱ्याची महत् बुद्धि दृग्गोचर होते. या आपल्या नूतन राजधानींत त्याणें एक वेधशाळा बांधून, त्याच्या खर्चाची कायम तजवीज केली होती, या वरून या राजाच्या इतर गुणांत विद्येची आवड हाही गुण होता असें दिसतें. बाल्यावस्थेंत सुद्धां त्याजमध्यें विचित्र बुद्धी

चीं चिन्हें दिसत होतीं. तीं चिन्हें वऱ्याच काळ पर्यंत राज्य करून जयसिंगानें पूर्णपणें खरीं करून दाखविलीं. या इतिहासांतील विषयाशीं त्याचा इतकाच संबंध आहे कीं, एक्याकाळीं मध्यहिंदुस्थानांत त्याची कांहीं सत्ता असे, व सर्व आयुष्यभर त्या प्रांतीं त्याचें मोठें वजन असे. मध्यहिंदुस्थानांत सर्व लोकांची, विशेषेंकरून राजपूत लोकांची, जयसिंगाच्या नांवावर अत्यंत आवड आहे. जयसिंगास व जोतपूरच्या यशवंत सिंगास, राजपूतलोक आपल्यांत सर्वांहून विशेष प्रतापी समजतात. औरंगजेबाशीं झगडल्या मुळें यशवंतसिंग त्यांच्या भक्तीस विषय झाला आहे.

जयसिंगाच्या वजनदारीमुळें बाळाजीस कांहींअंशीं अटक झाली होती, अशी कल्पना केल्या शिवाय राहवत नाहीं. सर्व राज्यकारणी मसलतींत मराठे लोक नीति उजागऱ्यानें व निर्लज्जपणानें झुगारून देत. बाळाजी व त्याचा चुलता चिमणाजी यांणीं, दिल्लीच्या निर्बल बादशाहाशीं ठरविलेल्या एका कलमबंदींत, एक शेरा लिहिला आहे, तो वर लिहिल्या गोष्टीचें ध्यानांत राहण्याजोगें उदाहरण आहे. या कलमबंदींत प्रथमतः पुष्कळ प्रकारची नोकरी बजाविण्याचें कबूल करून, पुढें लिहिलें आहे कीं " आजपासून पुढें मी बाळाजीराव हरएक गोष्ट मोकळ्यामनानें व निष्कपटानें करीन, व बादशाहाच्या इच्छा यथार्थ दिसतील तितक्या अमलांत आणीन, व फरमान न आल्यामुळें अथवा अशाच तऱ्हेच्या फक्त शिष्टाचाराच्या गोष्टी राहिल्यामुळें, उगाच कामें लांबणीवर टाकून वादविवाद आजपर्यंत वाढविले, तसे पुढें वाढविणार नाहीं. आणखी पूर्वीप्रमाणें यापुढें, रोख पैक्याची तूट आहे ह्मणोन सोंग करून अथवा अशींच दुसरीं निराधार कारणें लाऊन, नोकरी अंगाबाहेर टाकणार नाहीं.[1]" महंमदशाह बादशाहानें माळव्या-

---

१, माळव्याच्या सुभ्याचें काम बाळाजीकडे सांगितल्यानंतर, त्याणें व चिमणाजीनें बादशाहास नऊ कलमांची एक कलमबंदी लिहून

चा सुभा बाळाजीकडे सांगितला खरा, परंतु या काळीं बादशाह व पेश-वे यांमधील व्यवहार विचित्र तऱ्हेनें पडदा राखून होई. माळव्याच्या सुभेदारीचें मोठें काम, बादशाहानें एका तऱ्हेचें सोंग करून, पेशव्यास देण्यासाठीं वजीराच्या स्वाधीन केलें.[२] असा संभव होतो कीं, मराठ्यांनीं आपल्यास देणी देणें भाग पाडिलें, या गोष्टीची तैमूरच्या निर्बल वंशजास लाज वाटली; आणि आपल्या पदवीची मानहानि होऊं नये ह्मणून त्याणें ही युक्ति योजिली. मराठ्यांच्या पेशव्यांस तर त्या गोष्टीची जरूर नव्हती. सत्ता वाढली असतां पोकळ नांव दुसऱ्याकडे ठेविण्यास त्यांची खुशीच असे. आणखी कितीएक लेखांवरून असें दि-

---

दिली, तीस वर लिहिलेली कबुलायत जोडिली आहे; ती बाळाजीच्या स्वदस्तूरची आहे. सुरूंत लिहिलें आहे कीं, हा नऊ कलमांचा ठराव खान दौरानाच्या कारकीर्दींत, वजीराचा संतोष ठेविण्यासाठीं, रावरूपारामाच्या सांगण्यावरून, पुष्कळ वादविवादांतीं ठरला. रावरूपाराम हा बराच प्रसिद्ध पुरुष होता. हा फार दिवस जयसिंगाच्या तर्फे दिल्लीस वकील होता. महंमदशाह बादशाहाची याजवर जातखत कृपा होती.

१. हें काम सांगितल्याविषयीं दोन सनदा आहेत. एकीची तारीख २२ जमादिलावल व दुसरीची तारीख १८ रज्जब. या बादशाहाच्या कारकीर्दींतील चोविसाव्या वर्षीं.

२. दुसरी सनद ह्मणजे तारीख १८ रज्जबची अशा तऱ्हेनें झाली आहे.

३. बाळाजीराव पेशवा, माळव्याच्या सुभेदारीची पदवी व अधिकार संपादन करण्याविषयीं फार उत्सुक होता. हें पुष्कळ लेखांवरून व बोलण्याचालण्याच्या कागदांवरून, व लहानसहान कलमबंदीच्या दाखल्यांवरून सिद्ध होत आहे. आपल्या इच्छा मान्य झाल्या असतां, आपण एक निष्ठा दाखवूं व आज्ञा मानूं, अशा ह्मणण्याची या कागदां-

सतें कीं, दिल्लीच्या दरबारापासून उगींच कारणें लाऊन व कधींकधीं तर राग येण्यासारिखीं सोंगें करून, बाळाजी पैसा उकळीत असे. नादरशाहानें हिंदुस्थानावर स्वारी केली होती तेव्हां, बादशाहानें बाळाजीच्या बापाशीं कबुलायत केली होती कीं, तुह्मीं आमचें साहित्य राखिल्यास तुह्मांस पुष्कळ ऐवज देऊं. आतां जरी बाजीराव त्या प्रसंगीं मदत न देतां दूर राहिला, व तसेंच त्याणें आपल्या ताब्यांतील मुलूक वाढविण्यास तो अडचणीचा प्रसंग साधिला, तरी बाळाजीनें त्या ऐवजाचा

---

त बाळाजीनें रेलचेल केली आहे. आपले हेतु सिद्धीस नेण्याकरितां हरतऱ्हा योजिण्यास व हवेंतसें कबूल करण्यास बाळाजी कसा तयार असे, याचें चमत्कारिक उदाहरण या कागदांत अढळतें. महंमदशाहाच्या कारकीर्दीच्या तेविसाव्या वर्षीं बाळाजीनें एक कबुलायत लिहून दिली आहे, तिच्या डोक्यावर लिहिलें आहे कीं, "मी बाळाजीराव मुख्य प्रधान असोफजाहाच्या द्वारें लिहून देतों ऐसाजे;" आणि याच तारखेच्या व याच मतलबाच्या लिहिलेल्या दुसऱ्या कागदांत, आणखीं कोठेंही फरक नसतां, "असोफजाहाच्या द्वारें" इतकीं अक्षरें मात्र गाळिलीं आहेत. इतकेंच नाहीं, तर उलटें बाळाजीराव ह्मणतो-कीं, मी बादशाहाच्या हुकुमाखेरीज असोफजाहाशीं, अथवा आणखीं कोणाशीं, दोस्ती करणार नाहीं. लोकांनीं अशी कल्पना केली आहे कीं, प्रथमतः पहिल्या तऱ्हेनें कागद लिहिला गेला होता, परंतु बादशाहानें तो पसंत न केल्यामुळें दुसऱ्या तऱ्हेनें लिहिला गेला; परंतु हे दोन्ही कागद पुणें दप्तरांत बाळजीनें ठेविले आहेत, यावरून असा विशेष संभव होतो कीं, या दोहोंमधील एक कबुलायत दिल्लीच्या दरबारीं रवाना केली गेली, व दुसरी निजामुल्मुल्काच्या दरबारीं रवाना केली गेली. असें करणें मराठी मुत्सद्दी लोकांच्या रहणीस जुडून आहे. आपला प्रकृत हेतु साधला तर, पुढें उघडें पडेल व काळिमा येईल याची ते काळजी ठेवीत नाहींत.

दावा केला व त्याची उग्रणीही केली. माळव्याच्या सुभ्याचें काम जेव्हां प्राप्त झालें तेव्हां, बाळाजीनें व त्याच्या चुलत्यानें आपली कृतज्ञता बुध्दि एका तहनाम्यांत प्रकट केली आहे. तो तहनामा जरी लीनतेनें लिहिला होता तरी, त्याच्या कलमांवरून, आज्ञा मान्य करण्याचीं व स्वामिभक्ति दाखविण्याचीं अर्थरहित बोलणीं लावून आपला तात्कालिक हेतु साधण्यास प्रयत्न करीत होते असे जे पेशवे, त्यांची वास्तविक स्थिति कसी होती हें खूब दिसून येतें.[१]

---

१ बाळाजीराव पंडित प्रधान व चिमणाजीराव यांणीं कबूल केलेल्या कलमांचें खालीं भाषांतर दिलें आहे.

बादशाहांनीं कृपावंत होऊन नोकर बाळाजीराव व चिमणाजीराव यांस माळव्याच्या सुभ्याचें काम सागितलें, त्यास आह्मीं बाळाजीराव व चिमणाजीराव खालीं लिहिल्याप्रमाणें नोकरी बजाविण्यास तयार आहों.

१ बादशाहाच्या हुजूरांत आह्मांस पदवी प्राप्त होऊन आमची इभ्रत वाढावी असा आमचा अर्ज आहे.

२. आह्मी लिहून देतों कीं, माळवा सोडून जाऊन दुसऱ्या देशावर आह्मी स्वारी करणार नाहीं, व लुटालूट करून देश उद्वस्त करणार नाहीं.

३. कोणीही मराठा सरदार नर्मदेच्या पलीकडे उत्तर-हिंदुस्थानच्या सुभ्यांत जाणार नाहीं. याची जबाबदारी आह्मी आमचे माथ्यावर घेतों.

४. कोणी तरी लायकीचा मराठी सरदार, ५०० स्वारानिशीं, बादशाहाच्या हुजूर चाकरींत हमेश राहील.

५. यासालीं जो ऐवज आम्हास बादशाहांनीं इनाम दिला आहे तो आम्हीं ग्रहण करितों; परंतु पुढें आम्हीं बादशाही दरबारांतून छदाम मागणार नाहीं. बादशाहाचें दरबार पृथ्वीचा मध्य आहे. आम्हीं आपल्या कामांत व बादशाहाच्या सेवेंत हमेष तत्पर राहूं.

माळवा ताब्यांत घेण्याकरितां बाळाजी उत्सुक होता यामुळें, त्यानें आपला विश्वास येण्यासाठीं, बादशाहापाशीं आपल्या सरदारांस जामीन दिलें, हें वर सांगितलेंच आहे. यापुढें पेशव्याच्या स्वाऱ्यांपासून कांहींएक उपसर्ग होणार नाहीं, अशी खातर तसली करण्यासाठीं, मराठ्या सरदारांनीं खालीं लिहिल्याप्रमाणें कबुलायत महंमदशाहास दिली. "आह्मीं राणोजी शिंदे, मल्हारजी होळकर, यशवंतराव पंवार, आणि पिलाजी जाधव स्वदस्तूर लिहून देतों कीं, बाळाजीराव मुख्य प्रधान याणें बादशाहाची नोकरी करणें कबूल केलें आहे, त्यास जर तो यापुढें चाकरी करण्यास मागेंपुढें पाहील तर, आह्मीं त्यास दोन गोष्टी सांगून तसें करूं देणार नाहीं. आणि आह्मी सांगितलें असतांही जर बाळाजीराव चाकरी न करण्याचा हट्ट करील तर, आह्मी सारे पंडित

---

६. जेव्हांजेव्हां सरकारचें गाजी सैन्य बाहेर निघेल तेव्हांतेव्हां, चार हजार स्वारांची टोळी त्या लष्कराबरोबर आम्हीं पाठवूं; परंतु जर ज्यास्ती लोकांची जरूर असेल तर, हुजुरांतून त्यांचा खर्च मिळावा.

७. चंमलनदीच्या पलीकडील जमीदारांपासून, ठरलेल्या पेशकशाखेरीज, एक छदाम आह्मी ज्यास्ती घेणार नाहीं.

८. चंमलनदीच्या पलीकडील मुलकांत कोणाएकाद्या लहानसहान जमीदाराचें शासन करण्यास हुजूर फरमावतील तर, आह्मी चार हजार स्वार तिकडे पाठवूं; व हें लष्कर तें कार्य तडीस नेण्यास हरप्रकार योजील.

९. किलेदार लोकांच्या जहागिरी, व कानगो व मुत्सी लोकांचे हक्क, व इनाम जमीनी, व पेनशनें व धर्मादाय, वगैरे हुजूरच्या देणग्यांमध्यें आह्मीं व्यत्यय आणणार नाहीं. ज्यांज्यांस त्या दिल्या आहेत त्यांणींत्यांणीं त्या उपभोगून, बादशाहीची हमेष बढती व्हावी या हेतूनें दुवा देत असावें ह्मणून, त्या आह्मीं चालवूं.

प्रधानाची चाकरी सोडूं. दाखल्याभावीं हा दस्ताऐवज लिहून दिला असे." हा दस्तऐवज सन १७४२ त, बादशाहाच्या कारकीर्दीच्या चोविसावे वर्षी, तारीख ७ रविलावल रोजीं लिहून दिला.

पूर्वीच्या कांहीं वर्षांवर नजर दिली असतां, वर लिहिलेल्या विचित्र दस्तऐवजाचें आणखीं विचित्रच स्वरूप दिसून येईल. ज्या पेशव्याच्या नेक वर्तणुकीकरितां राणोजी जामीन झाला, त्या पेशव्याच्या बापाचे तो जोडे उचलीत असे; व मल्हारराव होळकर थोड्या वर्षांमागें, दक्षिणेंत आपल्या खेडेगांवीं, बकऱ्यांच्या कळपांमागें हिंडत असे; परंतु काळच राज्यक्रांतीचा; तेव्हां तेच पुरुष प्रतापि सेनाधिपति झाले व त्यांजवळच स्वतंत्र लष्करें राहूं लागलीं. तसेंच खुद्द पेशव्यांच्या स्वार्थांपासून त्यांचे स्वार्थही, दक्षिणेंत, व विशेषेकरून नर्मदेच्या उत्तरेस, स्वतंत्र उत्पन्न झाले. हीं वर्तमानें झाल्यानंतर पुढें, मध्यहिंदुस्थानाच्या इतिहासाशीं, पेशव्यांचा थोडाच संबंध राहतो. तो इतिहास दाखविण्यास पंवार, शिंदे व होळकर या मराठी कुळांचें थोडें थोडें वृत्त दिलें पाहिजे; कारण मध्यहिंदुस्थान जिंकिण्याचें काम या घराण्यांतील मूळपुरुषांकडे सोंपविलें गेलें होतें, व पुढें तो देश त्यांच्याच कबजांत राहिला.

# प्रकरण ४.

## धारकर व देवासकर पंवारांच्या कुळाचें वृत्त.

मराठ्यांच्या पूर्वकाळच्या वृत्तांतांत, पंवारकुलाची गणना प्रतिष्ठित कुलांत आहे. हे मूळचे राजपूत होते. यांच्या जातींतील पुष्कळ लोक, फार प्राचीन काळापासून, माळव्यांत घर करून राहिले होते. तेथून पंवार दक्षिणेंत गेले. दक्षिणेंत पंवारकुलांतील प्रथमपुरुषाचें नांव शिवाजी अढळतें. हा जमीदार होता[1], आणि याचे नातू, संभाजी व काळूजी हे, प्रख्यात शिवाजी राजाच्या चाकरींत लष्करी सरदार होते. संभाजीचे तिघे मुलगे, उदोजी, आनंदराव, व जगदेव, शाहुराजाच्या नोकरींत होते. शाहूच्या कारकीर्दींत उदोजीस बरीच मान्यता मिळाली. त्याजकडे मोठ्या सैन्याचें काम सांगितलें गेलें इतकेंच नाहीं, तर शाहुराजानें व प्रधान बाजीरावानें जीं त्यास पत्रें लिहिलीं आहेत, त्यांच्या धरतीवरून व मतलबावरून असें दिसून येतें कीं, ते त्यास मोठ्या योग्यतेनें वागवीत. हीं पत्रें अझून या कुलांतील पुरुषांपाशीं आहेत.

मध्यहिंदुस्थान जिंकिलें त्यापूर्वीं आठ वर्षें, चौथ व सरदेशमुखी हे स्वाऱ्या करून बसविलेले हक्क, गुजराथ व माळवा प्रांतांत गोळा करण्यास, उदोजीस बाजीरावानें पाठविलें होतें.[2] परंतु पुढें इतराजीच्या

---

१ यांजकडे दक्षिणेंत सुपट, कणगी व कर्णगांव येथील जमीदारी होती.

२ उदोजी गुजराथेंत गेला होता, परंतु त्या प्रांतीं त्याचा चांगलासा पगडा पडला नाहीं. कारण तेथें बांडे व पिलाजी गायकवाड यांणीं सत्ता सुरू केली होती. पिलाजीनें कांहीं झगडा करून सन १७२६ त, दुबय

कारणानें, पेशव्यांनीं त्याची सत्ता हिरावून घेऊन त्यास बंदींत टाकिलें[१]; व त्याचा धाकटा भाऊ जो आनंदराव त्यास, ते या घराण्याचा मुख्य समजूं लागले. माळव्याचा मुलूक, सिंदे, होळकर, व पंवार यांजमध्यें पुढें वांटला गेला, त्यापुर्वी हें वर्तमान झालें, ह्मणून धारच्या संस्थानाचा मूळ पुरुष आनंदराव समजला जातो. या वर्तमानापूर्वीं सातशतकें, ज्या धार शहरांतून पंवारकुळीच्या राजांस घालवून दिलें होतें, तेंच धार शहर, मराठ्यांच्या विजयांमुळें, आनंदराव पंवाराच्या व त्याच्या वंशजांच्या अधिकाराचें मुख्यस्थान झालें. हा विचित्र दैवयोग समजला पाहिजे; परंतु सांप्रतचें पंवारकुल जरी त्याच राजपूत जातींतील आहे तरी, माळव्यांतील प्राचीन पंवारराजांपासून त्याची उत्पत्ति नाहीं.[२] ज्या क्षत्रिय जाति मराठ्यांशीं एकरूप झाल्या, त्यांणीं मराठ्यांच्या सर्व प्रकारच्या राहटी धारण केल्या. त्यांच्या मनाचे कलही मराठ्यांप्रमाणें झाले. पंवारांविषयीं असेंच ह्मटलें पाहिजे. या कुळांतील मुख्य पुरुषांनीं दक्षि-

---

व वडोदा हे दोन किल्ले घेतलेले सोडून देण्यास, व माळव्याकडे परत जाण्यास, उदाजीस भाग केलें. बडोदा शहर येथपासून पिलाजीच्या अधिकाराचें मुख्य स्थान झालें.

१ एक वृत्त असें आहे कीं, उदोजी बंदिखान्यांतून सुटून दक्षिणेकडे पळाला, व तिकडे पुण्याजवळ मुलथान या गांवीं त्याचा विपत्तींत काळ झाला इतकें खरें आहे कीं, यापुढें मराठी इतिहासांत त्याचें नांव कोठें अढळत नाहीं. या गोष्टीमुळें, व उदोजी प्रसिद्धीस आला होता यामुळें, अशा संशयास जागा झाली आहे कीं, बाजीरावाच्या मसलतीनें, व आनंदरावाच्या भीतीनें, उदाजीस अकालीं मरण आलें. आनंदराव, पेशव्यांस जाऊन सामील झाला हेंच, उदोजीस पडताकाळ येण्यास कारण झालें, असें लोक मानितात.

२ सोंतच्या लहानशा संस्थानचे राजे, आपण त्या प्राचीन पंवारांपासून आहों असी अहंता बाळगितात.

णेंत कांहींकांहीं गांवीं पाटिलक्या विकत घेतल्या; व त्यांचे वंशज अझून, त्या देशींच्या आपल्या लहान परंतु प्राचीन हक्कास चाहतात. ही बुद्धि राजपूतराजांपेक्षां, मराठी सरदारांशीं विशेष जुडून आहे. या राहटीवरून, व जे शरीरसंबंध त्यांचे पुढें घडले त्यांवरून पाहतां, पंवारांचें कूळ मराठ्यांत बिलकुल सामील झालें होतें असें दिसतें; तरी मूळच्या उंच जातीमुळें, तसेंच ते पेशव्यांचे नोकर नसतां सातारकर राजांचे नोकर होते अशामुळें, शिंदे व होळकर यांहून आपली पदवी मोठी आहे असा ते दावा करितात; व पंवारकुलांची सत्ता अत्यंत कमी झाली होती तेव्हांही, हर एक मानपानाच्या व बाह्योपचाराच्या ठिकाणीं शिंदे व होळकर, हा दावा कबूल करीत. माजी यशवंतराव होळकर व दौलतराव शिंदे हे तर, एकीकडे पंवारांच्या सत्तेचा अपहार करून त्यांच्या मुलकाची वाताहात करीत असत, व दुसरीकडे त्यांचा आपल्या पेक्षां मोठा मान आहे असें आपण होऊन ह्मणत असत.

सन १७३४त माळवा व गुजराथ या प्रांतांतील वसूलाचा आपला हिस्सा गोळा करण्यास, मराठ्यांनीं आनंदरावास अधिकार दिला. हा अधिकार आनंदरावानें क्वचितच चालविला असेल; कारण पुढच्याच सालीं बाजीराव पेशवा माळव्याचा सुभेदार झाला. माराठ्यांची मतलबी वागणूक कसीही असो; परंतु या तारखेपासून वस्तुतः ते माळव्याचे राजेच झाले. थोडक्याच काळांत आनंदराव धारेस येऊन राहिला. आणि धार प्रांत, व त्याच्या आसपासचे परगणे, व शिवाय कांहीं जवळच्या राजपूत सरदारांचा खंड, इतकें, खुद्द आनंदरावाच्या हाताखालील लोकांच्या उदरपोषणार्थ दिलें गेलें.

सन १७४९त आनंदरावाचा काळ झाला. त्याच्या मागें, त्याचा मुलगा यशवंतराव पंवार, गादीवर बसला. तो पेशव्यांबरोबर उत्तर हिंदुस्थानांत गेला. अफगाणाचा बादशाह अहमदशाह अबदाली याच्या हाताखालील एकत्र जमलेल्या मुसलमानी लष्कराशीं, पेशव्याचा भाऊ सदाशिवराव याच्या हाताखालील मराठी सैन्याचें, पाणीपतच्या मैदानावर जें

युद्ध झालें, त्यांत, जे पुष्कळ प्रसिद्ध वीर पडले, त्या वीरांत, यशवंतरावही पडला.[1] यशवंतराव मारला गेला त्या समयीं त्याचा मुलगा खंडेराव

---

१. यशवंतराव पंवारानें मराठे लोकांत मोठी ख्याति मिळविली होती. जसा शूर तसाच दयाभूत असी त्याची माळव्यांत प्रसिद्धि आहे. या देशांतील लोक त्याच्या कीर्तीच्या दंतकथांचें स्मरण राखितात. माझ्या जवळ ख्यालीराम नांवाचा एक संभावित मुनशी आहे, त्याजकडे कांहीं दिवस वर्षा महालाची वहिवाट होती. त्याणें यशवंतरावाविषयीं खालीं लिहिलेली गोष्ट मला सांगितली. तो ह्मणाला कीं, सरासरी तीस वर्षांमागें, वर्षा महालाचा वंशपरंपरा वतनदार चौधरी, हिंमतसिंग नांवाचा होता. त्याशीं बोलत असतां त्याणें यशवंतराव पंवाराच्या चांगुलपणाविषयीं व त्याच्या अवसानाविषयीं फारच तारीफ केली. हिंमतसिंग ह्मणाला कीं, सदाशिवरावभाऊच्या लष्कराचा तळ वर्षाच्या नदीवर जेव्हां पडला होता तेव्हां, यशवंतरावानें मला व आणखी कांहीं लोकांना तमाशा पाहण्याकरितां त्या सेनापतीच्या तंबूवर नेलें. यशवंतराव मुजरा करावयास आंतील डेऱ्यांत गेला, व मी व आणखी कांहीं जमीदार लोक बाहेरच्या डेऱ्याच्या तोंडाशीं बसलों. इतक्यांत कोणी तिघे मराठे सरदार तेथें आले, व घोड्यांवरून खालीं उतरले. सईस जवळ नसल्यामुळें त्यांणीं मला व आणखी दोघांना घोडे धरावयास सांगितलें, व आपण भाऊच्या आंतील डेऱ्यांत शिरले. इकडे आह्मीं घोडे धरलेच होते. मग यशवंतराव जेव्हां बाहेर आला तेव्हां त्याणें आह्मांस पुसलें कीं, हें काम तुह्मास कोणी सांगितलें? आह्मी झाल्या हकीकतीचें उत्तर दिल्यावर, मोठ्या रागानें यशवंतराव ह्मणाला कीं, माझ्या जमीदारांस घोडे धरावयास लावण्यास कोणाची छाती आहे? असें ह्मणून तो आह्मास ह्मणाला कीं, चढा या घोड्यांवर आणि जा आपल्या घरीं. हे घोडे तुमचे आहेत. आह्मी तत्काळ हुकुमाप्रमाणें केलें. नंतर याविषयीं कोणी चकार शब्दही काढिला नाहीं. ते उत्तम घोडे व त्यांचे सुंदर पोषाक आह्मांजवळ राहिले.

अडीच वर्षांचें लेंकरूं होता. ह्मणून त्याच्या संस्थानाची व्यवस्था माधवराव आवडीकर नांवाचा ब्राह्मण पाहूं लागला. या काळापासून धारचें लहान संस्थान मोडकळीस येऊं लागलें. तें निर्बळ झालें आहे, व त्यांत अव्यवस्था सुरू आहे असें पाहून, माळव्यांतील दुसऱ्या मराठी सरदारांनीं संधि साधिली. यामुळें आतां संस्थानाचा समूळ नाश होतो असाही समय प्राप्त झाला. इतक्यांत, ज्या राघोबादादाचा पक्ष स्वीकारिल्यापासून सर्वांस संकटच प्राप्त झालें, त्या राघोबानें आपलें कुटुंब धारेस आश्रयाकरितां पाठविलें. मग लागलीच प्रतिपक्षाच्या एकत्र झालेल्या लष्करांच्या एका टोळीनें, धारेस वेढा घातला. राघोबाची पत्नी आनंदीबाई नुकतीच बाळंतीण होऊन शेवटच्या बाजीरावास प्रसवली होती. ती किल्ल्यांत होती; ती व तिचा मुलगा युवराज आपल्या हातीं लागावे असा वेढा देणारांचा हेतु होता. खंडेराव उघड रीतीनें राघोबास मिळाला होता, ह्मणून त्याचे प्रांत जप्त झाले होते, ते त्यानें आतां आनंदीबाईस व तिच्या मुलास प्रतिपक्षाच्या स्वाधीन करून खुले करून घेतले. मग बाईस व मुलास कैद करून दक्षिणेंत नेलें.[१] माळव्यांतील महाल खंडेरावास परत देतांना,

---

१. इतक्या लौकर या लेंकराच्या कपाळीं कैद आली याची लोकांस खंत वाटली असेल; परंतु दुर्दैवी नारायणराव पेशवा, मारेकऱ्यांपासून पळून जाऊन, जीव वांचवावा ह्मणून आपल्या चुलत्यास बिलगला असतां, ज्या बाजीरावाच्या दुष्ट व राज्यलोभी आईनें, आपल्या खोलींतून बाहेर येऊन, त्या पोराचे हात सोडवून, राघोबापासून त्यास पलीकडे ढकलून दिलें, तिची कोणास दया आली नाहीं. बहुतकरून सारे मराठे असें मानितात कीं, आपल्यास व आपल्या मुलास गादी असावी असी आनंदीबाईची इच्छा होती. अशा इच्छेनें आनंदीबाई नारायणरावाच्या परिणामास कारणीभूत झाली. राघोबाचें नांव सर्वांस अनिष्टसूचक आहे. सर्वांपेक्षां इंग्रजांस अधिक समजलें पाहिजे. तो स्वभावानें

माधवराव पेशव्यानें ज्या सनदा दिल्या आहेत त्यांत, ते लष्कर राखण्याकरितां सरंजाम करून दिले आहेत असा स्पष्ट उल्लेख आहे.[१] खरोखरीच मराठी राज्यांत, लष्करी सरदारांस मुलूक देणें तो सरंजामीच देत; व ते सरदारही दुसऱ्या तऱ्हेचें देणें मागत नसत. मराठ्यांच्या ढिल्या चालत आलेल्या चालीप्रमाणें, सनद फक्त जरी सरंजामी असली तरी, तिजपासून राज्यापहार करण्यास व्यत्यय येत नसे. खेरीज प्रसंगावर मुख्य सरकार जोरदार असलें तर, सरदार मंडळीस, निमुटपणें तावेदारी कां उचलितां ह्मणून कोणी विचारिल्यास, आह्मीं सरंजामीच आहों असें सांगण्यास, व आपली समजूत करून घेण्यास, बरें असे. हें ही मराठ्यांच्या संवयिशीं जुडून असे. तसेंच दरबारी वसूली कामें, व लष्करी कामें दोन्हींही, वंशपरंपरा चालण्याची चाल चालत आली होती यामुळें, सरंजामी सनदा असतां आपल्या वंशांत मुलूक राहील, (दुसऱ्या सनदांप्रमाणेंच राखवेल

---

फारसा दुष्ट नव्हता, बाइलबुद्ध्या विशेष होता; असें त्याचे स्वदेशी लोक ह्मणतात. तो सर्व आयुष्यभर या धाडसी व दुष्ट बाईच्या मुठींत असे. आनंदीबाईविषयीं कोणाही मराठ्यास, कधींही, संतापाखेरीज व तिटकाऱ्या खेरीज बोलतानां मी ऐकिलें नाहीं.

१. या सरंजामी देणगीची सनद सहज माझ्या हातीं आली, तेव्हां धारचा वकील भ्यालासा दिसला; ह्मणून मी हसलों आणि त्यास सांगितलें कीं, आतां इंग्रज सरकाराशीं जो तह झाला आहे, तोच तुझ्या धन्यास उत्तम तऱ्हेची सनद आहे. पाठीमागील देणगीपासून त्यांचे कसे हक्क आहेत याविषयींची मागची चौकसी होऊं सकत नाहीं, व केली जाणार नाहीं. तो ह्मणाला कीं, मीं असें समजतों; परंतु पुष्कळ सनदांचा अर्थ इंग्रज सरकार अशा तऱ्हेनें करितें कीं, यदाकदाचित् तो अर्थ वास्तविक व उदारबुद्धीनें केला असला तरी, तो अर्थ मराठे करीत त्याप्रमाणें नसतो. अशाविषयीं लोक पुष्कळ गोष्टी सांगतात.

तेथपर्यंत), अशी त्यांची खात्री असे. ज्या नियमसूत्रांच्या धोरणानें त्यांचें राज्य चालत होतें त्यांवरून ते हेंही जाणत असत कीं, ज्यावेळीं आपलें रक्षण आपल्या हातून होणार नाहीं, त्यावेळीं कशीही सनद, कितीही सार्थ असली तरी, आपला नाश झाल्यावांचून राहणार नाहीं.

खंडेराव पंवाराचें, गोविंदराव गायकवाडाच्या मुलीशीं लग्न झालें होतें. गायकवाडाच्या मुलीस एक मुलगा झाला, तो खंडेरावाच्या मरणानंतर सहामहिन्यानें जन्मला. या मुलाचें नांव आनंदराव. हा सतरा वर्षांचा होईपर्यंत आपल्या अजोळीं वडोद्यास असे. नंतर धारेस आला; व जरी पहिल्यानें दिवाण रंगराव आवडीकर त्यास आड आला, तरी अखेरीस तो आपल्या संस्थानाच्या गादीवर बसला.

आनंदराव पंवार परत आला त्या दिवसापासून, धारकर पंवारांचें
सन १७९७. वृत्त पाहिलें तर, दुर्दैवाची माळिकाच दिसते. गेल्या वीस वर्षांत तर, या राजांच्या झगड्याचें स्वरूप, अधिकाराविषयीं जे झगडे असतात त्यांसारिखें नसून, केवळ जीव घेऊन राहण्यासाठीं जे असतात त्यांसारिखें असे. धारेस नागविणारे मुख्यत्वेंकरून होळकर व शिंदे हे दोघे मराठे सरदार होते. आपलें राज्य कायम राखण्याविषयीं व्यर्थ झटून,

१. येथील फिसादी कारभारी रंगराव आवडीकर हा यशवंतराव होळकरास शरण गेला; आणि यशवंतरावानें मोठी मैत्री दाखवून त्याचा सत्कार केला. नंतर एकीकडे रंगरावाचें व त्याच्या धन्याचें ऐक्य करून देण्याविषयीं व्यर्थ बोलणीं लावून, दुसरीकडे धारचा प्रांत यशवंतरावानें लुटून फस्त केला. मग रंगरावानें जेव्हां असें पाहिलें कीं, यशवंतरावाच्या हातून आपले हेतु सिध्धीस जातां दिसत नाहींत, तेव्हां तो दक्षिणेंत गेला; आणि तेथें त्याणें सन १८०७ त धार संस्थानावर हल्ला करण्याविषयीं दौलतराव शिंद्याचें मन वळविलें. शिंद्यानें प्रथम या लहानशा संस्थानापाशीं ३० लाख रुपये मागून सांगून

पाठविलें कीं, तुमचें संस्थान जप्त करण्याविषयीं मला पेशव्यानें हुकूम केला आहे; आणि जर तुह्मी माझें मागणें न कबूल कराल तर पेशव्याचा हुकूम मी अमलांत आणीन. मोठ्या मिन्नतीनें दोन लक्ष रुपये गोळा करून धारवाल्यांनीं त्याच्या हवालीं केले. व आणखीं चार लाखांविषयीं, कोठ्याचा खंड यावयाचा होता त्यावर, वरात लिहून दिली. आवडीकराच्या वदनियतीनें या संस्थानाचें जें नुकसान झालें त्याचा वर सांगितलेला एक अंश आहे. या कारभाऱ्याच्या निर्वाहासाठीं, अगर, व सुनेल हे परगणे दिले होते ते, त्यानें शिंद्याच्या स्वाधीन केले. आणि शिंद्यानें तर आनंदरावाच्या संस्थानांतून बहुतक

सन १८०५. भाग हिसकून घेईपर्यंत आरंभिलेलें वितुष्ट कमी केलें नाहीं. हारावतीमधील धारचा मुलूक त्याणें जबरदस्तीनें ताब्यांत घेतला; व त्याच्या सरदारांपैकीं जंगोबापू नांवाच्या सरदारानें, धारेवर दुसऱ्यानें स्वारी करून बरीच रोख रकम उकळिली. पुढें दोन वर्षांनीं, आणखीं एका संभाजी जुगा नांवाच्या सरदारानें या मोडकळीस आलेल्या संस्थानाशीं युध्य मांडिलें, व बदनावर येथें लढून त्याणें तो प्रांत आपल्या

सन १८७०. ताब्यांत घेतला. असें करण्याचें कारण, शिंदे पाऊणलाख रुपये मागतात ते द्या ह्मणून कळविलें. आपला प्रांत पुनः आपल्या कबज्यांत आणावा या हेतूनें, आनंदरावानें ही रकम कशी तरी गोळा करून त्याच्या हवालीं केली; परंतु ही खटपट चालली आहे तोंच तो दुर्दैवी राजा मरण पावला. हें वर्तमान घडून आल्यामुळें जी धांदल उडाली त्या धांदलींत, शिंद्यानें वाहणा करून पैकाचा पैका व परगणाचा परगणा दाविला. आनंदरावाची एक बहीण फार दुष्ट व व्यभिचारी होती, तिणें त्यास विषप्रयोग केला असें ह्मणतात. तिचा हेतु असा होता कीं, कोणी पोर आपण दत्तक घेऊन गादी चालवावी. हा हेतु मनांत बाळगिला असेल तर, तिची पूर्ण निराशाच झाली.

तिला आतां त्याचा अधिकार चालविणें भाग आलें.' ही राजपत्नी आपल्या नवऱ्याच्या अंतकाळीं गरोदर होती. यशवंतराव पंवाराचा

---

आनंदराव मेल्यानंतर थोडक्याच दिवसांत तिला, व तिला सामील होते असा ज्यांवर संशय आला त्यांना, पकडून ठार मारिलें.

हीं वर्तमानें चाललीं असतां, 'पंवारांचा बर्षा परगणा मीरखानानें आपल्या ताब्यांत घेऊन, करीमखान पेंढाऱ्याच्या स्वाधीन केला. यानंतर कांहीं वर्षांनीं, ताळ व मंडावळचे परगणे यशवंतराव होळकरानें हस्तगत करून, गफूरखानास लष्कराच्या निर्वाहासाठीं सरंजामाऐवजीं दिले. याप्रमाणें माळव्यामधील धारचा मुलूक, सर्व तऱ्हेचे लुटारू लोक तोडतोडून घेत असतां, या सर्व संकटांचें मूळ जो आवडीकर दिवाण, त्याणें आनंदरावाशीं कांहीं दिवस मिलाफ दाखवून, व धारेस राहून, पुनः पुण्याकडे पाय काढिला. तेथें धारवाल्यांचे दक्षिणेंतील गांव हिसकावून घेण्याविषयीं बाजीरावाचें मन वळवून, त्याणें आपल्या राजाचा पुरा नाश केला.

रंगराव आवडीकर अझून जिवंत आहे, व तो पुण्यास राहतो. तो कर्त्ता पुरुष आहे असें ह्मणतात; व जोंपर्यंत धारचें कामकाज केवळ त्याच्याच द्वारें चाले, तोंपर्यंत संस्थान चांगलें चाललें होतें. त्याचा हेतु असा होता कीं, आनंदरावानें आपल्या आईसह बडोद्यासच रहावें; परंतु आनंदराव सत्रा वर्षांचाच होता तरी स्वभावानें तलख होता. तो एकाएकीं चेतला व तावडतोब आपल्या राज्यांत आला. यामुळें दिवाणाशीं त्याचें फाटलें. नंतर राज्यलोभाधीन होऊन, ज्या संस्थानावर आतां आपला अंमल चालत नाहीं, त्या संस्थानाचा नाशकरावा, अशा कुटिल बुध्धीनें हा दिवाण लोकांस मदत देण्यांत आनंद मानी. नुकताच यानें, पुणे प्रांतीं धारवाल्यांचे असलेले लहान सहान वंशपरंपरा चालणारे हक्क, आपल्या उदरनिर्वाहाकरितां इनाम दिले आहेत असें कपटानें सांगून, हिसकाविण्याचा यत्न मांडिला होता. परंतु त्यांत त्यास यश आलें नाहीं.

१. मीनाबाई, गोविंदराव गायकवाडाच्या गहिनाबाई नांवाच्या बायकोची भाची होती. गहिनाबाई बरीच कर्ती बायको असे. पुष्कळ वर्षेंपर्यंत बडोद्याच्या दरबारीं तिचें प्राधान्य असे.

मुरारीराव या नांवें करून एक दासीपुत्र असे. त्याणें धार येथें आपला एक पक्ष उभा केला होता. या मुरारीरावाच्या मसलतीपासून भीति वाळगून, मीनाबाई मांडव येथें गेली; व तेथें ती रामचंद्रराव पंवार या पुत्रास प्रसवली. या गोष्टीपासून तिच्या पक्षास जोर आला. धार किल्ल्याचा किल्लेदारही तिच्याशीं एकनिष्ठपणानें वागला. यामुळें मुरारीरावास कपटप्रयोग करणें भाग आलें. तावेदारीच्या व भक्तिभावाच्या त्याच्या बोलण्यांनीं, धारेस येण्यास मीनाबाईचें मन वळलें. परंतु तेथें आल्यावर तीस किल्ल्यांत न जाऊं देतां, गांवांतच रहाण्यास मुरारीरावानें भाग केलें; व तेथें तावडतोब त्याच्या पक्षानें तिच्या सभोंवती वेढा घातला. ज्या घरांत ती व तिचे अनुयायी होते त्या घरास, आग लावून देण्याचा सुद्धां त्यांणीं यत्न केला, परंतु अशानें होष सोडणारी बायको मीनाबाई नव्हती. हा इकडे झगडा चालला असतां तिणें आपलें मूल एका कुणब्याच्या बायकोस देऊन, तिचें आपल्याजवळ ठेविलें; व युवराजास किल्ल्यांत पोंचीव ह्मणून त्या बाईस सांगितलें. रात्र साधून त्या बाईनें तसें केलें.[1] जेव्हां ही वातमी मुरारीरावाच्या कानांवर गेली तेव्हां, तो याचा मी सूड उगवीन अशी तंबी देऊं लागला. परंतु त्या हर्ष पावलेल्या आईनें सांगितलें कीं, तूं वाटेल तसा मजवर राग काढ. त्याची मला

१. संन १८१८ च्या डिसेंबर महिन्यांत मी धारेस होतों तेव्हां, खुद्द मीनाबाईनें मजपाशीं या गोष्टीचें मोठ्या आवीर्भावानें वर्णन केलें. तें ऐकून मी फार खुश झालों. ती ह्मणाली:—बापूरघुनाथ वगैरे मंडळी तुमच्या जवळच आहे त्यांना विचारा कीं, ज्या घरांत मी होतें त्या घरास आग लाविण्याची अगदीं सिद्धता झाली होती तेव्हां, त्यांणीं मला काय सांगितलें ? तुह्मीं पळून जा ह्मणून त्यांणीं माझी पुष्कळ विनवणी केली; परंतु मी उत्तर केलें कीं, पळून न जातां येथेंच रहावें यांत माझी अब्रू आहे, ह्मणून मी येथेंच राहणार. जर कदाचित् माझ्या शत्रुचा हेतु सिद्धीस गेला तर, कैलासवासी भ्रताराशीं सती जावें हें योग्य होतें, तसेंच सती गेल्यें ह्मणून समजेन.

क्षिति नाहीं. पंवारांच्या गादीचा मालक जो राजपुत्र, तो तुझ्या कबजा-बाहेर गेला इतकें बस आहे. मीनाबाईनें किल्लेदारांस सांगून पाठविलें होतें कीं, माझें काय होईल याची काळजी न करितां, तुह्मी शेवटपर्यंत मुलाचें संरक्षण करावें. आतां धारेचा किल्ला घेण्यास्तव मुरारीरावानें यत्न मांडिला, परंतु तो सिद्धीस गेला नाहीं. मग इतक्यांत, मीनाबाईची सोडवणूक करण्यास गुजराथेंतून कांहीं स्वारांचा जमाव येत आहे, असें त्याच्या कांनीं जाऊन त्याणें पलायन केलें. आपल्या संस्थानाचा हा शेवट-चा बाणीचा प्रसंग आहे असें जाणून, या राज्य चालवित्या राजपत्नी-नें सर्वांपाशीं मदत मागितली होती. आपल्या घराण्यास नागविणारांमध्यें शिंदा प्रमुख होता तथापि, धार येथील गादीच्या खऱ्या मालकाचा नाश न होऊं देण्याविषयीं, तिणें शिंद्यासही प्रार्थिलें होतें. वडोद्याच्या रसिदंट मार्फत, ती इंग्रज सरकारचें असें आर्जव करूं लागली होती कीं, तुह्मीं मध्यें पडून संस्थानाचें संरक्षण करा; परंतु त्यावेळीं मध्यें पडण्याची, शिंद्यास व इंग्रजास दोघांसही, सोय नव्हती. व त्यांच्या मसलतीचा रोख-ही तसा नव्हता. अखेर तिच्या विनवणी ऐकून, व तिचावर प्रसंग कसा आहे, व तशा प्रसंगांत धीर न सोडितां ती कसे यत्न करीत आहे हें पाहून, गुजराथेंतील तिचे सोयरे धायरे व इष्टमित्र येथपर्यंत वळले कीं, त्यांणीं तिच्या मदतीसाठीं सखाराम चिमणाजीस कांहीं सैन्य देऊन रवाना केलें.[1]

ही कुमक पाठविण्यांत, धारसंस्थानाचें रक्षण व्हावें व नाश होऊं न-ये असा गायकवाडांचा उघड हेतु होता खरा. परंतु त्यांचा आंतून असा ही हेतु होता कीं, त्या संस्थानानें अखेरीस आपल्या वशिल्याखालीं राहावें. शिवाय ज्यांनीं या स्वारीची योजना केली होती, व ज्यांची त्या

---

१. सखाराम चिमणाजी हा, त्या वेळेस वडोद्यास सीतारामपंत ह्मणून कारभारी होता, त्याचा भाऊ असे. मीनाबाईची आत गाहिनाबाई ह्मणून होती, तिणें आपलें वजन खर्चून सखारामपंतास तिच्या मदतीस पाठविलें.

स्वारीवर योजना झाली होती, त्यांस हें एक जातखतनफ्याचेंच कलम वाटलें होतें. ही शेवटची मसलत सारी फसली. तादृश लाभ न होतां उलटें या लोकांस कर्ज मात्र झालें. सखागमपंत मृत्यु पावला, व त्याच्या जागीं बापूरघुनाथ नांवाचा त्याचा कामदार झाला. बडोद्याच्या दरबाराचे हेतु सिद्धीस नेण्यांत जरी बापूरघुनाथ घसरला, तरी त्याणें आपल्या कुवतीनें व चपळतेनें धारेचें लहानसें संस्थान कायम राखिलें. त्यास मीनाबाईचा भरवसा व धैर्य यांपासून मदत मिळाली. होतांहोतां अखेर तो राज्यक्रांतीचा अनायासें दिवस आला कीं, ज्या दिवशीं पहिल्यापेक्षां धारचें राज्य जरी लहान झालें तरी, त्या राज्यास, पूर्वी कधींही प्राप्त झाली नव्हती अशी चिरकाळ राहणारी निर्भयता व शांति प्राप्त झाली.

या राज्यक्रांतीचें वृत्त थोडक्यांत आहे. शेवटल्या कांहीं वर्षेंपर्यंत, धारच्या गादी करितां मीनाबाई व तीचे गुजराथेंतील इष्टमित्र, मुरारीरावाशीं झगडत होते; व आपल्या सैन्याचा निर्वाह व्हावा म्हणून आसपासच्या राजपूत सरदारांच्या मुलकांत स्वाऱ्या करीत होते. कारण खुद्द धारचा मुलूक वैराण झाला होता, व त्यापासून सारखा नियमानें वसूल मिळत नसे. तेव्हां इतरांप्रमाणें मीनाबाईच्या लोकांसही लुटालूट केल्याखेरीज गत्यंतर नव्हतें.

आनंदरावाचा मुलगा लवकर मृत्यु पावला, परंतु मुलाच्या आईनें हिंदुशास्त्राच्या आधारानें, व आसपासच्या राजेरजवाड्यांच्या संमतीनें, लागलाच आपल्या वहिणीचा मुलगा दत्तक घेतला; व त्याचें रामचंद्रपंवार नांव ठेवून त्यास गादीवर बसविलें.[1] रामचंद्रपंवार वयानें, मीनाबाईच्या मुलाच्या बरोबरीचाच होता.

नानाप्रकारचीं स्थित्यंतरें होऊन, मुरारीरावास शेवटीं देशत्याग

---

१. दवलतराव शिंदा व यशवंतराव होळकर या दोघांनींही दत्तक घेण्याविषयीं संमति दिली.

करावा लागला; व त्यानंतर तो लवकरच मृत्यु पावला. नंतर मुजफ्फर नांवाच्या एका मकराणी सरदारानें, धार संस्थानापासून कुक्षीचा परगणा बळकाविला. अलीमोहनचा प्रांत, जो गुजराथ व धार यांमध्यें आहे, तेथें या सरदारानें आपलें ठाणें दिलें होतें; व तो या संस्थानास व अशाच दुसऱ्या लहानसहान संस्थानास भेवडावणारा झाला होता. वस्तुतः त्यांस नागवून तो आपला उदरनिर्वाह करीत असे. सखारामपंतावरोबर आलेली गुजराथेंतील कुमक आतां बहुतेक परत गेली; व शिंद्याचीं पलटणें जबरदस्तीनें वसूल घेण्यास धारच्या मुलकांत शिरलीं. शेवटल्या पांच वर्षांत धारचा प्रांत, पेंढारीलोक, व होळकरांच्या लष्करांतील निरनिराळे सरदार लोक, यांच्याही स्वाऱ्यांस विषय झाला होता.

१८१७. इंग्रज सरकाराचें लष्कर ज्या सालीं माळव्यांत शिरलें त्या सालाच्या सुरूंत, रामचंद्ररावपंवाराच्या कबजांत फक्त एक धार गांव मात्र राहिला होता; व एकंदर संस्थानाचें उत्पन्न ३५००० रुपयांवर नव्हतें. परंतु जोंपर्यंत मीनाबाई व तिचा दत्तक पुत्र किल्ल्यांत होते तोंपर्यंत, आठ अथवा नऊ हजार अडदांड लष्कर घेऊन, बापूरघुनाथ डोंगरपुरापासून नेमावरपर्यंत मुलूक, लुटून करभार हांशील करी. इंग्रज सरकारच्या सैन्याच्या येण्यानें जी संधि साधली, ती धारवाल्यांनीं गमाविली नाहीं. ऐन प्रसंगावर त्यांणीं दौलतराव शिंद्यास आठवण दिली कीं, बदनावरचा परगणा जबरदस्तीनें तुह्मी घेतला; त्याजबद्दल मागितलेला पैसा दिला असतांही, तुह्मी सोडीत नाहीं, हा मोठा अन्याय आहे. पेंढाऱ्यांच्या करीमखां नांवाच्या सरदारापासून बर्षाचा परगणा परत हस्तगत करण्याकरितांही त्यांणीं त्याची मदत मागितली, व त्यास असीही सूचना केली कीं, जर तुह्मी आमचें मागणें न द्याल तर, इंग्रजसरकार आतां हिंदुस्थानांत प्रमुख होऊन सर्वांचें मध्यस्थ झालें आहे, त्याजपाशीं आह्मास इनसाफ मागण्यास जावें लागेल. त्यावेळीं इंग्रजसरकाराकडे धारवाल्यानीं फिर्याद जावें असें ग्वालेरचें दरबार चाहत नव्हतें. ह्मणून दवलतरावानें बदनावरचा परगणा परत दिला,

आणि वर्षाचा परगणा परत आणण्याविषयीं आपलें वजन खर्चूं असें वचन दिलें. परंतु वर्षाचा परगणा पेंढाऱ्यांनीं व्यापिला होता यामुळें, तो इंग्रजांच्या लष्करांनीं प्रथमच काबीज केला होता. त्यांणीं तो धारच्या गादीकडे लावून दिला. प्रस्तुत धारवाल्यांचें इंग्रजसरकारानें असें संरक्षण केलें आहे कीं, वाताहात झालेला त्यांचा मुलूक इतक्यांतच पुनः व्यवस्थेप्रत व शांतीप्रत पावला आहे.

धारच्या लहानशा संस्थानांतील वसूलाचा पुढें उल्लेख करूं.

राजा रामचंद्रराव पंवार बारा वर्षांचा सुंदर मुलगा आहे. राज्य चालविणारी मीनाबाई, जरी संसारांतील सुखदुःखाच्या निरनिराळ्या स्थिति पाहून अनुभवलेल्या वृद्ध बायांसारिखी झाली आहे तरी, वयानें अझून तरुण आहे; व ती इंग्रजसरकारच्या उपकारांचें अत्यंत कृतज्ञता बुद्धीनें स्मरण करिते. कारभारी बापूरघुनाथ हा, दोन वर्षांमागें देश लुटून फस्त करण्यांत, व सर्वत्र शांति नाहींशी करण्यांत जसें औत्सुक्य व सामर्थ्य दाखवी, तसेंच आतां आबादी करण्यांत व शांतता राखण्यांत दाखवीत आहे. या चंचळ व बुद्धिवान् पुरुषास, जेव्हां त्याच्या पूर्वींच्या कर्माविषयीं, मी टपका दिला, व ८०० मनुष्यांस पोट भरण्यास पुरे इतका वसूल नसतां, तुह्मी कोणत्या तऱ्हेनें ८००० मनुष्यें गोळा केलीं, व नोकरींत राखिलीं ह्मणून विचारलें तेव्हां, त्याणें चटकन[1] जाब दिला कीं, दूर दृष्टि देऊन कसा तरी झगडा चालू राखून संस्थानावरचा हक्क कायम राखिला, या करितां झालेलें वृत्त पाहून तुह्मी मला दोष लावूं सकतां काय? आह्मी लुटारू ठरलों होतों त्यास, माळव्यांत लुटारू लोकांखेरीज दुसरे लोकच तेव्हां नव्हते. आमच्या लहानशा संस्थानाचे कसे तरी दिवस लांबविण्यास, जो आह्मी उपाय योजिला होता तोच मात्र ठीक होता. दरसाल आह्मी अशी उमेद बाळगून होतों कीं, या प्रांतावर जीं संकटें पडलीं आहेत, त्यांची अखेर कडे लोट होऊन, त्यापासू-

१. माझी व बापूरघुनाथाची प्रथमच जी मुलाकत झाली तींत त्याणें हें उत्तर केलें. तें मी टिपून घेतलें आहे.

न कांहीं तरी मोठा फेरफार घडून येईल. तो फेरफार हल्लीं घडून आला आहे. आतां आमच्या पुढील वर्त्तणुकीपासून तुह्मी इनसाफ करा कीं, जे दुर्दिन पूर्वी आमच्या दैवीं आले होते, त्यांपेक्षां विशेष सुदिनाचा उपभोग घेण्यास आम्ही योग्य आहों अथवा नाहीं.

देवासकर पंवारांचा मुलूक फार लहान आहे तरी, ते उंचपदवीचे सरदार आहेत; व त्यांच्या अधिकाराची विचित्र तऱ्हा आहे. यामुळें त्यांचें थोडेंसें वर्णन करणें योग्य आहे. जो मुलूक ते अजून उपभोगितात तो प्रथमतः दोघां भावांस दिला गेला होता; एका शतकापेक्षां अधिक काळ, त्यांचे वंशज त्या मुलकीं, बरोबर हिस्सेरश्शीनें वसूल गोळा करीत व अधिकार चालवीत आले आहेत.

पूर्वीं सांगितलेंच आहे कीं, शिवाजी पंवारास संभाजी व काळूजी असे दोघे नातू होते.[1] संभाजी हा धारच्या राजांचा पूर्वपुरुष. काळोजीस दोन पुत्र, तुकोजी व जिवाजी. हे दोघेही बाजीरावाबरोबर माळव्यांत आले, आणि पुढें जेव्हां हा देश विभागला गेला तेव्हां कित्येक परगणे त्यांस मिळाले.[2] यानंतर या घराण्यास बुंदेल खंडांत एक हमरपुराचा परगणा, व उत्तरहिंदुस्थानांत एक कुंडल्याचा परगणा, असें इनाम मिळालें. हे दोन्हीं परगणे आतां त्यांच्या कबजाबाहेर गेले आहेत. बाकीच्या परगण्यांवर जरी वारंवार स्वाऱ्या झाल्या, व त्यांचा वेळेविळीं लोकांनीं अपहार केला तरी ते, त्यांच्याचकडे या वेळीं चालत आहेत. वस्तुतः देवासवाले प्रत्येक राज्यक्रांतीचें एक खेळणें ठरले होते. त्यांचा मुलूक मध्यहिंदुस्थानांतील अत्यंत पीडितभागांत असून, लष्कर ठेविण्याचें अंगीं सामर्थ्य नसल्यामुळें, केवळ शिंदे व होळकर यांचींच दरबारें त्यांस लुटीत व गांजीत असें नाहीं; तर पेंढाऱ्यांचे

---

१. देवासकर पंवारांनीं आपल्या कुलाची एक बखर मला दिली आहे त्यांत काळोजी वडील भाऊ असें लिहिलें आहे.

२. काळोजीच्या पुत्रास प्रथम दिलेले परगणे देवास, सारंगपूर आणि अलोट.

सरदार वगैरे त्या वेळचे हरयेक लुटारू लोक तसें करीत. गेल्या पंचवीस वर्षांत त्यांचें बारीक वृत्त पाहिल्यास, असें आश्चर्य होतें कीं, ते कायम तरी कसे राहिले? व त्यांच्या खेडे गांवांत वस्ती तरी कसी राहिली? पूर्वीं जें कांहीं माळव्यांत त्यांच्या अधिकाराखालीं होतें तें सारें हल्लीं त्यांस परत दिलें गेलें आहे.[१]

देवासच्या प्रथम पुरुषांत कज्जाखोकला झाल्यानें, जमीनी व खेडींपाडीं विभागलीं गेलीं; परंतु मूळचें अधिकारांतील ऐक्य त्यांच्या वंशजांच्या वेळीं पुनः सुरू झालें. हल्लीं वडीलकुळांतील तुकाजी राजा हा, प्रथम मिळवित्या तुकाजीचा नातू आहे; व धाकटच्या कुळांतील आनंदराव हा, जिवाजीच्या नातवाचा दत्तपुत्र आहे. दरबारांतील मानपानांच्या प्रसंगीं कोणास कसें वागवावें हें समजण्याकरितां, त्यांच्या परस्पर संबंधाची मी पुष्कळ चौकशी केली; तेव्हां त्यांच्या एका कामगारानें हसून सांगितलें कीं, एखाद्या किरसानानें एक लिंबू नजर आणिलें तर त्याच्या बरोबर दोन फांका करून आमच्या दोघां राजांस दिल्या पाहिजेत. मला लौकरच असें दिसून आलें कीं, जरी उभयतां राजे जातखत एकमेकांशीं बरे होते, तरी त्यांच्या कामगार. मंडळींत वारंवार तंटेबखेडे होत. ह्मणून त्यांच्या बऱ्याकरितां व्यवस्था करितांनां मी मुख्य पाया हा घातला कीं, त्याणीं दोघांनीं एक समाईक कारभारी नेमावा. या गोष्टीस ते कबूल झाले. आणि मग त्या हुद्यावर एका जुन्या अब्रूदार नोकराची नेमणूक केली. हें एक त्यांच्या राज्याची सुधारणा होण्यास मोठें कारण झालें आहे.[२]

१. सारंगपूर शिंद्यांनीं ओढून घेतलें होतें ते, त्यांणीं पढाऱ्यांशीं झालेल्या युद्धाच्या शेवटीं, देवासवाल्यांस परत दिलें. माळव्यांतील त्यांचा बाकीचा मुलूक जरी उद्ध्वस्त झाला होता तरी, तो कोणी बळकाविला नव्हता.

२. एका पातीचा वंश परंपरा कारभारी, तूर्त पोरवई असल्यानें असी व्यवस्था सहज करितां आली.

# प्रकरण ५.

## शिंद्याचें कुल.

शिंद्याचें घराणें जातीनें कुणवी ह्मणजे शूद्र आहे. या कुळांत प्रथम, राणोजी नांवाचा पुरुष, शिपाईगिरी करून, मोठी प्रसिद्धि पावला. बाळाजीविश्वनाथाच्या नोकरींत शिरण्यापूर्वी, वांई परगण्यांत, कुमरखेड येथील पाटिलकीच्या वंशपरंपरा चालत आलेल्या अधिकारावर, तो होता. बाळाजीच्या मरणानंतर, त्याचा मुलगा जो बाजीराव-बल्लाळ त्याची, राणोजीनें कायम नोकरी पतकारिली. राणोजीकडे हलकें जोडा उचलण्याचें काम होतें खरें, परंतु हिंदुस्थानांत राज्याच्या मुख्य दिवाणापाशीं कोणत्याही पेशानें हुजूर राहणें, यांत अब्रू मानिली आहे. हुजूर राहिल्यानें अत्यंत कनिष्ठ स्थानापासून अत्यंत उंच पायरी त्वरित प्राप्त होते, अशीं वारंवार उदाहरणें दिसून आल्यामुळें, प्रतिष्ठित लोकही अशा जाग्यांचा शोध करीत; आणि असा संभव होतो कीं, कुमरखेडचाचा पाटील, प्रथमतः बाळाजीविश्वनाथाचा हुजऱ्या झाला यांत तो, गरीबीमुळें वर्तला नाहीं; तर राज्यलोभामुळें वर्तला. तथापि राणोजीचा उदय प्रसंगानें घडून आला इतकेंच. असें ह्मणतात कीं, शाहूराजाशीं फार वेळ मसलत करून बाजीराव एके दिवशीं

१. कपतान स्टयूअर्ट, शिंद्याच्या दरबारांतील ऍक्टिंगरसिदंट याणें तारीख ३ सप्तंबर १८१९ रोजीं लिहिलेल्या पत्रावरून वर सांगितलेल्या गोष्टीस पुरावा मिळतो. क्याप्टन् स्टयूअर्ट लिहितो कीं, "बढती झाल्यावर, राणोजी, पेशव्यांच्या जुना जोडा, सावधगिरीनें एका पेटींत घालून आपल्या जवळ बाळगी, असें लोक सांगतात. आपल्या उत्कर्षास हे जोडे कारण असें मानून, त्यांच्या ठिकाणीं त्याची देवतेसारिखी पूज्य बुद्धि होती; ती कधीं कमी झाली नाहीं.

बाहेर आला; आणि पाहिलें तों राणोजी आपले जोडे दोहों हातांत वळकट धरून उरावर ठेऊन उलथा निजला आहे. जोड्यासारख्या लहान वस्तूची राणोजीनें अत्यंत सावधगिरी ठेविली ही गोष्ट बाजीरावाच्या मनावर वळकट ठसली. मग आपण बहुत संतुष्ट झालों असें बोलून दाखवून त्यानें तात्काल राणोजीस पागेंत असामी दिली. अशा महत् उपकार करण्याच्या प्रेरणा, बाजीरावासारिखे जे लोक सत्तेचा उपभोग घेतात, त्यांस वारंवार होत असतात. या काळापासून राणोजी त्वरित वाढला. व बाजीराव जातीनें माळव्यांत आला तेव्हां तर, तो मराठी सरदारांतील अग्रगण्यांत आहे, व आपल्या धन्याच्या नेक वर्त्तणुकीसाठीं महंमदशाह बादशाहास लिहून दिलेल्या जामीनकदब्यावर आपली सही घालीत आहे, असें दिसतें. राणोजी मोठ्या छातीचा व चालाख शिपाई होता. आद्याबाहेर त्याचा खर्च असे, व मल्हारराव होळकराचें त्याजवर बरेंच कर्ज असे. मल्हाररावाचा व त्याचा निकट स्नेह जडला होता. तो माळव्यांत मृत्यु पावला; आणि सुजालपुराजवळ राणागंज नावाचें एक लहानसें खेडें आहे तेथें, त्याचें दहन झालें.

राणोजी शिंद्याचें, दक्षिणेंत असतां एक लग्न झालें होतें. त्याच्या बायकोचें नांव मीनाबाई. जयाप्पा, दत्ताजी, आणि जोतीबा असे तीस तिघे पुत्र झाले; त्यांपैकीं जयाप्पा व दत्ताजी पुढें प्रसिद्ध वीर झाले.[१] याखेरीज राणो-

---

१. माळव्यांत सर्वांपूर्वीं ज्या मराठ्यांच्या स्वाऱ्या झाल्या त्यांत, जयाप्पा कामगिरीवर असे. दोन बरे, दोन वाईट दिवस भोगून, अखेर दोघां राठोड राजपूतांच्या हातून, नागपूर येथें जयाप्पा मारला गेला. या राजपूतांस जोतपूरचा राजा बिजासिंग यानें या कामगिरीवर पाठविलें होतें. बिजासिंगाशीं लढण्यास जयाप्पा जात होता. दत्ताजी, रघुनाथरावाबरोबर उत्तरेस लाहोरपर्यंत फत्ते करीत गेला होता. त्याचा दिल्लीजवळ रदवर गांवाच्या मैदानांवर पराजय झाला, व त्या लढाईंत तो पडला. जोतीबा, जो साऱ्यांत धाकटा भाऊ तो, हिंदुस्थानांत डिग-किल्ल्याजवळ कुंभेर गांवीं मेला.

जीस एका माळव्यांतील रहाणाऱ्या राजपूत स्त्रीपासून दोघे मुलगे झाले. त्यांचीं नांवें तुकाजी व महादाजी. हा महादाजी गादीचा मालक झाला[१]. त्याचे स्वभाव गुण लवकरच प्रसिद्धीस आले, व हक्क नसतां जरी तो गादीवर बसला तरी, त्यास कोणीं आड आलें नाहीं. पाणीपतच्या लढाईत तो हजर होता. दाणादाण झाल्यानंतर, त्या रणांगणापासून पलायन करीत असतां, एका अफगाणानें त्याची पाठलाग केली; व त्यास गांठून आपल्या हातांतील खड्गानें त्याच्या उजव्या तंगडीवर त्याणें असा बळकट घाय केला कीं, आजन्मपर्यंत त्या तंगडीचा महादाजीस उपयेग नाहींसा झाला. अशा प्रकारें जखम करून, व महादाजीच्या आंगावरील कांहीं दागीनें ओरबडून घेऊन, व त्याची बसावयाची घोडी हिसकावून घेऊन, त्या अफगाणानें त्यास नशीबाच्या स्वाधीन केलें. या अवस्थेंत असतां, राणाखान या नांवाच्या एका भिस्त्यानें त्यास ओळखिलें, व आपल्या बैलावर बसवून दक्षिणेकडे नेलें. राणाखानही रणापासून परागत झालेल्या लोकांपैकींच होता[२]. या पाठलागाची हकीकत महादाजी वारंवार सांगत असे. ज्या अफगाण स्वारानें त्यास आपला भक्ष योजिलें होतें तो स्वार, एका टाकणचाल चालणाऱ्या मजबूत घोड्यावर होता; व महादाजी एका सुंदर दक्षणी

१. जयाप्पास जनकोजी नांवाचा मुलगा होता. हा राणोजीच्या मरणानंतर गादीवर बसला; परंतु बसल्यानंतर लागलाच पाणीपतच्या लढाईंत त्याचा अंत झाला.

२. हे उपकार स्मरून महादाजीनें राणाखानास चांगलें बक्षीस दिलें. राणाखानास यापुढें, भाई, ह्मणजे महादाजी शिंद्याचा भाऊ, असें ह्मणूं लागले. त्यास लष्करांतील अव्वलप्रतीचे हुद्दे मिळाले व आणखीही कृपांचा त्यावर वर्षाव झाला. त्यास दिलेल्या जहागिरींतून अझून कांहीं, त्याच्या नातवाकडे चालू आहेत. हा नातू तरुण परंतु गयाळी आहे.

घोडीवर होता. त्या दक्षणी घोडीनें त्यास प्रथमतः शत्रूच्या बरेंच पुढें नेलें; परंतु मग जेव्हांजेव्हां महादाजी अमळ दम घेण्यास उभाराही, (मग कितीही थोडा काळ असो), तेव्हांतेव्हां त्याचा शत्रू विश्राम न घेतां, टाकण चालीवर चालला येतच आहे असें दिसे. अखेर घोडी दमून एका खंदकांत पडली. नंतर अफगाणानें त्यास पकडलें, जखमी केलें, व तोंडावर थुंकून सोडून दिलें. मयत जनरल पामर, महादाजीच्या दरबारीं इंग्रज सरकारचा रेसिडेंट असे, त्यास तो ह्मणे कीं, त्या अवस्थेचा माझ्या कल्पनेवर असा मजबूत ठसा उमटला होता कीं, पुष्कळ दिवसपर्यंत, निजलों तरी स्वप्नांत देखील, माझ्या मागें व माझ्या सुंदर दक्षणी घोडीमागें, तो अफगाण आपल्या अवडधोवड घोड्यावर बसून लागला आहे असें मी पाहीं.

पाणीपतच्या मैदानावर वांचलेले मराठे दक्षिणेकडे पळून गेले; आणि कांहीं काळपर्यंत, त्या प्रलयाच्या परिणामापासून, मराठ्यांचे हातपाय गार पडल्यासारिखे झाले.[१] परंतु अहमदशाह अवदाली लवकरच काबुलास परत गेला, व जिकडेतिकडे तुटातूट झालेल्या दिल्लीच्या निरनिराळ्या प्रांतांकरितां, मुसलमानी उमराव आपआपसांत झगडूं लागले. यामुळें पुनः मध्यहिंदुस्थान आपल्या कबजांत आणण्यास, व उत्तरहिंदुस्थानभर आपली सत्ता पसरण्यास, मराठे समर्थ झाले.

शिंद्याचा, व तसाच दुसऱ्या मराठी सरदारांचा माळव्यांतील व उत्तर-

---

१. या लढाईसारिखी कत्तल पूर्वीं थोड्याच लढायांत झाली असेल. यावेळीं मराठ्यांचे निदान दोन लक्ष लोक नाहींसे झाले असा अंदाज आहे; पैकीं निमे तर रणांगणीं पडले. या पेक्षांही व्यवहारादि विधींत विशेष महत्वाचे परिणाम झाले. या युद्धाकरितां मराठ्यांचीं लष्करें नर्हूकडून गोळा झालीं होतीं; व कांहीं काळ हा, आपला पराजय काय तर आपला सर्व नाशच झाला, असें त्यांस भासलें.

हिंदुस्थानांतील मुलूक, पाणीपतच्या लढाईमुळें गेला; परंतु महादाजी, आतां बाळाजीराव पेशव्याच्या खासपागेंत प्रमुख झाला होता इतकेंच नाहीं, तर त्याचें जातखत लष्करही मोठें झालें होतें. शिवाय पाणीपतच्या लढाईनंतर तीन वर्षांनीं, होळकरांच्या कुळाचा संस्थापक मल्हारराव मृत्यु पावला, यामुळें तर मराठ्यांच्या लष्करी सरदारांत महादाजी अग्रगण्यच झाला. मल्हाररावाच्या मरणानंतर त्याच्या संततीशीं तो उदारबुद्धीनें वागला. त्याची विधवा सून अहिल्याबाई, आतां होळकराच्या गादीची वारीस झाली होती, तिजवर सैन्य न्यावें, व होळकरांचें सामर्थ्य नाहींसें करावें अशा हेतूनें, माधवराव पेशव्याचा चुलता राघोबा, जेव्हां मध्यहिंदुस्थानांत आला तेव्हां, महादाजीनें[1] त्यास असें सांगून पाठविलें कीं, पेशव्यांच्या खासपागेंत माझी एक नेमणूक आहे, त्या नात्यानें बोलवाल तर सडा मी, आपण योजिलेल्या कामगिरीवर येतों; परंतु मजजवळ जी स्वतंत्र फौज आहे ती फौज, मल्हाररावासारिख्या प्रसिद्ध सरदाराच्या घराण्याचा नाश करण्यासाठीं, मी पाठविणार नाहीं. महादाजीचें उत्तर ऐकून, नागपूरच्या जानोजी भोसल्यानेंही असेंच सांगून पाठविलें; मग अर्थातच राघोबाचे हेतु फसले.

१७६४. पाणीपतच्या लढाईनंतर तीन वर्षांनीं, मराठे बरीच फौज जमा करून, पुनः उत्तरहिंदुस्थानांत गेले. त्या वेळीं विसाजीबाळकृष्ण विनीवाला, पेशव्यांच्या वतीनें सेनापति होता. बाहेर दाखविण्यांत महादाजी शिंदा त्याच्या आज्ञा मानि. परंतु आंतून

---

१. हीवर्तणूक केवळ निरापेक्ष होती कीं नाहीं याविषयीं संदेह घेण्यास जागा आहे. अहिल्याबाईच्या हातीं भरली तिजोरी आली होती; आणि असें ह्मणण्यास जागा आहे कीं, या संकटसमयीं महादाजी शिंदा व राणोजी भोसला यांची मैत्रि संपादन करण्यांत, इतर उपायांबरोबर तिणें कांहीं पैसाही खर्च केला असावा.

त्यानें, जरी केवळ स्वतंत्र नव्हे, तरी पेशव्यांच्या अम्मलदारीहून निराळें, राज्य स्थापन करण्याचे बेत चालविले होते. फौजी खर्चाकरितां राणोजीस ज्या जमीनी सरंजाम मिळाल्या होत्या, त्यांचा तर तो वारीस झालाच होता. आणि आतां मध्यहिंदुस्थानांत व उत्तराहिंदुस्थानांत, दोन्ही ठिकाणीं, पेशव्यांच्या नांवानें, त्याणें राज्यामागें राज्यावर टांका बसविला, व परगण्यामागें परगणा आपल्या संस्थानास जोडिला. या मुलकांत पेशव्यांचा हिस्सा असतां, जुलुमानें पैसा उकळण्यास व मुलूक फत्ते करण्यास, सरदारलोक खुशाल त्यांच्याच आज्ञांचें मिष करीत. खुद्द पेशव्यांच्या ताब्यांतील प्रांतही वर लिहिलेल्या त्रासापासून मुक्त नव्हते. बाळाजीच्या मरणानंतर पुण्यास जे बखेडे उत्पन्न झाले त्यांची संधि साधून, नर्मदेच्या उत्तरेकडील पेशव्यांच्या जमीनी व हक्क, महादाजीनें वळकावतील तितके वळकाविले. मित्र असो अथवा शत्रु असो नागवायाचाच, हा जो धडाका त्यानें मांडिला त्याचा तपशील फारसा देणें नको. इतकेंच सांगणें पुरे कीं, राघोबाच्या तर्फेनें इंग्रजांनीं जें युद्ध चालविलें होतें त्यांत, हा कर्ता पुरुष त्यांचा मुख्य प्रतिस्पर्धी होता ; दुर्दैवी शाह आलमाचा दिसण्यांत गुलाम परंतु सख्त धनी होता ; होळकरांच्या कुळाचा माइक मित्र व कपटी स्पर्धी होता; मध्यहिंदुस्थानांतील राजपूत सरदारांत, मानपानाच्या बाह्योपचारांमध्यें, मी आपल्या पेक्षां हलका आहें असें उघड ह्मणणारा, परंतु वस्तुतः त्यांच्याहून मोठा व त्यांजवर जुलूम करणारा होता; व पेशव्यांच्या कुळास, मी आपला प्यादा ह्मणविणारा परंतु वस्तुतः बुडाडणारा होता.

साल्ब्याच्या तहनाम्यापासून, इंग्रज सरकारानें जरी शिंद्यास स्वतंत्र राजा लेखिलें, तरी पुण्याच्या दरबाराशीं हरएक प्रकारचा संबंध ठेविण्यांत, महादाजी बाह्योपचाराच्या विधि दक्षतेनें पाळी.[1]

---

१ आरंभीं महादाजी शिंदा सर्व कारभार पेशव्यांच्या नांवानें

शाहआलम व त्याची राजधानी महादाजीच्या कबजांत येतांच प्रथम, त्याणें त्या ऐश्वर्य गेलेल्या बादशाहाकडून पेशव्यांच्या नांवें बादशाहीच्या वजीरीची सनद घेतली. नंतर आपल्या नांवें वजीरीच्या नायबीची सनद घेणें ती, त्याणें पेशव्यांपासून करून घेतली. सवाई माधवरावाच्या कारकीर्दींत जेव्हां महादाजी पुण्यास आला तेव्हां तर, एक अद्वितीयच देखावा त्याणें लोकांच्या नजरेस पाडिला. दुनिया झुकविण्यास, मतलबी व राज्यलोभी पुरुषांनीं लीनतेचीं सोंगें करून, ज्या बनावटी आजपर्यंत योजिल्या असतील त्यांत, त्या देखाव्याची बरोबरी करणारी एकही बनावट नसेल. जो पुरुष सतलजपासून आग्र्यापर्यंत सर्व उत्तरहिंदुस्थानाचा बजाह राजा होता; जो पुरुष शिरस्त्यानें कवाइत शिकविलेल्या सोळा पलटणींचा, पांचशें तोफांचा, व एक लक्ष स्वारांचा सेनापति होता; जो पुरुष दो-

---

चालवी; आणि त्याचें कारभारी मंडळ, आपणास पेशव्यांचे नोकर ह्मणवी. कारभारी मंडळच काय, सर्व हातांखालील सरकारी नोकर, चोपदारांसुध्धां, आपणास पेशव्यांचे ह्मणवीत. पुढें सवाई माधवराव बाल्यावस्थेंत असतां, व नानाफडणवीस दिवाणगिरी करीत असतां, चंबल नदीच्या दक्षणे कडील शिंद्याचा मुलूक, महादाजीच्याच नांवानें चालावा असें झालें. चंबल नदीच्या उत्तरे कडील फत्ते केलेल्या मुलकांत, पेशव्यांचें नांव चालू असे; व पुण्याच्या दरबारांतून दोन मुख्य कामगार पेशव्यांच्या बतीनें महादाजीबरोबर असत. उत्तर हिंदुस्थानांत आरंभीं, कित्येक इनामें पेशव्यांच्या नावानें दिलीं गेलीं होतीं; परंतु जेव्हां त्यांस दिल्ली येथें वकील अलमुतालीक ही पदवी मिळाली तेव्हां, पहिल्यानें दिलेल्या सनदा परत घेतल्या जाऊन बादशाहाच्या नांवानें नव्या सनदा दिल्या गेल्या. त्यांजवर बादशाहांचे वजीर पेशवे व पेशव्यांचे नायब महादाजी असे शिक्के असत.

न तृतीयांश माळव्याचा, व दक्षिणेंतील कितीएक उत्तम प्रांतांचा मालीक होता; तो पुरुष, जेव्हां पेशव्यांच्या गादीवर असलेल्या लेंकरास मुजरा करावयास पुण्यास आला, तेव्हां दूर, वेशीशीं, हत्तीवरून खालीं उतरला, व दरबारांत गेल्यावर मजलसींत, सर्व मराठी मानकऱ्यांच्या खालीं बसला. नंतर इतर मानकऱ्यांच्या बरोबरीनें बसण्याविषयीं पेशव्यानें आग्रह केला असतां, अशा मानास मी अयोग्य आहें असें उत्तर करून, त्याणें आपल्या काखेंतून एक रुमाल काढून तो सोडिला; आणि त्यांतून एक जोडा काढून माधवरावापुढें ठेविला; आणि ह्मणाला कीं, माझातर हा धंदा आहे, व माझ्या वाडवडीलानींही हाच केला. असें ह्मणून लागलीच पेशव्यानें घातलेला जुना जोडा[१], महादाजीनें उचलून घेऊन दक्षतेनें रुमालांत बांधिला, व पुनः रुमाल काखेंत घातला; मग मोठी कांकूं करून इतर मानकऱ्यांबरोबर त्याणें बसण्याचें कबूल केलें. आपल्या कुलाच्या उत्पत्तीची व आपल्या प्रथम धंद्याची लाज न बाळगितां, उलट महादाजी अभिमान बाळगी, अशाविषयीं हेंच एक उदाहरण आहे असें नाहीं. दक्षिणेंत त्याचें कुळ साधा कुणबावा करीत होतें तेथें, कांहीं जमीन घेऊन त्याणें आपली वतनवाडी वाढविली; व आपल्या गरीबींतील पाटीलकीच्या वतनावरून लोकांनीं आपल्यास हाक मारावी अशी त्यास फार इच्छा असे. ही देशभक्तीची वृद्धि होय; व येणेंकरून महादाजी फार लोकप्रिय झाला. परंतु असें करण्यांत या खेरीज निःसंशय आणखीही त्याचे हेतु होते. हिंदुस्थानांत साधारण ह्मणच झाली आहे कीं, महादाजीनें आपणास पाटील ह्मणून ह्मणवून सर्व राज्याचें मालीक केलें. पाटिलकी व राज्याधिकार या अवस्था, व या अवस्थेसंबंधीं कर्तव्यकर्मे, यांचा कधींही मेळ बसावयाचा नाहीं असें असतां, मेळ बसविण्यास महादाजी प्रयत्न करी,

---

१ हा जुना जोडा महादाजी शिंद्याच्या पुढील पुरुषांनींही जपून ठेविला होता, असें क्यापटन स्टयुअर्ट यास लोकांनीं सांगितलें.

हें पाहून जरी हसूं येतें तरी, असें कबूल केलें पाहिजे कीं, हा कर्ता पुरुष आजन्मपर्यंत या वर्तणुकींत एकसारिखा राहिला. त्याच्या स्वभावांत मर्दुमी, व साधेपणा असे, तेव्हां तो राज्याच्या थाटमाटांस व ऐषआरामाच्या मोहक वस्तूंस लाथाडीत असे. ज्या मंडळींत त्याचा जन्म, त्या मंडळीच्या स्वरूपाशीं त्याचीं कृत्यें जुडून असत. त्या मंडळीसही, त्याच्या अक्कलहुषारीविषयीं व कर्तृत्वशक्तीविषयीं यथार्थ अभिमान असे. मराठी सरदारांच्या मंडळींत, महादाजी अत्यंत यशस्वी होता; व ती मंडळीही त्यास अत्यंत कार्यकर्त्ता लेखी. आपल्या देशांत आरंभीं जे मुत्सदी झाले, त्यांस अनुसरून, महादाजी अधिकाराच्या मुख्य तत्वापासून तृप्ति मानी; व त्याचीं बाह्यवस्त्रें लोकांस पांघरूं देई. आपल्या विस्तीर्ण प्रांतांस विशेष मज़बुती, देण्याचें, व आपल्या अधिकारास हमेश राहील असें रूप देण्याचें, त्यानें एक्या काळीं मनांत आणिलें होतें, असें अनुमान करण्यास बळकट पुरावा आहे; परंतु हा बेत मनांत आणिला असला तरी सिद्धीस गेला नाहीं. त्याचें सर्व आयुष्य सदा परिश्रमांत गेलें. त्यांत पुष्कळ जबरदस्तीचीं व जुलुमाचींही कृत्यें घडलीं; तथापि त्याचा स्वभाव एकंदरीनें पाहतां जातीचा गरीब असे. जिंकिलेल्या व अपहार केलेल्या मुलखांत सुधारणा व्हावी, याविषयीं त्यास विशेष इच्छा असे; परंतु राज्यलोभ अवसर सांपडूं देत नसे. एकीकडे, मोंगली राज्य गळून चाललें होतें अशामुळें, व दुसरीकडे, मराठे सरदारही निर्बळ असून आपसांत तंटेबखेडे करीत अशामुळें, त्यानें आपला मुलूख व आपली वजनदारी इतकी पुष्कळ व इतक्या त्वरित फैलाविली कीं, अधिकाराची यथार्थ व्यवस्था करण्यास त्यास सांपडलें नाहीं.

आजन्मपर्यंत महादाजी शिंदा आपल्या लष्करांत मुख्यत्वें मराठ्यांची भरती करीत असे. परंतु त्याचा बहुतेक काळ नर्मदेच्या उत्तरेस लढायांत गेल्यामुळें, त्यांत लौकरच मराठ्यांपेक्षां राजपूत व मुसलमान लोक विशेष झाले. ज्या नियमसूत्रानें पूर्वीं मराठ्यांचा जठ बांधला

गेला होता, त्या नियमसूत्राविरुद्ध ही गोष्ट होती; तरी त्यावेळेस तिजकडे फारसें लक्ष गेलें नाहीं. यामुळें मराठ्यांच्या बुद्धिप्रेरणांशीं ज्या लोकांच्या बुद्धिप्रेरणांचा क्वचितच मेळ, व जे लोक दुसऱ्याच बुद्धिप्रेरणांनीं कार्यें करणारे, त्यांसही मराठ्यांच्या संवई जडल्या. सैन्यांच्या मूळ रचनेंत हें एक अंतर पडलें. दुसरें एक अंतर महादाजीच्या शाहण्या राजमनसुभ्यानें पाडिलें. त्यानें बुद्धिचाणाख्यतेनें पाहिलें कीं, आपले वेत सिद्धीस जाण्यास, नुस्त्या लुटारू लष्करांनीं कधींही पुरें पडावयाचें नाहीं. मराठ्यांचें लुटणें चक्राकार होई. लूट देतां देतां एखादा देश थकला, ह्मणजे लष्करानें तेथून कूच करावें; कूच करितेवेळीं, जे तद्देशी लोक त्यांच्या पुंडाव्यांनीं अन्नास माहाग झालेले असतील, त्यांचीहि त्यांत भरती व्हावी; व अशानें संख्या वाढून त्यांनीं दुसरा देश लुटावयास जावें. असेंच दुसऱ्या देशाहून तिसऱ्या देशीं जावें; होतां होतां पुनः पहिल्या देशावर पाळी यावी. त्यांच्या प्रथमच्या स्वाऱ्यांत किल्ले घेण्याचीं साधनें त्यांजवळ नव्हतीं; व त्यांची युद्ध करण्याची धरतीही अशी नसे कीं, कठीण प्रदेशांत, दमदार शत्रूशीं, फार काळ ते लढूं शकते. हा कमीपणा त्यांच्या शत्रूंच्या लक्षांत लौकरच आला. मग, भिल्ल लोकांनीं आपल्या डोंगरांतून; व राजपूत लोकांनीं आपल्या बळकट किल्ल्यांतून, मराठ्यांशीं सामना मांडिला इतकेंच नाहीं; तर त्यांच्या जमीनी लुटून फस्त करून, आपल्यास झालेल्या त्रासांचा ते सूड उगवूं लागले. राजपूत लोकांनीं तर खेड्यापाड्यांसही तटबंदी करून किल्ल्यांची संख्या वाढविली. आतां या नूतन संकटाचें निवारण पद्धतशीर कवाइत शिकविलेल्या लष्करांशिवाय कसें होतें ? हें सर्व मनांत आणून महादाजी शिंद्यानें पायदळाचे कित्येक कंपू भरण्याचा निश्चय केला[१]. दैवग-

१ कवायत शिकविलेल्या लष्कराच्या प्रथम दोन पलटणी होत्या. त्या वाढून आठ झाल्या. व आठांच्या वाढून सोळा झाल्या. शिवाय ८० तोफा व हुषार घोडेस्वारांचा एक रिसाला असें लष्कर होतें.

तीनें या कामीं ज्या पुरुषाची त्यास मदत मिळाली, तोही केवळ असाधारण पुरुष होता. या काळीं महादाजीच्या नोकरींत डीबॉइन् या नावाचा एक युरोपियन शिरला होता. त्याजकडे कंपूंचें काम सांगितलें गेलें. एक्याप्रसंगानें तो त्याच्या नजरेस आला होता असें ह्मणतात. यापूर्वी, गोहद घेण्याविषयीं महादाजी एकदां यत्न करीत होता, तो यत्न निर्फल करण्याकरितां डीबॉइन् यानें युक्ति काढली होती. त्या युक्तीवरून महादाजीनें ओळखिलें कीं, या पुरुषांत युद्धकौशल्य आहे. पुढें या पुरुषाच्याच युद्धकौशल्यानें महादाजीस इतकी सत्ता प्राप्त करून दिली कीं, औरंगजेब बादशाहाच्या मरणापासून कोणत्याही हिंदुस्थानी राजास तितकी प्राप्त झाली नव्हती.

डीबॉइनाचे कंपू, बरोबर घेऊन, महादाजीनें आतां अशा तऱ्हेनें किल्ले हस्तगत केले, व खुल्या मैदानांवरील लढाया जिंकिल्या कीं, ती तऱ्हा मराठ्यांनीं पूर्वीं कधींही योजिली नव्हती. उत्तर हिंदुस्थानांतील व मध्यहिंदुस्थानांतील फिसाद माजविणाऱ्या लहान सहान संस्थानांवरच त्यानें हल्ले केले, व त्यांसच शरणागत आणिलें असें नाहीं, तर विशेष योग्यतेचीं जीं राजपूत संस्थानें, त्यांचाही अभिमान त्यानें पुरा नाहींसा केला. जोतपूरच्या चहूंकडून एकत्र झालेल्या लष्कराशीं मीरट[१]

या लष्कराच्या पगाराची व लत्ताकपड्याची प्रशस्त नेमणूक होती. इतर सैन्याहून विशेष हुषारी या लष्करानें वारंवार दाखविल्यावरून महादाजीने त्याची उत्तम व्यवस्था ठेविली होती. त्या व्यवस्थेमुळें तें इतक्या योग्यतेस आलें कीं, पूर्वी कधींही हिंदुस्थानी राजापाशीं अशा जातीचें उभारलेलें लष्कर, तितक्या योग्यतेस आलें नव्हतें. या लष्कराचें वर्चस्व बराच काळ राहिलें.

१ या विख्यात रणांत मारवाडच्या लष्करांतील चंद्रावत जातीच्या दोन हजार स्वारांनीं मात्र विशेष झुंज घेतली. ते डीबॉइनाचा कंपू कापून आंत शिरले होते, परंतु परत येण्यास जेव्हां एकत्र होऊं लागले तेव्हां, गोळ्यांच्या माराखालीं बहुतकरून सर्व पडले. सन १७९०.

येथें मराठ्यांची जी लढाई झाली, तींत महादाजीनें मोठा प्रभाव संपादन केला. येथपासून त्या संस्थानावर, व त्याच्याच शेजारच्या उदेपूरच्या निर्बल संस्थानावर, महादाजीचें वर्चस्व स्थापित झालें.[1] वीस वर्षांपूर्वी, या उदेपूरच्या संस्थानास आपल्या राज्यांतून कितीएक अत्यंत सुपीक प्रदेश, शिंदे व होळकर यांजकडे सोंपविणें भाग झालें होतें.[2] नंतर लौकरच डीबॉइनानें जयपूरच्या लष्करावर एक लढाई जिंकिली, व सन १७९२ त जनकोजी* होळकर याचा पराजय केला. या विजयामुळें, व होळकरांच्या नौकरीमधील मॉनूशियर ड्युडरनेक[3] नांवाच्या फ्रेंच सरदाराच्या ताब्यांतील चार कवायत शिकलेल्या टोळ्यांचा नाश झाल्यामुळें, महादाजीच्या संपादित कीर्तींत

---

१ या लढाईच्या वेळीं मारवाडचा अधिकारी विजासिंग होता. याच राजा विजासिंगानें जयाप्पा शिंद्यास मारविलें होतें. या प्रसंगीं यापासून खंड घेतला तो घेतलाच, परंतु त्याखेरीज जयाप्पास मारिलें याच्या शिक्षेबद्दल, अजमीरचा प्रांत शिंद्यानें मागितला, व विजासिंगानें दिला.

२ इसवी सन १७७१त, जावद, नीमच, रतनगड, खोणी आणि विज्यापूर हे प्रांत उदेपूरवाल्यांनीं महादाजी शिंद्यास दिले. भानपुरा, रामपुरा, मल्हारगड हे प्रांत व प्रतापगडचा खंड, होळकर सरकारास दिला. उदेपूरच्या हातांतून गेलेल्या या मुलकाची जमा ७५००००० रुपये समजली जाते.

३ या टोळ्यांचा मुख्य अधिकारी मॉनूशियर ड्युडरनेक हा जिवानिशीं पळाला; परंतु बाकीचे सर्व युरोपियन सरदार कोणी मेले व कोणी जखमी झाले.

* (मालकम साहेबानें जनकोजी होळकर असें लिहिलें आहे; परंतु होळकरांच्या घराण्यांत जनकोजी या नांवाचा कोणी पुरुष नव्हता असें वाटतें.)

आणखी भर पडली. ही शेवटची लढाई होण्यापूर्वी महादाजी शिंदा माळव्यांतून पुण्यास परत गेला होता. तेथेंच इसवी सन १७९४ मध्यें त्याचा काळ झाला. मराठी संस्थानिकांच्या राज्यांस, पूर्वी कधींही, मिळालें नव्हतें असें शाश्वत स्वरूप आपल्या राज्यास संपादावें, असा महादाजीचा मुख्य हेतु होता. तो वहुधा उत्तरहिंदुस्थानांत राहत असे, परंतु कधीं कधीं माळव्यांत येई व कांहीं दिवस उज्जनीस घालवी. खुद्द त्याच्या नजरेखालीं जितके देश होते तितक्यांत, चांगली व्यवस्था असे. तसीच, फिसाद न करणाऱ्या व तावेदारी उचलणाऱ्या लोकांच्या मुलकांतही चांगली व्यवस्था असे. हें मात्र खरें कीं उत्तर हिंदुस्थानांतील सरदार, राजपुतान्यांतील राजे, व मध्यहिंदुस्थानांतील रजवाडे यांस, आपल्या प्रजेचें स्वरूप द्यावें अशाविषयीं उद्युक्त असतां, त्याणें आपल्या लष्कराचे निर्वंध पुंडावे आवरले नाहींत. राजपूत लोकांस शरणागत आणण्याकरितां जे सरदार त्याणें योजिले होते, त्यांतून कित्येकांचीं कृत्यें अशीं छळणुकीचीं व अपहारवुद्धीचीं होतीं कीं, मराठ्यांच्या इतिहासांत सुद्धां कदाचित् त्यांस दाखला मिळणार नाहीं.[1]

महादाजी शिंदा इंग्रज सरकारचा वैरी असे खरा; परंतु त्या लोकांनीं आपणास सालप्याच्या तहापासूनें[2] स्वतंत्र राजा लेखिलें,

---

१. राजपुतान्यांत शिंद्याचे जे मुख्य सरदार होते त्यांत, आंवाजी इंगळ्या ह्मणून एक होता. हा त्या देशांतील राजेरजवाड्यांवर जुलूम करी, परंतु रयतेवर दया राखी, व त्यांच्या कल्याणाकडे लक्ष देई. राजपुतान्यांतून तो परत गेल्यानंतर, देश विध्वंसहोण्यास आरंभ झाला.

२. सालप्याचा तहनामा मिस्तरडेव्हिड अंडरसन याच्या मार्फत झाला. त्यांत पेशव्याच्या नेक वर्तणुकी करितां शिंदा, वस्तुतः पेशव्यांचा एक लष्करी सरदार असतां जामीन झाला, यावरून मराठ्यांच्या राज्य-

व आपल्या दरबारीं वकील ठेविला, यांत आपला लाभ आहे हें तो जाणत असे. तथापि परद्वीपस्थ लोकांची सत्ता त्वरित वाढत चालली इकडे, वर लिहिल्यामुळें त्यानें उदासीन वृत्ति धरली असें नाहीं. उलटें असें संभवतें कीं, राज्य वाढविण्या करितां त्यानें ज्या सामग्री सिद्ध केल्या, त्या अशा उद्देशानें सिद्ध केल्या असाव्या, व त्या सामग्रीस जें स्वरूप दिलें तेंही अशा उद्देशानें दिलें असावें कीं, कधींनाकधीं तरी, परकीय लोकांचा उत्कर्ष नाहींसा करण्यास त्यांचा उपयोग व्हावा. पुढें पुण्यांत जो तह ठरला त्या तहांत पक्षकार होण्याचें त्याणें नाकारिलें; व लॉर्ड कॉर्नवॉलीस जेव्हां श्रीरंगपट्टणावर चालून गेला. तेव्हां, त्या शहरीं महादाजीही जाऊन पोंचला. लोक असी कल्पना

---

व्यवस्थेची कसी विचित्र तऱ्हा होती हें दिसून येतें. वास्तविक स्थिति पाहतां, महादाजीनें घेतलेला पुढाकार यथार्थ दिसतो. त्या काळीं पेशव्यांच्या गादीवर लेकरूं होतें; व तें लेकरूं, कारभारी नानाफडनवीस याच्या आधीन होतें. नानाफडनवीस तरी शिंद्यासारखाच, राज्यांतलि एक कामगार होय. तेव्हां शिंद्यानें पेशव्याची जामीनकी पतकारिली ह्मणजे काय कीं, मराठी राज्यांतील मुख्य फौजी सरदारानें, एका मुख्य दरबारी मुत्सद्याच्या वर्तणुकीविषयीं जामिनकी पतकारिली; व तीही त्या मुत्सद्याच्या संमतीवरून व सांगण्यावरून. खेरीज कसेंही असलें तरी महादाजी शिंद्यास आपल्या बापाचा दाखला घ्यावयास होता. इसवीसन १७४३त दिल्लीच्या बादशाहाशीं केलेल्या करारांत, बाळाजीराव पेशवा फरक करणार नाहीं अशाविषयीं, महंमदशाहापाशीं ज्या चौघां मराठी सरदारांनीं जामिनीं दिली त्यांत, राणोजी होता. त्यावेळेस तर पेशव्यांच्या सत्तेचा ऐन भर होता.

१. टिपूच्या विरूद्ध जीं सरकारें एकत्र होत होतीं त्यांत सामील होण्याचें, महादाजीनें प्रथम कबूल केलें होतें; परंतु त्याणें ही शर्त ठेविली होती कीं, आपल्या बरोबर पुण्यास जाण्यास इंग्रज सरकारानें दोन

करितात कीं, या वेळीं श्रीरंगपट्टणास जाण्यांत इंग्रज सरकाराशीं त्याचा मित्रभाव होता असें नाहीं. इंग्रज सरकाराविषयीं त्याचे कसेही हेतु असोत, ते सिद्धीस नेण्यास तो राहिला नाहीं. अधिकार, थोडीबहुत वळकटी पावतो आहे तोंच त्यास मृत्यूनें गांठिलें, व त्याची सत्ता दुसऱ्या पुरुषाच्या हातीं गेली. तो पुरुष तर केवळ अल्पवयी; तेव्हां अर्थात, राज्यास स्थायिक स्वरूप देणें हें जें वळकट परिश्रमांचें काम, महादाजीपासून अपुरें त्याजकडे आलें, तें पुरें करण्यास तो समर्थ नव्हता.

महादाजी शिंद्यास संतान नव्हतें. त्याच्या तुकाजी नांवाच्या भावास तीन पुत्र होतेः—केभानजी, जोतीबा व आनंदराव. सर्वांत ज्येष्ठ जो केभानजी तोही संतान नसतां मृत्यु पावला. जोतीबास दोन मुलगे होते; परंतु महादाजीची भक्ति आनंदरावावर विशेष होती, यामुळें त्यानें त्याचाच मुलगा मांडीवर घेतला. या मुलाचें नांव दौलतराव. दौलतराव आपल्या आजाच्या मरणसमयीं फक्त तेरा वर्षांचा होता खरा; परंतु त्या आज्यानें आपले विस्तीर्ण मुलूकच त्यास ठेविले होते असें नाहीं; तर अशा प्रकारचें लष्करही ठेविलें होतें कीं, त्यापासून इतक्यांतच दौलतराव, मराठी राज्यांत मुख्य होय ना ह्मणणारा पुरुष झाला. दौलतरावास गादी प्राप्त होऊं नये ह्मणून महादाजीच्या बायका प्रथमतः आड आल्या. त्यांनीं दुसराच मुलगा राज्याधिकारी ठरवून एक सैन्य जमविलें; व कित्येक लढाया होऊन पराजय पावे तोंपर्यंत त्यांनीं झगडा सोडिला नाहीं. मध्यहिंदुस्थानांत जितका मुलूख आतां शिंद्याचा आहे, तितकाच त्या प्रांतीं बहुधा त्यावेळेसही होता. परंतु दौलतराव एकंदर ज्या मुलखाचा वारिसदार झाला, त्यांतील,

---

पलटणें द्यावीं, व उत्तर हिंदुस्थानांतील आपले मुलूख सांभाळण्याचें पतकरावें, व राजपूत संस्थानाशीं चालू असलेल्या युद्धांत मदत करावी हें ह्मणणें इंग्रज सरकारानें कबूल केलें नाहीं.

वर लिहिलेला भाग, तादृश, एक लहानसा तुकडा आहे असें ह्मटलें पाहिजे. त्याच्या सत्तेचा मुख्य पाया उत्तरहिंदुस्थानांत पडला असे, व त्याच्या कवायत शिकलेल्या वहुतेक लष्कराचा निर्वाहही, उत्तरहिंदुस्थानांतील वसुलावर, व राजपुतान्यांतील राजेरजवाड्यांकडून जो खंड जमे त्या खंडावर होत असे. कवायती लष्कराच्या कर्तृत्वामुळें व त्यापासून प्राप्त झालेल्या सामर्थ्यामुळें सदरहू वसूल व खंड जमे हें उघडच आहे.

होळकरांचा प्रथम पुरुष जो मल्हारराव त्याच्या मरणापासून, त्या घराण्याचें सामर्थ्य कमती होत चाललें होतें. जयपूरच्या उत्तरेकडील मुलकांत होळकरांची सत्ता या पूर्वींच नाहींशी झाली होती. तथापि त्या प्रांतींचा खंड घेण्यास त्यांस अधिकार आहे असें अझून पर्यंत मानिलें जात असे. आपले हक्क सांभाळण्याचें सामर्थ्य त्यांजमध्यें असल्यामुळें हा हक्क मानिला जाई, अथवा माळव्यांत असलेला त्यांचा मुलूक कायम राही, असा अर्थ नाहीं; तर मराठी सरदारांमध्यें जे अझून स्नेहतंतु राहिले होते त्या स्नेहतंतूमुळें हें कार्य होई. आपसांत युद्धें होत असतांही हे स्नेहतंतु मराठे तोडीत नसत. प्रसंगानुसार त्यांजमध्यें परस्पर झगडे उत्पन्न होत त्या झगड्यांस, स्वदेशीयांविषयींच्या अभिमानबुद्धीमुळें विचित्र रूप प्राप्त होई. या झगड्यांची अशी वारंवार अखेर होई कीं, जे लोक मराठ्यांच्या जुटीचा स्वभावगुण व तिची वांधणी जाणत नसत, त्यांस उमजच पडूं नये. दिसण्यांत तर परस्पर वैर, व तुटातूट, व फाटाफाट दिसत असावी; परंतु पुनः पुनः एकाएकीं ऐक्य होत असावें. या स्वभावगुणाची किंमत महादाजी पुरी जाणून असे. ह्मणून जीं नातींगोतीं व जे स्नेहतंतु त्यास कारणीभूत असत, तीं नातींगोतीं व तें स्नेहतंतु, वेळेवर आपला फार तोटा होत असतांही तो कायम राखी. सत्तेच्या ऐन भरांत असतांना देखील जेव्हां, माळव्यांतील व उत्तरहिंदुस्थांतील वसूलापैकीं, व राजेरजवाड्यांकडून जे खंड जमा होत त्या खंडांपैकीं, पेशव्याचा हिस्सा पाठऊन द्यावा ह्मणून नानाफडनवीस मागणी करी तेव्हां, महादाजी

खर्चाच्या रकमा दाखवून, तीं मागणीं युक्तीनें दूर करी; परंतु मागणी करणें तुह्मास योग्य नाहीं असें ह्मणत नसे. तसेंच, होळकरांच्या कुळाचें त्याच्या बापास पुष्कळ कर्ज देणें होतें, त्याचाही कांहीं हिस्सा त्याणें फेडिला. तसेंच, राजेरजवाड्यांच्या खंडापैकीं हिस्सेरसीच्या संबंधानें कज्जा उभा राहून, लाखेडीगांवाजवळ त्याच्या लष्करानें तुकाजीच्या लष्करावर हल्ला केला तेव्हां, तुकाजीचा पराजय झाला असतांही, महादाजीनें ती संधि साधून घेतली नाहीं. फक्त तंट्याच्या मुळाचा मात्र निकाल करून घेतला. लढाई संपल्यानंतर तर लौकरच, महादाजी व तुकाजी यांजमध्यें अत्यंत मैत्रीचा व घरोब्याचा संबंध दृष्टीस येतो. आतां महादाजीच्या मागें, त्याच्या सारिखेच विचार दौलतराव मनांत वागवील, व त्याच्या सारिखीच आपली वर्तणूक ठेवील, ही उमेद राखण्यास लोकांस मुळींच कारण नव्हतें. दक्षिणेपासून दूरदेशीं त्याचा जन्म व त्याची बाळशिक्षा; सभोंवती त्याच्या युरोपियन, मुसलमान व रजपूत लोकांचा मेळा; कवायतींत तरबियत केलेल्या कंपूंवर त्याचा विश्वास; व ज्या बिन कवायती व लुटारू लष्करांनीं धैर्य व चालाकी करून त्याच्या पूर्वजांस कीर्ति संपादून दिली होती, त्या बिन कवायती व लुटारू लष्करांचा त्यास तिरस्कार; तेव्हां ज्या प्रेरणांनीं महादाजी वर्ते त्या प्रेरणा दौलतराव जाणतच नसे. मराठ्यांच्या जुटांतील आपण एक सरदार आहों हें, वर लिहिलेल्या कारणांनीं दौलतरावाच्या गांवींही नसे. तो आतां वस्तुतः हिंदुस्थानचा मुख्य राज्याधिकारी होता; व तेवढेंच नातें मात्र तो ओळखी. शिंद्याच्या दरबारांतील वंशपरंपरा कामें करणाऱ्या मुख्य मुख्य लोकांमध्यें, स्वदेशीय लोकांविषयींचा अभिमान अद्याप होता खरा; व त्यांची, आपल्या चालत आलेल्या रूढींच्या व नियमांच्या ठिकाणीं, भक्ति होती खरी; परंतु सैन्यांत बहुतेक भरणा राजपूत लोकांचा व पठाण लोकांचा होता; व मंत्रिमंडळांत त्या सैन्याच्या सरदारांची प्रथमपायरींत गणना होती; यामुळें ते वंशपरंपरा कामें करणारे

अधिकारी, या परकीय सरदारांचें दिवसेंदिवस वाढतें वजन कमी करण्यास समर्थ नव्हते. शाहू राजाप्रमाणेंच, पेशव्यांची सत्ता बऱ्याच काळापासून आतां केवळ नामधारी झाली होती; व त्यांचा कारभार चालविण्याविषयीं निरनिराळे मराठे सरदार खटपटी करीत होते. परंतु महादाजी जिवंत होता तोंपर्यंत, सरदारमंडळींत उघड कज्जे झाले नव्हते; व देशांतील स्वस्थता नाहींशी झाली नव्हती. ती आतां नाहींशी होण्याचा प्रसंग आला. या वेळीं निझामाशीं एक युद्ध उद्भवलें. तें थोडाकाळ आणखी, ऐक्य राखण्यास कारण झालें; कांकीं सर्वांनीं एकत्र जमून प्रयत्न केल्यास, त्या युद्धांत सोप्या रीतीनें पुष्कळ लूट मिळण्याचा संभव त्यांस दिसून आला. हें सन १७९५. थोड्या दिवसांचे युद्ध लवकरच संपलें, व निझामानें, आपल्या अधिकाराचा व कुलाचा नाश होईल अशा भीतीनें, तह करून, व मराठ्यांस असंख्य पैसा व पुष्कळ मुलूक देऊन, आपल्यावरील अरिष्ट टाळिलें. हा महत् विजय संपादिल्यानंतर लागलेंच, मराठ्यांच्या दरबारीं, खटपटीचें व युक्तिप्रयुक्तीचें व राजद्रोही मसलतीचें असें झाडच बनून उभें राहिलें कीं, तशास दुसरी उपमाही सांपडणार नाहीं. असें होण्यास कार्यकारणरूपी वृत्तें जीं झालीं त्यांत, तरुण माधवराव पेशव्याचें दुर्दैव, तुकोजी होळकराचें मरण, नाना फडनविसास प्राप्त झालेला बंदीखाना, परशराम भाऊचा वध, व निझामाचा कारभारी अजीमुल उमराव याची प्रतिबंधांतून मोकळीक, हीं मुख्य होत; या अजीमुल उमरावास निझामानें, आपण केलेल्या कबुलायती पार पाडूं अशाविषयीं वली दिलें होतें. वर वर्णिलेल्या स्थितीपासून, निरनिराळ्या सरदारांत जे झगडे उद्भवले ते चालू असतां, पुणें प्रांत उद्ध्वस्त झाला; व मराठ्यांच्या लुटारू टोळ्यांनीं आजपर्यंत जे त्रास इतर देशांस दिले होते, त्या त्रासांबद्दल, मध्यहिंदुस्थानांतील व उत्तरहिंदुस्थानांतील लोकांनीं सूड उगविला. पूर्वीं सांगितलेंच आहे कीं, होळकर व शिंदे यांच्या लष्करांत, बहुतकरून मध्यहिंदुस्थानांतील

व उत्तरहिंदुस्थानांतील लोकांचा भरणा होता. दौलतराव शिंद्यानें, गादीवर बसतांच अधिकाराचा दुर्व्यय करण्यास आरंभ केला. याचें कांहीं अंशीं कारण तो तरुण होता हें होय; परंतु मुख्य कारण हेंच समजलें पाहिजे कीं, दुर्दैवेंकरून या प्रसंगीं त्याचें सरजाराव घाटग्याच्या कन्येशीं लग्न लागलें यामुळें, त्या कारस्थानी व दुष्ट सरजारावास मंत्रिमंडळांत मुख्यस्थान प्राप्त झालें.[१] अत्यंत पवित्र मानिलेल्या शपथा घेतल्या असून, त्या मोडून दौलतरावानें नानाफडनविसास पकडलें; कित्येक ब्राह्मणांचा वध केला; (यांत नानाफडनविसाचा भाऊ होता) पुण्याची वस्ति व आसपासचीं मुख्य गांवें लुटलीं;[२] मल्हारराव होळकरास मारून टाकण्या करितां, त्याचा भाऊ जो काशीराव त्यास मदत दिली; व मल्हाररावाचा पुत्र जो खंडेराव त्यास, लेंकुरअवस्थेंत कैदेंत टाकिलें. असे असे गुन्हे दक्षिणेंतून परत येण्यापूर्वीं दौलतराव महाराजानें केले. अखेर, यशवंतराव होळकराची सत्ता दिवसेंदिवस वाढत आहे हें ऐकून, भीति पावून, दौलतराव माळव्याकडे परतला; तेव्हां हरएक प्रसंगीं त्याच्या वर्तणुकीवरून असें दिसून आलें कीं ज्या विचारांनीं महादाजी राज्य वाढविण्याचा लोभ आंवरी, त्या विचारांपासून दौलतराव किंचितूही अटक पावत नसे. धारेच्या फिसादी कारभाऱ्यापासून पंवारांचे दोन परगणे त्याणें घेतले, हें वर सांगितलेंच आहे. याच प्रकारें देवासचें सारें संस्थान त्याणें जबरदस्तीनें आपल्या ताब्यांत आणिलें, आणि देवासवाल्यांपासून जेव्हां जबर खंड घेतला, तेव्हांच संस्थान पुनः मोकळें केलें.

---

१. सर्जाराव घाटग्याचें संस्थान कागलास आहे. हा गांव कोल्हापुरापासून तीन कोसांवर आहे.

२. पुणें शहर लुटण्या करितां जीं ढोंगीं कारणें लाविलीं त्यांत, बायजाबाईशीं शिंद्याचें लग्न झालें, त्या लग्नाचा खर्च उगवावयाचा आहे हें एक कारण लाविलें.

दौलतराव शिंदा माळव्यांत येऊन पोंचला त्यापूर्वींच, उज्जनी, यशवंतराव होळकराच्या ताब्यांत आली होती. यशवंतरावानें तेथील मातवर लोकांकडून पुष्कळ पैसा उकाळिला खरा; परंतु तो तितक्यांतच समाधान पावला, व त्याणें उज्जनी शहर लुटूं नये ह्मणून आपल्या सैन्यांत द्वाही फिरविली. यानंतर कांहीं महिन्यांनीं, सर्जाराव घाटग्यानें यशवंतरावाचा पराजय करून, व सैन्यासहित इंदुरीं येऊन, तें शहर घेतलें; तेव्हां तेथील रहिवाशांस या मारिलें, या नागविलें, सर्व शहरांत लुटालूट केली, व अत्यंत निष्ठुरपणानें, तेथील घरेंदारें जाळून खाक केली. शिंद्याच्या लष्करावरोबर पेंढाऱ्यांचे थवेचेथवे होते. त्यांणीं या विनाशाच्या कृत्यांत, दुर्व्यसनी सर्जारावास उत्तम मदत दिली. या प्रसंगीं इंदूरचा परगणा, व तसेच होळकराच्या राज्यांतील आणखी दुसरे परगणे, शिंद्यानें आपल्या वहिवाटदारांच्या हाताखालीं दिले. पेशव्यांच्या नांवानें आह्मीं मुलूक जप्त करितों, अथवा होळकरांच्या गादीची व्यवस्था लागे तोंपर्यंत मात्र, आह्मी तो आमच्या कबजांत ठेवितों, असें वाह्योपचाराचें मिष सुद्धां शिंद्यानें केलें नाहीं. चालत आलेल्या वहिवाटीचा हा अतिक्रम लोकांस इतका दुःसह झाला कीं, त्यामुळें होळकरांच्या अनुसंगी मंडळींत तत्काल ऐक्य झालें. जे कोणी यशवंतरावाच्या स्वभावास नाखुश होते, व त्याचा गादीवर दावा नाहीं असें ह्मणत होते, त्यांच्यासुद्धां दृष्टोत्पत्तीस आलें कीं, जर दौलतराव शिंदा आतां यश पावतो आहे तर, होळकरांच्या कुळाचा पुरा नाश होतो.

मध्यहिंदुस्थानांत आतां गर्दीचा वक्त सुरू झाला; परंतु पुनः एकदां कारस्थानांचा व युद्धांचा लोट दक्षिणेकडे वळला. यशवंतराव होळकर बोलूनचालून अशा हेतूनें पुण्याकडे आला कीं, होळकराच्या व शिंद्याच्या कुळांत इनसाफ करण्याविषयीं, बाजीराव पेशव्यासच सरपंच करावयाचें. यशवंतराव दक्षिणेंत आला तेव्हां शिंद्यासही माळवा सोडणें भाग आलें. तो प्रथमतः बऱ्हाणपुरास गेला, व

तेथून बाजीरावाच्या लष्करांत सामिल होण्याकरितां, व त्या पेशव्याच्या दरबारीं आपला प्रमुखपणा राखण्याकरितां, त्याणें आपल्या सैन्याची एक टोळी रवाना केली. बाजीरावापासून, यशवंतराव कांहीं उमेद बाळगून असेल तर, शिंद्याचें लष्कर पुण्यास पोंचल्यानें त्याची उमेद खचली. मग, शिंदा चालून येईल तर, आपण दोन लष्करांच्या गराड्यांत सांपडूं अशा दहशतीनें, तात्काल दांडगाईस आरंभ करणें त्यास भाग पडलें. या प्रसंगीं होळकरानें संपादिलेला विजय, अमृ-

सन १८०२. तरावाशीं त्याणें केलेला तह, बाजीरावाचें पलायन, वसईचा तह, इंग्रज सरकारची मध्यस्ति, दौलतराव शिंदा व रघूजी भोंसला या मराठी सरदारांशीं त्यांचें युद्ध, वगैरे वृत्तें या इतिहासांतील नाहींत. इतकें सांगणें पुरे कीं, इंग्रजांच्या सैन्याशीं आपल्या सैन्याचें सामर्थ्य ताडून पाहण्याचा प्रयत्न व्यर्थ झाल्यानंतर, प्रतापाचीं व राज्यवृद्धीचीं स्वप्नें दौलतरावास पडत होतीं तीं वितळलीं. डीबॉइनानें तयार केलेले, व पेरन् याणें पूर्ण स्थितीस आणिलेले कंपू, इंग्रजांनीं तोडिले[1]; शास्त्रज्ञ युरोपियन लोकांनीं, दौलतरावाच्या राज्यांत तोफा बनविण्याचे कारखाने स्थापून, पांचशें तोफा तयार केल्या होत्या, त्या हिसकावून घेतल्या; व गुजराथ, हिंदुस्थान, व बुंदेलखंड, या देशीं असलेले आपले उत्तम उत्तम परगणे, सोडून देऊन लढाई मवकूफ करणें शिंद्यास भाग केलें. तथापि या राज्याधिकाऱ्यापाशीं विस्तीर्ण प्रदेश राहिला; कारण पूर्वीं सरजा अंजनगांव येथें जो तह झाला होता, त्या तहनाम्यांतील द्व्यर्थी करारांचा अर्थ, त्याच्या तर्फेनें केला गेला. त्याच्या वर्तणुकीवरच केवळ नजर दिली असती तर,

---

१. इंग्रजांशीं युद्ध सुरू झालें तेव्हां, आरंभीं दौलतराव शिंद्याच्या कवाईत शिकलेल्या कंपूंत ७२ पलटणी होत्या. या पलटणींत एकंदर शिपायांची संख्या ४३,६५० होती. खेरीज रणांगणांत उपयोगी येणाऱ्या तोफा पुष्कळ होत्या.

या प्रकारें अर्थ करण्याचें कारण दिसलें नसतें. पुढें दुसरा एक तह- नामा ठरला त्यापासूनही, त्याचे राज्यांत आणखी बराच मुलूख सा- मिल झाला.[१]

इंग्रज सरकाराशीं तह झाल्यानंतर पुढें, दवलतराव शिंदा आपलीं लश्करें, मध्यहिंदुस्थानांतील व आसमंताद्भागांतील आपल्या कब- जामधल्या, व आपल्यास खंड देणाऱ्या, अनेक राजे रजवाड्यांस पुरे ताब्यांत आणण्याच्या कामीं, हमेष योजीत असे. या कामीं तो बहुत- करून विजय पावे. मग अर्थात कितीएक राजेरजवाड्यांचा समूळ नाश झाला, व कितीएकांस पूर्णपणें शरण येणें भाग झालें. अगोद- रच या दुर्दैवी देशीं लुटालूट करण्याचा व दंगे माजविण्याचा प्रस्तुत- काळीं लोकांस उत्सव होता, तो ज्यास्ती वाढविण्यास हे संग्राम विशेष कारणीभूत झाले. लवकरच असा अंदाज दिसूं लागला कीं, दवलत रावाच्या कवायत शिकलेल्या कंपूंपासून, आतां या देशास जीं दुःखें सोसावीं लागतील त्यांपुढें, आजपर्यंत पेंढारी व राजपूत लोकांच्या लुटालुटीपासून जीं दुःखें सोसावीं लागलीं होतीं, तीं कांहींच नाहींत. ज्याज्या खेड्यांतून व शहरांतून शिंद्याचे कंपू जात त्यात्या खेड्यावर व शहरावर, कोणताही विचाराविचार न पाहतां, ते खंड बसवीत. पगार वेळच्यावेळीं मिळत नसे, यामुळें कंपूंतील पलटणी हमेष बंडावलेल्या असत. व हमेष बंडावलेल्या असल्यामुळें, रयतेव- रील त्यांची गांजणूक विशेषच विचारशून्य व असह्य असे.

मराठ्यांचा जूट मूळचाच विस्खलित होता. तथापि त्या जुटां- तील सरदार कांहीं तंतूंनीं एकत्र बांधले गेले होते; ते तंतु तोडण्यांत दौलतराव शिंदा, कशा कारणांनीं कारणीभूत झाला, हें वर सांगितलेंच

---

१. सन इसवी १८०५ त मथुरा येथें जो तहनामा झाला, त्यांत गोहद प्रांत व ग्वाल्हेरचा किल्ला शिंद्यास दिला गेला.

[ ग्वाल्हेरचा किल्ला, पुनः इंग्रज सरकारानें आपल्या ताब्यांत घे- तला आहे. ]

आहे. यापुढें त्याणें रघूजी भोसला व यशवंतराव होळकर, यांशीं ऐक्य करून, इंग्रजांच्या सत्तेची वृद्धि कमी करावी अशा हेतूनें प्रयत्न केले; परंतु ते सफळ झाले नाहींत. जूट बांधण्यास ज्या बुद्धि पूर्वीं कारण झाल्या होत्या, त्यांचें आतां सामर्थ्य राहिलें नव्हतें. (तथापि बाजीरावानें हा जूट पुनः उभारण्याचा शेवटला प्रयत्न केला, व या कामीं त्याचे प्रयत्न बरेच फलद्रूपही झाले असें ह्मणावयास जागा आहे.) ज्या इंग्रजांनीं आपणास इतकें खालीं पहावयास लाविलें त्या इंग्रजांशीं, दौलतराव शिंदा, आंतून वैर वाळगीत असेलच असेल. नेपाळच्या लढाईंत ते विशेष फसत आहेत, हें पाहून त्यास समाधान वाटलें, व त्यादेशीं त्याणें कारस्थानें मांडिलेलीं उघडकीस आलीं तरी, इंग्रजांनीं उदार बुद्धीनें लक्षांत घेतलीं न घेतलीं असें केलें. या उदार बुद्धीचा चांगला ठसा, दौलतरावाच्या मनावर उठल्याशिवाय राहिला नसेल. तथापि इसवी सन १८१८ त जेव्हां पेशव्यानें, आपल्यास सामिल होण्यास त्यास बोलाविलें, तेव्हां त्याच्यानें नाहीं ह्मणवलें नाहीं. व लढायी करण्याचा पेशव्यानें निश्चय केला तेव्हां, त्यास मदत देण्याचें दौलतरावानें कबूल केलें. परंतु ही कबुलायत त्याच्यानें पार पाडवली नाहीं. कारण या प्रसंगीं त्यांचे परस्पर संबध जागृत होते असें नाहीं; व पेशव्यांस सामिल झालें नाहीं तर, तूर्त आपणावर संकट ओढवेलच ओढवेल, अशा बुद्धीनें शिंदा वर्तला होता असेंही नाहीं; तर आपणा उभयतांत पूर्वकाळीं कांहीं संबंध होते, या गोष्टीच्या केवळ आठवणीवरून, व न जाणो कदाचित् संकट आल्यास येईल अशा दूरच्या भीतीवरून, तो वर्तला होता. दौलतरावानें उतावळपणा करून या लढाईंत न घुसावें ह्मणून, इंग्रज सरकारानें असा बंदोबस्त केला होता कीं, जर तो घुसता तर, आरंभींच त्याच्या राज्याभोंवती संक्रांत आली असती. तेव्हां त्या युद्धांत दौलतरावास गुंतविण्यास समर्थ प्रयोजक कारणें नव्हतीं. मग अर्थात दौलतरावानें बचावाचा रस्ता धरून इंग्रजांशीं दोस्ती केली, व असी कबुलायत दिली कीं, प्रस्तुत जिकडे तिकडे लुटारूपणा

जो माजला आहे तो नाहींसा करण्यांत, व सर्व देशभर शांति राखण्यांत, तुमच्या बरोबर मीही प्रयत्न योजीन. हें त्याणें ह्मणजे राजीखुशीनें केलें असें नाहीं. निःसंशय तसें करणें भाग आलें ह्मणून केलें. पुढें असेंही दिसून आलें कीं, केलेल्या कबुलायतींपैकीं कित्येकांची टाळाटाळ करण्यास तो आंतून यत्न करीत होता. परंतु हें ध्यानांत धरिलें पाहिजे कीं, तो दुःखाच्या व अडचणीच्या प्रसंगांत होता. त्याचे जातभाई ज्यांत ज्यांत आब्रू लेखितात तें तें, राज्य कायम राखण्याबद्दल त्यास सोडावें लागलें.[१] या कारणामुळें इंग्रज सरकारानें त्याच्या संबंधांत ढिलेपणा ठेविला, व त्याची मुरवत राखिली, हें योग्य केलें; व तें करणें फलद्रूपही झालें. दौलतरावशिंदा जातखत स्वभावानें चांगला आहे; व ज्या दरबारी लोकांनीं, तारुण्यावस्थेंत कुमार्गीं लावून त्यास नासून टाकिलें होतें, ते दरबारी लोकही आतां त्याजजवळ राहिले नाहींत. इंग्रज लोक ज्या प्रेरणांनीं वर्तले, त्या प्रेरणांचें यथार्थ रूप तो आतां ओळखितो. झाले-

---

१. बाजीरावानें दौलतरावास या प्रसंगीं पाठविलेल्या पत्राचा शब्दशः खालीं तरजुमा दिला आहे. हें पत्र सन १८१८ च्या एप्रिल महिन्यांत माझ्या हातीं आलें; व देणारानें खात्री करून सांगितलें कीं, तें मूळच्या पत्राची हुबहू नकल आहे. तें एका अखबारींतून घेतलें आहे. "तुमचे तीर्थरूप महादाजी शिंदे, सरकारच्या हुकुमानें दिल्लीस गेले. व आह्मास वजीरी आणून त्यांणीं आपणही मोठी आब्रु संपादिली. त्यांणीं आमची अंतःकरणापासून सेवा केली. तुह्मी त्यांच्या ठिकाणीं झालां तेव्हां, इंग्रजांशीं दोस्ती मांडिली. याप्रमाणें तुह्मीं उत्तरहिंदुस्थानांत अधिकार चालवितां, व केलेले उपकार स्मरतां. अशा तऱ्हेनें नोकरी करण्यापेक्षां तुह्मी बायकांसारखे हातांत बांगड्या भराव्या, व स्वस्थ बसावें, हें योग्य आहे. आमची सत्ता नाहींशी झाल्यानंतर तुमची कशी राहील?

ल्या महद्राज्यक्रांतीस तो इतक्यांतच अनुसरला आहे. वर्चस्वा-विषयींचा झगडा आतां संपला असें मनांत आणून, इंग्रजी राज्याचें प्रमुखत्व मान्य करण्यास तो तयार आहे; व देशांत स्वस्थता करावी, व ती कायम राखावी अशा विषयीं, इंग्रज सरकार जे उपाय योजितें, त्यांपासून आपलें हित करून घेण्यास तो सावध आहे.

# प्रकरण ६.

## होळकरांचें कुळ.

होळकरांचें कुळ धनगरजातींतील आहे. या कुळांत प्रथमतः, मल्हारराव नांवाच्या पुरुषानें, आपल्या जातींतील लोकांहून विशेष योग्यता संपादून, प्रसिद्धि मिळविली. इंदूरचा सांप्रतचा दिवाण तात्या जोग याणें, मजजवळ एक बखर दिली आहे तींत, मल्हाररावाचा बाप दक्षिणेंत होळ* नांवाच्या खेडे गांवीं आब्रूदार किरसान होता, असें लिहिलें आहे. या खेड्यापासूनच मल्हाररावास व त्याच्या वंशजांस होळकर हें आडनांव प्राप्त झालें.

सतराव्या शतकाच्या अखेरीच्या सुमारास, (बहुधा सन १६९३ त), मल्हारराव जन्मला. त्याच्या बापाचें नांव कोंडाजी होतें. मल्हारराव चारपांच वर्षांचा असतांच, कोंडाजीचा अंत झाला. मग भावबंदांच्या झगड्यामुळें त्याची आई, आपल्या माहेरीं भावाजवळ जाऊन राहिली. त्याचें नांव नारायणजी होतें, व तो खानदेशांत घरची जमीन वाहून, आब्रूनें राहात होता. नारायणजीनें भाच्यास जें काम

* होळ हें खेडें, निंबाळकराच्या जाहागिरींत, फलटणच्या परगण्यांत आहे. तें नीरा नदीच्या पुलाज़वळ, फलटणापासून पांच कोसांवर व पुण्यापासून वीस कोसांवर आहे.

१. यास बहुधा नारायणजी बारगळ ह्मणत असत. मजजवळच्या एका फारसी बखरींत, मल्हाररावाच्या आईनें आपला मुलगा, आपला भाऊ माडकर ह्मणून होता त्याच्या येथें नेला, व माडकर माड नांवाच्या खेडेगांवीं राहात असे, असें लिहिलें आहे. मी वर जें लिहिलें आहे तें, तात्या जोगानें दिलेल्या बखरीच्या आधारानें लिहिलें आहे. कारण ती बखर खरी आहे असें मला वाटतें. तुकाजीचा मुलगा जो मल्हारराव, त्याच्या मामाचें आडनांव माडकर असे. नांवाच्या सारखवटपणामुळें फारसी बखरींत चूक झाली असावी.

सांगितलें, त्यावरून नारायणजीची स्थिति दिसून येते. कित्येक वर्षेंपर्यंत मल्हाररावाकडे, घरच्या मेंढ्या पाळावयाचें काम होतें. हा धंदा सुटण्यास, खालीं वर्णिलेला योग कारणीभूत झाला. एके दिवशीं रानांत निजला असतां, एका नागानें त्याच्यावर आपली फणी धरून उन्हाचें निवारण केलें आहे, असें लोकांच्या नजरेस पडलें. हें पाहून प्रथम लोक भ्याले, परंतु मागून त्यांनीं त्या गोष्टीचा अनुकूळ अर्थ काढिला. (हिंदुलोकांत जे कोणी प्रतिष्ठा मिळवितात त्यांजविषयीं, अशीच काहणी सांगितलेली असते.) होळकरांच्या घरांत चालत आलेल्या दंतकथेवरून पाहतां असें दिसून येतें कीं, वर लिहिलेल्या गोष्टीचा नारायणजीच्या मनावर बळकट ठसा उमटला; व कदम बांडे या नांवाच्या, प्रतिष्ठित सरदाराच्या चाकरीस नारायणजीचे कांहीं घोडे असत त्यांत, त्याणें एक घोडा मल्हाररावाच्या नांवानें केला. धनगरी सुटून, या तरुण होळकरास शिपाईगिरी प्राप्त होण्यास, कोणतेंही कारण झालें असो; त्याणें लौकरच असें दर्शविलें कीं, या नव्या पेशांत प्रसिद्धि मिळविण्यास जे अवश्य गुण लागतात, ते आपल्या अंगीं आहेत. आरंभींच एका प्रसंगीं, त्याणें निजामुलमुल्काकडील कोण्या एका सरदारास ठार केलें. या शूर कृत्यापासून, व त्याच्या विचित्र औत्सुक्यापासून व चालाकीपासून, तो सुरूमध्येंच प्रसिद्धि पावला. नारायणजी मामानें आपली मुलगी त्यास दिली.[१] यानंतर कांहीं वर्षांनीं त्याचा

---

१. या स्त्रीचें नांव गौतमाबाई होतें. ही,पुढें मल्हारराव होळकराची एकुलती एक पत्नी, अशी प्रसिद्धीस आली. मल्हाररावास एवढीच बायको होती. इचें माहेर जें बारगळ कुळ, त्याचा आतां निर्वंश झाला आहे. गौतमाबाईच्या भाचाचें नांवही नारायणराव होतें. तोही बऱ्याच नांवालौकिकास आला होता. तो उदेपूरच्या राजाच्या नोकरींत होता, व त्या राजानें त्यास मंदोसराजवळ, बुडाचा परगणा जाहागीर दिला होता. नारायणरावानें त्यापैकीं निमा आपल्या बहिणीस दिल्हा. तिणें त्या परगण्यांतील मुख्य गांवास, आपल्या नवऱ्याच्या नांवावरून, मल्हारगड असें नांव दिलें.

नांवलौकिक वाढून, बाजीराव पेशव्यानें त्यास आपल्या नोकरींत घेतलें; व एकदम पांचशें स्वारांची मनसब दिली. नव्या धन्याच्या चाकरींत शिरण्याविषयीं, कदम बांडे यांची पूर्ण संमति होती. वरुण मल्हाररावाचें नशीब खुललें हें पाहून, त्या सरदारास आनंद झाला; व मल्हाररावानेंही कृतज्ञता दाखवून, बांड्यांचा जो झेंडा तोच होळकरांच्या कुळाचा झेंडा केला. हा झेंडा अझून चालत आहे. गायकवाडांच्याही कुळाचा हाच झेंडा आहे. गायकवाड व होळकर दोघेही, मुळांत बांड्यांचे चाकर.

मल्हारराव होळकर झपाझप मोठ्या अधिकारास चढला. पेशव्यांच्या नोकरींत शिरल्यानंतर थोडक्या दिवसांनीं, चिमणाजीपंताबरोबर कोकणांत त्यास पाठविलें. त्यावेळीं तो प्रांत अमलांत आणण्या-

---

तिच्या भावानें आपल्या हिश्शांतील मुख्य गांवास, नारायणगड नांव दिलें. नारायणरावाच्या मरणानंतर, बावाजीराव या नांवाचा त्याचा मुलगा होता, त्याजकडे जाहागीर चालत होती. या जाहागिरीच्या आसपासचा मुलूक मराठ्यांच्या ताब्यांत गेला तेव्हां, बावाजीराव होळकरांचा जाहागीरदार झाला. अजमासें तीस वर्षांमागें बावाजीराव मेला. त्याची जाहागीर, त्याचे मुलगे मुगाजी व शंकरराव, यांजकडे चालत असे. सन १८०५ सालीं, यशवंतराव होळकरानें ही जाहागीर हिसकून घेतली, व सन १८०७ सालीं पुनः सोडिली. मुगाजी सन १८१३ त मेला. नंतर नारायणगड शंकररावाच्या ताब्यांत दोनवर्षें राहिला, व पुढें होळकरांनीं पुनः हिसकून घेतला. मग शंकरराव सातोळीच्या अरण्यांत पळाला, व लुटालूट करून दिवस गुजरूं लागला. लुटालूट करणें त्याणें सोडावें ह्मणून, पूर्वींच्या जाहागिरीपैकीं पुनः दोन खेडीं त्यास दिलीं; परंतु तीं मंदोसरच्या तहानंतर त्याजकडून हिसकलीं गेलीं. या घराण्यांतील शेवटला पुरुष, कांहीं महिन्यांपूर्वीं, अत्यंत गरीबींत मृत्यु पावला.

विषयीं पेशव्यांचे प्रयत्न, फार फलद्रूप होत होते. पोर्तुगीस लोकांपासून त्यांणीं, वसई व आणखी कितीएक मजबूत ठिकाणें, बुडावून घेतलीं. या प्रसंगीं मल्हाररावानें संपादिलेली कीर्ति, पुढें सन १७५७. निजाम अलीशीं युध्ध[1] झालें त्या युध्धांत, व दुसऱ्याही अधिक कमी प्रसंगांत, आणखीं वृध्धि पावली.

नर्मदेच्या उत्तरेकडे प्रथमतः, सन १७२८ त, मल्हाररावास बारा परगणे प्राप्त झाले[2]. व सन १७३१ त आणखी सत्तर परगणे[3] प्राप्त झाले. तसेंच पेशव्यांनीं पत्र लिहून देऊन[4] माळव्यांतील, मराठ्यांच्या हिश्शाची व्यवस्था त्याजकडेसच सांगितली. पुढच्या वर्षी या प्रांतीं मराठ्यांचें लष्कर आलें, व दया बहादर पराजित होऊन मृत्यु पावला. त्यावेळीं मराठ्यांच्या लष्कराच्या बिनीवर

---

१ राक्षसभुवन येथें झालेल्या प्रसंगांत मल्हाररावानें पुष्कळ प्रख्याति मिळविली. व त्यानंतर जो तह ठरला त्या तहाच्या वेळीं त्यास कांहीं मुलूक मिळाला. अंब्याचा परगणा होळकरांस याचवेळेस दिला गेला.

२ पुणें दफ्तरांत सन १७२८ सालच्या रोजकीर्दींत, प्रथमतः मल्हारजी होळकरास दिलेल्या बारा परगण्यांचा, व पंवारास दिलेल्या, तेहतीस परगण्यांचा दाखला आहे.

३ पुण्याच्या रोजकीर्दींत.

४ पुण्याच्या रोजकीर्दींत लिहिलें आहे कीं, सन १७३०।३१ या सालीं पेशव्यांनीं मल्हारराव होळकरास पत्र लिहिलें, व माळव्याची व्यवस्था त्याजकडे सोंपिली. त्या पत्रांत असें लिहिलें होतें कीं, तुह्मी सरकारचा हक्क, वेळच्यावेळीं हुजूर पाठवीत जाणें. उदाजी पंवाराचा राज्यलोभ वाढून, तो दिवसेंदिवस उद्दाम होत चालला होता; त्यास टोला बसावा याजकरितां, बहुधा हें काम मल्हाररावाकडे सांगितलें असावें.

सेनापति, मल्हारराव होता हें वर सांगितलेंच आहे. त्याच्या हाता-
सन १७३२. खालीं बरेंच लष्कर होतें. व बाकीचे मराठे विंध्याद्रि
चढून वर आले, त्यापूर्वींच त्याणें नेमाडांत कित्येक गांवें काबीज केलीं.
त्यांत मुख्य महेश्वर होय. माळवा फत्ते केल्यानंतर, सैन्याच्या निर्वाहाक-
रितां, मल्हाररावास इंदूरचा परगणा[1] दिला गेला.

मल्हाररावानें मोठी योग्यता व मोठी पदवी संपादिली ह्मणून वर वर्णन केलेंच आहे. पेशवा आपल्याशीं कपटानें वागणार नाहीं असी, महंमदशाहास ज्या मुख्यमुख्य मराठी सरदारांनीं जामिनकी लिहून दिली, त्यांत मल्हाररावाचें नांव आहे. हा, या गोष्टीचा वळकट पुरावा होय. खरोखरीच, माळव्यांत मराठे आले त्या दिवसापासून मल्हाररावाच्या मरणापर्यंत तीस वर्षें लोटलीं, त्या काळांत, सर्व मराठी सरदारांत तो अग्रगण्य होता[2]. मल्हाररावाकडे हमेष कामगिरी सांगितली जाई यावरून, बाजीरावाची त्याजवर मोठी मर्जी होती असें दिसतें; व तोही, सत्तेच्या ऐन शिखरास पोंचला असतां सुद्धां, पेशव्यांच्या हुकुमाचा अत्यंत अदब राखी. या सरदाराच्या कुळाची व अधिकाराची मध्यहिंदुस्थानांत स्थापना झाली आहे खरी; परंतु त्या प्रदेशाशीं त्याच्या जातखत आयुष्याचा संबंध फार थोडा आहे. त्याच्या मुख्य युद्धप्रसंगांचीं व विजयांचीं स्थानें, दक्षिण व उत्तरहिंदुस्थान हीं होत. मुख्य-

---

१ सन १७३३. चालीप्रमाणें ही सरंजामी सनद आहे.

२ सरदेशमुखी वगैरे मराठ्यांचे हक्क, माळव्याच्या वसूलांतून शेंकडा ३५ रुपयेप्रमाणें घेण्यास, राणोजी शिंद्यावरोबर मल्हाररावासही पेशव्यांनीं अधिकार दिला. या दोघां सरदारांनीं असा करार करून दिला कीं, पहिल्या सालीं एक लक्ष पांच हजार रुपये, दुसऱ्या सालीं एकलक्ष दहा हजार रुपये, व तिसऱ्या सालापासून पुढें एक लक्ष पंचवीस हजार रुपये आह्मी पुण्यास पाठवीत जाऊं; व बाकी जें राहील तें निमानिम वांटून घेत जाऊं.

र्वेकरून उत्तरहिंदुस्थान. या उत्तरदेशीं, बाजीरावानें आरंभीं ज्या स्वाऱ्या केल्या, त्यांतील एका स्वारींत, गयाळी महंमदशाह बादशाह दिल्लीस असतां, त्या शहरापासून सात आठ कोसांच्या टप्प्याच्या आंत, मराठ्या सरदारांनीं कालिका भवानीचा प्रसिद्ध मेळा लुटिला. त्या सरदारांत मल्हाराव होता. मोठी छाती करून केलेल्या या प्रसिद्ध स्वारीच्या प्रसंगीं, मराठ्यांनीं, हुमायून बादशाहाच्या कबरेजवळच्या पुलावर, डुक्कर मारून टांगून, मुसलमानी सत्तेचा धिःकार प्रदर्शित केला. यावेळीं त्यांस पुष्कळ लूट सांपडली. यापूर्वीं कांहीं महीने, बादशाहाच्या लष्करापासून मल्हाराव पराजय पावला होता[१], त्याचा पुरतेपणीं मुबादला होई इतकें द्रव्य व इतका नांवलौकिक, वर लिहिलेल्या प्रसंगीं त्याणें संपादिला. पेशव्यांच्या स्वाऱ्यांस आंतून जयसिंगाची मदत होती, ह्मणून कोट्याच्या रस्त्यानें परत येतांना बाजीराव त्या राजपूत राजास भेटला. तेव्हां जयसिंगानें व त्याच्या जातींतील आणखी लोकांनीं, त्यास अशी कबुलायत दिली कीं, आजपर्यंत आह्मी बादशाहांस खंड देत होतों, तो यापुढें त्यांस नदेतां तुह्मास, देत जाऊं. बाजीराव दक्षिणेंत गेला तेव्हां, वर लिहिलेला खंड गोळा करण्याचें व लष्करी कामें चालविण्याचें काम, त्यानें मल्हाररावाकडे सांगितलें, व त्याच्या वाढलेल्या सैन्याच्या उपजीविके करितां आणखी बराच प्रांत दिला.[२] माळवा, राजपुताना, व उत्तरहिंदुस्थान या

---

१. दुआबच्या कांहीं भागांत लुटालूट करून मल्हारराव आग्र्यास आला होता, व तेथें मोतीबागेजवळ, बऱ्हाणुल्मुल्क या नांवाच्या बादशाही सरदाराच्या फौजेनें, त्याचा पराजय केला होता; तेथून तो मोठ्या मुष्किलीनें पळाला व ग्वाल्हेरीस बाजीरावास जाऊन मिळाला.

२. मजजवळच्या एका बखरींत असें लिहिलें आहे कीं, सैन्याच्या उपजीविके करितां ह्मणून मल्हाररावास पेशव्यांनीं ज्या देणग्या दिल्या, त्या देणग्यांची किंमत माळव्यांत ४० लाख होती. व दक्षणेंत ह्मणजे

प्रांतीं लुटालूट करितांना जे युद्धप्रसंग झाले, त्यांच्या बारीक वृत्तांत फारसी गोडी नाहीं. त्या वृत्तांत वस्तुतः, छोटेखानी माराहाणीच्या व लुटालुटीच्या स्वाऱ्यांचीच रांग आहे. एका लुटींत, महंमदशाहाची राणी मलिकाजमाना इचा असबाव, मल्हाररावानें हस्तगत केला. त्या स्त्रीधनांतील दोन मौल्यवान वस्तु, अहिल्याबाईच्या मरणापर्यंत होळकरांच्या कुळानें मोठ्या जपून ठेविल्या होत्या. दोहोंपैकीं एक रथ होता, व एक केस विंचरायाची फणी होती. रथाचे पडद्यांस मोत्यांची जाळी होती, व फणीस सरासरी एक लाख रुपयांच्या किमतीचे उंच-उंच हिरे जडलेले होते.

मोगली राज्याची दुर्दशा पाहून मल्हारराव होळकरास स्फुरण चढलें होतें, व तो उत्तरहिंदुस्थानावर मराठ्यांची कायम सत्ता स्थापन करण्याचा हेतु, मनांत बाळगीत होता असें दिसतें. हा हेतु सिद्धीस नेण्यासाठीं, कधींकधीं फक्त आपणच, व कधींकधीं आणखीही मराठे सरदारांस बरोबर घेऊन, अयोध्येच्या प्रांतापासून सिंधुनदापर्यंत, व राजपुतान्यापासून कुमाऊन पर्वताच्या रांगीपर्यंत, तो स्वाऱ्या करीत जात असे.

महंमदशाहाच्या कारकीर्दीत, वजीर सफदरजंग यानें, रोहिल्यापासून
१७५१. अयोध्याप्रांताचें संरक्षण करण्याकरितां, मराठ्यांस पाचारण केलें. यामुळें जें युद्ध उद्भवलें त्यांत मल्हाररावहोळकरानें फारथोड्या स्वारांनिशीं एकारात्रीं शत्रूवर हल्ला करून, सर्वांहून विशेष ख्याति मिळविली. प्राचीन इतिहासांत सांगितलेली एक युक्ति योजून, याप्रसंगीं त्याणें यश संपादिलें असें ह्मणतात.[१] पांचचार हजार

---

सातपुड्याच्या दक्षणेस २० लाख पंधरा हजार त्यानें सैन्य ठेवावें असें ठरलें होतें.

१ प्राचीन इतिहासांत, कार्थ्याजिनियन सरदारानें रोमनलोकांशीं लढतांना जी एक्या प्रसंगीं युक्ति योजिली होती तींत. व मल्हाररावानें

गुरांच्या शिंगांस पेटलेल्या मशाली बांधण्याचा त्याणें हुकूम दिला, व तीं गुरें एकादिशेनें पिटाळिलीं. दुसऱ्या एका दिशेस झाडून झाड-झुडुपांवर मशाली बांधिल्या. व हें इकडे चाललें असतां, गुपचूप अंधारांत, तिसऱ्याच दिशेनें जाऊन त्यानें हल्ला केला. शत्रूनीं असें पाहिलें कीं, एकीकडून तर हल्ला येऊन पडलाच, व दुसरीकडे जिकडे तिकडे उजेड दिसत आहे; तेव्हां त्यांणीं कल्पना केली कीं, आपण चहूंबाजूंनीं लष्करांच्या घेऱ्यांत सांपडलों. या धास्तीनें त्यांची फुटाफूट होऊन, ते चहूं दिशेनें पळाले; व त्यांच्या लष्करांतील सर्व माल असबाव, विजय पावलेल्या मराठ्यांस प्राप्त झाला. या यशापासून मल्हाररावाची जी आब्रू वाढली, ती यथार्थच वाढली. या एकंदर स्वारींत मल्हाररावानें मोठें औत्सुक्य व शौर्य दाखविलें, या करितां बादशाहांनीं चांदवडची सरदेशमुखी सनद करून त्यास बक्षीस दिली. परगण्याच्या वसूलावर शेकडा १२॥ रुपायांचा हा हक्क आहे. होळकरांच्या कुळास बादशाहापासून एवढीच सनद होय. खरोखरीच, अशी गोष्ट सांगतात कीं, मल्हारराव होळकरास जेव्हां बादशाहानें सांगितलें कीं, हवें असेल तें इनाम माग, तेव्हां त्याणें उत्तर केलें कीं, मी पेशव्यांचा चाकर आहें, व त्यांस दिलेल्या मुलकाखेरीज स्वतंत्र मुलूक मी चाहत नाहीं. परंतु खानदेशांतील चांदवडची देशमुखी दिली असतां मला घेण्यास हरकत नाहीं. हा अर्ज बादशाहानें मनास आणिला, व त्या दिवसापासून होळकरांच्या कुळांत ही देशमुखी चालत आली आहे. हल्लीं खानदेशाचा प्रांत इंग्रज सरकारच्या कबजांत आला तेव्हां, राज्यकारणीं दृष्टि ठेवून, व होळकरांच्या कुळाचें

---

योजिलेल्या युक्तींत, जें साम्य आहे तें, चटकन दिसण्यांत येण्याजोगें आहे. पृथ्वीवर सर्वत्र ठिकाणीं मनुष्यांच्या कल्पनेंचें एक सारखें स्वरूप आहे. हें साम्य साहजिक ह्मटलें पाहिजे, कारण कीं, हानिबलाचें चरित्र या मराठ्या सरदारानें वाचलें असावें, असा संभवच नाहीं.

मन दुखवूं नये हें लक्षांत आणून, इंग्रज सरकारानेंही ती त्यांजकडेसच ठेविली आहे.

मल्हारराव होळकर, व निझाम उलमुल्काचा मुलगा गयासुद्दीन, यांजमध्यें कांहीं स्नेहसंबंध जडला होता. दक्षिणप्रांताच्या वजीरीवर बापामागें आपला वारसा सांगण्याकरितां, गयासुद्दीन दक्षिणेंत जात असतां, मल्हारराव त्याजबरोबर गेला. पेशवे व मुख्यमुख्य मराठे सरदार यांणींहि तोच पक्ष स्वीकारिला. ते औरंगाबादेस एकत्र जमले, व तेथून कुच करून पुढें जाणार इतक्यांत, गयासुद्दीन विषप्रयोगानें मृत्यु पावला अशी बातमी येऊन, ही स्वारी इतकीच राहिली; व दक्षिणेच्या सुभ्यास, आणखी कांहीं काळपर्यंत, शांततेचा उपभोग घ्यावयास सांपडला[१].

बादशाहाच्या निर्बलतेपासून पेशव्यांस लालूच उत्पन्न होऊन, त्यांणीं पुनः, आपले अर्थ संभाळण्याभावीं, मल्हारराव होळकरास सुभेदार अशी पदवी देऊन, व सैन्याची बरीच कुमक देऊन, उत्तरहिंदुस्थानांत रवाना केलें. यावेळीं तिकडे, अहमदशाह अबदालीच्या अफगाण सैन्याच्या, दरसाल, स्वाऱ्या सुरू झाल्या होत्या; व यामुळें मराठ्यांस पंजाब सोडणें भाग झालें होतें; असें मागें सांगितलेंच आहे. सन १७५९ त दत्ताजी शिंदा मारला गेला; व खुद्द मल्हारराव, अहमदशाहाच्या छावणींत घांस दाणा जात होता, तो अडवून लुटून टाकून शिकंद्रा येथें तळ देऊन राहिला असतां, एका अफगाण टोळीनें त्याजवर छापा घालून, त्याचा पूर्ण पराजय केला.

हीं वृत्तें झाल्यामुळें पाणीपतची लढाई उद्भवली. आपल्या देशबांधवांच्या त्या घातुकदिवशीं मल्हाररावानें रणांतून लवकरच पाय काढिला, यामुळें कित्येक लोकांच्या दूषणास तो पात्र झाला आहे; परंतु त्याचे तर्फदार लोक ह्मणतात कीं, सर्वांहून अधिक जाणता सेनापति तो होता, यामुळें

---

१ गयासुद्दिनास त्याच्या आईनें विषप्रयोग केला.

त्याचा त्यादिवशीं बचाव झाला; कारण ज्यावेळेस त्याणें दिवस गेला असें पाहिलें त्यावेळेस, आपला जट सांभाळून तो अशा व्यवस्थेनें रणाबाहेर पडला कीं, तसें दुसऱ्या कोणास बाहेर पडतां आलें नाहीं. ज्या दिवशीं रण झालें त्यादिवशीं प्रातःकाळीं, मुख्य सेनापतीशीं त्याचा झगडा झाला होता, त्याजवर नजर दिली असतां ही गोष्ट विशेष संभवनीय दिसते. आज लढाई न करितां, एक दोन दिवस आणखी लोटूं द्या अशी, मल्हाररावानें सदाशिवभाउची विनवणी केली होती असें ह्मणतात; परंतु सदाशिवरावाचा गर्व व आत्मश्लाघा अमर्याद होती यामुळें, मल्हाररावाची सल्ला न ऐकून तो आवेशानें ह्मणाला कीं, "धनगराच्या सल्लेस कोण विचारितो!" ही गोष्ट जर खरी असली तर, मल्हाररावासारिख्या सरदारानें, आज विजय मिळणार नाहीं असें भाकित केलें यांत नवल नाहीं. कसेंही असो; जे थोडे मराठे रणांतून वांचले त्यांत मल्हारराव वांचला. नंतर तो मध्यहिंदुस्थानांत आला, व तेथें आपल्या मुलकाची व्यवस्था पाहूं लागला. मराठ्यांच्या हमेषच्या रीतीनीं त्यानें तो मुलूक बराच वाढविला होता. ताळमंडाळच्या परगण्याखेरीज, माळव्यांत जितका प्रदेश हल्लीं होळकरांकडे आहे तितका सारा, मल्हाररावापासून चालत आलेला आहे. राजपूत संस्थानावर करभाराचे हक्कही त्याणें बसवून ठेविले होते. जयसिंगाच्या मरणानंतर, जयपुरीं तंटेबखेडे उत्पन्न झाले अशी संधि पाहून, मल्हाररावानें त्यादेशीं आपलें बरेंच वजन स्थापिलें; व माधवसिंग त्याच्या मदतीनें जेव्हां सिंव्हासनारूढ झाला तेव्हां, त्याणें मल्हाररावास आपल्या राज्यांतून चार परगणे व रोख ७६ लाख रुपये देण्याचें अंगिकारिलें; व खेरीज, सालीना साडेतीन लाख रुपयांचा खंड भरीत जाईन ह्मणून कबुलायत दिली. यापूर्वीं दक्षिणेंत मल्हाररावानें पुष्कळ जमीनी मिळविल्या होत्या. खानदेश प्रांताचा बराच भागही लष्कराच्या उपजीविकेकरितां त्यास सरंजाम दिला गेला होता. शिवाय कितीयेक खेडीं, मल्हाररावाच्या घरांतील स्त्रियांच्या नांवें, पेशवे व निझाम यांणीं करून दिलीं होतीं.

मरणसमयीं मल्हारराव ७६ वर्षांचा होता. लौकिक मिळवून चाळीस वर्षें अधिक, त्याणें सैन्याच्या अधिपत्यांत घालविलीं. कारकीर्दीच्या अखेरीस तर, मराठयांच्या जुटांत तो अग्रगण्य समजला जात होता, यांत संशय नाहीं. त्याच्या दहनादि क्रिया, ग्वाल्हेरपासून वीस कोसांवर, आलंपूरच्या परगण्यांत एक्या गांवीं झाल्या. त्या गांवांस तेथपासून "मल्हारगंज" असें ह्मणतात. मुत्सद्दीगिरींत महादाजी शिंद्यापेक्षां मल्हारराव कमी होता खरा; परंतु शिपाईगिरींत त्याच्या बरोबरीचा, किंबहुना त्याहून अधिक होता. साध्या गृहस्थी चालीविषयीं व पौरुषेय धैर्याविषयीं, मराठे लोक त्याजहून दुसऱ्यास विशेष गणीत नाहींत. केवळ शिपाईगिरीच्या कामांतच त्याची बुद्धि चाले असेंही नाहीं ; राजकारणांतही चाले. खुद्द त्याच्या अंमलाखालीं असलेल्या प्रांतांत, एकदां केलेली व्यवस्था तो फिरवीत नसे, व मूळीं करणें ती सारासार विचार पाहून करी. माळव्यांतील छोटेखानी राजपूत रजवाड्यांशीं मल्हारराव अशा तऱ्हेनें वागे कीं, त्यावरून जरी त्याच्या स्वभावाविषयीं आपण फैसला करूं लागलों तरी देखील, त्याच्या नांवास योग्यता येण्याजोगाच फैसला होईल. सत्ता चालविण्यांत, त्याणें आपल्यावर त्यांचें प्रेम जरी जडवून घेतलें नसलें तरी, बोललेला शब्द राखून व हरतऱ्हेचा मित व्यवहार ठेवून त्यांचें समाधान राखिलें, व त्यांजमध्यें आपल्याविषयीं पूज्यबुध्धि उपत्न केली.[1] या राजपूत रजवाड्यांपैकीं कितीएक तर, त्याचे दृढ मित्र व अनुयायी झाले असते[2]. या लोकांचे वंशज मल्हाररावाच्या नांवाचें अझुन उपका-

---

१. त्यास खंड देणारे अनुयायी व मित्र असे जे राजपूत सरदार होते, त्यांत राघवगडचा राजा बळिभद्रसिंग, व बागळीचा राजा गोकुळदास, हे प्रमुख होते.

२. त्याणें प्रतापगडाचा खंड कमी करून ७५००० रुपयांवर आणून ठेविला. ही ही रकम त्या लहानशा संस्थानास भारीच होती; तथापि मूळधसविलेल्या खंडाच्या निम्याहून अधिक नव्हती.

खुद्दीनें स्मरण करितात. होळकरांच्या गादीवर पुढें जे पुरुष बसले, त्यांचें याहून विपरीत वर्तन होतें यामुळें, वर लिहिलेल्या बुद्धीस पुष्कळ जोर आला असावा. मल्हाररावाचा मुख्य सद्गुण, औदार्य हा होता. जातीनें पैशाविषयीं त्याला खातरच नव्हती. तो ह्मणत असे कीं, (व त्याचें ह्मणणें खरेंही असे) मला जमाखर्चांत कांहीं उमजत नाहीं. जे कोणी कारभारी आपण पैसा वांटतां हा कमी करा अशी शिफारस करीत, त्यांच्या बोलण्यापासून त्यास तेव्हांच राग येई[1]. आपल्या जातवाल्यांवर, व खरोखरीच सर्व मराठ्यांवर तो विशेषच दया ठेवी. पेशव्यांशीं वागणूक ठेविण्यांत, व मराठ्यांच्या जुटांतील आपण एक सरदार या नात्यानें जीं कार्यें करावयाचीं तीं करण्यांत, जें जें महादाजी शिंदा मतलबानें करी, तें तें मल्हारराव खऱ्या अंतःकरणापासून करीत असे. महादाजींत मोठे गुण असून छद्मी मुत्सद्याची कावेबाजीही असे. मल्हारराव तर साधा निष्कपटी शिपाई होता.

मल्हारराव होळकरास खंडेराव या नांवाचा एकच पुत्र होता. तो पाणिपतच्या लढाईपूर्वीं कांहीं वर्षें, सन १७५४त, डिगेजवळ, कुंभेरच्या किल्ल्यास वेढा देत असतां, लढाईंत पडला[2]. खंडेरावाचें लग्न, शिंदे

---

१. एके ठिकाणीं असें लिहिलें आहे कीं, एकाद्या शिपायाची मर्दुमकी पाहून खुष झाला ह्मणजे मल्हारराव होळकर ह्मणे कीं, "भरा याची ढाल रुपयांनीं भरा."

२. कुंभेर, डिग व भरतपूर या दोहोंच्या मध्यांत चार कोसांवर आहे. याकाळीं सूरजमल्लाचा नातु नवलसिंग भरतपूरच्या गादीवर होता. मल्हाररावाशीं तह झाल्यानंतर, खंडेरावाच्या दहनाच्या ठिकाणीं छत्री बांधिली; व तेथें ब्राह्मण ठेवून त्याच्या निर्वाहाकरितां पांच खेडीं लावून दिलीं. पाणीपतच्या घातुकलढाईनंतर, भरतपूरच्या जाट राजानें मराठ्यांचा फार समाचार घेतला; यामुळें त्याच्या ठिकाणीं मराठे अजून भक्ति ठेवितात. भरतपूरच्या रा-

आडनांवाच्या कुळांतील अहिल्याबाई नांवाच्या कन्येशीं, लागलें होतें. हिजपासून त्यास एक पुत्र व एक कन्या असें संतान होतें. पुत्राचें नांव मालेराव होतें. गादीवर असलेल्या पेशव्याचा चुलता राघोबा दादा, यावेळीं मध्यहिंदुस्थानांतील सैन्यावर सेनापति होता, त्यानें तत्काळ मालेरावास वस्त्रें दिलीं, व आपल्या आजाच्या मुलखाचा व अधिकाराचा मालक तो आहे असें कबूल केलें. या तरुण मालेरावास आपल्या पदवीचा फार काळ उपभोग घ्यावयास सांपडलें नाहीं. गादीवर वसल्यापासून नऊ महिन्यांनीं तो मृत्यु पावला. हें वृत्त फार दुःखदायक आहे. मालेराव कांहीं गयाळी व कांहीं वेडसर आहे असें, पहिल्यापासून लोक समजतच होते; परंतु गादीवर बसण्यापूर्वीं, खरोखर वेडाचीं चिन्हें दृष्टोत्पत्तींत नव्हतीं. त्यानंतर हरएक गोष्टींत तीं दिसूं लागलीं. प्रथम प्रथम त्याच्या वर्तनांत, पापकर्माच्या अतिशयापेक्षां मूर्खपणाचा अतिशय विशेष दिसून आला. त्याच्या आईचें आयुष्य केवळ धर्मकृत्यांत व परोपकारांत जात असे; व ब्राह्मण लोकांवर ती विशेषेंकरून कृपा करी ह्मणून, ब्राह्मणवर्गांतील लोक, मालेरावाच्या दुष्ट उपहासास विशेष विषय झाले. त्यांस वस्त्रें अथवा जोडे दान देतांना, तो हमेष त्यांत विंचू घालून ठेवी. त्याणें रुपयांनीं पात्रें भरावीं, व त्यांत हे विषारी जीव

---

जानें लढाईंतून पळून आलेल्या लोकांस अन्नवस्त्र दिलें इतकेंच नाहीं, तर दक्षणेंत आपआपल्या घरीं जाण्याचें साहाय्यही दिलें. यामुळें मराठ्यांत बहुधा एकही असें कूळ नाहीं कीं, ज्याच्या घरांत भरतपूरच्या जाट लोकांच्या उपकाराविषयीं दंतकथा चालत नाहींत. वर लिहिल्या गोष्टींसारख्या गोष्टी, यासाठीं महत्वाच्या आहेत कीं, त्या ध्यानांत आल्यापासून कित्येक राज्यकारणांच्या रूपांत निराळाच रंग दिसून येतो. तथापि हें लिहिलें पाहिजे कीं, जाट लोकांचे आपण दोस्त आहों असें ह्मणविणाऱ्या मराठीलोकांनीं, भरतपुरावर ज्यावेळीं खंड बसवितां आला त्यावेळीं बसविलाच वर लिहिलेल्या बुद्धीमुळें देखील कांकू केली नाहीं.

घालून ठेवून, सत्पात्र भिक्षुकांस तीं दान द्यावीं; मग द्रव्यलोभानें उत्सुक होऊन, ब्राह्मण रुपये घ्यावयास जात व त्यांस दंश होत, तेव्हां तो अत्यंत आनंद पावे. ज्या मानानें त्यास आनंद होई, त्याच मानानें धार्मिक अहिल्याबाईस दुःख होई. आपल्या पोटीं खरेंखरेंच सैतान आलें आहे, काय खोटें कपाळ पहा! असें ह्मणून ती वारंवार विलाप करी. मालेराव दुष्ट व राज्य चालविण्यास नालायक होता यामुळें, त्याच्या मरणानंतर लोकांनीं अशी अफवा उठविली कीं, त्या सतीनें आपल्या लेंकरास मारिलें. ही अफवा खोटी आहे असें हरएक गोष्टीवरून सिद्ध होतें.[१] ज्यां ज्यांस ही गोष्ट मी विचारिली त्यांणीं त्यांणीं, मालेरावाच्या मरणाचें एकच कारण सांगितलें. ( सांगणारांपैकीं कित्येक लोक तर त्या प्रसंगीं हजर होते.) आपल्या वाड्यांतील कोणाएका दासीशीं, गांवांतील एक जरीबुटी करणारा दोस्ती ठेवितो हें ऐकून, संतापास चढून, त्या पुरुषास मालेरावानें ठार केलें. पुढें चौकशींत तो पुरुष निरपराधी ठरला. नंतर केलेल्या पापाचा पश्चात्ताप होऊन, त्यापासून मालेरावास इतका जबर

---

१ मालेरावाच्या मरणाचा अपवाद कित्येक युरोपियन लोकांस कळला व तो त्यांणीं खरा मानिला. अहिल्याबाईच्या नांवाकरितां, या गोष्टीची होईल तितकी बारीक चौकशी करणें भाग आहे असें वाटून, मी चौकसी केली. अखेरीस माझी अशी खात्री झाली कीं, अहिल्याबाई पूर्ण निर्दोषी आहे. हा गुन्हा जर तिजकडून झाला असता तर, कसेंही कारण असतें तरी, ती क्षमेस पात्र राहिली नसती. आतां यांत संशय नाहीं कीं, वेडेपणांत मालेराव दुष्ट कृत्यें करी तीं पाहून, तिच्या अंगावर शहारा उठे; व तो चांगला होईल असी आशा नव्हती यामुळें, त्यास मरण आलें ही गोष्ट खुद्द त्याजकडे पाहिलें तरी, अथवा आपल्याकडे पाहिलें तरी, अथवा देशाकडे पाहिलें तरी, सर्वांशीं बरी झाली असें ती मानी. हें तिचें मानणें तिच्या गुणास कलंक आणीत नाहीं, पण उलटें तिची योग्यता वाढवितें.

वेडाचा झपाटा आला कीं, त्यांतून तो वांचतो कीं नाहीं ही सर्वांस धास्ती पडली. हिंदुस्थानांतील पुष्कळ रहिवाशांचा या गोष्टींत पूर्ण विश्वास आहे कीं, प्रसंगानुसार मेलेलीं माणसें पिशाच्चयोनी धरून जिवंत माणसांच्या अंगांत शिरतात, व त्यांचा नाश करितात. आतां तो जरी बूटी करणारा मंत्रविद्या जाणत असे असें लोक सांगतात; व त्याणें मालेरावास बजाविलें होतें कीं, मला मारूं नको मारशील तर मी भयंकर सूड उगवीन. तो मारलेला पुरुष समंध होऊन मालेरावाच्या पाठीस लागला आहे, व ह्मणूनच तो वकत सुटतो, असें आपल्या वेड्या समजुतीप्रमाणें लोक मानीत. ही गोष्ट खरी आहे असें वाटून, अहिल्याबाई अहोरात्र आपल्या दुःखी मुलाच्या बिछान्यापाशीं, त्याशीं बोलत बसे. तिला वाटे कीं, मालेरावाच्या शरीरांतून हें पिशाचच आपल्याशीं बोलत आहे. तिच्या डोळ्यांवाटे अश्रुधारा चालत, व ती तासानतास ईश्वराच्या धाव्यांत घालवी. पिशाच्याची तृप्ति व्हावी ह्मणून ती त्यास ह्मणे, "तूं माझ्या मुलाला सोड; मी तुजकरितां एक देऊळ बांधित्यें व तुझ्या कुटुंबास जमीन इनाम करून देत्यें;" परंतु काय उपयोग! तिला वाटे कीं, कोणी पुरुष हमेष उत्तर करितो. "निरपराधी असतां त्याणें मला मारिलें. मी जीवास जीव घेईन." मालेरावाच्या मरणाविषयीं लोकांत ही कथा प्रगट आहे. अहिल्याबाईच्या वृत्ताच्या संबंधानें मात्र मालेरावाचें मरण सांगण्यालायक झालें; कारण त्यामुळें आपल्या कुळाची चलती नाहींशी होऊं नये याकरितां, पुढाकार घेणें तिला भाग आलें. तो पुढाकार घेऊन, तिणें स्त्रीजन्म असतां, असें शहाणपण, असे सद्गुण, व अशी कर्तृत्वशक्ति आपल्या अंगीं दाखविली कीं, त्या योगानें जोंपर्यंत जिवांत जीव होता तोंपर्यंत आपल्या मुलुकास ती सुखाची खाणच झाली होती. माळवे प्रांतीं, हरएक सुधारणुकीच्या व न्यायी राज्यरीतीच्या गोष्टीशीं, अहिल्याबाईच्या नांवाचा संबंध आहे.

अहिल्याबाईची कन्या लग्न होऊन दुसऱ्या कुळांत गेली होती यामुळें, हिंदुलोकांच्या वहिवाटीप्रमाणें, राज्यकारभारांत हात घालण्यास त्या

कऱ्येला अधिकार नव्हता. गंगाधर यशवंत नांवाचा एक ब्राह्मण मल्हार-रावापासून कारभारी होता, त्याणें अहिल्याबाईपाशीं अशी शिफारस केली कीं, दूरच्या नातेवाईकाचें एकादें लहान लेंकरूं दत्तक घेऊन गादीवर बसवावें. तसें केलें असतें तर त्याजकडे दिवाणगिरी कायम रहाण्यास हरकत आली नसती.[1]

गंगाधर यशवंताच्या मनांत असें होतें कीं, अहिल्याबाईनें, आपल्या निर्वाहाकरितां एकादा परगणा तोडून घेऊन, स्वस्थ बसावें. तिचें कर्तेपण तो कबूल करी; परंतु राज्यकारभार चालविण्यास ती स्त्री आहे ह्मणून हर-कत आहे असें ह्मणे. मग गंगाधरपंतानें राघोबास लिहिलें कीं, जर तुह्मीं माझें ह्मणणें कबूल कराल, व तें सिद्धीस नेण्यास मदत द्याल, तर तुह्मास बराच नजराणा पाठवून देईन. लांचखाऊ राघोबानें तत्काळ संमति दिली; व गंगाधरपंत दिवाण त्या संमतीपासून कार्य झालेंच असें समजला, आणि लागलीच अहिल्याबाईकडे गेला. त्याची पूर्ण खात्री होती कीं, जरी इतर कारणें आपण सांगूं तीं फसलीं तरीं, आतां राघोबाशीं झग-डण्यास उभें राहून फलादेश प्राप्त होणार नाहीं असें वाटून, निराश होऊन, अहिल्याबाईस आपण सांगूं ती गोष्ट कबूल करणें भाग येईल; परंतु ठिकाण आपण चुकलों असें गंगाधरपंताच्या लौकरच नजरेस आलें. या मोठ्या मनाच्या बायकोनें त्यास एकदम सांगितलें कीं, तुझा बेत होळकरांच्या कुळास लांछन आणण्यासारिखा आहे ह्मणून, त्यास मी कधींही संमति देणार नाहीं. नजराणा देण्याची गोष्ट काढल्यापासून तर ती विशेषच नाराज झाली. या प्रसंगीं, राघोबास या कामांत ढव-ळाढवळ करण्यास किंचितही अधिकार आहे, असें ती कबूल करीना.

---

१. गंगाधर यशवंत होळकरांपाशीं पेशव्यांनीं कारभारी ह्मणून दिला होता. मल्हाररावास जेव्हां प्रथमतः मोठ्या अधिकारास चढ-विलें तेव्हांच, त्याच्या दिवाणगिरीचें काम बाजीरावानें गंगाधर यशवंत यास दिलें.

ती ह्मणाली कीं, माझा मुलगा मेला तेव्हांच मल्हाररावाचा वंश खुंटला. आतां गादीवरील मागच्या दोन पुरुषांतील एकाची मी बायको, व दुसऱ्याची आई, या नात्यानें, गादीवर बसविण्यास मुलगा पसंत करणें न करणें, हा केवळ मलाच अधिकार आहे; व हा यथान्याय अधिकार, कसेंही संकट आलें तरी गाजविण्याचा माझा कृतसंकेत आहे. या प्रसंगीं अहिल्याबाईनें, केवळ आपल्या कुलाच्याच अनुयायी लोकांशीं सल्लामसलत करून न राहतां, माळव्यांत जितके मुख्यमुख्य मराठे सरदार होते तितक्या साऱ्यांशीं, सल्लामसलत केली असावी असें वाटतें. तिला व तिजबरोबर होळकर सरकाराला प्राप्त झालेल्या या बाणीच्या प्रसंगीं, तिच्या एकंदर वर्त्तणुकीवरून असें दिसून आलें कीं, बोलूनदाखविल्या प्रमाणें खरोखरीच तिचा कृतसंकेत होता, व तो संकेत ती निश्चयानें तडीस नेईलच नेईल. आपल्यास जबरदस्तीनें कोपऱ्यांत बसविण्याकरितां, राघोबा सैन्याची तयारी करीत आहे असें ऐकून, तिणें त्यास निरोप पाठविला व अंतःकरणापासून उपदेश केला कीं, स्त्रीबरोबर लढूं नको. त्यांत तुझ्या नांवास वट्टा लागेल; परंतु आब्रु कधींही प्राप्त होणार नाहीं. या खर्पूस निरोपास दृढता आणण्याकरितां, तिणें युद्धाची हरप्रकारें तयारी चालविली. होळकरांच्या सैन्यानें तिच्या कामीं अत्युत्साह प्रकट केला. तिणेंही मुत्सद्दीगिरी दाखवून, मैदानांत मी जातीनें लश्कर नेणार असें जाहीर केलें; व हुकूम दिला कीं, माझ्या लाडक्या हत्तीवर, हौद्याच्या चारी कोनास, तीरांनीं भरलेले भाते बांधा. प्रथमतः राघोबानेंही या मुकदम्याचा कडेलोट करण्याचा निश्चय धरिला होता असें दिसतें; परंतु त्याजबरोबर जाणारे सरदार लोक सर्व कांकूं करीत होते. महादाजी शिंदा व जानोजी भोसला यांणीं तर, राघोबाशीं व कृतघ्न दिवाण गंगाधरपंताशीं मिळून, होळकरांच्या स्वातंत्र्याचा नाश करण्याचें नाकारिलें. अहिल्याबाईनें आपलें वर्तमान माधवराव पेशव्यास लिहिलें होतें, तिकडूनही या संधीस राघोबास पत्र आलें; यामुळें तराजूचा कांटा अहिल्याबाईकडे चांगला-

वळला. खंडेरावाच्या आब्रूदार बायकोविरुद्ध बिलकुल चालूं नये ; राज्यकारभार पाहण्यास तिला निर्विवाद हक्क आहे; असा हुकूम माधवरावानें आपल्या चुलत्यास पाठविला. व तो, निमुटपणें त्यास ऐकावा लागला. मग पाहिलीच गोष्ट करितांना अहिल्याबाईनें आपल्या शहाणपणाचें उदाहरण दिलें. पुढें देशाची भरभर होऊन तिच्या कारकीर्दीस नांवलौकीक प्राप्त झाला, हें पुष्कळ अंशीं, तिणें प्रथम शहाणपणानें जी गोष्ट केली तिचेंच फळ होय. आपल्या सैन्याचें आधिपत्य करण्यास, व स्त्रीजातीमुळें जीं जीं कृत्यें आपल्या हातून होण्याजोगीं नव्हतीं तींतीं करण्यास, तिणें तुकोजी होळकरास योजिलें. हा आडनांवाचा होळकर खरा; परंतु मल्हाररावाचा नातेवाईक नव्हता.[१] शिपाई पेशाच्या नात्यानें मल्हाररावापाशीं तुकोजीची मोठी मान्यता होती, व त्याजकडे हुजूर पागेचें काम होतें. सांप्रतचा अधिकार मिळण्यापूर्वींच त्याणें असा लौकिक संपादिला होता कीं, "तुकोजी साधा, आढेवेढे न जाणणारा मराठा शिपाई आहे." आजन्मपर्यंत हा लौकिक त्याणें घालविला नाहीं. आतां वर लिहिल्याप्रमाणें व्यवस्था झाल्यानंतर राघोबा पुण्याकडे परत चालला. जातांना महेश्वरावरून जावें ह्मणून अहिल्याबाईनें त्यास निरोप पाठविला, व तेथें आल्यानंतर तिणें त्याचा अत्यंत आदरसत्कार ठेविला. पुण्यापर्यंत राघोबाबरोबर एक पलटन घेऊन जाण्यास तिणें तुकोजीस हुकूम दिला; व तेथें खुद्द पेशव्यांपासून वस्त्रें घ्यावीं, व तुह्मांस प्राप्त

सन १७६७.

१. गादीवरील सांप्रतच्या पुरुषाचा तुकाजी आजा होतो यासाठीं हल्लींचे कारभारी व आवांतर लोक त्यास मल्हाररावाचा नातेवाईक ह्मणतात; परंतु ही गोष्ट मुळांत खरी नाहीं.

* जावऱ्याचा माजी नबाब याणें एक सफरनामा लिहिला आहे त्यांत होळकरांची वंशावळ दिली आहे. त्या वंशावळीवरून तुकोजी, मल्हाररावाच्या सख्ख्या चुलतभावाचा मुलगा होता असें दिसतें.

झालेल्या उच्च स्थानावर कायम केलें आहे असें पत्र द्यावें, ह्मणून सांगितलें. तिच्या सर्व मनीषा तृप्त झाल्या. अखेर, गंगाधर पंतानें पूर्वी कामगिऱ्या केल्या आहेत व लौकिक संपादिला आहे, हें ध्यानांत आणून तिणें त्यास पुनः दिवाणगिरीवर कायम केलें.

तुकोजीस गादीवर बसविल्यापासून होळकरांच्या राज्यांत दोन ठिकाणीं अधिकार वांटला गेला. साधारण नियमांवरून तर्क केला तर, अशा तऱ्हेच्या अधिकाराचें स्वरूप एक आठवडाभर सुद्धां कायम राहूं नये; परंतु तें स्वरूप तीस वर्षेंपर्यंत कायम राहिलें, व त्यांत मत्सर अथवा राज्यलोभ हे विकार अंतर करूं सकले नाहींत. दोघांही पक्षांत सद्गुण व विचाराविचार व परस्परांविषयीं पूज्यबुद्धि असे, व त्यांस बहुत करून निरनिराळीं व दूरदुरच्या ठिकाणीं कामें पहावीं लागत असत, यामुळें वर लिहिल्याप्रमाणें स्थिति राहिली असें ह्मटलें पाहिजे.

मनुष्यांचे स्वभाव व त्यांच्या सवई कायम होतात अशा प्रौढ वयांत, सैन्याचें आधिपत्य करण्यास, व होळकरांच्या गादीचा अधिकारी ह्मणवून घेण्यास, अहिल्या बाईनें तुकोजीस योजिलें होतें. आपणच त्यास पसंत केलें हें मनांत आणून, त्याचें ती विशेष चालवी. व तोही, आपल्यावर उपकार करणाऱ्या अहिल्याबाईच्या ठिकाणीं, कृतज्ञता बुद्धि एक क्षणभर विसरला नाहीं. शिवाय या स्त्रीस, तिच्या सद्गुणानें, धर्मबुद्धीनें, व औदार्यानें सर्व हिंदुस्थान मानीत होतें. या मुळें तिची अशी वजनदारी चढली होती कीं, तिचे महदुपकार न स्मरून, (तिच्या वित्ताचा अथवा हक्काचा अपहार करणें तर दूरच,) तिची नुस्ती सांडासांड करावयाची इतकेंच जरी तुकोजीनें मनांत आणिलें असतें, तरी सर्व हिंदुस्थान त्याला शापदग्ध करितें; परंतु त्या प्रतापी शिपायास आपल्या मनाचा वारू आंवरण्यास वर लिहिल्या विचाराच्या अनीनीची जरूरच नव्हती. कांहीं दिवस नारोगणेश या नांवाच्या एका मुख्य कारभाऱ्याच्या वसांत तुकोजी फार होता, व तो नारोगणेश अहिल्या बाईविषयीं चांगलें मनांत आणित नसे हें जरी खरें आहे तरी, प्रथम-

पासून स्वीकारिलेला मार्ग सोडून तुकोजी कधींही आड गेला नाहीं. अहिल्याबाईपाशीं तो केवळ आज्ञांकितापेक्षां आज्ञांकिताचें नातें बाळगी; तो त्या राजपत्नीच्या ठिकाणीं आईसारखा भाव ठेवी, व जें करणें तें तिचा संतोष राहील असें करी; हमेषा तो आई या शब्दानें तीस हाक मारी; परंतु त्याजहून तिचें वय लहान होतें ह्मणून हें नातें मोहरेवर खोदलें नव्हतें. तिच्या हुकुमानेंच मोहरेवर, "मल्हारराव होळकराचा पुत्र तुकोजी," असे शब्द लिहिले गेले. राज्य कशा तऱ्हेनें चाललें होतें इकडे लक्ष दिलें तर, वर लिहिलेल्या गोष्टी अधिकच चमत्कारिक वाटतील. ज्यावेळीं तुकोजी दक्षिणेंत असे, (व एका प्रसंगीं तो एकसारिखा बारावर्षें दक्षिणेंत होता), त्यावेळीं सातपुड्याच्या दक्षिणेकडील आपल्या सर्व मुलकांची व्यवस्था तो पाही, व सातपुड्याच्या उत्तरेकडील मुलकांची व्यवस्था अहिल्याबाई पाही. अशावेळीं निरनिराळे खंड देणारे रजवाडे सालाबादचे खंड तिजकडेस पाठवीत. माळव्यांत तुकोजी फार दिवस रहात नसे; परंतु तो उत्तरहिंदुस्थानांत असला म्हणजे, तिकडील मुलकांचा वसूल व बुंदेलखंडांतील वसूल व राजपुतान्यांतील खंड तो गोळा करी. माळव्यांतील व नेमाडांतील परगणे हमेषाप्रमाणेंच अहिल्याबाईच्या व्यवस्थेखालीं असून, अशा प्रसंगीं दाक्षिणेंतील मुलकांची व्यवस्थाही ती ठेवी. होळकरांची तिजोरी अहिल्याबाईच्या हातीं असे. तिजोरीही बरीच मोठी होती; कारण तींत दोन कोटींची रोकड होती. या खेरीज तिजकडे खुद्द खासगींत सालीना अजमासें चार लक्षांची जमीन होती. हा चार लाखांचा वसूल व वर लिहिलेली तिजोरींतील रोकड, तिच्या मनास वाटेल त्याप्रमाणें ती खर्च करीत असे. बाकीचा राज्यांतील वसूल, एकंदर हिशेबीं लागून, राज्यव्यवस्थेच्या कामीं लाविला जाई. जमाखर्ची हिशेब फार मेहेनतीनें बरोबर राखिले जात. मुलकी कामगारांचे व शिबंदीचे पगार वांटून, दौलतखजीन्यांत जी शिलक राही ती, बाहेरप्रांतीं असलेल्या लष्करांकारितां अहिल्याबाई तुकोजीकडे रवाना करी. हमेष दूरदेशांत व कामगिरींत रहावें लागत असे यामुळें, तुकोजीस

वारंवार आपल्याच अंगावर जिम्मा घेऊन कामें करणें भाग येई; परंतु ज्याज्या प्रसंगीं होळकरांच्या एकंदर राज्याच्या संबंधानें प्रश्न उभा राही, त्यात्या प्रसंगीं तो आहिल्याबाईकडे लिही. युध्धाच्या अथवा सल्याच्या प्रसंगीं, अथवा परराज्याशीं संबंध ठेविण्याच्या प्रसंगीं, होळकरांच्या दरबारीं असलेले सर्व लहानमोठ्या राजांचे वकील, आाहिल्याबाईस मुख्य समजत. खुद्द तिणें नेमिलेले वकील पुण्यास, हैदराबादेस, श्रीरंगपट्टणास, नागपुरास, लखनौस, व कलकत्त्यास राहत. लहानसहान गुमास्ते, लहानसहान राजेरजवाड्यांच्या दरबारीं राहत; व विशेषेंकरून खंड देणाऱ्या रजवाड्यांच्या दरबारीं असत.

वर लिहिलें आहे त्यावरून दिसून येईल कीं, होळकरांच्या गादीची वास्तविक मालकीण अहिल्याबाईच होती. व तुकोजी, तिणें आपल्यास उंच पदवीस चढविलें, व तिचा आपल्यावर पूर्ण विश्वास आहे, इतकें वस्स आहे, असें समजून तृप्त असे. अहिल्याबाईच्या जीवांत जिव होता तोंपर्यंत सैन्याचें त्यानें अधिपत्य करावें, व ज्या ज्या प्रांताचा वसूल विशेष सोईनें गोळा कारितां येईल त्या त्या प्रांताचा वसूल गोळा करावा. याहून अधिक अधिकार तो चालवीत नसे. होळकर सरकाराचे त्या वेळेचे सारे नोकर असेंच सांगतात. तुकोजीची स्तुति करण्याविषयीं त्यांस वास्तविक इच्छा असतां, व त्यांतून त्याचा नातू सांप्रत गादीवर असतां, ते लोक त्याजविषयीं सर्वांत विशेष स्तुतिपर कायतें हेंच सांगतात कीं, आहिल्याबाईच्या सर्व आशा त्याणें तृप्त केल्या; व तिच्या अखेरच्या श्वासापर्यंत तो आज्ञांकित राहिला; व त्याणें तिची चांगली चाकरी केली.

वर लिहिलेंच आहे कीं, पेशव्यांच्या हुजुरांत हजर राहण्याकरितां तुकोजी[१] पुण्यास चालता झाला; परंतु यावेळीं तो दक्षिणेंत थोडे दिवस

---

१ तुकोजी दक्षिणेंत असला ह्मणजे, पेशव्यांशीं बोलणें चालणें सर्व त्याच्याच द्वारें होई; परंतु त्याच्या पश्चात्, अहिल्याबाई पुण्यास हुषार कामगार ठेवीत असे.

राहिला. पाणीपतच्या लढाईनंतर, भरतपूरच्या जाटराजानें पराजित झालेल्या मराठेलोकांशीं चांगला सलूक ठेविला, यामुळें त्यांच्या मनांत त्याजविषयीं कृतज्ञताबुद्धि उपजली होती; त्याच प्रकारें उत्तरहिंदुस्थानांतील पुष्कळ मुसलमानी सरदारांच्या व विशेषेंकरून नजीबुद्दौल्याच्या उद्दाम वर्तणुकीमुळें, ते सूड उगविण्याकरितां संतप्त झाले होते यामुळें, नजीबुद्दौल्यावर हल्ला करण्याचा मराठ्यांनीं संकेत केला. येथील किल्ल्यांत नजीबुद्दौल्याच्या घरचीं माणसें असत. हा बेत तडीस नेण्याकरितां दक्षिणेंतून एक मोठें सैन्य रवाना झालें. या मोहिमीवरोवर तुकोजी होता, परंतु पेशव्यांकडून रामचंद्रगणेश विनीवाला ह्मणून सेनापति[१] आला होता, त्याच्या हाताखालीं तो वागे. एका फारशी बखरीवरून असें दिसून येतें कीं, नजीबखान व मल्हारराव यांजमध्यें प्राचीन मैत्री होती हें कारण लावून, तुकोजीनें त्याशीं बोलणें लाविलें. असें करण्यास रामचंद्रपंताची संमति होती, परंतु महादाजी शिंदा त्यास फार रागें भरला. त्याणें तुकोजीस विचारिलें कीं, जमतांनां आपण सूड उगविण्याकरितां एकत्र जमलों असें असतां, आतां तुह्मी सूड उगविण्याबद्दल तहाचें बोलणें लावितां काय? नजीबखानाजवळ व आफगाण लोकांजवळ जो मुलूक आहे तो, पेशव्यांच्या वतीनें मला काबीज करणें आहे. माझा भाऊ दत्ताजी व पुतणे जनकोजी व संभाजी हे पाणीपतच्या मैदानावर पडले, व खुद्द माझा पाय तुटला व निकामी झाला. याबद्दल रक्तास रक्त मी घेईन. तुकोजी होळकर या उमरावास भाई ह्मणतो ह्मणून, सूड उगविण्याची माझी उमेद मी सोडणार नाहीं. तथापि तुह्मी पुण्यास माधवरावाकडे लिहून पाठवा. आणि तुह्मी करितां हें ठीक आहे अशी आज्ञा पाठवून माधवराव

---

१ या वेळीं रामचंद्रगणेशाबरोबर ६० हजार सैन्य होतें. त्यांत पुष्कळ पेंढाऱ्यांची भरती होती.

मंजूरी देईल तर, मी नोकर आहें ह्मणून मला ऐकणें भाग येईल. महादाजीचे असे विचार होते तथापि, तुकोजीनें दिलेली मसलत मराठ्यांनीं टाकिली नाहीं. नजीबुद्दौलानें मित्रभाव दाखविला आहे हा प्रसंग साधावा हेंच नीट असें ठरलें; कारण जर अशा शूर व लोकप्रिय सरदाराशीं खटला माजवावा तर, न जाणों मुसलमानांचें पुनः ऐक्य होईल. खेरीज नजीबुद्दौलाशीं तह केला असतां, जाट व राजपूत लोकांवर खंड बसविण्यास कोणी आडकाठी घालणारा राहणार नाहीं; व पुढील प्रसंगाकरितां संपत्ति वाढविण्यास सोपें जाईल. हीच मसलत मराठ्यांनीं अमलांत आणिली; व जाट व राजपूत या आपल्या हिंदुमित्रांस लुटण्यामध्यें बारा महिने घालविले[२]. आतां नजीबुद्दौल्याचा

हिजरी ११८५. अंत समीप आला होता. तो मराठ्यांच्या छावणींत आला. आणि महादाजी शिंद्याचा व त्याचा सलूक करण्याविषयीं लोकांनीं यत्न मांडिला, परंतु ते दोघेही उघड्या मनानें वागले नाहींत. येथून आपल्या राजधानीस परत गेल्यावर नजीबुद्दौला लवकरच मृत्यु पावला. मरणापूर्वीं कांहीं आठवडे, त्याणें आपला मुलगा जो जावेतखान त्याचा हात तुकोजीच्या हातीं दिला, आणि ह्याचें संरक्षण कर ह्मणून तुकोजीस सांगितलें. आपल्या कुळाची लौकरच वाताहात होईल असें त्याणें भविष्य केलें होतें. सर्व उत्तरहिंदुस्थान फत्ते करून घेण्यास, मराठ्यांस राहिलेली शेवटची हरकत नजीबुद्दौल्याच्या मरणानें दूर झाली. मग त्या प्रांताची मुख्य राजधानी व त्यांतील सर्वोत्तम भाग, त्यांनीं लौकरच

---

१. नबाब कमालुद्दीनाचा बाप मिरुद्दीनहुसेनखां याणें, सर च्यार्लस म्यालेटच्या सांगण्यावरून लिहिलेल्या फारशी बखरींतून हा उतारा घेतला आहे. ही बखर कमालुद्दीनाच्या मुलानें मला दिली. हा हल्लीं माळव्यांतील गायकवाडांच्या फौजेचा सेनापति आहे. मीरुद्दीन जीं वर्तमानें लिहितो, तीं होत असतां तो हजर होता.

२. यांत ज्या भरतपूरच्या नवलसिंगाशीं मराठे इतकी दोस्ती ठेवीत, त्या नवलसिंगावरच मुख्य संकट ओढवलें.

काबिज केले. गयाळी शाहआलमबादशाह त्यांस मदतरूप झाला. त्यांणें इंग्रज सरकारचा धरिलेला आश्रय सोडून, आपल्या धर्माचे व कुलाचे शत्रु जे मराठे, त्यांशीं स्नेह केला. त्यांस आपल्या बादषाही पदवीची व उरलेल्या थोड्या बहुत वजनदारीची मदत दिली; व त्यांच्या सामर्थ्याच्या वृध्धीस आड येण्याजोगें फक्त नजीबुद्दौला या एक्या मुसलमानी सरदारास मात्र समर्थ राहिलें होतें, त्याचानाश केला. हीं वर्तमानें घडल्या नंतर सन १७७२ त महादाजी शिंद्याची सत्ता फार वाढली, हें वर लिहिलेंच आहे. तो लैकरच दिल्लीचा व दिल्लीच्याआसपासच्या प्रांतांचा वस्तुतः बादशाहच झाला. तुकोजी होळकर माळव्यांत परत आला. त्याची योग्यता, विशेष कर्त्ता व विशेष लोभी पुरुष जो महादाजी त्याच्या वाढत्या नशीबापुढें, कमी होऊं लागली; व तो दुसऱ्या प्रतीच्या सरदारांत गणिला जाऊं लागला.

सन १७७२ त माधवराव पेशवा मृत्यु पावला; व सन १७७३ त त्याचा धाकटा भाऊ नारायणराव, राघोबा दादाकडून मारला गेला; यामुळें या प्रसंगीं सर्व मराठे सरदार दक्षिणेंत गेले. तेथें खुनी राघोबाविरुद्ध, बाराभाई या नांवानें त्यांनीं एक जूट उभारिला. त्या प्रसिद्ध जूटांत महादाजी शिंदा व तुकोजी होळकर सामील झाले. मग त्या दोहों सरदारांचें इंग्रज सरकाराशीं युध्ध उभें राहिलें. मराठ्यांच्या इतिहासांतील या बाणीच्या प्रसंगीं, पापाच्या व राज्यापहाराच्या पक्षाशीं इंग्रज सरकाराच्या नावाचा योग झाला होता. नारायणराव पेशवा मेल्यानंतर त्याचा मुलगा माधवराव जन्म पावला, तो, पेशव्यांच्या गादीचा मालक अशी, एकत्र झालेल्या मराठ्या सरदारांनीं द्वाही फिरविली. परंतु पेशव्यांच्या उंच पदवीची वास्तविक सत्ता, आतां बाळाजी जनार्दन याच्या हातीं आली होती. यास बहुधा नाना फडणवीस म्हणतात. हा ब्राह्मण कर्ता होता, व याणें राघोबाविरुद्ध जमलेला जूट बनविण्यांत मुख्य अंश घेतला होता. या जुटापासून काय काय परिणाम झाले हें

पूर्वीं सांगितलेंच आहे. पुढें सालप्याचा तहनामा[1] झाला, व ज्यांनी जूट, बनविला होता त्यांस यश प्राप्त झालें.

टिपूसुलतानाशीं पुण्याच्या दरबाराचें व निजामाच्या दरबाराचें सन १७८५।८६. जें संयुक्त युद्ध चाललें होतें, त्यांत तुकोजी होळकरानें बराच पुढारीपणा घेतला होता असें दिसतें. तें युद्ध समाप्तीस गेल्यानंतर, तो अहिल्याबाईची भेट घेण्याकरितां महेश्वरीं गेला; परंतु तेथें फार थोडे दिवस राहिला. कारण इतक्यांत त्याला पुनः कामगिरीवर जाण्याचा हुकूम झाला. या कामगिरीच्या परिणामीं, बाजीराव पेशव्याचा दासीपुत्र जो अलीबहादर[2], त्याची सत्ता बुंदेल खंडांतील बऱ्याच भागावर, व महादाजी शिंद्याची सत्ता सर्व उत्तर हिंदुस्थानावर, स्थापना पावली. महादाजीच्या लष्कराच्या मानानें तुकोजीचें लष्कर फार थोडें होतें ह्मणून, यावेळीं त्यास फारसा फायदा झाला नाहीं. तथापि नवीन जिंकिलेल्या प्रांताची बरोबर वांटणी मिळण्याविषयीं होळकरांनीं दावा केला, व महादाजीनें तो कबूलही केला. मग एकमेकांचे हिशेब फडशा करितेवेळीं, होळकरांचें देणें आपल्याकडे शिलक रहातें असें कबूल करून, फेडी करितां कितीएक परगणेही त्याणें त्यांस दिले.[3] परंतु महा-

---

१. सन १७७६ त करनल अपटनानें मराठ्यांशीं एक तह केला होता, परंतु त्याजवर पुनः युद्ध सुरू झालें होतें व तें युद्ध सालप्याचा तह ठरेपर्यंत समाप्तीस गेलें नव्हतें.

२. हा पहिल्या बाजीरावास एका मुसलमान स्त्रीपासून झाला. अशा जन्मामुळें आपल्या बापाच्या जातीचे धर्म पाळण्यास त्यास सांपडले नाहींत. जरी बाजीराव त्यास आपल्या पुत्रांत लेखी तरी, तो आईच्या धर्मांतील ठरला होता.

३. हिशेबाचे घोळ राणोजी शिंदा व मल्हारराव होळकर यांजपासून चालत आले होते, व त्यांचा ह्या दिवसापर्यंत फडशा झाला नव्हता.

दाजीच्या वरचड सत्तेमुळें, या देणगीपासून होळकरांस हांशील प्राप्त झालें नाहीं. पेशव्यांच्या दरबारीं आपलें वजन स्थापण्याच्या हेतूनें महादाजी पुण्यास गेला तेव्हां, मागें त्याच्या सेनानायकांशीं, व मुख्यत्वेंकरून लखोबा दादा ह्मणून एक होता त्याशीं, तुकोजीचा कज्जा झाला. पूर्वीं सांगितलेंच आहे कीं, यामुळें लाखेडीच्या घाटावर तुकोजीची
१७९२. व शिंद्याची लढाई झाली,व तींत डीबॉईनाच्या कंपूनें तुकोजीचा पराजय केला[1]. या लढाईपासून प्रस्तुत कांहीं एक विशेष निष्पन्न झालें नाहीं. शिंद्याचें लष्कर उत्तरहिंदुस्थानाकडे परत गेलें, व तुकोजीचें लष्कर इंदुरीं व महेश्वरीं परत आलें. परत येतांना त्यांणीं माळव्यांतील महादाजीच्या मुलुकावर हल्ला करून सूड उगविला नाहीं, या गोष्टीवरून असा एक तर्क वाटतो कीं, लाखेडीस झालेला झगडा खुद्द तुकोजी व महादाजी यांच्यामध्यें नव्हता; परंतु शिंदे व होळकर यांच्या सेनापतींमध्यें होता.

यावर तुकोजी माळव्यांत थोडे दिवस राहिला, कारण निजामअल्लीखानावर स्वारी करण्याचा फार दिवसांपासून बेत होत होता, तो सिद्धीस नेण्यास पुण्यास मराठे सरदार जमत चालले होते, त्यांत दाखल होण्या-
सन १७९५. करितां त्यास पाचारण पोंचलें. या स्वारीच्या परिणामाचें वर्णन मागें केलेंच आहे. प्रस्तुतकाळीं तुकोजी होळकराचें वय ७० वर्षांचें झालें होतें. ज्या मराठी सरदारांनीं आपल्या देशाच्या प्रतापाचें शिखर पाहिलें त्यांत, महादाजी शिंद्याच्या मागें तुकोजी सर्वांत कपि मोजिला जाई; परंतु वस्तुतः त्याचें सामर्थ्य दौलतराव शिंद्याहून कमी होतें. तारुण्याच्या तलखीमुळें दौलतराव, काय तें सैन्याचें सामर्थ्यच मुख्य असें लेखी. यामुळें निजामाचा पराजय

---

१. घरांतील फिसादीमुळें हा पराजय झाला असें लिहिलें आहे. तात्या जोगानें मजजवळ दिलेल्या बखरींत, फिसादीचा आरोप खुद्द काशीराव व बापू होळकर यांजवर आहे. काशीराव, तुकोजीचा मुलगा; व बापू पुतण्या.

झाल्यानंतर, व माधवराव पेशव्याचा काळ झाल्यानंतर, जीं वर्तमानें घडलीं त्यांत, वयाकडे व लौकिकाकडे पाहिलें असतां जितका तुकोजीनें अंश घ्यावा, त्याहून कमी घेतला असें दिसतें.

सन १७९७. या काळच्या अप्रतिम खटाटोपांमध्यें, तुकोजी, शिंद्याच्या बरोबरीचा स्वतंत्र सरदार आहे असें न भासतां, केवळ त्याचा कोणी पाठराखा आहे असें भासतें. बहुधा वयामुळें व जरेमुळें त्याच्यानें आतां मेहेनत होत नव्हती असें वाटतें. या खटाटोपांची अखेर होण्यापूर्वींच, तो मृत्यु पावला. तुकोजी शिपाईगिरींत हुषार, व माणुसकींत आढेवेढे न घेणारा साधा पुरुष होता. लबाडीपेक्षां त्याजमध्यें धैर्य विशेष होतें असा, त्याचा मागें लौकिक उरला आहे. लबाडीपेक्षां धैर्य विशेष, असें मराठे सरदारांविषयीं लिहिणें ह्मणजे, लहान सहान स्तुति नव्हे. अहिल्याबाईपाशीं कशा तऱ्हेनें स्वभाव सांभाळून आणि कृतज्ञता बुद्धि व आज्ञांकितपणा दाखवून तो वागे, हें पाहून तुकोजीवर आपली भक्ति बसते. त्यास गादी प्राप्त झाल्या पासून अहिल्याबाईच्या मरणापर्यंत पुष्कळ काळ लोटला; परंतु त्या साऱ्या काळांत उघड झगडा तर दूरच, परंतु खरोखर भांडणसुद्धां त्या दोघांमध्यें झालें नाहीं. या गोष्टीपासून त्या दोघांसही, परंतु विशेषेंकरून अहिल्याबाईस योग्यता प्राप्त होते. मध्यहिंदुस्थानांतील होळकरांच्या मुलकाची व्यवस्था तिणें कशी ठेविली होती, हें पाहणें आतां जरूर आहे. वर लिहिल्याप्रमाणें त्यांत थोडकींच वृत्तें आहेत. तीं नाहींत हाच तिच्या व्यवस्थेंत गुण घ्यावयाचा. तीस वर्षेंपर्यंत अधिक, होळकरांच्या कुळाची जी भरभर झाली, त्या भरभरीस अहिल्याबाईच्या राज्यव्यवस्थेचें स्वरूप, पाया होय. अखेर महादाजी शिंद्याच्या बुद्धिवैभवामुळें व प्रतापामुळें, जरी होळकरांचें कूळ अंमळ बाजूस पडलें तरी, तिच्या जिवांत जीव होता तोंपर्यंत, मराठी राज्याच्या मुख्य शाखेंतील एक शाखा अशी जी होळकरांची पदवी, ती कायम होती. तुकोजी व अहिल्याबाई, विभागून घेऊन अधिकार कसे चालवीत, हें वर वर्णिलेंच आहे. माळव्यांतील

व नेमाडांतील प्रांतांची व्यवस्था पाहणें हें तिजकडे मुख्य काम होतें. तिचाही मुख्य हेतु हा असे कीं, न्यायानें व विचाराविचारानें अधिकार चालवून, या देशांची स्थिति सुधारावी व आपल्या प्रजेचीं सुखें वाढवावीं. मुलकी शिबंदी खेरीज तिणें आपल्या जवळ सैन्य ठेविलें नव्हतें; परंतु तिच्या न्यायी कारकीर्दीमुळें, देशांत स्वस्थता राखण्यास ती शिबंदीच पुरे झाली. बाहेरच्या शत्रूपासून संरक्षण करून आपला नांव लौकीक राखण्यासाठीं, उत्तरहिंदुस्थानांत व दक्षिणेंत जें सैन्य युद्धप्रसंगांत गुंतलें असे त्यावर, तिचा भरंवसा होता.

बायकांस बाहेर हिंडूं न देणें अथवा त्यांस हमेष बुरखा घालणें ही हलकट चाल, कांहीं प्रांतीं हिंदु लोकांनीं विजयी मुसलमानांपासून घेतली खरी, परंतु त्या प्रांतांखेरीज बाकी ठिकाणीं त्यांजमध्यें हा प्रघातनाहीं.[१] आपल्या धर्मांत आधार नाहीं अशा या चालीचा बहुधा, महाराष्ट्रांतील उंच वर्णांनीं, ब्राह्मणांनीं सुद्धां, (क्वचित् स्थळाखेरीज) धिःकार केला आहे [२] तेव्हां आहिल्याबाईनें राज्यकारभार आपल्या खुद्द अंगावर घेतला, व ती प्रतिदिनीं खुल्या दरबारांत कामकाज पाहात पुष्कळवेळ बसे, यांत ती लोकरूढीविरुद्ध वागली नाहीं. जमीनीवर नेमस्त दर ठेविणें, व पाटील पटवारी व जमीनीवरील हक्कदार यांचे हक्क, केवळ धर्मसंबंधी गोष्टीप्रमाणें पवित्र मानून चालविणें, हे तिच्या राज्यव्यवस्थेचे मूळ पाये

१. राजपूत लोकांमधील उंच वर्णांनीं, व विशेषेंकरून त्यांच्या राजेलोकांनीं व सरदार लोकांनीं, ही चाल मुसलमानांपासून घेतली आहे. त्यांच्या लोकप्रिय कथांतून अशीं पुष्कळ वर्णनें आढळतात कीं, त्यांवरून असें अनुमान होतें कीं, ज्याकाळीं सर्व हिंदुस्थानभर हिंदूच राज्य करीत होते त्याकाळीं, या प्रकरणांत त्यांचा, सांप्रतच्या प्रघाताहून भिन्न प्रघात होता.

२. मिस्तर स्कॉट वारींग याणें मराठ्यांच्या इतिहासांत लिहिलें आहे कीं, माजी बाजीराव पेशव्याच्या बायकोस घोडा फिरवितांना पुष्कळदां मी पाहिलें आहे.

होतें. हरएक फिर्याद ती जातीनें ऐकत असे. व जरी हमेष, लोकांचे इनसाफ करणें न्यायाधीशांकडे व पंचांकडे सांगे तरी, कोणी खुद्द तिजकडेसच जाऊं म्हटलें तर, तसें होणें सहज होतें. रयतेस न्यांय इनसाफ यथार्थ देणें हें आपलें कर्तव्यकर्म आहे, अशी तिची बळकट बुद्धि होती. लोक सांगतात कीं, ज्यावेळेस तिजकडे अपीलें होत त्यावेळेस, कितीही लहान खटला असला तथापि, त्याची चौकशी सहनशीलतेनें व थकव्याकडे अलक्ष करून ती करी.

अहिल्याबाईविषयीं माहिती सांगण्यांत, होळकरांच्या कुळाचे नातेवाईक व अनुयायी लोक हे पक्षपात करतील असें समजून, व तिच्या कारकीर्दींतील ज्या बारीक गोष्टी बहुधा आपण ऐकतों, त्यांपासून मनावर खोटा ठसा न व्हावा असें मनांत आणून, मी आवांतर लोकांकडूनही हकीकती मिळविल्या. मला असें वाटत होतें कीं, अहिल्याबाईच्या अमलाखालीं जो पूर्वीं मुलूक होता, त्यांत, तिजनंतर जी विपरीत अव्यवस्था सुरू झाली, त्या अव्यवस्थेचा तिच्या व्यवस्थेशीं विरोध दिसून यावा ह्मणून, तिचें चित्र काढितांना खूपच रंग भरून, लोक त्यांत चमक आणितात. ह्मणून मी सर्व तऱ्हेच्या व सर्व वर्णांच्या लोकांपाशीं पूसतपास करूं लागलों; परंतु जेव्हां जेव्हां तिचें नाव निघे तेव्हां तेव्हां लोक तिची स्तुतीच करीत; स्तुती करीत काय, आशीर्वादांचा तिच्यावर वर्षावच करीत. खरोखरीच, लोकांच्या या बुद्धींत फरक यावा अशी एकही गोष्ट माझ्या कानीं आली नाहीं. जितका जितका ज्यास्त ज्यास्त शोध करावा, तितकें तितकें ज्यास्त ज्यास्त कौतुक वाटतें. सर्वांत ह्या गोष्टीचें विशेष आश्चर्य वाटतें कीं, आपण होऊन अंगिकार केलेले श्रम पुरे पाडण्यास, तिचें मन व देह दोन्ही कसे समर्थ झाले. वयाच्या तिसाव्या वर्षांपासून, साठावे वर्षीं काळ झाला[१] तेथपर्यंत, हे परिश्रम ती निरंतर करी. राज्य कारभारांतून जो काळ उरे तो सर्व, धर्मकृत्यांत व भजनपूजनांत

१. अहिल्याबाई सन १७६५ त राज्यकारभार पाहूं लागली. सन १७९५ त तिचा काळ झाला.

ती घालवी. धर्माच्या ठिकाणीं वळकट भाव असल्यानें, ऐहिक कामकाजें करण्यांमध्येंही तिचें मन दृढता पावलें. ती ह्मणत असे कीं, सत्तेच्या बळावर जें जें मी करीन त्या त्या साठीं, भगवंतापाशीं मला उत्तर करावें लागेल. फार सख्तीच्या सजा देण्याविषयीं, जेव्हां एकादे वेळीं तिचे मंत्री लोक गळ घेत तेव्हां, धार्मिकपणा व परोपकार यांमध्यें तल्लीन झालेला हा आत्मा ह्मणे कीं, भगवानानें निर्माण केलेल्या प्राण्यांचा नाश करण्यांत, आपण सर्व मृत्युलोकींच्यांनीं फार सावधगिरी ठेवावी.

अहिल्याबाई दिवस कसा घालवी, या विषयींची हकीकत मी लिहून आणिली आहे. त्याजवरून असें दिसतें कीं, सूर्योदयापूर्वीं एक तास उठून स्नानादि पूजाअर्चा तिणें कराव्या. नंतर नियमित काल पर्यंत पुराणश्रवण करावें. नंतर दानें द्यावीं, व आपल्या समक्ष ब्राह्मणांस भोजनें घालावीं. इतकें झाल्यावर तिचें ताट वाढून येई. जेवणांत सर्व उद्भिज पदार्थ असत. मांसान्न घेण्यास जातीचा प्रत्यवाय नसतां, तिणें तें वर्जिलें होतें. भोजन आटोपल्यानंतर, पुनः ईश्वरस्तव करून, थोडा काळ निद्रा घ्यावी. निजून उठल्यानंतर, पोषाक करून दोन वाजण्याच्या अमलांत दरबारांत जावें. तेथें बहुधा तीस सायंकाळचे साहा वाजत. पुढें दोनतीन तास पूजाअर्चा व फराळ करण्यांत घालवून, सरासरी नऊ वाजण्याच्या सुमारास पुनः तिणें सरकारी काम पहावयास लागावें, व तें अकरा वाजे तोंपर्यंत पहावें. मग अकरा वाजून गेल्यानंतर, निजावयास जावें. याप्रमाणें भजनपूजन, मिताहार, व परिश्रम यांत जाणाऱ्या आयुष्यकृत्यांत, निराहार उपासांचे दिवस, सणा वारांचे दिवस, व निकडीच्या सरकारी कामकाजांचे दिवस, यां खेरीज अंतर होत नसे. ( निराहार उपास व सणवार अहिल्याबाई फार पाळी. )

आपल्या मुलकांत बंदोबस्त ठेविण्यामध्यें, लोकांस ऐकून आश्चर्य होईल असें यश, अहिल्याबाईस प्राप्त झालें. ज्या नियमास अनुसरून

ती वसूल गोळा करी, व न्याय इनसाफ करी, त्या नियमांचा उल्लेख पुढें होईल. येथें इतकेंच सांगणें पुरे कीं, परराज्यांशीं तिचा इतका चांगला व्यवहार राहिला कीं, बहुधा तिच्या राज्यावर कोणीही स्वारी केली नाहीं. एकदां मात्र उदेपूरच्या अलशी राण्याच्या जातभाईनीं, रामपुरा वळकवण्याचा यत्न केला होता; व त्यांस कांहीं दिवसपर्यंत त्या राण्यानें मदत दिली होती; परंतु त्यांत त्यांस यश प्राप्त झालें नाहीं. बाहेर पर-राजांनीं हल्ले केले नाहींत या पेक्षांही, अंतर्व्यवस्थेंत कांहीं एक हरकत आली नाहीं हें पाहून, विशेष आश्चर्य वाटतें. निरुपद्रवी लोकांशीं, व त्याच प्रमाणें दंडेली व लुटालूट करणाऱ्या लोकांशीं, अहिल्याबाई जी वागणूक ठेवी, त्या वागणुकीचें हें फळ होय. निरुपद्रवी लोकांस ती भक्तीनें वागवी, व फिसादी लोकांशीं जरी सख्तीनें व करारानें वागे तरी त्यांत न्याय व विचाराविचार पाही. कारभारी लोक फार दिवस अधिकारावर राहातात किंवा त्यांचा अधिकार लौकर जातो, तसेंच माहलांतील कामदार लोकांचा, व आवांतर सरकारी कामदार लोकांचा नांवलौकिक कसा आहे, हें पाहून जसें हिंदुस्थानांतील एकाद्या राज्याचें स्वरूप ध्यानांत येईल तसें, दुसऱ्या कशापासून येणार नाहीं. आपल्या अधिकाऱ्यांस चांगलें वाईट ह्मणतांना, हिंदुस्थानी लोकांचा हाच कस आहे. अहिल्याबाईच्या सर्व कारकीर्दींत, एक गोविंदपंत गानूचा कारभार. गोविंदपंत उत्तम आब्रूचा ब्राह्मण असे. याचप्रमाणें अहिल्याबाईचे महाली कामगारही, फारसे बदलत नसत[२].

---

१. अहिल्याबाईनें हें वर्तमान ऐकतांच, आपल्या पहाऱ्यावरील शरीफ भाई नावाच्या मुख्य अधिकाऱ्यास, कांहीं सैन्य देऊन, तिकडे रवाना केलें. शरीफभाईनें, मंदोसराच्या उत्तरेस बारा कोसांवर पळसूडा ह्मणून खेडें आहे तेथें, राण्याच्या फौजेचा पराजय केला. पराजयाची वार्ता ऐकून, राण्यानें तहाचें बोलणें लाविलें, व अहिल्याबाईनें तें बोलणें मान्य केलें.

२. इंदूरच्या कमावीस दारीचें काम वीस वर्षे अधिक, खंडेराव नांवाच्या

इंदूर पूर्वी लहानसें खेडें होतें, त्यास अहिल्याबाईनें मातबर शहराची योग्यता आणिली. या करितां इंदूरावर तिची विशेष भक्ति असे. इंदुरांतील राहणाऱ्यांची ती कशी आईप्रमाणें काळजी घेई, याचीं पुष्कळ चमत्कारिक उदाहरणें आहेत. एकेवेळीं देवीचंद नांवाचा एक श्रीमान सावकार, पोटीं संतान नसतां इंदुरांत मरण पावला. त्यावेळीं तुकोजी होळकराच्या सैन्याचा तळ तेथें पडला होता. कित्येक मतलबी पुरुषांच्या फुसलावणीवरून, या सावकाराच्या संपत्तीचा कांहीं हिस्सा बळकवावा असें, तुकोजीनें मनांत आणिलें. देवीचंदाची बायको तावडतोब महेश्वरीं गेली, व तिणें माझें सरंक्षण करा असें अहिल्याबाईस विनविलें. अहिल्याबाईनें तिचें बोलणें ऐकिलें, व आपल्या भ्रताराच्या घरादाराची व मालमत्तेची, ही बाई पुरी मालकीण आहे असें ठरवून, लागलींच तीस वस्त्रें दिलीं, व तुकोजीस हुकूम पाठविला कीं, तुह्मीं इंदुरापासून अमळ अंतरावर उतरावें, व जुलूम करून माझ्या शहरास त्रास देऊं नये. प्रथम केलेल्या चुकीबद्दल, अहिल्याबाईची एकदम आज्ञा मानून, तुकोजीनें प्रायाश्चित्त केलें. व या गोष्टीपासून इंदूरशहरास अहिल्याबाई विशेषच प्रिय झाली. या शहरीं आज दिवसास तिच्या नांवावर लोक भक्ति ठेवितात इतकेंच नाहीं, तर त्या नांवाची पूजा करितात असें म्हटलें तरी चालेल.

राज्यांत अंतर्यामीची व्यवस्था ठेविण्यामध्यें, महादाजी शिंद्याच्या सामर्थ्यापासून व लौकिकापासून, अहिल्याबाईस बरीच मदत झाली. आरंभीं महादाजीचे तिजवर पुष्कळ उपकार होते; आणि जीवांतजीव होता तोंपर्यंत तीही त्याशीं मित्रभावानेंच वागली. त्याच्या मैत्रीचें महत्व ती उत्तम तऱ्हेनें जाणत असे. अहिल्याबाईस मदत देण्यांत, महादाजी निस्पृहपणानें वागला असावा असें, त्याच्या स्वभावाकडे पाहिलें असतां

---

ब्राह्मणाकडे होतें. तो खंडेराव वेळच्यावेळीं वसूल गोळा करितो, हें पाहून अहिल्याबाईस जो आनंद होई त्याहून, त्याच्या अंमलांतील रयत सुखी व समाधानी आहे, हें पाहून विशेष आनंद होई.

वाटत नाहीं. मल्हारराव होळकरानें मागें ठेविलेल्या धनाचा कांहीं अंश प्राप्त व्हावा अशी, कदाचित् त्याची इच्छा असेल. तथापि लोकांत आपली वाहवा झाली असतां काय हांशील आहे हें, त्याच्या इतकें दुसरा कोणी जाणत नव्हता. महादाजी अहिल्याबाईशीं मैत्रीनें वागतो, असें लोकांस वाटविल्यास आपण आपला लौकिक किती वाढवितों, हें तो पक्कें जाणत होता. त्याची मदत तिणें कसी संपादिली हें बरोबर दिसून येत नाहीं, परंतु हें खरें आहे कीं पुढें तिणें त्यास तीस लक्ष रुपये उसने ह्मणून दिले. व त्याबद्दल त्याणें रोखाही लिहून दिला; परंतु त्याची फेड करण्याचा त्याचा हेतु असेल असें दिसत नाहीं.[१] आपण तिशीं मैत्री राखून कार्य करितों, हाच कर्जाच्या फेडीहून विशेष लाभ आहे, असें तो बहुधा जाणत असेल. त्याणें आपल्या अमीन लोकांस, व इतर मुलकी व लष्करी कामगारांस, हुकूम दिला होता कीं, तुह्मीं अहिल्याबाईची हमेष मदत ठेवावी. या योगानें राज्यव्यवस्थेंत तिचें जसें साहित्य झालें तसें, दुसऱ्या कोणत्याही योगानें झालें नसतें; कारण होळकर व शिंदे यांचा मुलूक एकमेकांत मिसळलेला होता. अहिल्याबाईच्या अधिकाराखालीं, होळकरांचे टांकेदार अशायोग्यतेनें व विचारानें वागविले जात कीं, त्यांजकडील खंड येण्यास हरकत एकादेवेळीं येई. अशी हरकत आली असतां, ती जेव्हां रागानें पत्रें लिही तेव्हां, त्या टांकेदारांस इतकी दहशत बसे कीं, त्यापासून कार्यच होई. हीं रागाचीं लिहिणीं जशीं सख्त असत, तशींच यथार्थही असत. लुटावयाचें सामर्थ्य अंगीं असल्यानें, जे गिरासे रजपूत हक्कदार झाले होते, त्यांच्याशीं अहिल्याबाईनें सामोपचारानें व योग्यरीतीनें ठराव केले.[२] महादाजीशिंद्यानेंही त्यांच्याशीं अशीच नीति ठेविली, ह्मणून गिरासे लोक बहु-

---

१. याखेरीज हिरकाबाई (जिला कधींकधीं मावसीबाई ह्मणतात) नांवाची मल्हाररावाच्या परम प्रीतींतील स्त्री होती, तिणें महादाजीस एकदां संकटसमयीं सहा लाख रुपये उसने दिले.

२. गिराशांचें वर्णन पुढें येईल.

धाशांत व समाधनी झाले होते. आपल्या आसपासच्या सर्व लोकांची भरभर वाढावी, हा तिच्या जीवींचा लाडका हेतु होता. लोक गोष्टी सांगतात कीं, सावकार, वाणीउदमी, जमीदार, शेतपोत करणारी रयत हीं श्रीमान होत आहेत, असें अहिल्याबाईच्या दृष्टीस पडलें ह्मणजे, ती आनंद पावे. त्यांची संपत्ति वाढत्ये आहे हें, त्यांजपासून ज्यास्ती पैसा उकळण्यास चांगलें कारण होत आहे, असें न मानितां, उलटा ती असा समज घेई कीं, यामुळें ते विशेष भक्तीस व सांगोपनास पात्र होत आहेत. नर्मदेच्या कांठावरील गोंड लोकांशीं,

१. भोपाळच्या नवाबाच्या चाकरींत, हिंमतराम ह्मणून पूर्वीं एक मोठ्या योग्यतेचा मुलकी कामगार होता त्याचा ख्यालीराम नांवाचा पुतण्या, मजजवळ दोन वर्षेपर्यंत मुख्य मुनशी होता. त्याणें मला सांगितलें कीं, बत्तीस वर्षांपूर्वीं, मी बर्षा येथें कमाविसदार असतां, खेमदास नांवाचा एक श्रीमान सावकार सिरोंज येथें, पोटीं संतान नसतां, मृत्यु पावला. तेव्हां तेथील कमाविसदारानें तीन लक्ष रुपये त्याच्या कुटुंबापाशीं मागितले; व अशी धमकी दिली कीं, जर ही रक्कम तुह्मीं दिली नाहीं तर, तुमचा माल असबाव सरकारतिजोरींत जप्त करीन. खेमदासाच्या कुटुंबांतील पुरुषांनीं त्याच्या बायकोस दत्तक घेण्याविषयीं अनुमोदन दिलें, परंतु कमाविसदारानें, मागितलेला नजराणा दिल्याखेरीज दत्तक घेऊं देणार नाहीं ह्मणून निक्षून सांगितलें. खेमदासाची बायको आपल्या पुतण्यास दत्तक घेणार होती. मग ती त्यास बरोबर घेऊन, पुष्कळ सखेसोयरे व इष्टमित्र यांसह तावडतोब महेश्वरीं गेली. अहिल्याबाईनें त्यांस, काय होईल या धाकधुकींत एक दिवस सुध्दां ठेविलें नाहीं. तिणें तत्काळ आपल्या कमाविसदारास कामावरून काढिलें, दत्तक कबूल केला, व लाहनसहान सुध्दा नजराणा घेतला नाहीं. दत्तक दिलेलें लेकरूं आपल्या मांडीवर घेऊन त्यास वस्त्रें दिलीं, दागिने दिले, पालखी दिली, व परत सिरोंजेसपाठाविलें. तेथें तिच्या चांगुलपणाची व न्यायाची वाखाण-

व नेमाडांतील डोंगरी मुलकांतील भील लोकांशीं अहिल्याबाईनें जे ठराव ठरविले होते तेही, तिच्या खास राज्यांतील व्यवस्थेप्रमाणेंच उत्तम होते. आतां या लोकांचा बंदोबस्त करण्यामध्यें तीस पूर्ण यश आलें नाहीं यामुळें, तिच्या सामर्थ्यांत अथवा धूर्तपणांत कमीपणा येतो असें नाहीं. त्याचीं कारणें वेगळींच आहेत. त्यांशीं प्रथमतः तिणें सामोपचाराचे उपाय योजिले. परंतु त्यांपासून हसील निघत नाहीं असें पाहून मग, विशेषसक्तीचे उपाय योजिणें आरंभिलें. व त्यांपैकीं कित्येक, कधीं सुधरावयाचे नाहींत असे जे अत्यंत दुष्ट होते त्यांस, फाशीं दिलें[1].

---

णी, ते लोक जीवांतजीव होता तोंपर्यंत करीत होते. या औदार्याचा विषय अझून जिवंत आहे. परंतु आतां अमीरखानानें त्याची सर्व संपत्ति नागवून घेतली आहे. सांप्रत सिरोंज अमीर खानाकडे आहे. तात्याजोग यणें आणखी एक अहिल्याबाईच्या निरापेक्ष बुद्धीची गोष्ट सांगितली. तापीदास व बनारसदास या नांवाचे दोघे बंधू खरगोण येथें सावकार होते ते दोघेही पोटीं संतान नसतां एकामागें एक लगोलग मेले. त्यांजजवळ दोन लाख रुपये रोख होते, व दोन लाख त्यांचें लोकांकडे येणें होतें. तापीदासाची बायको महेश्वरीं अहिल्याबाईकडे आली, व तात्याजोगाच्या वडील भावाच्या द्वारें तिणें कळविलें कीं, तुमच्या संगोपना खालीं माझ्या नवऱ्यानें व दीरानें मिळविलेली संपत्ति मी तुह्मास देतें; परंतु अहिल्याबाईनें तिचें ह्मणणें नाकारिलें आणि तीस सांगितलें कीं, जर तुला संपत्ति नको असेल तर दानधर्म कर, अथवा लोकांस उपयोग होईल व तुझ्या नवऱ्याचें नांव मागें राहील असें कांहीं काम बांध. तापीदासाच्या बायकोनें आहिल्याबाईचें सांगणें ऐकिलें, व खरगोणच्या नदीस एक घाट बांधून, वर गणपतीचें देवालय बांधिलें. हीं दोन्हीं कामें, अहिल्याबाईनें नको ह्मटलेल्या संपत्तीचा कसा व्यय झाला त्याचीं, अझून स्मारकें उरलीं आहेत.

१ या लोकांत मनरूपसिंग सजा पावला. हा प्रसिद्ध धाडेकरी नर्मदेच्या कांठीं सिलाण्याच्या किल्ल्यांत असे. या चोरट्या सरदाराच्या

या प्रकारचीं कडक शिक्षेचीं उदाहरणें तिच्या कारकीर्दींत फारच थोडीं. योग्यसमयीं, अत्यंत निर्द्वयी धाडेकऱ्यांच्या ऱ्हदयांत सुद्धां कसी दहशत घालावी, हें जरी अहिल्याबाई जाणे तरी, दया व सामोपचार याच उपायांची वहुधा ती योजना करी. गोंडलोक धाडे करून निर्वाह करीत असत. ते धाडे, जागोजागीं आपलीं नाकीं बसवून, तिणे बंद केले. परंतु त्यांच्या संवयीवर फार विचाराची दृष्टि देऊन, पूर्वींपेक्षां चांगल्या तऱ्हेनें निर्वाह करा ह्मणून तिणें त्यांस ताकीद दिली; व आसपासच्या डोंगरांतून जो माल जात असे त्यावर, त्यांचा पूर्वींपासून कांहीं कर चालत आला होता, तो त्यांजकडे चालविला[१]. शिवाय, त्यांस कांहीं पडीत जमीनी इनाम देऊन, या इनामाच्या मुवादल्यांत आह्मीं रस्ते संभाळूं, व आमच्या हद्दींत जो माल जाईल त्याचा पत्ता लाऊन देऊं[२], अशी त्यांजपासून कबुलायत घेतली. अहिल्याबाईच्या राज्यांतील

वंशजांचा दंगा मोडण्यामध्यें मला सतत तीन वर्षें जो त्रास भोगावा लागला त्यापासून, कसकशा दुष्ट कृत्यामुळें, आपल्या स्वभावास सोडून सक्ति करणें अहिल्याबाईस भाग आलें असावें, हें माझ्या पक्कें ध्यानांत आलें.

१ याला भीलकवडी असें ह्मणतात. निरनिराळ्या ठिकाणीं या कवडीची किंमत निरनिराळी आहे, परंतु बैलास अर्धपैशावर कोठेंही ज्यास्ती नाहीं.

२ या लोकांशीं मलाही याच तऱ्हेचा बंदोबस्त करावा लागला. अहिल्याबाईच्या वेळीं ज्याप्रमाणें चालत होतें त्याप्रमाणेंच आतांही चालवूं अशी, होळकर सरकाराच्या हल्लींच्या कारभाऱ्यानें कबुलायत केली आहे. यांत सामोपचाराची आपण हद्द केली असें तो समजतो. डोंगरांतील अत्यंत रानटी भीलसुद्धां, अहिल्याबाईनें दिलेलें चालवा अशा मागण्यापेक्षां, अधिक मागत नाहींत. राज्य व्यवस्थेपैकीं या कठीण स्थळीं तिणें शाहाणपणाची वागणूक केली. त्या वागणूकीस नांव ठेविण्यास जागाच नाहीं.

व्यवस्थेच्या बारीक गोष्टी लिहूं लागल्यास संपणार नाहींत. इतकेंच सांगणें पुरे कीं, माळवेप्रांतीं सर्वलोकांच्या ऐक्यबुद्धीनें तीस उत्तम राज्यव्यवस्थेचें माहेर ठरविलें आहे. या अद्वितीयस्त्रीस अनुलक्षून मी चालेन असें, मल्हारराव महाराजाचा सांप्रतचा कारभारी, तात्याजोग, ह्मणत असतो. तो पक्कें जाणतो कीं, असें ह्मणण्यांत तीन गोष्टी एकदम साधतात. आमचा संतोष होतो; ज्या कुळाचा तो कारभार पाहतो त्या कुळास समाधान वाटतें; व लोकांची प्रीति संपादन होते. तिच्या नांवाचा इतका उत्तम अधिकार आहे कीं, कोणत्याही कामीं तिच्या वेळचा दाखला दाखविला ह्मणजे, कोणी एक हरकत ह्मणून काढीत नाहीं.

आहिल्याबाईचा पत्रव्यवहार हिंदुस्थानांतील अत्यंत दूरदूर ठिकाणींही असे; व तो बहुतकरून ब्राह्मणांच्या द्वारें चाले. धार्मिक बुद्धीनें जे दानधर्म ती करी, तेही त्यांच्याच द्वारें होत. तिचें औदार्य अमर्याद असे. त्यास दुसरें उदाहरण मिळणार नाहीं. होळकरांचा खजिना ज्या वेळीं तिच्या हातीं आला त्या वेळीं, हिंदूंच्या चालीप्रमाणें तिणें हातांत पाणी व तुळशी घेऊन, ब्राह्मण मंत्र ह्मणत असतां, तें पाणी त्या संपत्तीवर सोडिलें; व असें करून, दानधर्म व सुकृत्यें यांजमध्यें व्यय करण्याकरितां, तो खजीना एकाबाजूस काढून ठेविला. कित्येक किल्लेही तिणें बांधिले, व जामच्या किल्ल्यापाशीं जेथें विंध्याद्रीचा केवळ समोर कडा उतरला आहे तेथें, पुष्कळ पैसा खर्च करून घाट बांधिला. बरेंच द्रव्य, महेश्वरीं धर्मसंबंधी इमारती बांधण्यांत, व माळव्यांत आपल्या सर्व राज्यभर देवळें[1], धर्मशाळा, व तळीं बांधण्यांत खर्च केलें. तिचें औदार्य केवळ आपल्या राज्यापुरतेंच होतें असें ही नाहीं. हिंदूंच्या सर्व मुख्यमुख्य यात्रांच्या ठिकाणीं, पूर्वेस कटकप्रांतीं जगन्नाथ पर्यंत, पश्चिमेस गुजराथ

---

१ हरदें हंड्यासमोर नेमावर गांवीं तिणें एक देऊळ बांधिलें आहे. तें जरीं लहान आहे तरी, हिंदुस्थानाच्या त्या प्रांतीं जितक्या इमारती माझ्या पाहाण्यांत आल्या आहेत तितक्यांत, अत्यंत सुंदर लेखिण्याजोगें आहे.

प्रांतीं द्वारकेपर्यंत, उत्तरेस हिमालयाच्या वर्फांनीं भरलेल्या पहाडांत केदारनाथापर्यंत, व दक्षिणेस कन्याकुमारी पाशीं रामेश्वरापर्यंत तिणे धर्मसंबंधी इमारती बांधिल्या आहेत; व अन्नसत्रादि कारखानें ठेविले आहेत. या सर्व ठिकाणीं दानधर्माकरितां दरसाल पैसाही पाठविला जातो. तिणे बांधिलेल्या मुख्य इमारती गयेस आहेत. तेंथें एका देवळांत, पार्थिवाची पूजा करीत आहे असी, कोणी तिचीही मूर्ति वसाविली आहे. खुद्द तिला साधूची योग्यता मिळाली आहे. हिंदुलोक तिची मूर्ति रामचंद्राच्या व सीतेच्या मूर्तीजवळ वसवितात[१].

हिंदुस्थानांतील मुख्य मुख्य तीर्थांच्या ठिकाणीं घातलेले अन्नसत्रादिकारखाने चालण्याकरितां, जो सालावाद खर्च होई त्या खेरीज, लहान सहान तीर्थांच्या ठिकाणींही, स्थळाच्या मानाने पैसा जात असे. या नियमित धर्माखेरीज, ती प्रसंगानुसार आणखीही धर्म करीत असे. दक्षिण हिंदुस्थानांत, निरनिराळ्या ठिकाणच्या देवळांत अभिषेकाकरितां, नित्य भागिरथीचें उदक ती पाठवीत असे. यापासून जो लौकिक तिला प्राप्त झाला तो, दुसऱ्या कशापासून झाला नाहीं. तिचा आपल्या धर्मांत निष्कपट भाव होता, व देवांची पूजाअर्च्या करून कृपा संपादावी, व त्यापासून आपलें व आपल्या देशाचें कल्याण व्हावें, अशी तिची इच्छा होती; व या इच्छेपासूनच बहुधा वर लिहिलेलीं, हिंदुस्थानाच्या विस्तीर्ण भागावर पसरलेलीं, तिचीं दानकृत्यें उपजलीं असावीं.

तिच्या एकंदर दानधर्मांत व कारखान्यांत असा सर्वत्र भूतभक्तीचा अंकुर दिसून येतो कीं, त्यास खऱ्या ब्राह्मणपणाचें व लोकोपकाराचें स्वरूप आहे. ती दररोज गरीब लोकांस अन्न देई, व विशेष सणावारां-

---

१ या ठिकाणीं मालकम साहेबाची गैर समजूत झाली आहे असें दिसतें. कोठेंकोठें राममंदिरांतून अहिल्येची मूर्ति असते परंतु ती रामायणांत वर्णन केलेली गौतमाची वायको अहिल्या. आपल्या मुर्तीस देवांची योग्यता देतात असें जर अहिल्यावाईस समजतें तर, त्या धार्मिक वाईचें पापभीरु मन खरोखर दुःखच पावतें. भाषांतरकर्त्ता.

च्या दिवशीं, अत्यंत नीच जातीच्या लोकांसही मेजवानी मिळत असे. उष्णकाळांत रस्तोरस्तीं, वाटसरांस पाणी पाजण्याकरितां, नोकर लोक उभे असत. व शीतकाळाच्या आरंभीं, बहुतेक आश्रितांस व पंगू झालेल्या प्राण्यांस वस्त्रप्रावरणें मिळत. सर्वत्र भूतदयेविषयींच्या बुद्धीचा वारंवार कळस होई. रानांतील पशु, हवेंतील पक्षी, नद्यांतील मासे हेही तिच्या दयेचा अनुभव पावत. त्यांजकरितां भक्ष्यें पाठविलीं जात. उष्णकाळांत महेश्वराजवळचे शेतकरी असें पहात कीं, जमीन जोतीत असतां, अहिल्याबाईचे नोकर लोक पाण्याचीं भांडीं घेऊन येत, व तें बैलांस पाजण्याकरितां नांगर थांबवीत; याचप्रमाणें, शेतकरी लोक आपल्या धान्याचा नाश न व्हावा ह्मणून पक्ष्यांस हकून लावितात, त्या पक्ष्यांकरितां, अहिल्याबाई शेतें विकत घेत असे. हीं शेतें पक्ष्यांच्या थव्यांच्या थव्यांनीं भरलेलीं असत. शेतकरी लोक अर्थातच यांस हाकितात असें ती ह्मणे, कारण कीं त्याच धान्यावर खुद्द त्यांचाही निर्वाह आहे.

असा त्रैलोक्यकळकळा पाहून कदाचित् आपल्यास हसूं येईल, व धर्मवेडामुळें तिच्या सर्व दानांचा मुख्य अंश ब्राह्मण लोकांस सांपडे हें पाहून, व दूरदूरच्या देशीं इमारती बांधण्याकरितां, व त्यांचे खर्च सुरू ठेवण्याकरितां, तिणें आपल्या संस्थानाची संपत्ति गमाविली हें पाहून, तीस दोष द्यावा असें कदाचित् वाटेल; परंतु या प्रमाणें एकेवेळीं मी संभाषणांत दोष दिला असतां, एका बुद्धिवान् ब्राह्मणानें[१] मला यथार्थ विचारिलें कीं, जें द्रव्य अहिल्याबाईनें दानधर्मांत व सुकृत्यांत वेंचिलें, त्याच्या दुप्पट लष्करावर वेंचिलें असतें तर, तीस वर्षें अधिक, तिचा मुलूक पूर्ण शांतीचा अनुभव घेता, व तिच्या प्रजा सुखी असत्या, व खुद्द तिचें नांव पूज्य झालें असतें, असें तुह्मांस वाटतें काय? अहिल्याबाईच्या निष्कपट धर्मबुद्धीविषयीं कोणी संशय तर घेत नाहींच; परंतु यद्यपि केवळ दुनिया दारीच्या शाहणपणानें ती वागती तथापि, आपले हेतु सिद्धीस

---

१ येथें त्या ब्राह्मणाच्या तोंडांतून आलेलेच शब्द मी घेतले आहेत.

नेण्यास, जो तिणें उपाय योजिला त्याहून उत्तम उपाय तीस सांपडला नसता. हा गृहस्थ आणखी ह्मणाला कीं तिच्या कारकीर्दीच्या अखेरीस मी पुण्यास मोठ्या कामावर होतों, आणि त्या वेळेस नुस्तें तिचें नांव घेतलें असतां लोकांची बुद्धि कशी होई, हें मी पक्कें जाणतों. मराठी राजेरजवाड्यांत तर, तिच्याशीं वैर करणें, अथवा तिच्यावर कोणी चालून आलें असतां तिच्या साहित्यास न जाणें हें, गोहत्ये सारिखें महापाप समजलें जाई. सर्व तऱ्हेचे लोक तिच्या ठिकाणीं सारखीच बुद्धि ठेवीत. ज्या तऱ्हेनें पेशवे तिची योग्यता ठेवीत, त्याच तऱ्हेनें हैदराबादचा निजाम, व मैसूरचा टिपू सुलतान हेही ठेवीत; व हिंदूं प्रमाणेंच मुसलमान लोकही ईश्वराचा स्तव करीत कीं, अहिल्याबाईची भरभर असो, व ती चिरकाळ राहो.

अहिल्याबाईच्या कारकीर्दीच्या अखेरीस, हृदयस्फोट करण्यासारखें एक दुःखकारक वर्तमान घडून आलें, तें लिहिल्याविना पुढें जाववत नाहीं. तिचा एकुलता एक मुलगा जो मालेराव, त्याच्या दुःखदायक मरणाचें वृत्त पूर्वीं लिहिलेंच आहे. मालेरावाखेरीज अहिल्याबाईस मुक्ताबाई नांवाची कन्या होती.[१] मुक्ताबाईचें लग्न होऊन मुलगाही झाला होता. हा मुलगा चांगला वयांत येऊन महेश्वर येथें मृत्यु पावला. पुढें बारा महिन्यांनीं मुलाचा बापही वारला. तेंव्हां मुक्ताबाईनें आपल्या नवऱ्याबरोबर सहगमन करण्याचा निश्चय प्रगट केला. तिजवर जबरदस्ती केली नाहीं इतकेंच; परंतु मुलीनें सती जाऊं नये, व प्राण देण्याचा विचार सोडावा ह्मणून, सद्गुणी अहिल्याबाईनें, आई व राज्ञी या उभय नात्यानें, जेजे यत्न करवले तेते करून पाहिले. तिणें तिच्यापुढें मस्तक लववून भुईवर टेंकिलें, आणि विनवणी केली कीं, जर तुझी भगवंतावर भक्ति असली तर, मला या संसारांत एकटी निराश्रित सोडूं नको. मुक्ताबाई जरी ममताळू होती तरी, तिणें शांत रीतीनें निश्चयपूर्वक उत्तर

---

१. मुक्ताबाईच्या नवऱ्याचें नांव यशवंतराव पाणसे व तिच्या मुलाचें नांव नथोबा.

केलें—"आई तुझें ज्ञातारपण झालें आहे; आणखी थोड्या वर्षांनीं तुझ्या धार्मिक आयुष्याची समाप्ति होईल. माझें एकुलतें एक लेंकरूं व माझा पति हे तर गेलेच आहेत, व पुढें तूंही गेलीस ह्मणजे, हा जीव मला जड होईल; परंतु अग्नूनें तो टाकण्याची जी संधि आतां आहे ती मात्र पुनः येणार नाहीं." कितीही विनवणी केली असतां उपयोग होत नाहीं असें पाहून, अहिल्याबाईनें अखेरचा भयंकर समय आपल्या नेत्रांनीं पाहण्याचा निश्चय केला. ती, शव बाहेर निघालें तेव्हां, त्याजबरोबर निघाली; व स्मशानांत दोघां ब्राह्मणांनीं दोहों बाजूनीं धरली होत्साती, मुलीसन्निध उभी राहिली. जरी मन फाटून गेलें होतें तरी, प्रथम ज्वाला निघेपर्यंत बरेंच धारिष्ट धरून होती. परंतु ती ज्वाला पाहून तिचें सर्व भान नाहींसें झालें. सभोंवती जमलेल्या लोकांच्या मेळ्यांनीं जो दुःखानंदाचा गजर केला त्यांतून, तिच्या आरोळ्या ऐकूं येत, व ज्या ब्राह्मणांनीं तीस धरिलें होतें, त्या ब्राह्मणांच्या हातून सुटण्याकरितां, हाताचे मोठ्या यातनेनें आळेपिळे घेई असें दिसे. अशा प्रकारें आळेपिळे घेतल्यावर ती पुनः येथपर्यंत भानावर आली कीं, चिता जळून भस्म झाल्यानंतर, सर्वांबरोबर नर्मदेंत जाऊन तिनें स्नानविधि केला. नंतर ती आपल्या वाड्यापर्यंत आली, व सतत तीन दिवस पर्यंत, तोंडांत पाणीसुद्धां न घालितां अशा दुःखांत निमग्न राहिली कीं, तिणे तोंडांतून एक शब्दही काढिला नाहीं. या स्थितींतून बरी झाल्यानंतर, ज्यांची स्मृति आपल्या दुःखास विषय त्यांजकरितां, एक सुंदर स्मारक बांधण्यामध्यें ती समाधान घेऊं लागली[१].

भारमलदादाखेरीज आणखीही जे लोक या हृदयस्फोट करणाऱ्या प्रसंगीं हजर होते, त्यांच्या सांगण्याच्या आधारानें वर दिलेल्या गोष्टी

---

१. या मातृभक्तीच्या स्मारकाहून ज्यांचें विशेष सुंदर व बारीक काम झालें आहे अशीं सर्व हिंदुस्थानांत थोडींच अर्वाचीन देवळें आढळतील.

मी लिहिल्या आहेत.[1] धर्माच्या ठिकाणीं भाव असल्या कारणानें, चालत आलेल्या रूढीनें जी गोष्ट पवित्र मानिली गेली, तिचें उल्लंघन जरी अहिल्याबाईनें केलें नाहीं तरी, त्या उत्तम स्त्रीमध्यें, मनुष्य प्राण्यांच्या मायाममतादि स्वाभाविक वृत्ति लोप पावल्या नव्हत्या, हें पाहून आपलें मन संतोष पावतें.

काळजीनें व श्रमानें झिझून झिझून अहिल्याबाई ६० वर्षांच्या वयां-
१७९५. त मृत्यु पावली. कितीएक लोक ह्मणतात कीं, धर्मांत सांगितलेले अनेक उपासतापास कडकडीत करून, तिणें आपला मृत्यु समीप आणिला. तिचा बांधा मध्यम व फार सडपातळ होता. जरी फार सुंदर नव्हती तरी, तिचें सांवळें मुख स्वच्छ होतें.[2] मरणाच्या शेवटच्या घडीपर्यंत तिचा चेहेरा गोड होता. व संसारांत हरएक कामीं जो चांगुलपणा तिणें दाखविला, तो जसा चेहेऱ्यावर लिहिलाच आहे असें दिसे. तिची सदानंदवृत्ति असे, व तिला क्वचित् प्रसंगीं राग येई. परंतु अधमपणा अथवा गुन्हा पाहून जेव्हां तीस कोप चढे तेव्हां, अत्यंत मानिलेलीं माणसेंही

---

१. हा दुःखदायक प्रसंग ज्या जागीं घडला त्या जागीं, वृद्ध भारमलदादाबरोबर मी गेलों होतों. त्याठिकाणीं दादाचें हृदय भरून आलें; परंतु जेथें चिता रचिली होती, व मुलगी सती जात असतां जेथें आपली धनीण उभी राहिली होती, तीं स्थळें दाखविण्यांत दुःखांत समाधान त्यास वाटलें असें दिसलें. भारमलदादा पहिल्यापासून शेवटपर्यंत तिजबरोबर होता.

२. माजी बाजीराव पेशव्याची आई, राघोबा दादाची सुंदर परंतु दुष्ट बायको आनंदीबाई, जेव्हां धारेस आली होती तेव्हां, अहिल्याबाईची कीर्ति ऐकून मत्सर हेतूनें, तिणें अहिल्याबाई कशी दिसते तें पाहून येण्यासाठीं एक दासी पाठविली होती. दासीनें परत आल्यावर कळविलें कीं, अहिल्याबाई आकृतीनें सुंदर तर नाहीं, परंतु तिच्या मुखावर स्वर्गीचें तेज प्रकाशत आहे. सुंदर नाहीं यांतच समाधान पावून, आनंदीबाईनें इतकेंच उत्तर केलें ह्मणतात कीं, "सुंदर तर नाहींना?"

तिजपुढें जाण्यास कांपतें. हिंदुलोकांत साधारण प्रघात आहे त्याहून या अद्वितीय स्त्रीस, विद्येचा विशेष संस्कार होता. ती पुराणें जातीनें वाची, व त्यांतील अर्थ समजे. पुराणांचा अभ्यास ती मोठ्या आवडीनें करी. सरकारी कामकाज करण्यांत फारच हुशार व समंजस असे. वीस वर्षांच्या वयांत येण्यापूर्वींच पति मरण पावला, व हें दुःख असतां मुलाचे दुर्गुण व वेडसरपणा दिसून येऊं लागला; या गोष्टींनीं तिच्या मनावर वळकट ठसा उमटला होता. पतीमागें ती कधींही रंगाचीं वस्त्रें नेसली नाहीं.[२] व एका लहान कंठ्याखेरीज दुसरा दागिनाही तिणें कधीं घातला नाहीं. खरोखरीच, अनेक मोहक वस्तूंच्या गराड्यांत असतां, तिच्या संवई व स्वभाव बदलले नाहींत. स्तुतीचें बोलणें सुद्धां अहिल्याबाईस रुचत नसे. कोणी एका ब्राह्मणानें तिच्या स्तुतिपर ग्रंथ लिहून वाचून दाखविला. तो तिणें इत्थंभूत ऐकून उत्तर केलें कीं, मी अबला, पापी स्त्री आहे, व अशा स्तुतीस योग्य नाहीं. व तें पुस्तक नर्मदेंत टाकण्याचा हुकूम देऊन, त्या ग्रंथकाराचा विशेष पूस तपासही केला नाहीं. महेश्वरीं नर्मदेच्या काठीं अहिल्याबाईचा वाडा आहे. त्याच्या सज्यावर आह्मीं बसलों असतां, भारमलदादानें ही गोष्ट मला सांगितली. अहिल्याबाईविषयीं ज्या गोष्टी सांगितल्या आहेत, त्यांच्या आधारांच्या ठिकाणीं संशय घेण्यास जागा नाहीं.[३] खरोखरीच तिचें अद्वितीय चित्र आहे. स्त्री असून जिजमध्यें अभिमान नाहीं. धर्मवेड असून जिजमध्यें छळ नाहीं. खोट्या धर्मांत अत्यंत

---

१. महेश्वराचा वृद्ध कमाविसदार भारमलदादा पुष्कळ वर्षेंपर्यंत तिच्या कृपेंतील नोकर होता. त्याणें मला खात्रीनें सांगितलें कीं, अहिल्याबाईस क्वचित् राग येई, परंतु तीस खरोखर राग आला ह्मणजे, मोठ्या अत्यंत धैर्याच्या माणसांससुद्धां तिच्या मुखाकडे पाहण्याची भीति वाटे.

२. हिंदुविधवांच्या आचाराप्रमाणें, ती सदोदित साधें पांढरें पातळ नेसत असे; व त्यास जरीची अथवा रंगाची किनारीसुद्धां नसे.

३. अनेक व खऱ्या उगमापासून वर लिहिलेल्या वास्तविक गो-

मन गढलें असतां, त्यापासून प्रजेच्या कल्याणाखेरीज दुसरा ठसाच जिच्या मनावर उठला नाहीं.[१] अत्यंत दक्षतेनें व कर्तृत्वानें निर्बंध सत्ता चालवीत असतां, जिजमध्यें निष्कपट, लीनता, व मनुष्याच्या कृतीवर सदसद्विचारशक्ति जितका बळकट नीतीचा तावा वसवूं सकते तितका त्या नीतीचा जिजवर तावा. आणि इतकें असून इतरांच्या कमीपणाविषयीं व चुकांविषयीं जिची क्षमाशील दृष्टि. निदान, अहिल्यावाईचें, माळव्यांतील लोक, या तऱ्हेचें वृत्त सांगतात. त्यांणीं तिच्या नांवास साधुसंतांची योग्यता दिली आहे, व ते तिला ईश्वरी अवतार लेखितात. तिच्या गुणांविषयीं अत्यंत सावधगिरीनें जरी विचार केला तरी, असें खचित दिसून येईल कीं, पृथ्वीवर जे अत्यंत पवित्र व अनुलक्षानें चालण्यास योग्य असे अधिकारी उत्पन्न होतात त्यांपैकीं; आपल्या लहानशा मंडळांत ती एक होती. ऐहिक कृत्यें कारितांना, शेवटीं ईश्वरास जाव द्यावा लागेल अशी दृढबुद्धि ठेविणें, यापासून कसे अनुभवसिद्ध लाभ होतात या गोष्टीचें, अहिल्यावाई, ध्यानांत ठेविण्याजोगें उदाहरण आहे.

पूर्वीं योजिलें होतें त्याहून, अहिल्यावाईच्या वृत्तांताचा विशेष विस्तार दिला. परंतु तिची कारकीर्द होळकरांच्या कुळानें यथार्थ अभिमान वाळगिण्या जोगी आहे. तेव्हां, तिजवर थोडेंसें लिहून कसें चालेल? मरणानंतर तिच्या संपत्तीस व अधिकारास खुद्द तिचा कोणी वारस नव्हता.

---

ष्टी मला प्राप्त झाल्या आहेत; त्या उगमाखेरीज, ज्याज्या लोकांचे अहिल्यावाईनें बंदोवस्त केले होते, व कलमबंद्या ठरविल्या होत्या, त्यात्या लोकांशीं सरकारी कामांत मलाही बंदोवस्त करावे लागले, व कलमबंद्या ठरवाव्या लागल्या. अशामुळें अहिल्याबाईच्या राज्यव्यवस्थे संबंधीं बारीक पुरावे मला मिळाले आहेत त्यांवरून, तिच्या राज्यरीतीच्या खऱ्या स्वरूपाविषयीं बिलकुल संशय राहत नाहीं.

१ परधर्माचा छळ करावा हा वाईट गूण हिंदुधर्माचा नाहीं. परंतु अहिल्याबाई त्याहूनही पुढें होती. जे लोक आपल्या पासून धर्ममतांत वेगळे होते त्यांविषयीं ती विशेष दया ठेवी व विचाराविचार करी.

तिच्या अमलांतील रयतेस, ज्या सुंदर अशा तिच्या कारकीर्दीपासून प्राप्त झाल्या होत्या, त्यांचा भंग करण्याकरितां जे नाशकर्त्ते पुरुष पुढें उत्पन्न झाले, त्यांजविषयीं लिहिणें आतां भाग आहे.

अहिल्यावाईच्या मरणानंतर सरासरी दोन वर्षें, होळकरांच्या मुलकांत भरभर राहिली; परंतु जेव्हां तुकाजीचा काळ झाला तेव्हां, गादीकरितां झगडे माजले, व मुलूक वैराण होऊं लागला. तुकाजीस बायकोच्या पोटीं काशीराव व मल्हारराव असे दोन पुत्र होते. व एका आवडत्या स्त्रीच्या पोटीं यशवंतराव व विठोजी असे दोन पुत्र होते. वडील पणानें, गादीवर काशीरावाचा हक्क विशेष होता; परंतु तो गयाळी, दिसण्यांत कुरूप, व राज्य कारभाराचीं दक्षतेनें कामें चालविण्यास नालायक होता, यामुळें अहिल्याबाईनें व त्याच्या बापानें असें मनांत आणिलें कीं, काशीरावानें महेश्वरीं रहावें; व मल्हारराव जो शूर व होतकरू होता त्याणें, लष्कराचें सेनापत्य करावें. ह्मणजे मल्हाररावानें तुकोजीचीं कामें करावीं, व काशीरावानें अहिल्यावाईचीं. ही तदवीर होऊं सकेल असें तुकाजीस व अहिल्यावाईस वाटलें हें, मायापाशानें बुद्धि कशी अंध होत्ये याचें उदाहरण आहे. काशीराव व मल्हारराव या दोघां भावांच्या परस्पर विपरीत स्वभावांवरून, वर लिहिलेली तजवीज एक दिवस देखील टिकेल असी आशा नव्हती. तेव्हां वाप मरतांच, ते एकमेकाच्या नाशास प्रवर्त्तले. विशेष लायकीच्या कारणानें, आपल्यासच गादीवर बसवावें अशा विषयीं, मल्हाररावानें बापापाशीं गळ घेतली होती. बापानें ऐकिलें नाहीं या मुळें संतापून, त्याणें नानाफडणिसाचा आश्रा धरिला; व नानानेंही कुमक देतों ह्मणून सांगितलें. होळकरांचें लष्करही त्याच्याच तर्फदारींत होतें. या मुळें त्यासच गादी प्राप्त होईल असें, लोकांस खचित वाटूं लागलें. इतक्यांत काशीराव महेश्वरीं होता त्याणें, दौलतराव शिंद्याची, ह्मणजे त्याचा कारभारी जो सरजाराव घाडगा त्याची, आपला दावा सिद्धीस नेण्यासाठीं मदत मागितली. त्याणींही मदत देणें कबूल

केलें. व पुण्यास आल्यानंतर उघड रीतीनें त्याचा पक्ष स्वीकारिला. त्याच्या भावानें पळून सुटून जाऊं नये, व फार दिवस राहील असें युद्ध माजवूं नयें ह्मणून, त्यांणीं मध्यस्थीचा घाट घालून त्याची समजी केली; परंतु ज्या रात्रीं ही गोष्ट घडली, व बेल भंडारादि शपथा आणा झाल्या त्याच रात्रीं, शिंद्याच्या कंपूंनीं मल्हाररावाच्या लष्कराचा तळ घेरला[१]. दिवस उजडतांउजडतां मल्हाररावास आपल्यावर आलेलें संकट समजलें. मग तो तत्काळ घोड्यावर स्वार झाला; परंतु संरक्षणाची तजवीज करणार त्या पूर्वींच, एक गोळी त्याच्या मस्तकास लागून तो मरण पावला. या वेइज्जती दगावाजीच्या मुवदल्यांत, पूर्वीं अहिल्यावाई व हिरकावाई यांजपासून कर्ज घेऊन महादाजी शिंद्यानें रोखे लिहून दिले होते ते, दवलतरावास फुकट परत मिळाले. शिवाय काशीरावानें पंधरा लाख रुपये रोख देण्याची कबूली केली होती. त्या पंधरा लाखांपैकीं १० लाख नगदी मिळाले, व वाकीच्या फेडीकरितां दक्षणेंत अंवडचा वसूल गहाण मिळाला.

या प्रसंगीं काशीरावाच्या कांहीं अनुयायी लोकांखेरीज, होळकरांच्या वाकीच्या लष्कराची दाणादाण झाली, व त्यांचा तळ लुटला गेला. पळालेल्या लोकांत यशवंतराव होता. व त्याज बरोबर थोडेसे खास पागेचे स्वार, व कांहीं जडावाचे दागदागीनें होते, असें ह्मणतात. यशवंतराव प्रथमतः नागपुरास आश्रयाकरितां गेला. परंतु त्या जवळ द्रव्य आहे अशा समजुतीनें असो, अथवा, पुण्याचें दरवार व शिंदे यांची मर्जी संपादण्याच्या हेतूनें असो, रघूजीनें त्यास पकडून कैद केलें.[२] यशवंतराव साहामहिने पर्यंत कैदेंत होता. नंतर त्याणें पळून आपली सुटका केली. पळाला तरी पुनः धरला गेला; परंतु त्याणें पुनः आपल्यावरील पाहारेकऱ्यांची नजर चुकवून,

---

१. मल्हाररावावरोवर पुण्यास नुसतें तीन चार हजार लष्कर होतें.

२. या प्रसंगीं पेशवे व दौलतराव शिंदे या दोघांच्याही कारभाऱ्यांनीं रघुजीस फार ठपका देऊन पत्रें लिहिलीं.

निसटून जाऊन, मल्हाररावाच्या मरणापासून दीड वर्षानें खानदेश गांठला. दुसऱ्याने पळाला तेव्हां, त्याजबराबर शाह महमद नांवाचा एक मुसलमान, व भवानीशंकरनांवाचा एक हुषार व चपळ हिंदु असे दोघे होते.[१] खानदेशांत आल्यावर यशवंतराव, गुरगांवच्या खेड्यांत आपला चिमणाभाऊ नांवाचा पढविणारा राहत होता, त्याजकडे गेला. चिमणाजीनें एक घोडी[२] व तीनशें रुपये त्यास दिले; व सांगितलें कीं आतां येथें राहूं नको, तावडतोब माळव्यांत निघून जा. मग यशवंतराव तेथून निघून, प्रथमतः, नंदुरबारेजवळ साहा कोसांवर कुकरनाडा नांवाचा किल्ला आहे, तेथें गेला. दोनतीन महिने पर्यंत, या किल्ल्यामध्यें जो भिलांचा सरदार असे त्याची, त्याणें सोबत केली. या गोष्टीवरून या समयास यशवंतराव कशा विपत्तीस पोंहोचला होता हेंही दिसून येतें. कुकरनाड्याहून वढवाणीस, व वढवाणीहून नर्मदेच्या काठीं पंवार इलाक्यांत धरमपुरी आहे, तेथें गेला. आनंदराव पंवारानें, तो धरमपुरीस आला असें वर्तमान ऐकून, मांडवच्या रस्त्यानें धारेस त्यास पाठविण्याविषयीं, आपल्या कामदारास लिहिलें. तसेंच त्याणें त्यास वस्त्रें व पालखी पाठविली, व सर्वांस ताकीद दिली कीं, यशवंतरावास लागेल तें तें यथेच्छ पुरवावें. यशवंतरावास तर न-

---

१. यापुढें शाह महमदाचें नाव कोठें ऐकण्यांत येत नाहीं. जे लोक विपत्तीसमयीं आपल्या गरजेस पडले त्यांशीं, कृतज्ञतेनें यशवंतराव वागत असे. यावरून असें वाटतें कीं, शाह महमद लौकरच मेला असावा. भवानीशंकर यशवंतरावाजवळ राहिला तेव्हां, दहा स्वारांचा हिशेब ठेवणारा यःकश्चित् कारकून होता. तो पुढें यशवंतरावाच्या सर्व लष्कराचा बक्षी झाला. याविषयीं पुढें वृत्तांत येईल.

२. या घोडीचें नाव लंका होतें. तिचा बोररंग होता. व पुढें जरी देखणी नव्हती व म्हातारीही झाली होती तरी यशवंतरावाची तिजवर फार भक्ति होती. दसऱ्याच्या दिवशीं यशवंतराव मुख्य तिची पूजा करी; व आपल्या सुदिनाची ती मूळ आहे असें ह्मणे.

शीवाच्या या ओढत्याकाळीं, खुद्द आपल्यासाठीं व बरोबरच्या लोकांसाठीं, पांघरावयाचीं वस्त्रें सुद्धां पाहिजे होतीं.

यशवंतराव धारेस दोनतीन महिनें राहिला. त्याच्या कुळाच्या अनुयायी लोकांपैकीं दोनचार पुराणे लोक, तेथें त्यास येऊन मिळाले. परंतु त्यांचीही विपत्तीनें दुर्दशा झाली होती. यशवंतरावाच्या सुदैवानें या प्रसंगीं, रंगराव औडीकर, अपल्या बराबर पठाण व पेंढाऱ्यांचें लष्कर घेऊन, आनंदरावावर चालून आला. आनंदराव पंवार पाठीमागें हटावयास लागला होता, व त्याणें दोन तोफा टाकून दिल्या होत्या. इतक्यांत यशवंतरावानें त्यास रोंकविलें, "व उभा राहा अझून तुला यश संपादून देतों", असें ह्मणाला. नंतर लहानसा कागदाचा तुकडा घेऊन, औडीकरा बरोबर जे पेंढारी सरदार होते त्यांस त्याणें चिठ्ठी लिहिली कीं, पंवारावरोवर यशवंतराव होळकर आहे, तेव्हां जे तुह्मी होळकरांचे चाकर आहां त्या तुह्मीं, औडीकरास सोडावें. या गोष्टीविषयीं प्रथमतः पेंढाऱ्यांची खात्री होईना. परंतु चिठ्ठी नेणाऱ्या जासुदानें खात्री करून दिली तेव्हां, ते मागें सरले. यामुळें जी धांदल उडाली त्या धांदलींत, गेलेल्या दोन तोफा आनंदरावास परत मिळाल्या. यशवंतराव लागलाच घोड्यावरून उतरला, व तोफेचा सुंबा हातीं घेऊन, कित्येक लोकांच्या साहाय्यानें, त्याणें असा चांगला नेम धरून अफगान लोकांवर फेर झाडले कीं, ते पुनः हल्ला करण्यास जे पुढें येत होते ते, मागें सरले. रंगराव औडीकरही धांदल होऊन पळाला. या प्रसंगीं यशवंतरावाच्या बरोबरच्या माणसांस, खुद्द त्याच्याप्रमाणेंच हुरूप आला होता. यशवंतरावानें ज्याप्रमाणें चाकरी बजाविली, त्याप्रमाणें आनंदरावानें कृतज्ञता दाखविली. परंतु अत्यंत संकटसमयीं आश्रा द्यावा याखेरीज, यशवंतरावानें त्याजजवळ आणखी कांहीं मागितलें नाहीं. तो धारेस पळून गेला आहे असें ऐकून, शिंद्यानें आनंदरावास दहशत घातली कीं, जर तुह्मीं त्यास पकडून ठेवणार नाहीं, अथवा घालवून देणार नाहीं तर, आमची तुमच्यावर अत्यंत अवकृपा होईल. धारेस मुक्काम लांबवून, आपल्यास ज्यानें आश्रय दिला

त्याच्या नाशास आपण कारण व्हावें हें, उदारबुद्धीच्या यशवंतरावास ठीक वाटलें नाहीं असें सांगतात. ह्मणून त्याणें थोडा बहुत पैसा मागून घेतला, (एकंदर दहा हजार रुपये), व सात स्वार बरोबर घेऊन धार शहर सोडिलें. या वेळेस त्याजवळ हे सात स्वार व शामराव महाडिकाचे आणखी सात स्वार, इतके लोक मात्र होते. शामराव महाडिकानें यशवंतरावाबरोबर दिवस काढण्याचा इरादा केला होता. थोडक्यांत पुण्यास घोडे व असबाब गेलेले, वस्त्रांचीं लक्तरें झालेलें, व शस्त्रें आहेत आहेत नाहींत नाहींत असें, होळकरांच्या अनुयायी लोकांपैकीं सवासे एक पायदळ येऊन त्यास मिळालें. मग देपाळपूर[१] येथें काशीरावाच्या खास पागेंतील शंभर एक स्वार होते त्यांजवर, ही टोळी घेऊन यशवंतराव प्रथमतः गेला. धडाक्यानें येऊन त्याणें या शहरावर पुरा छापा घातला. या छाप्यांत यश पावल्यामुळें, कित्येक चांगले घोडे, व खेरिज वेळेवर उपयोगी येण्यासारिखें द्रव्य त्यास मिळालें. हें त्याणें गांवांतील निराश्रित लोकांपासून उकळिलें. यशवंतरावाच्या लुटारू स्वाऱ्यांचा हा आरंभ ह्मटला पाहिजे. माळव्यांत परत आल्या दिवसापासून पुढें, आपली सत्ता राखण्याचा, व दौलतराव शिंद्यापासून होळकरांचा इलाका बचावण्याचा, एवढाच उपाय आहे असें त्यास वाटलें. काशीराव तर या प्रसंगीं शिंद्याच्या हातीं बाहुलें होऊन राहिला होता. होळकरांच्या कुळाचे आपण औरस वारिस नाहीं या साठीं, मुख्य अधिकाराचा अपकर्ष करून त्या कुळाची अभिमानबुद्धि दुखवूं नये, याविषयीं यशवंतराव सावध होता. होळकरांच्या अनुयायी लोकांच्या व रयतेच्या मनोभावनेस अनुसरून चाललें असतां, आपणास

---

१ देपाळपूर हा गांव होळकर इलाक्यांत चंबलनदीच्या उजव्या तीरापासून दोन कोस आहे. काशीरावाच्या लष्करांत शिव्हिलियर ड्यूड्र नेकाचा एक कंपू असे. ड्युडर नेक देपाळपुरीं प्रथम उतरून तेथून इंदुराकडे चालता झाला होता. त्याणेंच देपाळपूरच्या संरक्षणाकरितां वर लिहिलेले खासपागेचे स्वार ठेविले होते.

किती वळकटी येईल; तसेंच त्या मनोभावांस दुखवून चालले असतां आपली किती हानि होईल हें, तो पक्कें जाणत होता; ह्मणून मुख्य आधिकाराचा त्याणें उघड अपकर्ष केला नाहीं. परंतु काशीराव स्वभावतःच बुद्धीनें व शरीरानें, दोहींकडून, पाहिलें असतां राज्य करण्यास केवळ असमर्थ आहे असा बाहणा करून, त्याणें मल्हाररावाचें लेकरूं जें खंडेराव त्याच्या पक्षांतील आपण आहों असें, सर्वत्र जाहीर केलें; व धारेंतून निघण्यापूर्वीं फारसी अक्षरांनीं एक शिक्का ठोकिला, आणि त्याजवर "यशवंतराव फिद्वी सवाई खंडेराव" अशीं अक्षरें खोदिलीं.[१] असें नांव घेऊन तो सैन्य जमवूं लागला. त्यांत मागें पुढें न पाहतां, सर्व जातीचे लोक—पेंढारी, भील, अफगाण, मराठे, रजपूत वगैरे त्याणें भरिले. आतां तो देपाळपुराहून जावऱ्यास व जावऱ्याहून महत्पुरास गेला. जावऱ्याच्या कमाविसदारानें[२] त्यास पकडण्याचा यत्न केला, व महत्पूर येथील कामदारानें मदत देणें नाकारिलें. मग तेथून पूर्वेस सारंगपुराकडे यशवंतराव निघाला. वजीर हुसेन या नांवाचा सय्यद जातींतील एक मुसलमान, पूर्वीं होळकरांच्या चाकरींत होता तो, या गांवीं राहत असे. तो त्यास मिळाला. माळव्यांत प्रथमतः योग्यतेचा पुरुष असा हाच यशवंतरावास सामील झाला.

---

१ मराठी मोर्तबावर "म्हाळसाकांतचरणीं तत्पर मल्हाररावसुत खंडेराव" अशीं अक्षरें होतीं.

२ गंगाराम कोठारी एक वाणी जातीचा गृहस्थ यावेळीं जावऱ्यास कमाविसदार होता. हा कर्त्ता पुरुष असे. पुढें यशवंतराव गादीवर बसला तेव्हां, यावेळच्या वर्तणुकीबद्दल त्याणें गंगाराम कोठाऱ्यापासून पैसा उकाळिला. परंतु नंतर त्याजकडे मोठमोठीं कामें सांगितलीं. हा नऊ दहा वर्षें पर्यंत रामपुरा, भानपुरा, वगैरे कांहीं परगण्यांचा कमाविसदार असे. गंगाराम कोठाऱ्याचा मुलगा मगनीराम हाही अझून होळकरांच्या नोकरींत आहे.

( हल्लीं गंगाराम कोठाऱ्याच्या घराण्याकडे भानपुऱ्याची अमीनी आहे. खेरीज जाहागीर चालते. )

वजीर हुसेनानें आपल्या नांवाची वजनदारी यशवंतरावास दिली; व खेरीज चाळीस पन्नास स्वार, व दोनतीनशें पायदळ, व पांच हजार रोख रुपये त्याजकडे आणिले. त्याच्याच सल्ल्यानें, अमीरखान नांवाचा सरदार पंधराशें पायदळासह भोपाळावर तळ देऊन राहिला होता त्याशीं, यशवंतरावानें बोलणें लाविलें. या मुसलमानी सरदारानें तें कबूल करून, तत्काळ सुजालपुराची वाट धरिली. पुढें हे जे दोघे सरदार लुटारू युद्धांच्या कथेंत इतके प्रसिद्धि पावले, त्यांची प्रथम गांठ राणागंज येथें पडली. ऐक्य होण्याभावीं दोघांची कलमबंदी तेव्हांच ठरली. अमीरखानानें कबुलायत केली कीं, मी यशवंतरावास कधींही सोडून जाणार नाहीं; व यशवंतरावापासून त्याणें करार लिहून घेतला कीं, या पुढें जी लूट प्राप्त होईल व जो मुलूक फत्ते होईल तो, आपण दोघे समान हिश्शानें वांटून घेऊं. या प्रसंगीं हे दोघेही पुरुष सारखे निराश झालेले होते; व आपण कौलकरार करितों हे, पुढें अमलांत आणावे लागतील अशी कांक्षा मनांत घेऊन, प्रस्तुत स्वार्थ साधण्याच्या इरादा सोडितील असे दोघेही नव्हते. तेव्हां त्यांजमध्यें कबुलायती ठरणें फारसें कठीण नव्हतें. आतां हे दोघे साथीनें कामें करूं लागले त्यांणीं प्रथमतः सुजालपूरच्या अमीनापाशीं पैसा मागितला. या कामगारानें, थोड्या दिवसांपूर्वीं, दोनशें रुपये हवेतर देतों असें ह्मणून यशवंत रावास राग आणिला होता. त्यास आतां सात हजार रुपये द्यावे लागले. सुजालपुराहून निघाल्यानंतर, कित्येक व्यापाऱ्यांचा ४० हजारांचा कापडमाल चालला होता तो, यशवंतरावानें लुटला. नवीन ठेविलेल्या लष्करांस अशा प्रकारें वस्त्रांचा पुरवठा झाला; व त्यामुळें आणखी हजारो लोक त्यास येऊन मिळाले.

यानंतर दुसऱ्या खेपीं, नर्मदेच्या काठीं, दौलतराव शिंद्याचीं कांहीं गांवें व कांहीं परगणे त्याणें लुटले. हंड्या हा गांव लुटून उद्ध्वस्त करून, तो मंडलेश्वरासमोर कसरावदच्या खेडीं आला. येथें काशीरावाच्या नोकरींतील शिव्हिलियर ड्यूडर नेकाचा कंपू होता, त्या कंपू-

ष्या एका वळकट टोळीशीं त्याचें युद्ध झालें. ही टोळी त्याजवर हल्ला करण्यास इंदुराहून पाठविली होती. निकरानें युद्ध होऊन अखेर यशवंतरावास विजय प्राप्त झाला. डयूडर नेकाच्या टोळीचा नाश झाला; व आठ निशाणें आणि चार तोफा विजयी यशवंतरावाच्या हातीं आल्या. यापासून विशेष सामग्री व लौकिक हेही त्यास प्राप्त झाले. नंतर तो लागलीच महेश्वरीं गेला; परंतु तेंगांव त्यास लौकरच सोडून सतवाशास पळावें लागलें. येथें ७ तोफा त्याच्या हातीं आल्या. त्या त्याणें दुरुस्त करून आपल्या बरोबर बडगोंद्यास नेल्या. इंदुरीं काशीरावाचें लष्कर जमा झालें होतें त्यास, आपल्यास येऊन मिळा ह्मणून सांगून पाठविण्याचें, त्याणें आतां मनांत आणिलें. केवळ नामधारी ज्याची सत्ता, अशा काशीरावा करितां आपण यत्न करीत आहों असें पाहून, हें लष्कर कंटाळलें होतें; तसेंच ज्या कुळाचे आपण अनुयायी त्या कुळाचा बचाव, सूक्तासूक्त न पाहणाऱ्या राज्यलोभी दौलतराव शिंद्यापासून करावयास, काशीरावापेक्षां यशवंतराव सरदार चांगला आहे असेंही त्यांस वाटूं लागलें होतें. मग अर्थातच शिविलियर डयूडर नेंक आपल्या कंपूसहित, व त्याजबरोबर नजिबखान असे तो आपल्या ८०० स्वारांसहित, यशवंतरावास जाऊन मिळाला. ज्या सालाच्या आरंभीं यशवंतराव पुण्याहून एकटा, पळाला, तें साल पुरें झालें नाहीं तोंच, यशवंतराव बऱ्याच लष्कराचा सेनापति झाला; व मध्यहिंदुस्थानांतील होळकरशाईचे लोक त्यास, आपल्या बालवई राजाचा संरक्षक मानूं लागले.

कवाईत शिकलेल्या कंपूंशीं कौलकरार केल्यानंतर, यशवंतराव महेश्वरीं गेला. तेथें अहिल्याबाईचें द्रव्य शोधण्याविषयीं त्याणें पुष्कळ मेहनत घेतली. बरेंच द्रव्य व जड जवाहीर त्याच्या हातीं लागलें असें ह्मणतात. निदान इतकें खरें आहे कीं, यानंतर लागलीच पगार वाट-

ण्याची त्याणें सुरुवात केली. व आपल्या लष्करांत[1] व्यवस्था करण्याचा हेतु प्रसिद्ध केला. महेश्वरीं सरासरी तीन महिने राहिल्यानंतर, यशवंतराव बडगोंदें येथें आपल्या छावणीस परत आला. येथें योजिलें होतें त्याहून त्यास अधिक रहावें लागलें; कारण निशाण धरलें असतां हातांतील बंदूक फुटून त्याचा डोळा जाया झाला. या सुमारास

१ या प्रसंगीं यशवंतराव होळकरानें आपल्या स्वारांचे, घोड्यांच्या बांध्यापुटचांवरून, तीन वर्ग केले. प्रथम वर्गांतील स्वारांस ५०० रुपये साल असे; दुसऱ्या वर्गांतील स्वारांस ३०० रुपये साल; तिसऱ्या वर्गांतील स्वारांस २५० रुपये साल. हुद्देदार लोकांस याहून मोठे पगार असत. दरमहिन्याच्या अखेरीस वीस दिवसांचा पगार मिळे, व बाकीचा फडशा सालअखेरीस होई. या सर्व व्यवस्थेंत, मुसलमानांमध्यें व हिंदूंमध्यें चमत्कार वाटण्याजोगा भेद ठेविला होता. वर लिहिल्याप्रमाणें पगार मुसलमानांस असे. हिंदूंत, अव्वल प्रतीच्या स्वारांस फक्त, ४०० रुपये, व दुसऱ्या प्रतीच्या स्वारांस २०० रुपये, आणि तिसऱ्या प्रतीच्या स्वारांस १५० रुपये असत. या भेदाच्या कारणांविषयीं मी पुष्कळ चौकशी केली. कित्येक ह्मणाले कीं, अमीरखान व दुसरे मुसलमान सरदार यांच्या वजनदारीमुळें असें होतें. कित्येक ह्मणाले कीं, पठाण लोक नोकरींत असत, व त्यांचे घोडे विशेष मजबूद व विशेष घासदाणा खाणारे असत, यामुळें अशी व्यवस्था होती. व कित्येक ह्मणाले कीं, मराठ्या स्वारांस लुटालूट करण्याची विशेष मोकळीक असे. खरें कारण असें दिसतें कीं, मराठ्यांच्या ढिल्या संवईस निभवून घेण्याची यशवंतरावाची इच्छा होती; यामुळें त्यास असें करावें लागलें. मराठे स्वार, आपल्या स्वारीच्या घोड्यांखेरीज आणखी तट्टं बाळगीत. त्या तट्टांवरून त्यांचीं मुलेंलेंकरें जात, व तीं तट्टें स्वारांतच नमूद असत. अशा सर्व गोष्टींमध्यें, मराठे जातीच्यालोकांस जी मोकळीक असे त्यामुळें, एकंदरीनें पहातां, त्यांचा मुसलमानांहून शेरा नांवानें मात्र कमती, परंतु वस्तुतः अधिक असे.

त्यानें अमीरखानास नवाब अशी पदवी दिली व हत्ती, घोडा, खिलत आणि जडजवाहीर अशीं पुष्कळ मोलाचीं बक्षिसेंही दिलीं. त्या पठाण सरदारानेंही आपल्या मोर्तबावर, "अमीरखान फिदवी यशवंतराव होळकर" अशीं अक्षरें खोदून, यशवंतरावाच्या अभिमानवृद्धीस तृप्त केलें. या नूतन नवाबास आतां त्याणें, लष्कराची बळकट टोळी बरोबर देऊन, पूर्वदिशेकडे लूट करण्यास व दंडखंड घेण्यास रवाना केलें. देवासच्या राजांना एक लक्ष रुपये भरावे लागले. आगर शहरापासूनही बरीच रकम प्राप्त झाली. हें शहर पुढें लुटलें गेलें. यानंतर अमीर-

सन १७९९. खान वर्षा, सिरोंज, आणि सागर, इकडे मुलूक वैराण करीत चालला. सागरास तर विशेषेंकरून मुलूक वैराण झाला, व अमीरखानास अतोनात लूट मिळाली. त्यावेळीं सागर पेशव्यांकडे असे. विनायकराव ह्मणून अधिकारी होता त्याणें कित्येक दिवसपर्यंत शहराचें संरक्षण केलें; परंतु अखेर अमीरखानानें किल्ल्यावर छापा घालून तें घेतलें. या प्रसंगीं अमीरखानाच्या नोकरींत असलेल्या एका माणसानें, जें वृत्त लिहून दिलें आहे[1] त्यांत असें लिहिलें आहे. कीं, या दुर्दैवी शहराजवळ अमीरखानाच्या लष्कराचा अजमासें महिनाभर तळ होता. या काळांत सरसकट निर्बंध लूट माजली होती. त्याच्या लिहिण्यावरून आणखी असें समजतें कीं, अखेर छाप्याच्या दिवशीं शहरास आग लावून दिली. त्या आगीच्या ज्वाला एक महिनाभर शहरांत कोठेंनाकोठें तरी पेटल्या असत. किल्लेकरी व सुखवस्तू मिळून अजमासें चारशेंएक लोक प्राणास मुकले असतील. भिकेस तर एकंदर सारेच मिळाले. कारण माल असबाब ह्मणून अमीरखानाच्या लष्करानें उरूं दिलाच नाहीं. शेवटीं, तळ्यांतून व विहिरींतून टाकिलेले जिन्नस बाहेर काढण्याकरितां तळीं व विहिरी सुद्धां त्यांनीं उपासिल्या. लष्करानें माजविलेली धुमाळी आंवरण्याकरितां, अमीरखानानें पुष्कळदां यत्न केले

---

१. हिंमतरामाचा पुतण्या ख्यालीराम हा आपल्या बापाबरोबर व भावाबरोबर अमीरखानाच्या नोकरींत असे.

असें ह्मणतात. त्या धुमाळीपासून खुद्द त्याचा नांवलौकिक व माल असबाव गेला; परंतु तो काय करितो ! तो केवळ बाजारबुणग्यांचा सरदार होता, व बाजारबुणगा त्यास मानीना. त्याच्या लष्करांत बहुधा सर्व पठाण होते, व पठाणांच्या बंडाव्याची व मगरूरीची या प्रसंगीं शिकस्त झाली. अमीरखान जेव्हां त्यांस आंवरण्याचे यत्न करूं लागला तेव्हां, त्याच्या आरंभींच्या विपत्तीची त्यांणीं टवाळी आरंभिली; आणि आपणास मोठें कोणी केलें हें विसरलां काय ह्मणून विचारिलें, व बजावून सांगितलें कीं, आह्मांस रागास पेटवूं नका. कारण कीं, तसें करण्यांत, एका क्षणांत तुह्मांस मुळची विपत्ति परत प्राप्त होईल. यावेळीं अमीरखानानें सोसिकपणा दाखविला यामुळें, पठाणांची मगरूरी अधिकच वाढली असें ख्यालीराम लिहितो. अमीरखानाच्या योग्यतेस हें लांछन आहे. पठाणांस कर्तव्य कर्म दाखवून देण्यास, पोकळ हांहांच्या विनवणीखेरीज दुसरा उपाय त्यानें योजिला नाहीं. मग अर्थातच सागरांतील पुरुष, बायका वगैरे एकंदर रहिवाशांस सर्व प्रकारचे अपमान व छळ सोसावे लागले. अफगाण लोकांच्या हातीं उंच वर्णाचा ब्राह्मण अथवा आणखी कोणी हिंदु सापडला ह्मणजे ते, त्याचें डोकें चासपून पाहत; व कातड्यावरून परीक्षा करीत कीं, तो माणूस ऐषआरामांत दिवस घालवीत असावा, किंवा कष्टांत दिवस घालवीत असावा. या चर्मपरीक्षेंत जसें निदान होई तसें, सांपडलेल्या कैद्यास मोकळीक मिळे, अथवा जुलमाचा कहर सोसावा लागे.

सागर येथें झालेल्या वर्तमानांपासून निष्पन्न व्हावयाचें तेंच झालें. अमीरखानाचें लष्कर पुर्वींपासूनच अव्यवस्थित होतें, तें आतां तर बिलकुल कह्याबाहेर गेलें. ज्यांना लूट मिळाली होती ते, तीं कशी रक्षण करावी याखेरीज दुसरी फिकर बाळगीत नव्हते; व ज्या कमनशीब्यांना लूट प्राप्त झाली नव्हती ते, नाराज होते. व त्यांणीं हाकाहाक माजविली होती. विनायकरावानें नागपूरच्या भोसल्यास मदतीविषयीं लिहिलें होतें तिकडून त्यांणीं मदतीसाठीं, बेणीसिंग

नांवाचा एक कंपेंतील सरदार, रवाना केला. तो अशा झपाट्यानें कूच. दरकूच करीत आला कीं, सागरापासून कांहीं कोसांच्या टप्पावर येई तोंपर्यंत, अमीरखानास त्याच्या येण्याची वातमी लागली नाहीं वातमी लागतांच त्याणें घोड्यावर स्वार होऊन, आपल्या लष्कारास बरोबर चालण्याविषयीं सांगितलें. दोनतीन हजार लोकांनीं त्याचा हुकूम मानिला; परंतु बाकीच्यांतून कितीएकांनीं, पगार मिळाला नाहीं हा बाहणा करून उघड, हुकुमाची अदूली केली; व कितीएकांनीं टाळाटाळ करून, तयारीस लागतों, झाली ह्मणजे मागाहून निघून येऊं असें सांगितलें. जे कितीएक अफगाण सरदार लूट मिळवून गबर झालेहोते, त्यांपैकीं कोणी कोणी तर, अमीरखान तळ सोडून बाहेर गेला नाहीं तोंच दुसरी दिशा धरून, पंचवीस मैलांवर भोपाळच्या नवाबाचा राठगड ह्मणून किल्ला होता तिकडे, निघून गेले[१]. हा नीचपणाचा कित्ता आणखी पुष्कळ लोकांनीं वळविला. अमीरखान तर फितूर न जाणून, बाकीचे लोक मागून येत आहेत अशा विश्वासावर, पुढें चाललाच होता. मग त्याणें नागपूरवाल्याच्या लष्करावर हल्ला केला. या हल्यांत तो घोड्यावरून खालीं आला, आणि जरी तत्काळ पुनः स्वार झाला तरी, त्यास खालीं येतांना एका हुद्देदारानें पाहिलें होतें, तो हुद्देदार, दिवस गेला असें समजून, भरधांव सागर येथील छावणीकडे पळाला. सागर येथें येतांच सर्व लोक, काय झालें, व अमीरखान काय करीत आहे, याची पूसपास करण्याकरितां घाईघाईनें जमा झाले. तो तर मुखांतून उत्तर न येई इतका गांगरला होता. त्याणें फक्त दोहीं हातांनीं खुणा मात्र केल्या[२] कीं,

---

१. अशा निर्लज्जपणानें अफगाण सरदार वागले त्यांचीं नावें. अगबरखान, हिम्मतखान, दुराबशाह, व नादरखान.

२. ख्यालीरामानें लिहिलें आहे कीं, गांगरून पळून आलेल्या माणसास प्रथमतः, मीच भेटून, प्रश्न विचारिले; परंतु पळण्याच्या खुणे खेरीज दुसरें उत्तर, त्याजपासून मिळालें नाहीं.

लादालादी करा व पाय काढा. या पळण्याच्या खुणेची तामिली तावडतोव झाली. कांहीं पळें लोटलीं नाहींत तोंच, सैन्याचा तळ व बाजार निर्जन झाले. तिकडे जयापजय कांहींच न होतां अमीरखान, रात्रीं, अंधार होण्यापूर्वीं सरासरी अर्धतास, जों परत येऊन पाहतो तों, तळ शून्य आहे. त्याचा हेतु, दुसरे दिवशीं पुनः लढाई सुरू करण्याचा होता. परंतु आतां, आपलें लष्कर कोणत्या दिशेनें पळून गेलें या खेरीज, आणखी माहितीच त्यास लागली नाहीं. मग बरो-बरच्या थोड्या लोकांसह, शत्रूपासून इतक्या जवळ रात्र काढण्याचा हिय्या त्याचा होईना; कारण झालेल्या दाणादाणीचा सुगाव त्यास निर्भ्रांत लागेल, असें त्यास वाटलें. ह्मणून त्याणें आपल्या छावणीस, आंत माल असबाव होता त्यासह, आग लावण्यास हुकूम देऊन, आपण राठगडाची वाट धरिली. तेथें पूर्वीं पळून गेलेले सरदार आहेत असें त्यास आढळलें; व शिवाय, त्याच्या कुमकेस बळकट लष्कर देऊन यशवंतरावानें त्याचा भाऊ करीमुद्दीन यास पाठविलें होतें तोही, तेथें येऊन पोंचलेला आढळला. सर्वांचीच दुःखदायक स्थिति यामुळें, दोन तीन दिवसपर्यंत कोणी कोणावर रागें भरला नाहीं. खुद्द अमीरखानास राहण्यास तंबू नव्हता, व अंगांतल्या कपड्यांखेरीज पांघरावयास वस्त्रें नव्हतीं. राठगडाच्या किल्लेदारानें कांहीं नजर नजराणा पाठविला, व लष्करानें तेथील मुख्य सावकारांस लुटलें, यामुळें त्याची प्रकृत विपत्ति दूर झाली. मोहिमीचा बंदोबस्त न राखल्याबद्दल, करीमुद्दीन आपल्या भावास पुष्कळ रागें भरला. लूट मिळाल्यामुळें जे सरदार बदचालीनें वागले, व लष्कर सोडून निघून गेले त्यांजपासून, झालेला तोटा कांहीं अंशीं तरी भरून घेण्याभावीं, लुटीचा कांहीं हिस्सा परत मागावा ह्मणूनही तो ह्मणाला.

१. या वेळेस मुरीदमहंमदखानाचा मुलगा महंमदखान राजगडाचा किल्लेदार होता. त्याणें या आगंतुक पाहुण्यास पांच हजार रुपये पाठविले.

मागतों ह्मणून अमीर खानानें कबूल केलें. परंतु हा बेत ऐकून अफगाण सरदार रागास चढले, व त्यांणीं दुसरे दिवशीं लष्कर सोडिलें. अशी सोप्या तऱ्हेनें त्यांची सुटका होऊं देऊं नये ह्मणून करीमुद्दीनानें निश्चय केला; व तो, आपल्या बरोबरच्या लोकांची एक टोळी घेऊन, त्यांच्या पाठीस लागला. कदीईच्या खेड्याजवळ त्यांस गांठून त्याणें, चहूं बाजूंनीं घेरून घेतलें. तीन दिवस पर्यंत ह्मणण्यासारिखें कांहीं झालें नाहीं. चौथ्या दिवशीं प्रातःकाळीं, करीमुद्दीनानें त्यांच्या तळावर हल्ला केला. कांहीं थोडावेळ झगडा झाल्यानंतर, अफगाण सरदार पराजित होऊन चहूं दिशेनें पळाले. या फिसादी लोकांपैकीं मुख्य जो अगवरखान तो, लढाईंत पडला. करीमुद्दिनानें त्याचें डोकें, व अफगाण सरदारांपासून परत घेतलेली लूट अमीरखानाकडे रवाना केली. केवळ पेंढारी लोकांची जमात बरोबर घेऊन, करीमुद्दीनानें अशा तऱ्हेनेंही नोकरी बजाविली; व मुख्य अधिकाऱ्यानें आपल्या हुकुमाची अदूली होऊं देऊं नये अशाविषयीं, आपल्या वडील भावास उपयुक्त धडा घालून दिला. एकंदरींत हा तरुण सरदार, वडील भाऊ अमीरखान याजपेक्षां हरएक तऱ्हेनें, विशेष गुणी होता. त्याजवर यशवंतरावही बहुत कृपा करी व विश्वास ठेवी. हें एक त्याच्या धूर्ततेचें उदाहरण आहे. संपादिलेला लौकिक उपभोगण्यास, कमरुद्दीन फार काळ राहिला नाहीं. सुजालपुरावर हल्ला होत असतां, तो मारला गेला. त्याच्या मरणानें, व सुजालपूर शहर लुटून फस्त केलें या कारणानें, अमीर खानाच्या सागर येथील वर्त्तणुकीपासून यशवंतरावास जितका राग आला होता त्याहूनही, आतां विशेष आला. इतक्यांत त्याणें असेंही ऐकिलें कीं, आपल्या अधिकाराविरुद्ध अमीरखान हेतु धरीत आहे. तेव्हां तर त्याणें त्यास पकडण्याकरितां, मजबूत लोकांची जमात देऊन शामराव महाडिकास रवाना केलें. यशवंतरावाच्या या कृतीपासून भीति पाऊन, अमीरखानानें आपल्या पूर्ण विश्वासांतील हिम्मतराव नांवाचा एक काम-

दार, होळकरांच्या ठिकाणीं आपली आज्ञांकित बुद्धि व भक्ति आहे असें बोलून दाखविण्याच्या हेतूनें, इंदुरीं रवाना केला. यशवंतरावानें सांगितलें कीं, आपला खरेपणा दाखविणें असेल तर, अमीरखानानें एकटें माझ्या लष्करांत यावें. अमीरखानाच्या स्वभावांत, युक्तीच्या वाटें कार्य साधावें, हा गुण विशेष असे. निग्रह दाखविण्यापेक्षां, नमून आपला हेतु सिद्धीस न्यावा, असा तो हमेष यत्न मांडी. तेव्हां अर्थातच त्याणें यशवंतरावाचें ह्मणणें कबूल करण्यास मागेंपुढें पाहिलें नाहीं. फक्त शंभर स्वार बरोबर घेऊन तो, शामरावाच्या लष्करांत गेला. त्याजबरोबर इंदुरीं जाऊन, व यशवंतरावाची गांठ घेऊन त्याजपुढें त्याणें आपली तरवार ठेविली, आणि ह्मटलें कीं, "आपण निंदखोरांच्या गोष्टी ऐकिल्या. आतां हीं मीं आपलीं हत्यारें आपल्या स्वाधीन करितों. हीं दुसऱ्याच्या नोकरींत मी धारण करूं शकत नाहीं." या नमनशीलतेपासूनही, मराठा सरदार जो यशवंतराव त्याणें तत्काल राग सोडिला नाहीं; व त्याच्या मनांत उभा राहिलेला संशय दूर झाला नाहीं. असें पाहून त्याचा विश्वास परत प्राप्त करून घेण्याचा अमीरखानानें निश्चय केला. मग तो, एकेदिवशीं प्रातःकाळीं एकटा उठून, यशवंतरावाकडे गेला; व आपला जंबिया त्याच्या स्वाधीन करून ह्मणाला कीं, आपले संशय अझून दूर होत नसतील तर, माझा जीव घेऊन दूर करा. माझा जीव जाऊन जर आपल्या राज्याचें कल्याण होतें, अशी आपली खात्री असेल तर, तसें होण्यांत माझें समाधान आहे. हें ऐकून यशवंतरावानें त्यास लागलीच आलिंगन दिलें, व बोलून दाखविलें कीं, अशा चांगल्या व भक्तिभाव ठेवणाऱ्या मित्राचा मला क्षणभर तरी कसा संशय उत्पन्न झाला, हें पाहून माझी मला लाज वाटते.

वर लिहिलेलीं वर्तमानें अशा सपाट्यानें एकामागून एक घडलीं कीं, माळव्यांतील आपला मुलूक संरक्षण करण्याकरितां, दौलतराव शिंदा जों लष्कर जमवीत आहे तोंच, तो मुलूक निमा उद्वस्त झाला. या प्रांतास तीस वर्षें अधिक, शांतीचा उपभोग झाला होता यामुळें,

आतां सुटलेल्या वादळांतून निभावण्यास, त्यांतील राहिवासी लोक समर्थ नव्हते. आतां तर जिकडेतिकडे वुछाडावुछाडी फैलावली. जुलमांचीं व घातापातांचीं कृत्यें, एकामागेंएक व एकामधून एक, अशा त्वरेनें उत्पन्न होऊं लागलीं कीं, हरएक परगणा अंदाधुंदीच्या, व जुलमाच्या तावडींत सांपडला. दौलतराव शिंदा येत आहे हें ऐकून,

सन १७९९. होळकरास आपलें लष्कर एकत्र गोळा करावें लागलें. या लष्कराची या काळीं संख्या ६० पासून ७० हजार होती. शिंद्यानें माळव्यांत प्रथम पाठविलेल्या लहानलहान टोळ्या पराजय पावल्या. परंतु पुढें सतवास येथें यशवंतरावाचा वळकट अपजय होऊन, त्यास इंदुरीं जावें लागलें; तेथें कांहीं दिवस मुक्काम करून, तो सारंगपुराकडे निघाला. या शहरीं अमीरखानही येऊन दाखल झाला. मग आठ कंपूंचा व वीस तोफांचा शिंद्याच्या लष्कराचा एक भाग उज्जनीस होता, त्याजवर ऐन पावसाळा असतां, हल्ला करण्याचा त्यांणीं इरादा केला. शहराजवळ येऊन पोंचले त्या दिवशींच, सैन्याच्या झटापटीस आरंभ झाला; परंतु अखेरीचें रण होण्यापूर्वी आठ दिवस लोटले. अखेरच्या रणांत तुमुल युद्ध झालें; व तो दिवस यशवंतरावानें आपल्या धैर्यानें व बुद्धिवैभवानेंच जिंकिला. एकीकडे तर त्याणें, शत्रूंच्या तोंडावर निकरानें हल्ला करण्याचा हुकूम दिला; व दुसरीकडे अमीरखानास सांगून पाठविलें कीं, स्वारांची मोठी टोळी घेऊन, जवळ खोल नाला होता त्याच्या आश्रयानें दडून दडून, शत्रूंच्या पाठीवर जाऊन पडावें. उज्जनी शहर शिंद्यांच्या कंपूंच्या पाटीशीं होतें. यशवंतरावाचे स्वार हें चक्कर साधून उज्जनीच्या दि-

---

१. पूर्वी दिलेल्या वारीक वृत्तावरून यशवंतरावाचें लष्कर कशा तऱ्हेचें होतें हें दिसून येईल. इतर लोकांबरोबर त्यास पुष्कळ पेंढारीही येऊन सामील झाले होते; परंतु जेव्हां दौलतराव माळव्याकडे यावयास परत निघाला तेव्हां, कादरवक्ष, कूकू व साहेवखां यांच्या खेरीज, वहुतेक पेंढाऱ्यांचे सरदार दौलतरावास जाऊन मिळाले.

शेनें जेव्हां येऊं लागले तेव्हां, प्रथमतः हे आपले साह्यकारी येत आ-हेत असें, शिंद्याच्या लष्करास वाटलें. व ही गैर समजूत त्यानांत येण्या-पूर्वींच, होळकराच्या स्वारांनीं हल्ला केला. मग जो शिंद्याचा पराज-य झाला त्यास, दुसरें उदाहरण सांपडणार नाहीं. कंपूंची पुरी नासा-डी झाली ह्मणून सांगतात. यशवंतरावानें कशी व्यवस्था स्थापिली होती, व त्याच्या स्वभावाचें कसें सामर्थ्य होतें याचा, या गोष्टीपासून आपल्या मनावर बळकट ठसा उमटतो कीं, त्यास हा विजय प्राप्त झाला असतां, उज्जनी शहर लुटलें गेलें नाहीं. सैन्यापासून तें बचावून राखून, त्यांतील संपत्तिमान् लोकांपासून त्याणें जातखत जब-रदस्त दंड घेतला. त्या लोकांस त्यांच्या वास्तविक संपत्तीच्या मा-नानें ह्मणा, अथवा लौकिकाच्यामानानें ह्मणा, दंड भरावा लागला. लुटालुटी करणांराचा मुख्य गुरूच ह्मटला पाहिजे असा जो नादर-शाह त्याणें, ज्या तऱ्हेनें पूर्वीं दिल्लीस पैसा उकळिला होता, त्याच तऱ्हेनें बहुधा हल्लीं यशवंतरावानें उज्जनीस उकळिला, हें एक विचित्र साम्य आहे. दोहों प्रसंगीं, शहरांतील राहणाऱ्या कित्येक नीच व हलकट लोकांनीं, शहराच्या निरनिराळ्या महल्ल्यांतून पैसा, व माल असबाव वगैरे जें कांहीं सांपडलें तें बुछाडून घेण्याचा हक्क, विजयसं-पादित्यासरदारांपासून पैसा भरून विकत घेतला[१].

शिंद्याच्या कंपूंचा पराजय झाला, व माळव्यांतील त्याचें मुख्य शहर यशवंतरावाच्या हातीं आलें, या गोष्टीचा लवकरच त्यानें क्रूरते-नें सूड उगविला. पावसाळा संपतांच इंदुरावर हल्ला करण्यास बळकट लष्कर देऊन, शिंद्यानें सरजाराव घाडग्यास पाठविलें. श-हर बचाविण्याकरितां होळकर उज्जनीहून घाईनें परतला. या प्रसंगीं शत्रूचें सामर्थ्य त्याणें, वास्तविक होतें त्याहून कमी लेखिलें. त्याणें हुकूम पाठविला असता तरी, सिव्हिलियर ड्यूडरनेक न मानिता असें मानण्यास

---

१. हिंदुस्थानांतील शहरांच्या महल्ल्यांची पोलिसकामांतील व्यवस्था, बहुधा युरोपांतील व्यवस्थेसारीखीच आहे.

यद्यपि जागा आहे तथापि, ज्या अमीरखानानें उज्जनी फते केली हाती व जो या वेळीं आपल्या कंपूसह जावऱ्यास होता तो, हुकुमाबरोबर आला असता. परंतु आपले घोडेस्वार बस आहेत असें यशवंतरावास वाटून, त्याणें फार थोडें पायदळ बरोबर घेतलें. त्यांत युरोपियन कामगार तर एकही नव्हता. मात्र उज्जनीस पकडलेल्या सर्व तोफा त्याणें बरोबर घेतल्या. या सरासरी ३०० असत. घाटगा येऊन पोंचण्यापूर्वी यशवंतराव इंदुरास दाखल झाला; व त्याणें, शहराच्या दक्षिणेस दीड कोशावर विजलपूर ह्मणून गांव आहे तेथें, तळ दिला. घाटगाही बिजलपुराजवळच येऊन राहिला. नऊ अथवा दहा दिवसपर्यंत एकसारखी चकमक झडत होती, व उभय-लष्करांत तोफा सुरू होत्या. शेवटीं हल्ला करण्याचा निश्चय करून, यशवंतरावानें अमीरखानास व भवानीशंकरास, रात्रीं दहा बारा हजार लोक बरोबर घेऊन, दूर चक्कर साधून, प्रातःकाळीं शत्रूंच्या पिछाडीस एक उंच जागा होती तेथें जावें, असा हुकूम दिला. यशवंतरावाच्या लष्करापेक्षां ज्या लष्करांत विशेष व्यवस्था असते त्यांमध्येंही, या प्रकारची तजवीज योजिल्यापासून पुष्कळदां अनर्थ घडून येतो. तो या प्रसंगीं घडला. शत्रूंच्या पिछाडीस पाठविलेलें लष्कर मुक्कामावर पोंचण्यापूर्वींच, घाटग्याकडील पेंढारी लोकांच्या उद्धटपणामुळें, यशवंतरावाजवळचे मुसलमानी स्वार हातघाईस आले; व त्या पेंढारी लोकांनीं पाय काढिला. घाटग्याकडील जे मराठे लोक त्यांच्या मदतीस येत होते, त्यांणींही त्यांचें उदाहरण घेतलें. व शिंद्याच्या लश्करांत हाहाकार होण्यास आरंभ झाला. पायदळानें तोफा टाकून देऊन, हातांतील शस्त्रेंही टाकण्यास आरंभ केला. अशा प्रकारें यशवंतरावास यश प्राप्त होत होतें; परंतु त्यानें त्याचा पाठलाग केला नाहीं यामुळें, हा दिवस तो हरला. तो तर मुसलमानी स्वारांनीं मांडिलेला हल्ला न होऊं देण्यास पहात होता. परंतु हा हेतु सिद्धीस गेला नाहीं. अशा संधींत काय करावें हें न सुचून, एक क्षणभर

स्तब्ध राहिला. व झालेली चुकी जों त्याच्या ध्यानांत येत आहे तोंच शिंद्याचें पायदळ सांवरलें; आणि आपल्याशीं लढणारे सारे दोन-तीनशें स्वार आहेत असें पाहून, पुनः हुषारीवर येऊन, त्यांणीं यशवंतरावाचा पराभव केला. त्यांची धांदल उडविण्याविषयीं यशवंतरावानेंही पुष्कळ प्रयत्न केले; परंतु त्यांत हशील प्राप्त झालें नाहीं. इकडे हें चाललें आहे तों, अमीरखान व भवानीशंकर नेमिलेल्या ठिकाणीं जाऊन पोंचले. व तोफ ऐकावयाची, व मागून व पुढून दोहोंकडून एकदम हल्ला करावयाचा, असा पूर्वसंकेत होता तो एकीचकडे राहून, त्यांच्या असें दृष्टोत्पत्तीस आलें कीं, यशवंतरावाचा निमाशिमा पराजय झाला आहे, व दिवसही वराच चढून आला आहे. आतां अर्थातच दिवस शिंद्याच्या लष्करास अनुकूळ झाला. होळकरांकडील कित्येक लोक गांवांत अश्रयाकरितां गेले, व या ऐन वाणीच्या प्रसंगीं कित्येक सरदारांनीं आपले उंट लादण्याचा हुकूम दिला. मग यशवंतरावाच्या अनुयायी लोकांत, आपला पराजय झाला अशी, पुरी सम्जूत झाली. यामुळें काळोख पडण्यापूर्वींच त्याणीं पळण्याची सुरवात मांडिली. पेंढारी लोक पळणाऱ्या लष्कराची हमेष चाहूल ठेवीतच असत; ते तत्काळ भारबरदारी वगैरे माल असबावावर पडले. मग तर अनिवारच घोळ माजला. आपण दिवस हरलों असें पाहून, यशवंतराव आपले स्वार व कांहीं पायदळ घेऊन, जांवेकडे पळाला. त्याच्या तोफा, व तळावरचा मालअसबाव, शत्रूस मिळाला व मुख्य राजधानीही शत्रूंच्या हातीं लागली.

इंदूरची लढाई हरण्याचीं अनेक कारणें सांगतात. कोणी ह्मणतात कीं, पायदळ नीट वागलें नाहीं. कोणी ह्मणतात कीं, उज्जनीस फाटाफूट झालेल्या शिंद्याच्या लष्करांमधून, यशवंरावानें तोफखाना भरिला होता, त्यांतील लोकांनीं फिसाद केला. व कोणी ह्मणतात कीं, अमीरखानानें प्रथमच वाईट कित्ता घातल्यानें असें झालें. आपला घोडा लढाईंत पडल्यानंतर लढणें सोडून त्याणें, बचावाकरितां झा-

ह्यांचा आश्रय केला. पराजय कां झाला हें दाखविण्यास हीं कारणें बस आहेत. तथापि हेंही ध्यानांत आणिलें पाहिजे कीं, राजधानीच्या सन्निध रण उभें राहिल्यानें प्रथमपासूनच, विशेष घोळ माजण्यास कारण झालें. युद्धप्रसंगांत असें स्थान फार घातुक असतें. या रणाच्या पसंतीबद्दल सर्व लोक यशवंतरावास दोष लावितात.

सरजाराव घाटग्यानें इंदुरीं केलेल्या अनर्थांचा, वर उल्लेख आलेलाच आहे. अमीरखानानें सागरास केलेले अनर्थ, त्यापुढें फारच कमी दिसतात. शिवाय त्यांत व यांत हेंही अंतर होतें कीं, यद्यपि अमीरखानाचा अधिकार पुळपुळीत, व त्याचें स्वभावसामर्थ्य कमी होतें तथापि त्याणें, आपल्या कह्याबाहेर जाणाऱ्या लोकांनीं मांडिलेले पुंडावे बंद करण्याविषयीं, निदान इच्छा तरी दाखविली. सरजाराव तर उलटा अनर्थपातांपासून संतोष पावला; व रानटी पेंढाऱ्यांससुद्धां ठाऊक नाहींत, अशीं अघोर कर्मे करण्यास त्याणें लोकांस चेतविलें असें ह्मणतात. बिचाऱ्या दुर्दैवी स्त्रियांनीं, दुष्टपणापासून व बेअब्रूपासून वांचण्याकरितां, विहिरींत उड्या टाकटाकून जीव दिले. त्यांच्या देहांनीं इंदुरांतले कुवे भरून गेले होते ह्मणून ह्मणतात. यांत अतिशयोक्ति आहे असें ह्मणण्यास कारण नाहीं. हा अनर्थ पंधरा दिवस अधिक, सुरू होता. अखेर इंदुरांतील एकूणएक रहिवासी या मारले गेले, या पळाले. व एकूणएक घरांचा विध्वंस झाला. तेव्हां लूट, कतल, व विध्वंस यांची जी धुमाळी माजली होती, ती बंद झाली. चार पासून पांच हजारपर्यंत लोक मारले गेले; व जे कोणी पळाले त्यांजजवळ असबाब बिलकुल राहिला नाहीं, असें सांगतात.

होळकरांच्या राजधानींतील संपत्ति, ओ येई तोंपर्यंत शत्रु लुटीत असतां, यशवंतराव जांबेस अटकून पडला होता. हें गांव विंध्याद्रीच्या किनाऱ्यावर बळकट ठिकाणीं असून, त्यास तटबंदीही आहे. शिंद्याचे पेंढारी लोक दररोज, यशवंतरावाच्या लष्करापासून कोस अर्धकोसावर येत, यामुळें त्यास दाणापाण्याची तूट येऊं लागली. लष्करास अ-

न्न मिळेना. व पगार मिळेना अशी स्थिती झाली. यशवंतरावानें रोज जीव तोडतोडून गोष्टीसांगून, मोठ्या आयासानें त्यांस एकत्र राखिलें होतें. व तुमची स्थिति सुधारण्यास मी लवकरच उपाय योजितों ह्मणून आश्वासन दिलें होतें. या प्रसंगीं त्याणें जे उपाय योजिले त्यांवरून, कशा अत्यंत संकटांत तो होता याचें, अनुमान करितां येतें. आतां त्याणें आपल्या हातांखालील सरदारांपासून वचन घेतलें कीं, प्रस्तुत दर स्वारास पांच रुपये मोलाचा एकएक सोन्याचा तुकडा दिला असतां, आह्मीं आठ दिवसपर्यंत त्यांना गप्प राखूं. मग अहिल्याबाईचे तिजोरींत दागीनें होते ते सारे, बायकांच्या अंगावरील सुध्धां, मोडून तोडून, कबुलायती प्रमाणें सोन्याचे तुकडे केले, व ते दिले. नंतर थोडाबहुत जो माल असबाब जवळ होता तो महेश्वरीं रवाना करून देऊन, नुस्तीं घोडीं व माणसें बरोबर घेतलीं; व एका दिवसांत एकूणच्याळीस कोसांचा सपाटा देऊन, तो रतलामेच्या संपन्न शहरीं दाखल झाला, व तें शहर लुटलें. शहरीं आल्याबरोबर त्याणें आपल्या लष्करास सांगितलें कीं, उपाय योजिण्याचें दिलेलें वचन, मीं आतां पुरें केलें आहे. तर, तुह्मीं इच्छेस वाटेल तसें आप आपलें पाहून घ्या. अन्नास महाग झालेल्या त्याच्या शिपायांस, रतलाम खरोखरीच मेजवानीच्या ठिकाणीं झालें. ही मेजवानी तेरा दिवस पर्यंत सुरू होती. या काळांत मनुष्यें व घोडे ओ येई तों पर्यंत चरले. घोड्यांच्यानें नेववेल तितकी लूट लष्करास मिळाल्यानंतर, यशवंतराव रतलामेहून [1]महेश्वरीं उलटला. महेश्वरीं दाखल झाल्यानंतर, आपल्या बरोबरच्या लोकांस त्याणें उघड सांगितलें कीं, आतां महिनेमाह पगार देण्यास मला ताकत नाहीं; परंतु लुटालूट करून, नशीबाचा दाखला पाहाण्यासाठीं तुह्मांतून मजबरोबर निघण्यास जे कोणी च्याहतील त्यांस, नेण्यास मी राजी आहें. हें

१ या गोष्टीवरून असें दिसतें कीं, अहिल्याबाईच्या खजिन्यांत जें द्रव्य सांपडलें होतें, तें सारें खर्च झालें. तें द्रव्य वीस अथवा तीस लाखांहून ज्यास्ती नव्हतें असें सांगतात. लष्कर प्रथमतः यशवंत-

बोलणें लहानमोठ्या सर्वांनीं उत्साहानें कबूल केलें, ह्मणून लोक खात्रीनें सांगतात.

काशीरावाचा पक्ष धरून आपलें हित साधत नाहीं असें पाहून दौलतरावशिंद्यानें त्यास, आपल्या लष्करांतून निघून, महेश्वरीं जाण्यास सांगितलें. यशवंतराव येऊन पोंचल्यानंतर दोन दिवसांनीं काशीराव आला. यशवंतरावानें त्यास दयेनें व सन्मानानें वागविलें, परंतु राज्यकारभारांत खरा ह्मणा अथवा नांवाचा ह्मणा, कोणताच हिस्सा घेऊं दिला नाहीं. एके दिवशीं, दौलतरावशिंद्याच्या सल्लामसलतींत आपली वजनदारी आहे, असा गर्व वाहून काशीराव यशवंतरावास ह्मणाला कीं, ह्मणाल तर तुह्मामध्यें व दौलतरावामध्यें मी सख्य करून देतों. ही गोष्ट मला एका अब्रूदार ग्रहस्थानें सांगितली. या संभाषणसमयीं तो हजर होता. इतर लोकांनींही हें संभाषण असेंच झालें, अशी माझी खात्री केली. यशवंतरावानें संतापून उत्तर केलें कीं, "जीभ अटोप; होळकरांच्या कुळावर जर दया करून ईश्वर तुला स्त्रीजन्म देता तर, मुलें प्रसवून दुसऱ्या कुळाचें तरी हित कारितास; परंतु तुला पुरुषाचें नांव आहे. ह्मणून, तूं आपल्या कुटुंबाच्या नाशासमात्र कारण झाला आहेस."

शिंद्यानें काशीरावास महेश्वरीं जाण्याचें सांगितलें, इतकेंच नाहीं. त्याणें त्यापूर्वीं थोडावेळ यशवंतरावास असेंही कळविलें होतें कीं, आमच्या प्रांतांस यापुढें धका न लागेल तर, मल्हाररावाच्या मुलास आह्मीं सोडून देतों; व होळकरांचा सर्व मुलूक घेतलेला परत देतों. मुळारंभीं यशवंतरावाचें मागणें याहून विशेष नव्हतें; परंतु आतां लुटालुटी करण्यांत त्याचा इतका प्रवेश झाला होता कीं, तो क्रम सोडण्यांत त्यास भयच होतें. ह्मणून यावेळीं उत्तर करितांना यशवंतरावानें कि-

---

रावाच्या ताब्यांत आलें त्यावेळीं, वेळच्यावेळीं पगार वांटण्याच्या वगैरे ज्या तर्तुजी त्याणें केल्या होत्या, त्या सर्व आतां मोडल्या; व लुटीखेरीज दुसरा उपाय नाहीं असें त्याणें उघड जाहीर केलें.

तीएक परगणे असे मागितले कीं, ते पहिल्या मल्हाररावाच्या वेळेस सुद्धां, होळकरांच्या अधिकाराखालीं नव्हते. हें मागणें कबूल न झाल्यामुळें, लढाईची विशेष तयारी त्याणें मांडिली.

सन १८०१. शिंद्याचा व पेशव्यांचा दक्षिणेंतील मुलूक लुटण्याकरितां, बंगश जातीचे दोन पठाण सरदार बरोबरदेऊन, फत्तेसिंगमान्यास आतां त्याणें रवाना केलें. व जातीनें आपण उत्तरेकडे गेला. जातांना रस्त्यांतील मुख्य मुख्य गांवांवर जबर दंड बसवीत चालला. या स्वारीच्या आरंभीं, आपला मुलूख यशवंतरावनें उद्वस्त न करावा ह्मणून सातलाख रुपये, कोठ्याच्या जालीमशिंगास द्यावे लागले. या प्रसंगीं यशवंतरावाबरोबर कवायत शिकलेले कंपू होते, परंतु त्यांत बराच फेरफार झाला होता शिव्हिलियर डयूडरनेक सामील न होतां, रामपुऱ्यासे[२] अलग राहिला. असें त्याणें भीतीनें केलें असो, अथवा शिंद्याच्या चाकरीमधील स्वदेशीय लोकांशीं पत्रव्यवहार केल्यामुळें असो. तुह्मांस योग्यतेनें वागवूं ह्मणून डयूडरनेकास सांगण्याकरितां, यशवंतरावानें शामराव महाडिकास पाठविलें. कांहीं केल्या त्याचा विश्वास बसत नाहीं असें पाहून, शामरावानें त्याच्या पलटणीस सांगितलें कीं, तुमचा राहिलेला पगार आह्मी देऊं; तुह्मी डयूडरनेकास सोडावें, व माझ्या लष्करास जाऊन मिळावें. हें लष्कर आतां जावदेस जाऊन पोंचलें होतें. पलटणींनीं राजी होऊन तसें केलें; नंतर जावदेहून एक टोळी, व चार तोफांखेरीज बाकी सर्व पायदळ, महेश्वरीं महाडिकानें रवाना केलें. इकडे स्वारांनिशीं यशवंतराव राजपुतान्यांतील परगणे जो लूटीत चालला, तो उत्तरेस टोंकपर्यंत पोंचला. येथें, शिंद्यानें आपल्या पाठलागाकरितां रवाना केलेली पलटण येऊन

---

१. यशवंतरावानें नासाडी करूं नये ह्मणून नवलाई, खाचरोद, मंदोसर वगैरे गांवांस पुष्कळ पैसा द्यावा लागला.

२. रामपुरा चंमलनदीवर आहे. हा गांव व याच्या सभोंवतीचा मुलूक, लष्कराच्या पगाराकरितां डयूडरनेकास जायदादद दिला होता.

पोंचली असें ऐकून, तो पश्चिमदिशेस वळला. तसेंच मेवाडा-मधील नाथद्वाराच्या संपत्तीचा लौकिक ऐकून, त्या देवस्थानास हिंदू लोकांनीं धार्मिकबुद्धीनें जें द्रव्य व जडजवाहीर अर्पिलें होतें तें लुटावें, व आपल्या लष्कराची विपत्ति दूर करावी, अशी उमेद धरून तो, मोठ-मोठे मुक्काम करीत चालला. कितीएक प्रसंगीं स्वार्थाची हानि असतांही, मराठे शिपायी धर्मबुद्धीस मानीत; परंतु अशाविषयीं आपल्या देशबांधवांच्या कांकूंचा यशवंतराव उपहास करी. तो येत आहे असें ऐकून, नाथजीची मूर्ति व चारपांच लाखांचें जडजवाहीर, लोकांनीं उठवून दुसरीकडे नेलें. नंतर बहुधा नाथजी सुटून गेल्याचें ऐकूनच, त्याणें सौम्य वृत्ति धरिली व नाथजीचा नाद सोडिला असें दिसतें. पुढें दोन वर्षांनींच हें देवस्थान त्याणें लुटलें, व मिळालेल्या लुटीस थट्टेनें लोकांपाशीं "नाथजीचा प्रसाद, नाथजीचा प्रसाद" असें ह्मणूं लागला. त्याच्या लष्करांत पठाण लोक सर्वांत विशेष असत, व त्यांजवर त्याची विशेषेंकरून भक्ति असे. त्या पठाण लोकांस अशा धर्माच्या हेटाळणीनें यशवंतराव प्रिय होई; परंतु त्याच्या लष्करांतील हिंदुलोक फार चपापत. त्यांतील कित्येक अझून असें मानितात कीं, हें कर्म करण्यापूर्वींच, यशवंतरावाच्या वेडास आरंभ झाला होता. व कित्येक त्याच्या कठीण अंताचा संबंध, हा जो त्याणें एका मुख्य देवतेचा गुन्हा केला, त्याजकडे लावितात.

मेवाडचा बराच भाग लुटून फस्त केल्यानंतर, यशवंतराव चंमल-नदीच्या कांठीं रामपुऱ्यास परत आला; येथें लष्कराचा मुक्काम असतां, जवळच्या हिंगलाजगडांत पुरलेल्या बऱ्याच द्रव्याचा त्यास शोध लागला, असें ह्मणतात. रामपुऱ्याहून तो अमझऱ्यास गेला. हें शहर त्याणें लुटलें व जाळिलें; कारण येथील राजा हिय्या करून आड आला ह्मणून, तो संतापास चढला. त्या राजाच्या हिय्यापासून कांहीं निष्पन्न झालें नाहीं. नंतर नर्मदा उतरून, नेमांडांतील शिंद्यांच्या परगण्यांवर तो जाऊन पडला, व ते परगणे त्याणें पुरे उजाड

पाडिले. त्यावेळेस खांडवें हा संपन्न गांव होता, त्याची त्याणें राखरां-गोळी केली; व ब्र्‌हाणपुरावर जबर खंड बसविला. येथें त्याचें पाय दळही त्यास येऊन मिळालें. हें पायदळ व कांहीं स्वार बरोबर घेऊन तो, तसाच खानदेशांत पैसा उगविण्यास चालला. व अमीरखानास व दुसऱ्या सरदारांस, पेशव्याचे व निजामाचे मुलूख लुटून आपआपल्या लोकांची उपजीविका करावी ह्मणून सांगून, त्याणें निरनिराळ्या दिशेकडे रवाना केले[1].

यशवंतरावाचें लष्कर पुण्यास जात असतां, दुष्टकृत्यांची व लुटालुटीची जी धूम उडाली त्याचें, बारीक वर्णन करणें व्यर्थ आहे. त्या राजधानीवर यशवंतराव चालून जात आहे या धास्तीमुळें, दौलतराव शिंद्यानें पेशव्यांच्या सहायास लष्कर रवाना केलें. हें लष्कर यशवंतरावाच्या लष्कराजवळून जात असतां, थोडीबहुत चकमक झडली. त्या प्रसंगीं शिंद्याच्या कवाईत शिकलेल्या दोन पलटणींवर, अमीर खानानें यश सं-

१. मालेगांव, टोंकें, कायगांव, पारें, संजण, आणि जालरा या शहरांपासून अमीरखानानें जबरदस्त खंड घेतले. व जवळचे दुसरे गांवही लुटले. अंवड मल्हाररावाच्या मरणापासून शिंद्यांच्या ताब्यांत होतें, तें तीन दिवस लुटल्यावर शेवटीं अमीरखानास शरण आलें. हें गांव लुटलें न जावें ह्मणून, त्या सरदाराची फार इच्छा होती असें ह्मणतात. परंतु अशाविषयीं त्याणें केलेले सर्व प्रयत्न व्यर्थ झाले. येथून तो विंचुरास गेला. विंचूरच्या जाहागीरदाराबरोबर त्याची लढाई झाली. विंचुरकराचा पुरा पराजय झाला. मग अर्थातच तें गांव पठाणांनीं लुटून विध्वंस करून टाकिलें. हे पराक्रम केल्यानंतर अमीरखान, फुलतांब्यास यशवंतरावास येऊन मिळाला. हें गांव लुटण्याविषयीं त्याणें अत्यंत उत्सुकता दर्शविली. जरी या क्षेत्रास इजा देण्याची यशवंतरावानें कांकूं दाखविली तरी, शेवटीं पंधराहजार रुपये खंड घेण्याविषयीं त्याणें आपली संमति दिली. या रकमेच्या तिप्पट रकम फुलतांब्याच्या लोकांस अखेर भरावी लागली.

पादिलें. पुढें याहून विशेष त्रास न पावतां, शिंद्याचें लष्कर मुक्कामास जाऊन पोंचलें.

तारीख २५ अगटंबर रोजीं यशवंतरावाच्या सैन्याचें, बाजीराव व सन १८०२. शिंदा यांच्या सैन्याशीं, पुण्यावर जें युद्ध झालें त्याचें वर्णन, वर केलेंच आहे. शत्रूसमोर आपलें लष्कर उभें करून, व पायदळाच्या पाठीवर व बाजूनें रिसाले ठेवून यशवंतराव, लढाई चांगली दिसावी ह्मणून एका टेंकाडावर उभा राहिला. त्याच्या विश्वासांतील कित्येक कामगार ह्मणतात कीं, अझूनसुद्धां पेशव्यांशीं दोस्ती होईल अशी तो उमेद बाळगून होता. खरोखरीच त्याणें अशी उमेद बाळगिली असेल तर, ती लौकरच विलयास गेली[1]. यशवंतरावाच्या

---

१. यशवंतराव व बाजीराव यांमध्यें इतकें बळकट वितुष्ट पडलें होतें कीं, यशवंतरावानें बाहेरून कसेंही दाखविलें असलें तरी, निरुपाया-खेरीज बाजीरावाचें व आपलें सख्य होईल हें, त्याणें कधींही खरोखर मनांत आणिलें नाहीं. पूर्वीं ज्या वेळेस यशवंतराव पुण्याहून पळाला होता, त्याच वेळेस त्याचा भाऊ विठोजीही पळाला होता. विपत्तीमुळें निरु-पाय होऊन, साध्या दरोडेखोराची वृत्ति त्यास पतकरावी लागली होती. या धंद्यांत तो पकडला जाऊन, पुण्यास हत्तीच्या पायीं दिला गेला. हें खरें आहे कीं, त्याणें देहांतशिक्षेचाच गुन्हा केला होता; परंतु तो तुकोजी होळकराचा मुलगा. यःकश्चित् गुन्हेगाराप्रमाणें त्यासही देहांत दंड केला हा, त्याकाळीं मराठे लोक मोठा जुलूम समजले. यशवंतराव हमेश ह्मणे कीं, पुंडावे व अन्याय यांमध्यें जें मी आयुष्य घालवितों त्याचें कारण, बाजीरावाचें हें कृत्य, व खंडेरावास बंदी प्राप्त झाली ही गोष्ट आहे. या तऱ्हेच्या आयुष्यमार्गांत त्याणें आतां इतकें क्रमण केलें होतें कीं, लोकांनीं त्यास क्षमा करावी, अथवा लोकांस त्याणें क्षमा करावी हा प्रकारच राहिला नव्हता. खेरीज लुटारू लोकांचे थवे त्याजपाशीं जमले होते त्यांच्या योगानें, मागून करीत आल्या प्रमाणेंच पुढेंही करणें त्यास भाग आलें. जसा बाहेरून बाजीरावाच्या ठिकाणीं

शत्रूकडून युद्धास आरंभ झाला. त्यांणीं प्रथमतः त्याच्या स्वारांची एक टोळी मागें हटविली. हा पिछेहट पाहतांच यशवंतराव घोड्यावर स्वार झाला, व आपल्या लोकांपैकीं कांहीं लोकांस ह्मणाला कीं, ज्या कोणाचा आज मरून जावें अथवा फत्ते करावी असा इरादा नसेल त्याणें, आपला बचाव करावा; व बायकापोरांत निघून जावें. मजविषयीं ह्मणाल तर, आजच्या प्रसंगांतून वांचण्याचा माझा हेतु नाहीं. जर आजची लढायी न जिंकिली तर, पळून जाण्यास स्थळ कोठें आहे? हा कृतनिश्चय त्याणें जसा प्रगट केला तसें, त्या प्रकटीकरणाची आपल्या कृत्यांनीं बाजू राखिली. त्याचें कवाइत शिकलेलें पायदळ, एका इंग्रज कामदाराच्या हाताखालीं[१] लढत होतें, तिकडे जाण्याची त्याणें त्वरा केली. जातांना, मागें पाय काढलेले स्वार त्यास भेटले, त्यांची निर्भर्त्सना करून, व आपला मासला दाखवून, त्याणें त्यांस पुनः होशावर आणिलें. मग त्यांस बसलेली दचक नाहींशी झाली; व लढाई फत्ते होऊन, केलेल्या प्रयत्नाचें यशवंतरावास बक्षीस प्राप्त झालें. प्रतिपक्षाकडील बरेच लोक मारिले गेले, व जखमी झाले. आणि त्यांचा तळ लुटला गेला. पुणेंही तत्काल लुटलें जावयाचें,

---

आपली भक्ति आहे, असें यशवंतराव दाखवी त्याच प्रमाणें, इंग्रज सरकारांनीं मित्रभावानें मध्यस्थी करावी अशाविषयींही इच्छा दाखवी; परंतु कागदपत्रांच्या दस्ताऐवजावरून असें सिद्ध होतें कीं, आरंभापासून इंग्रजसरकारच्या राज्यरीतीशीं तो वैर बाळगी; कारण तो जाणत असे कीं, ज्या लुटालुटींच्या पुंडाव्यांवर आपण व आपले अनुयायी अवलंबून आहों, त्या लुटालुटी बंद करण्याकडे त्यांच्या राज्यरीतीचा कल आहे.

१. याचें नांव क्यापूटनहार्डिंग. हा तरुण, व शूर, व हिय्या करून संकटें शोधणारा पुरुष थोड्या काळापासून यशवंतरावाच्या नोकरींत राहिला होता. लढाईंत तो पडला, व त्याच्या मरणानें यशवंतरावास फार दुःख झालें.

परंतु यशवंतरावानें तें शहर खुद्द आपल्या कारितां ठेविलें ह्मणून, वांचलें. अमीरखानाचे पठाण, प्रसंगाच्या आरंभीं, सर्वांच्या अगोदर पळूं लागले होते, ते आतां लुटालूट करण्यास सर्वांच्या पुढें झाले. ते शहराच्या ऐन तोंडाशीं पोंचून लुटालूट व कत्तल करावयास लागले. ह्मणून इतक्यांत यशवंतरावानें लागलीच आपल्या कांहीं तोफा त्यांजवर सुरू करण्यास हुकूम दिला. अशा निष्ठुर आज्ञेखेरीज पठाणानीं दुसरी आज्ञा मानलीच नसती. हा हुकूम देखील ते पूर्णपणें ऐकत नाहींत असें पाहून, व शहराच्या रक्षणास जे पाहारे लाविले होते त्यांतून, जबरदस्तीनें आंत जाण्यास त्यांपैकीं कित्येक प्रयत्न करीत आहेत असें पाहून, यशवंतराव जखमेनें घायाळ झाला असतांही, भरधांव घोडा सोडून तेथें आला; व त्याणें आपल्या भाल्यानें दोघां तिघांस खालीं पाडिलें. उज्जनीस जसें जातखत मोठें शौर्य त्याणें दाखविलें, तसेंच याप्रसंगींही दाखविलें. त्याच्या सारखी अमीरखान याणें प्रसिध्धी मिळविली नाहीं. लढाई संपल्या नंतर आपल्या जखमा यशवंतराव बांधीत असतां, अमीरखान त्याजवळ आला; व आजच्या प्रसंगाचा चांगला परिणाम झाला ह्मणून स्तुतिवाद करूं लागला. तेव्हां यशवंतराव हंसून ह्मणाला कीं, भाई तुह्मीं तर मोठ्या नशीबानें वांचलां. अमीरखानानें गंभीरपणानें उत्तर केलें कीं, आपण खरेंच ह्मणतां; कारण कीं, ही पहा तोफेच्या गोळ्यानें माझ्या घोड्याची कलगी उडून गेली आहे. कुचोद्य यशवंतरावानें उत्तर केलें कीं, तुह्मीं तर बाबा मोठे दैवशाली आहां ! व मोठ्यानें हंसून, कलगी तुटल्याचें अमीरखानानें सांगितलेलें कारण आपल्यास खोटें वाटलें असें दाखवून, तो आणखी ह्मणाला कीं, तुटलेली कलगी घोड्याच्या दोहों कानांमध्यें असतां, गोळ्याच्या योगानें घोड्याच्या कानांस इजा झाली नाहीं, हें मोठें आश्चर्य आहे. हें चमत्कारिक संभाषण ज्या गृहस्थानें मला सांगितलें तो ह्मणाला कीं, चातुर्याच्या या दांडग्या परंतु तिखट बोलानें, पठाणांचा सरदार अमीरखान लाजला व चिरडीस गेला.

या समयापूर्वी, अमृतरावाबरोबर फिसादीचें बोलणें यशवंतरावानें लाविलें होतें. मग लढाई जिंकिल्यानंतर, अमृतराव येऊन मिळे तोंपर्यंत पंधरा दिवस, तो पुण्यास राहिला. अमृतरावाच्या येण्यानें, आपल्या देशबांधवांचीं मनें न दुखवितां, आपल्या अधिकारास बळकटी आणण्याचे प्रयत्न पुढें वाढविण्यास त्यास सोय सांपडली. अमृतरावानें जरी आपणास पेशवा असी खिताब घेतली नाहीं तरी, राजधानींतून बाजीराव पळून गेला यामुळें, वस्तुतः त्याणें अधिकार सोडिला असें कारण लावून तो, कामकारभार पाहूं लागला. पुण्यास इंग्रजांचा वकील माजी सर ब्यारिक्लोस होता, त्यास तो मोठ्या इज्जतीनें वागवूं लागला, व आपल्या नव्या अधिकाराच्या ठिकाणीं त्याणें सख्यबुद्धि ठेवावी ह्मणून, अमृतरावानें हरप्रयत्न योजिले. परंतु तसें घडणें अशक्य आहे असें पाहून, मुंबईस जाण्याकरितां मोठी कांकूं करून सर ब्यारिक्लोसास परवाने दिले.

दोन महिनेपर्यंत, पुण्याच्या वस्तीवर जुलूमजबरी फारसी झाली नाहीं. या काळांत वसूलवसुलातही अशा तऱ्हेनें केली गेली कीं, त्यापासून लोकांस फारसें भय वाटलें नाहीं; परंतु इंग्रज सरकारानें आतां युद्धाची तयारी मांडिली यामुळें, अमृतरावास प्रतिकूळ असा बाणीचा प्रसंग लौकरच ओढवला. आजन्मपर्यंत, पुण्यास आपण पेशवा व्हावें असा अमृतरावास लोभ होता. तो सिद्धीस जाईल अशा उमेदीनें, यशवंतरावाच्या सल्लामसलतींत तो सामील झाला होता. परंतु बाजीरावानें पळून जाऊन, इंग्रज सरकाराशीं तह ठरविल्यामुळें, या आशेची निराशा झाली; व आपला पाठबळी जो यशवंतराव त्याशीं, कबूल केलेलीं बोलणीं पारपाडण्याचें सामर्थ्य, अमृतरावास राहिलें नाहीं. यशवंतरावानें तर लष्कराची प्रस्तुत विपत्ति दूर करण्यासाठीं, मोठी रकम त्याजजवळ मागितली. पुणें शहर लुटल्याखेरीज, ही रकम उभी राहण्यास सोय नव्हती ह्मणून, हें अपहाराचें कृत्य करण्याचा त्या दोघांनीं निश्चय केला. मग घर बरेंचसें दिसलें पुरें; ह्मणजे ते आंत

शिरत, व त्यावर पाहरा ठेवीत. अमुक गृहस्थ मालदार आहे अशी एखाद्या राहिवाशाची कीर्ति असली पुरे; ह्मणजे त्यास पकडीत, व मागीतलेलें द्रव्य देईपर्यंत त्यास यातना देत. लोकांनीं पळून न जावें ह्मणून, चहूंदिशांनीं स्वार उभे केले होते. या प्रसंगीं यशवंतरावास खूप लूट मिळाली. मग आपल्या लष्कराचा तुंबलेला पगार वांटून, यशवंतराव पुष्कळ रकम बरोबर घेऊन, मध्यहिंदुस्थानाकडे परतला.

या संधीस इंग्रज सरकाराशीं लढण्याकरितां, दौलतराव शिंदा व रघूजी भोंसला एकत्र होऊन तयारी करीत होते. पुण्यास वरलिहिलेलीं वर्तमानें होत असतां, या तयारीसाठीं दौलतराव बऱ्हाणपुरास छावणी करून राहिला होता. या एकत्र झालेल्या सरदारांस, यशवंतरावाची आपल्यास मदत मिळावी हें, फार महत्वाचें आहे असें दिसलें. ह्मणून, त्यांणीं त्याशीं तह करून, व होळकरांचा पूर्वी जितका मुलूक होता तितका सारा परत देऊन, व खंडेराव आणि यशवंतरावाची मुलगी भिमाबाई यांस कैदेंतून मुक्त करून, त्यांणीं त्याजपासून साह्याचें वचन घेतलें.[1]

दौलतराव शिंद्यानें यशवंतरावाचा पुतण्या व मुलगी जेव्हां त्याजकडे पाठविलीं तेव्हां, तो महेश्वरीं होता. त्यांजबरोबर त्यांणें असेंही सांगून पाठविलें कीं, इंग्रजांशीं लढाई तावडतोब उभी राहणार आहे; याकरितां, तुह्मीं आपल्या लष्कराचा कांहीं भाग दक्षिणेंत पाठवाल अशी, आह्मीं उमेद बाळगून आहों. यशवंतरावानें प्रथम तर हें ह्मणणें मान्य करण्याचा इरादा केला; व अमीरखानाचा सारा रिसाला, नर्मदेस पूर आला होता तरी, नदी उतरून पलीकडे पाठविला. (त्यावेळीं ऐन पावसाळा होता) परंतु अमीरखान व यशवंतराव, एका होडींत बसून सर्वांमागून नदी उतरत असतां, त्यांजमध्यें कांहीं संभाषण झालें. संभाषण काय झालें

---

१. दौलतराव शिंद्याच्या ज्या कामदारांनीं सरजाअंजणगांवचा तह केला, त्यांणीं असें उघड कबूल केलें कीं, इंजग्र सरकाराविरुद्ध आपणास सामील होण्याविषयीं, दौलतरावानें व रघोजीनें यशवंतरावाचें वचन घेतलें होतें.

हें पुढें कोणासही उमगलें नाहीं. इतकें खरें कीं, यानंतर यशवंतरावाचे पूर्वीचे बेत एकंदर बदलले. दुसऱ्याच दिवशीं, पठाणांचें लष्कर पुनः नर्मदा उतरून आलीकडे येऊं लागलें. आपल्या अशा वर्तनाचीं कारणें दाखविण्याभावीं, यशवंतरावानें दौलतराव शिंद्यास एक लांबलचक पत्र लिहिलें, असें ह्मणतात. लष्कराचा पगार देण्याकरितां पैशाची तूट आहे असें, पत्रांत त्याणें लिहिलें; व आपल्या कडून अशी शिफारस केली कीं, तुह्मी पायदळ, तोफखाना, बाजारबुणगा, व घरचीं माणसें-काणसें जीं असतील तीं, माळव्यांत रवाना करावीं; व इंग्रजांशीं लुटालूट करून युद्ध करावें. आपण राजे आहों या नात्यानें लढाल, ह्मणजे कवायत शिकलेलें लष्कर घेऊन लढाल तर, तुह्मीं पराजय पावाल. मराठ्यांप्रमाणें लढाल तर, विजयी व्हाल[१]. ज्याच्या पहिल्या कृत्यांतच फिसाद दिसून आला, व ज्याणें शिंदेशाईंतील लष्करें, उत्तर हिंदुस्थानांत व दक्षिणेंत कामीं लागलीं आहेत असें पाहून, मध्यहिंदुस्थानांतील रक्षणाखेरीज असलेले शिंद्यांचे प्रांत लुटून फस्त केले, त्याच्या सांगण्यावर दौलतराव फारसें लक्ष पुरविता, ही कल्पना नको. इकडे अमीरखान पूर्वेकडील अष्टें, सुजालपूर आणि उमटवाडा हे परगणे लुटूं लागला होता. पावसाळा इंदुरीं घालवून, यशवंतराव भानपुऱ्याकडे गेला. तेथें चंमलनदीच्या किनाऱ्यावर कांहीं दिवस राहून, तो जयपूरच्या सरहद्दीकडे गेला. ज्या ज्या परगण्यांतून त्याचीं लष्करें जात, ते ते परगणे तो मागेंपुढें न पाहतां लुटी. यानंतर लवकरच, शिंद्यानें इंग्रजांशीं तह केला. परंतु त्यांशीं लढतानां त्याची फार हानि झाली होती, व झालेल्या तहांत कांहीं वादाचीं स्थळें उभीं राहिलीं, यामुळें संतापून त्याणें पुनः यशवंतरावाशीं सलूकीचें बोलणें लाविलें. या बोलण्यांत अंबाजी इंगळा मध्यस्थ होता. त्याजकरवीं दौलतरावानें यशवंतरा-

---

१. होळकरांचे सर्व कागद नाहींसे झाले आहेत त्यावेळीं होणाऱ्या गोष्टींची यथार्थ बातमी लागेल अशा अधिकारावर जे लोक होते, त्यांतून कित्येकांच्या सांगण्यावरून ही गोष्ट मी लिहिली आहे.

थास सांगून पाठविलें कीं, रघूजी भोसल्यानें मजशीं फिसाद केला; खुद्द माझ्या कारभारी लोकांनीं मला फसविलें; लष्करांनीं मला सोडिलें; अशा प्रसंगांत तुमच्या सामर्थ्याखेरीज व धैर्याखेरीज, मराठ्यांची बाजू राहण्याची उमेद बाळगण्यास जागा नाहीं. यशवंतरावानें उत्तर केलें कीं, इंग्रजांविरुद्ध लढण्याचा जो प्रकार तुह्मी काढला होता, त्याचा परिणाम कसा होईल हें मी पूर्वींच जाणून होतों. मी सांगितलेली मसलत त्यावेळेस तुह्मी तुच्छ मानिली तथापि, लष्कर बाहेर पाठवितां यावें या करितां तुह्मी पुरेसा पैसा पाठऊन द्याल तर, अझूनही इंग्रजांविरुद्ध पुनः एकदां प्रयत्न करण्यास मी तयार आहे. शिंद्यानें आबाजी करवीं उत्तर केलें किं तूर्त देण्यास आह्माजवळ पैसा नाहीं; परंतु आमच्या मुख्यमुख्य शहरांपासून पैसा वसूल करण्यास आह्मी तुह्मास परवानगी देतों. ही परवानगी यशवंतरावानें आनंदानें घेतली. नंतर त्याणें एकीकडे, भेलसा व बुंदेलखंडाचे भाग यांतून आपल्या गरजा पुरवाव्या, अशी अमीर खानास ताकीद देऊन, आपण दुसरी कडे, मंदोसरास चालता झाला. हें शहर एका प्रांताची राजधानी होतें इतकेंच नाहीं; तर गुजराथ, राजपुताना, माळवा, व उत्तर हिंदुस्थान याया मुलकीच्या व्यापारांची मध्य वर्ती जवर पेठ होती. जरी मंदोसर उज्जनीहून लहान होतें, तरी कमी संपन्न नव्हतें. या पूर्वीं, होळकरांनीं या शहरापासून निरनिराळ्या तीन वेळा पैसा उकळिला होता. परंतु त्यां पासून झालेलें नुकसान सरकारानें, वसूलाची तगाई वगैरे देऊन कांहीं अंशीं भरून दिल्हें होतें या मुळें शहराची नासाडी झाली नव्हती. प्रस्तुत यशवंतरावाचा आलेला धाडा, वर सांगितल्या प्रसंगांपेक्षां विशेष नाशकारक होता. वस्तींतील लोकांनीं पळून न जावें ह्मणून, शहरापासून साहा कोसांच्या अंतरावर असतां त्याणें, तीन लाख रुपये खंड घेऊन परत जाण्याचें कबुल केलें होतें. हा खंड तादृश हलकाच होता असें ह्मटलें पाहिजे. परंतु दुसरे दिवशीं जेव्हां सर्व शहर वेढलें गेलें, व त्याच्या

तट बंदीवर दोनशें तोफा येऊन पडल्या तेव्हां त्याणें, चकार शब्द न बोलतां शहर हवळा करावें, नाहीं तर तावडतोब हल्ला सुरू होत आहे त्याचे परिणाम भोगावे, ह्मणून तेथील कामदारास सांगून पाठविलें. युद्धास उभें राहणें व्यर्थ होतें; तेव्हां तेथील कामगारानें शहर हवाला करावयाचें कबूल केलें. नंतर शहराची एकंदर संपत्ति लुटली गेली. प्रत्येक मोहल्यांत कामगार लोक नेमून, त्यांच्या हाताखालीं कारकून सवार व कामाठी लोक दिल्हे होते. जेथें जेथें सौख्याची अथवा संपत्तीची थोडी बहूत निशाणी दिसली, तेथें तेथें जमीनी खणून द्रव्य लपविलें आहे कीं काय, याचा शोध झाला. फक्त शहरांतील पुर्वींच्या मुख्य कामदाराचें घर मात्र शोधिलें नाहीं. स्त्रियांच्या आंगावरील वस्त्रें व दागीनें यां खेरीज, सांपडेल तें बुछाडावें असा हुकूम दिल्हा होता. ज्या किती येक शिंद्याच्या कामगारांनीं द्रव्य पुरून ठेविलें आहे असा वाहिम आला, त्यांस कबूल होई तों पर्यंत, यातना दिल्या. परंतु या खेरीज दुष्टपणाचीं अद्वातद्वा कृत्यें यशवंतरावाच्या लश्करानें येथें केलीं नाहींत. या कायदेशीर पणामुळेंच, हातीं धरलेलें कार्य विशेष पुर्त्ततेने झालें; व लोकांचा तोटाही विशेष झाला. मागें पुढें न पाहतां अव्यवस्थित लुट होती तर, इतका तोटा झाला नसता. या प्रसंगीं सरकारी, व लोकांची घराऊ, एकंदर जी लूट सांपडली त्याची किंमत, कमी आकारणी केली तरी, एक कोट रुपयांवर होते. इतकें तर खचित आहे कीं, नगदी द्रव्य, दागदागीनें, सामान सुमान, व धान्य पान्य वगैरेच्या रूपानेंच, यशवंतरावास साठ लाख रुपये किमतीची संपत्ति प्राप्त झाली. या द्रव्यानें त्याणें लश्कराचा तुंबलेला पगार वाटला. या लश्करास आतां इंग्रज सरकाराशीं लढण्यास जावयाचें होतें.

या पुर्वीं कांहीं वेळ यशवंतराव आणि लार्डलेक यांत, तहाचें बोलणें सुरू होतें. परंतु एकीकडे यशवंतरावानें जरी दोस्तीचें बोलणे लाविलें होतें तरी, त्याणें जी मागणी केली तिच्या स्वभावावरून, कपट

दिसून आलें. उत्तर हिंदुस्थानांतील कित्येक राज्यांस त्याणें लिहिलेलीं, पत्रें धरलीं गेलीं, त्यांवरूनही त्याचा, इंग्रज सरकाराशीं शत्रुभाव उघड झाला. यथार्थ व्यवस्थे संबंधीं हरएक बोलण्यास तो ना देई, यावरून ही तो शत्रुभाव बाळगितो असें ह्मणण्यास पुष्टिकरण झालें. इतक्यांत, त्याजकडून इंग्रज सरकारचे तीन कामदार मारले गेले[१]. या पासून तर उद्भवणाऱ्या लढाईचें स्वरूप जाहीरच झालें. जनरल वेलेस्ली दक्षिणेत सैन्याधीश होता; त्यासही यशवंतरावानें अशा गर्विष्टपणानें व उध्धटपणानें पत्र लिहिलें होतें कीं, तें लढाईचीच जाहिरात आहे असें ह्मटल्या खेरीज निर्वाह नव्हतो[२]. तथापि, कंपनीच्या राज्यांत सर्वत्र शांतताराही अशा तऱ्हेनें यशवंतरावानें वागावें या करितां, हरएक उमेद नाहींशीं होई पर्यंत, अखेर उपाय गवरनर जनरलानें योजिला नाहीं.

यशवंतराव होळकर, व इंग्रज सरकार यांमध्यें जें युद्ध झालें, त्याचें इत्थंभूत वर्णन करणें हा, या इतिहासाचा विषय नाहीं. युद्धाच्या आरंभी च टोंकरामपुऱ्याचा परगणा व किल्ला, यशवंतरावानें गमाविला. परंतु पुढें कर्नल मॉनसन, आपल्या हाताखालील लहानसें लष्कर अविचारानें माळव्यांत घेऊन गेला तेव्हां, जरी प्रथमतः त्यास विजय प्राप्त झाला तरी, यशवंतरावानें आपलें सर्व सैन्य त्याजवर आाणिलें. कर्नल

१. या कामगारांची नांवें. टाड, रायन आणि विकर्स. हे उदेपुर पासून सात कोसांवर, नाहार मुलगा, (वाघाची टेंकडी) येथें सन १८०४ च्या मे महिन्यांत मारले गेले. मारण्याचें कारण असें लाविलें कीं, ते इंग्रजाच्या मुख्य सेनापतीशीं पत्रव्यवहार ठेवीत.

२. हें पत्र सन १८०४ च्या फेब्रुआरी महिन्यांत लिहिलें गेलें. यांत यशवंतराव ह्मणतो कीं शेंकडो कोस जमीन मी चालून जाईन. तुला (लार्ड लेकास) श्वास घेण्यास फुरसत सांपडणार नाहीं. एक सारखें रण माजवून लाखो मनुष्यांचा नाश होईल, आणि समुद्राच्या लाटां सारखें माझें सैन्य, सर्व गारत करील.

मॉनसन हुकूम पाठविण्यास फार दूर राहिला यामुळें, त्यास मागें हटावें लागलें. या नाशकारक पीछे हाटामुळें, यशवंतरावास मोठें लष्कर घेऊन विजयीं पुरुषासारखें, उत्तर हिंदुस्थानांत जावयास सांपडलें. व त्याच्या अनुयायी लोकांस, या गोष्टीपासून, पुढें ही विजयच होईल असें स्फुरण आलें. परंतु लवकरच, ध्यानांत राखण्याजोगे एकामागे एक यशवंतरावाचे पराजय होऊन, या स्फुरणाचा लय झाला. मे महिन्यांत त्याणें एक लहानसा हल्ला केला, त्यांत तो फसला; फरक्काबाद येथें त्याच्या लश्करांची पुरी दाणादाण झाली; व डीगच्या किल्यावर त्याच्या पायदळाचा पराजय, व तोफांचा नाश झाला. यानंतर, भरतपुरच्या किल्ल्यावर हल्ला करितांना, इंग्रज सरकारचा वळकट पराजय होऊन अत्यंत नाश झाला. तरी उत्तर हिंदुस्थनांत शिरल्या दिवसापासून सांत माहिन्यांच्या आंत, होळकरास परत येणें भाग झालें तें झालेंच. परत येतांना त्याचें लष्कर, पराजित झालेलें, व तोफागेलेलें, व वहुत करून लढाईचें सर्व सामान सुमान नाहींसे झालेलें, असें होतें.

त्याच्या लष्कराविषयीं, सर्वांत विशेष भरोसा ठेविण्या जोगी जी बातमी लागली, तिजवरून असें दिसून आलें कीं, उत्तर हिंदुस्थानांत शिरतांना, त्याच्या एकंदर फौजेची संख्या ९२००० होती. या पैकीं रिसाला ६६००० तोफखाना ७००० व पायदळ १९००० होतें. शिवाय १९० तोफा होत्या. जेव्हां यशवंतराव उत्तर हिंदुस्थानांतून परतला तेव्हां, त्याच्या रिसाल्याची संख्या कमी होऊन ३५००० वर आली; व पायदळाची व तोफ खान्याची संख्या ७००० वर आली. व त्याजवळ तोफा ३५ राहिल्या. मनुष्यांचें नुकसान होण्यास, मुख्यत्वें करून, लोकांनीं नोकरी सोडिली हें कारण झालें. यावेळीं नोकरी सोडणाऱ्यांच्या संख्येंत, अत्यंत पुरातन व अत्यंत कामीं येणारे कांहीं कामदारही होते[1]. या सुमारास दौलतराव शिंदा, सरज्याराव घाटग्याच्या पुनः बसांत

---

१. याप्रसंगीं भवानीशंकरानें यशवंतरावास सोडिलें. हा अत्यंत पुरातन माणूस होता, व याणें अत्यंत एकनिष्ठपणानें चाकरी केली हो-

आल्यामुळें, इंग्रज सरकाराचें त्याशीं युद्ध होईल असा घोंटाळ्याचा प्रसंग येऊन ठेपला होता. परंतु यशवंतरावाच्या युद्धापासून आपण कशा संकटांत येऊन पडत आहों हें, दौलतरावानें लवकरच पुरें ओळखिलें. आणि ह्मणून, इंग्रज सरकाराशीं केलेल्या तहाप्रमाणें आपण चाललों नाहीं याचें कारण जो अधम सरज्याराव घाटगा त्यास, दरबारांतून घालवून देण्याचें, व यशवंतराव होळकराचा पक्ष सोडून देण्याचें, त्याणें त्या सरकाराशीं कबूल केलें. शिंद्याच्या लष्कराची व होळकरांच्या लष्कराची फूट होण्यापूर्वीं, आंबाजी इंगळ्या या नांवाच्या सरदारास लुटून टाकण्याविषयीं, यशवंतरावानें दौलतरावाचे कान फुंकिले. फार दिवसांपासून शिंद्याच्या उत्तम प्रांतांची वहिवाट इंगळ्याकडे असे. लोकांवर अन्याय व जुलूम करून त्याणें संपत्ति संपादिली होती; आतां लोकांनीं त्यावर अन्याय व जुलूम केल्यानें, ती संपत्ति त्यास सोडून देणें भाग आलें.[१] आतां आपल्या कमी झालेल्या सैन्यासह यशवंतराव, पावसाळा संपे तोंपर्यंत, मेवाडांत राहिला. नंतर पुनः उत्तरहिंदुस्थानांत शिरून, झपाट्याचे

वी. त्याणें यशवंतरावास सोडिलेंयाचें सर्व एकच कारण सांगतात. हरनाथदादा या नांवाच्या एका हलकट माणसावर, यशवंतरावाची फार भक्ति होती. त्या हरनाथदादाचें व भवानीशंकराचें इतकें वैर जडलें कीं, त्यापासून आपलें आयुष्य व अब्रू दोन्हीही नाहीशीं होतील अशी, भवानीशंकरास धास्ती बसली. यशवंतरावाचें सैन्य हरनाथदादास जुमानीत नसे, व भवानीशंकरास मानीत असे, यामुळें हरएक प्रसंगीं लोकांत, दोघांच्या स्वभावाची व चालचलणुकीची चर्चा चाले. यामुळें हरनाथदादानें, भवानीशंकराचा नाश करण्यास, कित्येक प्रयत्न केले. भवानीशंकर पुढें मजकडे आला त्यावेळीं, त्याचें व माझें जें भाषण झालें त्यावरून, असें ह्मणण्यास कारण आहे कीं, त्याणें यशवंतरावास सोडिलें या गोष्टीचें जें कारण लोक सांगतात तें यथार्थ आहे.

१. अंबाजीपासून शिंद्यास ५६ लाख रुपया प्राप्त झाला. त्यापैकीं निम्मे हिस्सा यशवंतरावास मिळाला.

मुकाम करीत पंजाबाकडे चालला. त्याच्या पाठीस इंग्रज सरकारचें सैन्य लागलें. पंजाबांत इंग्रजाशीं त्यास तह करणें भाग आलें. चंबलनदीच्या उत्तरेकडील मुलूक व हक्क खेरीज करून, बाकी जितका मुलूक अहिल्याबाईच्या वेळेस होळकरांच्या ताब्यांत होता, तितका परत दिला असतां तृप्त राहाण्याचें, या तहाच्या कलमबंदींत यशवंतरावानें कबूल केलें; आणि मराठ्यांचें पूर्वीचें वैभव, जिकडेतिकडे लुटारू स्वाऱ्या करून परत आणूं, अशी जी कांहीं काळापासून त्याणें उनाड उमेद धरिली होती ती, आतां सोडून दिली. ही जी शेवटीं त्याणें पंजाबांत स्वारी केली, त्यांत काय हांशील पाहिलें हें समजणें कठीण आहे. हा प्रश्न त्याच्या कित्येक कामदारांस विचारिला असतां, त्यांणीं उत्तर केलें कीं, रणजितसिंग आपली कुमक करील अशी त्यास उमेद होती; व अशीही उमेद होती कीं, जर यश प्राप्त झालेंच तर, दौलतराव शिंदाही आपल्या स्वदेशीयांचा पुनः पक्ष स्वीकारील. परंतु पंजाबांत जाण्याचें वास्तविक कारण असें दिसतें कीं, दक्षिणेंतील व मध्यहिंदुस्थानांतील त्याचा मुलूक आतां इंग्रजांनी व्यापिला होता, व तो त्याच्या कबजांतून गेला होता; तेव्हां लुटालूट केल्याशिवाय फौजा राखण्यास दुसरें साधनच नव्हतें. मग अर्थातच, ज्या देशीं त्यांचा निर्वाह होईल असें वाटलें, त्या देशीं त्यांस त्याणें नेलें. असाही पुष्कळ संभव होतो कीं, या गोष्टीस शिंद्यानें फूस दिली असावी. यशवंतराव व त्याचें बेकाबू लष्कर दूरदेशीं गेल्यानें, शिंद्याचा प्रकृत लाभ होता.

पंजाबांतून परत येतांना यशवंतराव, जयपूरप्रांतांत एक महिनाभर, तळ देऊन राहिला. त्याच्या लष्करानें या प्रांतांतील शेतें उजाड पाडिलीं, व त्याणें खुद्द तेथील राजास व कारभाऱ्यांस दहशत बसवून, त्यांजवळून १८ लाख रुपये उकाळिले. या समयीं या राजानें, इंग्रज सरकाराची मैत्री व आश्रय गमाविला होता. (या गोष्टीचीं कारणें येथें देण्याची जरूर नाहीं.) जयपुराहून यशवंतराव मारवाडांत गेला. तेथें आपल्या उत्पन्नाच्या मानानें लष्कर कमती करून, व जें ठेविलें त्यास

तावेदारी व कवायत शिकवून, तो लष्कराची वळकट सुधारणा करूं लागला. आजपर्यंत ज्या अस्ताव्यस्त स्वारांच्या टोळ्या त्याणें बाळगिल्या होत्या त्यांस, "आपआपल्या घरीं जा अथवा दुसऱ्या कोणाची नोकरी पहा; कारण कीं, मला इंग्रजांशीं लढण्याचें सामर्थ्य राहिलें नाहीं, व तुमच्या पोटास देण्याची ऐपतही राहिली नाहीं"; असें सांगून, त्याणें रजा दिली.

अजमीरच्या प्रांतीं असतां, जोतपूरचा राजा मानसिंग त्यास येऊन भेटला. ज्यावेळीं यशवंतराव पंजाबाकडे निघाला होता त्यावेळीं, त्याच्या घरचीं माणसें मानसिंगानें आपल्या जवळ टेविलीं होतीं; तीं त्याणें आतां परत आणून हवालीं केलीं. प्रस्तूत उदेपूरच्या अत्यंत सुंदर व कुलीन राजकन्येच्या पाणिग्रहणाकरितां, जयपूरच्या राजामध्यें व मानसिंगामध्यें वैर उभें राहिलें होतें. या झगड्यांत आपल्यास कुमक करावी ह्मणून, मानसिंगानें यशवंतरावाची विनवणी केली; परंतु कुमक करूं नये ह्मणून, जयपूरच्या राजानें त्याजकडे अठरा लाख रुपये पाठविले. दिलेलें वचन तुह्मीं भंगिलें, व मी दाखविलेली मैत्री तोडिली, असा मानसिंगानें यशवंतरावास टपका दिला; परंतु पहिल्यापासून, प्रकृत गरजांकरितां हरएक नातें तोडून निगरगट झालेला जो यशवंतराव तो, मानसिंगाचा टपका काय मनावर आणितो! या वेळीं खुद्द त्याच्या लष्करांत वळकट बंड उपस्थित झालें होतें. मग केलेली कबुलायत पार न पाडण्यास हें कारण लावून, आपल्या जुन्या मित्रास त्याणें परत पाठविलें. इतकें मात्र वचन देऊन ठेविलें कीं, तुमच्या झगड्यांत मी दोघांपासूनही आलिप्त राहीन; व पुढें तुझ्या मदतीस अमीरखानास पाठवून देईन.

यशवंतरावाच्या लष्करांत मुख्यत्वें करून दक्षणी स्वारांनीं बंड माजविलें होतें. ज्या कोणास रजा देण्याविषयीं त्याणें मनांत आणिलें होतें, तेही त्यांत सामील झाले. त्यांचा पुंडावा मोडण्याकरितां, व मागील तुंबलेला पगार मिळेल असी खातरी करण्याकरितां, त्याणें आपला पुतण्या जो खंडेराव त्यास वळी दिलें. तथापि पैसा देण्याची टाळाटाळ व आजउद्यां

यशवंतराव करितो, हेंपाहून संतापून, लष्करानें असा वेत केला कीं, खंडेरावाच्या नांवानें अधिकार तर चाललाच आहे; तेव्हां त्यास आतां खरोखर अधिकारी कांनकरावें ? होळकरांचा दिवाण गणपतराव, " खंडेरावावरोवर आहे ही संधिही चांगली जाणून, लष्करानें त्याचा झेंडा उभारिला; व जिकडेतिकडे जाहीर केलें कीं, होळकरांच्या गादीचा औरस वारीस खंडेराव आहे. व त्याचे मात्र आपण नोकर आहों. यशवंतराव औरस नाहीं तेव्हां, तो केवळ गादीचा अपहारकर्ता होय. याप्रसंगीं, गणपतराव स्वेच्छेनें लष्कराच्या हातीं बाहुलें झाला; परंतु खंडेरावाचें वय जरी दहा वर्षांचें होतें तरी, वयाहून विशेष बुद्धि व धमक दाखवून, त्यानें सर्व लोकांस सांगितलें कीं, तुमचा तुंवलेला पगार तुह्मांस मिळेल, आणि नंतर तुह्मीं माझा त्याग करून नाश कराल; कारण तुंवलेला पगार मिळावा इतकाच तुमचा हेतु आहे. या लेंकरानें जें होईल ह्मणून ह्मटलें तें, भविष्यवादाप्रमाणें घडून आलें. जयपुराहून आणिलेला सर्व पैसा यशवंतरावानें वंडवाल्यांस वांटला; व पगार मिळाल्यानंतर ते लोक, आपआपल्या घरीं जावयास निघाले; दुसऱ्याच आठवड्यांत खंडेरावास एकाएकीं मृत्यु आला, असा सर्व लष्करांत पुकारा झाला. यशवंतरावानें त्यास विषप्रयोग केला, यांत कांहीं संशय नाहीं. हें कृत्य त्यानें, आपला गुरु जो चिमणाभाऊ त्याच्या सल्ल्यानें केलें असें ह्मणतात; हा पुरुष दुष्ट व वदफैली होता. यशवंतरावाचीं कित्येक अत्यंत वाईट कृत्यें, चिमणाभाऊनें सांगितलेलें ऐकिल्यापासून झालीं असें ह्मणतात. वंडवाल्यांच्या वर्तनापासून बसलेली धास्ती, खंडेरावाची आहुति दिल्यानेंसुद्धां, यशवंतरावाच्या मनांतून गेली नाहीं. काशीराव जोंपर्यंत जिवंत राहील तोंपर्यंत, आपणास भीति आहेच आहे असें त्यानें आतां मनांत

१. गणपतरावास यशवंतरावानें धरून कैद केलें. परंतु तींतून सुटून, तो प्रथमतः जयपुराकडे पळाला; आणि तेथून काशीस गेला. होळकरांच्या संस्थानाचें मुख्यप्रमाणें काम पहाणें यशवंतरावाचें सुटलें तोंपर्यंत, तो परत आला नाहीं.

आणिलें, व त्यासही मारण्याचा निश्चय केला. हें दुसरें पापकर्महि चिमणाभाऊनेंच करावयास सांगितलें ह्मणून ह्मणतात. निदान तें करण्यांत निःसंशय त्यानें मदत दिली.[1]

---

१. नेमाडांत खरगोण महालाची वहिवाट चिमणाभाऊकडे होती. येथें काशीराव आणि त्याची बायको, त्याच्या देखरेखीखालीं असत. त्यास मारावेंच असें त्याच्या मनांत नव्हतें ह्मणून ह्मणतात; परंतु बंगशखान पठाणाच्या दादनखान नांवाच्या हाताखालील कांहीं लोकांनीं, काशीरावास बंदींतून मोकळा करण्याचा प्रयत्न केल्यावरून, त्यास मारावें लागलें. दादनखानाच्या सांगितल्याप्रमाणें बंगशखानानें, या गोष्टीचें बारीक वृत्त लिहून दिलें आहे. त्याचा हेतु काशीरावास सोडविण्याचा होता; परंतु त्याच्या यत्नामुळेंच काशीरावास लवकर मरण आलें. बंगशखान लिहितो कीं, खरगोणापासून कांहीं अंतरावर, जंगलांत, काशीरावाचा खून झाला. चिमणाभाऊच्या, या प्रसंगांत दाखल असलेल्या, एका शिपायानें विशेष तपशिलाचें वृत्त सांगितलें. तो ह्मणाला कीं, काशीरावास व त्याच्या बायकोस, या पूर्वीं खरगोणाहून बिजागडास नेलें होतें. तेथें खालच्या किल्ल्यांत एका घरांत ते कैद असत. जेव्हां बंगशखानाच्या पठाणांनीं त्या घरास वेढा दिला तेव्हां, आंत त्यांचा शिरच्छेद करण्याकरितां तावडतोब चिमणाभाऊकडून हुकूम झाला. पाहाऱ्यावरील शिपायांत वृत्त सांगणाराही होता. सर्व शिपायांनीं हा हुकूम आह्मीं मानीत नाहीं ह्मणून सांगितलें. हा नकार ऐकून, कोणीएक चिमणाभाऊचा नातलग खोलींत आला; व त्याणें एकदम काशीरावाचें डोकें उडाविलें. नंतर लागलीच, त्याची बायको जी आनंदीबाई, तिचें उडाविलें. आनंदीबाई गरोदर होती. पुढें लोकांनीं अशी बातमी उठविली कीं, या समयास लेकरूं उपजलें व तें मागें राहिलें आहे. पुष्कळांनीं या बातमीवर भरोसा ठेविला. परंतु असें सिद्ध झालें आहे कीं, या गोष्टीस मुदलींच आधार नाहीं. हा प्रसंग झाल्यावर, चिमणाभाऊनें आपल्या धन्यास असें कळाविलें कीं, होळकरांच्या गादीविषयीं तुजशीं अथवा तुझ्या लेकरांशीं वाद सांगण्यास, कोणींही प्राणि उरला नाहीं.

हीं पापें ऐकून सर्वत्र लोकांचीं मनें विटलीं; व त्यांच्या अंगावर शहारे उभे राहिले. परंतु यशवंतरावाच्या धास्तीमुळें, कोणी तोंडांतून चकार शब्द काढिला नाहीं. या वेळीं यशवंतरावांचा जुलमीपणा विशेषच वाढून, त्यास वेड लागण्याचीं चिन्हें दिसून आलीं. परंतु प्रस्तुत हीं चिन्हें थोडक्यांत बंद पडलीं. खंडेरावाच्या खुनापासून या वेडास आरंभ झाला असें, त्याच्या कुळांतील माणसें, व होळकरांचे अनुयायी लोक ह्मणतात.

लष्करी लोकांनीं जेव्हां बंड उठाविलें तेव्हां, त्यांतील मुसलमान लोकांस शांत करण्यास यशवंतरावानें, अमीरखानास योजिलें. हे मुसलमान, बंडखोरांत साऱ्यांहून विशेष हकाटा करणारे, व पुंडावा माजविणारे होते. यशवंतराव व अमीरखान यांजमध्यें पूर्वींचा करार होता कीं, जें मिळेल तें सम हिश्शानें विभागून घेऊं. हा करार आतां पुरा करा असें ह्मणण्यास, अमीरखानानें ही संधि साधिली. तो करार पूर्णपणें पारपाडण्याची जरी यशवंतरावानें टाळाटाळ केली तरी, त्याणें अमीरखानास, पीडावा व टोंक[1] हे दोन परगणे दिले. आणखीही पुष्कळ जमीनी दिल्या. खेरीज कोट्याचा खंड वसूल करण्याचें त्याजकडेसच सोंपविलें. दाखविण्यांत बाहेर, याप्रसंगीं यशवंतराव व अमीरखान एकमेकांपासून फुटले; व अमीरखान, जयपूरचा राजा जगतसिंग याची कामगिरी बजाविण्यास निघून गेला. त्याच्या कुमकीनें, उदेपूरची राजकन्या प्राप्त होईल अशी उमेद धरून, जगतसिंगानें त्याच्या बरोबरीच्या सर्व लोकांचा चरितार्थ चालविण्याचें कबूल केलें. जगतसिंग व मानसिंग यांच्या युध्धास ही राजकन्या कारणीभूत झाली, हें वर सांगितलेंच आहे.

जयपूरच्या राजास यशवंतरावानें मदत देणें कबूल केलें होतें, ती मदत अशा तऱ्हेनें अमीरखानास पाठवून, दिली. जोतपूरच्या राजाशींही, अमीरखानास पाठवून देईन ह्मणून, कबुलायत केली होती. ती

---

१. हा परगणा आगर व कोटा यामध्यें आहे. याच्या वसुलाचा अजमास सालीना ५० हजार रुपये आहे.

पुरी पाडणें, असें ह्मणून टाळिलें कीं, अमीरखान आतां यापुढें माझा नोकर नाहीं. वास्तविक पाहातांही असें दिसून येतें कीं, याकाळापासून पुढें, तो पठाण सरदार स्वतंत्रतेनें वागूं लागला; व आपला व आपल्या लष्कराचा गुजारा राजपुतान्यांतील प्रांतांवर करूं लागला.

आतां होळकर भानपुऱ्याकडे रवाना झाला. तेथें गेल्यानंतर त्याणें, तोफा ढाळण्याची, व लष्करांत सुधारणा करण्याची आशा परम उत्साहानें व जालिमपणानें सुरुवात मांडिली कीं, त्यावरून त्याची बुद्धि वहकली असें दिसूं लागलें. असें करण्यानें तर, त्याचें वेड लौकरच वाणीवर आलें. आरंभीं आरंभीं, यशवंतरावास कशाचीहि आठवण राहीना; व तो प्रतिदिवशीं स्वभावानें अधिक उतावळा व शीघ्रकोपी होऊं लागला. फारादिवसांपासून त्यास मद्यप्राशनाची[1] अत्यंत सवय जडली होती. आतां तर तोफांच्या भट्ट्यांपाशीं, व धातु ओतण्याच्या कारखान्यांपाशीं सक्त मेहेनत पडूं लागल्यामुळें, या संवयीचे परिणाम विशेष अनुभवास येऊं लागले.[2] या भट्ट्यांजवळ व धातु ओतण्याच्या कारखान्यांजवळ, तो रात्रंदिवस उद्युक्त असे. वारंवार जातीनें त्यानें तोफांच्या सांच्यांत धातु ओतावी. अशा तऱ्हेच्या अत्यंत प्रयत्नानें, त्यानें तीन चार महिन्यांत, दोनशें अधिक पितळेच्या तोफा ढाळल्या.

---

१ यशवंतराव होळकर तारुण्यावस्थेपासूनच बदफैली होता. इसवी सन १८०१ या सालीं त्यानें जेव्हां पुणें घेतलें तेव्हां, हरएक व्यसनाची शिकस्त केली. त्याची भक्ति, चेरी व रासबेरी ब्रांडी या मद्यांवर असे. हीं व अशींच दुसरीं कडक मद्यें, त्यास पुरवितांनां, मुंबईचीं दुकानें रितीं पडत.

२ तोफा ढाळण्याच्या कामावर, सुभाराम नांवाचा एक हिंदु कारागीर, मुख्य व्यवस्था पहाणारा होता. उज्जनी येथील तोफांचा कारखाना, ज्या प्रसिद्ध मानसिंग चौधऱ्याकडे फार काळ होता त्या मानसिंगाचा, सुभाराम गुलाम व विद्यार्थी होय. सुभाराम मोठा शास्त्रज्ञ होता असें ह्मणतात. यशवंतरावाच्या नव्या तोफांसाठीं हरएक ठिकाणीं, लागेल ती किंमत देऊन धातु विकत घेतली गेली; कारण अंमळ उशीर झाला असतांही, यशवंतरावाच्या कोपाचा कहर होत असे.

त्यांतून पुष्कळ, ग्यालोपरस Gallopers सारख्या फडावर चढविल्या असत. उत्तरहिंदुस्थानांत तो स्वारीवर गेला होता तेव्हां, त्याच्या रिसाल्यावर शत्रूच्या तोफखान्यापैकीं ग्यालोपरस तोफा, कशा सुरू झाल्या याचा अनुभव त्यास आला होता; ह्मणून त्यांच्या विशेष गुणांचा त्याच्या मनावर बळकट ठसा उमटला होता. दोन हजार शिलेदारांखेरीज, बाकी सर्व रिसाल्याच्या माणसांस सरकारी घोडे असावे; व फक्त त्यांच्या पुरता दरमहा त्यांस देत जावा, असा यावेळीं यशवंतरावानें निश्चय केला. अशा तऱ्हेचे अजमासें दहा हजार स्वारांचे त्यानें रिसाले बांधिले, व या संख्येची दुप्पट करण्याकरितां, चहूंकडे घोडे विकत घेण्यासाठीं त्यानें हुकूम पाठविले. याचप्रमाणें जुनें पायदळही त्यानें मोडून टाकिलें; व नव्या बारा पलटणी तयार केल्या. नव्या लष्करांतील माणसें व घोडे, सर्वच मापानें मोजिले जात. घोडे चांगले, उंच, व जबर असले तर मात्र घेतले जात. पलटणींतील मनुष्यांचे तीन विभाग केले होते. उत्तम, मध्यम, कनिष्ठ. लोकांच्या टोळ्यांसच हीं नांवें दिलीं होतीं. नव्या शिपायाची भरती करावयाची झाली ह्मणजे, त्याचें माप घेत; व उंचीच्या मानानें जी टोळी असेल तींत भरती करीत. या सुधारणा यशवंतरावानें अशा रीतीनें मांडिल्या कीं, त्यांवरून त्याचें मन बहकलें आहे हें दिसून आलें. त्याचा एकदां हुकूम झाला ह्मणजे, ती गोष्ट एका क्षणांत झाली पाहिजे होती; नाहीं तर त्याच्या जालिमपणाचा कहर होऊन जाई. हरएक कामाची तो जातीनें देखरेख ठेवी. दिवस उगवला नाहीं तों, लष्कराची कवायत घेण्यास तो बाहेर पडे. मग पायदळांवर हल्ला करण्यास रिसाल्यांस हुकूम द्यावे. पायदळांस तोफखान्यांवर जाऊन पडण्यास हुकूम द्यावे. तोफखान्यांनीं भरधांव जाऊन, अवंतर लष्करांच्या बाजूवर व पाठीस पडावें; व मनुष्यांच्या व घोड्यांच्या अगदीं जवळ गोळे सोडावे. तोफांच्या ऐन सरबत्तींत, जाग्यावरून न हालण्याची त्यांस सवय झाली पाहिजे, असें तो हांसून ह्मणत असे. अशा तऱ्हेच्या खोट्या लढाया

दिवसांतून दोनदां व्हाव्या. यशवंतराव तर, सर्व लष्करास व प्रत्येक माणसास जातीनें हुकूम देत आहे असें दिसे; असें करण्यांत त्याणें इतकी चालाकी व इतकें सामर्थ्य खर्च केलें कीं, थोडक्या काळांत लष्कराची अशी सुधारणा झाली कीं, कोणास सांगितलें असतां खरेंही वाटणार नाहीं. परंतु आतां या विचित्र पुरुषाच्या कारकीर्दीची अखेरी आली होती. वर लिहिल्याप्रमाणें सातआठमहिने घालविल्यानंतर, त्याच्या वेडेपणाची इतकी हद्द झाली कीं, त्यास कोंडून ठेविणें भाग आलें. हें वेड जवळच्या लोकांस फारकाळापासून दिसतच होतें; परंतु त्याची लोकांस जी जरब असे त्यामुळें, अखेर उपाय योजिण्यास सर्व लोक भीत. पंजाबांतून परत आल्यानंतर, मुख्यमुख्य कारखानदारांवर त्याणें अशी शिस्त धरिली; व त्याचीं सर्व करणीं अशीं जालीम असत कीं, पुष्कळ कारखानदार पळपळून गेले. इंग्रजसरकाराशीं बोलणें ठरविण्यांत, बाळारामशेट या नांवाचा मुत्सद्दी फार कामीं आला होता. तो यावेळीं दिवाण झाला असे[1]. या बाळारामापाशीं, माझ्या बुध्धींत विपर्यास होत चालला आहे, असें यशवंतराव भिऊन सांगे. आतुरपणानें तो ह्मणत असे कीं, "याक्षणीं मी काय ह्मणतों याची मला पुढच्या क्षणीं आठवण राहात नाहीं. कांहीं तरी औषध दे." असें ह्मटलें ह्मणजे बाळाराम, होय देतों, ह्मणून सांगे. खरोखरीच यशवंतराव जें सांगे त्यास तो होयच ह्मणे. अशा हो ह्मणण्यामुळें यशवंतराव थंड पडे, व आपण त्याजजवळ काय ह्मटलें व काय झालें हें विसरे. वेडाच्या सपाटयांत निरनिराळ्या वेळीं, अनेक माणसांस मारून टाकण्याचे त्याणें हुकूम दिले होते; परंतु फक्त एकादोघांस मात्र ही शिक्षा सोसावी लागली. कारभारी बाळाराम याच्या धूर्ततेमुळें व परोपकारामुळें, बाकीचे लोक वांचले. जावखत भितरेपणामुळें, हा कारभारी आपला जीव

---

१ सन १८०६च्या जानेवारी महिन्यांत पंजाबप्रांतीं माझ्याशीं, यशवंतरावाच्या नांवानें, बाळारामशेट व आणखी एक त्याच्या हाताखालील शेखहबीबुल्ला यांणीं, तह ठरविला.

जाईल ह्मणून जरी कांपत असे तरी, लोकांचे जीव वांचविण्याविषयीं तो अत्यंत दक्ष असे[१]. परंतु हा प्रकार फार दिवस कसा चालतो! एकेरात्रीं वाड्यावर गंगाराम कोठाऱ्याचा पाहरा असतां, आंतील सर्व बायकामाणसें बाहेर धावून आलीं; व त्यांणीं ओरडा केला कीं, महाराजांच्या कहरानें आह्मीं सर्व धास्तींत पडलों आहों. गंगारामानें प्रथमतः बचावाची जागा त्यांस दाखविली; व नंतर त्याणें, आंतील चौकांत शिरून, तावडतोब कारभारी बाळाराम शेट यास बोलावूं पाठविलें. अगोदर यशवंतराव कोठें आहे हें त्यांस दिसेना. परंतु मशाली लावून पहातांना असें दिसलें कीं, मोकळ्या कापडांचा एक गंज पडला होता, त्यांत दडून राहण्यास तो पहात आहे. जे लोक या वेळीं हाजर होते त्याणीं असें ठरविलें कीं, आतां यशवंतरावाच्या वेडाची शिकस्त झाली. यापुढें त्यास खुलें असूं देणें बरोबर नाहीं. मग त्यांणीं यशवंतरावास पकडण्याविषयीं हुकूम दिला; व लोकांनीं त्याला धरून ओढीत बाहेरच्या चौकांत आणिलें; कारण कीं, बायका माणसांस आंत जागा पाहिजे होती. यशवंतरावास जबरदस्तीनें पकडलें, त्यावेळीं त्यास शुद्ध नव्हती तरी, धरणारांच्या हातून सुटण्याविषयीं त्याणें शरीरसामर्थ्य पुष्कळ खर्चिलें. वेड लागलें असल्यानें हें सामर्थ्य वाढलें होतें. यामुळें त्यास पुरा कबजांत आणण्यास पंचवीस तीस माणसें लागलीं. एका प्रहरापूर्वीं ज्याच्या बारीकसारीक आज्ञाही, खरेप्रणानें ह्मणा, अथवामानभावी पणानें ह्मणा, निमुटपणानें ऐकिल्या जात,

---

१ यशवंतरावाच्या व बाळारामाच्या ज्या मुलाकती होत, त्यांचें वर्णन ऐकून हसूंच येईल. तो बहुधा बारीक वस्त्र पांघरून कांपत समोर बसला असे. केव्हांकेव्हां यशवंतराव विचारी कीं, बाळाराम तुला काय होत आहे? बाळाराम बहुधा उत्तर करी कीं, बारीक ताप आला-आहे महाराज; अशातऱ्हेनें बाळाराम भीत असे खरा; परंतु बाणीच्या प्रसंगावर, ज्या लोकांमध्यें विशेष धैर्य आहे असें समजलें जात होतें, त्या लोकांनीं ज्यावेळीं पाय काढिला त्यावेळीं, बाळाराम आपल्या ठिकाणीं होता तो होताच.

तो आतां जंगली जनावरांप्रमाणें दोऱ्यांनीं बळकट बांधिला गेला. काय करावें काय न करावें, अशा काळजींत रात्र मोठ्या संकटानें गेली. शेवटीं शहाणपणानें लोकांनीं ठराव केला कीं, आतां ही गोष्ट लपवून उपयोग नाहीं. मग दुसरे दिवशीं प्रातःकाळीं सर्व मुलकी कामदारांस व लष्करास, कोणास जवानी, कोणास लेखी, जाहीर केलें कीं, यशवंतरावाची अशी अशी स्थिति आहे. हें जाहीर झाल्यावर दंगाधोपा उठला नाहीं. पुढें जें होईल तें होवो, अशी सर्वांनीं समाधानवृत्ति धरिली. तिसरे दिवशीं यशवंतराव कांहीं वेळ शुद्धीवर आला; व मला कां बांधिलें आहे, ह्मणून त्याणें विचारिलें. मग झालेलें वृत्त लोकांनीं सांगितल्यानंतर, तो नुस्तें इतकेंच ह्मणाला कीं, तुह्मी ठीक केलें. मी फारच बेशुद्ध झालों असेन खरा! परंतु आतां ह्या माझ्या काढण्या सोडा; अमीरखानभाईस बोलावूं पाठवा, आणि मला बरें करा. लोकांची धर्मवेडी अशी समजूत होती कीं, भानपुऱ्याच्या वाड्यांत पिशाच वापरतें, त्याणें यशवंतरावास वेड लाविलें असावें; ह्मणून आतां लोकांनीं भानपुऱ्याजवळच गरोट[१] गांव आहे तेथें त्यास नेलें. यशवंतरावाचें वेड जरी दिवसेंदिवस मुकरर होत चाललें, तरी पहिल्या पेक्षां त्याचा कहरीपणा कमी झाला. तथापि त्यास एका तंबूत एकटा ठेविला होता; व सभोंवती पहारे राखिले होते. त्याच्या प्रत्यक्ष शरीराचें रक्षण कितीएक अत्यंत विश्वासांतील हुजऱ्यांकडे सोंपविलें होतें. हे हुजरे वेडाचें वारें कसें येतें, व केव्हां येतें, या गोष्टींशीं लवकरच वाकबगार झाले. हीं वारीं वारंवार येत, व निरनिराळ्या तऱ्हेचीं असत. केव्हां केव्हां त्यांत जालिमपणा दृष्टीस पडे; परंतु बहुधा खुळेपणा व द्वाडपणा विचित्र विचित्र तऱ्हेनें मिळालेला आहे असें दिसे. यशवंतरावानें बोलाविल्याप्रमाणें अमीरखान घाईघाईनें आला. व त्याणें त्यास आराम होण्याविषयीं हरप्रयत्न योजिले असें दिसतें. त्याणें एक मुसलमान हकीम आणि-

१. हें गांव भानपुऱ्यापासून नैर्ऋत्य दिशेस ७॥ कोसांवर आहे.

ला होता. त्यास, प्रथमतः आराम होईल अशी मोठी आशा होती. पिशाच-बाधेपासून वगैरे यशवंतरावास वेड लागलें आहे, अशा समजुतीची त्याणें थट्टा केली; व पुढें औषध देणें, असें ह्मणून नाकारिलें 'कीं, खाणें पिणें देणें हें ज्यांच्या हातीं आहे ते, आपल्या कह्यांत न राहतां, औषधास वांकडे ते पदार्थ खाऊं घालितात. या वरून तो हकीम बुद्धिमान् व कुशल होता असा आपल्यास एक भास होतो. यशवंतरावास बरें करण्या करितां, दौलतराव शिंद्यानें खंडेराव जोशी नांवाचा एक ब्राह्मण पाठविला होता. त्या ब्राह्मणाच्या, कुटिलपणानें घाणेरड्याथट्टा करण्यांत यशवंतराव संतोष पावे. तो ब्राह्मण औषधोपचार करण्यांत मंत्राची पुष्कळ छांछू करी, यामुळें यशवंराव तसें करीत असो; अथवा ज्या दौलतराव शिंद्यानें त्यास पाठविलें होतें, त्या दौलतरावाचा अपमान करण्या करितां करीत असो.' आतां हा वृत्तांत पुरा करण्या करितां इतकेंच सांगितलें पाहिजे कीं, त्यास आराम होण्याभावीं केलेले सर्व प्रयत्न घसरले. एक वर्षपर्यंत वेडाची अशी स्थिति राहिल्यानंतर, पुढें यशवंतराव अगदींच चळला. या शेवटल्या स्थितींत त्याणें, कधींही तोंडांतून एक शब्द काढला नाहीं; व आसपास काय चाललें आहे याची त्यास कोणतीच शुद्ध नसे. त्याची शुश्रूषा मोठी जपून करीत असते.² व लहान लेकराप्रमाणें त्यास दूध पाजीत. अशा उपायांनीं

---

१. केव्हांकेव्हां या थट्टा नुस्त्या शब्दावरच जात, व नुस्त्या एवढ्या ब्राह्मण वैद्यापुरत्याच असत असें नाहीं. चिमणाभाऊ, जो लोकांत यशवंतरावाचा गुरु या नात्यापेक्षां, त्याजकरवीं अन्याय करविता या नात्यानें विशेष प्रसिद्ध आहे, त्यास एके दिवशीं बोलावयाचें आहे, असें मिष करून, यशवंतरावानें बोलावूं पाठविलें; नंतर एकाएकीं तो त्याच्या अंगावर धावून गेला. चिमणाभाऊ पळून जाणार त्यापूर्वींच त्यास खूप मार मिळाला, हें पाहून जवळच्या लोकांचें समाधान झालें.

२. या वेडांत यशवंतरावाचें पथ्यपाणी करणाऱ्या बाईचें नांव लक्ष्मीबाई असे. ही मोठी अब्रूदार बायको होती. हिच्या अशा विचित्र

सरासरी तीन वर्षेंपर्यंत त्याचें आयुष्य लोटविलें; नंतर भानपुऱ्यास त्याचा काळ झाला. या गांवाजवळ एक लहानशी, परंतु सुंदर व भरीव कामाची छत्री त्याच्या नांवानें बांधिली आहे.[१] यशवंतराव होळकराचा मध्यम बांधा होता. तो बळकट व चपळ काठीचा असे. रंग काळसर होता, व एक डोळा गेल्यानें मुखचर्याही विरूप झाली होती[२]. तथापि त्याची मुद्रा गोड दिसे; कारण त्याजमध्यें स्वभावतः जी दिलदारी असे तिजपासून, त्याजवर टवटवी येई. ही दिलदारी भीतीच्या समयीं त्याच्या कामी आली इतकेंच नाहीं; तर ती त्याच्या अंतास कारण जें भयंकर वेड, त्या वेडासही न जुमानून, कांहीं वेळ राहिली होती. या सरदारास चांगलें शिक्षण प्राप्त झालें होतें. जरी फारशी, त्याला लिहितां अथवा वाचितां येत नव्हतें तरी, फारशी बोलणें त्यास समजे. त्याच्या स्वभाषेंत, ह्मणजे मराठींत तर, तो फार शुद्ध लिही; व हिशेबी कामांत जलद व हुशार असे. घोड्यावर बसण्यांत, आणि याच प्रमाणें सर्व पौरुषेय कसरतींत, विशेषें करून भालाबोथाटींत, थोडेच लोक यशवंतरावाच्या बरोबरीचे असतील. या कामांत जसें त्याचें कौ-

---

कबजांत यशवंतराव आला कीं, जेंजें ती ह्मणे, तेंतें तो लेंकराप्रमाणें ऐके. यशवंतराव, संवत १८६८ कार्तिक शुद्ध ११ दिवशीं ह्मणजे सन १८११ च्या सालीं २० आक्टोबर रोजीं मरण पावला.

१. मी यशवंतरावाची छत्री पहावयास गेलों, तेव्हां त्याच्या अत्यंत कृपेंतील एक घोडा, आपल्या धन्याच्या छत्रीजवळ विश्रांति घेत व घासदाणा खात पडला आहे असें दिसलें; हें पाहून मला संतोष झाला.

२. याचा डोळा वडगोंद्यास हातांतील बंदूक फुटून जाया झाला, असें वर लिहिलेंच आहे. हिंदुस्थानांत साधारण ह्मण आहे कीं, एकडोळे पुरुष क्वचित साधु असतात. आपला डोळा गेला असें जेव्हां यशवंतरावास समजलें तेव्हां, तो थट्टेनें ह्मणाला कीं, आजपर्यंत मी दुष्ट तर होतोंच; परंतु आतां सोद्यांचा गुरु होईन.

शल्य, तसें त्याचें धारिष्टही होतें. धारिष्टाचीं उदाहरणें त्याणें हरएक प्रसंगीं दाखविलीं. पुण्यास शिंद्याच्या तोफांवर स्वार घेऊन तो जातीनें जाऊन पडला होता; व एका मोठ्या सशक्त गोलंदाजानें त्याला जखमी करून घोड्यावरून खालीं ओढला असतां, तो जमीनीवर उभा राहून त्याशीं झगडत होता. अखेर त्याच्या जवळच्यां पैकीं, कोणी एक त्याच्या मदतीस आला; त्या मदतवाल्यानें शत्रूस पाडून, यशवंतरावास पुनः घोड्यावर चढविलें. अशा मरदुमकीत, व खरोखरीच ज्याज्या प्रसंगांत जातीचा प्रताप दाखवावयाचा असे, त्या त्या प्रसंगांत, तो मोठें वैभव मानी. वर लिहिलें आहे यांत स्तुतीस पात्र अशा सर्व त्याच्या गुणांचें वर्णन आलें. त्याच्या शरीराच्या बांध्याकडे, व लहान वयापासून जडलेल्या संवईकडे पाहिलें असतां, हे गुण त्याजमध्यें असावे असें कोणासही वाटेल. तो होळकरांचा औरस पुत्र नव्हे. लुटारू स्वारांच्या एकाद्या टोळीच्या आधिपत्याखेरीज, विशेष मोठी योग्यता मिळण्याची त्यास आशा नव्हती. व लुटारू स्वाऱ्या नेण्याच्या स्थितीमधील हरएक गोष्टीची मात्र, त्याला बाळपणापासून शिक्षा झाली होती. अशी ज्या यशवंतरावाची मूळपीठिका, तो यशवंतराव बाप जिवंत असता तर, मराठ्यांच्या लष्करांत फक्त अत्यंत धारिष्टवान् व चपळ लुटाऱ्यांमध्यें गणिला जाता. हीच कीर्ति मिळविण्याविषयीं प्रथमपासून त्याची उमेद होती. जर तावेदाराची कृति करण्यापुरतीच त्याची योग्यता राहिली असती तर, त्यांत खुद्द त्याचें व अवंतर लोकांचेंही कल्याण झालें असतें; परंतु दौलतराव शिंद्यानें त्याच्या एका भावास मारल्यामुळें, पळून जाणें भाग आलें असतां; व बाजीराव पेशव्यानें दुसऱ्या एका भावास देहांत शिक्षा दिल्यानें त्याचा जातीचा जीव धोक्यांत असतां, जेव्हां नशीबानें होळकरांच्या गादीवर त्यास बसाविलें, तेव्हां, अर्थांतच त्याणें साहस कर्मे करण्याचा मार्ग धरिला. चांगल्या विचारावर थोडीबहुत भक्ति, पहिली त्याच्या हृदयांत असल्यास असो; परंतु आतां सद्गुणाच्या व नीतीच्या ठिकाणीं तिचा लोप होऊन, त्याचें हृदय

कठोर झालें. अधिकार प्राप्त झाल्यावर, वाईट कृत्याच्या तो इतका शिखरावर येऊन पोंचला कीं, त्या शिखरावरून उतरणें अशक्य नसलें, तथापि कठीण होतें. जरी स्वभावसामर्थ्यामुळें यशवंतरावाचा हुकूम चाले, तरी लुटारू लष्कराचा सेनापति मात्र तो असे. या लुटारू सैन्यास त्याणें आपल्या बुद्धीची, नांवाची, व कार्यांची मदत पोंचविली. पुंडाव्यांत गेलेल्या आयुष्याच्या फेरफारांत, हें सैन्यही त्याशीं खऱ्या भावानें वागलें. त्याणें सैन्यांतील बद फैली आंवरलि होती असें नाहीं. फक्त तीस एक मार्ग काढून दिला होता. एक तर त्याच्या स्वभावसामर्थ्यामुळें त्या लोकांस दहशत होती; व दुसरें आपल्या अत्यंत दुष्कर्मांसही यशवंतरावानें मोकळीक ठेविली आहे, हें पाहून, ही त्यांस समाधान वाटत होतें. आशामुळें ते इतक्या आज्ञांकितपणानें त्याची सेवा करीत कीं, यशवंतरावाच्या मनांत एकाद्याचा नाश करणें आल्यास, त्यांच्या योगानें तो भयप्रदच होता. यशवंतरावाच्या दुष्टकृत्यासं सबबी दाखविणारे कदाचित् असें ह्मणतील कीं, सत्ता हातीं राखण्यास त्यास या खेरीज दुसरा कोणता मार्ग होता? परंतु त्यांस हें कबूल करावें लागेल कीं, त्याणें केलेलीं कृत्यें, त्याच्या स्वभावास खासीं मानवणारीं होतीं. खरोखरीच, लुटारू लोकांच्या सैन्याचें आधिपत्य करण्यासच, ईश्वरानें त्यास निर्माण केलें होतें असें ह्मटलें पाहिजे. जो कोणी संमोर येई त्यास कसें फुसलवावें, या कळेचा तर तो गुरुच होता. पगार न मिळाल्यामुळें, अथवा हरएक दुसऱ्या कारणामुळें, जेव्हां त्याचे शिपाई व सरदार अतृप्त होत, अथवा पुंडावा करीत, तेव्हां त्यांची हांजीहांजी करून, अथवा मसकरी करून, अथवा हसूं येण्याजोगें भाषण करून, त्यांस तो सुप्रसन्न करी; परंतु कदाचित् त्यांस भेवडावूं असें जर त्याणें मनांत आणिलें, तर मात्र त्यास असें स्फुरण येई कीं, अत्यंत धारिष्टवान् लोकही कांपूं लागत. पुण्यास, आपल्यास पगार मिळाला नाहीं याची दाद घेण्याविषयीं, एक पठाणकामदार त्यास आडवूं

पाहूं लागला[१]; तेव्हां त्याणें त्यास सांगितलें कीं, तूं मला अमीरखान समजूं नको. ज्यास्त कांहीं एक न देतां, या उद्धटपणा साठीं तुजजवळ असेल तें लुटून घेईन. हें ऐकून पठाणानें मागें पाय काढिला, व आपल्यास शिक्षा दिली नाहीं, हेंच तो आपलें दैव समजला. तथापि यशवंतरावाचा राग क्षणिक असे; त्याच्या जवळचे सर्व लोक सांगतात कीं, मुळचा त्याचा दयार्द्र व उदार स्वभाव होता; परंतु कशाही तऱ्हेनें सत्ता हातीं येवो, या ठिकाणीं त्याचा मुख्य जीव; तेव्हां ती प्राप्त करून घेण्यास, व सांभाळण्यास त्याणें हरएक उपाय योजिले. त्याच्या भक्तींत पुष्कळ अयोग्य पुरुष असत[२]. या अयोग्य पुरुषांतून कोणी, दिलेलें वचन तोडण्याविषयीं, अथवा दुष्ट कर्म करण्याविषयीं, एकादी सल्ला दिली; व प्रस्तुत कार्य साधत असल्यास, अथवा विपत्ति दूर होत असल्यास, ती यशवंतरावानें ऐकिली नाहीं; असें झालें नाहीं. अशा प्रेरणांनीं वर्तणारा यशवंतराव, नाशकर्त्या पिशाचासारिखा, सद्गुणी अहिल्याबाईनें उभारिलेली सुंदर इमारत पाडून टाकण्यास उभा राहिला. मध्यहिंदुस्थानांत ज्या दिवशीं यशवंतरावाच्या कारकीर्दीस आरंभ झाला, त्या दिवशींच वाताहातीसही आरंभ झाला. यशवंतरावाचा पक्ष उचलणारे पुष्कळ पुरुष आहेत. ते ह्मणतात कीं, प्रथम पासूनच संरक्षण करण्यास त्यास मुलूक नव्हता. तसेंच शिंद्याच्या अन्याया मुळें, त्याला दुष्कर्मांत इतकें गडून जावें लागलें कीं, पुढें हात सोडवून घेण्यास जागा राहिली नाहीं; कारण त्याजजवळ

---

१. जमशेरखान निंबाखेड्याचा माजि कमाविसदार थोड्या महिन्या पूर्वीं वारला.

२. त्याच्या मुख्य भक्तींतले लोक, चिमणाभाऊ त्याचा गुरु, व हरनाथदादा, हे असत. हरनाथ मुळचा जातीनें न्हावी होता. त्यास यशवंतरावानें लहानपणापासून वाढवून मोठ्या अधिकारास चढविलें. चिमणाभाऊ विशेष दुष्ट, की हरनाथदादा विशेष दुष्ट, याची निवड करणें कठीण आहे.

जें सैन्य माजलें, त्यास पगार देण्यास नियत उत्पन्न नव्हतें; व हें सैन्य सोडून द्यावें तर, त्याचा अधिकार व जीव धोक्यांत घ.तल्याशिवाय तसेंही होऊं सकत नव्हतें. आतां कांहीं अंशीं हें सर्व खरें आहे; परंतु ज्या नियमानें चांगला व व्यवस्थेशीर अधिकार चालतो, त्या नियमांस वस्तुतःच यशवंतराव मानीत नसे. असे नियम स्थापण्याची त्याणें आपली कधींही इच्छा दाखविली नाहीं. त्याचा मुख्य हेतु असा होता कीं, पूर्वीं, लुटीच्या स्वाऱ्या करून मराठ्यांनीं हिंदुस्थानभर वर्चस्व मिळविलें; तीच मांडणी आतांही सुरू करून, तें वर्चस्व पुनः प्राप्त करावें. परंतु कालमहात्म्य बदललें होतें. मोगलांच्या पडत्या राज्याच्या ठिकाणीं, इंग्रजांच्या वर्धिष्णु दैवाशीं त्यास झगडावयाचें आलें होतें. तसेंच शिवाजीबरोबर जें स्वदेशीय सैन्य होतें, त्या सैन्याच्या ठिकाणीं यशवंतरावापाशीं, विचाराविचार न पहाणाऱ्या लुटारू बारभाईंची मिसळ होती. लुटीच्या भक्तीखेरीज, यालोकांत सर्वांत साधारण दुसरी बुद्धि नव्हती. अखेर उत्तरहिंदुस्थानांत नेलेली स्वारी घसरली तेव्हां, लूट करण्याच्या व फत्ते करण्याच्या स्वप्नांतून, यशवंतराव जागृत झाला. मग आपलें लष्कर सुधारण्यास यत्न मांडूं लागला; व राज्यस्थिति चांगली करण्याविषयीं बडबडूं लागला. परंतु त्याच्या कारकीर्दीचा हा शेवट होता. जी कारकीर्द संकटसमयीं सुरू झाली; व जिजमध्यें विपत्ति, जुलूमजबरी, बदफैली, राज्यलोभ, व गुन्हे यांची शिकस्त दिसून आली; त्या कारकीर्दीचा अंत वेडेपणांत व्हावयाचा होता. राज्यकारभारांत यश मिळवून देण्यास, अथवा अधिकाराखालील लोकांस सुख देण्यास, जर विचाराविचार व सद्गुण नाहींत तर, नुस्तें धारिष्ट व बुध्धिही किती निरुपयोगी आहेत, याचें उदाहरण लोकांस मिळावयाचें होतें.

यशवंतरावाची छोटीशी कारकीर्द फक्त दहाच वर्षें असतां, तिचा भार त्याच्या मुलुखावर कसा पडला होता, हें मनांत आणून त्याच्या कृत्यांचें विशेषें करून वर वर्णन केलें आहे. तुकोजीच्या मरणापासून पुढें, गर्दीच्या काळास आरंभ झाला असें लोक ह्मणतात.

जे लोक अमर्याद सत्ता चालविणाऱ्या राजाच्या हाताखालीं असतात, त्यांस इतकें तरी सुख असतें कीं, त्याणें जातीनें जुलूम केला तथापि, तो इतर जुलूम करणाऱ्यांस दूर राखितो; परंतु तुकोजीच्या मरणापुढें लोकांस हेंही सुख नाहींसें झालें. वेळोवेळीं यशवंतराव शत्रूंपासून त्यांचें संरक्षण केल्यावांचून राहात असे इतकेंच नाहीं; तर खुद्द आपल्या लष्कराच्या कहरापासूनही त्यांस वांचविण्यास तो वारंवार असमर्थ असे. असमर्थ असे ह्मणा; अथवा इच्छित नसे ह्मणा. ह्या सर्व गोष्टी खऱ्या आहेत तथापि, जोंपर्यंत तो राज्याधिकार चालवीत होता तोंपर्यंत, होळकरांच्या कुळास व रयतेस, हमेष अभिमानास जागा होती कीं, यशवंतराव हा चपळ व शूर शिपाई दुर्दैवाशीं झगडत आहे. चालू क्रमांत बदल व सुधारणा होईल, अशी त्यांस शेवटपर्यंत उमेद होती. परंतु मग पुढें जेव्हां, त्याच्या अधिकाराची समाप्ति झाली; व निर्बळ कारभारी आणि सेनापति, सैन्य आंवरण्यास प्रयत्न करूं लागले; व तें सैन्य तर त्या प्रयत्नांस मानीना; तेव्हां, लोकांचीं दुःखें विशेषच असह्य झालीं. कारण आतां त्यांना त्रास देणारे जे मधले लोक उत्पन्न झाले, ते फारच हलकट असत. खरी गोष्ट अशीच ह्मटली पाहिजे कीं, यशवंतरावास वेड लागल्यापासून, तों पुढें मंदोसरावर वह होऊन मल्हारराव गादीवर बसला, तों पर्यंत, होळकरांचा अधिकार बंद पडला होता. या अपरिमित अंदाधुंदीच्या अकरा वर्षांत, ज्या कारभाऱ्यांनीं व सेनापतींनी, होळकरांच्या नांवानें अधिकार चालविला, त्यांचें आतां विशेषें करून वर्णन केलें पाहिजे. कारण मध्यहिंदुस्थानांतील इतिहासाच्या नात्याखेरीज, एकंदर हिंदुस्थानांतील रहिवाशांच्या रीतिभाती, व समजुती व स्वभाव, दाखविण्यास त्याचा विशेष उपयोग आहे.

# प्रकरण ७.

## यशवंतरावास वेड लागल्यापासून पुढें, होळकरांच्या दरबारीं झालेलीं वर्तमानें.

सन १८०८ ता. १८२०.

यशवंतरावास वेड लागल्यानंतर बाळारामशेट, मुख्यत्वें करून, (निदान वरकांतीं तरी,) कारभार पाहूं लागला खरा; परंतु तो वस्तुतः हरएक गोष्टीमध्यें, तुळसाबाईच्या हुकुमानें चाले. थोड्या काळापासून या स्त्रीनें, आपल्या सौंदर्याच्या व शाहणपणाच्या योगें, दरबारांत मोठी वजनदारी प्राप्त करून घेतली होती. आतां तर सर्व लोक तिलाच मुख्य मालकीण समजूं लागले. या बाईचीं पुढील कृत्यें व तिचा अंतकाळ, हीं वर्तमानें इतकीं चमत्कारिक आहेत कीं, तिची मुळापासून थोडीशी काहणी सांगितली पाहिजे. अजीबा या नांवाच्या कोणी पुरुषास मानभावी पंथांत, कांहीं प्रसिद्धि प्राप्त झाली होती.[१] व पहिल्या मल्हाराव होळकराच्या भक्तींतील हिरकाबाई ह्मणून जी स्त्री होती तिणें, ह्यास गुरु केलें होतें. हिरकाबाईजवळ, मीनाबाई ह्मणून एक दासी होती, तिणेंही त्याचा उपदेश घेतला. पुढें मीनाबाईनें त्याच्या घरीं जावें यावें, असें होतां होतां, त्या मानभावानें आपली मुलगी ह्मटलेली तुळसाबाई ह्मणून एक बायको होती, तिची तिची ओळख झाली. ओळखीनें ओळख वाढतां, अखेर यशवंतरावाची ओळख झाली. यश-

---

१. हा पंथ कृष्णंभट नांवाच्या ढोंग्यानें काढिला. हा भट दक्षण हिंदुस्थानांत सर्वांस माहीत आहे. मानभाव लोकांच्या मतीं वेद मान्य आहेत, परंतु ते लोक पुराण व गीतादि ग्रंथ यांस जुमानीत नाहींत.

वंतरावाची ओळख होण्यापूर्वीं, तुळसाबाईचें लग्न झालें होतें. पाहतांच तिच्या सौंदर्यानें यशवंतराव मोहित झाला.[1] मग थोडक्याच दिवसांत तुळसाबाई त्याच्या वाड्यांत गेली, व तिच्या नवऱ्यास बंदीखाना प्राप्त झाला. पुढें तिच्या मध्यस्थीमुळें, त्याची बंदीखान्यांतून सुटका होऊन, दक्षिणेंत रवानगी झाली. दक्षिणेकडे जातांना, सुंदर बायकोच्या मुबादल्यांत एक घोडा, खिलत, व कांहीं द्रव्य इतकें त्यास मिळालें. यशवंतरावापाशीं गेल्या दिवसापासून, तुळसाबाईनें त्याची प्रिति संपादिली. घरादारावर तिचा पुरा अधिकार चालूं लागला. यामुळें राज्य कारभारांतही ती मत देऊं लागली, व तिचें वजन पडूं लागलें. मग अर्थातच यशवंतरावाच्या वेडांत, राज्याची अनीनी तिच्या स्वाधीन झाली. राज्याधिकार चालविण्याविषयीं, बायकांचे हक्क मराठे लोक सहज मानितात. तुळसाबाईस उघड रीतीनें कोणी आड आलें असें दिसत नाहीं. आतां ती नित्य दरबार भरवूं लागली; परंतु तिच्या दरबाराची, अहिल्याबाईच्या दरबारापासून फार निराळी रीत होती. तुळसाबाई हमेष पडद्याच्या आंत बसत असे; व बाहेरल्या बाजूस मीनाबाई बसत असे; नंतर मीनाबाईच्या द्वारें, आपल्या कारभारी मंडळीशीं व कामदार मंडळीशीं ती बोले.

प्रथमतः बाळाराम शेटावर तुळसाबाईचा पूर्ण विश्वास होता; व त्यास अमीरखानाचेंही पाठबळ होतें. यामुळें त्याचा अधिकार चां-

---

१. तुळसाबाईस प्रथम शामराव माहाडिकानें पाहिलें. तिच्या सौंदर्याचें त्यास इतकें आश्चर्य वाटलें कीं, त्याणें तिचा संबंध जोडण्याकरितां, यशवंतरावास चेतविलें. बहुधा आपण तिच्या उदयास कारण झालों, ह्मणजे आपल्या हिताकरितां ती वजन खर्च करील, असें त्यास वाटलें असेल. शामराव माहाडिकानेंच तिला मांडवगडाहून महेश्वरीं आणिलें आजीबाबरोबर ती मांडवास गेली होती. ही हकीकत शामरावाचा पुतण्या व वारीस, हरसुल्याचा हल्लींचा कमाविसदार याणें सांगितली.

गला स्थापला गेला, असें दिसूं लागलें. परंतु लवकरच, सैन्य बिलकुल कह्याबाहेर गेलें; व पलटणी लोकांनीं यशवंतरावास आपल्या ताब्यांत घेऊन, आपल्या छावणींतील तंबूंत नेलें. ते असें ह्मणूं लागले कीं, ज्यादूच्या योगानें, यशवंतरावास लोकांनीं वेड लाविलें आहे. व यासाठीं आह्मी उपाय योजून त्यास बरें करितों. या वेळीं हा पुंडावा, अमीरखान हजर होता त्यानें मिटविला. परंतु त्यास लवकरच राजपुतान्यांत, आपलें हित साधण्यास, माळवा सोडून जावें लागलें. जातांना त्याणें आपल्या तर्फे होळकरांच्या दरबारीं, आपला साडू गफूरखान या नांवाचा गृहस्थ होता, त्यास ठेविलें. गफूरखानास आतां नवाब अशी पदवी प्राप्त झाली; व त्याणें एक हजार स्वार राखण्याचें कबूल केलें. त्याच्या व त्याच्या स्वारांच्या निर्वाहासाठीं, सालीना वीस हजार रुपये उत्पन्नाचा मुलूक, बाळारामानें सरंजामी करून दिला. यशवंतरावास पकडून ठेविल्यानंतर सातआठ महिन्यानीं, हीं वर्तमानें घडलीं.

गेल्या पावसाळ्यांत काळी सिंध नदीच्या किनाऱ्यावर होळकरांच्या सैन्याचा तळ होता. आतां चालू पावसाळ्याच्या संधीस हें सैन्य, दक्षिण दिशेस निघालें; व महूजवळ छावणी देऊन राहिलें. येथें प्रथमतःच बाळारामानें अशी एक गोष्ट केली कीं, तिजपासून त्याचा अधिकार बहुधा गेलाच होता. यशवंतरावानें बारा पायदळ पलटणी नव्या उभारिल्या होत्या, त्या पलटणींवर व त्यांच्या बरोबरच्या तोफांवर, निरनिराळे बारा सरदार होते. या बाराही पलटणी, बाळारामानें आतां एकत्र करून, त्यांचा एक मोठा कंपु बनविला; व या कंपूचा मुख्य अधिकार, यशवंतरावाच्या कृपेंतील एक धर्मा कुंवर ह्मणून हुजऱ्या होता त्यास, कर्नेल ही पदवी देऊन, दिला. हा पुरुष हिम्मतदार व खटाटोपी होता. त्याला, कोणीं कोणीं राज्याधिकार बळकाविण्याची मसलत दिली; व ती त्याणें लवकरच ऐकिली. प्रथमतः त्याणें यशवंतरावाच्या डेऱ्यावर, तुळसाबाईच्या डेऱ्यावर, व होळकरांच्या कुळां-

तील अवंतर बायकांच्या डेऱ्यांवर पाहारे लाविले; आणि नंतर असा निखालस हुकूम फिरविला कीं, यशवंतरावाच्या अथवा तुळसाबाईच्या भेटीस, माझ्या हुकुमाखेरीज कोणास जाऊं देऊं नये. याचप्रमाणें कारभारी लोकांस व आवांतर कामदार लोकांसही त्याणें सांगून पाठविलें कीं, तुह्मी हमेषाप्रमाणें आपआपलीं कामें चालवावीं; परंतु माझ्या सल्ल्याखेरीज व मंजुरातीखेरीज, ज्यास्तकमी करणें झाल्यास करूं नये. धर्मा कुंवर छातीचा व कराराचा पुरुष आहे, हें सर्वांस माहीत होतें; यामुळें प्रस्तुत लोकांस धास्ती बसली खरी; परंतु त्याच्या अशा दांडग्या कृतीनें लोकांस अशीही बुद्धि झाली कीं, यास कसेंतरी अडविलें पाहिजे. मग होळकरांच्या कुळांतील बायकांनीं, व विशेषेंकरून तुळसाबाईनें, गफूरखानास आंतून सांगून पाठविलें कीं, या बंदींतून आह्मास सोडीव. हा निरोप आल्यावर गफूरखान, बाळारामशेट, व आणखीही कामदार लोक, धर्मास बुडविण्यास एकत्र जमले. व त्यांस राजा महिपतराम नांवाचा सरदार येऊन मिळाला[१]. हा महिपतराम मागच्याच वर्षीं निजामशाईंतून पळून येऊन, रामपुऱ्यास यशवंतरावास मिळाला होता; व यशवंतरावानें त्याचा सत्कार करून, हजार लोकांनिशीं त्यास चाकरीस ठेविलें होतें. हल्लीं महिपतरामाच्या लोकांचा पगार बराच तुंबला होता; तेव्हां तो वसूल करण्याच्या मिषानें

---

१. निजामाजवळ फ्रेंच पलटणीचा अधिकारी मानशूर रेमंड जेव्हां होता, तेव्हां त्या जवळ महिपतराम, पेषकार ह्मणजे शिरस्तेदारासारिखा होता. या जागीं प्राप्त झालेली वजनदारी, महिपतरामाच्या उत्कर्षास कारण झाली. सन १७९९ त रेमंडाच्या पलटणीचीं हत्यारें घेतलीं, व सुधारणा केली, त्यावेळीं, महिपतराम फार उपयोगी पडला. व त्याजवर निजामाची कृपा होऊन, त्यास मोठमोठीं कामें मिळालीं. हैदराबादेचा कारभारी मीर आलम मेल्यानंतर, पुंडावा करण्याचा महिपतरामानें यत्न केल्यावरून, अखेर निजामशाईतून त्यास पळून जाणें भाग आलें.

यशवंतरावास आपल्या कबज्यांत घ्यावें, असा त्यानें बेत ठरविला. मग रीतीप्रमाणें त्याच्या लोकांनीं धरणें घेतलें. धर्मकुंवरानें आरंभींच ओळखिलें कीं, या उद्धटपणाचा रोंख आपल्यास लक्षून आहे. परंतु करितो काय! मराठी लष्कराची चालच अशी होती यामुळें, या गोष्टीचा त्यास डाव धरितां येईना. बाळारामशेट व गंगाराम कोठारी यांणीं सोंग करून धर्मास कळविलें कीं, आह्मीं मध्यस्ती करितों; व महिपतरामाकरवीं असें कबूल करवितों कीं, तीस हजार रुपये मिळाले असतां धरणें उठवीन. महिपतरामही बाहेरून या गोष्टीस कबूल झाला; व धर्मानें वीस हजार रुपये त्याच्या पदरांत टाकिले. परंतु इतकें जों चाललें आहे तों, धर्माच्या नजरेस आलें कीं, आपला जीव घेण्याकरितां, निदान आपली सत्ता नाहींशी करण्याकरितां, जबर खटपटी चालल्या आहेत. मग त्यानें जिवाचा निर्धार करून, तावडतोब उपाय योजिले. त्यानें महिपतरामास छावणी सोडून निघून जाण्यास हुकूम पाठविला; व आपण गफूरखानाच्या डेऱ्यावर जाऊन, अमीरखानाचा तो मुतालीक आहे हें नातें ध्यानांत घेऊन, थोडकेंच परंतु कराराचें त्याशीं बोलणें बोलला.

---

१. महिपतरामानें यशवंतरावास असें सांगितलें कीं, आपल्या राज्यकारभारांत इंग्रज दखल देतात अशामुळें, निजाम नाराज आहे; त्यास आपण दक्षणेंत जावें, व इंग्रजांच्या हातांतून निजामास सोडविण्याचा यत्न करावा. यशवंतरावानें हा बेत पसंत केला. त्यावेळच्या अखबारींत अशा तऱ्हेचा मजकूर लिहिला जात असे; परंतु निजामानें, इंग्रजसरकारच्या वकीलाच्या सांगण्यावरून, सन १८०९ च्या फेब्रुआरी महिन्याच्या ३. तारखेस, यशवंतराव होळकरास पत्र लिहिलें कीं, इकडे आलां असतां, मजपासून तुह्मांस उमेद राहावी अशी माझी इच्छा नाहीं. यशवंतरावानें उत्तरीं लिहून पाठविलें कीं, महिपतराम माझ्या पाठीस पडला आहे त्याअर्थी, त्याला तुमच्या स्वाधीन करण्यांत माझा अपमान आहे; परंतु माझा असा हेतु आहे कीं, महिपतरामास कलकत्त्यास पाठवावा; ह्मणजे कौंसल त्याचा न्याय करील.

तो ह्मणाला कीं, मी यशवंतरावाचा केवळ दास आहें; व ज्याप्रकारें यशवंतरावास मानितों, त्याप्रकारें अमीरखानासही मानितों. हें माझें पोकळ बोलणें नाहीं. कारण तुमच्या लष्कराच्या निर्वाहाकरितां, जावरा वगैरे प्रांत जायदाद करून देऊन, मी अमीरखानास किती मानितों, व तुझा किती मित्र आहें हें, उघड प्रदर्शित केलें आहे. या गोष्टीस अझून फार दिवस देखील लोटले नाहींत. असें असतां, मला पकडण्याकरितां व माझा नाश करण्याकरितां, महिपतरामासारख्या परक्याशीं तुह्मीं काय ह्मणून खलबत केलें! त्याच्या बोलण्याच्या धरतीवरून, गफुरखानास बरीच दहशत बसून, त्यानें आपण खलबत केलें ही गोष्ट नाकारिली. हें संभाषण रात्रीं झालें; व दुसरे दिवशीं अंमळ सूर्योदय झाला न झाला तों एक पलटण, दोन तोफा घेऊन महिपतरामाच्या डेऱ्यावर चालून गेली. ही पलटण पाठविण्यापूर्वीं, लष्करांतून पुनःनिघून जाण्याविषयीं महिपतरामास ताकीद दिली होती. व ती मानण्याविषयीं त्याणें आपली खुशीही दाखविली होती. परंतु त्याचे लोक स्वयंपाक वगैरे करण्यांत गुंतून जिकडे तिकडे पसरले होते यामुळें, निघून जाण्यास अवधि लागली. हें हुकूम तोडल्याचें उदाहरण आहे असी सबब लावून, खुद्द धर्माचे लोक महिपतरामाच्या आंगावर धांवले. त्याणें हें तुह्मी जालिमपणाचें कृत्य करितां, हें बरोबर नाहीं ह्मणून सांगितलें. परंतु यावेळेस त्याजबरोबर फक्त एक हुजऱ्या मात्र होता याजमुळें, त्याचा कांहीं इलाज चालला नाहीं. मग धर्माकुंवराच्या एका शिपायानें गोळी घालून, उभे राहिल्या ठिकाणींच, त्यास पाडिलें; व त्याचें डोकें कापून, साधारण खूनी वगैरे गुन्हेगाराप्रमाणें, यशवंतरावाच्या डेऱ्यासमोर झुगारून दिलें. गफूरखान, महिपतरामास वांचविण्याच्या उमेदीनें, तंट्याच्या आरंभींच यशवंतरावाच्या डेऱ्यावर आला होता; परंतु तसें करण्याची संधि गेली असें पाहून, त्याणें धर्माची विनंती केली कीं, धडाबरोबर जाळण्यास, महिपतरामाचें डोकें पाठवून द्यावें. हें त्याणें कबूल केलें. महिपतरामाचा माल असबाब, व त्याच्या लोकांचे कांहीं

घोडे, प्रथमतः धर्मानें जप्त केले होते; त्यांपैकीं कितीएक घोडेही गफूरखानाच्या सांगण्यावरून त्याणें सोडून दिल्हे. महिपतरामाचा माल असबाब पुष्कळ होता ह्मणून ह्मणतात.

अमीरखान नागपूरच्या राज्यावर युद्ध योजीत असतां, गफूरखानानें, वर सांगितलेल्या गोष्टीची, लिहून पाठविलेली हकीकत त्यास पोंहोचली. त्याणें उत्तर लिहिलें कीं, तुह्मीं आहां तेथेंच असावें. मीही लवकरच तुमच्या व होळकरांच्या कुळाच्या मदतीस निघून येतों. या पत्रांतील हांसील एका मुखबिरानें धर्मास जाऊन कळविलें. मग त्याणें तावडतोब गफूरखानास हुकूम पाठविला कीं, छावणी सोडून तूं निघून जा. न जाशील तर तुझा समूळ नाश करीन. गफूरखानानें हा हुकूम लागलाच मानिला; व तो जावऱ्याकडे निघून गेला. 8 तेथें महिपतरामाचा पुतण्या जयपतराम ह्मणून होता तो, व धोंडोपंततात्या या नांवाचा शिंद्याचा एक लुटारू सरदार होता तो, असे दोघे, त्यास जाऊन मिळाले. धोंडोपंततात्याबरोबर पांचशें लोक व दोन तोफा होत्या. मग गफूरखान हें लष्कर बरोबर घेऊन, आपला जायदाद मुलूखच बुछाडवेल तितका बुछाडूं लागला. इतकेंच नाहीं तर, आसपासचे परगणेही लुटून फस्त करूं लागला. परंतु त्याला लवकरच, कोटयाकडे पळून जावें लागलें. कारण इकडे धर्मकुंवरानें, आपल्या लष्कराचा एक भाग, जावरा घेण्यास्तव रवाना करून, आपण जातीनें, बाकीच्या लष्करासहित व दरबारी सर्व लोकांसहित, उदेपुराजवळ महादेवाचें प्रसिद्ध स्थान आहे तेथें, यशवंतरावास नेण्याच्या इराद्यानें, कूच केलें. कितीएक ब्राह्मणांनीं असें भविष्य सांगितलें होतें कीं, या तीर्थी गेल्यापासून यशवंतराव पुनः शुद्धीवर येईल. धर्मकुंवर हलक्या कुळांत जन्मला असून अधिकाराचा केवळ अपहारकर्ता होता खरा; परंतु त्याणें सैन्य अशा शिक्षेंत ठेविलें होतें कीं, तशी शिक्षा हिंदुस्थानी लष्करांत क्वचित् आढळते. ही गोष्ट त्यास भूषणास्पद आहे. मार्गानें जातांना, तो मुलुखांतून वसूल उकळीत चालला; परंतु त्याणें एकही गांव लुटलें नाहीं, व एकही शेत नासलें नाहीं. पुष्कळ

कारणांमुळें, वाटेंत धर्माचे मुक्काम फार हलके होऊं लागले. तो वडी सादरी येथें जाऊन पोहोंचला नाहीं तोंच, अमीरखान एका मोठ्या लष्करासह येऊन दाखल झाला. या वेळीं बहुतकरून सर्व पेंढारी लोक त्याचे अनुयायी झाले होते; ते सारे त्याच्या लष्करावरोवर होते. त्याच्या स्वारांचा रिसाला मोठा असल्यामुळें, त्याणें होळकरांच्या सैन्यास वेढा दिला; व धर्मास सांगून पाठविलें कीं, यशवंतरावास तावडतोब आणून आमच्या हवालीं करावें. धर्मानें हें सागणें अमान्य केलें; व एक कवायत शिकलेल्या पलटणीखेरीज सारे, त्याचा नाशच इच्छीत होते यामुळें, सामोपचारास जागाच नव्हती. मग परस्पर विरोधास आरंभ झाला. त्यांत पंधरादिवस लोटले. तथापि धर्माच्या कवायती पलटणीवर व तोफांवर, अमीरखानाच्या रिसाल्यांचा वस वसेना; परंतु त्याच्या दाणापाण्याचा पुरवठा वंद पडला असल्यामुळें, चालू झगडा लांबविण्याची त्यास उमेद राहिली नाहीं. मग दिवसेंदिवस रिसाल्यास धैर्य चढत चाललें. अमीरखानानेंही या प्रसंगीं असाधारण हिय्या दाखविला. सांप्रत आलेल्या संकटांतून, व यामुळें लागणाऱ्या कलंकापासून, होळकरांच्या कुळाचें संरक्षण करण्याकरितां, करवेल तितका प्रयत्न करा असें, तो जातीनें सैन्यास सांगत असे; व उमेद देत असे. हें संकट लहान नव्हतें. आतां धर्मानेंही असें जाणिलें कीं, आपण चहूं वाजूनें दवावांत आलों आहें; व यांतून निसटून जाणें यदाकदाचित् असंभाव्य नसलें, तथापि बहुत कठीण आहे. असें जाणूनच त्याणें, जिवाची तमा न धरितां, एक शकल काढिली. ती ही कीं, ज्या दिवशीं लष्करानें वडी सादरी सोडली, त्यादिवशीं वेशुद्ध असलेला यशवंतराव, व राज्य चालविती तुळसाबाई, व राज्याचा वालाधिकारी मल्हारराव यांस, वरोवर एक पाहरा देऊन, त्याणें जवळच्या जंगलांत एका दाट झाडीच्या ठिकाणीं पाठविलें. सांप्रतच्या झगड्यास जे हे तिघे कारण होते, त्यांस मारून टाकून, आपण सुटून जाण्याचा त्याणें इरादा केला होता, यांत विलकूल संशय नाहीं. परंतु हा त्याचा वेत

फसला. रत्नुपाटील नांवाचा खासपागेंत एक मराठा कामदार होता, त्यास वर लिहिलेली गोष्ट, यशवंतरावाच्या एका हुजऱ्यानें जाऊन सांगितली; रत्नुपाटलानें स्वार होऊन, तावडतोब त्या ठिकाणावर धांव केली; व जितके स्वार लोक जमा होतील तितके लगोलग रवाना करण्याविषयीं, त्याणें लष्करास हुकूम पाठविला. जंगलांत पोहोंचल्यानंतर, त्याणें धर्मास विचारिलें कीं, अशा ठिकाणीं या बालराजास तूं काय ह्मणून आणिलेंस? तुळसाबाई रडत आक्रोश करीत जवळ बसली होती, तिणें उत्तर केलें कीं, आमचा जीव घेण्याकरितां याणें आह्मांस येथें आणिलें आहे. धर्मानें जें उत्तर दिलें तें असें पुळपुळीत होतें कीं, त्याजविषयीं आलेला संशय बळकटी पावला. रत्नुपाटलानें आतां हुकुमत धारण केली; व लष्करास हुकूम पाठविला कीं, ज्या जागीं पोहोंचलां आहां, त्या जागींच तळ देऊन राहावें. लष्कर हल्लीं सात्रीपासून दोन कोसांवर, सांगडा या नांवाचा गांव आहे तेथें, जाऊन पोहोंचलें होतें. इतकें झाल्यावर, दरबाराकडून धर्माच्या पलटणींस असें सांगितलेंगेलें कीं, आह्मी तुमच्या तुंबलेल्या पगाराचा फडशा करूं; तुह्मी धर्मास कैद करावें. हें वचन मिळतांच, हीं पलटणें आपल्या सेनापतीवर उलटलीं; व त्यांणीं धर्मास, व सुभाराम ह्मणून त्याचा एक सोबती होता त्यास, व त्यांच्या अनुषंगी मंडळीस कैद करून, दुसरे दिवशीं प्रातःकाळीं तुळसाबाईच्या डेऱ्यावर हजर केलें. तिणें त्यांच्या वधाविषयीं लागलाच हुकूम दिला. मग त्यांस एका खटाऱ्यांत घालून, छावणीपासून अर्ध कोसावर नेलें; व ठार मारिलें.

धामधुमीच्या प्रसंगीं प्रसिद्ध लोक उदयास येतात. धर्मांकुंवर मूळ हुजऱ्या होता. त्याणें चालाकी व धैर्य या गुणांनीं, यशवंतरावाची बहुधा कृपा संपादिली असावी. मग आपल्या धन्याचे बहुतेक गुण त्याणें धरिले असें दिसतें. बाळाराम शेटाचा त्याजवर विश्वास असतां, त्याशीं तो कृतघ्नपणानें वागला. त्या कारभाऱ्यानें धर्मास मुख्य सेनापतीचा अधिकार दिला; व धर्मानें सत्तेचा लोभ धरून, बहुधा दुसऱ्याच

दिवशीं, आपल्या हिताकरितां तो अधिकार योजिला. परंतु ज्या आडदांड लोकांचें त्यास स्वामित्व प्राप्त झालें होतें, त्या लोकांस त्याणें असें कबजांत राखिलें होतें कीं, त्यावरून तो उगाच असा तसा सामान्य पुरुष नव्हता, असें दिसून येतें. यशवंतरावाच्या कुटुंबांतील माणसांस, व होळकरशाईतील मुख्य मुख्य कामगार लोकांस, त्याच्या सासुरवासांत राहावें लागलें खरें; परंतु निदान लष्कर आज्ञांकितपणानें वागतें, व देश संरक्षिला जातो हें तरी पाहून, समाधान मानण्यास त्यांस जागा होती. या गोष्टीचा विशेषच चमत्कार वाटतो; कारण कीं, धर्मास फार बदफैली सवई जडल्या होत्या. दारू पिण्यांत त्याची शिकस्त होती. आयुष्याच्या शेवटल्या रात्रीं, त्याणें सुटून न जावें या करितां जी तयारी चालली होती ती पाहून, आपलें काय होणार आहे हें समजलें असतां, तो लोकांनीं येऊन पकडी पर्यंत, नाचगाणें ऐकत, व सोभारामाबरोबर दारू पीत, स्वस्थ बसला होता. सोभाराम मतलबी व दुष्ट होता. धर्मास आडवाटेस लाविल्याचा दोष, लोक त्याजकडेसच लावतात. ज्या पुरुषांमध्यें प्रसिद्ध धैर्य, बाणेबहादरी, व निश्चय हे गुण असतात, त्यांणीं गुन्हे केले असतांही, लोकांस कींव येते. धर्माविषयीं अशीच लोक कींव करितात. अखेरच्या घटकेसही, तो असा वर्त्तला कीं, त्यापासून अधिकच कींव येण्यास कारण झालें. डोकें मारण्याविषयीं हुकूम देतांना तुळसाबाई ह्मणाली कीं, यांना हिंगळास येथें पाठवा. हिंगळास या नांवाचा एक गड आहे तेथें, राज्यकारणी बंदीवान लोक राखिले जात. या कारणामुळें, अशक्त मनाच्या सोभारामास असें वाटलें कीं, जिवाची उमेद धरण्यास कारण दिसतें. ह्मणून तो आपल्या सोबत्यास ह्मणाला कीं, आपणास हिंगळास गडीं बंदींत ठेविणार आहेत. परंतु हिंगळास हें, नाशाची स्वामिनी जी भवानी देवी, तीसही नांव आहे. तुळसाबाईच्या बोलण्याचा अर्थ, सोभारामापेक्षां धर्मा चांगला समजला. त्यानें उत्तर केलें कीं "बाबा तूं चुकतोस! आपल्याला स्वर्गींच्या हिंगळासेकडे पाठवीत आहेत. डोकें मारितेवेळेस, मांगानें एका हातांत शस्त्र घेऊन

अमळ हलका वार केला; तेंव्हां धर्मानें कडक नजरेनें उलटून पाहिलें, आणि तो त्यास बोलला कीं पाजी माणसा ! दोन्ही हात लाव. धर्माचें डोकें उडवावयाचें आहे हें तुजला माहित नाहीं ?

तुंबलेला पगार वांटून दिला जाईल अशा कबुलायतीवर, पलटणी आपल्या अधिकाऱ्यांवर फिरल्या; तेंव्हां आतां त्यांणीं पगार वांटणी ताबडतोब करावी ह्मणून मागणी केली. मग अमीरखानानें, पेंढारी लोकांच्या सरदारांसुद्धां, एकंदर सर्व लष्करी कामगार लोकांवर फाळा बसवून, सरासरी दोन लाख रुपये उभारिले; व लष्कराची प्रस्तुत विपत्ति निवारण केली.

लष्कराबरोबर दोन महिने राहिल्यानंतर, जयपूर वगैरे राजपुतान्यांतील संस्थानांकडून, होळकरदरबारास मिळावयाची खंड वसूल करण्यासाठीं, अमीरखानास त्या प्रांतीं जाण्यास हुकूम झाला. तो छावणी सोडून जाण्यापूर्वींच, बाळारामावर लोकांनीं बळकट कूष्मांड उभारिलें. तात्या आळेकर या नांवाचा एक मतलबी ब्राह्मण होता, त्याचें होळकराच्या कुळांतील बायकांपाशीं बरेंच चालत होतें. त्याच्या मनांतून आतां बाळारामाचा कारभार काढावा असें आलें. असें होईल हें अमीरखानानें पूर्वींच जाणिलें होतें; ह्मणून त्यानें एकीकडे तुळसाबाईस असें सांगून पाठविलें होतें कीं, ज्यावेळेस तुह्माला बाळाराम यास काढून टाकावें असें वाटेल, त्यावेळीं तुह्मीं त्यास माझ्या छावणींत पाठवून द्या; मग मी जरूर असल्यास त्यास मारून टाकीन. व एकीकडे त्याणें बाळारामास सांगून ठेविलें होतें कीं, माझ्या छावणींत यावयास कोणी सांगितलें असतां, तुह्मी निर्भयपणानें यावें. या नंतर थोड्याच दिवसांनीं अमीरखान राजपुतान्याकडे निघून गेला. तुळसाबाईनें आतां बाळारामास बोलावूं पाठविलें, आणि अमीरखानास जाऊन मिळावें ह्मणोन सांगितलें; व अमीरखानास लिहिलें कीं, तुह्मीं दिलेलें वचन पुरें करून, या आमच्या आणि आमच्या संस्थानाच्या शत्रूस वाटेस लावावें. तुळसाबाई इच्छीत होती त्याहून, फारच भिन्न परिणाम दिसून आला. अमीरखानानें मोठ्या

इतमामानें बाळारामास आपल्या लष्करांत आणिलें; व तुझा जीव वांचविण्याकरितां ही युक्ति मी योजिली असें सांगितलें. त्यास मारून टाकण्याविषयीं आलेलीं पत्रेंही त्यास त्याणें दाखविलीं. नंतर अमीरखान बाळारामास ह्मणाला कीं, माझ्या लष्कराचा पगार बहुत तुंबल्यामुळें मी फार विपत्तींत आहें; त्यास तुझ्यावर मी लष्करास हुंड्या लिहून देतों; त्या तूं स्वीकाराव्या. याच्या मुबादल्यांत, तुझा कारभारीपणा पुनः कायम होण्याविषयीं, मी मदत करीन. बाळारामास टाऊक होतें कीं, हें वचन दिलें असतां, आपणास पार पाडण्याचें सामर्थ्य नाहीं; तथापि त्याणें बरें आहे ह्मणून ह्मटलें. मग त्याणें अमीरखानास, निरनिराळ्या मुदतीच्या, एक कोटि चौसष्ट लाख रुपयांच्या हुंड्या, आपणावर लिहू दिल्या. ज्यांणीं या हुंड्या घेतल्या, त्यांसही माहीत होतें कीं, या फुकट आहेत. परंतु त्या लोकांस दुसरीकडून पैसा मिळण्याची जी मुदलींच आशा नव्हती, ती आतां कांहींतरी ( मग कितीही थोडें असो ), मिळण्याची आशा उभी राहिली. अमीरखान इतकें झाल्यानंतर, तुळसाबाईचें व बाळारामाचें ऐक्य करण्याकरितां, होळकरांच्या दरबारीं गेला; व मोठ्या सायासानें त्याणें त्यांचें ऐक्य केलें. आतां पुनः राज्याचा, बाळाराम मुख्य कारभारी असें, जिकडेतिकडे गाजलें. परत काम पाहूं लागल्यानंतर प्रथमतः, आपण स्वीकारिलेल्या हुंड्यांची त्याणें तजविजीनें तोडजोड केली. कारण कीं, अमीरखानानें केलेल्या उपकाराची फेड, होईल तितकी करावी असें, त्याणें मनांत आणिलें होतें.[१]

---

१. वर लिहिलेल्या गोष्टीचें स्वरूप यावरून दिसून येईल कीं, एक कोटी चौसष्ट लक्ष रुपयांची सर्व फेड, अडीच लाख रुपये रोख, व दोन लाख रुपयांचें आणखी कापड अशा, एकंदर साडेच्यार लाख रुपयांत झाली. एकंदरीनें रुपयास अर्धा आण्याहून कमी फेड पडली. देण्याचा दरही निरनिराळ्या लोकांस निरनिराळा होता. कितीएकांस अर्धा आणाही मिळाला नाहीं. दिलसुखराय एक सभ्य माणूस आहे त्याणें, मला सांगितलें कीं, रोख बारा हजारांची मजजवळ हुंडी होती, तिजबद्दल १०९ रुपयांचें कापड मिळालें; व त्यांतच मला संतोष मानणें भाग आलें.

या वेळीं होळकरांचें कारभारीमंडळ, त्या दरबाराचा व लष्कराचा गुजारा होण्यास ज्या तजविजी काढी त्या, देशाचा सत्यानास करणाऱ्या असत. त्यांणीं हल्लीं, मुख्य कामगारांपैकीं कित्येकांस सुभेदाऱ्या देऊन, व फौजी टोळ्या बरोबर देऊन, बाहेर रवाना केलें. व त्यांस असे हुकूम देऊन ठेविले कीं, तुह्मी आपला गुजारा करून, पैसा वेचून बाकी राहील तो, दरबारीं रवाना करीत जावा. ज्या लोकांनीं, आपल्या बरोबर दिलेल्या लष्कराच्या तुंबलेल्या पगाराची फेड करण्याची जबाबदारी घेतली, व तिजोरींत प्रथमतः कांहीं ऐवज भरला, व खेरीज तुळसाबाईच्या प्रीतींतील कामगारांस लांचलुचपत दिली, त्या लोकांस बहुधा वर लिहिल्या प्रमाणें हुद्दे व हुकुमती मिळून लूट माजविण्याची मोकळीक मिळाली. सुभेदारांनीं अमका मुलूख लुटावा, अमका लुटूं नये, अशाविषयीं कांहींच निर्बंध नव्हता. मग जसे खुद्द होळकरांच्या मुलकास त्रास भोगावे लागले तसेच, शिंदे व पंवार यांच्याही मुलकांस भोगावे लागले. संरक्षण करण्यास सामर्थ्य नाहीं इतकेंच कारण, या धाडेकरी सुभेदारांचे हल्ले येण्यास, पुरें होतें. होळकरांचे कामगार, सुभेदार वगैरे नांवें घेऊन, पेंढारी लोकांपेक्षांही विशेष दुष्टकृत्यें करूं लागले.[1]

---

१. या उंच पदवीच्या कामगारांत प्रथमतः, जगोबापूंत सुभेदार केलें. त्याजबरोबर च्यार पलटणीं दिल्या होत्या, त्यांपैकीं दोहोंचा मुख्य अधिकार रोशनबेगाकडे होता. साध्या शिपायाच्या जाग्यावरून रोशनबेग, आपल्या चपलपणानें व धैर्यानें योग्यतेस आला. पुढें होळकरांच्या लष्करांतील अधिकाऱ्यांत त्याणें नांवलौकिक संपादन केला. जगोबापूनंतर, दुसऱ्या खेपीं, बाळारामानें बापूविष्णूंत सुभेदारी दिली. हा गृहस्थ हल्लीं वसी आहे. त्याजबरोबर दिलेली टोळी मुख्यत्वेंकरून पायदळ लोकांची होती; परंतु त्यास पाठविल्या ठिकाणींच, दुसरी एक टोळी पाठविली होती ती, रिसाल्यापैकीं होती. या लोकांनीं एकत्र जमून, प्रथमतः शिंद्यांचीं कांहीं खेडीं लुटलीं; व नंतर

पुढें पुढारीपणा ज्यानें घेतला असा एक पुरुष, याच सालीं प्रथमतः लोकांच्या नजरेस आला. होळकरांच्या दरबाराची स्थिति, व माळव्याची दुःखदायक अवस्था, हीं कशीं असत हें, या पुरुषाच्या उदयापासून, व अधिकार प्राप्त झाल्यानंतर त्याणें जें वर्तन केलें त्या वर्तनापासून, चांगलें लक्षांत येतें. उत्तरहिंदुस्थानांत, कंपनीच्या राज्यांत, रामदीन नांवाचा एक ब्राह्मण, हलक्या कुळांत जन्मला होता. तो यशवंतरावाजवळ जासुदाच्या कामावर राहिला असे. पुढें दयाराम जमादार ह्मणून त्याचा स्वदेशीय असे, त्याची त्याजवर भक्ति वसली. दयाराम अब्रूदार व वजनदार गृहस्थ होता; त्याणें रामदीनास प्रथमतः महेश्वरचें काम सांगून, प्रसिद्धीस आणिलें. रामदीनानें, आपली वढती होण्यास द्रव्यसाधन पाहिजे या करितां, तेथील वस्तीस लुटलें. या प्रथमच प्रसंगीं, त्याच्या करणी इतक्या निर्लज्जपणाच्या व दुष्टपणाच्या होत्या, व त्याजवर फिर्यादीही इतक्या पुष्कळ झाल्या कीं, त्यास धरून आणून बिड्या घालण्याचा हुकूम, तुळसाबाईस देणें भाग आलें. बाळाराम पुनः कारभाऱ्याचें काम पाहूं लागला त्या सुमारास, ही गोष्ट घडून आली. मग अमीरखानाच्या मध्यस्थीनें रामदीन सुटला. निःसंशय, मिळविलेल्या लुटीचा कांहीं हिस्सा देऊन त्याणें, अमीरखानास वश केलें असावें. अमीरखान राजपुतान्याकडे निघून गेल्यानंतर, रामदीन, लांचखाऊ मीनाबाईच्या आर्जवीं लागला. या समयास तुळसाबाईजवळ, मीनाबाई ह्मणे तसें चालत होतें. हिला व आणखी लोकांनां पुष्कळ लांच दिल्यामुळें, व पुढच्या करितां वचनें दिल्यामुळें, या हलकट व दुष्ट माणसास इज्जतीचीं वस्त्रें, राजमोर्तब, डंकानिशाण, वगैरे सुभेदारीचीं एकंदर चिन्हें मिळालीं. त्याणें मराठी स्वार आपल्याबरोबर घेतले; व त्यांचा गुजारा चालवि-

---

मल्हारगडावर हल्ला केला. हा गड त्या वेळीं, गफूरखानाच्या ताब्यांत होता. (सन १ १०). अमीरखानाचा दरारा होताच, व गफूरखानानेंही आपलें वजन खर्च केलें ह्मणून, मोठ्या मुष्किलीनें, हे त्याच्या जाहागिरीवर निर्वाह करण्यास गेलेले लोक, परत बोलाविले गेले.

ण्याचें कबूल केलें. पायदळांपैकीं प्रथमतः त्याजजवळ फक्त शंभर लोक व दोन तोफा होत्या. परंतु जसजसें त्यास यश मिळत चाललें, तसतसा तो नव्या लोकांची भरती करून, आपली टोळी वाढवूं लागला. असें करितांकरितां त्याणें, एकंदर चार पलटणी उभारल्या; व मीनाबाई-च्या वसील्यानें, दरबारांतून कित्येक तोफाही त्याच्या लाहानशा सैन्यास प्राप्त झाल्या. मग हें सैन्य लवकरच माळव्याच्या पश्चिम भागास भयप्रद झालें.

रामदीनास दिलेला परवाना, मोहगम रीतीनें लिहिला होता. देणाराची व घेणाराची समजूत असी कीं, विचाराविचार न करितां, ज्यास लुटवेल त्यास लुटण्याचा अधिकार, या परवान्यापासून रामदीनास प्राप्त झाला. सत्यानास करण्याच्या कामीं, यापेक्षां लायक पुरुषाची पसंदी, पूर्वीं कधींही झाली नसेल. खुषामद, लुच्चेगिरी, व हलकटपणा यांची मिसळ होऊन त्याचा स्वभाव बनला आहे. हा मतलबी, हांजीहांजी करणारा, उद्धट, व फुशारकी मारणारा असून, कोणत्याही नियमसूत्रास अथवा चांगल्या बुद्धीस न मानणारा आहे. विपत्ति आली असतां जो गुलामासारखा, उदयप्रसंगीं जो उद्धट, अभिमान धरण्यास ज्यास नाकूळ नादेश;—असा हा रामदीन, सर्व लोकांपासून व सर्व जातींपासू-न, जितकें बुळाडवेल तितकें बुळाडीतच चालला. आपणास धोक्याचें ठिकाण आहे कीं नाहीं, हें पाहण्यांत मात्र तो फार सावध होता.

या मनुष्याच्या अवगुणाचें जरूरीहून विशेष वर्णन वर केलें; परंतु माळवे प्रांतीं कसकशा गोष्टींनीं अद्वितीय संकटें येऊन पडलीं, हें त्याव-रून चांगलें लक्षांत येईल

या अधिकार प्राप्त झालेल्या धाडेकऱ्यांनीं, काय काय केलें हें, बारीक रीतीनें सांगण्यांत हशील नाहीं. इतकेंच सांगणें पुरे कीं, त्यांणीं योजिलेल्या सर्व उपायांत, व केलेल्या सर्व कामांत, एक सारिखा जालिमपणा, व निर्दयपणा, दिसून येई.

यशवंतरावानेंच, नासाडी करणें सुरू केलें होतें, हें खरें आहे;

तथापि तो जोंपर्यंत शुद्धीवर होता तोंपर्यंत, राज्यास निदान राजा तरी होता. जातीनें तो गुन्हे करण्यास समर्थ असे, व सपाटून करी; परंतु आवांतर लोक करूं पाहतील तर, त्यांस दंड करण्यासही तो समर्थ असे. पुढें धर्मानें कांहीं दिवस कारकीर्द केली; त्यांत त्याचीही इतकी दहशत असे कीं, त्यामुळें मोठे मोठे बेकायद्यानें वागणारेही हुकुमतींत असत. आतां त्याच्या मरणानंतर, पुढें कायतें अमीरखानाकडे आलें, व तो अमीरखान तर, यांतच आपला मतलब जाणे कीं, होळकरांच्या कुळाची, व त्यांच्या कारभाऱ्यांची, व सेनापतींची अस्ताव्यस्त स्थिति असावी; त्यांजमध्यें आपलें वरचस्व नाहींसें करण्यास जूट होऊं न पावावा; व त्यांच्या नांवानें आपण, नागपुरापासून जोतपुरापावेतों, लुटी करीत हिंडत असावें.

तुळसाबाई तर मतलबी, मानभावाची मुलगी;[1] (मुलगी नसली तरी निदान शिष्यीण) व तो मानभावी, साधुत्वाच्या मिषानें, ऐहिक लोभाचा दास. तेव्हां अर्थांतच, स्त्रीजातीच्या साधारण कपटाहून, विशेष कपटांत, तुळसाबाईस शिक्षण होतें. तसेंच ज्या देशीं बायका क्वचितच विद्या शिकतात, त्यादेशीं विचित्र स्त्री ह्मणवून घेण्यापुरती विद्याही तीस होती. ती रूपानें सुंदर, व बोलण्याचालण्यांत मन हरण करणारी; परंतु आचरणानें बदफैली, व स्वभावानें जालिमी होती. तिची बुद्धि बरीच तीक्ष्ण असे, व केव्हां केव्हां मनाचा निर्धार, हाही गुण ती दाखवी; परंतु तिच्या अंगीं मुख्यत्वें दुष्टपणा असे. हा चमत्कार आहे; कारण पडद्यांत वाढलेल्या स्त्रियांच्या स्वभावाशीं, हा गुण अगदीं पडत नाहीं; व तुळसाबाई तर, अहिल्याबाईनें घातलेल्या शिरस्त्या विरुद्ध,

---

१. मानभावी अजीबा हा तुळसाबाईचा खराच बाप, अशी बहुत करून समजूत आहे. हा साधु ह्मणविणारा पुरुष, धादांत गोसावी असतां, आपली शिष्यीण जी हिरकाबाई तिच्या कृपेमुळें, गबर झाला होता. हा मेहश्वरीं राहात असे; यास पालखी, घोडे व अनेक चाकरमाणसें वगैरे, इतमाम मिळाला असे.

आमरणांत पडद्यांतच राहिली होती. खरोखरींच, सर्व गोष्टींमध्यें अहिल्याबाईच्या बिलकुल उलट, तिची वागणूक असे.

तुळसाबाई तरुण व सुंदर होती, ह्मणून पडद्याच्या आंत राहात असे, असें बहुधा कारण सांगतात; परंतु जसें हें कारण लागू, तसेंच हेंही लागू असेल कीं, ती अनीतीनें वागत असे, ह्मणून ती पडद्यांत राही. आरंभीं जनलज्जा न राखावी, इतकी निर्लज्ज ती झाली नव्हती. तसेंच ती हेंही जाणे कीं, जर आपण दुराचारानें चालतों हा, जिकडे तिकडे उघड बोभाटा झाला तर, आपल्या अधिकाराचें वजन नाहींसें होईल; निदान कमी तरी पडेल. अहिल्याबाईचा मासला पाहून, लोकांचा असा ग्रह झाला होता कीं, स्त्रियांच्या हातीं अधिकार जावा यांत आपलें कल्याण आहे. हा ग्रह, आरंभीं तुळसाबाईस पथ्यास पडला; परंतु तो लवकरच नाहींसा झाला. तिच्या हरएक कृत्याव रून, दिसून येऊं लागलें कीं, स्त्रीजातीचे जितके दुर्गुण तितके सर्व तिजमध्यें होते; परंतु त्या दुर्गुणांस मारक जे स्त्रीजातीचे सद्गुण, त्यांपैकीं मात्र एकही नव्हता. सर्वांत विशेष व्यंग हें होतें कीं, पूर्वी निष्कलंक गुणामुळें अहिल्याबाईस, आपल्या करण्यांत जो भरंवसा वाटत होता, तो तुळसाबाई मध्यें अर्थातच नव्हता.

मीनाबाईचें वर्णन पूर्वीं केलेंच आहे. मल्हाररावाच्या हिरकाबाईची ती कुणबीण होती; व तिजप्रमाणेंच तिणें, मानभावी अजीबापासून उपदेश घेतला होता. हल्लीं ती तुळसाबाईचें विश्वासपात्र झाली होती. मुख्यत्वें हांजी हांजी करून, व तीस गोड वाटणाऱ्या कृत्यांत साह्यभूत होऊन, मीनाबाईनें तुळसाबाईस आपल्या चांगल्या छापेंत आणिलें होतें. तिचें वय साठ वर्षांहून अधिक होतें; परंतु द्रव्य संपादण्याचा तिला मोठा हव्यास असे. जे जे तिची साह्यता मिळवूं पाहात, त्यां त्यांस, लाचलुचपत द्यावी लागे. अशा योगानें तिणें पुष्कळच रकम जमविली होती. ती कर्मठ असे खरी, परंतु आपल्या मानभावी पंथांत, सांगतलेले आचार मात्र ती चालवी; या-

मुळें अनादिहिंदुधर्मांत ज्या लोकांची भक्ति असे, त्या लोकांच्या त्रासास ती विषय झाली होती; कारण हे अस्सल हिंदु, त्या पंथास अधर्म समजतात. तथापि लोकांना खरे विचार लपवावे लागत होते; कां कीं आपला कोणी अपमान केल्यास, अथवा आपलें कोणी वाईट केल्यास, मीनाबाई तावडतोब सूड उगवी.

कारभारी बाळाराम शेट, जातीनें वाणी होता[१]. यशवंतरावाच्या रिसाल्यांत रसदेचा जो मोदीखाना असे, त्या मोदीखान्यांत प्रथमत: त्याजकडे, एक लहानसें काम होतें. पुढें तो जेव्हां पंजाबाकडे गेला तेव्हां, बाळारामास अमळ मोठी जागा मिळाली. हळू हळू त्याजवर यशवंतरावाचा इतका विश्वास बसला कीं, इंग्रज सरकाराशीं त्याणें जें तहाचें बोलणें केलें, तें त्याच्या मार्फत केलें.[२] हें काम पुरें पाडिल्या नंतर तर, तो आपल्या धन्याच्या अशा कृपेंत चढला कीं, कारभारीच झाला. या ग्रहस्थाच्या स्वभावांत कांहीं मऊपणा, कांहीं लबाडी, कांहीं चांगुलपणा, कांहीं राज्यलोभ, अशी खिचडी होती; यामुळें त्याकाळास, व त्याकाळीं त्यास जीं कृत्यें करावयाचीं होतीं, त्या कृत्यांस, तो विशेषच योग्य झाला होता. त्याच्या जवळ मालमत्ता कधींच नव्हती; तेव्हां, आपण नागविलें जाऊं ही, प्रथमपासूनच त्यास भीति नव्हती. जो कोणी, जें कांहीं पुसे त्यास, तो होय ह्मणून ह्मणे. मग अर्थातच, त्यानें दिलेलें वचन जरी क्वचितच खरें होई तरी, त्याच्या वर्तनांत, बाह्यदृष्टी दया व ह्रदयाचा चांगुलपणा दिसून येई; यामुळें लोक जरी फसत, तरी संताप पावत नसत. त्यावेळच्या प्रसंगांतील आवांतर लोकांपेक्षां तो, हमेष सर्वांस चांगला वाटे. वस्तुत: ही, इतरां-

---

१ याची अगरवाल्याची जात. याचें कूळ मुळचं हरियाणा प्रांतांतील नागोर गांवचं राहाणारें; परंतु याचा जन्म खानदेशांत मालेगांवीं झाला होता. निदान तेथें हा लहानाचा मोठा झाला.

२ इसवी सन १८०५ त होळकर व इंग्रज यांजमधील तहाचें बोलणें, मजशीं या कारभाऱ्यानें केलें.

पेक्षां तो चांगलाच होता. इकडे तर, तो जातीनें स्वभावाचा मऊ असल्यामुळें, तुळसाबाई व तीची सखी मीनाबाई यांशीं, आज्ञांकितपणानें, उजर न करितां, वागे; व तिकडे आवांतर लोक तर असें समजत कीं, त्यांच्या कुमार्गास, प्रतिबंध कायतो एक बाळारामच आहे. ऐन लष्करी फिसादांत वागावें लागत असतां, व बहुत करून जातीनें हमेष प्रतिबंधांत असतां, सर्व लष्कर त्याजवर दया ठेवी. जितका पैसा उभारवेल, तितका उभारून तो त्यांस देई; व देतांना बहुधा असें ह्मणून ठेवी कीं, आणखी कांहीं मिळालें तर तुमचेंच आहे. वास्तविक पाहतां, तो त्यांचा मध्यस्थ बनला होता. पुष्कळ वेळां, लष्कराचा तगादा सोडविला पाहिजे; तसें न करावें तर, ते अडदांड पुंडावा माजविणारे लोक आहेत; असें मिष करून तो, पैसा कोठूनतरी काढीत असे. राज्यकर्ती त्या तऱ्हेची; कारभारी या तऱ्हेचा; लष्करी कामगार रामदीनासारखा; खुद्द लष्कर बंडावी व बेशिस्त; तेव्हां, देशाची स्थिति कसी असेल याची सहज कल्पना करितां येईल. प्रजांचे हक्कही कोणी मानीत नसत, व राजांचे हक्कही कोणी मानीत नसत. जेथें तेथें जुलूमजबरीचा प्रसंग दृष्टीस येई. उघड मैदानावरचीं शहरें व खेडेगांवें, पैसा देई तोंपर्यंत लुटलीं जात. गांवांस कोट वगैरे असल्यास, ते फोडिले तोडिले जात. कांहीं लष्करी कामदारांनीं बाहेरून यश संपादून यावें; मग जसें त्यांणीं लोकांस बुच्छाडिलें तसें, त्यांहून जे सामर्थ्यवान असतील त्यांणीं त्यांस बुच्छाडावें. शिंदे, होळकर, पंवार, व पेंढारी यांच्या लष्करांमध्यें हमेष झटापटी व्हाव्या. राजपुतान्यांतील लोकांनीं व लुटारू सरदारांनीं, आपल्या प्रकृत हिताकडे पाहून, घटकेंत इकडे मिळावें, घटकेंत तिकडे मिळावें. लुटालुटींतच ज्या भिलांचा जन्म, त्यांणीं व्यवस्थित अधिकार कोणाचाच चालत नाहीं हें पाहून उत्तेजन पावावें; व आपल्या डोंगरी बच्यावाच्या जागा सोडून, लुटी मिळविण्याकरितां मैदानावर यावें. मैदानावरील खेडेगांवांतील वगैरे लोकांनीं निराश होऊन, गेलेल्या वित्ताच्या

मुवादल्याकरितां, आसपासच्या दुसऱ्या लोकांस बुडवाडण्याच्या इरादानें, आपणही धाडेकरी बनावें. एकंदर असा कारखाना माजला होता; परंतु अशी स्थिति फार काळ कशी राहूं सकते! हजारों लोकांना, हीं वातहतीचीं ठिकाणें सोडून, दुरदुरच्या देशीं पोटाची सोय पाहण्यास जावें लागलें. या काळीं झालेल्या सत्यानासापासून होळकरांच्या राज्यांतील एकही गांव सुटला नाहीं. धारकर व देवासकर पंवारांचा मुलूक, भोपाळवाले नवाबाचा मुलूक, व कांहीं अंशीं शिंदे व राजपूत राजेरजवाडे यांचा मुलूक, सर्व या सत्यानासाच्या फेऱ्यांत सांपडले होते. फकत एक राजपूतसंस्थानांपैकीं कोटयाचें संस्थान वांचलें. तें मात्र, सभोंवती नासाडी व पडापडी चालली असतां, संपत्तींत व भरभराटींत, वृद्धि पावलें. या गोष्टीचीं कारणें सन १८१८ पुढें सांगितलीं जातील. अशा या धांदलीच्या ऐन प्रसंगांत, यशवंतरावाचा भानपुऱ्यास काळ झाला. तुळसाबाईस तर लेंकरूं नव्हतेंच; पण केसराबाई ह्मणून यशवंतरावास आणखी एक स्त्री होती[1], तिला मुलगा झाला होता; व त्याचें मल्हारराव होळकर असें नांव ठेविलें होतें. या मल्हाररावास, यशवंतराव जिवंत असतांच, तुळसाबाईनें आपल्या मांडीवर घेऊन वाढविलें होतें. मग बाप मरतांच, मल्हाररावास गादीवर बसविलें; व सर्व लोकांनीं त्याचा हक्क मानिला. कोटयाचा कर्ता प्रतिनिधि जालिमसिंग, यावेळीं या तरुण राजास नजराणा देण्यास, खुद्द जातीनें भानपुऱ्यास आला.

यशवंतराव मेल्यानंतर दोन महिन्यांनीं, तुळसाबाईच्या अधिकाराविरुद्ध, एक फिसाद माजला. या फिसादाचें मूळकारण दौलतराव शिंदा होता असें ह्मणतात. जोतिबामान्या ह्मणून त्याचा कोणी एक नातलग, तरुण मल्हाररावाच्या नोकरींत शिरला असे; त्याच्या द्वारें दौलतरावानें, जगोबापूच्या हुकुमतीखालील तीन पलटणी, फितविल्या. तुंबलेल्या पगाराचा तगादा करण्याच्या मिषानें,

१ हल्लींच्या राजाची आई केसराबाई कुंभार कुळांतली आहे.

वस्तुतः आंतून ठरविलेला बेत सिध्धीस नेण्याच्या इराद्यानें, या पलटणी भानपुऱ्याकडे चालत्या झाल्या. या बेतांत वरकांतीं अग्रगण्य, होळकरांच्या कुळांतील पुण्यास जो मल्हारराव मारला गेला होता, त्याची बायको यमाबाई, व खुद्द यशवंतरावाची बायको लाडाबाई, या दोघी स्त्रिया होत्या. यत्पक्षी लोकांचा असा बेत ठरला होता कीं, जलैनचा जाहागीरदार आनंदराव होळकर ह्मणून होता त्याचा मुलगा महिपतराव[१], लाडाबाईनें मांडीवर घ्यावा. ते लोक ह्मणूं लागले कीं, केवळ स्वहितमात्र साधण्यास उत्सुक अशा दुष्ट लोकांच्या जुटानें, गादीवर बसविलेल्या अनौरस बापाच्या अनौरस मुलापेक्षां, औरस आनंदरावाच्या वंशांतील औरस महिपतरावाचा, गादीवर विशेष हक्क पोहोंचतो. हें कूट उघडकीस येतांच मोडलें. यावेळीं गफूरखानानें फार अध्वर्यूपणा घेतला; व त्याणें जिकडे तिकडे असें जाहीर केलें कीं, अमीरखानाच्या वतीनें तरुण मल्हाररावाचा मी संरक्षक आहें. मग त्यास होळकरांचे सर्व कारभारी लोक येऊन मिळाले इतकेंच नाहीं; तर जालिमसिंग अजून भानपुऱ्यास होता, तोही येऊन मिळाला. आतां जगोबापूच्या पलटणींस प्रथमतः मागें हटावें लागलें; नंतर त्यांचीं शस्त्रें जाऊन, त्या लुटल्याही गेल्या. वर लिहिलेल्या खटाटोपांत, यमाबाई आणि लाडाबाई यांचा वस्तुतः फारच थोडा हात होता. तथापि, त्यांस देहांत शिक्षा झाली. जोतीबा माने पळाला; परंतु त्याचा माल असबाब सर्व पकडला गेला, व लुटला गेला. आणखी किती एक लहानसहान अपराध्यांचीं

---

१ महिपतराव सतरा वर्षांच्या वयाचा होता. कूट मोडलें असें पाहून, तो खानदेशाकडे पळाला. पुढें त्याणें तेथें लोकांची जमवाजमव करण्याचा यत्न मांडिला; परंतु त्याणें जमविलेल्या थोड्या लोकांवर, बाळारामशेटाचा भाऊ रामदास याणें हल्ला केला; व त्यांस पराजित केलें. होळकरांच्या गादीवर या दावाकरणाराचें पुढें काय झालें हें समजत नाहीं. परंतु लोक असें ह्मणतात कीं, तो दक्षिणेंत विपत्तीमध्यें दिवस काढीत आहे.

डोकीं उडविलीं. जगो बापूस फार काळ सख्त बंदी भोगावी लागली. याहून विशेष त्यास शिक्षा झाली नाहीं याचें कारण, तो जातीनें ब्राह्मण होता हें बहुधा असल.

आतां लष्कर वारंवार दंगे करूं लागलें, व त्यांपासून भीति उत्पन्न होऊं लागली; ह्मणून गणपतराव दिवाणानें शिंद्याकडे जाऊन बोलणें लाविलें कीं, या वेळीं द्रव्याची मदत दिल्यास, होळकर सरकारच्या राज्याचा कांहीं भाग, आह्मी गहाण लावून देऊं. दौलतरावानें हें बोलणें मोठ्या संतोषानें ऐकिलें. खरोखरीच, होळकरांच्या दरबारीं आपलें वर्चस्व स्थापन करण्याभावीं, अशा तऱ्हेचें हरएक बोलणें तो अशाच संतोषानें ऐके. मग लागलीच त्यांची कलमबंदी ठरली; व गणपतराव दिवाण, शिंद्याच्या लष्करांतील सावकारांच्या मुख्य मुख्य गुमास्त्यांस बरोबर घेऊन, परत निघाला. या गुमस्त्यांना शिंद्याची अशी ताकीद होती कीं, कलमबंदींत ठरलेल्या प्रांताचा आपल्या नांवानें रोखा झाला, व तो आपल्या ताब्यांत आला, ह्मणजे, होळकरांच्या लष्कराचा तुंबलेला पैसा देऊन टाकण्याची, तजवीज करावी. हा बेत सिध्धीस गेला असतां, आपलें व आपल्या धन्याचें वजन जाईल, हें गफूरखानानें ओळखून, व आपल्या मित्रांची, व त्यांतही विशेषेंकरून तात्याजोगाची, सलाह घेऊन, अमीर खानास असें लिहून पाठविलें कीं, यावेळीं आपलें व होळकरांचे हित राखण्याकरितां, आपण जोतपुराहून अवश्य निघून यावें. मग तो पठाणांचा सरदार अमीरखान, जलदीकरून, दरबारीं येऊन पोंहोंचला; व त्याणें, पहिलीं झालेलीं बोलणींचालणीं सर्व मोडून टाकिलीं.

अमीरखानानें तुळसाबाईस सांगितलें कीं, लोक, तुमची चाल वाईट आहे ह्मणून, मजजवळ बोलतात. हें ऐकून तुळसाबाईस मोठा क्रोध चढला; व तात्या जोगाच्या शत्रूंनीं[1] तिचे असे कान

१. तात्या जोगावर तुळसाबाईचा राग होण्यास तात्या आळेकरच मुख्य कारण होता.

भरिलें कीं, या आरोपाचें मूळ तात्या आहे. मग लागलीच तुळसाबाई-नें त्याचा प्राण घेण्याचा इरादा केला. तिच्या तडाक्यांतून, केवळ, मित्रमंडळीच्या सावधपणानें व निश्चयबुद्धीनें, तो सुटला. मग तो तावडतोव कोटचाकडे रवाना झाला; व तेथें कित्येक महिने राहिला. इकडे अमीरखान राजपुतान्याकडे परत गेल्यानंतर, शिंद्याची मदत घेण्याविषयींचा बेत, दरबारीं पुनः उभा राहिला; व बाळाराम शेट आणि मीनाबाई यांच्या संमतीनें, तात्या आळेकर ग्वाल्हेरीकडे रवाना झाला. त्याणें शिंद्याशीं अशी कलमबंदी ठरविली कीं, चोवीस लक्ष वसुलाचा मुलूक लावून दिला असतां, तुह्मी सालीना चोवीस लक्ष रुपये, रोख पाठवीत जावे. ही दुसरी कलमबंदीही पहिल्या कलमबंदीप्रमाणें फसली. तसें होण्यास अनेक कारणें झालीं. मुख्यत्वेंकरून हें कारण झालें कीं, सर्व लष्कर एकदम बंडावलें; व त्याणें तुळसाबाईस, (मल्हारराव बरोबर घेऊन), प्रथमतः, गफूरखा[१]नाच्या डेऱ्यावर पळून जाण्यास लाविलें. नंतर तेथूनही, लष्कराच्या अकांतांतून सुटून जाण्यासाठीं, तिला गंगराडच्या किल्ल्यांत आश्रयास राहणें भाग आलें. हा किल्ला होळकरांच्या ताब्यांतील खरा, परंतु तूर्त कांहीं दिवस, जालिमसिंगाकडे लावून दिला होता.

जालिमसिंगानें आपली वजनदारी खर्च केल्यामुळें, तात्या जोग कोटचाहून दरबारीं परत आला; व पुनः सरकारी कामांत बरेंच प्रमुखत्व घेऊं लागला. आतां मीनाबाईनें, त्यास व आणखी कितीएकांस पकडून, लुटून घेऊन, लष्कराचा तुंबलेला पगार द्यावा; व राज्यकारभार रामदीनाकडे सोंपावा; असी आंतून मसलत केली. या नवीन संकटांत, फिरून तात्याच्या नाशाची वेळ आलीच होती; परंतु तो थोडक्यानें सुटला. रामदीन या वेळीं नुकताच आपल्या पलट-

१. तुजवर संकट आलें आहे असें, या प्रसंगीं, तात्याजोगास प्रथमतः गफूरखानानें सुचविलें. व पळून जाण्यांत त्याणें त्यास मदतही दिली.

णी घेऊन गंगराडेस येऊन पोंचला होता; व त्याणें आपल्या भावासही बरोबर आणिलें होतें[1]. त्याचा भाऊ, केवळ जातीनें मालदार होता इतकेंच नाहीं; तर, कांहीं मोठाल्या परगण्यांचा इजारदारही असे. यामुळें उज्जनीच्या कितीएक महत् श्रीमान् व्यापाऱ्यांशीं त्याचा संबंध असे. मीनाबाईनें ठरविलेल्या मसलतीप्रमाणें सदलाबदल करण्यास, जें लष्कर अनुकूल होतें त्यास, आपला तुंबलेला पगार मिळेल, व पुढेंही पगारास अडचण होणार नाहीं, अशी खातरनिशा देण्यासाठीं, वर सांगितलेल्या उज्जनीच्या सावकारांपैकीं एकजण, रामदीनाच्या भावाबरोबर आला होता[2].

सर्व दरबारांत गुप्तवृत्तें असतातच. हिंदुस्थानाच्या प्रत्येक दरबारांतील गुप्तवृत्तें उघडकीस आणिलीं तर; कूष्मांडांचे खटाटोप, व व्यभिचारांचे विचित्र प्रसंग, दृष्टोत्पत्तीस येतील. या काळीं होळकरांच्या दरबारीं, इतकीं दुष्ट व निर्लज्ज कृत्यें घडून येत असत कीं, त्यांस तुळितां, दुसरें उदाहरण सांपडणार नाहीं[3].

---

१. रामदीनाच्या भावाचें नांव मखनलाल; याला बहुधा जोशी ह्मणत. हा चांगला पढीक होता, व कामकाजही चांगलें जाणे. धूळधाणीच्या प्रसंगांत, पुष्कळ दिवस प्रमुखपणा घेतल्यापासून, व दुसऱ्याही कारणांपासून, याजवळ बरेंच वित्त झालें असे. पुढें दौलतराव शिंद्यानें यास कबूल केलें होतें कीं, जर तूं माझी (मालकम साहेबाची) संमति आणशील तर, तुजकडे मुलकी मामल्याचें काम सांगेन. माझी संमति मिळण्याकरितां, मखनलालानें हरएक प्रयत्न योजिला; परंतु त्याच्या वाईट गुणांमुळें मी ती दिली नाहीं.

२. मखनलालाबरोबर गंगराडेस गेलेल्या सावकाराचें नांव भगवानदास. हा संपत्तिमान् व अब्रूदार गृहस्थ आहे.

३. यशवंतरावाच्या व्यभिचारवृध्धीस आड येईल असें कांहीं नव्हतें त्याची मर्जी संपादण्याकरितां, आपल्या घरच्या बायकामाणसांची अब्रू नाहींशी करावी, हा दरबारीलोकांचा असाधारण क्रम होता

तुळसाबाईच्या व्यभिचाराची गोष्ट प्रसिध्ध होती; परंतु गणपतराव दिवाणाशीं तिचा जो पापसंबंध जडला व प्रसिध्धि पावला, त्यापासून अत्यंत महत्वाचे परिणाम घडून आले. तुळसाबाईचें त्याजवर जडलेलें प्रेम, उत्तेजन देऊन वाढविण्यास, व अशा योगानें आपल्यास व आपल्या पक्षास भय नाहीं असें करण्यास, गणपतराव दिवाणास, तात्या जोगानें आंतून मसलत दिली, असा लोकापवाद आहे. यांत संशय नाहीं कीं, या बाबतींत किती सावधपणानें राहाणें भाग आहे हें, गणपतराव व तुळसाबाई या दोघांसही ठसवून देण्याविषयीं, त्याणें प्रयत्न केले. या संबंधापासून गणपतरावाचें हवें तसें चालूं लागलें; व त्यामुळें तात्यास व तात्याच्या मित्रांस अधिकार प्राप्त झाला; तेंव्हां, हा संबंध तुटावा असें बहुधा त्याच्या हृदयांत नसेल. गणपतरावानें व तुळसाबाईनें आतां, प्रथमतः, मीनाबाईची धूळधाणी उडविण्याचें मनांत आणिलें. तुळसाबाई तर, आपल्या कामवासनेची बटीक झाली होती; व आपल्या आषिकावर तिचें बेहद्द प्रेम बसलें होतें; ह्मणून तिची या कामीं, कांकूं केल्यावांचून, कबुलायत मिळाली. गणपतरावाच्या सांगणीवरून, आपल्या पूर्वींच्या सखीस, तिणें आतां कैद केलें.

यावेळीं तात्या आळेकर, शिंदेसरकारचे कांहीं कामगार लोक व कांहीं सावकार लोक बरोबर घेऊन, परत येत होता. मागें सांगितलेल्या कलमबंदींत ठरल्याप्रमाणें, लागेल तो पैसा आगाऊ देण्यास, व शिंद्यानें कबूलकेल्याप्रमाणें सालीना मिळत जाईल असी खातरजमा करण्यास, हे लोक आले होते. रस्त्यांत कोटयास आळेकरास बातमी लागली कीं, आपली मुख्य साह्यकारी मीनाबाई कैदेंत पडली

---

असें नाहीं. यशवंतराव व गणपतरावदिवाण यांच्या सख्याची मुख्य कडी, गणपतरावाची सुंदर बायको होती असें ह्मणतात. ज्या काळाविषयीं मी लिहीत आहें त्या काळीं, याच बाईनें, उघड रीतीनें, तात्याजोगाशीं संबंध जोडला होता. तिचा नवरा व तात्या यांच्या सख्यासही मुख्य कारण तीच होय.

आहे; व ज्या रामदीनावर आपला अत्यंत विश्वास, तोही बंदींतच आहे. आपल्या स्वार्थाकरितां बरोबर आणिलेलें द्रव्य, रामदीनास प्रतिपक्षाच्या स्वाधीन करावें लागलें होतें; व त्या प्रतिपक्षानें, लष्करांतील सर्वांहून जास्त दंगेखोर जे स्वारलोक, त्यांच्या ताब्यांत, त्यास पगाराच्या फेडीसाटीं वली ठेविलें होतें.

हीं वृत्तें झाल्यावर, गंगराडच्या किल्ल्यांतून तुळसाबाई, आपल्या लष्कराच्या छावणींत आली; व तिणें त्या लोकांस खर्चाऐवजीं कांहीं पैसाही दिला. मग थोड्या दिवसांनीं सर्व लष्कर पावसाळ्याकरितां, काळी सिंदनदीच्या कांठीं, मक्षी गांवीं, छावणी करण्यासाठीं निघालें. लष्करावरोबर रामदीन व मीनाबाई यांसही बंदीत घालून नेलें. रामदीनास मोकळें करण्याबद्दल वादविवाद होऊन, तात्याजोग व गफूरखान यांजमध्यें वितुष्ट आलें. खेरीज गफूरखानानें तात्या आळेकरास आश्वासन दिलें; व त्यामुळें तो कोटयाहून पुढें आला; व तुळसाबाईस अधिकारावरून दूर करून, मीनाबाईस तिच्या ठिकाणीं स्थापण्याची मसलत करूं लागला. हें पाहून वर लिंहिलेलें वितुष्ट वृद्धि पावलें. आळेकराच्या खलवतांत, बाळारामही सामील झाला. त्याचे मित्र ह्मणतात कीं, गणपतराव आणि तुळसाबाई यांजमधील उघड व निर्लज्ज संबंधापासून, होळकरांच्या कुळास जो कलंक आला तो न साहून, बाळाराम या प्रमाणें वर्तला. परंतु या वेळीं तुळसाबाई व तिचा प्रियपात्र हे, कर्ता पुरुष जो तात्याजोग त्याच्या मसलतीनें, चालत होते. गणपतरावास तर जातीचें शाहाणपण नव्हतेंच. आतां तात्या जोगानें असी मसलत केली कीं, मीनाबाईस

१ मेजर ऑग्न्युचें तात्याजोगाशीं, दिवाणाविषयीं जें संभाषण झालें, त्यांत तात्या ह्मणाला कीं, "जातीनें गणपत पुळपुळीत, तुच्छ मानण्यास योग्य असा पुरुष आहे." तात्या जोगाच्या या बोलण्यावरून बऱ्याच अंशीं सिद्ध होतें कीं, जों वेळपर्यंत तुळसाबाई व गणपतराव, त्याची मसलत घेत तीं वेळपर्यंत, ते हा ह्मणेल तसें करीत.

तावडतोब तेथून काढावें. हा वेळपर्यंत जरी कैदेंत होती तरी, तिला बरीच मोकळीक असे; व तिचा मानही बराच ठेविला असे. परंतु आतां गणपतराव तिला मारावें ह्मणून ह्मणूं लागला; व त्याच्या सखीच्यानें ना ह्मणवेना. ज्या स्त्रीवर तिणें इतके दिवस भक्ति ठेविली होती, त्या स्त्रीस आतां लोकांनीं रात्रीं, जबर तुफान चाललें असतां, व पावसाची झड लागली असतां, फरफरां ओढीत गंगराडेस नेलें. तिणें पुष्कळ विनवणी केली कीं, मला अखेरीस एकदां तरी आपल्या धनिणीस पाहूं द्या. परंतु कोणी ऐकेना. शेवटीं तिणें असा आक्रोश मांडिला, व ती अशी हातांपायां पडूं लागली कीं, लोकांनीं तीस तुळसाबाईच्या डेऱ्याच्या दरवाज्या पावेतों नेलें. तेथें ती क्षणभर तरी मला आंत घ्या ह्मणून ह्मणूं लागली; परंतु त्या वज्रहृदयी तुळसाबाईनें मीनाबाई अगदीं जवळ उभी असतां, गणपतरावाच्या सांगणीवरून, सर्वांस ऐकूं जाईल असा मोठ्यानें हुकूम केला कीं, "तिला आंत येऊं

---

परंतु तात्याचे मित्र असें नव्हतें ह्मणून ह्मणतात. त्याच्या अत्यंत विश्वासांतील कामगार जो रावजी त्र्यंबक त्यास एकदा मी ह्मटलें कीं, कायहो! गणपतराव पुेळपुळीत पुरुष असेल व यामुळें तात्या जोगाच्या हातीं केवळ बाहुल्या सारिखा असेल नव्हे! तेव्हां त्याणें झटकन् उत्तर केलें कीं, गणपत अशा अर्ध वेड्या, अर्ध शाहाण्या मंडळींतला आहे कीं, त्याशीं वागणें अथवा त्यास वागविणें, महा कठीण काम आहे. असे लोक बहुतेक गोष्टींत सांगावें तसें करितात; परंतु केव्हां केव्हां दुसऱ्याच्या सांगण्यांत, आपली कांहीं तरी अशी शकल घुसमटतात कीं, त्यामुळें साऱ्याचा विघाड होतो. या खेरीज तो आणखी ह्मणाला कीं, दिवाण हमेषा केवळ तुळसाबाईस संतोष देण्यासाठीं वागत असे. तुळसाबाई, जरी गोड, व मनहरण करणारी, व केव्हां केव्हां चतुर बोलणारी होती तरी, ती कामकाजांत फारसें समजत नव्हती. तिचा स्वभावही फार जालिमी होता, तो तिच्यानें आंवरत नसे; यामुळें वारंवार तिच्या हातून फार दुष्टकृत्यें घडलीं.

देऊं नका. घेऊन जा." मग प्रथमतः मीनाबाईस गंगराडेस नेलें, व तेथून विजलपुरास नेलें.[1] या गांवीं येऊन, कांहीं दिवस जों स्वस्थता मिळत आहे तोंच, खासपागेतील कांहीं कामगार लोक, बऱ्याच ऐवजाची हुंडी तिजवर घेऊन आले. त्यांस असा हुकूम होता कीं, ही रकम मीनाबाईपासून हरतऱ्हेनें उगवावी. मग तऱ्हतऱ्हेच्या यातना त्यांणीं तीस दिल्या; परंतु तिणें, प्रथमपासूनच, एक रुपया सुद्धां देणार नाहीं ह्मणून सांगितलें. मजजवळ द्रव्य नाहीं असें ती ह्मणाली नाहीं. ती इतकेंच वारंवार त्यांस ह्मणे कीं, मला तुह्मीं तुळसाबाईकडे न्या; आणि मग जर तिला खुद्द दाहालक्ष रुपये लागले तर, मी देण्यास तयार आहे. परंतु तुळसाबाईची व तिची भेट न होऊं देणें हेंच, तिच्या शत्रूंना पाहिजे होतें. त्यांणीं तें कांहीं एक न ऐकितां, पुनः यातना देणें सुरू केलें. अखेर त्यामुळें त्यांचा खरा हेतु सिद्धीस गेला. भुकेनें व यातनांनीं व्याकुळ होऊन, मीनाबाईनें विष घेतलें; व आपल्यास संकटांतून मुक्त केलें. आपल्या वैऱ्यांस, आपल्या जवळील कौडीचा फायदा न होऊं देण्याचा निश्चय, तिणें पार पाडिला.[2]

---

१. विजलपूर इंदुराहून सरासरी दीड कोश आहे. हा गांव मीनाबाईस दिला होता. तिणें आपला गुरु हऱ्यावा यास दिला. हा गांव अझून त्याजकडे चालत आहे. हऱ्यावा थाटानें राहतो, परंतु हल्लीं या गांवापासून त्याची प्राप्ति कमी झाली आहे. हा महंत मीनाबाईच्या या शेवटल्या सफरींत तिच्या बरोबर होता.

२. मीनाबाईच्या द्रव्यांतून कांहीं एक सांपडलें नाहीं. तिणें तें निर्भय राहावें ह्मणून, होळकरशाईच्या बाहेर पोंचविलें होतें. त्यापैकीं बराच मोठा भाग, अझून अजमीर येथें किसनगीर नांवाच्या सावकारापाशीं आहे, असें लोक मानितात. तात्या जोगाची पक्की खातरी झाली आहे कीं, या सावकाराजवळ त्यापैकीं पुष्कळ रकम आहे. त्याणें तीं परत घेण्याविषयीं पुष्कळ यत्नही केले; परंतु कांहीं निष्पन्न झालें नाहीं.

हें वृत्त घडल्यानंतर लवकरच, होळकरांचें सर्व सैन्य पुनः बंडावलें; व कहर करून देऊं ह्मणून, धास्ती घालूं लागलें. यामुळें तुळसाबाईस छावणी सोडून, मोठ्या मुष्किलीनें पळून जावें लागलें. मग तिणें पुनः गंगराडच्या किल्ल्याचा आश्रय केला. थोड्याच दिवसांपूर्वीं, हा किल्ला जालिमसिंगानें परत दिला होता.[१]

गंगराडेस पोहोंचल्यावरावर, तुळसाबाईनें निश्चय धरून, कराराचे यत्न मांडिले. तोफखान्यांकडील लोक, व पायदळांच्या कांहीं टोळ्या, अझून तिच्या पक्षांत होत्या. तोफखान्यांच्या दराऱ्यानें, गफूरखानाच्या लोकांखेरीज, व आणखी एका लहान टोळी खेरीज, आवांतर मुसलमानांस तिणें, छावणीपासून लांब जाऊन राहणें भाग आणिलें. व असा जाहीरनामा प्रकट केला कीं, एकंदर लष्करांत सर्वांहून मुसलमानलोक विशेष फंद माजविणारे आहेत. यासाठीं, यापुढें होळकर दरबारांत हिंदुलोक मात्र नोकरीस ठेवावे. या जाहिरनाम्याचें वस्तुतः खरें कारण असें होतें कीं, मुसलमान लोक केवळ मुशाहिऱ्याच्या लालचीनें मात्र नोकरी करीत असून, सारे अमीरखानाच्या पक्षांतील असत. आणि अमीरखानास तर या प्रसंगीं, तुळसाबाई आपल्या शत्रूंत मुख्य, गणीत असे. हा जाहीरनामा प्रकट झाल्यावर, तुळसाबाईचा अधिकार बुडविण्यास लोकांनीं वळकट यत्न केला. दरुण मल्हारराव हातीं असल्यामुळें क्काय तें तिचें सामर्थ्य; तेव्हां, लोकांनीं अशी मसलत केली कीं, अगोदर मल्हाररावासच तिच्या कबजाबाहेर काढावें. या मसलतींत पायदळ पलटणीच काय, तोफखानाही सामिल झाला. मग तात्याजोग व गणपतराव यांच्या घरांवर पाहरे लागले. त्यांस तर याप्रकरणाची चाहूलही समजली नव्हती. आतां गणपतराव दिवाणास बंदी प्राप्त झाली; परंतु तात्या जोग चाळीस लो-

---

१. या परगण्याचा जालीमसिंगानें इजारा केला होता; परंतु पुढें फारच जास्त रकम मागूं लागले ह्मणून, त्याणें तो सोडिला.

कांनिशीं निसटून, तुळसाबाई राहत होती तेथें, गंगराडच्या किल्यांत गेला. तेथें त्याणें लागलीच किल्ला संभाळण्याची तजवीज मांडिली. या प्रसंगीं तुळसाबाईच्या कृपेंत, जोतीबा नाईक ह्मणून पागेकडील कामदार होता त्याणें, तिला मदत देण्याचा यत्न आरंभिला. हें जोतीबास भूषण आहे. तुळसाबाईवरील प्रसंगाची वार्ता ऐकतांच, तो दोनशें लोक बरोबर घेऊन, छावणींतून गांवांत आला; व किल्ल्याची तटबंदी अमुक ठिकाणीं सकल आहे असें पाहून, तेथें शिड्या लावून, वर चढला; व कशाही तऱ्हेचा अटकाव न मोजितां, किल्याच्या बाहेरच्या वेशीपर्यंत जाऊन पोहोंचला. किल्ल्यांत फिसादी लोकांचे पाहरे होते, त्यांवर त्याणें एकदम छापा घालून, अशा रीतीनें हल्ला केला कीं, पाहारेकऱ्यांपैकीं बहुतेक लोक या मेले, या जखमी झाले. तुळसाबाई व तात्या जोग यांणीं, मोठ्या उत्साहानें त्याचें आगत स्वागत केलें. तो आंत शिरला तेव्हां, तुळसाबाई नागवा जंबिया हातीं घेऊन, मल्हाररावाजवळ बसली आहे असें, त्याणें पाहिलें. ज्याच्या नांवानें मी अधिकार चालवितें, त्याला मजजवळून लोकांनीं घेऊन जावें यापेक्षां, जंबिया भोसकून त्यास मारून टाकावें असा, मी निश्चय केला आहे ह्मणून ती ह्मणाली. परंतु आतां धास्ती धरण्यास कोणतेंच कारण राहिलें नाहीं. जोतीबाचा सपाटा पाहून, पायदळ पलटणीस इतकी दहशत बसली कीं, ते लोक तावडतोब आपल्या छावणींत निघून गेले; व गंगराडचा गांव फक्त पागेकडील स्वारांच्या हातीं राहिला. हे पागेचे स्वार, झगड्याची वार्ता ऐकतांच, तुळसाबाईच्या मदतीकरितां भरधांव निघून आले होते. गफूरखानही एका वेशीपर्यंत येऊन पोहोंचला होता; परंतु बंड उठविण्यास तो कारण असावा असा त्याजवर संशय होता (तो संशय यथार्थ होता) ह्मणून, तुळसाबाईकडील लोकांनीं, तेथून निघून दूर जाण्यास त्यास ताकीद दिली. व तोही ताकीद ऐकून, छावणींत आपल्या डेऱ्यास परत गेला.

अशा रीतीनें हा फिसाद प्रस्तुत मिटला. परंतु त्यांत तोफखाना व पायदळ सामील होण्यास, जीं प्रयोजक कारणें झालीं होतीं तीं अद्याप जशींचीं तशींच राहिलीं. हे लोक पहिल्याप्रमाणेंच तुंबले-ल्या पगारा करितां गवगवा करीत राहिले; व गणपतरावाची कैद विशेष सक्त केली असतां, पगाराची फेड लवकर होईल असें जाणून, त्यांणीं तसें केलें. त्यांणीं खूप अंदाज बांधिला होता! गणपतरावाची स्थिति ऐकून, तुळसाबाईस चैन पडेना. दिवाणाची, हरप्रयत्न करून सुटका करविण्यासाठीं, तिणें तात्या जोगास विनवून, त्या कार्यासाठीं बऱ्याच रकमेचे दागदागिने त्याच्या स्वाधीन केले. ते दागदागिनें मोडून, व आणखी थोडेंबहुत द्रव्य यत्नानें जमा करून, तात्यानें लष्कराची समजूत पाडिली. मग, त्या दंग्यांत सामील झालेले,अजमासें तीन हजार लोक होते, त्यांणीं, गणपतरावास बंदींतून सोडून, आपल्या जवळील तोफा व हत्यारें टाकून देऊन, आणि आपल्या जिवास व वित्तास धोका नाहीं अशा विषयीं आश्वासन घेऊन, नोकरी सोडिली; आणि ते उत्त-राहिंदुस्थानांत आपआपल्या गांवीं गेले.

वर लिहिलेल्या लोकांनीं कशा तऱ्हेनें दंडेली उपाय योजून, आप-ल्या तुंबलेल्या पगाराची फेड करून घेतली हें पाहून, होळकरांच्या लष्करांतील बहुतेक पायदळ पलटणी गंगराडेस आल्या.[1] मग पुनः दंग्यांस व फिसादांस आरंभ झाला. त्या लोकांस बाळारामानें चेत-विलें असावें, असा किती एकांस संशय आला होता. व आतां हल्लीं येऊन पोहोंचलेल्या पलटणींच्या कामगारांसही, गवगवा करण्यास, तोच चेतवितो असें ते ह्मणूं लागले. हीगोष्ट खरी होती, किंवा लोकांनीं त्यास

---

१ ठाकुरदास सांगतो कीं, वर लिहिलेले फिसादी शिपाई आप-आपल्या घराकडे निघून गेले. या गोष्टीस दाहा दिवस झाले नाहींत तोंच रोशनबेग, रोशनखान, आणि हुसेनअल्ली, या तीन कामगारांच्या तीन पलटणी, गंगराडेस येऊन पोहोंचल्या.

बुडविण्याच्या निश्चयानें कंडी उभारिली होती, याचा चांगला पत्ता लागत नाहीं बहुधा कंडीच असावी असें वाटतें. अमीरखानाचें त्यास पाठवळ असे; तात्या आळेकराशीं त्याचा संबंध असे; (आळेकर पळून गेला होता खरा, तथापि त्याची लोकांस धास्ती होतीच) व गफूरखानाशीं त्याचें हमेश खलवत राहे; यामुळें ज्या पक्षाच्या हातीं प्रस्तुत सत्ता होती, त्या पक्षास असें वाटण्यास कारण होतें कीं, बाळाराम पुनः काम पाहूं लागला असतां, आपला अधिकार कायम राहणार नाहीं. त्याणें काम पाहावें, व आपली सत्ता तर कमती न्हावी असी जडण कोठून बसणार, हें मनांत आणून, ते त्याच्या नाशास प्रवर्तले असावे. तथापि केवळ त्याच्या जिवावर येऊन बेतावें असें न्हतें. परंतु त्याणें कितीएक वेळा तुळसाबाईस असें खरपुस बोलून दाखविलें होतें कीं, तुमचें दिवाणाशीं उघड रीतीनें पापसख्य आहे, याची सर्व हिंदुस्थानभर टिमकी होऊन, होळकरांच्या कुळास लज्जा व कालिमा प्राप्त झाली आहे. अशा बोलण्यांनीं बाळारामानें तुळसाबाईचा द्वेष संपादिला होता[1]. ह्मणून आतां त्यास मृत्यूची शिक्षा मिळाली. तिणें त्यास शिक्षा दिली असें न ह्मणतां, तिणें त्याचा खून केला असेंच ह्मटलें पाहिजे. त्या खुनाच्या प्रसंगीं ज्या गोष्टी घडून आल्या त्यांवरून, बाळारामाच्या शब्दांनीं ती किती फणाणली होती, हें दिसून

---

१ या गोष्टीविषयीं ठाकुरदासास मी विचारिलें तेव्हां, त्याणें तुळसाबाईचें बाळारामाशीं हाडवैर होण्यास तीन कारणें सांगितलीं.— पहिलें कारण हें कीं, त्याच्या फिसादी मसलतीनें गणपतराव दिवाण फार संकटांत आला होता. दुसरें कारण हें कीं, हिंदुस्थानी स्वारलोकांशीं त्याचें आंतून बोलणें चालणें असून, त्याणें त्यांस आपल्या पक्षास अनुकूळ करून घेतलें होतं. व तिसरें कारण हें कीं, तिच्या वाईट चालीवर उघड दोष देऊन, ती चाल टाकून देण्यास त्याणें उपदेश केला होता.

येतें. लोकांचा पुंडावा सुरू झाला त्यावेळेपासूनच त्याजवर डोळा ठेविला होता, व त्यास गंगराडच्या बाहेर जाऊं दिलें नव्हतें. तथापि सख्त कैद ह्मणून, मरणापूर्वीं तीनच दिवस त्यास भोगावी लागली. एके दिवशीं मध्यान्हीच्या सुमारास, तुळसाबाईचें त्यास बोलावणें आलें. ती गणपतरावास व कांहीं चाकर लोकांस घेऊन, त्याची वाट पाहात बसली होती. बोलाविलें आहे ह्मणून निरोप आला तेव्हां, बाळाराम निजला होता. अधले दिवशीं झालेलें वृत्त, मध्यरात्रीचा समय, व बोलावयास आलेल्या जासुदांचीं भाषणें, या सर्व गोष्टी मनांत आणि-ल्यावर, कशासाटीं बोलवितात कोण जाणे, असा त्यास संशय उभा राहिला. त्याच्या घरचीं माणसेंही घाबरलीं, व बायकोनें तर डोळ्यांतू-न आंसवें काढून त्यास विनविलें कीं, कांहीं करा, परंतु एवढा हुकूम तुह्मीं ऐकूं नका. त्याणें तीस बाजूस सारिलें व सांगितलें कीं, हा अकांत पुरे कर; व हुकूम तोडल्याचा गुन्हा मजकडून करवूं नको. तथापि तुळ-साबाईसमोर तो आला तेव्हां, त्याणें आपला जीव वांचविण्याविषयीं पुष्कळ विनंति केली. तो असें ह्मणाला कीं, ज्या मजपासून बुछाडून घेण्यास वित नाहीं; व जो मी आपली वजनदारी खर्च करून फिसा-दीशिपायांना शांत करूं सकतों; त्या मला मारून हांसिल कोणतें ! थोडे दिवस मला वांचवा तर खरा, आणि मग प्रत्यय पाहा कीं, लष्करांत जो बळकट फिसाद उठला आहे तो, मी बंद करूं सकतों कीं नाहीं ! हें बोलणें ऐकून, उत्तर करितांना, तुळसाबाईनें त्याज-वर पुष्कळ आरोप टेविले, त्याची पुष्कळ निंद्रा केली, त्यास पुष्कळ शिव्या दिल्या, आणि आतांच जीं संकटें मजवर आलीं होतीं त्या सर्वांचें मुख्य कारण तूं होतास असें ह्मणाली.[१] "तुह्मी ह्मणतां त्या

---

१ अवंतर गुन्ह्यांत हा एक गुन्हा तुळसाबाईनें त्याजवर लाविला कीं, रोशनबेगानें केलेला गवगवा आपणास पसंत आहे असें दाख-विण्याकारितां, तूं त्यास खिलत पाठविली.

गोष्टी मी केल्या नाहींत" असें त्याणें पुष्कळ सांगितलें, परंतु व्यर्थ. तिणें एकदम हुकूम दिला कीं, "याचें डोकें उडवा." दोघे शिपाई जवळ उभे होते त्यांस गणपतरावानें विचारिलें कीं, बाईसाहेबांनीं केलेला हुकूम तुह्मांस ऐकूं आला नाहीं. ? तेव्हां त्यांणीं करारानें व पापपुण्य मनांत आणून उत्तर केलें कीं, आह्मी शिपाई आहोंत मांग न होंत[1]. हें उत्तर ऐकून, गणपतरावानें आपली तरवार उपसून, बाळारामावर प्रथम वार केला; व मग जवळच्या दोघां हुजऱ्यांनीं[2] हें दुष्टकृत्य तडीस नेण्यास मदत दिली. नंतर त्याचें शरीर ओढीत ओढीत एका अंधारकोठडींत नेऊन टाकिलें; व दुसरे दिवशीं प्रातःकाळीं गांवांत पुकारा केला कीं, कारभारी बाळाराम फरारी झाला. परंतु या पुकाऱ्यानें लोक फसले असें नाहीं. वर लिहिलेल्या प्रसंगांत मुख्य अंश, तुळसाबाई व गणपतराव यांचा होता. लोकवार्तेनें तात्याजोगासही या गुन्ह्याचें भागीदार केलें आहे. या वेळीं त्याचें वजन दरबारांत होतें, ह्याच त्या वार्तेचा पाया असावा[3]. परंतु बाळारामास मारितेवेळीं तात्याजवळ नव्हता, आणि प्रथमपासून या कामांत माझा हात नव्हता

---

१ या दोघांचीं नांवें दीनासिंग, व लालसिंग. हे अजून चाकरींत आहेत.

२ हसूबा हुजऱ्यानें दुसरा वार केला; व बाळारामाच्या शरीराचा चेंदामेंदा झाल्यावर, भीमसिंग बुंदेल्यानें तें ओढीत नेऊन खोलींत टाकिलें. या खुनी माणसांनीं त्याच्या अंगावरचे कांहीं दागिने घेतले; व खुद्द दिवाणानेंही हलकटपणानें, त्याच्या गळ्यांत पाचांची कंठी होती ती घेतली असें ह्मणतात.

३ तात्याचा सर्वांत विशेष विश्वासू अनुयायी, रावजी त्र्यंबक, असें ह्मणतो कीं, आमचा यजमान प्रथमपासून अखेरपर्यंत बाळारामास मारून टाकण्याच्या विरुद्ध होता. तो हें कबूल करितो कीं, या पुढें एक वर्ष लोटे तोंपर्यंत, गणपतराव व तुळसाबाई यांशीं त्याचें वांकडें आलें

ह्मणून तो ह्मणतो. हें कृत्य ऐकून लोकांच्या अंगावर शहारे उठले. बाळारामाच्या स्वभावाचें वर्णन वर केलेंच आहे. तो स्वभावानें इतका उल्हासी होता, लोकांचें कल्याण करण्याविषयीं त्यास इतकी मोठी इच्छा होती, व तो इतका क्षमाशील होता कीं, दिलेलीं वचनें जरी त्याणें पाळिलीं नाहींत, व खोटा सत्तालोभ जरी बाळगिला तरी, सर्व जातीच्या लोकांची त्याजवर भक्ति असे. अझूनपर्यंत

---

नाहीं. तथापि तो ह्मणतो कीं, येव्हांपासून त्यांचें परस्पर चित्त विटलें. एक वर्षानंतर, तात्या जालिमसिंगाच्या छावणींत असतां, श्रीपतराव नांवाच्या कोणी माणसानें फिसाद करून, त्यांजमध्यें पुरें वांकडें आणिलें. बंदींतून गणपतरावास मुक्त करून देण्यास, तात्यानें तुळसाबाईस जेव्हां मदत दिली होती तेव्हां, तिजकडून शपथ घेवविली होती कीं, या संबंधापासून आपल्या कुळास व पक्षांतील सर्व लोकांस बट्टा येत आहे तर, यापुढें तो मी राखणार नाहीं. रावजीत्र्यंबक आणखी असें सांगतो कीं, बाळारामाचा रोशनबेगाशीं संबंध जडल्यानें, तुळसाबाईस राग आला; व गणपतरावास कैद मिळण्यास तोच कारण आहे, असें तिला वाटलें. यामुळें बाळारामावर संकट आलें. ही गोष्ट तात्याजोगास, प्रथमतः, जोरावरमल्ल सावकार याणें सांगितली. ती ऐकून तात्या, दिवाणाकडे गेला. व त्याणें बाळारामास कैदेंत ठेवावें ह्मणून सांगितलें. परंतु त्याच्या जिवास धका लावूं नये ह्मणून त्याची विनवणी केली. एकाएकीं बाळाराम मारला गेला, हें ऐकून जितकें तात्यास आश्चर्य वाटलें तितकें, आणखी कोणास वाटलें नसेल; परंतु त्याच्यानें आपल्या मनांतील गोष्ट उघड सांगवेना. कारण सांप्रत त्याजकडे जें काम होतें त्याखेरीज, त्यास जीव वांचविण्यास जागा नव्हती. यावेळीं मी मंदोसरास द्रव्य जमवीत होतों, परंतु ज्या गोष्टी मी सांगतों, त्यांजविषयीं माझी खातरी आहे, असें रावजीत्र्यंबक ह्मणतो.

लोक त्याची खंति करितात, व त्याच्या वधास "रानटी दुष्टकृत्य" असें समजतात.

इकडे गंगराडेस काय झालें या गोष्टीची, गफूरखानास बातमी लागतांच, त्यानें अपला एक विश्वासू माणूस तात्यास, असें विचारावयास पाठविला कीं, तुमच्या आमच्या आणाभाका झाल्या असतां, अशा कृत्यांत तुह्मी कसे पडलां ? व याविषयीं मीं आतां अमीरखानास काय लिहावें ? तुह्मीं ह्मणतां अशी गोष्ट मला मुळींच समजली नाहीं; व बाळाराम कैदेंत आहे खरा, परंतु जिवंत आहे असें मला वाटतें ह्मणून तात्यानें उत्तर दिलें.+ गफूरखानाच्या वकिलानें, याहून विशेष समाधान होण्यासारखें उत्तर मागितल्यावरून, तात्यानें घडलेलें

---

+ या प्रसंगीं हजर असणाऱ्या माणसांनीं मला ही गोष्ट सांगितली. व गफूरखानानें तात्याकडे मोतीरामास पाठविलें होतें, त्या खुद्द मोतीरामापासूनही, मी ही गोष्ट ऐकिली. तो खालीं लिहिल्या प्रमाणें ह्मणाला.

"बाळारामास कैद केल्यापासून तिसरे दिवशीं, गफूरखानानें त्याजविषयीं चौकशी करण्याकरितां, मला तुळसाबाईकडे पाठविलें. ती ह्मणाली कीं, बाळारामास इजा देण्याचें माझे मनांत नाहीं. फकत् त्याजकडून हिशोब घ्यावयाचा आहे, तो घेऊन त्यास सोडून देईन. त्याच रात्रीं बाळाराम मारला गेला. दुसरे दिवशीं अमीरसिंग नांवाच्या माणसानें, मारल्याची बातमी, गफूरखानास कळविली. मग त्याणें काय झालें आहे हें पाहाण्यास, मला तात्याकडे पाठविलें. तात्या ह्मणाला कीं, बाळाराम पळाला असें मला तुळसाबाईनें सांगितलें आहे; परंतु पुनः मी विचारिलें, व तात्याचें बोलणें खरें वाटत नाहीं असें दाखविलें; तेव्हां तो बाईकडे गेला, व नंतर पाठोपाठ त्याणें मलाही बोलाविलें. मी पोंचण्याच्या पूर्वीं, बाईनें एका हुजऱ्यास बोलावून आणून विचारिलें कीं, बाळाराम तुझ्याहातून कसा निसटून

वर्तमान तुळसाबाईस व गणपतरावास सांगितलें. त्यांणीं त्याची खात्री होण्याविषयीं आणखी यत्न केला; परंतु तो मानीतच नाहीं असें पाहून, तुळसाबाई, भीति व लाज टाकून देऊन, मोठ्यानें ह्मणाली कीं, गफूरखान माझा चाकर आहे कीं धनी आहे ? या प्रश्नाच्या उत्तराची वाट न पाहतां, ती आणखी बोलली कीं, जा माझा निरोप त्याला सांगा कीं, बाळारामाविषयीं तुला फार काळजीच असेल तर, येथें ये; ह्मणजे त्याची भेट करून देतें. हा निरोप ऐकून गफूरखान बराच भ्याला. नंतर दोन दिवस लोटल्यावर, आपल्यावर हल्ल्याचा इरादा चालला आहे हें ऐकून, सांप्रतची जागा सोडून तो आणखी दूर जाऊन राहिला. तुळसाबाईनें लागलीच असें करण्याचें कारण काय ? ह्मणून पुसावयास पाठविलें; व त्याची खातरी करावयास

---

गेला ? त्याणें उत्तर केलें कीं, मला झोंप लागली होती. मग तिणें त्यास कोरड्यांचा मार देण्याचा हुकूम दिला. कांहीं कोरडे त्याच्या पाठीवर बसले होते तों इतक्यांत मी गेलों, आणि तात्यास ह्मणालों कीं, बाळाराम मारला गेला हें मला पक्कें ठाऊक असतां, असें करण्यांत तात्पर्य काय ? इतकें झाल्यानंतर आह्मीं पुनः बाईजवळ गेलों. तात्यानें, मी काय ह्मटलें हें बाईस कळविलें, व आपण सांगतों यावर माझा बिलकूल विश्वास बसत नाहीं असेंही सांगितलें. हें ऐकून बाईस अनिवार राग आला. ती ह्मणाली कीं, माझ्यापाशीं गफूरखान जो इतकी विचारपूस करितो आहे हा, माझा धनी कीं चाकर ? बाळारामास पाहण्यासच तो इतका उत्सुक असेल तर, त्याला येथें बोलावा ह्मणजे, त्या पलीकडच्या बुरुजाजवळ बाळाराम बसला आहे, त्याची भेट करून देतें. या बुरजाच्या एका कोठडींतच नुकें बाळारामाचें धड टाकून दिलें होतें. मोतीराम ह्मणाला कीं, हें ऐकून, आपल्या जिवाकरितां भीतच, मी जाण्यास रजा घेतली. कारण तिला प्रचंड कोप आला होता."

असेंही सांगितलें कीं, तुझ्याविषयीं माझ्या मनांत द्वेष अगदीं नाहीं. मग त्याणें पुनः परत येण्याचें कबूल केलें खरें; परंतु मूळच्या तळावर छावणी न देतां, त्याणें रोशनबेगाच्या पलटणींजवळ आपले डेरे लाविले. यानंतर तीन दिवसांनीं, छावणींत गवगवा चालला आहे असें ऐकून, व गंगराड आपल्या ताब्यांत घेण्याविषयीं पलटणी लोक इरादा करीत आहेत असें मानून, तुळसाबाई, मराठे स्वार बरोबर घेऊन, त्या गावांतून बाहेर पडली. जोतिबा नायकाच्या उतावीळ पणामुळें, रोशनबेगाच्या पलटणीशीं स्वारांची चकमक झडली. या चकमकींत रोशनबेग मुख्य होता; व त्यास गफूरखानाचें पाठबळ होतें. पलटणींनीं तोफांची सरबत्ती चालविली; व तुळसाबाईनेंही प्रथमतः बरेंच धैर्य दर्शविलें. परंतु शेवटीं एक गोळा, बालवयी मल्हारराव ज्या हौद्यांत हत्तीवर बसला होता, त्या हौद्यास लागून, तत्पक्षी लोकांत एकंदर दहशत बसली. मग तुळसाबाई एका घोड्यावर चढली; व दुसऱ्या घोड्यावर गणपतरावापुढें मल्हाररावास देऊन, तिणें पळ काढिला; आणि गंगराडेपासून आठ कोसांवर देवासवाल्यांचा आलोट ह्मणून गांव आहे, तेथें मुक्काम केला. तिजबरोबर पागेचे स्वार, व आणखी दुसरे मराठे स्वार होते. रोशनबेगाच्या पलटणींनीं, गंगराडे-

---

पुढें गफूरखान व तात्याजोग यांजमध्यें सख्य झालें तेव्हां, गफूर खानानें तात्याजोगास शांत करण्याकरितां सांगितलें कीं, मोतीरामास असा पिच्छा घेण्यास मी सांगितलें होतें असें नाहीं. गफूरखानानें त्यास, आपली आज्ञा तोडल्याचें मिष करून, नोकरींतूनही काढिलें. मग मोतीराम दुसरीकडे नोकरीस राहिला. व कांहींदिवस कपतान ब्रिग्स याजपाशीं होता. पुढें आपली जाहागीर चालण्यांत अंतर होणार नाहीं असें, इंग्रज सरकारचें वचन मिळून, गफूरखान स्वतंत्र झाल्यासारखा झाला. तेव्हां, त्याणें मोतीरामास पुनः बोलावून घेतलें. हल्लीं तो त्याजजवळ मीर मुनशी आहे.

वर चालून जाऊन, तें आपल्या हस्तगत केलें. त्यांणीं प्रथमतः बाळारामाचें शरीर शोधून काढण्याचा इरादा केला. व तें शरीर कुजत चाललेलें सांपडलें. मग त्याच्या जातवाल्यांकडून, हिंदुधर्मांत सांगितल्याविधीनें, त्याचें दहन झालें. या प्रसंगीं गंगराड पुरें लुटलें गेलें; पलटणीलोकांस तुंबलेल्या पगाराचा अंश मिळाला; व त्यांचे कामदार लोक, ( विशेषेंकरून रोशनबेग ), गबर झाले.

गंगराडेस जीं सर्व वर्तमानें झालीं, त्यांत अमीरखानानें व त्याच्या मुत्सद्यांनीं, फौजी लोकांचे बंडावे, आपल्या मसलतीस साह्यभूत करून घेतले, यांत कांहीं संशय नाहीं. त्यांचा इरादा तुळसाबाईच्या हातून अधिकार काढावयाचा होता. यामुळें त्यांचे स्वार्थ व तुळसाबाईचे स्वार्थ बिलकुल निरनिराळे झाले असत. मग एका पक्षाचा मुख्य तात्याजोग[1] समजला जाई, व दुसऱ्या पक्षाचा मुख्य गफूरखान समजला जाई. तात्याच्या पक्षास जरी खासपागेंतील स्वार व मराठे स्वार मात्र असत तरी, मल्हारराव हातीं असल्यानें, त्यास वर्चस्व आलें होतें. मल्हाररावाच्या ठिकाणीं लोकांची इतकी निष्ठा होती कीं, ज्या पक्षाच्या तो स्वाधीन त्या पक्षास, प्रतिपक्षही सरकार समजे. गफूरखानाच्या पक्षास, खुद्द त्याचे मुसलमानी अनुयायी लोक, व तुळसाबाईनें रजा दिलेले स्वार त्याणें परत बोलाविले होते ते, असून, तोफांसहित पायदळ पलटणीही होत्या.

मंदोसर येथें शिंद्याचा कामदार होता त्याशीं, कांहीं ठराव ठरवून, तात्याजोगानें प्रथमतः, अंबाजीचा कंपू साह्यास घेतला. या कंपूंत पांच पलटणी व तीस तोफा होत्या. शिंद्याच्या लष्करापैकीं हा भाग माळव्यांत कामगिरीवर असे; व त्याच्या निर्वाहाकरितां, महीन

---

१. तात्याबरोबर स्पर्धा करण्या जोगें गणपतराव दिवाणामध्यें शाहाणपण नव्हतें; व तुळसाबाई, रागाचा आवेश येई तो वेळ खेरीज करून, हमेष शिकवणीप्रमाणें वागे.

माह पैका देण्याची यत्ता ठरविली असे. तात्यानें अंबाजीचें पाठवळ केलें खरें, परंतु अंबाजी इतक्या सावधगिरीनें वागूं लागला, व गफूरखानाशीं लढणें टाळण्याचा त्याचा इतका स्पष्ट हेतु दिसूं लागला कीं, होळकरांच्या दरबारास, आपल्या या नव्या मित्राचा लौकरच कंटाळा आला.

अमीरखान, व शिंदा, हे दोघेही असें इच्छित होते कीं, होळकरांच्या दरबारांतील घोटाळ्यांपासून आपले स्वार्थ साधले जावे. यासाठीं शिंद्यानें, अमीरखानाकडे एक मुत्सद्दी पाठवून बोलणें लाविलें कीं, होळकरांच्या कुळाचा नाश होईल व दुर्लौकिक होईल, अशीं कामें न करण्याची गफूरखानास ताकीद देऊन, त्यास दरबारांतून काढून द्यावें; व तुह्मी तुळसाबाईच्या इच्छेप्रमाणें वागावें. दौलतरावशिंद्यानें या कामांत हात घालावा, हें अमीरखानास रुचलें नाहीं ह्मणून, त्याणें त्यास उत्तर केलें नाहीं. तथापि तंटे जिकडच्या तिकडे मिटावे अशी त्याची इच्छा होती, यासाठीं, त्याणें गफूरखानास लिहिलें कीं, तुळसाबाईशीं लढूं नये. आणि तुळसाबाईसही लिहिलें कीं, जर तुह्मीं मला दरबारीं परत येऊं द्याल, आणि मुलूकभर भटकत न फिराल तर, पलटणी लोकांस, तुंबलेल्या पगाराचा निमा हिस्सा घेऊन, तृप्त राहणें मी भाग करितों. व माझ्या वतीनें, गफूरखान तुमच्या जवळ आहे तो, तुह्मांस अगदीं नकोसा झाला आहे, तर त्यासही काढितों. अमीरखानास कोटच्याच्या जालिमसिंगाचें पाठवळ होतें. त्या जालिमसिंगानेंही, तुळसाबाईस लिहिलें कीं, अमीरखान जे करार करितो, त्यांस मी जामीन आहें. परंतु तुळसाबाईनें यथार्थ जाणिलें कीं, अमीरखानाचा हेतु, आपली सत्ता हिरावून घेण्याचा, व खुद्द जातीनें कारभार पाहण्याचा आहे. ह्मणून तिणें उत्तर लिहिलें कीं, दरबारीं येण्यापूर्वीं, प्रथमतःच, गफूरखानास तुह्मीं काढून टाकिलें पाहिजे, व पलटणींचा बंदोबस्त केला पाहिजे. मग पलटणींच्या बंदोबस्ताविषयीं अमीर-

खानानें होईल तितका यत्न केला; परंतु तो व्यर्थ झाला. आतां दोहों पक्षांत पुनः झुंझ माजावयाची वेळ आली; तथापि कांहीं समजुतीवर येऊन, आपला झगडा जालिमसिंगानें तोडावा असें, त्यांनीं ठरविलें. मग मल्हाररावाचें लष्कर जालीमसिंगाच्या छावणीपासून, साहा कोसांच्या आंतबाहेर येऊन उतरलें; व इकडून, तात्याजोग आणि अमीरखानाकडून, गफूरखान, त्याच्या छावणींत आले. नंतर असा क्रम सुरू झाला कीं, घटकेंत त्यांच्या समजुती व्हाव्या, व घटकेंत पुनः तंटे उभे राहावे; पुनः समजुती व्हाव्या, पुनः तंटे उभे राहावे. आणा शपथा द्याव्या, घ्याव्या, व पुनः मोडाव्या. हा थाट तीन महिनें सतत चालला होता. या मुदतीच्या अखेरीस, पावसाळा बंद होण्याच्या समयास, इंग्रज सरकारचें लष्कर, मध्य हिंदुस्थानाकडे चालून येत आहे अशी बातमी आली; व यामुळें प्रस्तुत क्षणभर दोन्ही पक्षांचा एकोपा झाल्यासारखें झालें. हा एकोपा दुसऱ्या कोणत्याही गोष्टीनें झाला नसता.

सन १८१७. आतां जालिमसिंगास तर, खुद्द जातीच्या बच्यावाकडे लक्ष देणें भाग आलें होतें; तेव्हां, तो अर्थातच अशी इच्छा करूं लागला कीं, हे जे आपले होळकरशाई मित्र, मदत न करितां, घोटाळ्यांत पाडण्यास मात्र कारणीभूत होणारे आहेत, यांच्या हातून कसें तरी आपण सुटावें. परंतु त्यास अशीही इच्छा होती कीं, होळकरांचे अनुयायी लोक आपसांत वितुष्ट बाळगीत होते, त्यांचा कधींनवत जमलेला जूट कायम राहिला पाहिजे. तो, कायम ठेविण्यास कोणाची योजना करावी, हा त्यास विचार पडला. तात्याजोगाच्या गुणांस हें भूषणास्पद आहे कीं, कोटच्याच्या शाहाण्या व अनुभवी राज्यकर्त्यानें, या बाणीच्या प्रसंगीं, जूट कायम राखिण्याच्या कामीं, त्यास योग्य लेखिलें व योजिलें. आपला स्नेह दाखविण्याकरितां जालिमसिंगानें, तात्याच्या संरक्षणार्थ ह्मणून, आपल्या फौजेंतून, तीनशें पायदळ व दोन झेंडे त्याजजवळ दिल्हे.

आतां सर्व गोष्टींची आखर आली होती; ती करण्यास जीं कारणें झालीं त्यांचें वर्णन करण्यापूर्वीं, हें सांगणें भाग आहे कीं, बऱ्याच दिवसांपासून, शिंदे व होळकर या दोघांचीं दरबारें, स्नेहतंतूंनीं जोडण्यास, व निरनिराळे मराठे सरदारांचा जूट जमवून, मराठी राज्याचें पूर्वींचें सामर्थ्य पुनः उभें करण्यास, कित्येकांचा प्रयत्न चालला होता.

ज्या त्रिंबकजी डेंगळ्याच्या नांवाचा महाराष्ट्रांत डंका वाजला आहे, तो, या समयास बाजीरावापाशीं सलाहमसलतींत प्रमुख झाला असे; व त्यास प्रमुखत्व मिळाल्या दिवसापासून, पेशव्यांच्या राज्यमसलतींत बदल पडून, बाजीराव इंग्रजसरकाराविरुद्ध खटपटी करूं लागला असे. पुढें जेव्हां, गंगाधरशाह्याचा खून करून त्रिंबकजी सजेस पात्र झाला, तेव्हां बाजीरावाच्या खटपटीपासून, काम विशेष विकोपास जाईल असें दिसूं लागलें. शिंदे आणि होळकर यांजमध्यें, प्रथमतः गणपतराव दिवाणानें, व नंतर तात्या आळेकरानें, कांहीं ठराव ठरविले होते ह्मणून, वर वर्णन केलेंच आहे. त्यांतील प्रथम कलमांत, पेशव्यांची ताबेदारी करणें व आज्ञा मानणें उभयतांचाही धर्म आहे; व तसें करण्याचा उभयतांचा इरादा आहे; आणि हीच गोष्ट आपल्या परस्पर सख्यास कारण आहे; असें उभयपक्षीं ह्मणताते[2]. यांत कांहीं संशय नाहींकीं, त्या दोघांचाही मुख्य हेतु, इंग्रजसरकाराविरुद्ध एकत्र जमून जाण्याचा होता; व याकामीं त्यांणीं हळूहळू, व मोठ्या सावधगिरीनें चालण्याचा इरादा धरिला असे. परंतु बाजीरावाच्या स्थितीमुळें व वागणुकीमुळें, सावधगिरीनें चालण्याचा इरादा एकीकडे राहून, एकदम

---

१. इसवी सन १८१५ पासून त्र्यंबकजीचें बाजीरावापाशीं अत्यंत चालूं लागलें.

२. मेजर आग्न्यूनें इंग्रजसरकारच्या मुख्य चिटणिसास तारीख ३१ एप्रील सन १८१८ चें लिहिलेलें पत्र पाहा.

झगडा उभा राहिला. आतां बाजीराव घटकेघटकेस, खुद्द आपल्याविषयीं, व आपल्या कृपापात्राविषयीं, ज्यास्ती दहशत बाळगूं लागला; व जसजशी ज्यास्ती दहशत बाळगूं लागला तसतसा, बाहेरून, तावडतोब, व कामास उपयोगी येईल अशी मदत, जरूरीनें मागूं लागला. मग त्याणें शिंद्याच्या दरबारीं कोणी एक मुत्सद्दी पाठवून, होळकरांच्या दरबारींही एक योग्यतेचा पुरुष रवाना केला.[1] दरबारानें, आलेल्या वकिलाचा सत्कार, मोठ्या मानपानानें केला. सर्व कारभारी लोक, सामोरे पेशवाइस जाऊन, त्यास भेटले. परंतु हा वेळ, कोणत्याही
सन १८१५ कार्या साठीं एकोपा होईल असा नव्हता. व पुढें बाळाराम शेटाच्या मरणानंतर तर, दरबारांतच धुमाश्चक्री माजली; व अधिकाराविषयीं तंटे व मसलती उभ्या राहिल्या. त्यांपासून, बाजीरावाच्या तर्फेनें गणोबानें मांडिलेले यत्न, सर्व निरर्थक झाले. मग दुस-
१८१६. ऱ्या सालाच्या आरंभीं, पेशव्यानें, धोंडोपंत या नांवाचा दुसरा एक वकील, होळकरांच्या छावणीस पाठविला. व दरबारच्या मुलकी कारभाऱ्यांनीं व फौजी सरदारांनीं, आपले तंटे तोडण्याविषयीं, कोट्याच्या राजास मुखत्यार केलें, त्यापूर्वीं कांहीं दिवस, हा वकील येऊन दाखल झाला होता.[2] हा दुसरा वकील, आह्मांजवळ पैशाची तूट नाहीं इतकेंच, मल्हाररावाच्या कारभाऱ्यांस सांगे असें नाहीं तर, असं-

---

१. याचें नांव गणपतराव होतें; यास बहुधा गणोबापंत ह्मणत. गणोबा संवत १७८३ आषाढशुद्ध ४ स मकराडच्या छावणींत पेशव्यांचें पत्र घेऊन दाखल झाला; दरबारानें मानपान देऊन, त्याचा आदरसत्कार केला. असा रपोट त्यावेळीं ग्वाल्हेरीस रसिदंट वेलेस्ली असे त्याणें सरकारचे चिटणीस मिस्तर आडम यांस केला आहे. या रपोटाची तारीख २० फेब्रेवारी १८१६.

२. याचें नांव धोंडोपंततात्या. यानें आपलें खरें नांव लपवून कृष्णराव नांव घेतलें होतें.

ही सांगे कीं, बाजीरावास मदत पोहोंचविण्यास, शिंदे व अमीरखान यांस, मी खात्रीनें आणूं सकतों. प्रथम जालिमसिंगाच्या छावणींत कांहीं दिवस राहून, नंतर धोंडोपंत अमीरखानाच्या छावणींत गेला. त्या पठाण सरदारानें त्याच्या बोलण्यास नाहीं ह्मटलें नाहीं. परंतु त्याजजवळ चार लाख रुपये आगाऊ मागितले. धोंडोपंतानें ही रकम देण्याचें कबूल केलें; व होळकरांच्या छावणींत पत्र लिहून पाठविलें कीं, या रकमेच्या हुंड्या, तुह्मी अमीरखानाकडे पाठवाव्या. असें करण्यांत जो वेळ गेला तो, चाललेलें बोलणें खालीं पडण्यास कारण झाला. इंग्रजसरकारचें लष्कर जवळ आल्यानें, त्या सरकारानें ह्मटलेल्या गोष्टी अमीरखानानें कबूल केल्या; व डेविडअक्टरलोनीची एक भेट झाल्या नंतर, बाजीरावाच्या वकिलास त्याणें निघून जाण्यास सांगितलें; आणि गफूरखानासही लिहिलें कीं, तुळसाबाईस कळवा कीं, आतां तुह्मीं दक्षिणेंत जाण्याचा इरादा न करितां, मी येईं तों पर्यंत वाट पाहा; ह्मणजे तुमचे व इंग्रजसरकारचे तंटे मोडून टाकितों.

पेशव्यानें अमीरखानाशीं जें बोलणें आरंभिलें होतें, त्याचा असा परिणाम झाला. परंतु होळकरांच्या दरबारीं त्याणें, जो वकील पाठविला होता, त्याच्या मसलती विशेष साधल्या. गणपतरावाचा कोणी एक पीढीजाद आश्रित, मोठा कावेबाज ब्राह्मण असे, तो, त्या वकिलाबरोबर पुण्याहून आला होता; व वकिलात पुरी पाडावी अशासाटीं यत्न मांडीत होता.[1] तात्याजोग व गणपतराव दिवाण यांच्या सख्यांत, कांहीं दिवसांपासून अंतर पडत चाललें होतें. तें सख्य आतां समूळ नाहींसें करण्यासाटीं, हल्लीं तात्याजोग जालिमसिंगाकडे गेला आहे असें पाहून, या ब्राह्मणानें संधि साधिली. दिवाणाचें मन आपल्या मित्रावरून उडतांच, तुळसाबाईचेंही अर्थांतच उडालें. मग, तात्या परत आल्यानंतर, आपल्या तुंबलेल्या पगाराच्या फेडीकरितां त्यास

---

१. श्रीपतराव.

धरून अडकविण्यासाठीं, गणपतराव वगैरे मंडळीनीं, कित्येक लष्करी कामदारांस चेतविलें.

यावेळीं, होळकरदरबारांत जे लोक सलाहकार होते त्यांनीं, बाजीरावाच्या पक्षास साह्य देण्याचें ठरविलें. यामुळें, पेशव्याच्या वकिलानें त्यांजकडे, अगाऊ एकलक्ष साठहजार रुपये पाठविले. या रकमेंतून कांहीं अंश फौजेस वांटला गेला; आणि आतां, दरबारानें दक्षिणेंत जाण्याविषयीं आपला इरादा प्रगट केला; व लष्करांतील सर्व लोकांस व पलटणींस तावडतोब एकत्र जमण्याचा हुकूम दिल्हा. ही गोष्ट नोव्हेंबरांत घडली. पुढल्या महिन्याच्या आरंभीं, सर्व लष्कर, महत्पुराहून दाहा कोसांवर जमलें; व तेथून निघून खुद्द महत्पुरास आलें. आतां सर्व लोकांस होश चढला असें दिसूं लागलें. तुह्मी एकदां नर्मदा तर उतरा, ह्मणजे तुह्मास पुष्कळ पगार देऊं, व तोही वेळच्यावेळेवर; असें लष्करांस सांगण्याची दिवाणानें व त्याच्या मित्रांनीं रेलचेल केली होती. परंतु यानंतर लौकरच, इंग्रजसरकारच्या लष्कराचा एक भाग, महत्पुराहून अंदाजें सातआठ कोसांच्या टप्यावर, आगरें[1] मुक्कामीं, दाखल झाला; व दुसरा एक भाग, माळव्यांत शिरला. हें ऐकून, त्यांच्या मनांत वरीच दहशत बसून, चढलेला होश कमी झाला[2].

दिल्लीचा रसिदंट मिस्तर मेटकाफ याणें, ठाकूरदास या नांवाचा एक माणूस, होळकरांच्या दरबारीं, अखबार लिहून, पाठविण्यास, ठेविला होता; त्या ठाकूरदासास दरबारानें कांहीं रोजांपूर्वीं, मेटकाफाच्या नांवें दो-

१. माझ्या टोळ्या आगर मुक्कामीं सन १८१७ च्या ४ डिसेंबरास पोहोंचल्या.

२. सरटी हिस्लापाचें लष्कर उज्जनीस जावयास निघालें होतें त्याची प्रथम तुकडी, नर्मदा उतरून उत्तरेस तारीख १ डिसेंबर सन १८१७ रोजीं आली.

स्तीचीं मोहोगम पत्रें लिहून देऊन, दिल्लीस रवाना केलें होतें. इतक्यांत पहिला कारखाना सर्व बदलला. यामुळें मोहोगम गोष्टी सोडून देऊन, कांहीं तरी निश्चय करून, पुढें चालण्याचा ठराव करणें दरबारास भाग आलें. मग मसलत करण्यास त्यांची मंडळी जमली; व तात्याजोग जरी कैदेंत होता तरी, मुख्यस्थानीं येऊन बसला. त्याणें असी सल्ला दिली कीं, आगरास इंग्रजसरकारचें लष्कर आलें आहे, त्यावरील कामदाराकडे, कोणी तरी योग्य पुरुष, बोलणें लाविण्यास वकील करून, पाठवावा. परंतु, त्याची मसलत कोणी मनावर घेतली नाहीं. तो इंग्रजांस फितूर झाला आहे असा अपवाद मात्र त्याजवर आला. या अपवादामुळें त्यास विशेष दिवस कैदेंत राहावें लागलें इतकेंच नाहीं, तर त्याजवर सख्तीही विशेष झाली. मुख्यत्वेंकरून, पायदळ पलटणींच्या अधिकाऱ्यांस तात्या नकोसा झाला होता. या मसलतीनंतर हे कामगारलोक, व रिसाल्याचे मुख्यमुख्य कामगार लोकही, गफूरखानाच्या डेऱ्यावर गेले. व त्यांणीं परस्पर सत्यानें वागण्याच्या, व पुढें येऊन पडणाऱ्या संकटांत ऐक्य राखण्याच्या, शपथा घेतल्या.

मग दरबारच्या मंडळींनीं, आगर येथील इंग्रज सरकारच्या कामगाराशीं, पत्रव्यवहार मांडिला. तो कामदार, सर टॉमस हिस्लॉपच्या लष्करांत येऊन, दाखल होण्याकरितां निघाला होता. त्याणें होळकरांच्या कारभाऱ्यांस सांगितलें कीं, खरोखरीच तह करण्याची तुमची इच्छा असेल तर, तुह्मीं जनरल हिस्लॉपाकडे मुख्यठिकाणीं, वकील पाठवावे.[१] हें बोलणें त्यांणीं मनास आणून, वकील पा-

---

१. आगरास आल्या बरोबर, मल्हाररावाच्या कारभाऱ्यांकडे मित्रभावाचें एक पत्र, मी लिहून पाठविलें. आंतील हेतु हा होता कीं, त्यांचे विचार, निदान इंग्रज सरकाराशीं वागण्यांत तरी कसे होते, याचा साफ निकाल, त्यांच्या उत्तरानें व्हावा. हें पत्र त्यांजपाशीं दा-

ठविले. व ते वकील, तह करण्यास आह्मी सर्व मुखत्यारी घेऊन आलों आहों, असें ह्मणूं लागले. मग इंग्रज सरकारच्या तर्फे, त्यांस सोपे पडतील असे ठराव ठरविण्याविषयीं सांगितलें. मात्र बंडावी पायदळ पलटणींची पुरी सुधारणा झाली पाहिजे, असा आग्रह धरिला. तेव्हां कारभारी लोक तसें करण्यास आपण असमर्थ आहों, व हेंच आपले टराव न कबूल करण्यास आमचें कारण आहे, असें ह्मणूं लागले. तेव्हां त्यांना असें उत्तर दिलें कीं, जर तुह्मीं आपला व आपल्या राज्याचा बचाव चाहत असाल तर, आपल्या

---

खल होण्यापूर्वीं, तरुण मल्हाररावाच्या नांवानें लिहिलेलें एक पत्र मजकडे आलें. त्यांत मोहोगम दोस्तीच्या बोलण्याखेरीज दुसरें, कांहीं नव्हतें. होळकरांच्याकुळाचे तुह्मी जुने दोस्त आहां, यासाठीं- इंग्रज सरकारामध्यें व होळकरदरबारामध्यें तुह्मीं सख्य करावें, असें ही त्यांत लिहिलें होतें. मी इकडून पाठविलेल्या पत्रीं, मल्हाररावाकडे बोलण्यास एक कामगार पाठविण्याचें लिहिलें होतें. त्याच्या जबाब न आल्याकारणानें, मी तराण्याच्या रस्त्यानें उज्जनीस जावयास निघालों. तेथून मी गणपतराव दिवाणास लहानशी चिठ्ठी लिहून पाठविली कीं, माझा बेत, कमांडर इनूचीफ मुख्य सेनापति सर टामस हिस्लाप, याच्या लष्करांत जाऊन दाखल होण्याचा आहे. व तुमच्या मनांतून जर संकट टाळावयाचें असेल तर, तहाचें बोलणें लाविण्यास बिलकुल उशीर लाऊं नका.

१. तारीख १५ डिसंबर सन १८१७ रोजीं होळकरांच्या वकिलाशीं माझें बोलणें झालें. त्याच्या घेतल्या टीपांत दाखल असल्याप्रमाणें, तहाचीं दाहा कलमें त्यांस सांगितलीं गेलीं. हे ठराव परिमित असत, व हेतु हा होता कीं, इतर आजुबाजूच्या संस्थानांस इजा न पोहोंचे अशा स्थितींत, होळकरांचें दरबार आणून ठेवावें. ही स्थिति प्राप्त होण्याकरितां, त्या दरबारापासून, पेंढाऱ्यांस निराळें होणें भाग

पायदळास इंग्रज सरकारच्या छावणींत आणावें; व ज्या दुर्वृत्त व हुकुमाची अदुली करणाऱ्या लोकांनीं, आजपावेतों देशाची शांति नाहींशी करून, खुद्द आपल्या धन्याचे मुलूकसुद्धां ओसाड करून टाकिले, त्यांस कवज्यांत आणण्याचें काम इंग्रजी फौजेच्या कामगारांवर सोंपावें. हें तहाचें बोलणें चाललें असतां, खरोखरीच होळकरांच्या सैन्यांत मुख्य ह्मणावयास कोणीच नव्हतें.[१] निरनिराळ्या पलटणींचे अधिकारी यांची खात्री होऊन गेली असे कीं, जर आपल्या दरबारानें इंग्रज सरकारची दोस्ती केली, तर धांदली वंद होतील; व धांदली बंद झाल्यावर, आपलें महत्व कशास राहतें! तेव्हां अर्थात, प्रथमपासूनच ते अधिकारी लोक, वितुष्ट माजविण्यास पाहत होते. यामुळें, जे कोणी तह करा असें ह्मणत त्यांजवर, ते संतापत. लष्करी कामगारांचें विशेष चालत असल्यामुळें, इंग्रज सरकारानें दोस्तीचीं बोलणीं लाविलीं होतीं त्यांस, समर्पक जवाब दरबारानें पाठविला नाहीं. जे तंटा व्हावा असें इच्छित होते त्यांणीं, मराठी स्वारांच्या कामदारांना काळ लावून देऊन, व इंग्रज सरकारच्या लष्करांतील बाजारबुणग्यांवर, व गुरांढोरांवर, नित्य लुटारू छापे घालून, लढाई लवकर उभी राहील

---

होतें. सारांश लुटालूट माजविण्याचा सर्व प्रकार सोडणें भाग होतें. कारण त्यांपासून इतर संस्थानांची शांति नाहींशी होत होती. हे फेरफार करण्याकरितां, इंग्रज सरकारांनी फुकट मदत देण्याचें कबूल केलें होतें, व होळकरांपासून राज्याचा कांहींएक भाग न मागतां, उलटें, लष्करी लोकांस रजा देतेवेळीं, मागील तुंबलेला पगार वांटून देण्यास, पैसा पुरविण्याचें कबूल केलें होतें.

१. सभोंवतालचा रंग पाहून, तुळसाबाई फार भयभीत झाली; व तिचा प्रियपात्र गणपतराव निरनिराळ्या लोकांच्या निरनिराळ्या मसलतीनें इतका घोटाळ्यांत पडला होता कीं, या कठिण प्रसंगीं त्याच्यानें तुळसाबाईस मदत देववली नाहीं.

असें केलें. सर टामस हिस्लाप महत्पुरास येऊन पोंहोचण्याच्या पूर्व-दिवशींच, दरबारच्या लोकांनीं, इंग्रज सरकारच्या सैन्यांतील जे लोक लष्कराबाहेर चाहूल घेण्यास नेमिले होते त्यांजवर, हल्ला केला. मल्हारराव होळकराच्या छावणींत नुकतेंच झालेलें वर्त्तमान, इकडे येऊन पोहोंचलें होतें; त्यावरून, वर लिहिल्याप्रमाणें होईल असें अनुमान पूर्वींच केलें होतें. त्याच्या छावणींत, व्यवस्था व अधिकार यांची निशाणीसुद्धां राहिली नव्हती. व लढावें किंवा तह करावा या प्रश्नाचा फैसला, इतर गोष्टींप्रमाणेंच, बंडावलेल्या लष्कराच्या उद्धट व अज्ञानी कामगारांनीं, ओरडाओरडीची मसलत करून, केला.

सन १८१७.

यावेळीं गणपतराव व तुळसाबाई यांचा नाश करण्यास जो पक्ष उत्सुक होता, त्यापक्षास गफूरखान जाऊन मिळाला. त्यांचा नाश करण्यास, साधनांची कमती नव्हती. कारण जरी रामदीन त्यांच्या पक्षांत होता तरी, बाकीचे सर्व कामगार त्यांचा द्वेषच करीत. बाळारामाच्या खुनामुळें, लष्कर सूड उगविण्यास पाहतच होतें. तात्याजोगास बंदींत टाकून सख्तीनें वागविल्यामुळें, त्याचीही बुद्धि, हें खलबत वडीस जावें असी झाली, ह्मणून ह्मणतात. तो जरी बंदींत होता तरी, मसलत सिद्धीस नेण्याचे उपाय, त्याजजवळून नाहींसे झाले नव्हते. या नवीन खलबतांत मुख्य पुढाकारी, पागेकडील मोठे मोठे अधिकारी होते. त्यांत सदरूद्दीन हवालदार ह्मणून कोणी होता, त्याच्या सांगण्यावरून एका माणसानें, बालवयी मल्हारराव बाहेरच्या डेऱ्यावर खेळत होता तेथून, त्यास फुसलावून नेलें; व लागलीच तुळसाबाईच्या डेऱ्यावर पाहारा बसविला. तिला सोडविण्याकरितां गणपतराव आला; परंतु मल्हाररावाची व तिची फोड केली असें, जेव्हां त्याणें ऐकिलें तेव्हां आपल्या शत्रूंची मसलत किती खोल आहे हें तो चटकन् उमजला; व लागलीच परत फिरून, आपल्या घोड्यावर स्वार होऊन, त्याणें पळ काढण्याचा इलाज मांडिला;

परंतु प्रतिपक्षांतील लोकांच्या एका टोळीनें, क्षिप्रा नदीच्या पात्रांत त्यास गांठिलें. प्रथमतः भाल्याची त्यास थोडीसी जखम झाली; व मागून तो घोड्यावरून खालीं पडला. पडल्यावर, लोकांनीं त्यास बुच्छाडून घेतलें; लाताबुक्यांचा मार केला; व हरएक तऱ्हेचा अपमान करून बंदींत घालून, लोक तिरस्काराचे शब्द बोलत आहेत, व शाप देत आहेत अशा गर्दींत, त्यास त्यांणीं पायदळपळटणींत नेलें.

हें वर्तमान, डिसेंबर महिन्याच्या विसाव्या तारखेस, प्रातःकाळीं घडलें. त्या दिवशीं रात्रीं, याहून विशेष दुःखपरिणामी गोष्ट घडून आली. तुळसाबाईच्या डेऱ्यावर पाठविलेले पाहारेकरी, फार सख्तीनें वागूं लागले; व ते आंत तिजकडे कोणा एकास सुद्धां जाऊं देईनात. यावरून दिसतें कीं, आरंभींच, तुळसाबाईस मारून टाकण्याचा, लोकांनीं निश्चय केला होता. आजपर्यंत उध्धटपणानें वागलेली जी ही स्त्री, तिणें आतां अन्न घेणें सोडिलें; व सारा दिवस रडत काढिला. क्षिप्रा नदीच्या कांठीं तिचा वध व्हावयाचा होता; तेथें नेण्याकारितां जेव्हां लोकांनीं तिला पकडलें तेव्हां, तिणें नेणारांची आपणास वांचविण्याकारितां पुष्कळ विनवणी केली; व आपले दागीने त्यांस लांच देण्यासाठीं ह्मणून काढिले; आणि आपण केलेले गुन्हे लोकांवर लोटिले असें ह्मणतात. हें चाललें असतां, अरुणोदय होण्याची वेळ आली. आसपास छावणींत, झोपेंत असलेले पुष्कळ लोक, तिच्या आरोळ्यांनीं जागे झाले; परंतु "या स्त्रीनें कधींही कोणास दया दाखविली नव्हती; तेव्हां अर्थातच तीस आतां वांचविण्यास एक पाऊलही कोणी पुढें सरला नाहीं, व एक शब्दही कोणी तोंडांतून काढिला नाहीं." तो प्रसंग पाहाणाऱ्यांपैकीं एकाचे हे शब्द आहेत. क्षिप्रा नदीच्या कांठीं पोहोंचल्यावर, तिला म्यान्यांतून खालीं काढिलें; व तेथें शिरच्छेद करून, तिचें शरीर नदींत फेंकून दिलें. हिंदूंच्या प्रेतांस जे साधारण संस्कार होत असतात, तेही तिला प्राप्त झाले नाहींत.

वधाच्या वेळीं, तुळसाबाईचें वय, तीस वर्षांहून अधिक नव्हतें रू-

पानें सुंदर असून, बुद्धिचांचल्याविषयीं व मनोहारिवर्तनाविषयीं ती प्रसिद्ध असे. अस्खलित गोड भाषणाविषयीं थोडेच तिची बरोबरी करीत. अशा भाषणानें, जे तिच्या समोर येत त्यांस, तिच्या इच्छेप्रमाणें वागावें असें वाटे. तिला घोड्यावर खुबीदार बसतां येत होतें; व या वाहनावरून चालली असतां, तिच्यामागें घोड्यांवर, दरबारांतील मोठ मोठ्या कुळांच्या स्त्रिया बरोबर असत. मराठ्यांच्या बायकांत घोड्यां-वर बसतां येणें हा अवश्य गुण समजला जातो. परंतु ईश्वरानें अनंत हस्तांनीं दिलेल्या देणग्या, दुर्व्यसनांत निमग्न असल्यानें, कशा नाशास-च कारण होतात हें, या राजकुळांतील स्त्रीच्या वृत्तांत जसें उघड दिसून येतें असें, दुसऱ्या कोणाच्याही वृत्तांवरून दिसून येत नाहीं. तुळसाबाई जरी यशवंतरावाची पत्नी नव्हती तरी, त्याचें कुळ तिच्या ताब्यांत वागे या मुळें, व यशवंतरावाच्या गादीचें जें वारस लेंकरूं, तेंही तिच्या स्वाधीन असे या मुळें, केवळ धर्मपत्नीसारख्याच, तिच्या आज्ञा दरबारांत मानिल्या जात. ती यशवंतरावाची लाडकी असे, व मल्हाररावाचें पाळणकर्ती असे ह्या कारणानें, होळकरांच्या अनुयायी लोकांस, तिची बाजू संभाळावी अशी बळकट बुध्धि होती. परंतु तिणें हें सर्व दुर्वर्तनानें झुगारून दिलें यामुळें, जिवंत होती तरी कोणी तिला पूज्य लेखिलें नाहीं; व मेली तरी कोणी तिची खंत केली नाहीं.

तुळसाबाईवर उघड सूड उगविण्यास गफूरखान वाट पाहात होता, हें सर्वांस ठाऊक होतें. ह्मणून, तिच्या मरणांत तो अंशभूत होता असें लोक ह्मणतात. तात्याजोगही तिच्या विरुद्ध होता; व तात्याच्या अत्यंत विश्वासांतील लोकांनीं, या झालेल्या प्रसंगांत पुष्कळ दखल दिली, यांत संशय नाहीं. मल्हाररावाची आई केसराबाई, हिचा या गोष्टींत इतका लाभ होता कीं, तीही या कुटांत सामील असेल असा लोकांस संशय आला. निदान इतकें खास आहे कीं, यावेळीं ज्या लष्करी कामदारांनीं अधिकार ओढून घेतला होता, तेच मात्र वर लिहिलेल्या जुलुमाच्या कृत्यांत सामील होते असें नाहीं. तर तें कृत्य

सर्वांची मसलत ठरून झालें होतें. विच्याऱ्या तुळसाबाईचा शिरच्छेद-ही, शिपायांकडून न होतां, केवळ राजद्रोही गुन्हेगारांप्रमाणें मांगां-करवीं झाला. तुळसाबाईचा शिरच्छेद ज्यांनीं केला, ते अजून होळकरांच्या कुळांत नोकर आहेत; यावरून असें दिसतें कीं, हल्लींचे अधिकारी लोक, तुळसाबाईस मारल्यामुळें आपणास कळंक आला आहे असें, समजत नाहींत[१].

तुळसाबाईस लोकांनीं ज्या दिवशीं पकडलें त्याच दिवशीं, महत्पुराजवळ क्षिप्रेच्या कांठीं, होळकरांच्या छावणीपासून सरासरी पांच कोसांवर, इंग्रजांचें सैन्य येऊन उतरलें. मग दरबारवाल्यांनीं, अस्ताव्यस्त वेडाव्याची कचेरी भरविली; व त्या कचेरींत लष्करी कामगारांनीं असें ठरविलें कीं, हल्लीं आपली छावणीची जागा आहे ही फायदेशीर आहे, ह्मणून येथेंच लढाई करावी हें प्रशस्त होय. तारीख सन १८१७ २१ डिसेंबरच्या प्रातःकाळीं, त्यांचे बरेच स्वारलोक, नदी उतरून उजव्या कांठीं, इंग्रजसरकारच्या फौजेशीं सामना करण्यास आले. आदल्या दिवशीं, मल्हारराव होळकरास इकडून एक लहानसें पत्र लिहिलेलें होतें; व त्याला अखेरचें सांगणें सांगून पाठविलें होतें कीं, तुह्मीं संकटांत येत आहां याविषयीं सावध असा. लष्कर कुच करण्यास निघण्याच्या समयास, या पत्राचें उत्तर येऊन पोहोंच-

---

१. तुळसाबाईच्या मरणांत कोणकोण सामील होते असें मी रावजीत्र्यंबकास विचारिलें. तो ह्मणाला कीं, गणपतराव व रामदीन यांखेरीज मला वाटतें कीं, होळकरांच्या छावणींतील एकंदर लोक अशी गोष्ट व्हावी हें इच्छित होते. तिचा शिरच्छेद करणारे, मेवात्यांचे दोन जमादार होते. सादतखान व मोहीद्दीन अल्ली. सादतखान पांच महिन्यांपूर्वी मेला. मोहीद्दीनअल्ली, पायदळ पळटणींतील दोन शें लोकांच्या टोळीचा, मुख्य कामदार आहे; व ही टोळी इंदूर येथें मल्हाररावाच्या राजवाड्याजवळ पाहऱ्यावर आहे.

ले. पूर्वीप्रमाणेंच यांतही, उडवाउडवीचा लेख होता. प्रथम कांहीं मोहोगम वाक्यें लिहून, शेवटीं एक लहान वाक्य असें आणिलें होतें कीं, त्यावरून त्यांची खरी बुद्धि उमजली. या वाक्यांत बालवयी राजाकडून असें ह्मणविलें होतें कीं, "जर तुह्मीं पुढें याल तर, ही आठवण ठेवा कीं, हें होळकरांचें लष्कर आहे." या प्रसंगीं दरबारच्या कामगार लोकांत क्षणभर एकोपा झाला; कारण मूळचें कितीही वितुष्ट असलें तरी, प्रस्तुत सर्वांवर सारखें संकट आलें आहे, असें त्यांणीं जाणिलें; व ज्या लष्कराचे आपण अधिकारी आहों, त्या लष्कराचा पूर्वापार संपादित लौकिक जाऊं न द्यावा, असा अभिमान धरिला. विसावे तारखेच्या रात्रीं, त्यांणीं एकमेकांशीं इमानानें वागण्याच्या शपथा घेतल्या; व दुसरे दिवशीं प्रातःकाळीं, मोठ्या चतुरायीनें लढाईची योजना केली. जे स्वारलोक, क्षिप्रा नदी उतरून उजव्या किनाऱ्यास आले होते ते, इंग्रजसरकारच्या चालून येणाऱ्या लष्करास घोटाळा पडे अशा रीतीनें, स्थान साधून उभे राहिले. अशा तऱ्हेनें त्यांणीं, त्यांचें लक्ष आपल्याकडे लावून घेऊन, आपण सामानसुमान व दारूगोळा यांजवर जाऊन पडतों असें दाखविलें. जे स्वार नदीउतरून आले नव्हते ते, पायदळ पळटणींच्या व तोफांच्या पाठीवर राहिले. व पळटणींनीं व तोफांनीं एक बळकट व सबंध रांग साधिली. उजव्या बाजूस खोल नाला येऊन, व डाव्याबाजूस क्षिप्रा नदीचा एकदम उतरता कांठ येऊन, पायदळ पळटणींचा व तोफांचा बचाव झाला होता. नदी उतरून आलेले स्वार, रामदीनाच्या ताब्यांतील होते. पायदळ पळटणींचा अधिकारी रोशनबेग होता. खासपागा सदरुद्दीनाच्या हातीं होती. सर्व लष्कराच्या पिछाडीस गफूरखान, आपल्या जातीच्या लोकांसहित, बालवयी मल्हाररावास घेऊन उभा होता.

दरबारच्या लष्करांत, सरासरी सत्तर तोफांची मोर्चेबंदी केली होती; त्यांजवर हल्ला करून, जाऊन पडावें, असा प्रथमपासून इंग्रज सरकारच्या लष्करानें संकेत केला; व टोळ्याटोळ्यांच्या लहान ल-

हान झुंझी, न होऊं देण्याची तजवीज ठेविली. मग त्या सैन्यानें नदी उतरून जाऊन अडोशाची जागा धरिली. या जागेहून, प्रथमतः, इंग्रजी सैन्याचा उजवा भाग, दरबारी सैन्याच्या डाव्या भागावर जाऊन पडला; कारण त्या सैन्याची बळकटी डाव्या भागावरच होती. सर्वांनीं एकदम हल्ला करण्याचा इशारा होई तोंपर्यंत, बाकीचे लोक स्तब्ध राहिले होते. तो इशारा झाल्यावर, चहूंकडे एक सारखी गर्दी उसळली; व थोडा वेळ निकरानें युद्ध होऊन, अखेर इंग्रजी सैन्याचा चहूंकडे जय झाला; आणि दरबारचें सैन्य अस्ताव्यस्त होऊन पळालें. लढाईच्या सुरूमध्यें, त्यांच्या स्वारलोकांनीं धैर्य दाखविलें होतें; परंतु जेव्हां ऐन कडाका उडाला तेव्हां, त्यांनींच सर्वांच्या अगोदर रणांतून पाय काढिला. मग त्यांचें उदाहरण घेऊन, त्यांच्या मागून पायदळ पलटणींनीं पाय काढिला. तोफखान्यांनीं मात्र, रिसाले व पायदळपलटणी रण सोडून जाई पर्यंत, गोळ्यांचा भडिमार सोडिला नाहीं.

लढाईंत मल्हारराव हत्तीवर बसला होता; व सर्व लोक सांगतात कीं, तो मोठ्या छातीनें वागला. जेव्हां आपल्या लष्करानें पळ काढिला असें त्याणें पाहिलें, तेव्हां मात्र त्यास रडूं आलें; व पुनः परतण्याविषयीं तो त्यांची विनवणी करूं लागला. त्याचा चुलत भाऊ जो हरीराव होळकर, त्याणेंही या प्रसंगीं मोठें शौर्य दाखविलें. त्याणें प्रथम, महीसूरच्या रिसाल्यांतील दोघां स्वारांस कापून काढिलें, परंतु इतक्यांत गोळी लागून त्याचा घोडा पडला. हें पाहून बालवयी मल्हारराव, मोठ्या काळजीनें पुकारूं लागला कीं, पुनः त्यास घोड्यावर बसवा. या गोष्टी लोक अजून आठवितात. कारण कीं, अंगीं शौर्य असणें हें, आपल्या धन्यांच्या घराण्याचें प्रसिद्ध स्वरूप आहे, असा जो होळकरांच्या कुळाचे अनुयायी अभिमान बाळगितात, त्या अभिमानास तृप्त करण्याजोगें कर्तृत्व, मल्हारराव व हरीबा या दोघांनीं, या प्रसिद्ध प्रसंगीं, वय लहान असतां, दाखविलें.

सर्व रात्रभर, दरबारचें लष्कर, सीतामहूच्या रस्त्यानें पळत होतें. तें गांव त्यांणीं दुसरे दिवशीं प्रातःकाळीं गांठिलें. पलटणींचा पराजय होतेवेळीं, तात्याजोग व गणपतराव दिवाण आपल्या पाहाऱ्यांतून निसटले होते. ते आतां, कांहीं थोडावेळ महत्पूर येथें गांवांत दडून राहिले; व रात्र झाल्यानंतर, गांव सोडून, मल्हाररावास जाऊन मिळाले. आतां राज्याचा मुख्य अधिकार, मल्हाररावाची आई केसराबाई इजकडे आल्यामुळें; तिनें तात्याजोगास बोलावून आणिलें; त्यास कारभाऱ्याचीं वस्त्रें दिलीं; व मल्हाररावास सांभाळणें, आणि आपल्या कुळाचें हिताहित पाहाणें हें, सारें त्याजकडे सोंपविलें. सीतामहूहून कूच करून, लष्कर मंदोसराजवळ गेलें; तेथें करीमखान या नांवाचा माणूस, पेंढाऱ्यांची टोळी घेऊन छावणी करून राहिला होता. त्याणें, पुनः लढण्यास तुह्मास आपण मदत देतों, ह्मणून सांगितलें. परंतु आतां, अशा तऱ्हेच्या लोकांची मदत दरबार इच्छीत नव्हतें. इंग्रजी लष्कर पाठोपाठ येत होतें, त्याशीं लढून, अखेर यश मिळेल ही उमेद तर कोठून असणार, परंतु लढून, दोन दिवस टिकाव धरितां येईल, हीही उमेद त्यांस राहिली नव्हती. मग अर्थांतच दरबारकडून मीरजाफर अली या नांवाचा वकील, तहाचें बोलणें लाविण्यासाठीं, सीतामहूहून इकडे आला[1]. जाफरअलीनें या पूर्वींही एकवेळ वकिली केली होती.

आरंभीं तहाचीं कलमें जीं ठरवावयाचीं त्यांचा खर्डा, इकडून त्यांस दिला गेला; व असेंही कळविलें गेलें कीं, हा खर्डा सही होऊन आला ह्मणजे आह्मीं लढाईची तयारी बंद पाडूं. या वेळीं दरबार, इंग्रज सरकारच्या छावणीहून, सरासरी आठ कोसांच्या अंतरावर, प्रतापगडाजवळ होतें. उत्तर न आलें असतां, तेथें असलेल्या बाकी

---

१ मीरजाफर अली, गफूरखानाकडचा माणूस होता. या वेळीं गफूरखानानें निश्चय करून पलट घेतली, व दरबाराबरोबर मी येत

मराठी लष्करावर हल्ला करण्याभावीं, कूच करून जाण्यांस[1] जी घटका नेमली होती, त्यापूर्वीं थोडा वेळ, मंदुसरास मीरजाफर अल्ली खडर्यांवर सही घेऊन आला. वेळेवर दरबार शरण आलें हें ठीक झालें. असें झालें नसतें तर, त्यांस बचावास जागा नव्हती; व असें झालें ह्मणूनच, पूर्वीं योजून ठेविलेलें शासन त्यांस दिलें गेलें नाहीं. दुसरेदिवशीं इंग्रजी छावणींत तात्याजोग खुद्द आला; व मग तारीख ६ ज्यान्युआरी रोजीं मंदुसरास तह ठरला. या तहामुळें राजपुतान्यांतील संस्थानावरचे हक्क, जयपूरच्या संस्थानांतील जमीनी, व सातपुड्याच्या दक्षिणेकडील मुलूक, इतकें होळकर दरबारापासून गेलें. तरी बाकी राहिलेल्या प्रांतांवर, इंग्रज सरकारच्या मदतीनें, त्यांचा खरोखरी अंमल सुरू झाला[2]. होळकरांच्या संस्थानास हें वस्तुतः

---

नाहीं ह्मणून सांगितलें. असें वागण्याविषयीं अमीरखानाचीं त्यास पत्रें आलीं होतीं. परंतु मुख्यत्वें, आपल्या हितावर दृष्टि देऊनच त्याणें असें केलें. याबद्दल त्याच्या मनांत होतें, त्या प्रमाणें बक्षीस प्राप्त झालें; कारण कांहीं नियमित स्वार लोक इंग्रज सरकारच्या चाकरींत हजर ठेवावे अशा आटीवर, होळकरदरबारांतून असलेली जाहागीर इंग्रज सरकारानें त्याजकडे चालू ठेविली.

१ लष्करापैकीं माझ्या हुकुमांतील भाग, महत्पुराहून पाठलाग करण्यास रवाना झाला होता. आह्मी तारीख ३१ डिसंबर रोजीं प्रातःकाळीं मंदुसरास जाऊन पोहोंचलों. त्यादिवशीं रात्रीं कूच करून जाऊन, दरबारच्या सैन्यावर हल्ला करण्याचा मी बंदोबस्त केला होता. त्या सैन्याची अशी स्थिति होती कीं, तें त्यावेळीं आपला बचाव करूं सकतेंना.

२ या पुढें गव्हरनर जनरलानें दरबारचें मन संतोष राहावें अशा बुध्धीनें, औदार्य दाखवून, होळकरांचे दक्षणेंतील मुलूक, बाफगांवचे हक्क, व चांदवडची देशमुखी, इतकें दरबारास परत दिलें.

नवेंच स्वरूप प्राप्त झालें, असें समजलें पाहिजे. कारण आज वीस वर्षांपासून त्यांस, नियमित वसूल कधींच प्राप्त झाला नव्हता; व त्यांचा सुरळीत अधिकार कधींच चालला नव्हता. दरबारच्या नांवाचें सोंग करून, लुटारू लोकांना हरतऱ्हेची अंदाधुंदी व हरतऱ्हेचे गुन्हे करण्यास मात्र, संधी सांपडत गेली होती.

मंदोसराच्या तहामुळें, आपल्या संस्थानाच्या स्थितींत जो बदल झाला त्यापासून, पुढें कसकसे चांगले परिणाम घडून येतील हें, दरबाराचे कितीएक अनुयायी लोक यथार्थ उमजले. मराठी स्वारांचे रिसाले मात्र, तह झाला असें ऐकतांच, एकंदर, बाजीराव अझून पळाला नव्हता त्यास सामील होण्यास, दक्षिणेस निघून गेले. त्यांचा मुख्य अधिकारी आतां रामदिन झाला[१]. रामदिनास निघून जाण्यास आणखी एक कारण होतें तें हें कीं, तात्याजोगाशीं त्याचें हाडवैर असे; व तात्याजोगास तर प्राप्त झालेला कारभार, इंग्रज सरकाराशीं तह ठरविणें पडल्यामुळें, कायम झाल्याप्रमाणें झाला होता.

महत्पुरास पराजय पावलेल्या पायदळ पलटणींतील बाकी राहिलेले लोक रामपुऱ्यास गेले होते; तेथें जनरल ब्रौनच्या लष्करानें त्यांचा पराजय केला, व त्यांजपासून तोफा हिसकून घेतल्या. नवीन कारभाऱ्यानें व इतर कामगारांनीं पूर्वींच निश्चय करून, इंग्रज सरकारचा आश्रय धरिला होता यामुळें, त्यास ही गोष्ट ऐकून खेद वाटली नाहीं. कारण तसें झाल्यानें अनायासें संस्थानाच्या रित्या[२] खजिन्यामागील,

---

१ बाजीराव शरण आल्यावर रामदीनानेंही शरण येऊन आपल्या जवळच्या लोकांस रजा दिली. शरण आल्यामुळें, व माळव्यांत पुनः परत कधीं येणार नाहीं अशी कबुलायत लिहून दिल्यामुळें, इंग्रज सरकारानें सालीना तीन हजार रुपयांचें पेनशन त्यास करून दिलें. तो आतां त्या सरकारच्या मुलुखांत राहत आहे.

२ होळकर दरबारची तिजोरी, किती एक वर्षें पर्यंत रिती पडली

त्या फिसादी लष्कराचा पिच्छा सुटला; व अनायासें फार दिवस तुंबून राहिलेल्या पगाराचे त्रासरूपी दावे नाहींसे झाले.

यशवंतरावास वेड लागल्यापासून, इंग्रज सरकाराशीं मल्हाररावाचा तह होईपर्यंत, मध्यंतरीं जीं वर्तमानें घडलीं, त्यांचें वाजवीहून विशेष वर्णन केलें; परंतु यावेळीं या संस्थानाचें एक ध्यानांत राहण्या जोगें स्वरूप दिसून येतें. तें हें कीं, एका विशेष बुध्धिग्रहाखेरीज, दरबारांतील लोकांत परस्पर जोडते स्नेहसंबंध, हरएक नाहींसे झाले असतां, व राज्याधिकार खरोखरीच पूर्णपणें विलयास गेला असतां, केवळ चालत आलेल्या लोकसमजुतीच्या बळकट ग्रहानें मात्र, संस्थान हें नांव, कायम राहिलें होतें. मल्हाररावाच्या ठिकाणीं केवळ देवतेसारखा भाव, हीच काय ती, या अंदाधुंदीच्या व जोरजबरीच्या प्रसंगांत, दरबारच्या मंडळींत सर्वांस सारखी लागु पडणारी प्रयोजक बुद्धि होती. (याखेरीज अंतर ज्याचे त्याचे हेतु निराळे.) या बुध्धीमुळेंच, मल्हारराव ज्यांच्या हातीं होता त्यांस, कांहीं काळ केलेल्या गुन्ह्याचें शासन मिळालें नाहीं. जरी वयानें मूल तरी, त्याचें नांव, सर्वांस एकत्र ठिकाणीं आणील असें होतें. या अस्ताव्यस्त झालेल्या मंडळींत हा एक गुण होता कीं, वितुष्ट पडलें असतांही पुनःपुनः ऐक्य व्हावें; (या तऱ्हेच्या मंडळींत हा गुण सदा असतो.) व या गुणामुळेंच, सर्वांच्या भक्तीस केंद्ररूप जो मल्हारराव, त्याच्या नांवाचें विशेष महत्व होतें. त्या वेळचे बहुतेक सोंगाडी अझून रंगभूमीवर आहेत. तेव्हां, आजपर्यंत ते कशा प्रसंगांत वागले हें पाहून, पुढें त्यांची वागणूक कशा प्रकारची राहील याचें, कांहीं अनुमान होऊं सकतें.

---

होती. या घराण्यांतील दागदागिनें जडजवाहीर पूर्वीं भारी किमतीचें असे, तेंही बरेंच कमी झालें होतें. महत्पुराच्या लढाईंत वीस लक्षांहून अधिक रुपयांचा त्यांचा तोटा झाला नाहीं, असें ह्मणण्यास जागा आहे. प्रथमतः, झालेल्या तोट्याची अतिशयोक्ति झाली होती; परंतु पुढें शोधाअंतीं पुष्कळ आंख तुटला.

आतां अमीरखानाकडे आपणास वळलें पाहिजे—जो अमीरखान होळकरांचा धडधडीत नोकर असतां, गेल्या तीस वर्षांच्या राज्यक्रांतींत इतक्या योग्यतेस चढला. चालू प्रकरणांत सहजीं आलेल्या वर्णनाहून, या पुरुषाचें अधिक बारकाईनें वर्णन करणें जरूर आहे.

---

# प्रकरण ८.

## अमीरखान.

अमीरखान, मुरादाबाद परगण्यांत संबळ ह्मणून गांव आहे, तेथला राहाणारा होय. त्याचा बाप मुल्ला असे, व त्याजवळ कांहीं थोडा बहुत जमीनजुमला होता. वीस वर्षांच्या वयांत अमीरखान, करीमुद्दीन नांवाच्या आपल्या भावास बरोबर घेऊन, उत्तर हिंदुस्थानांतून निघाला. राहण्याच्या गांवीं, त्यांचें घराणें, वजनदार होतें. हें यागोष्टीवरून सिद्ध होतें कीं, निघतांना त्याजबरोबर दाहा अनुयायी लोक होते. यालोकांसह अहीरवाड्यांत[1] जाऊन त्याणें, रणोदच्या जमीदाराची[2] चाकरी पतकारिली. पुढें माळव्यामध्यें पेशव्यांकडून, कोणी मराठा कामगार, कित्येक परगण्यांची वहिवाट पाहाण्यास आला होता, त्याची नोकरी पतकारिली[3]. ही नोकरी सोडूनही, तो दुसऱ्या एका मामलेदाराच्या नोकरींत शिरला[4]. यातीन्हीं ठिकाणीं, अमीरखान आपल्या लोकांसुद्धां शिबंदींत चाकरीस होता. त्याच्या लोकांस सरासरी तीनपासून चार रुपयेपर्यंत दरमहा मिळे; व खुद्द त्यास दाहापासून पंधरा रुपयेपर्यंत. परंतु लवकरच या तरुण शिपायाचा उदयसमय आला. भोपाळच्या लहानशा दरबारीं, छत्तेखान कारभारी मेल्या नंतर, निरनिराळे पक्ष होऊन जो घंपाघोळ चालला

---

१ हा प्रांत माळव्याच्या ईशान्यसरहद्दीवर आहे. यांत पुष्कळ परगणे आहेत.

२ दिलीपसिंग.

३ याचें नांव देवजी होतें. याजकडे सुरोंज नजीक अरुण, टोमीन, वगैरे पंचमहालांचा मामला होता.

४ सुजालपूरचा मामलेदार, नजीखान.

त्यांत, निरनिराळ्या पक्षांनीं, आपआपले तर्फेचे कितीएक लोक ठेविले. यावेळीं ६० पायदळ व साहा घोडे घेऊन, अमीरखान, हयात महंमदखानाजवळ राहिला[1]. येथें तो सरासरी एकवर्षपर्यंत होता. नंतर निघून जाऊन, राघवगडचे पदच्युत ठाकूर, दुर्जनलाल व जयसिंग ह्मणून होते, त्यांस मिळाला. दौलतरावशिंद्यानें ठाकूरमजकुरांस त्यांच्या मुलकांतून घालवून दिल्ह्यामुळें, ते आतां, आपल्याच पूर्वींच्या जमीनी लुटून निर्वाह करीत असत.

अमीरखान या नोकरींत शिरल्यानंतर लागलीच, त्या ठाकुरांनीं आपल्या मराठ्याशत्रूंशीं सामना केला. त्यांत अमीरखानानें लौकिक संपादिला. यामुळें त्याला पांचशें लोकांचा अधिकार प्राप्त झाला; व मेणा वगैरे तैनातीस मिळून, एकंदरीनें बरेंचै वजनही प्राप्त झालें. पुढें तो येथें आणखी चढला असता; परंतु कितीएक राजपुतांशीं त्याचीं वळकट भांडणें झालीं. त्यांपैकीं एकांत तर, दगडाच्या मारानें तो इतका जखमी झाला होता कीं, पुन: बाहेर निघण्यास सामर्थ्य येई, तोंपर्यंत, सिरोंज मुक्कामीं त्यास तीन महिने दुखण्यांत पडून रहावें लागलें. यामुळेंच दुर्जनलालास सोडून, तो, बाळाराम इंगळ्या नांवाच्या मराठी सरदारापाशीं, चाकरीस राहिला. याप्रसंगीं बाळाराम, भोपाळच्या झगड्यांत गढून गेला होता.

बाळाराम इंगळ्यानें, अमीरखानाच्या ताब्यांतील लोकांची संख्या वाढवून, पंधराशें केली; व फतेगडचा किल्ला संरक्षण करण्याचें काम त्याजकडे सोंपिलें. मागें सांगितलेंच आहे कीं, हा किल्ला त्यास

---

१ हयात महंमदखानाचा दिवाण हिंमतराम असे, त्याणें यास ठेविलें. दैवाच्या विचित्रगतीनें पुढें जेव्हां हा अमीरखान नवाबाच्या योग्यतेस आला तेव्हां, हिंमतराम आपल्या जमादाराचा दिवाण झाला. या हिंदुगृहस्थाचा मुलगा दातेयाराम हल्लीं अमीरखानाजवळ मुख्य कामगार आहे.

सोडून देणें भाग आलें; परंतु या वेळेचा अपजयच त्याच्या उदयास कारण झाला. कारण कीं, त्याणें आतां यशवंतराव होळकराचा पक्ष स्वीकारिला. या यशवंतरावाच्या सोबतीनें, पुढें तो इतक्या लौकिकास चढला कीं, कित्येक वर्षेपर्यंत, मुलकाची शांतता नाहींशी करणाऱ्या पुढारी लोकांत, तो प्रसिद्ध असे.

प्रथमतः हा संबंध जडतांना, अमीरखान व यशवंतराव होळकर, एकमेकांचें बरोबरीचें नातें समजत. परंतु यशवंतरावाची पदवी मोठी; तो राज्याचा अधिकारी; व त्याच्या स्वभावगुणाचें सामर्थ्यही विशेष; अशामुळें लवकरच स्वामिसेवकांचें नातें त्यांजमध्यें स्थापिलें गेलें. तथापि या पठाण सरदारास यशवंतराव भाई ह्मणे; व त्यास इतर कामगारांहून विशेष योग्यतेनें वागवी. आपल्या ताब्यांतील लोकांवर, अमीरखानाचा सर्व तऱ्हेनें पूर्ण अधिकार असे. इच्छेस येईल त्यास तो नोकरींत ठेवी; व इच्छेस येईल त्यास काढून टाकी. यामुळें काहींअंशीं त्यास स्वातंत्र्य होतें; परंतु ही स्थिति हेवाकरण्यासारखी नव्हती. पगार देण्याचें जितक्यांस अंगीं सामर्थ्य त्यांहून, विशेष लोक हमेषा त्याजवळ असत. यामुळें, त्याच्या लोकांत हमेष फिसादही असे. दर साल साहामहिने अधिक, या सरदाराच्या घरावर धरणें बसलेलें असे. यामुळें, कोणत्याही नियमसूत्रास अनुसरून न चालतां, आपल्या फिसादी लष्कराच्या गवगव्यच्या मानानें, व त्यांच्या निर्वाहार्थ तजवीज करण्याचें जरूर दिसेल त्या मानानें, त्यास वागणें भाग येई. अमीरखानाच्या पठाणांनीं सागरास कसा कहर केला हें, मागें सांगितलेंच आहे. पुणें मुक्कामीं असतां, सागरापेक्षांही त्यांणीं विशेष कहर केला. येथें खुद्द त्यासच धरून (अमीरखानास) मारून चेचून, त्याचेंच पागोटें त्याच्या गळ्यास बांधून, त्याचा जीव घेण्यास ते तया-
सन १८०३. र झाले होते. यावेळीं यशवंतरावानें ही दांडगाई बंद केली, व करणारांस शिक्षा दिली खरी; परंतु, पुष्कळ प्रसंगीं ताब्यांतील लुटारू लोकांचा धुंडावी स्वभाव त्यासही सोसावा लागे; व हां हां

करून व चढवून देऊन, लोकांस शांत करावें लागे. अमीरखानाच्या पठाणांनीं पुण्यास, गोवध वगैरे करून, हिंदुलोकांस संतापास चढविलें[१]. गोवध करण्याची उजागऱ्यानें जी त्यांणीं मोकळीक घेतली त्यावरून, हरएक प्रसंगीं ते उद्धटपणानें, व जसे कांहीं आपण सर्वांचे धनीच आहों अशा तऱ्हेनें वागत असत, हें सिद्ध होतें. या लोकांस हमेषा दूरच्या कामगिरीवर ठेवावें असा, यशवंतरावाचा हेतु असे. हमेषा उपयोगी येणारें जें आपलें जातखत लष्कर त्यांत, पठाणांच्या मेळ्यांस, यशवंतराव लेखीत नसे हें, उघड दिसतें. तो इतकेंच समजे कीं, हा एक लुटारू लोकांचा जमाव आहे; व ह्यांच्या सरदाराशीं संबंध ठेविल्यापासून, एकंदरीनें सरासरी आपल्या ह्मणण्याप्रमाणें त्यांस वर्तविता येतें. इकडे यशवंतरावाचा समज असा. तिकडे अमीरखानाचे पठाण लोक असा समज घेत कीं, हिंदुस्थानांतील एका सर्वमान्य दरबाराच्या नांवानें कार्यें केलीं असतां, त्यांत आपलें हित आहे. पठाणांचा सरदार, ही अशाश्वत योग्यता, अमीरखानाची कायम राहाण्यास हेंच कारण होय कीं, होळकर दरबार व लुटारू सैन्य, यांचा संबंध राखण्यांत तो मध्यस्थी होता.

उत्तरहिंदुस्थानांतून अखेरची स्वारी परत आल्यानंतर, यशवंतराव व अमीरखान निराळे झाले. तोंपर्यंत यशवंतरावाच्या कारकीर्दीचें जें मागें वर्णन केलें आहे त्यांत, अमीरखानाचेंही वर्णन आलें. आतां तो जयपूर येथील, जगतसिंग राजाच्या चाकरींत शिरला. उदेपूरच्या

---

१ सन १८०२ मध्यें ग्वालेरीस मी असतां, दौलतराव शिंद्यानें मला सांगितलें कीं, जर तुह्मीं, आमचा इंग्रजसरकाराशीं तहनामा झाला आहे त्यांत, असें कलम घालाल कीं, इकडून दिलेल्या प्रांतीं कोणी गोवध करणार नाहीं तर, तुह्माला आणखी मुलूख तोडून देईन. यासालीं जरी दुष्काळ पडला होता तरी, त्याणें कित्येक लोकांस गोवधाबद्दल देहांत दंड केला.

राण्याची एक कन्या फार सुंदर असे. तिच्या पाणिग्रहणाविषयीं, जोतपूरच्या राजाशीं जगतसिंगाचा झगडा उभा राहिला होता; त्यांत मदत देण्याकरितां, त्याणें अमीरखानास ठेविलें.[१]

उदेपूरचें कूळ सर्व राजपुतांमध्यें पदवीनें उंच आहे ह्मणून, त्या कुळाशीं शरीरसंबंध जडणें ही गोष्ट, मोठ्या आब्रूस कारण होय, असें रजपूत राजे लेखीत आले आहेत. तशांत राजकन्या कृष्णाकुमारी इचा उंच कुळीं जन्म इतकेंच नव्हतें. अद्भुत लावण्याविषयींही तिची ख्याती होती. तिला जोतपूरच्या भीमसिंग राजास दे-

---

१ शिकंदर बादशाहाशीं जो पौरुष नामक राजा लढला, त्या पौरुषापासून उदेपूरच्या राजाचें प्रसिद्ध, परंतु आलीकडे मोडकळीस आलेलें घराणें, उत्पन्न झालें आहे, असें पुष्कळ मानितात. परंतु ही चूक आहे असें मला वाटतें. तथापि या गोष्टींत कांहीं संदेह नाहीं कीं, हिंदुस्थानांतील अत्यंत प्राचीन व प्रसिद्ध राजांपैकीं, हे राजे आहेत; व पूर्वकाळीं आग्रा प्रांताच्या पश्चिमभागामध्यें, व गुजराथ प्रांताच्या ईशान्यदिशेमध्यें, राजपुतान्याचा जितका भाग येतो, तितका सारा यांच्या ताब्यांत होता. या प्रांताच्या पूर्व हद्दीवर माळवा आहे. व पश्चिम हद्दीवर रेतीचें मैदान आहे. लांबी ३३० मैल्स (१६५ कोस) व, अत्यंत रुंद भागांत रुंदी २०० मैल्स (१०० कोस). या प्रांतांतील मुख्यसंस्थानें जयपूर, जोतपूर व उदेपूर. सर्वांत सुपीक मुलूक जयपूरचा आहे. परंतु जोतपूरचा मुलूक सर्वांत विस्तीर्ण आहे. या मुलकास बहुधा मारवाड असें ह्मणतात. उदेपूरचा मुलूक, ज्यास मेवाड असें ह्मणतात तो, आतां संकुचित असून उजाड आहे; परंतु इंग्रज सरकारच्या उदार आश्रयाखालीं, तो झपाझप पुनः सांवरत आहे. एकंदर राजपुतान्यांत, टेंकड्यांच्या व अरुंद खोंड्यांच्या पंक्तिमागेंपंक्तिच लागल्या आहेत, असें ह्मटलें पाहिजे.

ण्याचा वाङ्निश्चय झाला होता; परंतु तो राजा लवकरच मेला; व त्याच्या मरणानंतर, दूरच्या भावावंदांपैकीं मानसिंग ह्मणून कोणी पुरुष, गादीवर बसला.[1]

मागून दोन वर्षांनीं, भीमसिंगाचा कारभारी सवाईसिंग यानें, एक मुलगा, त्याच्या पोटचा आहे असें ह्मणून, (हें ह्मणणें खरें असो किंवा खोटें असो) त्या मुलाच्या तर्फे एक जबर पक्ष उभा केला; व आपले हेतु सिद्धीस जाण्याकारितां, जोतपूरच्या व जयपूरच्या राजांत हडवैर आणावें, हा उपाय बरा समजून, तो त्याणें योजिला. उदेपूरची राजकन्या आपल्यास प्राप्त होईल, असी मानसिंग उमेद बाळगून आहे हें जाणून, सवाईसिंगानें जयपूरच्या जगतसिंग राजास चेतवून, त्या-जकडून ती कन्या मागविली. तिच्या सौंदर्याचीं वर्णनें ऐकून, कामातूर होऊन, राजा जगतसिंग[2] तात्काल या फाशांत पडलो.

---

१ मानसिंगास गादीवर बसवितेवेळीं असा ठराव केला होता कीं, भीमसिंग राजाच्या राणीपैकीं एकादी गरोदर असून पुत्र प्रसवली तर, त्यापुत्रास गादी प्राप्त होईल. दोन वर्षेपर्यंत कोणीही दावेदार न उठतां, पुढें सवाईसिंग कारभारी यानें धोकळसिंग नांवाचा मुलगा आपल्या वहिणीच्या पोटीं उपजला असें ह्मणून, त्याच्या तर्फे दावा केला. परंतु खुद्द सवाईसिंगाच्या वहिणीनें, हें माझें लेंकरूं नाहीं असें ह्मटलें, व सवाईसिंग फिसादी ठरला. यामुळें लोक असें मानितात कीं, धोकळसिंग तोतया होता. परंतु या गोष्टीविषयीं साफ निर्णय ह्मणून कांहींच ठरलेला नाहीं.

२ जगतसिंग पुळपुळीत व वदफैली होता. अक्षय इंद्रियसुखांत तो निमग्न असे. त्याणें हलकट ठिकाणीं धरलेल्या प्रेमांचीं वर्णनें, व ज्या प्रीतिपात्रांना त्याणें योग्यतेस चढविलें त्यांचीं वर्णनें केलीं असतां, इतकीं विचित्र होतील कीं, लोकांस तीं खोटीं वाटतील. रसकापूर नांवाची एक मुसलमानी कळवंतीण होती; तिला जगतसिंगानें आप-

मग त्याणें, उदेपूरच्या राण्याशीं, कृष्णाकुमारीच्या पाणिग्रहणाविषयीं बोलणें लाविलें. व कांहींवेळ हा घाट जमतो व लग्न होतें, असाही संभव दिसून आला. परंतु इतक्यांत तें न होऊं देण्याची सवाईसिंगानें युक्ति योजून, जोतपूरच्या राजास बहकाविलें; व त्या राजकन्येच्या पाणिग्रहणाविषयीं आपला पूर्वींचा दावा सिद्ध करण्याकारितां, त्याजकडून आग्रह धरविला; इतकेंच नाहीं तर, जयपूरच्या राजाशीं संबंध घडूं लागल्यास, जबरदस्तीचा उपायही योजील असें केलें.

यापासून राजपुतान्यांत जे खटाटोप माजले, व जें युद्ध उभें राहिलें, त्या खटाटोपांच्या अथवा त्या युद्धाच्या बारीक वर्णनाची येथें जरूर नाहीं. इतकेंच सांगणें पुरे कीं, ज्या ज्या गोष्टीनें या उभयराजांचें निकर युद्ध होईल असें दिसलें ती ती गोष्ट, सवाई सिंगानें योजिली; व उभयतांकडून हरएक ठिकाणची मदत मागविली. त्यांणीं, इंग्रज सरकारानें या युद्धांत पडावें अशाविषयीं, पुष्कळ विनवणी केली. परंतु त्या सरकारानें ऐकिलें नाहीं. विनवणी ऐकून

---

त्या राज्यांत पहिल्या प्रतीच्या लोकांत सामील केलें. तिच्या नोकर लोकांत तो जातीनें चालत असे. व तिला त्याणें मोठमोठाल्या जाहागिरी दिल्या. आपल्या कुळांतील उंच उंच पदवीच्या राजपूत बायकांना त्याणें हुकूम दिला होता कीं, रसकापुरेस आपल्यापेक्षां उंच पदवीचें जाणून, मुजरा करीत जावा; व तिच्या भेटीस जात जावें. त्या बायकांनीं हा हुकूम मानिला नाहीं; व असें सांगून पाठविलें कीं, तिच्या सारख्या बदचालीच्या स्त्रियांबरोबर आपली योग्यता करून घेण्यापूर्वीं, तुमचा आग्रहच असेल तर विष खाऊं; अथवा जांबियानें भोसकून घेऊन, आह्मीं आपले प्राण देऊं.

१ सन १८०५ सालीं मी, दिल्लीमुक्कामीं लार्ड लेकाजवळ असतां, तेथें, जयपूरच्या राजाचा पक्ष धरून शिफारस करावी, व इंग्रजसरकारचें सैन्य मदतीस देववावें, अशा हेतूनें तिकडील वकिलानें मजपाशीं

अशी तजवीज योजिली कीं, बापूजी सिंदा, व सरजाराव घाटगा ह्या दुष्ट सरदारांस; आपआपल्या लुटारूलोकांचा निर्वाह, राजपूत राजांच्या तंट्यापासून परभारें करितां यावा. होळकरदरबारानें तर, अमीरखान व पठाण यांच्या रूपानें, शिंदे व घाटगे यांहूनही विशेष विषारी वाघ्र पाठविल्या.

परिणामीं जयपूर व जोतपूर या उभयसंस्थानांची पुरी धूळधाणी उडाली. या दुर्दैवी युद्धास जयपूरच्या राजाचा खर्च कमींतकमी म्हटला तरी, एक कोटी वीस लक्ष रुपया झाला; व त्यास जरीं आरंभीं यश प्राप्त झालें होतें तरी, अखेर त्याचा पराजय होऊन, फजीती झाली.

या युद्धांत मानसिंग पुरा फसला गेला असें पाहून, धोकळसिंगाच्या तर्फे सवाईसिंगानें, पुनः राज्याचें मागणें केलें. राजानें उत्तराची उडवाउडवी केली. मग हेंच मिष करून तो, आपण दरबारांतून निघून गेला इतकेंच नाहीं तर, बाकीचेही बहुतेक सरदार निघून जाईत असें त्यानें केलें. मानसिंग तर लढाईस उभा राहिला होता; त्याणें हा प्रकार पाहून, थोडेसे लोक बरोबर घेऊन, पळ काढिला. तेव्हां अर्थांतच त्याच्या छावणींतील सर्व असबाब, जगतसिंगास व त्याच्या मदतगारांस लुटावयास सांपडला.

एवढ्याच पराजयानें, मानसिंगाचें दुर्दैव संपलें नाहीं. जयपूरवाल्यांनीं जोतपूरच्या रस्त्यानें त्याचा पाठलाग करून, सर्व मुलूक उद्वस्त पाडिला; व धोकळसिंगास गादीचा मालक ठरविलें. बहुतेक राठोड सरदारांनीं या तरुण राजकुमारास धनी म्हटलें, व आतां झगड्याची समाप्तीच झाली, असें सर्वांस वाटूं लागलें; परंतु मानसिंगानें, व त्याजबरोबर जे स्वामिभक्तींत खरे असे थोडेबहुत

---

तऱ्हेतऱ्हेचें बोलणें लाविलें; व तऱ्हेतऱ्हेच्या देणग्या देण्याचें कबूल केलें. पुढें जोतपूरच्या राजानेंही, इंग्रज सरकारापाशीं मदत मागितली. त्याणें तर मदतीबद्दल मुलूक तोडून देण्याचें कबूल केलें होतें.

लोक होते त्यांणीं, हिंमत सोडिली नाहीं. पूर्वीपासून आपल्या शत्रूंची फोड करण्याविषयीं, मानसिंग उद्युक्त होताच. हल्लीं हा प्रयत्न त्याणें पुनः आरंभिला; व हा प्रयत्न सफल करण्यास, जोतपुरास जयपूरवाल्यांचा वेढा पडला होता तो वेढा, कांहीं अंशीं कारण झाला. कारण कोणताही दिलेला वेढा, फारदिवस राहण्यास हमेष हरकती उभ्या राहत असतात त्या, प्रस्तुत उभ्या राहिल्या; व त्या उभ्या असतां, मानसिंगानें अमीरखानाशीं बोलणें लाविलें, आणि अमीरखानानें तें मान्य केलें. फौजेचा पगार तुंबल्याची हमेषाची सबब लावून, तो, वेढा घालणाऱ्या सैन्यांतून फुटून निघाला; व जयपूरकरांच्या, व जोतपूरकरांच्या मुलकांत भेदाभेद न करितां, दोन्ही लुटीत, व दोहोंपासून वसूल गोळा करीत, चालिला. जयपूरवाल्याचे परगणे लुटून फस्त करण्यांत, त्याणें जो कहर केला त्यांत, बहुतकरून तद्देशीय सर्व सरदारांचे तोटे झाले. तेव्हां अर्थातच जिकडेतिकडे गवगवा माजला; व अमीरखानाचें शासन करण्यास, आपल्या जवळच्या सैन्यांतून कांहीं लष्कर, जगतसिंगास रवाना करावें लागलें. मग अमीरखान प्रथमतः टोंक परगण्याकडे हटत चालला. परंतु तेथें कांहीं पायदळ पलटणींची, व तोफांची मदत प्राप्त झाल्यामुळें, त्याणें पुनः पुढें सरून, जयपूरच्या सैन्यावर हल्ला केला; व त्यास पुरें पराजित केलें. हें पूर्ण यश प्राप्त झाल्यावर, अमीरखान आतां खुद्द जयपुरास येऊन पोहोंचतो असें सर्वांस वाटून, तेथील रहिवासी लोक अत्यंत गडबडून गेले. परंतु इतर प्रसंगांप्रमाणें या प्रसंगींही, अमीरखानाच्या वर्तनावरून असें साफ दिसून आलें कीं, तो केवळ लुटारू लोकांचा मात्र सरदार होता. जयपुरास गेलों असतां, आपण संकटांत पडूं अशा भीतीनें, त्याणें प्राप्त झालेल्या विजयाचें फळ गमाविलें; व शहराच्या आसपास लुटालूट करूनच, तो तृप्त राहिला. मग अर्थातच रहिवासी लोकांची दहशत उडाली; व शहराची भीति नाहींशी झाली.

जयपूरच्या सैन्याची पराजय वार्ता ऐकून, जगतसिंगाच्या ज्या फौजेनें जोतपुरास वेढा घातला होता त्या फौजेस, इतकी धास्ती बसली कीं, जगतसिंगास वेढा उठवून, परत जाण्याचा निश्चय करावा लागला. मग त्याणें कुमकेस आणिलेल्या शिंद्याच्या लष्करास, असें कबूल केलें कीं, जर तुह्मी आह्मांस जयपुरास नेऊन पोहोंचवाल तर, तुह्मांस अमूक मोठी रकम देऊं. नंतर ही कुमक बरोबर घेऊन, तो परत निघाला. प्रथम युद्धप्रसंगीं, जोतपूरवाल्यांच्या कांहीं तोफा, व कांहीं दुसरें सामान, त्याच्या हातीं लागलें होतें तें, त्याणें परततांना लष्कराच्या अघाडीवर चालविलें. इकडे कितीएक राठोड सरदार, वस्तुतः मानसिंगाशीं स्वामिभावानें वागत असतां, मानसिंगाच्या मनांत कांक्षा आल्यावरून, शहर सोडून असत. त्यांणीं आपला खरा भाव खात्रीनें दाखविण्यास, ही संधी चांगली आहे असें जाणून, आपसांत मसलत करून, आपल्या देशास कलंक लावून जी लूट जयपूरवाले नेत होते तिजवर, हल्ला केला. व जयपूरवाल्यांचा पुरता पराजय करून, चाळीस तोफा, व आणखीही पुष्कळ लूट परत आणिली. नंतर त्यांणीं अमीरखानाच्या लष्करास जाऊन मिळून, त्या सरदाराबरोबर, विजयघोष करीत जोतपुरीं पुनः प्रवेश केला.

वरलिहिलेलीं वृत्तें घडल्यामुळें, मानसिंगाचें दैव पुनः खललें; परंतु जोंकाळपर्यंत त्याचा शत्रु सवाईसिंग जिवंत होता तोंकाळपर्यंत, त्यास मोटी कडक धास्ती असे. तो सरदार नागोर येथें जाऊन आश्रयास राहिला होता. त्याजवर चालून जाण्यास, मानसिंग राजानें अमीरखानास अगाऊ दोन लाख रुपये देऊन विनविलें; व या महत्त्वाच्या कामीं यश संपादिल्यास, पुढें आणखीही कृपा दाखवूं, व संपत्ति देऊं असें सांगितलें. अमीरखानानें हें काम बजाविण्याचें कबूल केलें; परंतु तें सिद्धीस नेण्याकरितां त्याणें, प्रथमपासून, आपल्या सामर्थ्याहून आपल्या कावेबाजीपणावर, अधिक विश्वास ठेविला. नंतर नागोरापासून कांहीं कोसांच्या अंतरावर जाऊन राहून, व कांहीं गोष्टी जोतपुरास उघडीस आल्या-

मुळें, मानसिंगाची कृतघ्नबुद्धि आपल्या नजरेस आली; व त्यामुळें आपण त्याशीं नाराज आहों असें सोंग करून, सवाईसिंगाशीं संबंध जोडण्याकरितां त्याणें बोलणें चालविलें. यांत कपट आहे असें सवाईसिंगास प्रथमतः वाटलें; परंतु अमीरखानाकडून जो कामदार त्याजकडे गेला होता, त्याणें आमच्या धन्याच्या खरेपणाविषयीं मी, जामीन राहतों असें खातरीनें सांगितलें; व त्यास भेटावयास जाण्याचें त्याजकडून वचन घेतलें. वचन पार पाडण्याची वेळ जवळ आली तेव्हां, पुनः तो राजपूत सरदार कांकूं करूं लागला. हें पाहून अमीरखान खुद्द त्यास भेटावयास गेला. व कराराचीं बोलणीं करून, व शपथा वाहून, त्याणें सवाईसिंगास गुंगवून, तो आपल्यावर पुरा भरंसा राखी असें केलें. मग तो सवाईसिंग कांहीं एक कांक्षा मनांत न आणितां, आपल्या मानभावी मित्राच्या छावणींत गेला; परंतु तेथें तो व त्याच्या बरोबर गेलेले लोक बहुतेक मारले गेले.[1] आपला देश उद्ध्वस्त करण्यास जें युध्दकारण, त्या युध्दास सवाईसिंग कारण होता तेव्हां, त्यास झालेला देहदंड जरी कदाचित् यथार्थ असला तरी, त्यापासून अमीरखानानें केलेला वळकट गुन्हा कमी होत नाहीं. या प्रसंगीं त्याच्या वर्तनावरून, असें दिसून आलें कीं, दया व विचाराविचार हे गुण लेशमात्रही त्याजमध्यें नव्हते.

---

१ हें सारें समक्ष पाहिलेल्या एका अब्रूदार गृहस्थानें, खालीं लिहिल्याप्रमाणें मजपाशीं वर्णन केलें.

महमदशाह खानानें खात्रीचीं बोलणीं करून, सवाईसिंग अमीरखानास भेटण्याचें वचन देई असें केलें. परंतु भेटीस जाण्याची जशी वेळ आली तसें, तो मागंपुढें पाहूं लागला. बहुधा धोका आहे अशी कांहींनाकांहीं बातमी त्यास लागली असावी. तो येण्यास कांकू करीत आहे हें, जेव्हां अमीरखानास कळलें तेव्हां, तो घोड्यावर चढला; व कांहीं थोडे लोक बरोबर घेऊन, नागोरच्या तटबंदीजवळ एका

हीं वर्तमानें घडत असतां, यशवंतराव होळकरास वेड लागलें. यामुळें, नागोर शहर लुटून फस्त केल्यानंतर लागलीच, अमीरखानास भानपुऱ्याकडे जाणें भाग आलें. तेथें असतां, तो कशा तऱ्हेनें वर्तला याचें वर्णन, मागें झालेंच आहे. त्याचप्रमाणें नागपुराकडे

---

पिराची कबर आहे तेथें गेला. तो येत आहे असें पाहून, सवाईसिंगही तेथें आला. मग त्यास बोल लावून अमीरखान ह्मणाला कीं, जो पुरुष तुमच्या वांकड्यावर असेल तो पुरुष, आज ज्याप्रमाणें मी विश्वास दाखवितों त्याप्रमाणें कधीं तरी दाखवील काय? व ज्यास मनांतून फसवावयाचें, त्याच्या ताब्यांत एकटा येईल काय? हें एकून मी चुकलों असें सवाईसिंगानें ह्मटलें. मग ह्यांचे आपसांत नजरनजराणे झाले; खिलतें झालीं; भाईचारा दाखविण्याकरितां त्याचें पागोटें त्याणें घातलें; व त्याचें त्याणें घातलें; आणि पिराच्या कबरीवर हात ठेवून, अमीरखानानें शपथ वाहिली कीं, आजपासून तुमच्याशीं मी खऱ्या भावानें वागेन. आतां अर्थातच त्याच्या छावणीस जाण्यास हरकत नाहीं असें सवाईसिंगास वाटून, तो दुसरे दिवशीं तेथें गेला. त्याचा आदरसत्कार करण्यासाठीं, तयारीचा थाट माजला होता; कितीएक सरदार पेशवाईस जाण्यास उभे होते; लष्करांतील शिपाई वगैरे लोक कांहीं सलामी करण्याच्या मिषानें, व कांहीं परेडीच्या मिषानें हत्यारबंद झाले होते; आणि तोफा गोळे लावून तयार केल्या होत्या; व त्यांचा रोख सवाई सिंगाच्या डेऱ्यावर योजिला होता. सवाईसिंग कांक्षा मनांत न आणितां, आपल्या मुख्य मंडळीसह येऊन बसला. इतक्यांत ठरलेला इषारा झाला; व तो होतांच डेऱ्यावर गोळे पडूं लागले. अमीरखानाच्या कामदार लोकांनीं आपआपला बचाव केला. परंतु बिचारे राजपूत सरदार जितके आले होते तितके, सर्व क्रूरतेनें मारले गेले. सवाईसिंगाबरोबर सातशें स्वार हजर होते त्यां पैकीं, दोनशें मात्र वांचले. बाकीचे सर्व मारले

त्याणें नेलेल्या स्वारीचेंही वर्णन झालें आहे. होळकर व भोसले यांजमधील कांहीं हिशेबाचा फैसला करून घेण्याची सबब लावून, ही स्वारी त्याणें नेली. परंतु त्याचा वस्तुतः हेतु, लूट संपादन करण्याचा होता.[1] यावेळीं अमीरखानाच्या पायदळपलटणी व तोफा, जरीं महमदशाहाखानावरोबर जोतपुरीं होत्या तरी, भोपाळचा नबाब व पेंढारी लोक येऊन सामील झाले, यामुळें, त्याजजवळ लष्कर खूब जमलें. भोपाळच्या नबाबाचें रघूजीशीं वांकडें असल्यानें, त्या राजा-

---

गेले. तोफांची सरबत्ती चालली तेंव्हां, अमीरखानाचेही कांहीं लोक पडले. त्यांत एक तर खुद्द त्याचा नातलगच होता. सवाईसिंगाचा प्राण गेल्यावर, अमीरखानानें त्याचें डोकें तरवारीनें कापून, मानसिंगाकडे पाठविलें; व मानसिंगानें याबद्दल त्यास बक्षिसीदाखल जाहागीर देऊन, खेरीज पुष्कळ द्रव्यही दिलें.

१ या प्रसंगीं अमीरखान ह्मणाला कीं, मी होळकरदरबाराच्या हुकुमावरून वागत आहें. परंतु गवरनर जनरलानें जेंव्हां यशवंतरावास पत्र लिहिलें, व नागपुराकडे सैन्य पाठविण्याचें कारण विचारिलें तेंव्हां, खऱ्या मराठी वकिलातीच्या धरतीस अनुसरून, त्याच्या कारभाऱ्यानें उत्तर लिहिलें कीं, नागपूरकरांविरुद्ध युद्ध करण्याचा आमचा मनसुबा नाहीं. आतां अमीरखान, भोसल्यांच्या राज्यांत शिरला खरा; परंतु कशासही धक्का न लावितां, उलटें भोसल्यांचा मुलूक संरक्षीत जावा, असा आह्मीं त्यास हुकूम दिला आहे. व हल्लीं गव्हरनर जनरलाचें लिहून आल्यावरून, हा हुकूम पुनः लिहून पाठवीत आहों. बहुशः हें पत्र अमीरखानानेंच लिहविलें असेल. वस्तुतः लुटारू लष्कराची स्वारी पाठविली ही गोष्ट तर त्यांणीं कबूल केली; परंतु नागपूरकरांशीं सख्य राखण्याचाच आमचा हेतु होता असें ते ह्मणत. यावेळीं हें टाळाटाळीचें उत्तर, कांहीं एक राजकारणासाठीं, कबूल करावें लागलें.

घे जे कोणी शत्रु असत त्यांचा, तो नवाब मोठ्या उत्साहानें, आपण होऊन, साह्यकारी होई.

यापुढें होळकरांचें दरबार मोडकळीस आलें; शिंद्यांच्या दरबारीं अंदाधुंदी चालू झाली; निजामाच्या अमलांतील पुष्कळ लोक फिसादी स्वभाव दाखवूं लागले; व अमीरखानाच्या लैंकिकाचा कळस होऊन त्याजबरोबर मोठें लष्कर राहूं लागलें. या सर्व गोष्टींवरून, बहुतेक लोक असा तर्क बांधूं लागले कीं, मुसलमानांची सत्ता पुनः स्थापन करण्याचा इरादा, तो करीत आहे. मुत्सदीपणांत अथवा लष्करी कामांत, जर अमीरखान मोठा बुद्धिमान् पुरुष असता तर, निःसंशय हा काळ वर लिहिलेला हेतु, सिद्धीस नेण्यास अनुकूल होता. परंतु हा हेतु, त्याणें कधींही चांगला विचार करून, मनांत आणिला नव्हता असें ह्मणण्यास हरकत नाहीं. दिल्लीचा बादशाह तूं होशील ह्मणून, कोणी एका फकीरानें अमीरखानास सांगितलें होतें; तें हल्लीं बहुधा खरें झाल्यासारखें आहे, असें त्याच्या ताब्यांतील पठाण लोक हमेषा बोलत. परंतु असें बोलणारांस अमीरखानाकडून उत्तेजन मिळत नसे. तो हमेषा, जें करणें तें होळकरदरबाराच्या नांवानें मात्र करी. लुटारू लष्कराच्या सरदारीपासून प्राप्त झालेली जी सत्ता, तीखेरीज दुसरी सत्ता मिळविण्यासाठीं, त्याणें कोणत्याही वेळीं कोणताही यत्न मांडिला नाहीं. त्याचा हेतु इतकाच होता कीं, प्रस्तुत चालू असलेल्या अंदाधुंदीपासून, कशाही तऱ्हेनें आपल्या ताब्यांतील लुटारू लष्कर जमून राहावें; व त्याचा गुजारा चालावा.

नागपुराहून परत येऊन, यशवंतरावास, व त्याच्या कुटुंबांतील माणसांस, धर्मकुंवराच्या जाचांतून सोडविल्यानंतर, अमीरखानानें पुनः एका कठोर कृत्यांत पुढारीपणा घेतला. या प्रसंगीं त्याचा हेतु चांगला होता; परंतु त्याणें केलेलें कृत्य स्वभावतःच असें होतें कीं, तें दयार्द्र अंतःकरणास किंचितूही सहन होत नाहीं. जयपूरच्या व जोतपूरच्या राजांमध्यें पुनः सख्य व्हावें ही गोष्ट, योग्य व शाहाण-

पणाच्या मसलतीनें साधावी अशी होती; व ती साधण्यांत अमीरखानाचा मतलबही होता. ह्मणून हा घाट आणण्याकरितां त्याणें, त्या उभयराजांचीं लग्नें परस्परांच्या कुळांतील कन्यांशीं व्हावीं असें योजिलें. जगतसिंगाचा विवाह, मानसिंगाच्या मुलीशीं व्हावा; व मानसिंगाचा विवाह, त्याचा शत्रु व त्याच्या भक्तिस्थानाच्या ठिकाणींच भक्ति ठेविणारा जो जगतसिंग, त्याच्या बहिणीशीं व्हावा असें, त्याणें ठरविलें. उभयपक्षीं प्रसन्नता राहून हे विवाह व्हावे, व उभयपक्षांच्या अब्रूस कमीपणा न यावा याकरितां, उदेपूरच्या कृष्णाकुंवर राजकन्येस कसा तरी मृत्यु आला पाहिजे असें, या मसलतींतील सर्व मंडळीस वाटलें.[1] मग तिला बळी देण्याचा विचार सुरू झाला. त्यावेळीं अमीरखान उदेपुरास होता; व त्याणें तेथील मंत्रिमंडळास ही गोष्ट करणें अवश्य आहे ह्मणून सांगितलें. तो असें ह्मणाला कीं प्रस्तुतच्या युद्धास जी कारण आहे, ती जों पावेतों जिवंत राहील तोंपावेतों, हा झगडा मिटणें फार कठीण आहे. बरें झगडणाऱ्या दोघांसही, ही राजकन्या न देतां, एकाद्या तिसऱ्याच सरदारास द्यावी असें जर मनांत आणिलें तर, विशेष कार्य न होतां, फुकट दोघांचाही राग संपादिला असें होईल. तशीच अविवाहित ठेवावी तर, उदेपूरच्या लौकिकास बट्टा येतो. कन्या अविवाहित राहिली असतां, कुळास कलंक लागतो, ही जी राजपुत लोकांच्या महत् अभिमानाची खोटी समजूत, त्या समजुतीस बळकटी आणणारीं अशीं पुष्कळ भाषणें त्याणें केलीं. राजाराण्याचें मन वळविण्यासाठीं, हा सारा वाग्जाल होता; परंतु आपल्या लेंकराचा वध करण्याकरितां, अथवा

---

१ अमीरखानानें उदेपूरच्या राण्याजवळ, ही गोष्ट उघडपणानें आपण पुढें होऊन काढिली नाहीं. या प्रसिद्ध प्रसंगीं, कुराण्याचा ठाकूर अजितसिंग, मध्यस्थी करण्यास, अमीरखानाचें कळसूत्री बाहुलें झाला होता असा लोकांचा त्या ठाकुरावर दोष आहे.

तिला तूं आपल्या जिवाची वाट लाव ह्मणून सांगण्याकरितां, राजाराण्याचें मन अमीरखानाच्या बोलण्यानेंही वळलें नाहीं; व त्याणें दाखविलेल्या भीतीनेंही वळलें नाहीं; असें लोक सांगतात. एकंदर मनुष्यजातीच्या भूषणासाठीं, या सांगण्यावर आपण विश्वास ठेवावा हें ठीक. राण्यानें जरी ऐकिलें नाहीं तरी, ही मसलत चांदाबाई ह्मणून त्याची बहीण होती तीस मानवली. तिणें कृष्णाकुंवरेच्या हातीं विषाचा प्याला दिला; व तिची अशी विनवणी केली कीं, बाई तुझ्या उंच जन्मापासून हा झगडा व हें संकट प्राप्त झालें आहे तर, हा प्याला घेऊन आपल्या बापाचें, आपल्या कुलाचें व आपल्या जातीचें रक्षण कर. विनवणी व्यर्थ गेली नाहीं. कृष्णाकुंवरेनें एकामागें एक असे तीन विषाचे प्याले घेतले. अखेरचाप्याला घेऊन तत्काळ मृत्यूच्या स्वाधीन होण्यापूर्वीं, ती ह्मणाली कीं, माझ्या ललाटीं लिहिलेला हा विवाह होता. राजवाड्यांत काय चाललें आहे हें सर्वांस माहीत झालें होतें यामुळें, व कृष्णाकुंवरेच्या तारुण्यामुळें, व अद्वितीय सौंदर्यामुळें, इतके लोक संतप्त झाले कीं, तशा प्रकारचा संताप हिंदुस्थानांतील लोकांस क्वचितच प्राप्त होतो. हें वृत्त त्यावेळीं त्याठिकाणीं हाजर असलेल्या कितीएकांच्या सांगण्याप्रमाणें मी लिहिलें आहे. ते सर्व सांगतात कीं, या राजकन्येच्या मृत्यूची बातमी, उदेपूर शहरांत पसरतांच, चहूंबाजूंनीं विलापांचा मोठ्यानें ध्वनि होऊं लागला. व एकीकडे लोक तिच्या दुर्दैवासाठीं खंती करूं लागले, व एकीकडे ज्या भितऱ्या व षंढ लोकांनीं अशा उपायांनीं आपला बचाव राखिला त्यांस, शाप देऊं लागले. हें शोकरसानें भरलेलें वृत्त झाल्यानंतर, थोड्याच वेळानें राजकन्येची आईही मृत्यु पावली. हें ऐकूनही पुनः लोकांचा संताप झाला. आपल्या सुंदर, व लाडक्या

---

१ हें वृत्त घडल्यानंतर अकरा वर्षांनीं सन १८२१ त, मार्च महिन्यांत, मी उदेपूरच्या दरबारीं गेलों होतों. तेथें दर लिहिलेल्या

लेकीचा परिणाम ऐकतांच, जो तिच्या ह्रदयांत धक्का बसला, त्यापासून ती सांवरली नाहीं. अजितसिंग, उंच पदवीचा पुरुष होता; व त्याचें आपल्या राजापाशीं अतोनात वजन होतें; तथापि तो या गोष्टींत प्रथमपासून अखेरपर्यंत कुलीनपणा सोडून, अमीरखानाच्या हातीं बाहुल्यासारखें वागला. त्याच्या अशा वागणुकीनें, उदेपूरच्या सरदारमंडळीस जो कलंक लागला तो, करडरचा ठाकूर सगवनसिंग याणें, आपल्या योग्य वर्तणुकीनें उडवून टाकिला. राजवाड्यांत झालेलें वृत्त ऐकतांच, तो स्वार होऊन, उदेपुरास तावडतोब आला. घोडा धांपा टाकितोच आहे, तो थांवतो न थांवतो तोंच, खालीं उडी टाकून, अदवी वे अदवीचा विचार न करितां, एकदम, राजा आपल्या मंत्रिमंडळासह विलाप करीत बसला होता त्याठिकाणीं, तो गेला; व दम न धरितां, त्याणें प्रश्न केला कीं, राजकन्या जिवंत आहे किंवा मेली? प्रश्न ऐकिल्यावर कांहींवेळ स्तब्ध राहून अजितसिंगानें उत्तर केलें कीं, गेलेल्या लेकराचा खेद करीत बाप बसला आहे त्यांत, व्यत्यय आणूं नको. हें ऐकतांच, वृद्ध सगवनसिंगानें पडदळांतून तरवार काढून, ती तरवार, व ढाल महाराण्याच्या पायांपुढें ठेविली; व शांतपणानें, परंतु निश्चयबुद्धीनें प्रत्युत्तर केलें कीं, "माझ्या वाडवडिलांनीं आपल्या वाडवडिलांची सतत वीस पिढ्यांहूनही अधिक नोकरी केली. आतां माझे विचार मी आपल्यापाशीं प्रकट करूं सकत नाहीं; परंतु आजपासून पुढें हीं शस्त्रें, आपल्या सेवेंत मी धारण करणार नाहीं." महा-

---

गोष्टीचा खरेपणा ताडून पाहण्यास, हवीं तितकीं साधनें मिळालीं. कृष्णाकुंवरेचा भाऊ जीवनसिंग, हल्लीं राज्याचा मालक आहे; त्यास पाहतांच, तिच्या सौंदर्याविषयीं, माझा असलेला संशय फिटला. ती हुबेहूब त्यासारखी होती असें ह्मणतात. जीवनसिंगाचा चेहेरा फार शुभ्र असून, सर्व मुद्रा सुंदर आहेत; व हिंदूंच्या मुद्रेमधील सौम्यपणा त्यांमध्यें आहे इतकेंच नाहीं; तर उत्साहाचें व बुद्धीचें तेजही आहे.

राण्यास इतकें बोलून तो अजितसिंगाकडे वळला, व त्यास ह्मणाला कीं, पाजी माणसा ! राजपुतांच्या नांवावर हा कळंक ज्या तूं आणिलास त्या तुजवर दुःखित बापाचा शाप पडो; व तुझें निःसंतान होवो. असें बोलून तो, बसलेली मंडळी सोडून चालता झाला. यावेळीं हजर असलेले लोक सांगतात कीं, त्याच्या बोलण्यापासून ऐकणारांच्या आंगावर रोमांच उभे राहिले. ही गोष्ट घडल्यापासून आठ वर्षेंपर्यंत सगवनसिंग जिवंत होता; व जरी त्याणें स्वामिभक्ति सोडिली नाहीं तरी, पुनः शस्त्र ह्मणून हातीं धरिलें नाहीं. अजितसिंगाचें एक लेंकरूं राहिलें होतें तें, थोड्या काळापूर्वीं मरण पावलें. धर्मभोळे राजपूत, सगवनसिंगानें दिलेला शाप अजितसिंगावर पडला असें मानितात. परवांपर्यंत अजितसिंगाचें वजन आपल्या धन्यावर होतें. परवांपासून मात्र राण्यानें त्याची बेअब्रू करून त्यास हकून लाविलें, यामुळें उदेपूरच्या लोकांस मोठा आनंद झाला. ज्या राजकन्येची खंत अझून ते विसरले नाहींत. तिणें केलेल्या आत्मनाशास मुख्य कारण तो होता, असें ते लोक मानीत होते.[१]

आतां अमीरखान उदेपुराहून जोतपुरास गेला. जोतपूरवाले व जयपूरवाले यांजमधील तंटा मिटल्यापासून, त्याच्या पठाण लोकांच्या टोळ्या सर्व राजपुतान्यांत जेथें कोठें लूट मिळेल असें दिसे तेथें तेथें, सन १८१२।१३. फिरूं लागल्या, त्याच्या लुटीच्या कारखान्यांत फक्त या तीन गोष्टींमुळें, केव्हां केव्हां व्यत्यय येई. त्या तीन गोष्टी ह्या कीं, प्रसंगोपात्त पठाण बंडावत, प्रसंगोपात मुख्य कामगार आपसांत कज्जे करीत, व प्रसंगोपात्त, लढतांना, एकादें तटबंदीनें मजबूत झालेलें ठिकाण टिकाव धरून लढे.

---

१. अजितसिंगास हाकून लाविलें; व असें केल्यामुळें लोकांस मोठा आनंद झाला; ही बातमी, उदेपूर येथील पोलिटिकल एजंट कपतान टॉड याणें सन १८२१ च्या जून महिन्यांत मला लिहून पाठविली.

थोडक्या वर्षांत, जोतपूरच्या संस्थानांत अत्यंत अंदाधुंदीची व द
सन १८१४।१५. रिद्राची शिकस्त झाली हें पाहून, इंदुराज या नांवाच्या कारभाऱ्यानें, मानसिंगाचा गुरु देवनाथ ह्मणून असे त्याच्या मदतीनें, आपल्या देशाच्या विध्वंसकर्त्यास घालवून देण्याचे यत्न मांडिले. या देवनाथाचें मानसिंगापाशीं फार वजन असे. वर लिहिल्याप्रमाणें निश्चय करून, इंदुराज, देवनाथ वगैरे मंडळींनीं अमीरखानास निघून जावयास सांगितलें. त्याणें नाहीं ह्मटलें नाहीं; परंतु आपल्या हिशेबाची तावडतोब वाट लावा ह्मणून आग्रह धरिला. त्यांणीं हिशेवाची व्यवस्था जोतपूरसंस्थानाच्या शक्त्यनुसार केली. मग एकंदर व्यवस्था आतां सुरळीतपणानें होईल असें दिसूं लागलें. अमीरखान शहर सोडून बाहेरही गेला होता; परंतु त्याचे कांहीं स्वार हिशेबाचा थोडा फैसला होणें राहिला होता याकरितां, शहरांत मागें राहिले होते. त्या स्वार लोकांनीं इंदुराजास कैद केलें. यामुळें, झगडा उभा राहिला. या झगड्यांत त्या दंगेखोर पटाणांनीं इंदुराज व देवनाथ या दोघांसही ठार मारिलें. पठाणांचा उद्धटपणा व शेखी, या प्रसंगीं इतकी माजली होती कीं, त्यांणीं केलेल्या गुन्ह्यांत आपला अंश नाहीं ह्मणून, जें अमीरखान ह्मणे तें, कांहींसें खरें दिसलें. तथापि असें अनुमान करण्यास अनेक कारणें आहेत कीं, वर लिहिलेले खून होतील असें त्यास ठाऊक होतें इतकेंच नाहीं; तर ते त्याच्याच हुकुमानें झाले. वर लिहिलेल्या गोष्टींनीं राजामानसिंगास इतका धक्का पोहोंचला, व इतकी दहशत वसली, कीं, त्याणें तत्काळ धर्मवैराग्य घेतलें; व सर्व ऐहिक गोष्टींचा त्याग केला. लोकांशीं त्याणें बोलणें सोडिलें. आपली दाढी वाढविली, व लवकरच तो असा दिसूं लागला कीं, यद्यपि जिवंत, तथापि संसारांतील सर्व हिताहितापासून, व काळजीपासून मुक्त झाला आहे. अशा स्थितींत, कांहीं दिवस त्याचे लोटले असें पाहून, त्याचा मुलगा चतुरसिंग राज्यकारभार पाहूं लागला. इंदुराज व देवनाथ यांच्या खुनांत, हा सामील होता असें ह्मणतात. चतुरसिंग दोन वर्षें कारभार

पाहून, मृत्यु पावला. नंतर त्याच्या बापानें, इंग्रज सरकाराच्या आश्रयाचा भरोसा पाहून, धारण केलेलें वैराग्य सोडिलें; व तो पुनः राज्यकारभार पाहूं लागला.

सन १८१७. यानंतर अमीरखान पुनः जोतपुरास आला नाहीं. पुढच्या दोन सालीं जयपूरचा मुलूक लुटून फस्त करण्यांत, त्यास पुष्कळ कामगिरी होती. या मुलकांतील मांडोराजापूरच्या किल्ल्यापाशीं नऊ महिने त्याचा तळ पडला होता. हा किल्ला वेढीत असतां, सर डेव्हिड आक्टर लोनीच्या ताब्यांतील, इंग्रज सरकारचें लष्कर, राजपुतान्यांत शिरलें. ज्या लुटारू कारखान्याचे, अमीरखान व अमीरखानाची फौज मुख्यस्तंभ असत, तो लुटारू कारखाना एकंदर बंद पाडण्याच्या हेतूनेंच, हें लष्कर आलें होतें. आतां इंग्रज सरकारास आड येऊन विजय प्राप्त होण्याची या पठाण सरदारास उमेद नव्हती; ह्मणून, व इंग्रज सरकारानें, सांगितलेले ठरावही, अत्यंत सौम्य होते ह्मणून, त्याणें ते कबूल केले. असंख्य लुटारू लोकांचा त्याजजवळील जमाव, जो लष्कर हें नाव पावला होता तो, मोडून टाकण्याचें जरी इंग्रजसरकारानें योजिलें तरी, खुद्द त्याची राजाप्रमाणें तरतूद केली. होळकरदरबारांतून त्याजकडे असलेला मुलूक, जसाचातसाच त्याजकडे चालविला. या मुलकाचा वसूल अंदाजें सालीना १५ लाख रुपये आहे. याखेरीज इंग्रजसरकारानें स्वसंतोषानें अमीरखानास रामपूरचा परगणा किल्ल्यासह दिला.

सन १८१७. अमीरखानानें मनांत आणिलेले कांहीं हेतु फसल्यामुळें, व आतां सोडून दिलेल्या लोकांच्या नाराजीमुळें, व निंदेमुळें, इंग्रज सरकारच्या अटी कबूल केल्यानंतर कांहीं वेळ, अमीरखान चिरडीस गेल्यासारखा झाला होता. परंतु थोडा वेळ गेल्यानंतर, तो शांत झाला. शांत होण्यास निःसंशय गवरनर जनरलाचें औदार्य कांहीं अंशीं कारण झालें असावें. हा पठाणांचा सरदार सावध, व हिताहिताची संधी साधणारा असे. त्याच्या धूर्तपणाच्या विशेषामुळें, केव्हांकेव्हां

त्याच्या धैर्याचा, लोकांस संशय येई. ज्यावेळीं, आपल्या झेंड्याखालीं हिंदुस्थानांतील लुटारू निम्में लष्कर उभें करवलें असतें, त्या वेळीं जो अमीरखान इंग्रजसरकाराशीं युध्द करण्यास उभा राहिला नाहीं, तो आतां, पुढें देशाची शांति मोडण्यास कारण होईल, असा फारसा संभव नाहीं. खेरीज अमीरखानाच्या सत्तेचा मुख्य उगम, नांवाचा दवदवा, हा असे. तो दवदवाही आतां उडाला आहे. खरोखरीच महत्कार्यें करण्याचा प्रसंग सोडून, ज्यांना स्वस्थ बसावें लागतें त्या लोकांस, मागें केलेल्या कृत्यांबद्दल लोकमान्यता प्राप्त होत असत्ये. ती अमीरखानाइतकी कमी, थोड्याच पुरुषांस प्राप्त झाली असेल. होळकरांचें दरबार अर्थातच समजतें कीं, आपल्या राज्यापासून अमीरखानाचा उदय असतां, त्याणें आपल्यास सोडिलें व नागविलें. मंदोसरचा तह होण्यापूर्वीं, व तो झाल्यानंतरही, तें दरबार व इंग्रजसरकार यांमध्यें मध्यस्थि करण्याचा अमीरखानानें हेतु दाखविला होता[1]. तेव्हां, दरबारांतील सर्व पक्षांनीं त्याच्या ठिकाणीं द्वेषबुध्दीच प्रकट केली. तथापि हें कबूल केलें पाहिजे कीं, (अमीरखानामध्यें एकादा चांगला गुण म्हाणेंच असेल तर, तो हा होता.) आपला मित्र व धनी जो यशवंतराव होळकर त्याच्या ठिकाणीं, अमीरखानाची हमेष पूज्य बुद्धि व भक्ति असे. या भक्तीमुळेंच त्याणें यशवंतरावास बदफैलांतून सोडविण्याचा हर एक प्रयत्न योजिला होता[2]. व या

---

१. तहाच्या पूर्वीं व तहाच्या नंतरही, मध्यस्थी करण्याविषयीं मोठ्या उत्सुकतेनें लिहिलेलीं अमीरखानाकडून मजकडे पत्रें किती एक आलीं होतीं. हरएक पत्राच्या जबावांत मी त्यास हेंच लिहिलें कीं, ही गोष्ट कांहीं घडावयाची नाहीं.

२. पुणें मुक्कामीं असतां, यशवंतरावाच्या बदफैलीची शिकस्त झाली होती. विजयाच्या मदानें व ज्या चेरीत्रांडीची त्यास अतोनात आवड असे तिच्या धुंदीनें, अत्यंत वाईट व निर्लज्जपणाचीं कृत्यें त्याणें

भक्तीमुळेंच वेडांतून यशवंतरावास बरें करण्यासाठीं, तो मनापासून झटला होता. तसेंच साद्री मुकामीं धर्मकुंवराची जी गर्दी झाली होती तींत अमीरखानानें आपल्या जिवाची तमा धरिली नव्हती, हेंही त्यास भूषण आहे. अमीर खानाचा अत्यंत द्वेष करणारे शत्रूसुद्धां, हें कबूल करितात कीं, यशवंतरावावर त्याची भक्ति होती खरी.

निर्जीव झालेल्या, व अंदाधुंदींत पडलेल्या, हिंदुस्थानांतील राज्यांच्या आपसांतील झगडयांची संधि साधून, ज्या असंख्य बाजारबुणग्यांनीं उगीच शस्त्रें बाळगून, लुटी माजवून, आपला निर्वाह चालविला होता, त्यांचा मुख्य सरदार अमीरखान असे. यामुळें, त्याचें मागील चरित्र, जरूरीहून विशेष लिहिलें आहे. आतां थोडक्यांत त्याचा स्वभाव व त्याची सांप्रतची स्थिति दाखवितों.

अमीरखानानें आपल्या निर्वाहाकरितां, पुष्कळ परगणे लावून घेतले होते. त्याच्या तब्यांत पुष्कळ किल्लेही आले होते, परंतु त्यांतून, त्याणें एक किल्लासुद्धां आपल्या कबज्यांत ठेविण्याची संधि साधून घेतली नाहीं. आपल्या करितां निराळें व स्वतंत्र राज्य स्थापण्याचा हेतु त्याणें कधीं धरला होता असें दिसत नाहीं. याजवरून त्याजमध्यें शाहाणपणा होता हें दिसून येतें. तसा यत्न जर तो मांडिता तर, यश पावता किंवा नाहीं याचा, सदा संशयच असे. यत्न करून फसला असता तर, त्यास कोणीच पुसलें नसतें. आपण कशा कच्चा पायावर उभे आहों हें, तो चांगलें जाणत असे. दुरून लोकांस असें दिसे खरें कीं, हिंदुस्थानांतील मुसलमानी शिपाई लोकांचा, अमीरखान, मुख्य आहे. परंतु खुद्द अमीरखानास, आपल्या ताब्यांतील केवळ रोज-

---

केलीं; त्यांजबद्दल अमीरखान धैर्य करून, व उघड बोलून, त्यास रागें भरला. या बद्दल यशवंतराव त्याजवर रागावला नाहीं. व पुन: असें करणार नाहीं ह्मणून अमीरखानास वचन देऊन त्याणें तें कांहीं दिवस पाळिलेंही. परंतु तो नित्यकृत्यास लागायचा तसा लागला.

मुऱ्याकरितां नोकरी करणाऱ्या लोकांच्या नित्य फिसादामुळें, नित्य आठवण होई कीं, आपण या लोकांच्या हातीं, केवळ बाहुलें आहों. अस्तु. आजपर्यंत कोणतेही उद्देश धरून, व कोणतेही हेतु साधण्याचें मनांत आणून, तो वर्तला असो. यापुढें पूर्वींसारखे गुन्हे करण्यास त्यास लालूच राहिली नाहीं. कित्येक लोक त्याच्या तर्फेनें असें ह्मणतात कीं, कालमानान्वयें गुन्हे करणें त्यास भाग आलें होतें. आतां हें कारणही राहिलें नाहीं. तेव्हां अशी उमेद धरण्यास हरकत नाहीं कीं, तो आपली प्रस्तुत स्थिति जाणून, आपल्या राज्याची चांगली व्यवस्था ठेवून, व तें सुधारून, इंग्रजसरकाराचा आश्रय व लोभ कायम राखील.

॥ समाप्त ॥